टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

# ‘पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास’

संशोधक

कु.प्रिया लक्ष्मण तांबे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस. पी. शिंदे

सप्टेंबर,२०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी कु. प्रिया लक्ष्मण तांबे यांनी, 'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. हे संशोधन पूर्णपणे नवीन असून प्रस्तुत प्रबंध यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : सातारा                                   मार्गदर्शक

दिनांक : / /२०१४

(प्रा. डॉ. एस. पी. शिंदे)

# प्रतिज्ञापत्र

मी कु. प्रिया लक्ष्मण तांबे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला **'**पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास**'** हा माझा स्वतःचा शोध प्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : सातारा                    संशोधक

दिनांक : / /२०१४

( कु.प्रिया लक्ष्मण तांबे )

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील पीएच.डी.प्रबंध 'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर विद्यावाचस्पती पीएच.डी. पदवीसाठी सादर करीत आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात धार्मिक व ऐतिहासिक क्षेत्रात या स्थळांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यामुळे हा विषय पीएच.डी.साठी निवडलेला आहे.

माझे मार्गदर्शक आदरणीय प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनी मला विषयाच्या निवडीपासून संपूर्ण प्रबंध पूर्ण होईपर्यंत बहुमोल मार्गदर्शन केले. संशोधनाचे काम पूर्ण होईपर्यंत मनमोकळेपणाने त्यांनी मार्गदर्शन केले. माझ्या संशोधनातील अडचणी समजावून सांगीतल्या. अति उत्साहाने व आपुलकीने चौकशी करून मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणेमुळे मी माझ्या संशोधनाचे काम पूर्ण करू शकले. त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणे मला अधिक आवडेल.

माझ्या संशोधन कार्यात आदरणीय डॉ. श्रीकांत कार्लेकर, अधिष्ठाता, सामाजिकशास्त्र विभाग यांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. इतिहास विभाग प्रमुख डॉ. संध्या पंडित मॅडम यांनी मार्गदर्शन केले व वेळोवेळी सूचना केल्या त्याबद्दल आभारी आहे. सर्व कार्यालयीन सेवक यांचेही आभारी आहे.

संशोधनासाठी मुंबई पुराभिलेखागार विभागातील संचालक अधिकारी व कार्यालयीन सेवक यांनी मला परवानगी देऊन कागदपत्र मिळवून देण्यासाठी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार. मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई इतर अधिकाऱ्यांनी मला सहकार्य केल्याबद्दल आभार मानते. विश्वकोश कार्यालय वाई, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा ग्रंथालय याठिकाणी मला जी माहिती उपलब्ध करून दिली. ग्रंथसंग्रहालयातील संचालक अधिकारी व सेवक वर्ग यांनी मला वेळोवेळी मदत केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानते त्याबद्दल ग्रंथपाल व सेवकांचे आभार.

या विषयाच्या संशोधन कार्यासाठी सहकार्य मिळाले यामध्ये माजी प्राचार्य डॉ. जे.जी. जाधव छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा व माजी प्राचार्य डॉ. दिपा महानवर तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज

सातारा इतिहास विभागप्रमुख, प्रा. डॉ. विनायक जाधव, प्रा.भास्कर कदम, प्रा .व्ही. पी. पवार, प्रा. डॉ. डी. बी. मासाळ, डॉ. अवनिश पाटील, प्रा. यलमार व्ही. एस., प्रा. एस. एस. बोडखे, प्रा. डॉ. दत्तात्रय कोरडे आणि ग्रंथपाल श्री. लोखंडे एस. टी. सर, श्री. जाधव पी. डी. सर, यांनी सहकार्य केले त्याबद्दल आभार.

माझ्या संशोधन कार्याला सतत प्रेरणा व मदत करणाऱ्या माझ्या मैत्रीणी दिपा पद्माळे, सौ. धनश्री अमित ढोले, सौ. सोनाली रांगोळे यांची ऋणी आहे. विशेषतः प्रा.पक्षाळे बी.जे., श्री सुनील शहा, श्री सागर जगताप यांची कृतज्ञता व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

माझ्या संशोधन कार्यात माझे कुटुंब, नातेवाईक यांचे मोठे योगदान आहे. माझे वडील प्रा. डॉ. एल. पी. तांबे आणि आई प्रा.डॉ.सौ.एस. एल. तांबे यांचे आशीर्वाद मिळाले. तसेच माझी बहीण प्रज्ञा व भाऊ चि. प्रतिक आणि मावशी, काका, मामा या सर्वांनी मला मदत केली. त्याबद्दल त्यांची ऋणी आहे.

माझ्या आयुष्याला कलाटणी देणारे माझे परमपुज्य आजोबा कै.श्री शंकरराव जगदाळे आणि माझी आजी श्रीमती अंजिरा जगदाळे यांची मी शतशः ऋणी आहे.

या प्रबंधाचे टंकलेखन अचूक व सुबक करून त्यास मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल समृद्धी टाईपरायटरच्या प्रो.प्रा. सौ. वैशाली कोरडे यांचे आभार मानते.

संशोधक

कु. प्रिया लक्ष्मण तांबे

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | पश्चिम महाराष्ट्राची पार्श्वभूमी | १ ते ३२ |
| | प्रबंधाचे शिर्षक, संशोधन विषयाची निवड, संशोधनाची आवश्यकता, | |
| | संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके | |
| | सिद्धांत कल्पना, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने | |
| | संशोधन पद्धती, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, प्रकरण नियोजन | |
| | महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी, महाराष्ट्राची धार्मिक पार्श्वभूमी | |
| | महाराष्ट्राची राजकीय पार्श्वभूमी | |
| २. | पुणे जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे | ३३ ते ९४ |
| ३. | सातारा जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे | ९५ ते१५० |
| ४. | सांगली जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे | १५१ ते १९४ |
| ५. | कोल्हापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे | १९५ ते २४७ |
| ६. | सोलापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे | २४८ ते २८२ |
| ७. | उपसंहार | २८३ ते ३०५ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३०६ ते ३२४ |
| | परिशिष्ट्ये | ३२५ ते ३३१ |
| | नकाशे | ३३२ ते ३३७ |
| | छायाचित्रे | ३३८ ते ३४८ |

# प्रकरण पहिले
# महाराष्ट्राची पार्श्वभूमी

## १.१ प्रस्तावना

महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान हे वैशिष्टयपूर्ण आहे. महाराष्ट्र हा डोंगरदऱ्यांचा पठारांचा व छोटया नद्याच्या काठचा सुपीक खोऱ्यांचा प्रदेश आहे. सहयाद्री हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक व भौगोलिक इतिहास घडविणारा पर्वत आहे. या पर्वतांच्या असंख्य रांगा, उंच शिखरे, खोल दऱ्या, घनदाट अरण्य व त्यातील हिंस्त्र श्वापदे, या सर्वामुळे निर्माण झालेली दुर्गमता हे महाराष्ट्राचे महत्त्वपूर्ण वैशिष्टय होय. मानवाने प्राचीन काळापासून या ठिकाणी वस्ती केलेली आहे. त्याच बरोबर त्याने विविध क्षेत्रात विकास केलेला आहे. प्राचीन कालीन मानवाच्या विकासाची साक्ष देणारी अनेक साधने पश्चिम महाराष्ट्राच्या विविध भागात आढळून येतात. व्यक्ती, समाज, स्थळ आणि काळ हे इतिहासाचे चार मुलभूत घटक आहेत. मानव हा इतिहासाच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे.

मध्ययुगीन काळात मराठेशाहीमुळे महाराष्ट्राला फार महत्त्व लाभले होते. महाराष्ट्रात एकूण ३५ जिल्हयाचा समावेश होतो. या जिल्हयांना धार्मिक व ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळे या जिल्हयात प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक स्थळे मोठया प्रमाणावर आढळतात. महाराष्ट्राला धार्मिक व ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाचे स्थान लाभले आहे. महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांच्या देणगीमुळे मानवी जीवनाच्या विविध अंगाचा विकास होण्यास मदत झाली आहे. या धार्मिक व ऐतिहासिक स्थळामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मदत झाली आहे. या स्थळांची मोठया प्रमाणावर निर्मिती शिवकाळ व पेशवेकाळात झालेली आहे. यावरून मध्ययुगीन काळात परकीय सत्तेविरूद्ध लढण्यासाठी या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची प्रेरणा मिळाली आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध लढा देण्यासाठी लोकांच्यात राष्ट्रीयता व एकीची भावना वाढीस लावण्याचे महत्त्वाचे कार्य धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी केलेले आहे. आज पश्चिम महाराष्ट्रात ही परंपरा जपलेली दिसून येते.

महाराष्ट्रावर आजपर्यत अनेक आक्रमणे आली तरी ही धार्मिक व ऐतिहासिक स्थळे टिकून आहेत. या स्थळांविषयीची माहिती मिळावी या दृष्टीने या प्रकरणात महाराष्ट्राची भौगोलिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमी याची माहिती दिलेली आहे.

## १.२ प्रबंधाचे शिर्षक

'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास'

## १.३ संशोधन विषयाची निवड

प्राचीन काळापासून महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना महत्त्वाचे स्थान आहे. या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची महाराष्ट्राला एक वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी आपली सत्ता टिकविण्यासाठी व सत्तेचा विस्तार करण्यासाठी ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना महत्त्व दिलेले आहे. भारताच्या इतिहासात धार्मिक व ऐतिहासिक स्थळामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढण्यास मोठया प्रमाणावर मदत झाली आहे. महाराष्ट्रातील लोक हे धार्मिक परंपरेचे असल्याने दिवसेंदिवस धार्मिक स्थळांचे महत्त्व वाढत आहे. या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांबद्दल अधिक माहिती व्हावी. पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत. महाराष्ट्रातील जनतेने ही ऐतिहासिक व धार्मिक परंपरेची जपणूक केली आहे. तसेच या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे महाराष्ट्राच्या इतिहासातील योगदान समाजासमोर यावे, यासाठी या विषयाची निवड केलेली आहे.

## १.४ संशोधनाची आवश्यकता

पश्चिम महाराष्ट्रात काही धार्मिक स्थळे प्राचीन आहेत. हिंदूच्या धार्मिक रिती–रिवाजाप्रमाणे या धार्मिक स्थळांमुळे सण, उत्सव मोठया प्रमाणावर साजरे केले जातात. मराठी सत्तेच्या कालखंडात या धार्मिक स्थळांचा महाराष्ट्रात विविध ठिकाणी उदय झालेला आहे. ही ठिकाणे धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झालेली आहेत. महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्मारकांच्या बांधकामाची शैली व ठिकाणावरून ती कोणत्या हेतूने व कशाप्रकारे उभारण्यात आली याची माहिती मिळते. मराठाकालीन ऐतिहासिक परंपराची व स्मारकांच्या बांधकाम शैलींची माहिती मिळते. या ऐतिहासिक स्मारकावरून नवीन पिढीस प्रेरणा, स्फूर्ती, आदर्श व उत्तेजन मिळण्यास फार मोठया प्रमाणावर मदत होते. त्यामुळे या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा अभ्यास व जतन करणे आवश्यक आहे.

## १.५ संशोधन विषयाचा कालखंड

'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास' या विषयाचा कालखंड हा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा आहे. कारण ही धार्मिक व ऐतिहासिक स्थळे महाराष्ट्रात प्राचीन काळापासून निर्माण झालेली आहेत. मध्ययुगीन कालखंडात विशेषतः मराठा कालखंडात त्यामध्ये भर पडून त्यांचे महत्त्व वाढलेले दिसून येते. आधुनिक काळात धार्मिक व ऐतिहासिक स्थळात मोठया प्रमाणावर भर पडत आहे. आज या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलत असून ते एक पर्यटन स्थळ बनले आहे.

## १.६ संशोधनाची उद्दिष्टे

१) महाराष्ट्राची पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेणे.

३) पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक जीवनाचा अभ्यास करणे.

४) पश्चिम महाराष्ट्रातील सामाजिक परंपराचा अभ्यास करणे.

५) पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक परंपराचा अभ्यास करणे.

६) पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांची माहिती व महत्त्व जाणून घेणे.

७) पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळांची माहिती व महत्त्व जाणून घेणे.

८) पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे भारताच्या इतिहासातील योगदान अभ्यासणे.

## १.७ संशोधनाची गृहितके

१) महाराष्ट्राला प्राचीन व समृध्द इतिहास आहे.

२) महाराष्ट्राचा विकास पुरातन काळापासून होत आलेला आहे.

३) भौगोलिक परंपरेतून पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा विकास झालेला आहे.

४) पश्चिम महाराष्ट्रातील अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहेत.

५) पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा मानवी समाजजीवनावर फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला आहे.

६) पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत.

## १.८ सिद्धांत कल्पना

१) महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास समृद्ध असल्याने विकास झालेला आहे.

२) महाराष्ट्रातील अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहेत.

३) पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा मानवी समाजजीवनावर फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला आहे.

४) पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत.

## १.९ संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन

‘ ‘पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास’ या संशोधन विषयावर यापुर्वी सलगपणे संशोधन झालेले नाही.

प्रा. किरण कुंभार यांनी एम.फिल.साठी इतिहास विषयामध्ये २००९ मध्ये “छ. शाहू आणि सातारा (१७००–१७४९)”, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे हा प्रबंध सादर केलेला आहे. परंतु या प्रबंधामध्ये फक्त सातारा शहरापुरताच संबंध आलेला आहे. डॉ. निवासराव वरेकर यांनी पीएच. डी. साठी २००९ मध्ये “स्वातंत्र्योत्तर काळातील सातारा शहरः एक नागरी ऐतिहासिक अभ्यास” या विषयामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. येथे प्रबंध सादर केलेला आहे, यामध्ये ही सातारा शहराचा ऐतिहासिक स्थळ म्हणून उल्लेख केलेला आहे. इतर कोणत्याही शहराची त्यामध्ये माहिती दिलेली नाही. प्रा. डॉ. दत्तात्रय कोरडे यांनी फेब्रुवारी २०१३ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे येथे “वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००)” हा प्रबंध सादर केला आहे. हा विषय वाई शहरापुरता मर्यादित असून त्यामध्ये वाई शहराचा सांस्कृतिक इतिहास पाहत असताना धार्मिकतेच्या दृष्टिने वाईतील मंदिरे व त्यांचे ऐतिहासिक महत्त्व याची माहिती दिल्याने वाई हे

पश्चिम महाराष्ट्रातील एक ऐतिहासिक व धार्मिक स्थळ होते हे दिसून येते. परंतु मी माझ्या प्रबंधात वाई बरोबर पश्चिम महाराष्ट्रातील इतर शहराचीही माहिती दिली आहे.

डॉ. खंडेराव शिंदे यांनी "कोल्हापूर राज्याचा इतिहास" हे पुस्तक २००९ मध्ये प्रकाशित केले आहे. यामध्ये केवळ कोल्हापूर शहरासंबंधी माहिती आलेली आहे. याशिवाय सावंत इंद्रजित यांनी "पर्णालपर्वत पन्हाळगड" हे पुस्तक २००९ साली प्रकाशित केले. यामध्ये पन्हाळा किल्ल्यासंबंधीची ऐतिहासिक माहिती दिलेली आहे. "दुर्गवैभव कोल्हापूर जिल्हयाचे" हे पुस्तक भगवान चिले यांनी प्रकाशित केले आहे. या पुस्तकात कोल्हापूरच्या परिसरातील किल्ल्यांचा दृष्टिक्षेप दिलेला आहे.

"पुणे शहरातील मंदिरे" हे पुस्तक डॉ. शां. गं. महाजन यांनी २००८ साली प्रकाशित केले आहे. या पुस्तकात पुणे शहरातील मंदिराची माहिती दिलेली आहे. परंतु मी माझ्या प्रबंधात पुणे शहराबरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील निवडक मंदिरांची माहिती घेतलेली आहे. रा.चि.ढेरे यांनी "शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव" हे पुस्तक सन २००१ मध्ये प्रकाशित केले या पुस्तकात फक्त शिखर शिंगणापूरच्या देवालयासंबंधी माहिती मिळते, परंतु या प्रबंधात पश्चिम महाराष्ट्रातील निवडक मंदिरांचा अभ्यास केलेला आहे. अशाप्रकारे या प्रबंधातून पश्चिम महाराष्ट्रातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

## १.१० संदर्भ साधने

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग केलेला आहे.

### अ) प्राथमिक साधने

१) जिल्हा माहिती अधिकारी पुणे जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

२) जिल्हा माहिती अधिकारी सातारा जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

३) जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

४) जिल्हा माहिती अधिकारी सांगली जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

५) जिल्हा माहिती अधिकारी कोल्हापूर जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

६) पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर जिल्हयाचा जनगणना अहवाल–२००१

७) धार्मिक संस्थाची घटनापत्रके.

८) पेशवे दप्तर, पुणे.

९) पेशवेकालीन धार्मिक सनद पत्रिका

१०) पुणे, सातारा, सोलापूर, सांगली व कोल्हापूर येथील ऐतिहासिक व धार्मिक स्थळाच्या सुधारणेविषयी शासनाने काढलेली परिपत्रिके

११) मुंबई पुराभिलेखागार कार्यालयातील कागदपत्रे.

१२) नाणी, मंदिरे, वाडे व उत्खनन अवशेष.

## १.११ दुय्यम साधने

१) विविध संदर्भ पुस्तके

२) एम.फिल. व पीएच.डी.चे प्रबंध

३) नकाशे, सीडी व कॅसेट

४) विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, त्रैमासिक व सहामाही अंक.

५) विश्वकोश व संस्कृतीकोश खंड

६) विविध कार्यालय व संस्थाचे रेकॉर्ड

७) आत्मचरित्रे व अभिनंदन ग्रंथ

८) विविध संस्थाच्या स्मरणिका व नियतकालिके

९) मुलाखती

१०) सर्वेक्षण

११) सातारा, पुणे, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर

## १.१२ संशोधन पद्धती

'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास' या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण व संदर्भ साधने या दोन पध्दतीचा वापर केला आहे. सर्वेक्षणामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, पुणे, सांगली, सोलापूर व कोल्हापूर जिल्हयात असणाऱ्या ऐतिहासिक वास्तू व अवशेष यावरून माहिती गोळा केली आहे. या पाचही जिल्हयात असणारी ऐतिहासिक स्थळे त्यातील पुरातत्वीय साधने व लिखित साधने यावरूनही हा इतिहास पाहण्यास मदत झाली आहे. मुख्यतः प्राचीन व मध्ययुगीन काळातील वाडे, स्मारके,

स्तंभालेख, ताम्रपट, लेणी, मंदिरे व मूर्ती यावरून विश्वसनीय माहिती मिळण्यात मदत झाली आहे. याशिवाय धार्मिक व सामाजिक संस्था यांच्या घटना पत्रकांचा अभ्यास करून माहिती गोळा केली आहे.

सदर संशोधनासाठी खालील संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

१) ऐतिहासिक संशोधन पद्धती

२) विश्लेषणात्मक पद्धती

३) सर्वेक्षणात्मक पद्धती

४) सांख्यिकी पद्धती

५) मुलाखत पद्धती

६) तुलनात्मक पद्धती

## १.१३ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

'पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास' हा संशोधन विषय पश्चिम महाराष्ट्रातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांच्यासाठी मर्यादित असला तरी यामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक इतिहासाची माहिती घ्यावी लागणार आहे. त्याचबरोबर या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा संबध हा भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीशी येत असल्याने त्याची ही माहिती यामध्ये घ्यावी लागणार आहे. प्राचीन काळापासून भारतातील राज्यकर्त्यांचा पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांशी संबंध आलेला आहे. त्यामुळे त्याची माहिती या प्रबंधात नमूद केली आहे.

अशाप्रकारे या संशोधनाची व्याप्ती वरील प्रमाणे असली तरी काही मर्यादा ही आहेत. हे संशोधन केवळ पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळासंबंधीच मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संशोधन विषयाचा संबंध भारतासह महाराष्ट्राशी येत असला तरी संशोधनाचा विषय लक्षात घेऊन मुख्य भर पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे व स्थळांशी निगडीत असणाऱ्या घटकांचा उहापोह देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## १.१४ प्रकरण नियोजन

### प्रकरण पहिले– महाराष्ट्राची पार्श्वभूमी

या प्रकरणात संशोधन विषयाचे नाव, संशोधन विषयाची निवड, संशोधन विषयाचा कालखंड, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, सिंद्धात कल्पना, संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन, संदर्भ साधने, संशोधन समस्या, संशोधन तंत्र, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पद्धती, संशोधन विषयाची व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, प्रकरण नियोजन, महाराष्ट्राची पार्श्वभूमी यामध्ये महाराष्ट्र या नावाची उत्पत्ती, महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी, महाराष्ट्राचे विभाग, महाराष्ट्राचे प्राकृतिक विभाग कोकण, देश, विदर्भ, महाराष्ट्राचे क्षेत्रफळ, महाराष्ट्राची प्राकृतिक रचना महाराष्ट्राचे स्थान, महाराष्ट्रातील नदीप्रणाली गोदावरी, कृष्णा, कोयना, वैनगंगा, प्राणहिता, मांजरा, इंद्रावती, शबरी, भिमा, तुंगभद्रा, पूर्णा, मुळा, प्रवरा, गिरणा, मुठा, सीना, नीरा, येरळा, माणगंगा, कुडाळी, उरमोडी, तारळी व वसना इत्यादी नद्यांची माहिती दिलेली आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या व जिल्हे, महाराष्ट्राचे हवामान, महाराष्ट्राची धार्मिक पार्श्वभूमी, महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास, मध्ययुगीन महाराष्ट्राचा राजकीय इतिहास, ब्रिटिशकालीन महाराष्ट्र, स्वातंत्र्योत्तर काळ, महाराष्ट्र राज्याची निर्मिती इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

### प्रकरण दुसरे– पुणे जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

या प्रकरणात पुणे जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी, पुणे जिल्हयातील भौगोलिक वर्णन, पुणे जिल्हयाचे क्षेत्रफळ व सीमा, पुणे जिल्हयातील नदीप्रणाली, धरणे व तलाव, पुणे जिल्हयाचे हवामान, पुणे जिल्हयाची सामाजिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राचीन इतिहास, मध्ययुगीन काळातील पुणे जिल्हा, सुलतानशाही कालखंड, शिवकालीन कालखंड(इ.स.१६३० ते १७०७), पेशवेकालीन कालखंड (१७०८ ते १८१८), ब्रिटिश कालखंडातील पुणे (इ.स.१८१८ ते १९४७), पुणे जिल्हयातील धार्मिक स्थळे यामध्ये पुणे जिल्हयातील अष्टविनायकापैकी मोरगाव, थेऊर, लेण्याद्री, ओझर, राजंणगाव ही पाच गणपतीची स्थळे, भीमाशंकर, जेजूरी, नारायणपूर, पुण्यातील कसबा पेठेतील गणपती, पुण्यातील पर्वती, सोमेश्वर, देहू व आळंदी इत्यादी प्रकारच्या स्थळांची सविस्तर माहिती दिली आहे.

पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळांमध्ये शिवनेरी, सिंहगड, लोहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, वज्रगड, वढू, विसापूर, शनिवारवाडा, महादजी शिंदे यांची छत्री व केळकर वस्तुसंग्रहालय इत्यादीचा समावेश होतो. इत्यादीची सविस्तर माहिती दिली आहे.

**प्रकरण तिसरे– सातारा जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे**

या प्रकरणात सातारा जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी, सातारा जिल्हयाची सामाजिक पार्श्वभूमी, ऐतिहासिक पार्श्वभूमी, निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. धार्मिक स्थळामध्ये शिखर–शिंगणापूर, औंधची यमाईदेवी, मांढरदेवी, जबरेश्वर मंदिर, चाफळचे राममंदिर, संगम माहूली, वाईचा गणपती, मशिद, पाली, मेरूलिंग, यवतेश्वर इत्यादी धार्मिक स्थळांचा अभ्यास व ऐतिहासिक स्थळांमध्ये अदालतवाडा, चारभिंती, सापचा वाडा, फाशीचा वड, मेणवलीचा राजवाडा, अजिंक्यतारा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, रंगमहाल, जुने जलमंदिर, नवे जलमंदिर, छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालय, प्रतापगड, सज्जनगड, वैराटगड, सदाशिवगड इत्यादी समावेश आहे.

**प्रकरण चौथे– सांगली जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे**.

या प्रकरणात सांगली जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी यामध्ये भौगोलिक क्षेत्रफळ, स्थान व सीमा, हवामान, नदीप्रणाली, धरणे व तलाव, सांगली जिल्हयाची सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी, सांगली जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी यामध्ये प्राचीन काळ, मध्ययुगीन कालखंड, सुलतानशाही कालखंड, मराठा काळ, आधुनिक काळ इत्यादी. सांगली जिल्हयातील धार्मिक स्थळे यामध्ये औंदुबर–दत्तमंदिर, सांगली गणपती मंदिर, दंडोबा येथील प्राचीन गुंफा मंदिर, सिद्धनाथ खरसुंडी, रेवणसिद्ध मंदिर रेणावी, भुवनेश्वरी मंदिर भिलवडी, सागरेश्वर, हजरत ख्वाजा शमसुद्दीन मिरासाहेब दर्गा मिरज, बुवाफन बाबा दर्गा मालगाव इत्यादीचा समावेश केलेला आहे. सांगली जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे यामध्ये जुना पन्हाळा, गणेश दुर्ग, आयर्विन पुल, मिरजेचा भुईकोट किल्ला, कृष्णा घाट(मिरज), प्रचितगड, मच्छिंद्रगड, सांगलीचे वस्तुसंग्रहालय, कोळदुर्ग, रामदुर्ग, कुंडल लेणी, विलासगड, बहादूरगड इत्यादीची माहिती दिली आहे.

**प्रकरण पाचवे– कोल्हापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे.**

या प्रकरणात कोल्हापूर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमीमध्ये स्थान व सीमा, क्षेत्रफळ व लोकसंख्या, हवामान व पर्जन्यमान, कोल्हापूर जिल्हयातील भूवर्णने व नदीप्रणाली, कोल्हापूर जिल्हयाची सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी, कोल्हापूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राचीन काळ, मध्ययुगीन कालखंड, यामध्ये बहामनीशाही राजवट, मराठा कालखंडातील शिवकाळ, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व कोल्हापूरचे छत्रपती– छत्रपती शिवाजी दुसरा (१७०० ते १७१४), छत्रपती संभाजी दुसरा (१७१४ ते १७६०), तिसरे शिवाजी, आधुनिक काळ, छत्रपती संभाजी तिसरे उर्फ आबासाहेब महाराज (१८१३–२१), छत्रपती शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज(१८२१–१८३८), शिवाजी चौथे उर्फ बाबासाहेब महाराज(१८३८–१८६६), स्वातंत्र्य चळवळीतील कोल्हापूर जिल्हा याची माहिती दिलेली आहे. कोल्हापूर जिल्हयातील धार्मिक स्थळे त्यामध्ये कोल्हापूरचे श्री महालक्ष्मीचे मंदिर, ज्योतिबा, नरसोबाचीवाडी, खिद्रापूर कोपेश्वर व बाहुबली इत्यादी धार्मिक स्थळांचा त्यामध्ये समावेश आहे.

कोल्हापूर जिल्हयातील ऐतिहासिक स्थळामध्ये जुना राजवाडा, नवा राजवाडा, रंकाळा तलाव, रांगणा, पन्हाळा, पावनगड, विशाळगड, भूदरगड, गंधर्वगड, महीपालगड इत्यादीची सविस्तर माहिती दिली आहे.

**प्रकरण सहा– सोलापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे**

या प्रकरणात सोलापूर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमीमध्ये स्थान व सीमा, लोकसंख्या, हवामान, प्राकृतिक विभाग, सोलापूर जिल्हयाची धार्मिक व सामाजिक पार्श्वभूमी, धार्मिक स्थळे, पंढरपूर विठ्ठल मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, अक्कलाईदेवी अक्कलकोट, मंगळवेढा संताचे स्थान– श्री संत दामाजीपंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा, श्री टिकाचार्य, श्री.संत गोपाबाई, श्री संत सिताराम महाराज व श्री बाबा महाराज आर्वीकर इत्यादी संत होऊन गेले म्हणून मंगळवेढा या गावास धार्मिक महत्त्व आले आहे. याशिवाय अक्कलकोटचे स्वामी समर्थ, वेळापूर, दहिगाव जैन मंदिर व मोहोळ तालुक्यातील वडवळ गावातील नागनाथ मंदिर इत्यादीची माहिती दिली आहे.

**प्रकरण सात– उपसंहार**

या प्रकरणात सर्व प्रकरणाचा निष्कर्ष काढलेला आहे.

## १.१५ महाराष्ट्राची पार्श्वभूमी

### १.१५.१ महाराष्ट्र या नावाची उत्पत्ती

महाराष्ट्र हा प्राचीन काळी दंडकारण्य म्हणून ओळखला जातो. या दंडकारण्याचा समावेश 'दक्षिणापथ' मध्ये होत होता. इ.स.पूर्व काळात उत्तर आर्यावर्तात स्थिरावलेल्या आर्यानी दक्षिणापथातील दंडकारण्यात प्रवेश करून येथे वस्ती करण्यास प्रारंभ केला. या दंडकारण्याच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना महारट्ट, मरहट्ठ व महारठ्ठ अशा अनेक वेगवेगळया नावांनी ओळखले जाऊ लागले. महारठ्ठ या प्राकृत रूपावरून महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले असावे.[१] महारठ्ठ हे संबोधन हा प्रदेश, प्रांत व त्यात राहणारे लोक या दोघांच्या बाबतीत वापरला जात होता. महाराष्ट्र या नावाची उत्पत्ती अनेक विद्वानांनी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे 'महारठ्ठ' या शब्दावरून महाराष्ट्रीक या लोकांचा देश तो महाराष्ट्र देश होय, अशी माहिती दिली आहे. डॉ.विल्सन यांच्या मते, 'महाराष्ट्र' म्हणजे महार+राष्ट्र= महारांचा देश होय. महारांची वस्ती या प्रदेशात मोठया संख्येने आहे. यावरून महाराष्ट्र हे नाव पडले असावे. महानुभाव आचार महाभाष्यात २४ व्या सूत्रावरील भाष्यात, 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र, त्यास महाराष्ट्र, महंत म्हणजे थोर इत्यादी विवेचन केले आहे.[२]

इ.स.पूर्व २०० ते इ.स.२०० या काळात कार्ले, कान्हेरी, नाणेघाट, भाजे येथील शिलालेखातून दान देणाऱ्याच्या नावामागे 'महारठिनी' व 'महारठी'अशी पदे जोडलेली आढळतात. 'महारठाचाच' पुढे महाराष्ट्र झाला असावा.[3] महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख इ.स.३६५ च्या ऐरण, जि.सागर (मध्यप्रदेश) येथील स्तंभालेखामध्ये आला आहे. त्यामुळे या लेखापूर्वी महाराष्ट्र हे नाव प्रचलित हाते.[४]

### १.१५.२ महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. त्यात कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रादेशिक विभागाचा समावेश होतो.[५] पश्चिम महाराष्ट्राला भौगोलिक विविधता लाभलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्हयांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील काही ठिकाणी

पाऊस १५२५ इंच व काही ठिकाणी एकदम कमी पाऊस, डोंगर, पठारे व माळराने व काही ठिकाणी सुपीक खोरी काही ठिकाणी कुसळी गवताचा व काही ठिकाणी हुकमी पिकांची काळीभोर जमीन असणारा प्रदेश हे महाराष्ट्राचे भौगोलिक वेगळेपण आहे.[६]

भौगोलिक पार्श्वभूमीच्या संदर्भात प्राचीन मराठी संस्कृती ही नद्याच्या खोऱ्यात विकसित झालेली आहे. कृष्णा, कोयना, वेण्णा व भीमा या प्रमुख नद्या व उपनद्या यांची खोरी सुपीक आहेत. पश्चिम महाराष्ट्रात दक्षिणोत्तर पसरलेल्या सहयाद्रीने महाराष्ट्राला दुर्गम बनविले आहे. सहयाद्रीमुळे महाराष्ट्राच्या किनारपट्टीचा चिंचोळा सखोल प्रदेश कोकण व महाराष्ट्र पठार देश असे दोन प्राकृतिक विभाग झाले आहेत. सहयाद्रीपासून पुर्वेकडे सलग डोंगररांगा गेल्या आहेत. या डोंगराची उंची पश्चिमेकडून पुर्वेकडे कमी होत जाते. या डोंगर रांगामुळे महाराष्ट्र पठारावरील नद्यांची खोरी परस्परापासून विभक्त झाली आहेत. महाराष्ट्राच्या उत्तर भागात सातपुडयाच्या रांगा पुर्व–पश्चिम दिशेने गेल्या आहेत. सहयाद्री हा महाराष्ट्राचा प्रमुख जलविभाजक आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम सीमेला सागर किनारा लाभल्यामुळे महाराष्ट्राचा जगाशी संबंध आला. यातून व्यापार, व्यवहार व सांस्कृतिक आदान प्रदान इत्यादी गोष्टी सातत्याने घडत गेल्या आहेत. येथील नैसर्गिक विविधता व संपन्नता यांनी मराठी संस्कृतीमध्ये विविधता व सहिष्णुता यांना आधार दिला आहे.[७]

### १.१५.२.१ महाराष्ट्राचे विभाग

महाराष्ट्र राज्य ३५ जिल्हयात विभागले गेले आहे. भौगोलिक, ऐतिहासिक व राजकीय मतानुसार महाराष्ट्रात पाच मुख्य विभाग आहेत. देश किंवा पश्चिम महाराष्ट्र पुणे विभाग, उत्तर महाराष्ट्र नाशिक विभाग, मराठवाडा औरंगाबाद विभाग, विदर्भ किंवा बरेरार नागपूर अमरावती विभाग आणि कोकण विभाग इत्यादी आहेत.[८]

### १.१५.२.२ महाराष्ट्राचे प्राकृतिक विभाग

महाराष्ट्राचे चार प्राकृतिक विभागात विभाजन होते. त्यापैकी दख्खनचे पठार हा विभाग इतरांना एकसंध ठेवतो. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वाटचालीत दख्खनच्या पठाराचा मोठा वाटा आहे. त्यामुळे दख्खनचे पठार, कोकण, देश व विदर्भ असे महाराष्ट्राचे प्राकृतिक विभाग पडतात.[९]

अ) कोकण

कोकणाचा विस्तार उत्तेकडील दमण, गंगेच्या खोऱ्यापासून ते दक्षिणेकडील तेरेखोल खाडीपर्यंत असून दक्षिणोत्तर लांबी ७०० कि. मी. आहे. कोकण किनारपट्टीचा आकार गायीच्या कानासारखा वाटतो. यावरून गोकर्ण–गोकण्ण– कोकण असे नाव प्राप्त झाले. कोकणला अपरांत म्हणतात.[१०] कोकणला अरबी समुद्राची ७२० कि. मी. लांबीची सलग किनारपट्टी लाभली आहे. या किनाऱ्यावर प्राचीन काळापासून अनेक बंदरे आहेत. ही बंदरे केवळ व्यापारासाठी प्रसिद्ध नसून ती सांस्कृतिक देवाण–घेवाण करणारी महत्त्वाची केंद्रे होती. मुंबई हे केवळ एक बंदर म्हणून महत्त्वाचे नसून भारताची आर्थिक केंद्र आहे.

ब) देश

कोकण व विदर्भ यांना जोडणारा भाग म्हणजे देश होय. हा भाग प्रामुख्याने सहयाद्री पर्वतानी व्यापला असून रांगा पुर्व–पश्चिम व दक्षिणोत्तर पसरलेल्या आहेत. सहयाद्री डोंगर रांगेत किल्ले उभारले गेले आहेत. या भागातील तापी, गोदावरी, कृष्णा व भीमा या नद्यांच्या खोऱ्यातून व उपखोऱ्यातून मानवी वसाहती निर्माण झाल्या. या परिसरात महत्त्वाची राजघराणी उदयास आली. त्यांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ही अधिसत्ता गाजवली. त्यामध्ये सातवाहन घराण्याचा उल्लेख येतो.

सहयाद्री पर्वत रांगातून पुर्व–पश्चिम यांना जोडणारे आंबाघाट, नाणेघाट, फोंडाघाट, माळसेज घाट, थळघाट, बोरघाट, वरंधाघाट, पारघाट व राजमाची घाट इत्यादी घाट लष्करी, व्यापारी व राजकीय दृष्टीने प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहेत. या भागावर वर्चस्व मिळविण्याकरिता प्रमुख सत्तामध्ये स्पर्धा चालत होती. [११]

पुणे जिल्हयाच्या सीमेवर हरिश्चंद्र रांग, दक्षिणेत सातारा जिल्हयात महादेवाचे डोंगर व उस्मानाबाद नांदेड लगत बालाघाटाचे डोंगर म्हणून ओळखले जातात. या सर्व रांगामधून दख्खनचा पठारी प्रदेश विभागला आहे. तापी, गोदावरी, कृष्णा व भीमा या प्रमुख नद्या व उपनद्या यांची खोरी सुपीक आहेत व अन्य ठिकाणी नापिक जमिन आहे.

क) विदर्भ

प्राचीन काळातील जैन वाङ्मयात केलेल्या वर्णनानुसार, ऋषभदेवाचा मुलगा विदर्भ हा एक होता. त्याच्या नावावरून तो ज्या प्रदेशाचा अधिकारी झाला, त्याचे नाव विदर्भ पडले

होते.[१२] मार्कंडेय, वायू, मत्स्य, वामन इत्यादी पुराणातही विदर्भासाठी 'वैदर्भ' रूप आढळते. विदर्भ कौडिण्य म्हणून एका ऋषीचे नाव बृहदारण्य–कोपनिषदात आले आहे. महाभारतात विदर्भ देशाचा अनेक वेळा उल्लेख आलेला आहे.[१३]

विदर्भात पूर्णा, वैनगंगा व वर्धा नद्यांची खोरी येतात. जमीन काळी कापसाच्या पिकाकरीता प्रसिद्ध आहे. या प्रदेशाच्या सुपीकतेमुळे उत्तरेकडून आलेल्या आर्य लोकांनी या प्रदेशात वसाहती केल्या होत्या. उदा. विंध्य पर्वत ओलांडून आलेल्या अगस्ती ऋषीनी विदर्भात प्रथम वस्ती करून तेथील वन्य जमातीच्या लोपामुद्रा या राजकन्येशी विवाह करून वसाहतीला बळकटी आणली.[१४]

महाराष्ट्राच्या कोकण, देश (खानदेश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र) व विदर्भ यांच्या प्रकृतीचा मागोवा घेताना असे लक्षात येते की, येथील इतिहासाची जडणघडणही वेगवेगळ्या प्रकारची आहे. येथील वसाहतीकरण वेगवेगळया कालखंडात झाले होते. त्याच्या विकासाची अवस्थाही वेगवेगळी होती, हे स्पष्ट होते.

### १.१५.२.३ महाराष्ट्राचे क्षेत्रफळ

महाराष्ट्र क्षेत्रफळाच्या दृष्टिने भारतातील तिसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३,७,७६२ चौ.कि.मी. असून भारताच्या क्षेत्रफळाच्या ते ९.३७ टक्के इतके आहे.[१५] महाराष्ट्राच्या पश्चिमेस ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे असून यांना अरबी समुद्राचा किनारा लाभला आहे. ठाणे जिल्हयाच्या उत्तर सीमेवर दादरा–नगर–हवेली हे केंद्रशासित प्रदेश आहे. ठाणे, नाशिक, धुळे व नंदुरबार या जिल्हयाची गुजरात बरोबरची सीमा ही महाराष्ट्राची वायव्य सीमा आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेस छत्तीसगड व उत्तरेस मध्यप्रदेश ही राज्ये आहेत. धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती व नागपूर या उत्तरेकडील जिल्हयांना जोडून मध्यप्रदेशाची सीमा आहे. तसेच गोंदिया व गडचिरोली या पूर्वेकडील जिल्हयांना जोडून गोवा राज्याची सीमा आहे. दक्षिण दिशेस महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सीमेवर कोल्हापूर, सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद व नांदेड हे जिल्हे आहेत. महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेपलिकडे आंध्रप्रदेश हे राज्य असून त्या राज्याच्या सीमा नांदेड, गडचिरोली, यवतमाळ व चंद्रपूर या जिल्हयांना जोडून आहे.[१६]

महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजरात व मध्यप्रदेश, पूर्वेस मध्यप्रदेश व आंध्रप्रदेश, दक्षिणेस आंध्रप्रदेश, कर्नाटक व गोवा ही राज्ये आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र आहे.[१७]

### १.१५.२.४ महाराष्ट्राची प्राकृतिक रचना

महाराष्ट्राच्या पश्चिम भागात किनारपट्टी उत्तर दक्षिण अशी पश्चिम घाटाची सहयाद्रीची अखंड रांग आहे. सहयाद्री हा महाराष्ट्राचा कणा असून त्याने इतिहास पूर्वकाळापासून मानवी जीवन विविधतेने निर्माण केली आहे. कारण महाराष्ट्रातील पर्जन्य, वनस्पती व शेती यावर सहयाद्रीचे वर्चस्व आहे. सहयाद्रीची उंची ६०० मीटर ते १५०० मिटर आहे. अरबी समुद्रापासून सहयाद्री ६० ते ७० कि.मी.अंतरावर आहे. उत्तर भागात हे अंतर १०० कि. मी. व दक्षिणेस ४० कि.मी. आहे. सहयाद्रीमुळे महाराष्ट्राचे किनारपट्टीचा चिंचोळा सखोल प्रदेश कोकण व महाराष्ट्र पठार देश असे दोन प्राकृतिक विभाग झाले आहेत. सहयाद्रीपासून पूर्वेकडे सलग डोंगररांगा गेल्या आहेत. या डोंगराची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी होत जाते. या डोंगर रांगामुळे महाराष्ट्र पठारावरील नद्यांची खोरी परस्परापासून विभक्त झाली आहेत. महाराष्ट्राच्या उत्तर भागात सातपुडयाच्या रांगा त्या पुर्व–पश्चिम दिशेने गेल्या आहेत. सहयाद्री हा महाराष्ट्राचा प्रमुख जलविभाजक आहे.

### १.१५.२.५ महाराष्ट्राचे स्थान

महाराष्ट्र राज्य हे भारतीय उपखंडाच्या साधारणतः पश्चिम मध्य दिशेला आहे. महाराष्ट्राची जमिन प्राकृतिक दृष्टया एकसारखी आहे. महाराष्ट्राला मोठे क्षेत्र(महाराष्ट्र देश) पठारी आहे. डेक्कन किंवा दख्खन असे या पठारांना संबोधले जाते. दख्खनचा पठारी प्रदेश विविध नद्यांनी व्यापलेला आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमेस व अरबी समुद्राच्या समातंर अशी सहयाद्रीच्या पर्वतरांगा (पश्चिम घाट) आहेत. त्यांची उंची सुमारे २१३४ मीटर आहे. या पर्वतरांगामधून गोदावरी, नर्मदा आणि कृष्णेसह इतरही अनेक नद्या उगम पावतात. अरबी समुद्राच्या व सहयाद्री पर्वतरांगांच्यामध्ये असलेल्या भागास कोकण म्हणतात. कोकण भागाची रूंदी ५०८० कि.मी. आहे. राज्याच्या उत्तरेस सातपुडा व पूर्वेस भामरागड–चिरोळी–गायमुखी पर्वतरांगा आहेत. राज्यात मोसमी पाऊस पडतो. महाराष्ट्रातील काळी बेसाल्ट माती कापसाच्या लागवडीसाठी उपयुक्त आहे.

महाराष्ट्राचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार अनुक्रमे १५° ४८ उ. ते २२° ६ उ. व ७२° ३६ पू. ते ८०° ५४ पू. या दरम्यान आहे.[१८]

### १.१५.२.६ महाराष्ट्रातील नदीप्रणाली

महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, कोयना, वैनगंगा, प्राणहिता, मांजरा, इंद्रावती, शबरी, भिमा, तुंगभद्रा, पूर्णा, मुळा, प्रवरा, गिरणा, मुठा, सीना, नीरा, येरळा, माणगंगा, कुडाळी, उरमोडी, तारळी व वसना इत्यादी नद्या आहेत.[१९]

### अ) गोदावरी नदी

गोदावरी नदीप्रणाली भारतीय द्रीपकल्पीय पठारावरील गोदावरी नदीचे खोरे सर्वात मोठे आहे. गंगा खोऱ्यानंतर क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील द्वितीय क्रमांकाचे गोदावरी खोरे आहे. महाराष्ट्रातील नाशिक जिल्हयातील त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीचा उगम होतो. ही नदी आंध्रप्रदेशाच्या किनाऱ्यावर बंगालच्या उपसागराला मिळते. तिला अनेक उपनद्या शेवटच्या टप्प्यात मिळतात. वर्धा, पेनगंगा, वेणगंगा, मांजरा, प्राणहिता, इंद्रावती व शबरी या गोदावरीच्या प्रमुख उपनद्या आहेत. मांजरा नदी वगळता बाकी सर्व नद्या जास्त पर्जन्य असलेल्या प्रदेशातून येतात. ही नदी बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते.

### आ) कृष्णा नदी

दक्षिण भारतातील तीन पवित्र नद्यांपैकी कृष्णा नदी ही एक असून ती पश्चिमेकडून पूर्वेकडे भारताचा द्रीपकल्पीय प्रदेश ओलांडून शेवटी बंगालच्या उपसागरास जाऊन मिळते. कृष्णा नदीची लांबी १,२८० कि. मी. असून तिचे एकूण पाणलोट क्षेत्र २,४३,६१० चौ. कि. मी. आहे. कृष्णेच्या खोऱ्याची महाराष्ट्रातील व्याप्ती सुमारे २४,६८२ चौ. कि. मी.आहे. कृष्णा नदीची सातारा जिल्हयातील लांबी १७६ कि. मी. आहे. वाई तालुक्याच्या पश्चिम भागात जोर खेडयाच्या पश्चिमेस सुमारे ६ कि. मी. अंतरावर कृष्णा नदी महाबळेश्वर पठाराच्या पूर्वेकडील उंच भागात (१,३६४ मी.) उगम पावते. तिचे उगमस्थान १८° ०१' उत्तर आणि ६३° ४१' पूर्व या ठिकाणी आहे. कृष्णा नदीच्या उगमस्थानाजवळ क्षेत्र महाबळेश्वर (सातारा जिल्हा) नावाचे महादेवाचे प्राचीन मंदिर असून त्यात एका लहान जलाशयातून दगडी गोमुखाद्वारे या नदीचे पाणी बाहेर पडते. हे कृष्णेचे उगमस्थान समजले जाते. महाराष्ट्रातील महाबळेश्वर येथे कृष्णा नदीचा उगम होतो. ही नदी महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेश या राज्यातून वाहते. कोयना, भीमा आणि

तुंगभद्रा या कृष्णा नदीच्या प्रमुख उपनद्या आहेत. गोदावरीच्या तुलनेत कृष्णा नदीत पाण्याचे तसेच गाळाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे या नदीचा त्रिभुज प्रदेश गोदावरीच्या त्रिभुज प्रदेशाच्या तुलनेत कमी आहे. सातारा जिल्हयातील कृष्णा नदीच्या एकूण सुमारे १७६ कि.मी. लांबीच्या प्रवासात कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी आणि कोयना या नद्या पश्चिमेकडून वाहत जाऊन कृष्णेला तिच्या उजव्या अंगास व वसना नदी उत्तरेकडून वाहत येऊन तिच्या डाव्या बाजूस मिळते. या सर्व नद्या कृष्णा नदीच्या उपनद्या आहेत. कोयना ही कृष्णा नदीची सर्वात मोठी उपनदी आहे.

जिल्हातंर्गत कृष्णा नदी जलवाहतुकीसाठी योग्य नाही. या नदीवर १९७६–७७ मध्ये वाई तालुक्यातील धोम गावाजवळ धरण बांधले आहे. त्याचा उजवा कालवा ५९ कि.मी. व डावा कालवा ११३ कि.मी. लांबीचा आहे. कराड तालुक्यात खोडशी गावाजवळ कृष्णेच्या उजव्या बाजूने ८६ कि.मी. लांबीचा कृष्णा कालवा १९८८ मध्ये बांधला आहे. कृष्णा नदीवर कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले आहेत.[२०]

नीरा ही नदी भीमेची उपनदी असून पुणे जिल्हयाच्या भोर तालुक्यातील सहयाद्री रांगेत उगम पावते. त्यानंतर ती खंडाळा आणि फलटण या तालुक्यांच्या उत्तर सीमेवरून पूर्वेस वाहत जाते. फलटण सोडल्यावर ती सोलापूर जिल्हयाच्या माळशिरस तालुक्याच्या उत्तर भागात प्रवेश करून पूर्वेकडे वाहत जाऊन भीमा नदीस मिळते. नीरा नदी पुणे, सातारा सीमा निर्धारित करते. या नदीवर पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील वीर गावाजवळ १९६५ मध्ये धरण बांधले असून त्याचा ७६ कि. मी. लांबीचा उजवा कालवा सातारा जिल्हयातून गेला आहे. जल–सिंचनाच्या दृष्टीने या नदीस महत्त्व असून हा परिसर बागायतीने समृद्ध झालेला आहे.

**इ) माणगंगा नदी–**

माणगंगा ही भीमा नदीची उपनदी माण तालुक्यात दहिवडीच्या वायव्येस टिटा डोंगरावर उगम पावते. माणगंगा नदीच्या मार्गाची एकूण लांबी १६० कि.मी. असून सातारा जिल्हयात फक्त ६४ कि.मी.आहे. माण तालुक्यात ही नदी आग्नेयेकडे मलवडी, आंधळी, दहिवडी व म्हसवड या गावाजवळून वाहत जाते. पुढे ती ईशान्येकडे वळून सोलापूर जिल्हयातील सांगोला व पंढरपूर तालुक्यातून वाहत जाऊन पंढरपूर पासून सुमारे १६ कि.मी. अंतरावर सरकोली जवळ भीमेस मिळते. या नदीवर १८७२ मध्ये गोंदवले बंधारा व १९०१ मध्ये म्हसवड तलाव

बांधला आहे. ही नदी जिल्हयाच्या दुष्काळी भागातून वाहते. या भागात पर्जन्यमान फार कमी असल्याने या नदीस पावसाळयात ६० से.मी ते १.८ मी. एवढे पाणी असते. उन्हाळयात पाण्याची खोली ६० से. मी. पेक्षा खाली जाते व काही ठिकाणी पात्र कोरडे पडते.[२१]

### १.१५.२.७ महाराष्ट्राची लोकसंख्या व जिल्हे

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ९,६४,९७,२४७ व सन २०११ च्या जनगणनेनुसार ११,२३,७४,३३३ एवढी आहे. महाराष्ट्र राज्यात ३५ जिल्हे आहेत. या जिल्हयाची नावे, लोकसंख्या, पुरुष व  स्त्रीया यांची संख्या पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

| अ.न. | जिल्हा | लोकसंख्या | पुरुष | स्त्रीया |
|---|---|---|---|---|
| १. | अकोला | १८,१३,९०६ | ९,३२,३३४ | ८,८१,५७२ |
| २. | अमरावती | २८,२२,१४३ | १४,३५,७२८ | १३,८६,४१५ |
| ३. | अहमदनगर | ४५,४३,१५९ | २३,४२,८२५ | २,००,३३४ |
| ४. | उस्मानाबाद | १६,५१,५७६ | ८,६१,५३५ | ७,९६,०४१ |
| ५. | औरंगाबाद | ३७,०१,२८२ | १९,२४,४६९ | १७,७६,८१३ |
| ६. | कोल्हापूर | ३८,७६,००१ | १९,८०,६५८ | १८,९५,३४३ |
| ७. | गडचिरोली | १०,७२,९४२ | ५,४१,३४८ | ५,३१,६१४ |
| ८. | गोंदिया | १३,२२,५०७ | ६,६१,५५४ | ६,६०,९५३ |
| ९. | चंद्रपूर | २३,७७,८६२ | ११,७७,४३१ | १२,००,४३१ |
| १०. | जळगाव | ४२,२९,९१७ | २१,९७,३६५ | २०,३२,५५२ |
| ११. | जालना | १९,५९,०४६ | १०,११,४७३ | ७,४७,५७३ |
| १२. | धुळे | २०,५०,८६२ | १०,५४,०३१ | ९,९६,८३१ |
| १३. | नंदुरबार | १६,४८,२९५ | ८,३३,१७० | ८,१५,१२५ |
| १४. | नागपूर | ४६,५३,५७० | २३,८४,९७५ | २२,६८,५९५ |
| १५. | नाशिक | ६१,०७,१८७ | ३१,५७,१८६ | २९,५०,००१ |
| १६. | नांदेड | ३३,६१,२९२ | १७,३०,०७५ | १६,३१,२१७ |
| १७. | ठाणे | १,१०,६०,१४८ | ५८,६५,०७८ | ९१,९५,०७० |
| १८. | परभणी | १८,३६,०८६ | ९,४२,८७० | ८,९३,२१६ |
| १९. | पुणे | ९४,२९,४०८ | ४९,२४,१०५ | ४५,०५,३०३ |
| २०. | बीड | २४,५४,१९६ | १२,७३,१४० | ११,८१,०५६ |
| २१. | बुलढाणा | २५,८५,०४९ | १३,३७,५६० | १२,४७,४८९ |
| २२. | भंडारा | १२,००,३३४ | ६,०५,५२० | ५,९४,८१४ |
| २३. | मुंबई जिल्हा | ३०,०३,७४१ | १६,८४,६०८ | १४,००,८०३ |
| २४. | मंबई उपनगर | ९३,५६,९६२ | ५०,३१,३२३ | ४३,२५,६३९ |
| २५. | यवतमाळ | २६,३४,२०० | १३,४४,३४५ | १२,८९,८५५ |

| अ.न. | जिल्हा | लोकसंख्या | पुरुष | स्त्रीया |
|---|---|---|---|---|
| २६. | रत्नागिरी | १६,१५,०६९ | ७,६१,१२१ | ८,५३,९४८ |
| २७. | रायगड | २५,८६,२५८ | १३,४४,३४५ | १२,४१,९१३ |
| २८. | लातूर | २२,०४,३०७ | ११,२३,८३४ | १०,८०,४७३ |
| २९ | वर्धा | १३,००,७७४ | ६,६८,३८५ | ६,३२,३८९ |
| ३० | वाशिम | ११,९७,१६० | ६,२०,३०२ | ५,७६,८५८ |
| ३१ | सातारा | २८,८८,४४५ | १४,८०,७६८ | १४,०७,६७७ |
| ३२ | सांगली | २७,७२,३४८ | १४,१९,९६५ | १३,५२,३८३ |
| ३३ | सिंधुदुर्ग | ९,१२,७८४ | ५,१२,३०० | ४,००,४८४ |
| ३४ | सोलापूर | ४३,१७,७५६ | २२,२७,८५२ | २०,८९,९०४ |
| ३५ | हिंगोली | ११,७७,३४८ | ६,०६,२९४ | ५,७१,०५१[२२] |

### १.१५.२.८ महाराष्ट्राचे हवामान

महाराष्ट्र राज्याचा सर्व भाग मान्सून प्रकारच्या पट्टयात मोडतो. फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरू होतो व तो मे महिन्यात संपतो. जूनच्या आरंभापासून मोसमी वाऱ्यापासून पाऊस पडतो. जून ते सप्टेंबर या चार महिन्यात मोसमी पाऊस पडतो या पावसाचा जोर मोठा असतो. घाटमाथ्यावर त्याचे प्रमाण ४०० से. मी. आहे. सहयाद्रीच्या पश्चिमेकडील, वाऱ्यांच्या दिशेत येणाऱ्या कोकण भागात मुसळधार पाऊस पडतो. मात्र उत्तरेकडे त्याचे प्रमाण कमी होत जाते. सहयाद्रीच्या पुर्वेकडे पर्जन्य छायेचा प्रदेश असून मावळ भागातून हळूहळू पुर्वेकडे गेल्यास पावसाचे प्रमाण कमी होते. महाराष्ट्र पठाराच्या पश्चिम भागात पावसाचे प्रमाण हे ७० सेमी आहे. सोलापूर व अहमदनगर जिल्हे हे कोरडया हवामान भागाच्या ठिकाणी येतात. मोसमी ऋतूच्या उत्तर काळात पूर्वेकडील मराठवाडा आणि विदर्भ या भागात पावसाचे प्रमाण थोडेसे वाढते. मराठवाडयात वळीवाचा पाऊस पडतो. विदर्भात बंगालच्या उपसागरावरून येणाऱ्या मोसमी वाऱ्यामुळे पाऊस पडतो. ऑक्टोबर ते जानेवारी या दरम्यान हिवाळा असतो. महाराष्ट्रात काही ठिकाणी कडक थंडी व काही ठिकाणी कमी थंडी जाणवते.[२३]

### १.१५.३ महाराष्ट्राची धार्मिक पार्श्वभूमी

प्राचीन काळापासून भारतीय समाजात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय समाज जीवनावर धर्माचा फार मोठा पगडा आहे. समाज जीवनाची सर्व क्षेत्रे धर्मसंस्थेने व्यापली आहेत. भारतात हिंदू, बौद्ध व जैन या धर्माचे लोक सलोख्याने राहत होते. येथे 'धार्मिक सहिष्णुता' होती. ८ व्या व ९ व्या शतकात या देशावर इस्लाम धर्मियांची आक्रमणे सुरू झाली. काही कट्टर

इस्लाम धर्मीय सत्ताधीशांच्याकडून येथील जनतेस त्रास झाला. इस्लामांच्या राजकीय आक्रमणामुळे हिंदू राज्यकर्त्यांचे स्थान नष्ट झाले होते. प्रजेला रक्षणकर्ता राहिला नाही. प्रजा हतबल झाली. त्यामुळे इस्लाम राज्यकर्त्यांना हिंदूच्यावर धार्मिक आक्रमण करणे सोपे झाले. या काळात हजारो हिंदू लोक बाटवले गेले. हिंदू संस्कृतीची जी प्रतीके होती ती उध्वस्त करण्यात आली. परंतु अकबर बादशहाने उदारमतवादी, धर्मसहिष्णू धोरणाचा पुरस्कार केला. पण नंतरच्या काळात भारतीय धर्म, संस्कृती व लोक यांना काही राज्यकर्त्यांनी दुय्यम दर्जाची वागणूक दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मानवतावादी व आदर्श धार्मिक धोरणाने महाराष्ट्रात नवे युग निर्माण केले.[२४]

शिवकाळ व पेशवे काळात इस्लामी राज्यकर्त्यांच्या धार्मिक अत्याचाराला पायबंद बसलेला होता. हिंदूधर्मीय लोक पुन्हा आपल्या चाली–रीती, धर्म, परंपरा उत्साहाने करायला लागले होते. पेशवे काळात याला मोठे महत्त्व प्राप्त झाले होते. समाजात बहुसंख्य लोक हिंदुधर्मीय होते, त्यानंतर मुस्लीम, जैन धर्मीय अल्पसंख्य होते. पण त्यांनाही त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याची मुभा होती. मराठयांचे राज्य स्थापन झाल्यामुळे तीर्थयात्रा, नवस–सायास व व्रतवैकल्य यांना उत्तेजन मिळाले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धार्मिक सहिष्णुतेचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी मंदिराप्रमाणे मशिदींना सरकारी तिजोरीतून मदत केली. शिवकाळात पुर्वीची मुस्लिम राज्यकर्त्यांनी स्वीकारलेली धार्मिक क्षेत्रातील अन्यायाची परंपरा संपली व सर्वधर्मसमभाव हे धोरण सुरू झाले. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते. अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी पारंपारिक धर्माची जोपासना करीत असताना तत्कालीन राजकारणाच्या संदर्भात धर्माला योग्य ते स्थान मिळवून दिले होते.[२५]

पेशवे काळात मराठी सत्तेचा विकास सर्व भारतभर झाला होता. या काळात हिंदूधर्म, त्याचे श्रेष्ठत्व, धार्मिक आचार विचार यांना महत्त्व प्राप्त झाले होते. पेशवे हे हिंदू उच्चवर्णीय ब्राह्मण जातीचे होते. त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था व देवदेवता कल्पना मान्य होत्या. त्यामुळे त्यांनी हिंदू धर्मातील कर्मकांड, पूजा–अर्चा, रूढी, परंपरा, यज्ञयाग व व्रतवैकल्य इत्यादी गोष्टी मान्य होत्या. त्यामुळे सनातनी हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन झालेले उत्तर पेशवाईत दिसून येते. या देशात पूर्वीपासून धर्मसत्ता ही ब्राह्मण जातीच्या हातात

होती. १८व्या शतकात राजसत्ता त्यांच्या हातात पडली. ज्या धर्माचे व जातीचे राज्यकर्ते असतात त्या धर्माचे व जातीचे वर्चस्व समाजात निर्माण होते. हे त्यांनी दाखवून दिले. १८ व्या व १९व्या शतकात महाराष्ट्रात धार्मिक व राजकीय क्षेत्रात ब्राह्मणाचे वर्चस्व वाढले होते.

पेशवे काळात समाजात पाप–पुण्याच्या कल्पनाला खूप महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे पुण्य संपादन करण्यासाठी धार्मिक विधी व व्रत–वैकल्य यांचे स्तोम माजले होते. सरदारापासून पेशव्यापर्यंत सर्वजण धार्मिक कृत्ये करण्यात गुंतलेले होते. एखादे वेळेस राज्य बुडाले तरी चालेल पण धर्म बुडता कामा नये. अशी धारणा राज्यकर्ते व समाजाची होती. सर्व संकटातून मुक्त होण्यासाठी नवस, अनुष्ठाने, दान देणे, ग्रंथाची पारायणे करणे हेच विधी केले जात. ग्रहण, ग्रहदशा, मुहूर्त, देवऋषी, चेटूक, सण व धार्मिक समारंभ या बाबी समाजात नित्याच्याच झाल्या होत्या.[२६]

महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय व नाथ पंथ इत्यादी निरनिराळे संप्रदाय व त्यांच्या निरनिराळया देवतांच्या उपासना सदैव चालू असलेल्या दिसतात. बारा महिने सदैव सण व उत्सव चालू आहेत. या देवदेवतेमध्ये दुर्गादेवी, पंढरपूरचा विठोबा, गणपती, खंडोबा, जोतिबा, तुळजापूरची भवानी, अष्टविनायक, यमाई, तुकाई, नवलाई, भैरवनाथ, सटवाई इत्यादीचा समावेश होतो. या देवतांच्या स्थापनेमुळे ते ठिकाण धार्मिक स्थळ म्हणून उदयास आलेले आहे. या ठिकाणी दरवर्षी मोठया प्रमाणावर उत्सव साजरे केले जातात. त्याचप्रमाणे रामनवमी, हनुमानजयंती, वटसावित्री, नागपंचमी, गणेशचतुर्थी, नवरात्र महोत्सव, दत्त जयंती, रथसप्तमी व महाशिवरात्र इत्यादी धार्मिक उत्सव ही साजरे केले जातात. तसेच गुढीपाडवा, दसरा, दिवाळी, होळी, बेंदूर, अक्षयतृतिया, मकरसंक्रात, रंगपंचमी, गौरीपूजा व वसंतपंचमी इत्यादी सण साजरे केले जातात.[२७]

### १.१५.४ महाराष्ट्राचा राजकीय इतिहास

#### १.१५.४.१ महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास

महाराष्ट्राला वैभवशाली ऐतिहासिक व धार्मिक परंपरा आहे. आधुनिक काळात करण्यात आलेल्या उत्खनन व संशोधनावरून महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाची माहिती मिळते. महाराष्ट्रातील कोल्हापूरमधील ब्रह्मपूरी व कराडमध्ये झालेल्या उत्खननात मिळालेल्या अवशेषावरून दोन हजार वर्षापूर्वीच्या सांस्कृतिक जीवनाचे ज्ञान होते. प्राचीन मानवी वसाहती,

समाज व त्यांच्या सांस्कृतिक प्रगतीची माहिती देणारी ही ठिकाणे महाराष्ट्रात आहेत. या पुरातत्वीय अवशेषांवरुन मौर्य घराण्याची महाराष्ट्राच्या काही भागावर सत्ता होती हे स्पष्ट होते. मौर्याच्या सत्तेनंतर महाराष्ट्रात सातवाहन सत्ता प्रस्थापित झाली .

**अ)सातवाहन–**

सातवाहन राजवंशापूर्वीचा महाराष्ट्राचा राजकीय इतिहास फारसा उपलब्ध नाही. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर राज्य करणारे सातवाहन हे पहिले राजघराणे ठरते. इ.स.पू.२३० च्या सुमारास सातवाहनांची सत्ता 'सिमुक' याने स्थापन केली.[२८] नेवासे येथील उत्खननात सुरूवातीच्या दोन सातवाहन राजांची नाणी सापडली आहेत. यावरून महाराष्ट्रात सातवाहनांची सत्ता होते, हे स्पष्ट होते.

सातवाहन घराण्यातील सिमुक, कृष्ण, सातकर्णी, वेदश्री, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र पुलुयामी, वसिष्ठीपुत्र स्कंध सातकर्णी, गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णी, गौतमीपुत्र विजय सातकर्णी, चण्ड सातकर्णी, वसिष्ठीपुत्र विजय सातकर्णी व पलुयामी हे कर्तबगार राजे होऊन गेले. या घराण्याने इ.स.पू. २३० ते इ.स.२३० या कालखंडात सत्ता उपभोगली. सातवाहन राजांनी सुरूवातीला विदर्भावर राज्य केले. त्यांची सत्ता अखेरच्या काळात विदर्भातपुरती मर्यादित होती.[२९]

पहिला सातकर्णी याची कारकिर्द प्रदेश विस्तार, धार्मिक विधी व व्यापार वृद्धी इत्यादी बाबत प्रसिद्ध असल्याचे दिसून येते. ब्रम्हपुरी जिल्हा कोल्हापूर येथील उत्खननात सापडलेल्या नाण्यांमध्ये कूट महारठीची नाणी, सातकर्णी पहिला, गौतमीपुत्र सातकर्णी व यज्ञश्री सातकर्णी याची नाणी सापडली आहेत.[३०]

सातवाहन राजांनी कला व स्थापत्यालाही उत्तेजन दिले. त्यांनी पितळखोरा जिल्हा औरंगाबाद येथील डोंगरात १३ लेण्या खोदविल्या. या सर्व बौद्ध धर्मीय आहेत. अजिंठा येथील लेणी क्र.८,९,१०,१२,१३ व १५ या क्रमांकाच्या बौद्ध लेण्या या काळातील आहेत. भोकरदन येथेही लेणी कोरण्यात आली आहे.

**ब) वाकाटक**

महाराष्ट्रात सातवाहनांच्यानंतर वाकाटक वंशाची सत्ता उदयास आली. वाकाटकाचा मूळ पुरूष विंध्यशक्ति हा होय. हे वाकाटक नृपती हरीषेणच्या अजिंठा शिलालेखावरून समजते.[३१]

या वंशाने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यत राज्यकारभार केला. विदर्भात वाकाटकांच्या दोन शाखा कार्यरत होत्या. पहिली शाखा नागपूर जिल्हयातील 'नंदीवर्धन' येथे (इ.स.३३० ते ४९० पर्यंत) राज्य करीत होती. वाकाटकांची ही शाखा ज्येष्ठ शाखा या नावाने ओळखली जात होती. वाकाटकांच्या दुसऱ्या शाखेची राजधानी 'वत्सगुल्म' (वाशिम) होती. अंजिठा लेणीतील शिलालेखावरून ही वाकाटकांची राजधानी असल्याचे समजते. वत्सगुल्म शाखेत सर्वसेन प्रथम, विंध्यशक्ति द्धितीय, सर्वसेन द्वितीय, देवसेन व हरियेण हे राजे होऊन गेले.

### क) बदामीचे चालुक्य

वाकाटक सत्तेनंतर महाराष्ट्रात बदामीच्या चालुक्याची सत्ता उदयास आली. कर्नाटकातील बदामी येथे या घराण्याची राजधानी असल्याने त्यांना 'बदामीचे चालुक्य' म्हणून ओळखतात. या घराण्यातील पहिला ऐतिहासिक पुरूष जयसिंह याने राष्ट्रकुट इंद्र याचा पराभव करून दक्षिण गुजरात व खानदेश हा भाग जिंकून घेतला. पहिला पुलकेशी याने दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक हा प्रदेश ऱ्हासाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मानपूरचे राष्ट्रकुट व कदंब यांच्याकडून जिंकून घेतला. पहिला पुलकेशी यास बदामीच्या चालुक्य वंशाचा संस्थापक मानले जाते. या घराण्यात पहिला किर्तीवर्मन, मंगलेश, दुसरा पुलकेशी, पहिला विक्रमादित्य, विनयादित्य, दुसरा विक्रमादित्य व दुसरा कीर्तिवर्मन हे कर्तबगार राज्यकर्ते होवून गेले.[३२]

### ड) राष्ट्रकूट

महाराष्ट्रावर राष्ट्रकूट घराण्याने सत्ता निर्माण केला. आजपर्यंत मानपूरचे राष्ट्रकूट, विदर्भाचे राष्ट्रकूट व मान्यखेटचे राष्ट्रकूट या तीन घराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले होते. मान्यखेटचे राष्ट्रकूटांची राजधानी कंधार जि. नांदेड ही होती. राष्ट्रकूट कन्नड वंशीय असून ते मूळ मराठवाडयातील लातूरचे असल्याचे ए.एस. आळतेकर यांचे मत आहे.

इ.स.६३१, इ.स.६९३ व इ.स.७०९, या साली सापडलेले ताम्रपट अनुक्रमे तिवरखेड ताम्रपट, सांगळूद ताम्रपट व मुलताई ताम्रपट, व यावरून विदर्भातील अज्ञात अशा राष्ट्रकूट घराण्याची माहिती मिळते. या घराण्यात दुर्गराज, गोविंदराज, स्वामिकराज, नन्नराज हे राजे होऊन गेले. हे घराणे कलचुरीचे मांडलीक घराणे म्हणून उदयास आले. त्यांनी नंदीवर्धन येथे राजधानी केली. हे घराणे ७ व्या शतकापर्यंत सत्तेवर होते.[३३]

### इ) कल्याणीचे चालुक्य

राष्ट्रकूटानंतर दक्षिणेत कल्याणीच्या चालुक्याची सत्ता तैल दुसरा याने स्थापन केली. तो राष्ट्रकूटांचा सुरूवातीस महासामंत होता. राष्ट्रकूट सम्राट कर्क दूसरा यास ठार करून त्याने राष्ट्रकूटांचे राज्य मिळविले. या घराण्याची सत्ता इ.स.९७५ पासून ११९० पर्यत होती. या राज्याची राजधानी बिदरजवळील कल्याणी हे नगर होते. चालुक्य घराण्यात भुवनेकमल्ल, दुसरा चालुक्य, सहावा विक्रमादित्य चालुक्य व तिसरा तैल हे राजे होऊन गेले.[३४]

### ई) शिलाहार

प्राचीन महाराष्ट्रीयन राजघराण्यामध्ये शिलाहार घराणे प्रसिद्ध होते. सुरूवातीला या घराण्याने चालुक्य व राष्ट्रकूट यांचे मांडलिकत्व पत्करून आपला उत्कर्ष केला. शिलाहाराचे घराणे आठव्या शतकात दक्षिण कोकणात पुढे आले. पुढे कोल्हापूर व उत्तर कोकणात या घराण्याने आपले वेगळे सत्ता केंद्र निर्माण केले. उत्तर कोकण व कोल्हापूरचे शिलाहार स्वतःला 'तगरपूरवराधिश्वर' म्हणवून घेत असत.[३५] या शिलाहाराच्या तीन शाखा असून त्यांनी दक्षिण कोकण, उत्तर कोकण व कोल्हापूर येथे राज्यकारभार केला. यांचे राजचिन्ह गरूड हे होते.[३६]

### उ) यादव घराणे

महाराष्ट्राच्या इतिहासात यादव घराणे प्रसिद्ध आहे. या घराण्याच्या काळात धर्म, साहित्य, कला व स्थापत्य या क्षेत्रात महाराष्ट्रात प्रगती घडून आली. यादवांनी आपल्या दरबारात मराठीला राजभाषेचा दर्जा दिला. हेमाद्रिने 'चतुवर्ग चिंतामणी' या ग्रंथाच्या व्रतखंडामध्ये यदुवंशीय राजांची पौराणिक काळापासून महादेवराव यादवापर्यत वंशावळ दिली आहे. पाचवा भिल्लम यादव याने आपली राजधानी देवगिरी येथे स्थापन केली होती. या घराण्यात प्रामुख्याने दृढप्रहार, सेऊनचंद्र, पाचवा भिल्लम यादव, जैगुंती यादव, सिंघनदेव द्वितीय, कृष्णदेव, महादेव यादव, रामचंद्र यादव व शंकरदेव इत्यादी राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला. या घराण्याचा पराभव इ.स.१३१२ मध्ये मलिक काफूर याने केला.[३७]

### १.१५.४.२ मध्ययुगीन महाराष्ट्राचा राजकीय इतिहास

इ.स. १३४७ मध्ये हसन गंगू बहामनी याने बहामनी राज्याची स्थापना दक्षिणेत केली. सर्व महाराष्ट्रभर बहामनी सुलतानाचे राज्य प्रस्थापित झाले. इ.स.१४९० ते १५२६ या काळात बहामनी सत्तेचे शकले होऊन पाच स्वतंत्र राज्ये निर्माण झाली. त्यामध्ये वऱ्हाडची इमादशाही,

अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, बिदरची बरीदशाही व गोवळकोंडयाची कुतुबशाही यांचा समावेश होतो. यापैकी अहमदनगरची निजामशाही व विजापूरच्या आदिलशाही यांचे महाराष्ट्राच्या प्रदेशावर दीर्घकाळ वर्चस्व होते. अनेक पराक्रमी मराठा सरदारांच्या मदतीने या इस्लामी सत्तांनी आपले वर्चस्व कायम टिकवले.

१७ व्या शतकाच्या सुरूवातीला मराठा साम्रज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची स्थापना केली. स्वराज्याची स्थापना ही महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणारी घटना होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्याच नेतृत्त्वाखाली मराठयांनी आपले स्वतंत्र राज्य निर्माण करणे सुरू केले. सन १६७४ मध्ये झालेल्या राज्यभिषेकानंतर शिवाजी महाराजांच्या राज्याची अधिकृत स्थापना झाली. शिवाजी महाराजांनी मराठयांना एकत्र आणून त्यांना स्वातंत्र्याच्या विचाराने भारावून टाकले. सामान्य मराठी माणसात स्वत्व व स्वाभिमान जागृत करून त्याला स्वराज्य, स्वधर्म, स्वदेश, स्वसंस्कृती व स्वभाषा यांच्या रक्षणासाठी व प्रसंगी आत्मसमर्पण करण्याची प्रेरणा दिली. त्यांनी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत आदिलशाही, कुतुबशाही व मुघल यासारख्या प्रबळ सत्तांशी संघर्ष करून मराठी सत्तेला स्थिर पायावर उभे केले. शिवकाळात समाजात स्वातंत्र्य, स्वदेश, व स्वधर्म रक्षणाची प्रेरणा इतकी प्रखर होती की, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाचा मरांठयाच्या पुढे टिकाव लागला नाही.[३८]

छत्रपती संभाजी राजांना मोगल बादशहा औरंगजेब याने पकडले व त्यांना ११ मार्च १६८९ रोजी ठार मारले. छत्रपती राजाराम महाराजांनी सन १७०० पर्यत साम्राज्य टिकवून धरले व महाराणी ताराबाई हिने १७०७ पर्यत या राज्याची धुरा सांभाळली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेल्या प्रेरणेने मराठयांनी औरंगजेब बादशहाबरोबर सतत २५ वर्षे लढा दिला. त्यामुळे औरंगजेबाचे मराठी राज्य जिंकून घेण्याचे स्वप्न अखेर धुळीस मिळाले.

छत्रपती शाहूंच्या काळात मराठी सत्तेचे स्वरूप बदलले. छत्रपती शाहू महाराजांची सत्ता कमकुवत बनली. पेशवे प्रबळ बनले व मराठी राज्यकारभाराचे प्रमुख बनले. बाळाजी विश्वनाथ पेशवे व बाजीराव पहिले यांनी मराठा राज्य वाढविले सध्याच्या भारताच्याही सीमेपार आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पहिल्या चार पेशव्यांनी मराठयांच्या सत्तेचा विस्तार केला.

मराठी सत्तेला श्रेष्ठ व सामर्थ्यशाली सत्ता म्हणून स्थान मिळवून दिले. सन १७६१ मध्ये पानिपतच्या तिसऱ्या लढाईत अफगाण सेनानी अहमदशाह अब्दाली याने पेशव्यांचा म्हणजे मराठयांचा दारूण पराभव केला. या पराभवानंतर मराठा साम्राज्याची एकसत्ता संपली. महाराष्ट्राबाहेरील साम्राज्य अनेक सरदारांनी आपापसात वाटून घेतले. त्यानंतरच्या काळात महाराष्ट्रातील सत्ता पेशव्यांकडे राहीली, इ.स.१८१८ ते १९४७ या सुमारे १३० वर्षाच्या काळात भारतातील प्रजेला पारतंत्र्यात राहावे लागले. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वीकारलेल्या ध्येयांचा नंतरच्या काळात पडलेला विसर, राष्ट्रहितापेक्षा स्वहित महत्त्वाचे मानण्याची स्वार्थी वृत्ती, वतनाविषयी असणारे प्रेम, वतनासाठी स्वजनासी संघर्ष, अकार्यक्षमता, दूरदृष्टीचा अभाव, दुर्बल व नीतिशून्य केंद्रसत्ता इत्यादी बाबी मराठयांच्या सत्तेच्या विनाशाला कारणीभूत ठरल्या.[३९]

### १.१५.४.३ ब्रिटिशकालीन महाराष्ट्र

### १.१५.४.३ .१ ब्रिटिश राज्य व स्वातंत्र्योत्तर काळ

इंग्रज प्रथम व्यापाराच्या उद्देशाने भारतात आले. इ.स.१६०० मध्ये लंडन येथे पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. या कंपनीने भारतात सुरत, मद्रास, मुंबई व कलकत्ता इत्यादी ठिकाणी आपल्या वखारी स्थापन करून व्यापारास प्रारंभ केला. भारतासारख्या खंडप्राय देशात व्यापाराच्या वाढीसाठी राजकीय सत्तासुद्धा आपल्याकडे असणे आवश्यक आहे. याची जाणीव धूर्त इंग्रजाना १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. त्यावेळी भारतात त्यांना रोखणारा, प्रखर विरोध करणारा कोणताही बलवान सत्ताधिश नव्हता. तसेच ब्रिटिशांनी आपले प्रगत तंत्रज्ञान, आधुनिक शस्त्रास्त्रे तसेच फितुरी, आर्थिक संपन्नता, अधिकाऱ्यांची कार्यक्षमता व मुत्सद्देगिरीच्या जोरावर कंपनीने भारतात आपली राजकीय सत्ता स्थापन केली.

इ.स.१७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळवून इंग्रजानी बंगाल प्रांतात आपल्या राजकीय सत्तेचा पाया घातला. क्लाईव्ह व वॉरन हेस्टिंग्ज या गव्हर्नरानी आपल्या कुशल मुत्सद्देगिरी व धाडस याच्या जोरावर आपल्या सत्तेचा भारतात विस्तार केला. लॉर्ड वेलस्ली याने सत्ता विस्तारासाठी आक्रमक धोरण स्वीकारून 'तैनाती फौजेचा' अनेक भारतीय सत्ताधीशांना स्वीकार करण्यास भाग पाडले. त्यांना कायमचे ब्रिटिशांचे अंकित बनविले . त्यास महाराष्ट्रातील दुसरा बाजीराव पेशवा ही बळी ठरला. महाराष्ट्रात १८ व्या शतकाच्या शेवटी

पेशवा सवाई माधवराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस यांच्या मृत्यूने पेशवाईतील कर्तबगार पिढी संपली. दुसऱ्या बाजीरावाच्या अंगी कसलेही कर्तृत्व नसल्याने त्याचे मराठा सरदारांच्याबरोबर वैर निर्माण झाले. त्याने १८०२ मध्ये इंग्रजांच्या बरोबर वसईचा तह केला. तैनाती फौजेचा स्वीकार केला. आपले स्वातंत्र्य त्याने कायमचे घालविले. पुढे पेशव्यांची सत्ता इ. स. १८१८ मध्ये नष्ट केली. १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतासह महाराष्ट्रात आपल्या सत्तेचा विस्तार करून इंग्रजाची सत्ता स्थिर झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात व्यापार करत असताना मराठे व ब्रिटिश यांच्यात सन १७७७–१८१८ च्या दरम्यान तीन युद्धे झाली. सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठयांना पराभव करून मराठयांचे राज्य काबीज केले.[४०]

ब्रिटिश काळात महाराष्ट्र हा मुंबई राज्याचा एक भाग होता. मुंबई राज्यात कराची ते उत्तर दख्खन भाग समाविष्ट होता. त्यावेळी सर्व राज्यकर्ते ब्रिटिशांचे वर्चस्व मानून आपापले राज्य सांभाळीत होते. मराठवाडा निजामाच्या अमंलाखाली राहीला होता. ब्रिटिशांनी सामाजिक तसेच नागरी सुविधा आणल्या होत्या. परंतु त्यांच्या भेदभावाच्या निर्णयामुळे व पारतंत्र्यांच्या जाणिवेमुळे भारतीयांमध्ये असंतोष निर्माण झाला. २० व्या शतकाच्या सुरूवातीस लोकमान्य टिळक यांनी ब्रिटिशांविरूद्ध लढा उभारला पुढे महात्मा गांधी यांनी सुरू ठेवला होता. महाराष्ट्रातील मुंबई व पुणे हे शहर भारतीय स्वातंत्र्य लढयाचे महत्त्वाचे केंद्र होते.[४१]

**महाराष्ट्र राज्याची निर्मिती**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. इ.स.१९५५ मध्ये पोट्टी रामलु यांनी स्वतंत्र आंध्रप्रदेशाच्या निर्मितीसाठी उपोषण केले. त्यात त्यांचा शेवट होऊन आंध्रप्रदेशाची निर्मिती झाली. इ.स.१९५६ मध्ये विदर्भ, मराठवाडा, मुंबई राज्यास जोडण्यात आले. गुजराथ व महाराष्ट्राचे राज्य द्विभाषिक बनविण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न भाषावार प्रांत रचना झाल्यानंतर मोठा गंभीर बनला होता. 'आपल्यावर अन्याय होत आहे. इतर प्रांतापेक्षा वेगळी नीती महाराष्ट्राबाबत वापरली जात आहे'. अशी भावना सर्वत्र निर्माण झाली होती.[४२]

त्यानंतर प्रांत व राज्यांची पुनर्रचना करण्याचे हाती घेतले गेले. साधारणतः भाषेप्रमाणे प्रांत निर्माण केले जात होते. परंतु भारत सरकारने मुंबईसह महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीस नकार दिला. केंद्राच्या या धोरणाच्या विरोधात महाराष्ट्रातील जनतेने प्रखर आंदोलन केले. यामध्ये १०५ व्यक्तीनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. केंद्र सरकार मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट

करण्याच्या विरोधात होते. आचार्य अत्रे, शाहीर साबळे, सेनापती बापट, अमृत डांगे इत्यादी व्यक्तीनी सयुंक्त महाराष्ट्र चळवळीला बळ दिले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने महाराष्ट्राच्या विविध भौगोलिक भागास एकत्र आणले. परंतु बेळगाव आणि आसपासचा परिसर व गुजराथमधील डांगी बोलणारा प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट केला गेला नाही. बेळगावसह ८६५ गावे महाराष्ट्रात सामील करण्यासाठी आजही प्रयत्न चालू आहेत.[४३]

## १.१६ समारोप

भारतातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा पश्चिम महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान हे वैशिष्टयपूर्ण आहे. या भौगोलिक वैशिष्टयामुळे महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना केली. मध्ययुगीन काळात मराठेशाहीच्या दृष्टिने महाराष्ट्राला फार महत्त्व होते. महाराष्ट्राला धार्मिक व ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. त्यामुळे या जिल्हयात प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक स्थळे मोठया प्रमाणावर आढळतात. या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची मोठया प्रमाणावर निर्मिती शिवकाळ व पेशवेकाळात झालेली आहे. आजही पश्चिम महाराष्ट्रात ही परंपरा जपलेली दिसून येते. महाराष्ट्रावर आजपर्यत अनेक संकटे आली असली तरीही ही धार्मिक व ऐतिहासिक स्थळे टिकून आहेत.

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली असून त्यात कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या प्रादेशिक विभागाचा समावेश होतो. पश्चिम महाराष्ट्राला भौगोलिक विविधता लाभलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या जिल्हयांचा समावेश होतो. भौगोलिक पार्श्वभूमीच्या संदर्भात प्राचीन मराठी संस्कृती नद्याच्या खोऱ्यात विकसित झालेली आहे. कृष्णा, कोयना, वेण्णा व भीमा या प्रमुख नद्या व उपनद्या यांची खोरी सुपीक आहेत. महाराष्ट्राच्या पश्चिम सीमेला सागर किनारा लाभल्यामुळे महाराष्ट्राचा जगाशी संबध आला. यातून व्यापार व्यवहार व सांस्कृतिक आदान प्रदान या गोष्टी सातत्याने घडत गेल्या आहेत.

महाराष्ट्रातील नद्यांवर लहान मोठी धरणे व तलाव बांधलेली असल्याने महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थिती सुधारण्यास मदत झालेली आहे. महाराष्ट्राची धार्मिक परंपरा वैभवशाली आहे. महाराष्ट्र राज्यात लहान–मोठी अनेक देवस्थाने

असून वर्षभर सण, उत्सव, यात्रा निरनिराळया ठिकाणी होत असतात. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही तीर्थस्थानं आजच्या काळातही आपल आध्यात्मिक महत्त्व टिकून आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मानवतावादी व आदर्श धार्मिक धोरणाने महाराष्ट्रात नवे युग निर्माण केले.

शिवकाळात व पेशवे काळात इस्लामी राज्यकर्त्यांच्या धार्मिक अत्याचाराला पायबंद बसलेला होता. हिंदू धर्मीय पुन्हा आपल्या चालीरीती, धर्म, परंपरा उत्साहाने करायला लागले होते. पेशवे काळात याला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले होते. समाजात बहुसंख्य लोक हिंदुधर्मीय होते, त्यानंतर मुस्लीम, जैन धर्मीय अल्पसंख्य होते. पण त्यांनाही त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याची मुभा होती. मराठयांचे राज्य स्थापन झाल्यामुळे तीर्थयात्रा, नवस–सायास, व्रत–वैकल्य यांना उत्तेजन मिळाले.

इंग्रजानी इ.स.१७५७ च्या प्लासीच्या लढाईत विजय मिळवून बंगाल प्रांतात आपल्या राजकीय सत्तेचा पाया घातला. बक्सारच्या लढाईत (इ.स.१७६४) विजय मिळवून तो स्थिर केला. क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंग्ज या गव्हर्नरानी आपल्या कुशल मुत्सद्देगिरी व धाडस याच्या जोरावर आपल्या सत्तेचा भारतात विस्तार केला. त्यांनी महाराष्ट्र सन १८१८ मध्ये जिंकून घेतला. ब्रिटिश काळात महाराष्ट्र हा मुंबई राज्याचा एक भाग होता. ब्रिटिशांनी सामाजिक तसेच नागरी सुविधा आणल्या होत्या. परंतु त्यांच्या भेदभावाच्या निर्णयामुळे व पारतंत्र्यांच्या जाणिवेमुळे भारतात असंतोष निर्माण झाला. २० व्या शतकाच्या सुरूवातीस लोकमान्य टिळक यांनी ब्रिटिशांच्या विरूद्ध लढा उभारला. पुढे महात्मा गांधी यांनी सुरू ठेवला होता. महाराष्ट्रातील मुंबई व पुणे हे शहर भारतीय स्वातंत्र्य लढयाचे महत्त्वाचे केंद्र होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

## संदर्भ


१) दाते य. रा. (संपा.), मराठी शब्दकोश, विभाग तिसरा, १९३४, प्रस्तावना पृ.२

२) कित्ता, पृ.४

३) देशपांडे अ. ना. प्राचीन महाराष्ट्रातील वाकाटकांचा इतिहास, पुणे, १९९५, पृ.११२

४) कित्ता, पृ.१११

५) कर्वे चि. ग. (संपा.), महाराष्ट्र परिचय, पुणे,१९९५, पृ.२१

६) गोविलकर मोहन (प्रकाशक), आधुनिक भारत, १९९५, पृ.४

७) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड१२, साहित्य संस्कृति मंडळ मुंबई, १९८५, पृ. १४६९

८) मोरवंचीकर रा. श्री., अस्मिता महाराष्ट्राची, १९८५, महाराष्ट्र दिन, रौप्य महोत्सवी विशेष अंक, पृ.१

९) Indian Arcological, Vol.-62, 1932, P.235.

१०) डिसकळकर द. बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे विद्यापीठ पुणे, १९६४, पृ.१८

११) जोगळेकर एस. ए., सहयाद्री, पुणे १९५२, पृ.६२–६५

१२) पाठक अरूणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर नागपूर जिल्हा भाग १, २००५, पृ.११०

१३) गुप्त चंद्रशेखर, प्राचीन विदर्भाचा ऐतिहासिक भूगोल, नागपूर, २००४, पृ. ५४

१४) मोरवंचीकर रा. श्री., अस्मिता महाराष्ट्राची, १९८५,महाराष्ट्र दिन, रौप्य महोत्सवी विशेष अंक, पृ.१

१५) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश खंड१२, उपरोक्त, पृ. १४६९

१६) सरदेसाई बी. एन., आधुनिक महाराष्ट्र, पुणे १९९४, पृ.२२

१७) गोविलकर मोहन (प्रकाशक), उपरोक्त,१९९५, पृ.४

१८) जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), उपरोक्त, पृ.१४६

१९) देव शा. भा. महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर मुंबई, १९६८, पृ.७५

२०) जोग सुरेश व इतर, भारत प्राकृतिक पर्यावरण, पुणे, २००६,पृ.१८

२१) पाठक अरूणचंद्र (संपा.), सातारा जिल्हा गॅझिटियर, मुंबई, १९९९,पृ.१८८

२२) जनगणना अहवाल, महाराष्ट्र राज्य, २०११, पृ.२

२३) मोरवंचीकर रा. श्री., उपरोक्त, पृ.५

२४) कुलकर्णी अ. रा. (सप़ा.), मराठयांचा इतिहास (खंड–१), १९९३, पृ.५४

२५) कित्ता, पृ.११२

२६) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, १९९९, पृ.७८

२७) कित्ता, पृ.८९

२८) मिराशी वा. वि., सातवाहन आणि पश्चिम क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७९, पृ.१४

२९) गुप्त चंद्रशेखर, उपरोक्त, पृ. ९

३०) Sankliya H.D., Axkaveshan At Brahmpuri, 1945, P.59

३१) मिराशी वा. वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, १९५७, पृ.३४१

३२) Nagraj M. S.(Ed.), The Chalukya\s Of  Badami, 1978, P.44

३३) Ibid, P.109-115

३४) दळवे अरूण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, २००४, पृ.८४

३५) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९७४, पृ.१४

३६) कित्ता, पृ. ५६

३७) पाध्ये के. आ., हेमाद्री उर्फ हेमाडपंत यांचे चरित्र, १९३१, पृ.१७८.

३८) पाठक अरूण (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर सातारा जिल्हा, साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १८८५, पृ.२३०

३९) रानडे म. गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, कोल्हापूर, १९७८,पृ.१२०

४०) फडके य. दि., २० व्या शतकातील महाराष्ट्र,  पुणे, १९८०, पृ.३९

४१) Tarachand, History of the freedom movement India, Vol.1,1973, P.177

४२) लेले सुमती यशवंत, कर्मयोगी, २१ मार्च २००४, पृ.३४

४३) काळे भीमराव, संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, १९९५, पृ.१२९.

## प्रकरण दुसरे

# पुणे जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

## २.१ प्रास्ताविक

पुणे जिल्हयास ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे. पुणे जिल्हयातील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीनी अनेक स्थळे महत्त्वाची आहेत. पुणे हे शहर ऐतिहासिक व धार्मिकतेच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. भाजे, कार्ले व बेडसे येथील लेणी, संत ज्ञानेश्वरांची समाधी असलेले पवित्र तीर्थक्षेत्र आळंदी, संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने पुनित झालेले देहू, सोपान देवाच्या समाधीमुळे प्रसिद्ध असलेले सासवड, याशिवाय ओझर, थेऊर, रांजणगाव, मोरगाव व लेण्याद्री ही अष्टविनायकापैकी पाच तीर्थक्षेत्रे, नसरापूर जवळील बनेश्वर मंदिर, जेजुरीचे खंडोबा मंदिर, भीमाशंकर येथील ज्योतिर्लिंग मंदिर, करंजे येथील सोमनाथाचे मंदिर इत्यादी. जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे यामध्ये शिवनेरी, सिंहगड, तोरणा, राजगड, लोहगड, विसापूर, पुरंदर, वज्रगड, शनिवारवाडा, महादजी शिंदे यांची छत्री व केळकर वस्तुसंग्रहालय यांनी मोठया प्रमाणावर ऐतिहासिक दृष्टिने महत्त्वाचे कार्य केले आहे.

## २.२ पुणे जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी

### २.२.१ पुणे जिल्हयातील भूरूपे

पुणे जिल्हयाचा आकार सामान्यतः त्रिकोणाकृती असून पश्चिमेकडील सहयाद्री पर्वत हा त्याचा पाया, तसेच आग्नेय कोपऱ्यामध्ये भीमा व नीरा या नद्यांचा शिरोबिंदू येतो. जिल्हयाचे भूरूपानुसार तीन विभाग पडतात. ते म्हणजे घाटमाथा, मावळ व देश हे होत.[१]

पुणे जिल्हयात दोन पर्वत रांगा असून पहिली मुख्य रांग सहयाद्रीची आहे. या रांगेची लांबी ११८ कि.मी. असून ती पश्चिम भागात दक्षिणोत्तर पसरलेली आहे. या रांगेच्या उत्तर टोकास १,४२४ मीटर लांबीचे हरिश्चंद्रगड हे सर्वात मोठे शिखर आहे. या पर्वत रांगेत शिखरा शिवाय नाणे घाट, बोरघाट व वरंधा घाट या प्रमुख खिंडी जिल्हयाच्या सरहद्दीवर आहेत. या जिल्हयातील दुसरी पर्वत रांग म्हणजे सहयाद्रीच्या मूळ रांगेपासून पुर्व व आग्नेय दिशेस पसरलेले अनेक लहान–मोठे डोंगर होत. या डोंगरांची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे कमी–कमी होत जाते. या पर्वत रांगेत हरिश्चंद्र, शिंगी, तसुभाई, मांडवी, ताम्हीनी, अंबाला, पुरंदर इत्यादी डोंगरांचा समावेश होतो. पुणे जिल्हयाच्या दक्षिण सीमेवर भीमा व भामा या नद्या दरम्यान शिंगी डोंगर,

भीमा व इंद्रायणी नद्यादरम्यान तसुभाई डोंगर, पवना व मुळा नद्यांच्या दरम्यान मांडवी डोंगर, मुळा व मुठा नद्यांच्या दरम्यान ताम्हिनी डोंगर आणि मुठा व निरा या नद्यांच्या दरम्यान अंबाला या डोंगररांगा आहेत. या सर्व डोंगररांगा सहयाद्रीचेच फाटे आहेत. शिवनेरी, राजमाची, राजगड, लोहगड, सिंहगड, पुरंदर रोहीतगड, तोरणा इत्यादी इतिहास प्रसिद्ध किल्ले या डोंगर रांगेत आहेत.[२]

### २.२.२ पुणे जिल्हयाचे क्षेत्रफळ व सीमा

पुणे जिल्हयाचा विस्तार १७° ५४′ उ. ते १९° २४ उ. आणि ७३° १९′ पू. ते ७५° १०′ पू. या दरम्यान असून क्षेत्रफळ १५,६४० चौ.कि.मी. असून सन २०११ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयाची लोकसंख्या ९४,२९,४०८ एवढी आहे.[३]

पुणे जिल्हयाच्या पश्चिमेस रायगड जिल्हा, उत्तरेस व पूर्वेस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेस सातारा जिल्हा, वायव्येस ठाणे जिल्हा व आग्नेयेस सोलापूर जिल्हा आहे. या जिल्हयात पुणे शहर, इंदापूर, बारामती, दौंड, भोर, पुरंदर, वेल्हे, खेड, शिरूर, जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी व हवेली असे चौदा तालुके आहेत. पुणे हे या जिल्हयाचे मुख्य ठिकाण आहे.[४]

### २.२.३ पुणे जिल्हयातील नदीप्रणाली, धरणे व तलाव

पुणे जिल्हयातून वाहणाऱ्या नद्या या पश्चिमेकडील सहयाद्री पर्वतात उगम पावून पूर्व व आग्नेय दिशास वाहतात. भीमा, मीना, कुकडी, वेल, घोड, पुष्पावती, इंद्रायणी, मुळा वायव्य दिशेस वाहते. या  जिल्हयाच्या भीमा नदीच्या डाव्या तीरावर वेल व घोड या नद्या वाहतात. तर उजव्या तीरावरून भीमा, इंद्रायणी, मुळा, मुठा, नीरा या मुख्य नद्या आहेत. मीना, कुकडी, घोड, पुष्पावती, या नद्या जिल्हयाच्या उत्तर भागातून वाहतात. पुणे जिल्हयाच्या मध्य भागातून भीमा, इंद्रायणी, मुळा, मुठा, पवना या नद्यांची खोरी आहेत. जिल्हयाच्या सरहद्दीवरून नीरा नदी वाहते.[५]

जिल्हयाच्या पश्चिम भागात नद्यावर धरणे बांधली असून त्यापासून जल–सिंचन व काही प्रमाणात विद्युत निर्मिती केली जाते. पुणे जिल्हयामध्ये भाटघर, वीर, खडकवासला, पानशेत, वरसगाव, पवना, येडगाव, माणिकडोह इत्यादी धरणे आहेत. याशिवाय डिंभे, वडज, पिंपळगाव व घोड प्रकल्प ही धरणे आहेत. पुणे शहराला खडकवासला, पानशेत व वरसगाव या

धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पिंपरी चिंचवडला पवना प्रकल्पामधून पाणीपुरवठा केला जातो. पुणे जिल्हयात टाटा कंपनीने मुळशी येथे धरण बांधून त्यामधून वीजनिर्मिती केली आहे.[६]

### २.२.४ पुणे जिल्हयाचे हवामान

पुणे जिल्हयाचे मोसमी हवामान आहे. येथे मे महिन्यात कमाल तापमान ४१° पर्यत वाढते आणि जानेवारीत ते किमान ५.६° पर्यत असते. पुणे जिल्हयात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाचे प्रमाण जून ते सप्टेंबर महिन्यात सरासरी जास्त असते. सहयाद्री पर्वतामुळे घाटमाथ्यावर भरपूर ४३१ सेमी. पाऊस पडतो. घाटमाथ्याच्या पूर्वेकडील प्रदेशात पावसाचे प्रमाण खूपच कमी म्हणजे ४५ सेमी. आहे. पुणे येथे ६५ सेमी. पाऊस पडतो. पुणे जिल्हयात दौंड, शिरूर, बारामती, इंदापूर, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर व खेड या तालुक्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडणाऱ्या पावसाची अनिश्चिती असल्याने तेथे वारंवार अवर्षण पडते.[७]

## २.३ पुणे जिल्हयाची सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी

या जिल्हयात सन १९७१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३१,७८,०२९ आहे. यामध्ये हिंदू २७,३२,७००, मुस्लिम १,५९,८००, ख्रिश्चन १३,२००, शीख १,६१,०००, बौद्ध ४६,५००, जैन व बाकीचे इतर धर्मीय लोक एकत्र राहतात. अनुसुचित जमातीपैकी महादेव कोळी, कातकरी व ठाकूर या जमाती प्रमुख आहेत. या जिल्हयात मुळशी, भोर व वेल्हे या तालुक्यात महादेव कोळी आणि ठाकूर यांची संख्या जास्त आढळते. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांपैकी बहुतेकांचा शेती हा व्यवसाय आहे.[८]

पुणे जिल्हयात विविध जाती धर्माचे लोक वास्तव्य करतात. यामध्ये हिंदू, ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध, शीख, व पारशी इत्यादी त्यांच्या सामाजिक चालीरिती, आचारसहिंता व जीवनपद्धतीमध्ये विविधता आढळते. पुणे जिल्हयातील हिंदू धर्मीय लोकांची संख्या सर्वात जास्त असल्याचे आढळून येते. हिंदू धर्मात अनेक जाती व उपजाती आहेत. हिंदू धर्मातील धार्मिक विधी रितीरिवाज आचार, विचार यात विविधता दिसून येते. पुणे जिल्हयात ख्रिस्ती धर्माचे तत्वज्ञान आत्मसात करणारे लोक आढळतात. पुणे जिल्हयात इस्लाम धर्माचे लोक आहेत. कुराण हा इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ मानला जातो. पुणे जिल्हयात जैन लोक हे

महावीर यास मानणारे असून ते कुणबी जमीनदारासारखे दिसतात. काही जैन लोक शेती करणारे तर काही व्यापार व दुकानदारी करतात. बौद्ध धर्मिय लोक गावसेवक म्हणून गावकी कामे करीत. धम्मचक्र परिवर्तनानंतर बौद्धांचे धार्मिक व सामाजिक विधी बौद्ध भिक्षूद्वारे होत असले तरी काही जुन्या रूढींचे अनुपालन काही लोक करतात. शीख धर्माने ईश्वराच्या एकतेवर भर दिला आहे. हिंदू धर्माप्रमाणेच शीख धर्मात आत्मा, शरीर, पुनर्जन्म, मोक्ष या धर्माचे तत्त्वज्ञान आचरणारे लोक पुणे जिल्हयात आढळतात.[९]

अशाप्रकारे पुणे जिल्हयात अनेक धर्माचे लोक एकत्र राहत आहेत. हे लोक आपापले सण व उत्सव साजरे करीत आहेत. या लोकांचे धार्मिक श्रद्धास्थान हे भिन्न असले तरी हिंदू धर्माशी मिळते जुळते होऊन जीवन जगताना दिसतात. काही इतर धर्मीय हिंदू समाजातील सण व उत्सव साजरे करीत असताना दिसतात.

पुणे जिल्हयातील पुरूषांचा पोषाख हा अंगात शर्ट, धोतर, डोक्यावर टोपी किंवा रूमाल, पायात जाड वहाणा, तरूणांचा पोषाख हा अंगात शर्ट, टी शर्ट, पॅन्ट, नेहरू शर्ट, जीन्स पॅन्ट असा आहे. स्त्रियांचा पोषाख अंगात चोळी, ब्लाऊज, नऊवारी किंवा सहावार साडी, सलवार, कुर्ता या पद्धतीचा आहे. शहरी लोकांच्या पेहराव्यात पाश्चात्य पद्धतीचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो.[१०]

या लोकांच्या रोजच्या आहारात ज्वारीची भाकरी, गव्हाची चपाती, भात, पालेभाज्या, कांदा, मिरची, सणासुदीला पुरणपोळी किंवा मांसाहार यांचा प्रामुख्याने अंतर्भाव असतो. पुणे जिल्हयात ग्रामीण भागात पोळा, दिवाळी, मकरसंक्रात, नागपंचमी, गोपाळकाला, रंगपंचमी, होळी, धुलीवंदन, अक्षयतृतीया, गुढीपाडवा व आषाढी एकादशी हे सण मोठया प्रमाणावर साजरे केले जातात.[११]

## २.४ ऐतिहासिक पार्श्वभूमी

### २.४.१ प्राचीन इतिहास

डेक्कन कॉलेजचे प्राध्यापक ह.धि.सांकलिया यांनी सन १९५७ साली पुणे शहरात उत्खनन केले असता त्यांना एक लाख वर्षापूर्वीची मानवाने वापरलेली विविध हत्यारे आणि वस्तू मिळाल्या. त्यामध्ये लहान तुकडे, काही फळांच्या आतील भाग, कुऱ्हाड आणि लाकूड तोडण्याची इतर हत्यारे सापडली आहेत. या हत्याराच्या कालखंडावरून सांकलिया यांनी असे

अनुमान काढले की, एक लाख वर्षापूर्वी पुणे येथे मानवी वस्ती होती. पुढे सन १९६२–६३ मध्ये डॉ.राजगुरू व मुजुमदार यांनी मुठा नदीच्या पात्रामध्ये उत्खनन केले. त्यावेळी तेथे अश्मयुगीन हत्यारे व काही वस्तू सापडल्या. यावरून तेथे एक ते दिड लाख वर्षापूर्वी वस्ती होती, हे स्पष्ट होते.[१२]

राजा कृष्णराज पहिला याच्या कालखंडातील इ.स.७६८ मधील ताम्रपट उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये पुणे शहराचा उल्लेख 'पूनक विषय' असा केलेला आहे. त्यानंतर राष्ट्रकुटांच्या कालखंडातील इ.स.९६० मधील ताम्रपट किंवा कोरीव लेख उपलब्ध झालेले आहेत. त्यामध्ये पुणे शहराचा उल्लेख 'पुनकवाडी' असा केलेला आढळतो. इ.स.९९३ सालचा शिलाहार अपराजित देव याच्या कालखंडातील मुरूड–जंजिरा येथे ताम्रपट सापडला आहे. त्यामध्ये 'पुनकदेश' असे या प्रदेशाला संबोधले आहे.[१३] या सर्व गोष्टीवरून हे स्पष्ट होते की, पुणे भूप्रदेश प्रथम राष्ट्रकुटांच्या प्रभावाखाली होता. नंतर शिलाहार राजांच्या प्रभावाखाली होता.

ऑक्टोबर २००२ मध्ये पुण्यातील कसबा पेठेत इमारतीच्या झालेल्या खोदकामात काही अवशेष सापडले आहेत. त्यावरून चौथ्या शतकातही पुणे येथे वस्ती होती हे स्पष्ट होते. असे अनुमान इतिहास संशोधक श्री. पांडुरंग बलकवडे यांनी काढले आहे. डिसेंबर २००२ मध्ये कसबा पेठेत आणखी एक खोदकाम झाले होते या खोदकामात सापडलेल्या प्राचीन वस्तू सातवाहनकालीन असल्याचे स्पष्ट झाले. या पुराव्या वरून पुणे शहराचा इतिहास प्रथमच इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापर्यंतची माहिती प्राप्त झाली.[१४]

पुणे शहरावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे राज्य होते. सातवाहनानंतर पुणे येथे राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. दहाव्या शतकाच्या अखेरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी राष्ट्रकुटांचा पराभव करून पुणे आपल्या वर्चस्वाखाली आणले. यादव काळातील अनेक वास्तुंचे अवशेष अद्याप पुणे जिल्हयात विखुरलेले आढळतात.[१५]

शालिवाहन शके ५३५ इ.स.६१३ म्हणजे सुमारे १४०० वर्षापूर्वी ज्या ठिकाणी हल्ली पुणे आहे, त्या ठिकाणी एक लहानशी वाडी होती. तिच्या पूर्वेस कुंभारली व कासारली ही दोन गावे होती. या गावांची वहिवाट सुमारे सन १२०० मध्ये जुन्नर सुभ्याखाली होती. हा सुभा त्यावेळी मुसलमानांकडे होता. कसब्याचे काही भागावर वस्ती होती. तेथे सुमारे दहा पंधरा घरे होती. त्यात ब्राह्मणांची दोन, बाकीची कोळी, वाजंत्री यांची होता. परंतु या वस्तीतही मारूती,

बहिरोबा, पुण्येश्वर आणि नारायणेश्वर ही चार देवांची मंदिरे होती.[१६]

### २.४.२ मध्ययुगीन इतिहास

इ.स.१२९० मध्ये दिल्लीहून सय्यद हिसामोहीदीन खताल व त्यांचे पाच अवलिया मुसलमान यांनी येऊन नदीचे काठचे पुणेश्वर व नारायणेश्वर यांस काढून त्यांच्या ठिकाणी दर्गे केले. त्यापैकी पुणेश्वराच्या दर्ग्यास आता धाकटा शेकसल्ला बाबाचा दर्गा म्हणतात. दुसऱ्या दर्ग्यास थोरला शेकसल्ला बाबाचा दर्गा म्हणतात. या दर्ग्यात हिंदूच्या मंदिरांच्या काही खूणा आहेत. त्या मंदिरातील पुजाऱ्यास आदिलशहाने दर्ग्यातील मुजावर बनविण्यासाठी मुसलमान केले. त्या ब्राम्हणाने मुसलमान धर्म स्वीकारल्यावर बादशहाने त्यास आणखी काही जमीन इनाम म्हणून दिली.[१७]

### २.४.२.१ सुलतानशाही कालखंड

दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीने इ.स.१२९४ साली यादवांचा पराभव केला व पुणे दिल्लीच्या सुलतानांच्या सत्तेत आले. १४ व्या शतकाच्या प्रारंभी तुघलकांनी खिलजीचा पराभव करून पुणे येथे आपली सत्ता निर्माण केली. इ.स.१३४० मध्ये मुहम्मद तुघलक दौलताबादहून पुण्यावर स्वारी करण्यासाठी आपल्या फौजेसह कोंढाणा किल्ल्यावर आला. त्यावेळी कोंढाणा किल्ल्याचा किल्लेदार नाग नाईक याने सुलतानापुढे क्षमायाचना केल्याने युद्ध टाळले गेले, मात्र कोंढाणा किल्ल्यासह पुणे सुलतानाच्या ताब्यात गेले.

पुढे तुघलकाचा सरदार हसन गंगु बहामनी याने बंड करून दख्खन देश जिंकून घेऊन बहामनी राज्याची स्थापना इ.स.१३४७ साली केली. त्यामुळे पुणे बहामनी राज्यात सामील करण्यात आले. पुढे अंतर्गत कलहामुळे बहामनी राज्याची पाच शकले होऊन पुणे हे अहमदनगरच्या निजामशहाच्या ताब्यात गेले. या निजामशाहीत भोसले कुळाचा नाव लौकीक होऊन इ.स.१५४५ साली मालोजी भोसले यास पुण्याची जहागिरी निजामशहाने दिली. पुढे काही दिवसांनी ही जहागीरी आदिलशहाकडे गेली.

अहमदनगरच्या निजामशहाचा वजीर मलीक अंबर याने शहाजी भोसले यास इ.स.१६२१ मध्ये पुणे जिंकून घेण्याची आज्ञा केली. त्यावेळी पुणे येथे आदिलशहाच्यावतीने रायराव नावाचा एक अंमलदार कारभार पहात होता. त्याने आदिलशहा व निजामशहा यांच्यातील बिघडलेले संबंध पाहून रायराव रयतेकडून जुलूम जबरदस्तीने पैसे उकळत होता.

त्यावेळी शहाजी राजांनी त्याच्यावर हल्ला करून त्याला पुणे–शिरवळ परगण्यातून हद्दपार केले. अशाप्रकारे शहाजी राजे जोपर्यंत आदिलशाहीमध्ये (इ.स.१६२५ ते १६२८) नोकरी करीत होते तोपर्यंत पुणे जहागिरी ही शहाजीराजांच्या ताब्यात होती. मलिक अंबरच्या काळात पुणे येथे रंगो बाबाजी धडपळे हा पुण्याचा ठाणेदार होता. त्याने १६२९–३० च्या मोठया दुष्काळात महत्वपुर्ण कामगिरी केली होती. पेठांची स्थापना करून पुण्यात सुधारणा केल्या. पुढे इ.स.१६३१ साली आदिलशाही सरदार मुरारजगदेव याने पुण्यावर हल्ला केला. एवढेच नव्हे तर पुंडगिरीने वागणारा मोरो तानदेव याला पकडून आणले त्याला नखीसुया टोचून मार देऊन कैद केले. पुढे १६३६ मध्ये निजामशाही नष्ट झाली, शहाजीराजे आदिलशाहीत नोकरी करू लागले. निजामशाहीच्या प्रदेशाची वाटणी करताना आपला पुणे–सुपे–इंदापुर हा जहागीरीचा मुलुख हल्लीचा पुणे जिल्हयातील भाग वगळून इतर सर्व प्रदेश मोगल आणि विजापूरकर यांना देऊन टाकला. १६३६ साली आपल्या जहागीरीची व्यवस्था पाहण्यासाठी शहाजीराजांनी दादोजी कोंडदेव याची नियुक्ती केली.[१८]

## २.४.२.२ शिवकालीन पुणे (इ.स.१६३० ते १७०७)

दादोजी कोंडदेव यांनी शिवाजी राजांच्या वास्तव्यासाठी पुणे येथे लालमहाल हा वाडा बांधला. शिवनेरी किल्ल्यावरून मातोश्री जिजाबाई व छत्रपती शिवाजी यांना आणून लालमहाल वाडयात त्यांच्या मुक्कामाची सोय केली. पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपतीचा जिर्णोद्धार केला. संरक्षणाच्या दृष्टीने चोख बंदोबस्त करून परागंदा झालेल्या रयतेला बोलावून त्यांना सवलतीने जमिनी लागवडीसाठी दिल्या. अशा प्रकारे पुण्याची पुनर्वसाहत झाली. पुणे हे शहाजीच्या जहागिरीचे मुख्य केंद्र बनले. छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या स्वराज्याच्या कार्याची मुहूर्तमेढ पुणे जिल्हयातील तोरणा किल्ल्यावर केली. दादोजी कोंडदेवच्या मृत्यूनंतर राघोबल्लाळ अत्रे याच्याकडे पुण्याची सुभेदारी होती.

पुढे शिवाजी राजांचा पुण्याशी प्रत्यक्ष संबंध राहिला नाही. सन १६६३ मध्ये मुघल सरदार शाहिस्तेखान पुण्यातील लाल महाल वाडयात येऊन राहिला होता. त्याला पुण्याबाहेर हाकलण्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी ६ एप्रिल १६६३ च्या रात्री खानावर छापा घातला. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजांचा धसका घेऊन पुणे सोडले.[१९]

छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या स्वराज्याच्या राजधानीचे ठिकाण म्हणून राजगड किल्ल्याची निवड केली होती. पुणे जिल्हयातील त्यांनी तोरणा, सिंहगड व पुरंदर हे किल्ले जिंकून स्वराज्याच्या कार्याची सुरूवात केली. नरवीर तानाजी मालूसरे याने कोढांणा किल्ला आदिलशहाच्या ताब्यातून जिंकून घेताना स्वतःचे प्राण गमावले. पुढे सुरत लुटीनंतर शिवाजी राजांनी आपली राजधानी राजगडहून रायगडला नेली. इ.स.१७०० मध्ये सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराजांची समाधी आहे. छत्रपती शिवाजी राजांच्या निधनानंतर दिल्लीचा औरंगजेब बादशहा मराठेशाही संपविण्यासाठी मराठी राज्यात आला होता. त्याने कोंढाणा किल्ला जिंकून पुण्यात वास्तव्य केले. त्याचवेळी त्याचा नातू मुहि–उल्मिलत याचा १७०३ मध्ये मृत्यू झाला. म्हणून त्याचा स्मरणार्थ पुण्याचे नामांतर 'मुहियाबाद' असे करण्यात आले. पुण्याच्या विद्यमान 'बुधवार पेठे' चे नावदेखील 'मुहियाबाद पेठ' असे ठेवले होते. पण ही दोन्ही नावे फार काळ टिकली नाहीत.[२०]

### २.४.२.३ पेशवेकालीन पुणे (१७०८ ते १८१८)

छत्रपती शाहूच्या काळात बाळाजी विश्वनाथचा छत्रपती शाहू हा मराठयांचा छत्रपती असे पर्यत सातारा राजधानीला महत्त्वाचे स्थान होते. परंतु सन १७४९ नंतर सातारचे महत्त्व कमी होऊन पुणे येथील पेशव्यांचे महत्त्व वाढीस लागले. त्यामुळे पुण्याचे ही ऐतिहासिकदृष्टया महत्त्व वाढीस लागले. सातारच्या छत्रपतीचा संबंध हा फक्त पेशव्यांना पेशवे पदाची वस्त्रे देण्यापुरता मर्यादित राहिला.

बाळाजी विश्वनाथ (१७१७ ते १७१९) या पहिल्या पेशव्यांने इ.स.१७१९ मध्ये मोगलाकडून स्वराज्याच्या सनदा आणल्या व तसेच मोगलाईत असलेले पुणे स्वराज्यात दाखल झाले. बाळाजी विश्वनाथ याने पुण्याच्या आर्थिक विकासास वाव मिळावा म्हणून पुण्याच्या मोगल कोतवालास इ.स.१७१८ मध्ये अशी ताकीद दिली, की व्यापारावर जादा जकात बसवू नये. इ.स. १७२० नंतर पेशव्यांचे लक्ष पुण्यावर केंद्रीत झाले. इ.स.१७२५ मध्ये छत्रपती शाहूने पेशवा पहिल्या बाजीरावास पुणे दिले. तेव्हापासून पुण्याचे महत्त्व वाढीस लागले. बाजीरावाने पुणे येथे बापूजी श्रीपत चित्रावशास्त्री याची पहिला सुभेदार म्हणून नियुक्ती केली. पुण्यातील खाजगीवाले आणि तुळशीबागवाले हे चित्रावशास्त्रीचे जवळचे सहकारी होते. त्यामुळे पुण्याचा कारभार तुळशीबागवाले पाहू लागले. या तिघांनी सुरूवातीच्या काळात पुण्यात पेठा वसविणे,

व्यापार–उदिम वाढविणे, बंदोबस्त ठेवणे ही कामे केली. म्हणून पहिल्या बाजीराव पेशव्यास पुण्याचा आद्य संस्थापक असे म्हटले जाते.

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर (इ.स.१७४९) नानासाहेब पेशव्याने मराठयांच्या राजकारणांची सर्व सूत्रे पुण्याहून हलविण्यास प्रारंभ केला. नानासाहेब पेशव्याच्या मृत्यूनंतर माधवराव पेशवे, नारायण पेशवे नंतर सवाई माधवराव पेशवे हे पेशवे पदावर आले. पुणे येथे अनेक सरदारांचा उदय झाला. त्यांनी आपले वाडे पुणे शहरात बांधले. उदा. तुळशीबागवाले, रास्ते, मेंहदळे, घोरपडे इत्यादी होत. पुणे येथे पेशव्यांनी व त्यांच्या सरदारांनी अनेक वास्तू व मंदिरे बांधली. मराठयांचे सरदार महादजी शिंदे यांची समाधी वानवडी येथे उभारण्यात आली आहे. तसेच त्या समाधीवर उभारण्यात आलेली छत्री हे पुण्यातील एक प्रेक्षणीय स्थळ आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रजाबरोबर पुणे येथे तिसरे युद्ध सुरू झाले युद्धात इंग्रजांनी मराठयांचा दारूण पराभव केला आणि पुण्याच्या शनिवार वाडयावर 'युनियन जॅक' फडकविला. अशाप्रकारे पुणे हे ठिकाण पेशव्यांच्या ताब्यातून ब्रिटीशांच्या ताब्यात गेले. त्यामुळे पुण्याबरोबरच संपुर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला.

### २.४.२.४ ब्रिटिश कालखंडातील पुणे (इ.स.१८१८ ते १९४७)

ब्रिटिश कालखंडाचे तीन उपकालखंड पडतात. पहिला कालखंड सन १८१८ ते १८८६ दुसरा कालखंड हा १८६८ ते १९२० हा होय. तिसरा कालखंड हा १९२१ ते १९४७ हा होय.

### अ) पहिला कालखंड (इ.स.१८१८ ते १८६८)

इ.स.१८१८ साली पुणे हे दख्खन विभागातील ब्रिटीशांचे एक प्रमुख लष्करी ठिकाण म्हणून उदयास आले. इ .स. १८१८ मध्ये पुणे येथे 'पुणे कॅन्टोन्मेन्टची' स्थापना करून तिचा कारभार ब्रिटीश लोक पाहू लागले. इ. स. १८१९ मध्ये विल्यम चॅप्लिन याची पुण्याचा कमिशनर म्हणून नेमणूक झाली. नंतर १८२२ साली खडकी कॅन्टोन्मेन्ट स्थापन झाली. हा कालखंड शांततेचा असल्याने ब्रिटीशांनी पुण्यातील विश्रामबाग वाडयात ६ ऑक्टोबर १८२१ रोजी आधुनिक पद्धतीची पाठशाळा काढली. पुढे सन १८५१ मध्ये डेक्कन कॉलेज ही संस्था स्थापन करण्यात आली. याच डेक्कन कॉलेजमधून पुढे गोपाळ गणेश आगरकर व लोकमान्य टिळक यांनी शिक्षण घेतले. इ.स.१८५७ मध्ये भारतात ब्रिटीशांच्या विरोधात जे बंड झाले, त्यामध्ये पुण्यातील नागरिकांनी फारसा सहभाग घेतला नाही.

१८२३ मध्ये पुणे जिल्हयातील सती प्रथा ब्रिटिशांनी बंद केली. ८ फेब्रुवारी १८४० रोजी ब्रिटिशांनी पुणे येथे नगर वाचन मंदिर सुरू केले. १२ फेब्रुवारी १८४९ रोजी ज्ञानप्रकाश नावाचे मराठी वर्तमानपत्र सुरू करण्यात आले. सन १८५१ मध्ये पुण्यात पहिली इंग्रजी शाळा स्थापन केली. तसेच तत्पूर्वी महात्मा जोतिराव फुले यांनी पहिली मुलीची शाळा स्थापन केली. १८५४ मध्ये पुण्यापासून मुंबईपर्यत तारायंत्र सुरू झाले. पुण्यात १ जून १८५७ रोजी पुणे शहर नगरपालिकेची स्थापन झाली. २३ मार्च १८६४ रोजी मुंबई ते पुणे पहिली आगगाडी सुरू झाली. सन १८६७ मध्ये इंग्रज सरकारने टपालाचे खाते सुरू केले. अशाप्रकारे पुणे शहरात व जिल्हयात ब्रिटिशांनी अनेक सुधारणा करून पुण्याची प्रगती केली.[२१]

**ब) लोकमान्य टिळक कालखंड (१८६८ ते १९२०)**

लोकमान्य टिळकांच्या कार्याची सुरूवात सन १८८० सालापासून झाली. त्यांनी आपल्या ४० वर्षाच्या कारकिर्दीत महाराष्ट्रासह भारतावर आपल्या कार्याचा ठसा उमटवला होता. २ जानेवारी १८८१ रोजी लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर यांनी 'मराठा' या वृत्तपत्राची व ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' या वृत्तपत्राची स्थापना केली. या वृत्तपत्रातून लोकजागृती, लोकशिक्षण व ब्रिटीश सरकारच्या जुलमी राजवटीविरूद्ध असंतोष पसरवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. पुणे येथे सन १८९५ साली श्रीगणेशोत्सव व सन १८९६ मध्ये श्री शिवजयंती उत्सव हे दोन उत्सव टिळकांनी सुरू केले.[२२] सन १९१६ साली सर परशुरामभाऊ महाविद्यालयाची स्थापना झाली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची स्थापना सन १८७५ साली झाली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री–शिक्षणाचा प्रसार केला. पुणे येथील ब्रिटीशांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुणे सार्वजनिक सभेची स्थापना सार्वजनिक काका उर्फ गणेश वासुदेव जोशी यांनी केली.[२३]

क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशाविरूद्ध बंड पुकारले होते. त्यावेळी त्यांचे वकील पत्र सार्वजनिक काकांनी घेतले होते. क्रांतिवीर चाफेकर बंधूनी इंग्रजी अधिकारी रँड याची २२ जून १८९७ रोजी हत्या केली. त्यावेळी त्यांना ब्रिटिशांनी फासावर चढवले. तेव्हा चाफेकर बंधूनी आनंदाने फाशीची शिक्षा स्वीकारली.[२४]

लोकमान्य टिळकांनी पुणे शहराचे नाव संपूर्ण भारतभर केले. त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला सन १९०८ मध्ये भरण्यात आला होता. त्यानुसार त्यांची रवानगी मंडालेच्या तुरूंगात

झाली होती. त्यावेळी त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच." ही राष्ट्रप्रेमाची स्फूर्ती सर्वांना दिली. त्यांना असंतोषाचे जनक असे म्हणतात. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' या ग्रंथाची निर्मिती केली.[२५]

गोपाळ कृष्ण गोखले हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. त्यांना महात्मा गांधीजीनी आपल्या गुरूस्थानी मानले होते. त्यामुळे पुण्याचे नाव आणि लौकिक भारतभर झाला.[२६]

पुणे जिल्हयात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणा केल्याचे दिसून येते. त्यामध्ये डॉ.आनंदीबाई जोशी, महर्षी धोंडो केशव कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, महात्मा फुले, गणेश वासुदेव जोशी इत्यादींनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह, शेतकऱ्याचे प्रश्न, अस्पृश्यता निवारण, स्त्रीशिक्षण, उच्च-नीच भेदभाव निर्मूलन, सती प्रथा, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर संघर्ष यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन त्यांनी पुणे शहर व जिल्हा या ठिकाणी सुधारणा करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.[२७]

### क) महात्मा गांधी युग (सन १९२० ते १९४७)

महात्मा गांधीजींच्या नेतृत्त्वाचा प्रभाव पुणे जिल्हयातील काकासाहेब जोशी, केशवराव जेधे, शंकरराव मोरे व अच्युतराव पटवर्धन या युवकांच्यावर पडलेला होता. या युवकांनी काँग्रेसचा प्रसार पुणे शहरासह जिल्हयात केला. महात्मा गांधीजीनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग चळवळीत पुणे जिल्हयातील या कार्यकर्त्यांनी तसेच सर्वसामान्य जनतेने ही सहभाग घेतला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांचा सन १९३२ चा 'पुणे करार' पुणे येथील येरवडा कारागृहातच झाला होता. सन १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनामध्ये पुणेकरांनी आत्मीयतेने भाग घेतला होता.[२८]

## २.५ पुणे जिल्हयातील धार्मिक स्थळे

महाराष्ट्राची धार्मिक परंपरा वैभवशाली आहे. महाराष्ट्र राज्यात लहान-मोठी अनेक देवस्थाने असून वर्षभर सण, उत्सव, यात्रा निरनिराळ्या ठिकाणी होत असतात. महाराष्ट्रात गणपती, महादेव व जगदंबा देवी यांची उपासना करणारे लोक सर्वात जास्त आहेत. विठ्ठल हा विष्णूचा अवतार मानला जातो. वारकरी संप्रदायाचे ते आराध्य दैवत आहे. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही तीर्थस्थानं आजच्या काळातही आपले आध्यात्मिक

महत्त्व टिकवून आहेत.[२९]

धार्मिक स्थळामुळे जातीय ऐक्याचा पाया मजबूत करण्यास विशेष मदत होते. त्यामध्ये पुणे जिल्हयातील अष्टविनायकापैकी मोरगाव, थेऊर, लेण्याद्री, ओझर, राजंणगाव ही पाच गणपतीची स्थळे, भीमाशंकर, जेजूरी, नारायणपूर, पुण्यातील कसबा पेठेतील गणपती, पुण्यातील पर्वती, सोमेश्वर, देहू व आळंदी इत्यादी स्थळांची सविस्तर माहिती दिली आहे.

### २.५.१ पुणे जिल्हयातील अष्टविनायकाची पाच स्थळे

#### २.५.१.१ मोरगावः–

मोरगाव हे पुणे जिल्हयातील अष्टविनायकातील एक गणेशाचे धार्मिक स्थळ असून ते बारामती तालुक्यात कऱ्हा नदीच्या काठी आहे. मोरगाव हे पुण्यापासून ६४ कि.मी. अंतरावर आहे. प्राचीन काळापासून या ठिकाणी मोर पाळणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे या गावाला मोरगाव हे नाव मिळाले. तसेच या गावाचा आकार
मोरासारखा असल्याने त्याचे नाव मोरगाव असे पडले आहे.[३०]

मोरगावात मयुरेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर उत्तराभिमुख असून त्याच्याभोवती उंच तट, आणि चार कोपऱ्यावर मिनारासारखी रचना आहे. या मंदिराच्या पुढे दोन बाजूंना दोन दगडी दिपमाळा व मधोमध एक जयस्तंभ आहे. या मंदिराचे वैशिष्टय म्हणजे मंदिर गणेशाचे असून स्थापत्य मात्र मुस्लिम शैलीतील आहे. याचे कारण म्हणजे मोरगावच्या मयुरेश्वरावर हिंदूप्रमाणेच मुस्लिम सत्ताधिशांचीसुद्धा श्रद्धा होती. बिदरच्या बादशहाने हे मंदिर बांधले आहे.

गर्भगृहातील मूर्तीसमोर सभामंडपाच्या बाहेर एक काळया पाषाणातील नंदीची मुर्ती आहे. त्यामुळे तेथे दुसरे एक वैशिष्टय दिसून येते की, महादेव मंदिरापुढे अशा नंदीच्या मूर्ती दिसून येतात. परंतु मोरगावातील एका शिवमंदिरासाठी हा नंदी घडवून तयार केला होता. तो एका गाडयातून शिवमंदिराकडे घेऊन जाताना एका पाठोपाठ दोन गाडे मयुरेश्वराच्या दारात मोडले गेले. त्यामुळे लोकांची अशी भावना झाली की, नंदीची इच्छा मयुरेश्वराच्या मंदिरापुढे राहण्याची आहे. म्हणून त्या नंदीची प्रतिष्ठापना मयुरेश्वर मंदिरापुढे करण्यात आली आहे.[३१]

मंदिरास प्रवेशद्धारावर नगारखाना बनवलेला आहे. नगारखान्याखाली मोरेश्वराकडे मुख करून आपल्या पुढच्या दोन पायात लाडू घेऊन मूषक उभा आहे. त्यावर कमळाच्या

शिल्पाकृती कोरलेल्या आहेत. सभागृह आणि गर्भगृह अशी मंदिराची रचना असून भोवतालच्या ओवऱ्यामध्ये ही अनेक देवता आहेत. यामध्ये आठ दिशांना आठ गणेशाचे अवतार आहेत. सभामंडपातून गाभाऱ्यातील गजाननाचं दर्शन होते. मुख्य गाभाऱ्यात शेंदुर लावलेली गणेशाची आसनस्थ मुर्ती आहे. ही मुर्ती डाव्या, सोंडेची असून तिच्या दोन्ही डोळयात व नाभीत तेजस्वी हिरे, मस्तकावर नागाचा फणा आणि बाजूला रिद्धी-सिद्धी अशी त्याची रचना आहे.[३२]

गणेशभक्त मोरया गोसावी यांचे जन्मगाव हे मोरगाव होय. त्यांना कऱ्हा नदीच्या कुंडात एक गणेश मूर्ती सापडली त्याचीच स्थापना या मयुरेश्वर मंदिरात केली आहे. मयुरेश्वराची मूळ मूर्ती ही लहान आकाराची असून तिच्यावर वर्षानुवर्षे शेंदराचे लेप दिले जात असल्याने तिचा आकार वाढला. यापूर्वी इ.स.१७८८ व इ.स.१८८२ मध्ये हे कवच मूर्ती निखळल्याच्या नोंदी आहेत.[३३]

या मंदिरात देवदर्शन करून प्रदक्षिणा घालताना प्रथम उजव्या हातास मंदिराला लागून नग्नभैरवाचा कौलारू मंडप आहे. नग्न भैरव हा असितांग, रूद्र इत्यादी सर्व भैरवांचा मुख्य आहे. तो या मंदिराचा क्षेत्रपाल समजला जातो. या ठिकाणी समर्थ रामदास व संत तुकाराम यांनी भेटी दिल्याचे अनेक पुरावे सापडतात. त्यामध्ये समर्थ रामदास स्वामी व संत तुकाराम महाराजांनी स्थापन केलेली अनुक्रमे गणपती, मारूती व विठ्ठल-रखुमाईची मुर्ती पाहावयास मिळते.

शके १५२० च्या सुमारास सौराष्ट्रातील सोरटी सोमनाथहून एक सिद्धयोगी मोरगावात आले होते. ते या गणेशसंप्रदायाचे महान आचार्य होते. त्यांना 'गणेशयोगींद्र' असे म्हणत. त्यांनी ओवरीत राहून बारा वर्षे श्रींची आराधना केली. त्यांनी गाणपत्य धर्माला नवीन उजाळा दिला. मोरगावातील गोळे या गृहस्थांने योगींद्राचे शिष्यत्व पत्करले व मंदिरास तटबंदी आणि सभामंडप उभारला. अमृतराव पेशव्यांनी योगींद्राच्या आज्ञेवरून या मंदिराचे महाद्धार बांधले आणि बाजीराव याने त्यावर चौघडा चढविला.

या मंदिराच्या ओवरीवर गणेशयोगींद्रांनी स्वहस्ते काढलेली गणेशलीलांची अनेक चित्र पाहावयास मिळतात. गणेशयोगींद्र हे दिवसातील बराच काळ समाधिस्त राहत असत व त्यांची सेवा सिद्धेश्वर नावाचा शिष्य करीत असे. शके १७२७ माघ वद्य दशमीला कऱ्हा नदीच्या काठी त्यांनी समाधी घेतली. त्यामुळे मोरगावच्या मयुरेश्वराला प्रथम अग्रमान दिला जातो. येथे

भाद्रपद व माघ चतुर्थीला मोठे उत्सव साजरे केले जातात. विजयादशमी व सोमवती अमावस्येला मोठी यात्रा भरते. [३४]

### २.५.१.२ थेऊर

पुणे जिल्हयातील हवेली तालुक्यात थेऊर हे अष्टविनायकापैकी प्रसिद्ध स्थळ मुळा–मुठा नदीच्या काठावर आहे. तसेच या नदीपात्रात एक 'कदंबतीर्थ' नावाचा डोह आहे. यावरून प्राचीन काळात थेऊर हे 'कदंबनगर' या नावाने ओळखले जात होते. या गणेशाला 'चिंतामणी विनायक' असे ही म्हटले जाते. रत्न धारण करणारा म्हणून व भक्ताची चिंता दूर करणारा यावरून त्याचे नाव 'चिंतामणी विनायक' असे पडले आहे. याविषयी पौराणिक कथा ही सांगितल्या जातात.

थेऊरचे गणेशाचे तीर्थक्षेत्र अतिप्राचीन काळापासून आहे. या देवस्थानच्या स्थापनेसंबंधी जी माहिती मिळते त्यामध्ये एकदा ब्रह्मदेवाने आपल्याला सिद्धी प्राप्त व्हावी या उद्देश्याने अनुष्ठान केले. त्यातून त्याची इच्छा पुर्ण झाली. आपल्याला आपली इच्छा ज्याप्रमाणे पुर्ण करता आली त्याचप्रमाणे आपली पत्नी सावित्री व भारती यांचीही इच्छा पूर्ण व्हावी या हेतूने त्याने तेथे विनायकाची आराधना सुरू केली. मग ब्रम्हदेवाने त्याठिकाणी चिंतामणी गणेशाची स्थापना केली. ही घटना थेऊर या तीर्थस्थानी घडली होती. त्याच्यातून आज अष्टविनायकापैकी एक थेऊरचा 'चिंतामणी विनायक' आहे. [३५]

'चिंतामणी विनायक' हे गणेशाचे मंदिर पेशवे माधवराव यांच्या वाडयासमोर बांधले आहे. या मंदिराचा मुख्य दरवाजा उत्तर दिशेला असून गणेशाची मूर्ती पुर्वाभिमुख आहे. हे मंदिर प्रशस्त असून त्याच्या सभोवती प्रशस्त ओवऱ्या आहेत. मंदिराचा सभामंडप लाकडाचा असून तो माधवराव पेशवे यांनी बांधला आहे पुढे त्यामध्ये पेशव्यांचे सरदार हरिपंत फडके यांनी दुरूस्ती केल्या आहेत. मंदिरातील चिंतामणीची मूर्ती स्वयंभू असून डाव्या सोंडेची आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूंना अलिकडच्या काळात चांदीचा महिरप काढण्यात आलेला आहे. [३६]

वसईचा विजय मिळवून येताना चिमाजी आप्पांनी आणलेल्या प्रचंड घंटापैकी एक घंटा या मंदिराच्या आवारातही आहे. या मंदिराचा पूर्वीचा कळस पानशेतच्या पुरात कोसळल्याने त्याठिकाणी रणजित देसाईनी नविन सोन्याचा कळस बसवला आहे. प्रारंभी मोरया गोसावी यांचे वंशज धरणीधर महाराज यांनी सुमारे चाळीस हजार रूपये खर्च करून या मंदिराची उभारणी

सन १६५५ मध्ये केली होती. पुढे शंभर वर्षांनी श्रीमंत माधवराव पेशवे यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. नंतर पेशव्याचे सेनापती हरिपंत फडके यांनी वेळोवेळी मंदिराची दुरूस्ती केली. मंदिराच्या उत्तरेकडील महाद्वारापासून थेट मुळा–मुठा नदीपर्यंत जाण्यासाठी पेशव्यांनी घडीव चिऱ्यांची सडक बांधली आहे. ती आजही टिकून आहे.[३७]

### ऐतिहासिक महत्त्व

थेऊरचा गणपती हे श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे श्रद्धास्थान होते. ते वारंवार श्रीचिंतामणीच्या दर्शनासाठी येत असत. देवाचा सहवास नित्य राहवा म्हणून त्यांनी मंदिराच्या आवारात स्वतःसाठी प्रशस्त वाडाही बांधून घेतला होता. आज त्याठिकाणी वाडयाचे भग्न अवशेष पाहावयास मिळतात. श्रीमंत माधवराव पेशवे राजकारण व रोजच्या कटकटीतून कंटाळले की ते काही दिवस विश्रांतीसाठी या वाडयात येत असत. त्यांची श्रीचिंतामणीवर फार मोठी श्रद्धा होती. त्यांच्या शेवटच्या आजारात तर ते या मंदिरातील ओवरीतच येऊन राहिले होते. श्रीचिंतामणीचे स्मरण करत १८ नोव्हेंबर १७७२ रोजी येथेच त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी रमाबाई या सती गेल्या होत्या. आज मुळा–मुठा नदीच्या काठावर रमाबाईचे वृंदावन आहे. थेऊरमध्ये दरवर्षी कार्तिक वद्य अष्टमीस रमा–माधव पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. भाद्रपद महिन्यात प्रतिपदेपासून सप्तमीपर्यंत व माघ महिन्यात अष्टमीपर्यंत या गणेशमंदिरात खूप मोठा उत्सव साजरा केला जातो.

थेऊर गाव श्रीचिंतामणीस इनाम असून या गावाची सनद मोगल बादशहा औरंगजेब याने दिलेली आहे. सांप्रत हे देवस्थान चिंचवड संस्थानच्या ताब्यात आहे. पेशव्यांच्या राजश्रयामुळे या स्थानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. आजही त्याठिकाणी प्रत्येक अंगारकीला व संकष्टीला श्रीचिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असते.[३८]

### २.५.१.३ ओझर

पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यात कुकडी नदीच्या काठावर वसलेले ओझर हे एक श्रीविघ्नेश्वराचे ठिकाण आहे. मंदिराभोवती काळयापाषाणांनी बांधलेली अभेद्य व भव्य तटबंदी आहे. पूर्वेच्या महाद्वाराच्या पुढे दोन उंच दगडी दिपमाळा आहेत. त्यावर त्रिपुरी पौर्णिमेला दिव्यांची रोषणाई करून दीपोत्सव साजरा करतात. मुख्य मंदिराच्या महाद्धाराजवळ दोन्ही बाजूना दगडात कोरलेले भालदार व चोपदार द्वारपाल आहेत. महाद्वाराच्या आत दोन बाजूंना

तीस फूट लांबीच्या व आठ फूट रूंदीच्या २५–३० ओवऱ्या असून त्यांना दगडी कमानी आहेत. या कलात्मक कमानीमुळे या ओवऱ्यांच्या सौंदर्यात अधिक भर पडलेली आहे.[३९]

एका ओवरीच्या खाली तळघर असून त्यात विघ्नेश्वराची पालखी, हंडया, झुंबर इत्यादी सामान ठेवलेले आहे. मंदिरात एका पाठोपाठ एक असे तीन सभामंडप आहेत. सभामंडप आणि ओवऱ्या यांच्यामधून प्रदक्षिणा घालण्यासाठी दगडी फरशी केलेला मार्ग आहे. तिसऱ्या सभामंडपात विघ्नेश्वराची पूर्णाकृती बैठी मूर्ती, डौलदार कमानीत बसविलेली आहे. मूर्ती डाव्या सोंडेची असून दोन्ही डोळयात दोन माणके आणि कपाळावर हिरा बसविलेला आहे. या मूर्तीच्या सर्व अंगाला शेंदूर लावलेला आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूला रिद्धी–सिद्धीच्या पितळी मूर्ती आहेत. गाभाऱ्यात चारी बाजूना छोटे छोटे कोनाडे असून त्यात पंचायतनाच्या मूर्ती आहेत.

**ऐतिहासिक महत्त्व**

थोरल्या बाजीराव पेशव्यांनी ओझरचे देवस्थान, चिंचवडचे गणेशभक्त श्री देव यांच्या स्वाधीन केले. या देवस्थानाला इनाम म्हणून गाव व जमिनी दान दिल्या. त्यांचा भाऊ चिमाजी आप्पा यांनी वसई जिंकून घेतल्यानंतर या मंदिराचा जीर्णोद्धार करून त्यावर सोन्याचा कळस चढवला. या मंदिरात भाद्रपद चतुर्थीला गणेशोत्सव व माघ चतुर्थीला गणेश जयंतीचा उत्सव साजरा केला जातो. त्रिपुरी पौर्णिमेपासून पुढे चार दिवस दीपोत्सव साजरा करतात.[४०]

### २.५.१.४ लेण्याद्री

पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यात उत्तरेकडे कुकडी नदीच्या काठावरील 'लेण्याद्री' हे अष्टविनायकापैकी एक ठिकाण आहे. ते 'गिरिजात्मक विनायक' या नावाने ओळखतात. हे ठिकाण प्राचीन काळात 'जीर्णपूर', व 'लेखनपर्वत' या नावाने ओळखले जात होते.[४१]

या मंदिराच्या गर्भगृहात व परिसरात बौद्ध लेण्या आहेत. त्यामुळे अष्टविनायकापैकी हे एकमेव असे ठिकाण आहे की, हे मंदिर म्हणजे एक लेण बनलेले आहे. या लेण्याच वैशिष्टय म्हणजे तेथे एकही स्तंभ नाही. तसेच या लेण्याची लांबी ५३ फूट व ५२ फूट रूंदी आहे. येथील लेण्याची व्यवस्था पुरातत्त्व खात्याकडे आहे, व जुन्नरचे सरदार देशपांडे यांच्याकडे देवालयाचे सरपंच पद आहे.[४२]

मंदिरात दोन्ही बाजूस एकूण १८ ओवऱ्या आहेत. यामध्ये अंधारात गर्भगृह आहे. तेथे गिरिजात्मकाची मूर्ती आहे. ही मूर्ती आखीव रेखीव असून उत्तराभिमुख आहे. या गजाननाच्या

विषयी पौराणिक कथामध्ये असा उल्लेख आहे की, पार्वतीने गजाननासाठी लेण्याद्रीवर तपश्चर्या केली. ती तपश्चर्या फलद्रूप होऊन गजाननाचा जन्म झाला. या मंदिराचा परिसरात आणखी १८ बौद्ध लेण्या आहेत. तेथे पश्चिमेकडील लेण्यात महादेवाचे स्थान आहे. गिरिजात्मक दर्शन घेण्यासाठी लेण्याद्रीच्या पायथ्यापासून सुमारे तीनशे पायऱ्या आहेत. ज्या यात्रेकरूंना पायऱ्या चढणेही शक्य नसते. त्यांच्यासाठी या ठिकाणी डोलीची सोयही केलेली दिसते.[४३]

### २.५.१.५ रांजणगाव

पुणे जिल्हयात शिरूर तालुक्यात पुणे अहमदनगर महामार्गावर गणेशाचे हे स्वयंभू ठिकाण आहे. हा गणपती श्रीमहागणपती म्हणून ओळखला जातो. या मंदिराचे वैशिष्टय म्हणजे महागणपतीच्या पूजेच्यावेळी सुर्याची प्रकाश किरणे मूर्तीवर पडतात. त्यासाठी मंदिराचे बांधकाम करतानाच दिशासाधनाची सोय केलेली आहे. मंदिराचा सभामंडप इंदूरचे सरदार किबे यांनी व गाभारा श्रीमंत माधवराव पेशव्यानी बांधलेला आहे.[४४]

या मंदिराच्या गाभाऱ्यात महागणपतीची डाव्या सोंडेची, आसन घातलेली रेखीव मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस रिद्धी–सिद्धी आहेत. या मूर्तीच्या खालच्या बाजूला तळघर आहे. या तळघरात आणखी एक महागणपतीची लहान मूर्ती आहे. ही गणपतीची मूळ मूर्ती असून तिला दहा सोंडा व वीस हात आहेत. मंदिराच्या आवारात पडलेल्या भग्न अवशेषावरून असा अंदाज काढता येईल की, मूळ मंदिर हे नवव्या, दहाव्या शतकातील वास्तुशैलीतील आहे. [४५]

भाद्रपद शुद्ध चतुर्थीला या ठिकाणी मोठया प्रमाणात गणेशोत्सव साजरा केला जातो. भाद्रपद शुद्ध प्रतिपदा ते भाद्रपद शुद्ध पंचमी या पाच दिवसांच्या कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भक्ताला देवाच्या गाभाऱ्यात मूर्तीपर्यत जाऊन दर्शन घेता येते. अशी सोय केलेली आहे.

### ऐतिहासिक महत्त्व

या देवस्थानाला मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, यशवंतराव चंद्रचूड इत्यादीकडून इनामे मिळाली आहेत. या देवस्थानास सुरूवातीच्या काळात भोर संस्थानाकडून मदत मिळत होती. देवस्थानाची देखभाल व्यवस्थित चालण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी सनद दिली होती. थोरले माधवराव पेशवे यांनी सन १७६८ मध्ये या देवस्थानाला दिलेली सनद आजही पाहावयास मिळते.[४६]

## २.५.२ भीमाशंकर

सहयाद्री पर्वताच्या रांगेमध्ये भीमाशंकर हे एक बारा ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. भीमाशंकर हे पुणे जिल्हयातील खेड व आंबेगाव तालुक्याच्या सीमेवर असून ते एक शिवतीर्थस्थान व थंड हवेचे ठिकाण आहे. हे ठिकाण प्राचीन असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे ३,२९६ फूट इतकी आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध भीमा नदी येथील मोक्षकुण्डात उगम पावते. त्यामुळे भीमाशंकर या ठिकाणाचे महत्त्व आणखी वाढते. प्राकृत वाङ्मयात भीमाशंकर याचा उल्लेख 'भीमा उगमी भीमाशंकर' असा आढळतो.[४७]

भीमा नदीच्या उगमस्थानाजवळ एक महादेवाचे मंदिर आहे. हे मंदिर सातव्या शतकातील असून कोळी, महादेव कोळी, वारली व धनगर अशा आदिम जमातीचे हे आराध्य दैवत आहे. भीमाशंकर मंदिराचे बांधकाम अनेक वेळा केले गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी मंदिराच्या व्यवस्थेसाठी खरोस्ती गाव दान दिले होते. चिमणाजी अनंत भिडे नाईक यांनी सन १७३३ मध्ये मंदिराची दुरूस्ती केली. दीक्षित पटवर्धन यांनी सन १७६६ मध्ये आवश्यक दुरूस्त्या केल्या आहेत. रघुनाथराव पेशवे यांनी विहीर खोदणे, बांधून पक्की करणे हे काम केले. त्याचा नाना फडणीसांनी जीर्णोद्धारास प्रारंभ केला होता. त्यानंतर त्याच्या पत्नीने ते अपुरे जिर्णोद्धारचे काम पुर्ण केले. हे मंदिर हेमाडपंती शैलीतील असून काळया व ताशीव दगडांनी त्याची उभारणी केलेली आहे. विशेष म्हणजे या मंदिरात जुन्या-नव्या नागर स्थापत्यशास्त्रांचा संगम झालेला दिसतो. मंदिराच्या दगडी स्तंभावर व गाभाऱ्याच्या दरवाजावर सुबक व सुंदर नक्षीकाम केलेले आहे. तसेच त्यावर देव-देवता आणि राक्षसगणांची शिल्पे कोरलेली आहेत.
गाभाऱ्यातील स्वयंभू शिवलिंगावर अभिषेक पात्रातून सतत जलधारा सुरू असते.[४८]

### ऐतिहासिक महत्त्व

शिवमंदिराच्या सभामंडपापुढे दोन खांबाच्या मधल्या लोखंडी दांडीला पाच मण वजनाची घंटा टांगलेली आहे. या घंटेच्या तोंडावर ख्रिस्तमाता 'व्हर्जिन मेरी'ची मूर्ती कोरलेली आहे. मूर्तीच्या मस्तकावर क्रॉसचे चिन्ह आहे. मूर्तीच्याखाली १७२९ हा आकडा इंग्रजीत कोरलेला आहे. यावरून ही घंटा कधी तयार केली गेली हे दर्शवतो. सन १७३९ मध्ये ठाणे जिल्हयातील वाशिंद या गावातील चर्चमधून ही घंटा चिमाजी आप्पा यांनी विजयचिन्ह म्हणून जिंकून आणलेली आहे. या घंटेच्या बाजूला एक छोटे मंदिर आणि तुलसी वृंदावन आहे. बाजूला

दोन दगडी दिपमाळा आहेत. येथेच एक होम–हवनासाठी एक चौथरा बांधण्यात आलेला आहे. मंदिराच्या डावीकडे व समोर तटबंदी आहे. उजवीकडे एक धर्मशाळा आहे. व शेजारी मंदिराच्या विश्वस्तांचे कार्यालय आहे.[४९]

भीमाशंकर मंदिराला सरकारकडून वर्षासन व काही जमीन इनाम दिलेली आहे. भोरगिरी संस्थानाकडून या देवस्थानचा कारभार पाहिला जात होता. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी समिती स्थापन झालेली आहे. येथील कारभार गुरव समाजाच्या लोकांच्या हातात आहे. गुरव तेथील पुजा–अर्चा व देखभाल करत असतात.[५०]

### २.५.३ जेजुरी

महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील लाखो भक्तांचे कुलदैवत व श्रद्धास्थान असलेले खंडोबा हे देवस्थान जेजुरी येथे आहे. खंडोबाच दुसर नांव 'मल्हारी' आहे. कर्नाटकात खंडोबास 'मठमैलार' अस संबोधले जात. याच शब्दाचे मराठीत 'मल्हार' हे नाव पडल आहे. 'मल्हारी' या कानडी–संस्कृत शब्दाचे रूप आहे. 'येळकोट येळकोट जयमल्हार' व 'चांगभले' हे खंडोबाच्या संदर्भातील घोषवाक्य आहेत. खंडोबा या दैवतास खंडेराय, म्हाळसाकांत, मार्तंड, भैरव, मल्लखान व अजमतखान इत्यादी नावांनी संबोधले जाते. महाराष्ट्रात सर्व जाती व पंथाचा तसेच गोरगरीब व श्रीमंत लोकांचा खंडोबा हा देव आहे. या दैवताची घरोघरी पूजन केले जाते.[५१]

जेजुरी हे खंडोबाचे देवस्थान पुणे फलटण मार्गावर पुण्याच्या आग्नेय दिशेस पन्नास किलोमीटर अंतरावर आहे. हे देवस्थान जेजुरीगडावर आहे. या गडावर जाण्यासाठी ३९० पायऱ्या आहेत. पुरंदर डोंगररांगेवर एका पठारावर जेजुरीगड व खंडोबाचे मूळ मंदिर आहे. हे कडेपठार ४०० फूट उंचीचे असून गडाची उंची सुमारे २५० फूट आहे. या गडावर अनेक छोटया–मोठया दीपमाळा, नगारखाने, पार व वेशी आहेत. या गडावर अठरा वेशी व साडेतीनशे दीपमाळा आहेत.[५२]

पेशवा दुसरा बाजीराव यांनी जेजुरी गडाच्या पायथ्याशी ३७ एकरात प्रशस्त तलाव बांधला आहे. या तलावास पेशवे तलाव असे नाव दिले आहे. तर या तलावाच्या पुर्वेकडील बाजूस २० एकराच्या प्रशस्त जागेत इंदूरचे अधिपती तुकोजीराव होळकर यांनी सन १७७० मध्ये दुसरा भव्य तलाव बांधला आहे. त्यामुळे गडावर जाण्यासाठी पुर्वेकडील दरवाजा बुजवून

टाकला आहे. उत्तरेकडील बाजूस दरवाजा ठेवलेला आहे. या दरवाज्यातून आत गेल्यावर एक अखंड पाषाणात नंदी घडविलेला पाहावयास मिळतो. त्याच्या दोन्ही बाजूला दोन हत्ती शिल्प आहेत. मुख्य प्रवेशद्धाराजवळच गणेश मंदिर असून जवळच अखंड पाषाणात कोरलेले कासव आहे. सात–आठ पायऱ्यानंतर भग्न वेशीचे अवशेष पाहावयास मिळतात. पुढे मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत जाताना अनेक छोटया मोठया दिपमाळा आहेत.

या गडावर मंदिरा शेजारी एक दगडी चौथरा बांधलेला आहे. सन १६६२ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचे पिता शहाजीराजे यांची या ठिकाणी भेट झालेली होती. तेव्हा त्यांच्या पावलाचे ठसे, त्या चौथऱ्यावर उमटवलेले आजही पाहावयास मिळतात. या भेटीची स्मृती राहावी, यासाठी तो चौथरा आजही व्यवस्थितपणे ठेवण्यात आलेला आहे. या चौथऱ्याच्या डाव्या बाजूस खंडोबाची पत्नी बाणाई देवीचे छोटेसे मंदिर आहे. खंडोबाने बाणाईस दिलेल्या वरानुसार प्रथम दर्शन घेण्याची प्रथा आहे. बाणाई देवीच्या मंदिराच्या उजव्या बाजूस एका मंदिरात हेगडी व प्रधान यांच्या दोन पाषाणमूर्ती आहेत. हेगडी हा खंडोबाचा प्रधान असून बाणाईचा भाऊ होता. तो विष्णूचा अवतार मानला जातो.[५३]

जेजुरीगडावर सहाव्या वेशीजवळ साक्षी गणेशाचे मंदिर आहे. महाद्वारालगतच्या तटाच्या भिंतीत शिवकालीन गडाचा रखवालदार यशवंतराव याची शेंदूर लावलेली शिल्प प्रतिमा आहे. हिंदूच्या देवदेवतांची व मंदिरांची धूळधाण करणारा औरंगजेब बादशहा याने आपल्या सैन्यासह ओरिसातील भुवनेश्वर मंदिराची नासधूस केल्यानंतर आपला मोर्चा जेजुरी गडाकडे वळविला. याप्रसंगी या गडाचा रखवालदार यशवंतराव यांने शर्थीने चिवटपणे झुंज देत आपला प्राण ठेवला. औरंगजेब बादशहाला हा गड जिंकण्यास अपयश आले होते. याचे कारण या गडावर असणारे भुंग्यासारख्या किटकानी बादशहाच्या सैनिकांना सळो की पळो करून सोडले होते. शेवटी आपला पराभव होत आहे, हे मान्य करून औरंगजेब बादशहाने खंडोबा देवाला सव्वा लाख रूपयाचा सुवर्ण कोंदनात मढविलेला रत्नाचा भुंगा अर्पण करून 'अजमतखान' असे संबोधले होते.[५४]

या मंदिराच्या महाद्वाराजवळ श्रीगणेश, नंदी व वाघ यांच्या अखंड पाषाणात घडविलेल्या मूर्ती आहेत. या मूर्तीजवळ श्री समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापन केलेली श्री हनुमानाची मूर्ती आहे. खंडोबाच्या मंदिरापुढे मोठे प्रशस्त प्रांगण आहे. प्रांगणाभोवती ३५० यार्ड किल्ल्याप्रमाणे

चुनेगच्ची असलेली भक्कम तटबंदी आहे. या तटबंदीस तीन दरवाजे आहेत. ही तटबंदी खटावकर यांनी सन १५५३ मध्ये उभारलेली आहे. या तटबंदीचा जीर्णोद्धार इंदूरच्या महाराणी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी सन १७४२ ते १७७७ या दरम्यान केला. तटबंदीच्या आत ६३ ओवऱ्या असून प्रांगणाच्या मध्यभागी एक मंडप आहे. ओवऱ्या व मंडपाचे बांधकाम सन १६३५ मध्ये राघो मंबाजी यांनी केले आहे.[५५]

खंडोबाचे मंदिर हे सभामंडप, गर्भगृह व देवडया अशा तीन भागात विभागलेले आहे. मंदिरात दोन मोठया घंटा असून त्यातील एक घंटा पोर्तुगीज बनावटीची आहे. या घंटेवर १७११ हे साल कोरले असून , N.S.DASAN GUST असे लिहीलेले आहे. मंदिराच्या डाव्या देवळीत बत्तीस किलो वजनाची चार फूट लांब आणि चार इंच रूंद व चार फूट उंच खंडोबाची 'खांडा'(तलवार) आहे. मंदिराशेजारील देवडीत खंडोबाची तळी भरली जाते.[५६]

जेजुरीच्या खंडोबाचे गर्भगृहाला चांदीने मढविलेला दरवाजा आहे. या दरवाजाचे काम धारच्या पवारांनी केलेले आहे. हे गर्भगृह पंधरा फूट लांबी व रूंदीचे आहे. त्याच्या मध्यभागी एक मखर आहे. मखरीपुढील चौकोनात खंडोबा व म्हाळसा अशी दोन स्वयंभू लिंग आहेत. त्यावर चांदीचे मुखवटे आहेत. या चौकोनाशेजारी बाणाई देवीचे स्वयंभू लिंग आहे. एका कोनाड्यात खंडोबाची आसनमांडी घालून बसलेली वस्त्र नेसलेली पाषाण मूर्ती असून एका हातात त्रिशूळ, दुसऱ्या हातात डमरू, तिसऱ्या हातात परळ(गडू) व चौथ्या हातात खड्ग आहे. खंडोबाचा पोषाख हा बाराबंदी व शिंदेशाही पगडी असा आहे. खंडोबाच्या दोन्ही बाजूस पाषाणाच्या मूर्ती असून त्यांना जोगेश्वरी असे म्हणतात. गडावर एका भिंतीच्या कोपऱ्यात गुप्तमळेश्वराचे स्थान असून दर्शनासाठी महाशिवरात्रीस येथील दरवाजा उघडण्यात येतो.[५७]

**ऐतिहासिक महत्त्व**

पेशवा नारायणरावाचा खून झाल्यानंतर त्याच्या पत्नीला संरक्षणासाठी पुरंदर किल्ल्यावर आणले गेले होते. तेव्हा ती गरोदर होती. त्यावेळी बारभाईनी तिचे व तिच्या मुलाचे संरक्षण व्हावे या हेतूने जेजुरीगडावर नाना फडणीस यांनी खंडोबा देवास नवस केला होता. तेव्हा गंगाबाईचा पुत्र सवाई माधवराव पेशवे पदावर विराजमान झाला त्यावेळी नानां फडणीस यांनी नवस फेडण्यासाठी पंचवीस हजार रूपये खर्चून चांदीच्या देवमूर्ती घडविल्या. दगडी मंडप रूप्याने मढविला. देवास सोन्याचे मुखवटे व कलगी–तुरा इत्यादी सामग्री दिली आणि एक

मणाचा भंडारा वाहिला.[५८]

आधुनिक कालखंडात ब्रिटीशांच्या विरोधात क्रांतिकारकांनी जे सशस्त्र लढे उभारले होते. त्यामध्ये क्रांतिवीर उमाजी नाईक यांचे खंडोबा हे दैवत होते. उमाजी नाईक यांनी पुरंदर परिसरातील तरूणांना एकत्र करून ब्रिटिश सत्तेविरूद्ध उठाव केला होता. खंडोबाचे नित्यदर्शन व इतर धार्मिक कार्यक्रमात त्याचा सहभाग असे. सन १८३२ मध्ये उमाजी नाईकास ब्रिटिशांनी पकडले व फाशी दिले. त्यावेळी फासावर लटकवित असताना उमाजी नाईक यांनी ‘यळकोट, यळकोट जय मल्हार’ असा घोष करीत त्याने आनंदाने मृत्यूला कवटाळले होते. खंडोबा मंदिराच्या आवारातच उमाजी नाईक यांची तालीम आहे. खंडोबाची प्रथम पत्नी म्हाळसा हिचे ही मंदिर येथे आहे.

खंडोबा हा शिवाचा अवतार समजला जातो. त्यामुळे सोमवती अमावस्येस जेजुरी गडावर यात्रा भरते. तसेच चैत्री पौर्णिमेस, श्रावणी पौर्णिमेस, चंपाष्टमीस, दसरा व महाशिवरात्रीस येथे मोठया यात्रा भरतात. आश्विन महिन्यात येथे खंडोबाचे नवरात्र असते. दसऱ्यादिवशी जेजुरीगड व कडेपठारावरून निघालेल्या खंडोबाच्या पालख्या एकमेकांना भेटतात. चंपाषष्टीस असलेल्या नवरात्रीस ‘वांगसटीचे नवरात्र’ असे म्हणतात. हे खंडोबाचे मुख्य नवरात्र असून या प्रसंगी येथे मोठा उत्सव असतो. भाद्रपद व माघ महिन्यात मोरगावहून चिंचवडला निघालेली तांदळा गणपतीची पालखी, गडावर मुक्कामास येते.[५९]

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात खंडोबाच पूजन आजही मोठया प्रमाणावर केले जाते. संत जनाबाई, कवी अमृतराय, रामदास स्वामी, संत तुकाराम, संत एकनाथ या संतानी आपल्या साहित्यात खंडोबा, जेजुरी, म्हाळसा, बाणाई देवी यांचा नामोल्लेख केलेला आढळतो.[६०]

खंडोबा हे दैवत हिंदूचे आहे तसेच ते मुस्लिमांचे ही मानले जाते कारण खंडोबाला मल्लुखान व अजमतखान अशी दोन मुसलमानी नावे आहेत. मल्लुखान हे नाव बीड येथे मिळालेल्या १७ व्या शतकातील एका कोरीव लेखातही आहे. अजमतखान हे नाव मोल्सवर्थच्या इ.स.१८५७ च्या मराठी–इंग्रजी कोशाच्या दुसऱ्या आवृतीत दिलेले आहे. ही नावे व उपासनेत भिक्षा मागण्यासाठी योजलेला गदा हा शब्द यावरून मुसलमान भक्तसुद्धा या देवतेला भजत होते हे स्पष्ट होते.

जैन संप्रदायातील काही लोकांनी मल्लारी म्हणजे आपला तीर्थकर मल्लिनाथ असे समजून जेजुरीच्या मंदिरात गाभाऱ्यात बाहेरील कोनाडयात मल्लिनाथाचा यक्ष कपर्द याची मूर्ती बसविली आहे. त्याखाली संवत १३०३(शके ११६८, इ.स.१२४६) चा लेख असून त्यात धउल्लक नावाच्या भक्ताने वरील यक्षाची मूर्ती घडविल्याचे म्हटले आहे.[६१]

### २.५.४ कसबा पेठ गणपती पुणे

कसबा पेठेतील गणपतीलाच श्री सूर्यमुखी गणपती असे म्हणतात. या गणपतीच्या मंदिराचे बांधकाम आधुनिक काळातील असले तरी त्या मंदिरातील मूर्ती ही फार पुर्वीची असल्याचे दिसून येते. परंतु निश्चितपणे ती कोणत्या काळातील आहे, हे सांगता येत नाही. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे गणेशाची मूर्ती जमिनीवर ठाण मांडून बसलेली आहे. या मूर्तीची उंची सुमारे तीन फूट असून शेंदरी रंगाची आहे. या गणेशाची सोंड डाव्या बाजूस असून ती डाव्या हातातील मोदक पात्रात टेकलेली आहे. या मूर्तीचा एक पाय दुमडला आहे. दुसरा पाय काहीसा पसरलेला आहे. पायाशी मोठे काळ्या पाषाणातील शिवलिंग असून समोर छोटा नंदी आहे. या मंदिरातील मूर्तीकडे पाहिले असता असे दिसते की, ही मूर्ती शिवलिंगाची पूजा करीत आहे.[६२]

शिवलिंग व गणपती हे एका अखंड दगडातील आहेत. गणपतीसमोर मोठे शिवलिंग क्वचित पाहावयास मिळते. एका अखंड दगडातील गणपती व शिवलिंगाचे हे एकमेव स्थान आहे. त्यामुळे ते वैशिष्ट्यपुर्ण वाटते.

### २.५.५ पर्वती

पुण्याच्या नैऋत्य दिशेला पर्वती ही छोटी टेकडी आहे. या टेकडीवर पर्वती किंवा पर्वताई देवीचे स्थान प्राचीन काळातील आहे. पर्वती गावाचे उल्लेख शिवकालात ही सापडतात. पर्वती देवीच्या नावावरून या टेकडीला पर्वती हे नाव पडले आहे.[६३]

सन १७४९ मध्ये बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्याने पर्वती टेकडीच्या माथ्यावर मंदिरे बांधून त्यातील प्रमुख मंदिरात देवदेवेश्वराच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. तेंव्हापासून त्यांनी पर्वतीवरील मंदिराचा स्वतंत्रपणे कारभार चालविण्यास सुरूवात केली. सरदार खासगीवाले यांच्या देखरेखी खाली हा कारभार चालविण्यात येत असे.[६४]

पर्वती देवीचे महत्त्व पाहत असताना असे दिसून येते की, थोरल्या बाजीरावाची पत्नी काशीबाई पायाच्या आजाराने त्रस्त होत्या. तेव्हा तिचा आजार बरा व्हावा या हेतूने नानासाहेब पेशव्यांनी सुरेख मंदिर बांधले. अशाप्रकारे जी टेकडी ओसाड होती त्यास या मंदिरामुळे महत्त्व आले. नानासाहेब पेशव्यांनी पर्वती देवीचे मंदिर उभारून त्याच्या जोडीला देवदेवेश्वर, विष्णू, गणपती व सूर्य अशी चार मंदिरे उभारून शिवपंचायतन सिद्ध केले. नानासाहेब पेशवे शंकराचे निःस्सीम भक्त होते. त्यांनी आपले काका चिमाजी आप्पा यांनी मुठा नदीच्याकाठी श्री ओंकारेश्वराचे मंदिर बांधले होते. त्याचे अनुकरण करून पर्वतीवर नानासाहेबांनी देवदेवेश्वराचे मंदिर बांधले. पर्वतीवर चार मंदिरे बांधून त्या मंदिराच्या सभोवती अष्टकोनीय तटबंदी उभारली. मंदिरात जाण्यासाठी एक महादरवाजा तयार केला आहे.[६५]

नानासाहेबांनी देवदेवेश्वर शंकराची मूर्ती रूप्याची तर त्याच्या मांडीवर बसलेली पार्वती व गणपतीची मूर्ती भरीव सुवर्णाची करून घेतली आहे. शंकराची मूर्ती ६३३७ तोळे, श्रीपार्वती १२४५ तोळे व गणपतीची मूर्ती ६८६ तोळे अशा वजनाची आहे. याशिवाय प्रत्येक मूर्तीला हिरे–माणकांचे अलंकार सजवले आहेत. तसेच मंदिराच्या पाच कळसांनाही तांब्यावर सोन्याचा मुलामा देऊन लखलखीत करण्यात आले आहे. त्यासाठी १०७९ तोळे सोने खर्च करण्यात आले आहेत. शत्रूच्या हल्ल्याप्रसंगी या मूर्ती सिंहगडावर हलविण्यात येत असत.

शत्रुच्या हल्ल्याचे अनेक प्रसंग घडले होते. त्यामध्ये सन १७५३ व १७६३ चे निजामाचे हल्ले झाले त्यावेळी निजामाने पर्वतीवर नासधूस केली. तेथे काहीही न सापडल्याने त्याने मंदिराचे कळस कापून नेले. सन १७६८ मधील महादजी भोसले याने पुण्यावर स्वारी केली. इ.स.१८०३ मधील होळकरांची पुण्यातील नासधूस आणि १८१७ मधील इंग्रजांशी मराठयांची झालेली लढाई, त्यावेळी पर्वतीवरील मूर्ती सिंहगडावर नेण्यात आल्या होत्या. १५ जुलै १९३२ रोजी पार्वती व गणपतीच्या सुवर्णमूर्ती चोरीला गेल्या होत्या. त्या मूर्ती अजूनही सापडल्या नाहीत. आज त्याठिकाणी सोन्याचा मुलामा दिलेल्या मूर्ती पाहावयास मिळतात.[६६]

पर्वतीवर वाडयाच्या मागील बाजूस कार्तिकेय मंदिर आहे. कार्तिकेय हा शंकराचा पुत्र मानला जातो. विशेष म्हणजे महाराष्ट्रात कार्तिकेय मंदिरे बांधण्याची प्रथा कोठेही आढळत नाही. पेशवा नानासाहेब यांचे बंधू रघुनाथराव यांनी या मंदिराची उभारणी तेथे केलेली दिसते. आजपर्यत कार्तिकेयची मूर्ती सहा वेळा बदलून पुनर्स्थापना करण्यात आली. दुसऱ्या बाजीराव

पेशव्याने पर्वतीसाठी खूप खर्च केला होता. त्याने तेथे रस्ता व पाणी याची सोय केली होती. तसेच त्याने आजपर्यंत खासगी व्यवस्थेने चालविण्यात येणाऱ्या पर्वती संस्थानचा कारभार सन १८०३ नंतरच्या काळात स्वतंत्रपणे पंचमंडळी नेमून चालविण्याची प्रथाही सुरू केली त्यामुळे पेशवाईच्या अस्तानंतरही पर्वती संस्थानांची योग्य संभावना करून इंग्रजांनीही ते व्यवस्थित चालण्यासाठी लक्ष दिले. ३१ जानेवारी १८४२ रोजी मुंबई सरकारने ठराव करून संस्थानाची व्यवस्था पुण्याचे कलेक्टर आणि पुण्यातील प्रतिष्ठित नागरिकापैकी सहा पंच नेमून त्यांच्याद्वारे करावी, अशी व्यवस्था केली. ही व्यवस्था सन १९७२ पर्यंत चालू होती. त्यानंतर पर्वती संस्थानाची व्यवस्था धर्मादाय आयुक्ताच्या संमतीने पंचमंडळीची नेमणूक करून चालविली जाते. पेशव्यांचे वंशज वि.वि.पेशवा संस्थानाचे सरपंच आहेत. अन्य पंचमंडळीत बापूसाहेब जोशी, वसंतराव नूलकर, नानासाहेब बले, रामभाऊ चव्हाण, भगवानपंत जोशी इत्यादीचा समावेश आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी पदसिद्ध विश्वस्त आहेत. या सर्वांनी चांगल्या प्रकारे पर्वतीची देखभाल ठेवलेली आहे.[६७]

## २.५.६ देहू

हवेली तालुक्यातील देहू हे संत तुकाराम महाराजांची जन्मभूमी व कर्मभूमी आहे. संत तुकाराम महाराजांनी महाराष्ट्रातील लोकांना भक्ती कशी असावी, हे शिकविले. संत तुकाराम महाराजांनी रचलेले अभंग आजही महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यांनी उच्च–निच जातीभेद मोडून काढून सर्वत्र समानतेचा संदेश दिला एवढेच नव्हे तर त्यांनी समाजनिरीक्षण करून जो अभंग रचला त्यामध्ये ‘बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले । अंग झाडीन अंग । त्यांच दास्यत्व करीन ।।’[६८]

### देहूतील महत्त्वाची ठिकाणे

### १) देऊळवाडा–

देऊळवाडयात संत तुकाराम महाराजांची एक पोषाख घातलेली पाषाणमूर्ती आहे. या वाडयातच संत तुकाराम महाराजांचा इ.स. १६०८ मध्ये जन्म झाला.

### २) समाधी स्थळ–

देऊळवाडयाच्या उत्तर महाद्वारासमोर संत तुकाराम महाराजांच्या वंशजांच्या व वारसांच्या समाधी आहेत. यामध्ये संत तुकाराम महाराजांचे चिरंजीव नारायणबाबांची समाधी

आहे. या समाधीच्या बाजूस एक महादेवाचे मंदिर आहे. मंदिराजवळ इंद्रायणी नदीवर एक पुल बांधला असून पुलापलिकडे संत तुकाराम महाराजांची मुलगी भागिरथी हिचे सासर येळवाडी हे गाव आहे.

**३) चोखामेळा मंदिर–**

देहू गावामध्ये हरिजन वस्तीत जाधव नावाच्या गृहस्थाने संत तुकाराम महाराजांचा स्वभाव पाहून बांधलेले एक चोखामेळा या संताचे मंदिर आहे.

**४) निर्वाण स्थळ–**

गोपाळपुऱ्यात प्रवेशताना एका लहानश्या अश्वत्थ वृक्षाखाली संत तुकाराम महाराजांच्या निर्वाणाचे स्थान आहे. फाल्गुन वद्य पंचमी शके १५७१ सोमवार (इ.स. १६४९) रोजी या ठिकाणाहून संत तुकाराम महाराज गुप्त झाले होते.

**५) भागिरथी मूर्ती–**

संत तुकाराम महाराजांच्या निर्वाण स्थळाच्या डाव्या बाजूस त्यांची कन्या भागिरथी हिची मूर्ती आहे. आपल्या पित्याच्या वियोगाची बातमी ऐकून ती येळवाडीहून पळत आली होती. तिला झालेल्या दुःखावेगाने तिने टाहो फोडला. त्या ठिकाणी आज भागिरथीची मूर्ती आहे. एका कोपऱ्यात भजन करत असलेल्या संत तुकाराम महाराजांची काळया पाषाणातील मूर्ती आहे. येथेच विठ्ठल–रखुमाईचे मंदिर आहे. तसेच एक तुळशी वृंदावन व मुरलीधराच मंदिर आहे.

**६) इंद्रायणीचा डोह–**

गोपाळपुऱ्यापासून काही अंतरावर इंद्रायणी नदीच्या पात्रात हे स्थळ आहे. या ठिकाणी संत तुकाराम महाराजांना जलदिव्य करावे लागले होते. संत तुकाराम महाराजांनी धर्म बुडविला म्हणून असंतुष्ट झालेल्या लोकांपैकी मंबाजीबुवाने संत तुकाराम महाराजांच्या वहया इंद्रायणी नदीत बुडविल्या होत्या. त्या वहया परत मिळाव्यात म्हणून संत तुकाराम महाराजांनी तेरा दिवस अन्नपाणी वर्ज्य करून नदीतीरी धरणे धरली व तेराव्या दिवशी त्यांना त्यांच्या वहया मिळाल्या.

**७)गाथा मंदिर**

देहू गावातील मुख्य आकर्षण म्हणजे गाथा मंदिर होय. याठिकाणी तुकाराम महाराजांचे भव्य शिल्प पाहावयास मिळत. गाथा मंदिरात संत तुकाराम महाराजांचे ४६०७ अभंग उच्च

प्रतीच्या मार्बलवर कोरलेल आहेत. हे गाथा मंदिर बारा गुंठे जागेवर उभारलेले आहे. वीणा मंडपाच्या खांबांस व महिरपीस बन्सी पहाडपूर दगडाचे नक्षीकाम केलेले आहे. कठडयावर जाळीची व खांबांची रेलिंग आहे. या गाथा मंदिर परिसरात भक्तासाठी पंधरा हजार स्केवर फूटाचे तीन मजली भक्त निवास बांधण्यात आलेले आहेत.[६९]

**ऐतिहासिक महत्त्व**

संत तुकाराम महाराजांनी केलेल्या कार्याचा गौरव महाराष्ट्रासह संपूर्ण हिंदुस्थानात झालेला होता. सन १८४९ मध्ये इंग्रज मिशनरी मरे मिचल याने आपल्या प्रस्तावनेसह तुकाराम चरित्राचा इंग्रजी गोषवारा मुंबईच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या जर्नलमध्ये छापला होता. मरे मिचल यांना तुकाराम गाथांचा मोठा व्यासंग होता.

जानेवारी १८६७ मध्ये कंपनीचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इनस्ट्रक्शन सर अलेक्झांडर ग्रँट यांनी तुकाराम महाराजांच्यावर 'फॉर्टनाइटली रिव्हयू' मध्ये एक निबंध प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी काही निवडक अभंगाची पद्यात्मक भाषांतरे दिली होती. ग्रँट साहेबांची तुकाराम गाथेवर फार मोठी भक्ती होती. हे त्या निबंधातील काही भाषातंरित
वाक्यावरून स्पष्ट होते.

तुकारामांच्या अभंगाची डेव्हिडच्या गीतांशी तुलना टाळता येणे शक्य नाही. हे अभंग म्हणजे देवाच्या सतत सान्निध्यात असलेल्या हृदयाचे निरनिराळया प्रसंगी व वेगेवेगळया भावनांच्या आवेशात पक्षांच्या कूजिताप्रमाणे सहज गाइलेले उद्‌गार आहेत. ज्यांच्या मुखी तुकारामांची वाणी आहे, त्यांना नैतिकदृष्टया ख्रिस्तीधर्म श्रेष्ठ आहे, हे पटवून देणे दुरापास्त आहे.[७०]

**२.५.७ आळंदी**

पुणे जिल्हयात खेड तालुक्यात पुण्यापासून २१ कि.मी.अंतरावर श्री क्षेत्र आळंदी हे संत ज्ञानेश्वर महाराजांचे जन्मगाव आहे. शके ११९७(इ.स.१२७५) श्रावण कृष्ण अष्टमी, मध्यरात्री ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म झाला. आळंदी हे तीर्थक्षेत्र प्राचीन काळी सिद्धक्षेत्र शिवपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. येथील सिद्धेश्वर मंदिर आणि इंद्रायणीच्या पात्रातील सिद्धेबेट या अवशेषावरून याची सत्यता पटते.

### १) आळंदी नावाची उत्पत्ती–

आळंदी शहरातून जी इंद्रायणी नदी वाहते. या नदीला बाळमुंकुदाच्या अलका महात्म्यात 'कुबेरगंगा' असे म्हटले आहे. या नदीत कपिल, वरूण, सिद्धक्षेत्र, चक्र, शाली, वायु आणि चंडिकातीर्थ वगैरे तीर्थ आहेत. राष्ट्रकूट राजांनी या क्षेत्राला 'अलंदिय' असे नाव दिले होते. त्याचाच पुढे 'आळंदी' असा अपभ्रंश झालेला आहे. संतानी या तीर्थक्षेत्राला 'अलंकापुरी' असे नाव दिलेले आहे.[७१]

### २) आळंदीचे माहात्म्य–

महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रामध्ये आळंदी हे महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. आळंदी हे आध्यात्मिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रदीर्घ निवासाने व समाधीने पूण्यभूमी बनली आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी सारस्वत व भागवत धर्माच्या जडणघडणीत महत्त्वाचे कार्य केले होते. आध्यात्मापासून वंचित असलेल्या बहुजन समाजाला गीता, ब्रह्मविद्या, अद्वैत तत्त्वज्ञान, नीतिशास्त्राची ओळख त्यांनी प्राकृत भाषेत करून दिली. ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाची स्थापना करून भागवत धर्माचा पाया घातला. त्यांनी भक्तीचा प्रसार जातीभेद निषिद्ध मानला व भक्तिक्षेत्रात समता प्रस्थापित केली.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्या ग्रंथरचना केल्या त्यामध्ये ज्ञानेश्वरी, ज्ञानदेवी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी व हरिपाठ अशा एकूण पंधरा ग्रंथरचना केल्या. त्यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ प्रेम, प्रज्ञा व प्रतिभा यांचा उचित संगम असलेला आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी अनेक संस्कृत सुभाषित आपल्या सामर्थ्यावर मराठीत लिहीली आहेत. ज्ञानेश्वर महाराज हे प्रखर प्रज्ञा, गाढे अध्ययन व लौकिक सृष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करणारे होते. त्यामुळे अनेक भाविकांनी त्यांना आपली 'आई' मानले आहे.[७२]

### ३) आळंदीतील धार्मिक क्षेत्रांचे वर्णन

श्री सिद्धेश्वर हे ज्ञानेश्वर महाराजांचे आद्यदैवत होते. इंद्रायणी नदीच्या उत्तरेस श्रीसिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात ज्ञानेश्वरांची समाधी आहे. त्याच्या सभोवती पाषाणांनी बांधलेली अभेद्य, उंच व भव्य तटबंदी असून या तटबंदीला दक्षिण दिशा सोडून इतर तिन्ही दिशांना तीन मुख्य प्रवेशद्वार आहेत. उत्तरेकडील शिंदे दरवाजातून आत जाताना पहिली पायरी ही सातारा जिल्हयातील आरफळच्या हैबतबाबांची आहे. या हैबतबाबांनी ज्ञानेश्वर महाराजांच्या

पालखी सोहळयासाठी दिंडीतील शिस्तीचे नियम घालून दिले आहेत. त्यांनी सन १८३६ मध्ये या पहिल्या पायरीवर आपला देह ठेवला होता त्यामुळे त्या पायरीस हैबतबाबांची पायरी म्हणतात.

ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिराच्या महाद्वाराच्या आत उजव्या बाजूस मारूती व डाव्या बाजूस गरूड यांच्या मूर्ती आहेत. मारूतीच्या मूर्तीच्या उजवीकडे सुवर्ण पिंपळाचा पार आहे. मुख्य मंदिराच्या सभामंडपाच्या दोन्ही बाजूस सारख्या आकाराचे मंडप आहेत. डाव्या बाजूचा मंडप नागपूरकर यांनी सन १९०७ मध्ये बांधला. तर उजवीकडील मंडप आळंदी संस्थान समितीने बांधला आहे. मुख्य सभामंडपाचे बांधकाम सन १७६० मध्ये महादजी शिंदे यांचे दिवाण रामचंद्र शेणवी यांनी केले आहे.[७३]

नागपूरकर मंडपाच्या डाव्या बाजूस संत एकनाथांचा पार आहे. मुख्य सभामंडपाच्या पुढे कासव मंडप आहे. डाव्या बाजूस अजान वृक्षाचा परिसर आहे. कासव मंडपाच्या डाव्या बाजूस लक्ष्मीनाथबुवा यांची समाधी असून दक्षिणेच्या भिंतीजवळ डावीकडे केसरीनाथ व उजवीकडे भोजलिंगबाबा या ज्ञानेश्वरांच्या परंपरेतील समाध्या आहेत. केसरीनाथ हे नाथसंप्रदायातील अधिकारी पुरूष होते. भोजलिंग बाबा हे जातीने सुतार व वृत्तीने योगारूढ होते. वयाने वडील असल्यामुळे ज्ञानेश्वर महाराज त्यांना काका म्हणत. येथील मंडप केसरीनाथाचे शिष्य शिवदीननाथ यांनी सन १७२५ मध्ये बांधला आहे.[७४]

समाधी मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात श्री ज्ञानेश्वर महाराजांची संजीवन समाधी आहे. गाभाऱ्यामध्ये एकावर एक असे चार लहान दगड आहेत. त्यावर ज्ञानेश्वर महाराजांचा मुखवटा आहे. ज्ञानेश्वरांनी या ठिकाणी श्री शालिवाहन शके १२१८ दुर्मख नामसंवत्सर कार्तिक मास कृष्ण पक्ष त्रयोदशी, गुरूवार २५ ऑक्टोबर १२९६ रोजी माध्यान्ह समयी येथे वयाच्या बाविसाव्या वर्षी संजीवन समाधी घेतली. या प्रसंगी नामदेव व इतर संत मंडळी उपस्थित होती.[७५]

मंदिराच्या गाभाऱ्यातील ज्ञानेश्वरांच्या या समाधीच्या मागील बाजूस विठ्ठल–रखुमाईच्या मूर्ती आहेत. दुसऱ्या बाजीराव पेशव्याचे कारभारी अंताजी माणकेश्वर यांनी गाभाऱ्यासमोर मंडप बांधला होता. त्याचा जीर्णोद्धार ज्ञानेश्वर संस्थानाने सन १९२५ मध्ये केला. समाधी मंदिर चिरेबंदी पाषाणांचे असून त्याचे बांधकाम पुरंदरचे आंबेकर–देशपांडे यांनी सन १५७० मध्ये

केले. मंदिराचा 'कलशाध्याय' पुण्यातील बांधकाम व्यावसायिक नंदराम नाईक यांनी सन १८७३ मध्ये रचला. समाधीच्या पश्चिम भागात सिद्धेश्वर मंदिर आहे. गर्भगृह, मंडप व नंदी अशा तीन भागात हे मंदिर विभागले गेले आहे. गर्भगृहात तीन–चार पायऱ्या असून शंकराची स्वयंभू पिंड आहे. सभामंडपासमोर नंदी असून, त्याच्याजवळ असलेल्या भुयारातून ज्ञानेश्वर महाराज समाधिस्थानाकडे गेले असल्याचे संत नामदेवांनी आपल्या अभंगातून सांगितले आहे.

समाधी मंदिराच्या प्रदक्षिणा वाटेवर मुक्ताबाईचे छोटेसे मंदिर आहे. हे मंदिर सन १८०३ मध्ये नरसिंह सरस्वती स्वामींनी बांधले आहे. गाभाऱ्याजवळ पश्चिमेकडील प्रवेशद्वाराकडे सोळा स्तंभ असलेला हेमाडपंती मंडप असून त्यात गणेशमूर्ती आहे. या मंडपाच्या दक्षिणेस ज्ञानेश्वरांचे शेजघर आहे. या ठिकाणी महाराजांच्या पादुका ठेवलेल्या आहेत. समाधी मंदिरासमोर महाद्वाराजवळ गरूडपार आहे. त्याच्या पाठीमागे दीपमाळ आहे, ती कान्होजी आंग्रे यांची पत्नी लक्ष्मीबाई हिने १७७४ मध्ये उभारली आहे. पश्चिमेचा पाणदरवाजा, ओवऱ्या व भिंतीचे बांधकाम नानासाहेब पेशवे यांनी सन १७५० मध्ये केले आहे. या दरवाजावरील नगारखाना दुसरे बयाजीराव गायकवाड यांनी १८४० मध्ये केले आहे. या मंदिरातील मोठी घंटा शिवराम नारायण यांनी सन १८६७ मध्ये बांधली आहे.[७६]

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५३ मध्ये एका सनदेच्याद्वारे एका जिराईत जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नातून एक खंडी अडीच मन धान्य ज्ञानेश्वरांच्या समाधीसाठी नैवेद्यासाठी अर्पण केले आहे.[७७] सन १७६१ मध्ये बाळाजी बाजीराव यांनी आळंदी या गावाचा हक्कसुद्धा श्रीकडे इनाम करून दिला आहे. पेशवे आळंदीस यात्रेसाठी येत होते. बाळाजी बाजीराव यांनी नाना फडणीस यांना सांगितले होते की, आळंदीच्या यात्रेस येणाऱ्या भक्त, वाणी–उदीम यांना संरक्षण मिळावे यासाठी २०० ते ३०० सैनिक पाठविण्याची सोय करण्यात यावी.[७८]

आळंदी वारीची प्रथा संत तुकाराम महाराजांनी तर आळंदीहून पालखी नेण्याची प्रथा हैबतराव बाबांनी पाडली. आषाढी व कार्तिकी एकादशीस येथील समाधी व देवतांना नवीन वस्त्रालंकार घालून छबिना काढला जातो. कार्तिक वद्य १३ (२५ ऑक्टोबर) हा ज्ञानेश्वरांचा संजीवनी समाधी दिवस असल्यामुळे या दिवशी येथे अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. ज्येष्ठ वद्य अष्टमीस ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून पंढरपुरास जाण्यासाठी

निघते. ज्ञानेश्वर महाराजांनी घालून दिलेल्या आध्यात्मिक मार्गाने वारकरी संप्रदायाची वाटचाल सातशे वर्षापासून अंखडपणे चालू आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी असंख्य भाविक रोज आळंदीला येत असतात. आळंदी येथे राम, विष्णू व दत्त यांची मंदिरे आहेत. आळंदीच्या घाटावर छोटी–छोटी मंदिरे आहेत. तसेच प्रमुख हरिभक्तांच्या अनेक समाध्या आहेत. यामध्ये चक्रतीर्थावरील सन १८५७ मध्ये पुण्यातील सावकार चिंतामण माळवतकर यांनी भक्त पुंडलिकाच मंदिर बांधले आहे.[७९]

पुणे जिल्हयातील धार्मिक स्थळे ही आजच्या विज्ञानयुगात टिकून आहेत. या धार्मिक तीर्थक्षेत्रांनी अध्यात्मिक अधिष्ठानावर भौतिक वैज्ञानिक आणि संघर्षाऐवजी समन्वयाचा दृष्टीकोण हा भारताबरोबर जगाला दिलेला अमोल ठेवा आहे. आपल्या राष्ट्रीय संस्कृतीचे अधिष्ठान अध्यात्म हे आहे. आपली जीवनमूल्य, महान संस्कृती, सभ्यता, मनोधारणा व उच्च ध्येये इत्यादीमुळे आधुनिक जगाला जे प्रश्न पडतात. त्याचे समाधानकारक उत्तर धार्मिक स्थळांच्या अध्यात्मात आहे. म्हणूनच या धार्मिक स्थळामुळे आपली भारतभूमी जगाचा आध्यात्मिक गुरू आहे.

## २.६ पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे

पुणे जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे ऐतिहासिक स्थळे प्राचीन काळापासून असलेली पाहावयास मिळतात. पुणे शहरावर इ.स.पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे राज्य होते. सातवाहनानंतर पुणे येथे राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. या काळात पुणे हे मोठे व संपन्न शहर होते. १० व्या शतकाच्या अखेरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी राष्ट्रकुटांचा पराभव करून पुणे आपल्या वर्चस्वाखाली आणले. यादव काळातील अनेक वास्तुंचे अवशेष अद्याप पुणे जिल्हयात विखुरलेले आढळतात. पुणे जिल्हयाची ऐतिहासिक भरभराट खऱ्या अर्थाने यादव काळापासून झाली. शिवकाळात व पेशवेकाळात त्यामध्ये भर पडली. या काळात पुणे जिल्हयातील ऐतिहासिक ठिकाणांना महत्त्व प्राप्त झाले होते.

पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळांमध्ये शिवनेरी, सिंहगड, लोहगड, पुरंदर, राजगड, तोरणागड, वज्रगड, वढू, विसापूर, शनिवारवाडा, महादजी शिंदे यांची छत्री व केळकर वस्तुसंग्रहालय इत्यादीचा समावेश होतो.

## २.६.१ शिवनेरी

शिवनेरी हा किल्ला पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यात असून तो गिरीदुर्ग प्रकारात मोडतो. शिवनेरी किल्ल्यास मध्ययुगीन काळात मराठयांच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. या किल्ल्यावर हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शुक्रवार १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला. त्यामुळे हा किल्ला म्हणजे हिंदूचे तीर्थस्थान समजला जाऊ लागला आहे. या किल्ल्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ३३४२ फूट आहे.

### किल्ल्याचे वर्णन

#### अ) किल्ल्यावरील दरवाजेः–

शिवनेरी किल्ल्यावर जाण्यासाठी दोन रस्ते असून एक पाठीमागील बाजूने कडयावरील झाडांना किंवा कडयाच्या तटाला खिळे ठोकून किल्ल्यावर दिंडी दरवाजातून प्रवेश करता येतो. तर दुसरा रस्ता जुन्नर शहरातून सरळ मुख्य दरवाजापर्यंत जाता येते. या मुख्य दरवाजास जीभेचापाडा असे म्हणतात. अशा प्रकारचे बालेकिल्ल्यावर जाई पर्यंत आणखी सहा दरवाजे आहेत. त्यामध्ये जीभेचापाडा हा मुख्य दरवाजा सोडल्यानंतर परवानगीचा दरवाजा, हत्ती दरवाजा, पीराचा दरवाजा, शिवाई दरवाजा, फाटक दरवाजा, कुलपकार दरवाजा इत्यादी दरवाजे ओलांडून मगच किल्ल्यावर प्रवेश करता येत होता.[८०]

#### ब) शिवाई देवीचे मंदिर

शिवाई दरवाजातून आतमध्ये उजव्या बाजूस शिवाई देवीचे मंदिर आहे. या मंदिराचे सभामंडप व गाभारा असे दोन भाग असून, मंडपात दोन रांगात पाच लाकडी खांब आहेत. गाभाऱ्यात शिवाई देवीची चतुर्भूज मूर्ती आहे. मातोश्री जिजाबाईनी या देवीला नवस केला होता. तेव्हा या देवीच्या कृपेनेच त्यांना मूल झाले होते म्हणून त्याचे नाव शिवाई देवीच्या नावावरून शिवाजी ठेवण्यात आले होते. तेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज होत. या मंदिराशेजारी दगडी कातळात दोन पाण्याची टाकी आहेत व कडेकपारीत अनेक लेणी आहेत.[८१]

#### क) बालेकिल्ला

शिवनेरी किल्ल्यावर पडझड झालेली धान्याची कोठी आजही पाहावयास मिळते. या धान्यकोठीविषयी सन १६७३ मध्ये भेट दिलेला इंग्रज अधिकारी जॉन फ्रायर म्हणतो की, ‘इथे

हजार कुंटुबाना सात वर्ष पुरेल एवढी शिधासामग्री आहे.' या धान्यकोठीच्या पुढे गंगा-जमुना ही प्रसिद्ध पाण्याची टाकी आहेत. अशा प्रकारची पाण्याची टाकी, कुंड शिवनेरीवर ४० पर्यत आहेत.

बालेकिल्ल्यावर महाराष्ट्र राज्य शासनाने अलिकडच्या काळात एक भव्य सभामंडप उभारला आहे. त्यास 'शिवकुंज' असे नाव दिले. यामध्ये सिंहासनावर विराजमान जिजामाता व त्यांच्यापुढे तलवार घेतलेल्या बालशिवाजी राजेंची पंचधातूची मूर्ती बसविलेली आहे. उत्तरेस अनेक चौथऱ्यांचे अवशेष आहेत. यात 'हमामखाना' आहे. त्याच्यापुढील चौथऱ्यात एक दुमजली इमारत आहे. हे शिवाजीराजांचे जन्मस्थान आहे.

सध्या या इमारतीची मोठया प्रमाणावर पडझड झाली आहे. यापूर्वी सन १९१५ मध्ये कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहूनी व भास्करराव जाधव यांनी या इमारतीचा जीर्णोद्धार केला होता. दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी जिना असून विश्रांतीसाठी सोपे केले आहेत. तसेच गवाक्ष ठेवले आहेत.[८२]

**ड) शिवनेरी किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व**

शिवनेरी किल्ला सातवाहनांनी बांधला. प्राचीन काळी या प्रदेशात शक लोक राज्य करीत होते. त्यांच्या नहपान राजांची जुन्नर ही राजधानी होती. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात हे शक उज्ञयनीस होते. तेथून ते या प्रदेशात आले. त्याने अनेक धर्मशाळा व घाट बांधले. परंतु ते परकिय होते. पुढे गौतमीपुत्र सातकर्णी याने क्षत्रपांचा नाश केला. या किल्ल्यावर प्राचीन काळात सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव या घराण्याची सत्ता होती.[८३]

सन १४४३ मध्ये बहामनी सरदार मलिक-उत-तुजार याने हा गड जिंकून घेतला. तर सन १४८५ मध्ये मलिक अहमद याने या गडाचा ताबा घेतला होता. त्याने या किल्ल्यावर मोठया प्रमाणावर संपत्ती साठविली होती. जुन्नर हे त्याच्या कारभाराचे मुख्य ठिकाण होते. सन १४८६ मध्ये मलिक अहमदच्या वडिलांचा खुन झाल्यावर त्याने निजाम-उल-बहिरी हा किताब धारण करून स्वतंत्र राजवटीला सुरूवात केली. ही पुढे अहमदनगरची निजामशाही म्हणून प्रसिद्धीस आली होती. या राजवटीवर विजापूरच्या आदिलशाहीचा संस्थापक युसूफ आदिलखान व चाकणचा सुभेदारास स्वारी करण्यासाठी बहामणी सुलतानाने पाठविले होते. त्यावेळी निजाम-उल-बहारीने त्याचा पराभव करून त्याला तेथून पळवून लावले होते.[८४]

सन १६२९–३० मध्ये विश्वासराव सिधोजी हे शिवनेरी किल्ल्याचे गडकरी होते. त्यांची मुलगी जयंती आणि शहाजीराजेंचे पुत्र संभाजीराजे यांचा विवाह गडावर संपन्न झाला होता. पुढे शहाजीराजांनी हा किल्ला विश्वासराव सिधोजीच्या स्वाधीन करून जिजाबाईस किल्ल्यावर ठेवून ते निजामशाहीत निघून गेले. त्यावेळी मातोश्री जिजाबाई गरोदर होत्या. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यावेळी शहाजीराजे निजामशाहीच्या वतीने मोगलांशी लढण्यात गुंतले होते. ऑक्टोबर १६३६ मध्ये शहाजीराजांनी मोगलापुढे शरणागती स्वीकारल्यानंतर शिवनेरी किल्ला मोगलांना देऊन टाकला. तेव्हा शहा बेगखान हा मोंगलाच्या वतीने पहिला मोगल किल्लेदार नेमला गेला. याला नगारा नौबतीचा मान व चार हजार जात व तीन हजार स्वार अशी मनसब होती. सन १६३० ते १६३६ पर्यत बाल शिवाजीराजे शिवनेरी किल्ल्यावर मुक्कामी होते. परंतु किल्ला मोगलांच्या ताब्यात गेल्यावर त्यांना शिवनेरी किल्ला कायमचा सोडावा लागला होता.

सन १६५० साली मोगलाविरूद्ध पुणे प्रांतातील शिवनेरीच्या कोळयांनी मोठे बंड केले. ते मोडण्यासाठी औरंगजेब बादशहाने कडवी फौज पाठविली. त्यांनी कोळयांचा कोंडमारा केला. अनेकांची मुंडकी उडविली. हा प्रकार ज्याठिकाणी घडला त्या ठिकाणास कोळी चौथरा असे म्हणतात.[८५]

छत्रपती शिवाजी महाराज शिवनेरीवर हल्ला करण्यासाठी ३० एप्रिल १६५७ रोजी जुन्नरला पोहचले. दोराच्या शिडया लावून मावळे परकोटातून आत शिरले पहारेकऱ्यास मारून त्यांनी अचानक जुन्नर लुटायला सुरूवात केली. प्रतिकार फारसा झाला नाही. शिवाजी महाराजांना २०० घोडे, ३ लक्ष रोख रक्कम शिवाय कापड, जिनस व जडजवाहीर वगैरे भरपूर माल मिळाला. पण शिवनेरीवर मात्र हल्ला करता आला नाही. सन १६७३ मध्ये अजीजखान या किल्लेदाराला फितवून गड घेण्याचा प्रयत्न करण्यात आला पण यश मिळाले नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६७८–७९ च्या सुमारास तिसरा हल्ला केला. त्यावेळी किल्लेदार अब्दुल अजीजखान हा कसलेला मुघल सेनानी होता. जुन्नरचा फौजदार याहयाखान हा होता. मराठयांनी हा किल्ला जिंकून घेण्यासाठी किल्ल्यावर हल्ला केला मात्र अपयश आले.

अशा प्रकारे किल्ला जिंकून घेण्यासाठी शिवाजी महाराजांना शेवटपर्यत अपयश आले होते. सन १६३६ पासून ते सन १७६५ पर्यत शिवनेरी किल्ला मोगलांच्या ताब्यात होता. तो मराठयांना जिंकता आला नाही एवढा तो अभेद्य होता. पुढे पेशवा माधवराव याच्या काळात तो किल्ला मराठयांच्या ताब्यात आला. परंतु पुढे २० मे १८१८ रोजी मेजर एलड्रीज याच्या नेतृत्त्वाखाली इंग्रजांनी या किल्ल्यावर हल्ला चढविला. परंतु मराठयांना हा किल्ला दोनच दिवसात इंग्रजांना द्यावा लागला. झालेल्या लढाईत मराठेशाहीची दुर्दशा व पतन झाले होते. शिवनेरी किल्ल्याचा किल्लेदार हडसर पळून गेला. परंतु त्यासही पकडण्यात आले.[८६]

### २.६.२ सिंहगड

पुणे परिसरात किल्ले सिंहगड उर्फ कोंढाणा हा प्राचीन किल्ला आहे. पुणे शहराच्या नैऋत्येस सुमारे २० किमी अंतरावर हा किल्ला वसलेला आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १३१७ मी. आहे. या किल्ल्यास शिवकाळात महत्त्वाचे ऐतिहासिक स्थान लाभलेले होते. नरवीर तानाजी मालुसरे यांने या किल्ल्यावर आपल्या प्राणाची आहुती देऊन मोगलाकडून हा किल्ला जिंकून घेऊन मराठा स्वराज्यात दाखल केलेला होता.[८७]

### अ)सिंहगड किल्ल्याचे वर्णन

सिंहगड किल्ल्याच्या मुख्य ठिकाणी जाण्यासाठी तीन दरवाजे पार करावे लागतात. यातील तिसरा दरवाजा हा सर्वात प्राचीन आहे. या दरवाज्याच्या बाजूला खडकात खोदलेल्या घोडपागा आहेत त्याच्यापुढे गणेश टाके व रत्नशाळेचा चौथरा आहे. त्याच्याच शेजारी दारूखान्याची इमारत आहे. तेथेच लोकमान्य टिळकांचा बंगला आहे. या बंगल्याच्या कोपऱ्यावरच टिळकांचा पुतळा आहे.

तिसऱ्या दरवाजातूनच पुढे बालेकिल्ल्याकडे जाताना डाव्या हातास तानाजीचे स्मारक आहे. सिंहगड स्मारक मंडळाने उभारलेली मेघडंबरी व त्यामध्ये तानजीचा पुतळा आहे. दरवर्षी येथे माघ वद्य नवमीस पुण्यतिथी साजरी केली जाते स्मारकाच्या पाठीमागे भैरवनाथाचे मंदिर आहे. बालेकिल्ल्यावर प्रवेश करतेवेळी कल्याण दरवाजा लागतो. या दरवाजाचे वैशिष्टय म्हणजे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी येथेच बसून रवींद्रनाथ टागोर यांनी बंगाली भाषेत रचलेल्या शिवकाव्याच्या स्मृती जागवल्या होत्या.[८८] कल्याण दरवाजाच्या पुढे तटातटाने गेल्यास डोणगिरीचा कडा लागतो. या कडयातून चढून तानाजीने आपल्या तीनशे मावळयांसह किल्ल्यात

प्रवेश केला होता तेथून उत्तरेकडे गेल्यास शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराजांची समाधी लागते. त्यापुढे कोंढाणेश्वर महादेवाचे मंदिर आहे. अशा प्रकारे सिंहगडावर घोडपागा, खोदकडा, दारूकोठार, लोकमान्य टिळकांचा बंगला, कौडिण्येश्वर मंदिर, तानाजीचे स्मारक, उदयभान राठोडचे थडगे व राजाराम महाराजांची समाधी इत्यादी ऐतिहासिक वास्तू आहेत.[८९]

## किल्ल्याचा इतिहास

सिंहगड किल्ला हा प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहे. सन १३५० मधील एका फारसी 'कुंधला' असा उल्लेख आढळतो. कौंडिण्य ऋषीचे वास्तव्य गडावर होते. त्यांच्या नावावरून कोंढाणा हे नाव रूढ झाले. सन १३४० च्या सुमारास महमंद तुघलकाने सिंहगडावर हल्ला केला यावेळी नागनाईक हा कोळी सरदार किल्लेदार होता. त्याने तुघलकाच्या सैन्याविरूद्ध आठ महिने गड लढविला. अखेर हा किल्ला महंमदाने जिंकला यानंतर गडावर मुसलमान सत्तेचे वर्चस्व राहिले. तुघलकाकडून बहामनीकडे पुढे निजामशहा मग विजापूरकरांकडे हा गड होता.[९०]

छत्रपती शिवाजी महाराजानी सन १६४७ मध्ये हा किल्ला गोडी गुलाबीने बापूजी मुद्गल नऱ्हेकर यांना वश करून ताब्यात घेतला. पण १६४९ मध्ये शहाजीराजांची आदिलशहाच्या कैदेतून सुटका करण्याच्या बदल्यात  सिंहगड आदिलशहाला परत द्यावा लागला. त्यानंतर राजांनी तो परत मिळविला. ५ एप्रिल १६६३ रोजी शिवाजीराजांनी शाहिस्तेखानावर छापा घालून ते सिंहगडावर आले होते. १६६५ मध्येच पुरंदरच्या तहाने सिंहगड किल्ला मोगलांना दिला. सन १६७० मध्ये महाराजांनी मोगलांविरूद्ध युद्ध आघाडी उभारली. पुरंदर तहामध्ये मोगलांना दिलेले सर्व गड परत जिंकून घेण्याचे ठरले आणि पहिला गड निवडला तो सिंहगड. सिंहगड घेण्याची कामगिरी तानाजी मालुसरे याच्यावर सोपविली. सिंहगडावर उदयभान राठोड हा पराक्रमी मोगल किल्लेदार होता. ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी मालुसरे निवडक सैन्यासह डोणगिरी कडा  चढून किल्यावर गेल्यावर युद्धाला सुरूवात झाली. नंतर सुर्याजी मालुसरे यास कल्याण दरवाजा उघडून आतमध्ये घेतले. लढाईत तानाजीच्या हातातील ढाल तुटली तेव्हा हातावर तलवारीचे घाव झेलून मोठे युद्ध केले. या युद्धात दोघेही ठार झाले. गवताची गंजी पेटली मोहिम फत्ते झाली म्हणून राजे ताबडतोब गडावर आले. समोर त्यांना तानाजी मालुसरेचा देह दिसल्याने ते उद्गारले 'गड आला, पण सिंह गेला!' तेव्हापासून या गडास सिंहगड हे नाव पडले.[९१]

११ मार्च १६८९ रोजी संभाजीराजांच्या वधानंतर औरंगजेबाने एकापाठोपाठ एक किल्ले घेण्यास प्रारंभ केला. त्यास प्रत्युत्तर म्हणून संताजी घोरपडे यांनी तुळापुरास औरंगजेबाची छावणी असता रात्रीच्या वेळी छापा घालून तंबूच्या तणावा व कळस कापले. हे कृत्य करून ते सिंहगडावर आले त्यावेळी सरसेनापती प्रतापराव गुजर याचा मुलगा सिधोजी हा किल्ल्याचा किल्लेदार होता. त्याने त्या सर्वांची काळजी घेतली होती. पुढे ३ मार्च १७०० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू या किल्ल्यावर झाला.[९२]

इ.स.१७०२ मध्ये हा किल्ला पुन्हा मुघल बादशहा औरंगजेब याने जिंकून घेतला. इ.स.१७०५ मध्ये त्र्यंबक शिवदेव, पंताजी शिवदेव आणि रामजी फाटक यांनी सिंहगड किल्ला जिंकून घेतला तेव्हा औरंगजेब बादशहाने झुल्फिकारखान यास किल्ला घेण्यास पाठविले. त्याने किल्ल्याला वेढा दिला. शेवटी मराठयांनी मोठी रक्कम घेऊन हा किल्ला बादशहाला देऊन टाकला. पुढे औरंगजेब बादशहाच्या (१७०७) मृत्यूनंतर हा किल्ला मराठयांनी आपल्या ताब्यात घेतला.

पेशवे काळात नारायणराव पेशव्यांचा विवाह सिंहगडावर झाला होता. पुण्यातील संपत्ती ही आणीबाणीच्या काळात सुरक्षित राहावी म्हणून सिंहगडावर नेली जात होती. निजामाने मे १७७३ मध्ये पुणे जाळले. त्यावेळी सिंहगडावरील संपत्तीसुद्धा निजामाच्या हाती पडली. परंतु पुढे पुन्हा हा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात आला.

इंग्रजांनी मार्च १८१८ मध्ये सिंहगड हा किल्ला जिंकला. त्यावेळी त्यांना गडावरील ६७ तोफा व पन्नास लक्ष रूपयांची लूट मिळाली. तसेच पर्वतीच्या सोन्याच्या मूर्ती व पाच लाख रूपयांची गणेशमूर्ती देखील इंग्रजांना मिळाली.[९३]

सन १८८९–९० मध्ये लोकमान्य टिळक सिंहगडावर येऊन राहिले होते. तेथे त्यांनी 'आर्क्टिक होम इन द वेदाज' या ग्रंथाचे लिखाण केले. सन १९१५ मध्ये 'गीता रहस्य' या ग्रंथाची मुद्रणप्रत याच ठिकाणी तयार झाली. याच साली लोकमान्य टिळक व महात्मा गांधीजींची भेट टिळक बंगल्यात झाली. हा बंगला लोकमान्य टिळकांनी रामलाल नाईक यांच्याकडून खरेदी केला होता.[९४]

### २.६.३ लोहगड

पुणे जिल्हयातील लोहगड हा गिरीदुर्ग असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ३४१२ फूट आहे. लोहगड हा फार प्राचीन किल्ला आहे. लोहगडाजवळ असलेली भाजे लेणी इ.स.पू.२ ऱ्या शतकातील आहेत. त्याच्या ही अगोदर लोहगड हा किल्ला अस्तित्त्वात होता. हा किल्ला लोणावळा शहराजवळ आहे.

#### अ) किल्ल्याचे वर्णन

लोहगड या किल्ल्याचे वैशिष्टय म्हणजे तेथील चार दरवाजे हे एका मागोमाग एक सर्पाकार बांधलेले आहेत. त्या दरवाजाची नावे गणेश दरवाजा, नारायण दरवाजा, हनुमान दरवाजा, व महादरवाजा इत्यादी आहेत. महादरवाज्याच्या समोर डाव्या बाजूस मशिदीसारखी दिसणारे थडगे असलेली इमारत आहे. किल्ल्यावर तटाला लागून एक लोमेश ऋषींची गुहा आहे. तेथील टेकडीवर किल्लेदाराच्या वाडयाचे अवशेष आहेत. तेथे एक महादेवाच मंदिर व लहानसे तळे आहे. गडाची एक चिंचोळी सोंड दूरवर गेली आहे. या सोंडेच्या दोन्ही बाजूस तटबंदी असून विंचवाच्या नांगीसारखी आहे. म्हणून त्यास विंचूकाटा म्हणतात.[९५]

#### ब) लोहगड किल्ल्याचा इतिहास

लोहगड किल्ल्याच्या जवळच असलेल्या भाजे व बेडसे लेण्यावरून हा किल्ला फार प्राचीन काळातील असल्याचे स्पष्ट होते. या किल्ल्यावर सातवाहन, राष्ट्रकूट व चालुक्य इत्यादी राजवटी होत्या. असे तेथील अवशेषावरून दिसून येते. परंतु लोहगड किल्ल्याचा सलग इतिहास सापडत नाही.

मध्ययुगीन काळात निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमदने सन १४८९ मध्ये बहामणीकडून लोहगड स्वतःच्या ताब्यात घेतला. मूर्तजा निजामशहाने आपला भाऊ दुसरा बुऱ्हाणशहा यास लोहगडावर कैदेत ठेवले होते निजामाने आपल्याविरूद्ध लढणाऱ्या ईस्माइल या मुलास या गडावर कैदेत ठेवले होते. निजामशाहीच्या अस्तानंतर सन १६३७ मध्ये लोहगड आदिलशाहीकडे गेला.[९६]

छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला सन १६४८ मध्ये जिंकून घेतला. इ.स.१६६४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लूट केल्यानंतर ही लूट घेऊन स्वराज्यात आणत असताना काही दिवस लोहगडावर ठेवली होती. पुरंदरच्या तहात लोहगड मोगलांना द्यावा

लागला. परंतु इ.स.१६७० मध्ये मराठयांनी माळा व शिडया लावून हा किल्ला पुन्हा स्वराज्यात आणला पेशवेकाळात पेशव्यांचे मुत्सद्दी नाना फडणवीस यांचे कारभारी धोंडोपंत नित्सुरे यांच्याकडे हा किल्ला होता. नाना फडणवीसांच्या काळात या किल्ल्यावर बांधकाम झाले. किल्ल्यावरील गणेश दरवाजा, नारायण दरवाजा व महादरवाजा यांचे बांधकाम केले गेले. गडावर इ.स.१७८९ मध्ये एक तळे बांधले गेले. इंग्रजांनी लोहगडाशेजारील विसापूर हा किल्ला इ.स.१८१८ मध्ये जिंकला. ही गोष्ट लोहगडावरील मराठयांना समजताच मराठे घाबरून जाऊन हा किल्ला सोडून पळून गेले. त्यामुळे इंग्रजांना कोणतेही प्रयत्न न करता हा किल्ला आपोआपच मिळाला.[९७]

### २.६.४ विसापूर

पुणे जिल्हयातील देवरे गावाजवळ विसापूर हा किल्ला आहे. हा गिरीदुर्ग असून त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ३५६७ फूट आहे. हा किल्ला लोहगड किल्ल्याजवळ असून दोन्ही किल्ल्याच्यामध्ये एक खिंड आहे त्यास गायमुख खिंड असे म्हणतात.

#### अ)किल्ल्याचे वर्णन

किल्ल्यावर सुरूवातीस एक ढासळलेला तट आहे. त्या तटावर एक कोकण दरवाजा आहे. त्याची नासधूस इंग्रजांनी केली होती. त्यामुळे तेथे त्याचे अवशेष दिसून येतात. मुख्य दरवाजातून बालेकिल्ल्यावर जाण्यास रस्ता आहे. बालेकिल्ल्यावर एक टेकडी असून त्यामध्ये खोदलेल्या गुहा आहेत. टेकडीवर व भोवताली वाडयाचे अवशेष आहेत. उजव्या बाजूस टेकडी व तट आहे. किल्ल्यावर अनेक चौथरे, अवशेष व झाडाझुडपामध्ये तोफा पडलेल्या आहेत. या गडाचे वैशिष्टय म्हणजे तेथील तट, बुरूजांनी बंदिस्त असून याचे रूंद तट, बुरूज आजदेखील टिकून आहेत.[९८]

#### ब) किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

विसापूर किल्ल्यास स्वतंत्र असा इतिहास फार कमी आहे. परंतु त्याच्याजवळच्या लोहगडाचे अस्तित्त्व या किल्ल्यावर अवलंबून होते. सन १६५८ च्या सुमारास हा किल्ला शिवाजीराजांच्या ताब्यात आला. पेशवेकाळात तुळाजी आंग्रेचे पुत्र व तुळाजी आंग्रे यांना या किल्ल्यावर कैदेत ठेवले होते. त्यावेळी दुर्गाजी हे किल्ल्याचे हवालदार होते. सन १८१८ मध्ये विसापूर किल्ला इंग्रजांच्या ताब्यात होता.[९९]

### २.६.५ तोरणा

सिंहगड किल्ल्याच्या उजव्या बाजूस तोरणा हा किल्ला आहे. पुणे जिल्हयातील हा सर्वात उंच गड आहे. याची समुद्रसपाटीपासून उंची ४६०६ फूट म्हणजे १४०४ मीटर आहे. या डोंगरावर पुर्वी तोरण जातीची खूप झाडे होती. त्यावरून या किल्ल्याचे नाव तोरणा हे पडले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ला जिंकून घेतल्यावर या गडाचा प्रचंड आकार पाहून त्याचे नाव बदलून 'प्रचंडगड' ठेवले होते. या किल्ल्याला बालेकिल्ला, माच्या, मेटे व पायथ्याची गावे आहेत.

### अ) किल्ल्याचे वर्णन

तोरणा किल्ला हा वेल्हे गावाजवळ आहे. तोरणा किल्ल्याची एक सोंड वेल्हे गावाजवळ आलेली आहे. बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी जो मुख्य दरवाजा आहे. त्यास बिनीचा दरवाजा असे म्हणतात. यानंतर कोठीचा दरवाजा लागतो. या दरवाज्याच्या बाजूस मेटाचे आत एक छोटीशी देवळी आहे या देवळीत तीन मूर्ती आहे. सोमजाई, तोरणजाई व एक अनामिक अशी त्या मूर्तीची नावे आहेत. छत्रपती. शिवाजी महाराजांनी या किल्ल्याची डागडुजी व बांधणी सुरू केली त्यावेळी त्यांना जेथे भूमिगत धन प्राप्त झाले. त्याच ठिकाणी अष्टभुजा महिषासुरमर्दिनी श्री तोरणजाईची स्थापना केली गेली. या मंदिराजवळ तोरण टाके, खोकड टाके व तोरणेश्वर महादेवाची घुमटी आहे. या ठिकाणी सापडलेल्या धनाचा वापर राजांनी राजगड किल्ला बांधण्यासाठी केला.[१००]

बालेकिल्ल्यावर मेंगाई देवीचे मंदिर आहे. या ठिकाणी ब्रम्हपिशाच्याचे स्थान आहे. या मेंगाई मंदिराजवळ दीपमाळा, हवालदाराचा वाडा, दिवाणघर, सदर, तोरणेश्वर महादेवाच मंदिर, टाके, दगडी रांजण, सतीचे स्मारक असे अनेक अवशेष आहेत. मेंगाई मंदिराच्या दक्षिणेला कोकण दरवाजा असून त्या दरवाजाच्या पुढे बुधला माची आहे. या माचीची लांबी दिड कि.मी.आहे. पुढे डोंगराचा उंचवटा व त्यावर कातळखंड आहेत. माचीवर भगत दरवाजा, चिणला दरवाजा, वाळणजाई दरवाजा, चित्ता दरवाजा आहेत. चिणला व चित्ता दरवाजा हे चोर दरवाजे आहेत. बाले किल्ल्यावर विशाळा तळे, चौकोनी तळे, चार टाकी इत्यादी पाण्याची टाकी तसेच हत्तीमाळ हा चिलखती बांधणीचा बुरूज आहे. या बुरूजाच्या बाहयभागापर्यंत जाण्यासाठी २५ फूट भुयारी मार्ग आहे. पूर्वेस भिकुली बुरूज व रडतोंडी बुरूज आहे.[१०१]

भगत दरवाजा ते भिकुली बुरूज दरम्यान तटाखाली मानव निर्मित दोन विवर आहेत. एका विवरात सात फूट उंचीच्या दोन खोल्या आहेत. दुसऱ्या विवरात पाणी आहे. किल्ल्यावरील भेळ बुरूजासमोर नागमोडी वळणाची झुंजारमल माची आहे. ही माची दोन टप्प्यांची असून भेळ बुरूजाजवळ दिंडी दरवाजा आहे. झुंजारमल माचीवर एक पाण्याचे टाके, सदर, चुन्यात बसवलेले चार रांजण व काही वादयांचे भग्नावशेष आहेत.[१०२]

**किल्ल्याचा इतिहास**

तोरणा किल्ल्याजवळ असणाऱ्या कापूर लेण्यातील शिल्पावरून या किल्ल्यावर १२व्या शतकापासून मानवी वस्ती होती, हे स्पष्ट होते. इ.स.१४७० ते १४८६ या काळाच्या दरम्यान बहामनी सरदार मलिक अहमदने हा किल्ला जिंकला. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या प्रारंभीच्या काळात जिंकलेल्या किल्ल्यात तोरणा हा किल्ला होता. या गडाची दुरूस्ती करीत असताना बालेकिल्ल्याच्या तटाजवळ खणत असताना मोहरांचा हंडा सापडला. पुरंदरच्या तहात हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी आपणाकडे ठेवला होता.

छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात हा किल्ला मराठयांच्याच ताब्यात होता. त्यांच्या हत्येनंतर तो मोगलानी जिंकून घेतला. सन १६९० मध्ये तो मराठयांनी जिंकून घेतला. या लढाईत मोगल किल्लेदार हातमखान मारला गेला. सन १६९४ मध्ये मोगल सरदार शहाबुद्दीनखान याने गडाला वेढा दिला यावेळी झालेल्या चकमकीत हवालदार आबाजी विश्वनाथ मरण पावला. तोरणा किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. सन १७०३ मध्ये हा किल्ला पुन्हा मराठयांनी जिंकून घेतला. फेब्रुवारी १७०४ मध्ये स्वतः औरंगजेब बादशहा हा किल्ला जिंकून घेण्यासाठी या परिसरात येऊन थांबला होता. त्याने पुन्हा मरांठयांच्या ताब्यातून हा किल्ला जिंकून घेतला. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर १७०८ मध्ये हा किल्ला पुन्हा मराठयांनी जिंकून घेतला. पेशवे काळात तोरणा किल्ल्यावर कोणत्याही महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत.

सन १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठी राज्याचा शेवट केला. तेव्हा तोरणा किल्ला भोर संस्थानाच्या ताब्यात ठेवला. पुढे भारत सरकारने संस्थानाचे विलीनीकरण केल्यावर तोरणा किल्ला पुरातत्व खात्याकडे सोपविण्यात आला.[१०३]

### २.६.६ राजगड

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांची प्रथम राजधानी राजगड हा किल्ला होय. त्यांच्या राजकीय हालचालीचे केंद्र राजगड होय. राजगड हा किल्ला गिरीदुर्ग असून त्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ४,५७५ फूट आहे. मुस्लिम सत्ताधिशांपासून दूरवर असणारा, सर्व किल्ल्यापेक्षा अभेद्य असा हा राजगड किल्ला आहे. म्हणूनच या किल्ल्यास प्र. के. घाणेकर यांनी किल्ल्यांचा किल्ला असे म्हटले आहे.[१०४]

### अ) किल्ल्याचे वर्णन

राजगड हा किल्ला गुंजन मावळातील मुरूम खोऱ्यात वसला आहे. त्यामुळे या किल्ल्यास मुरूंबदेव या नावाने ही ओळखतात. हा किल्ला अभेद्य व दुर्गम असून बालेकिल्ल्यावर पोहचण्यासाठी अनेक टेकडया व नद्या पार कराव्या लागतात. त्याची उंची आणि प्रंचड विस्तार पाहून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याची राजधानी म्हणून निवड केली आहे.[१०५]

### १) माची

राजगड किल्ल्यावर तीन स्वतंत्र माची आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजगडाचा ताबा मिळविल्यानंतर याच्या तीन बाजूंना खालच्या पातळीवर तीन विभाग पाडून त्यावर तीन मजबूत माची बांधले. ते माची म्हणजे सुवेळा, पद्मावती व संजीवनी हे आहेत. या किल्ल्याच्या तीन माच्या आहेत.

सुवेळा माचीची उंची ११८३ मीटर आहे. छत्रपती शिवाजी राजांनी या माचीचे बांधकाम केले. व त्यास सुवेळा हे नाव दिले. सुवेळा म्हणजे उगवत्या सुर्याची दिशा होय. सुवेळा माचीची रचना तीन मजली इमारतीसारखी आहे. यातील पहिला मजला नैसर्गिक उंचवटयाचा असून दुबा नावाने ओळखला जातो. आज तेथे काही इमारतीचे अवशेष पाहावयास आढळतात. या ठिकाणी तानाजी मालुसरे, येसाजी कंक, सिलीमकर इत्यादी मराठा सरदारांची निवासस्थाने होती. दुबाच्या पाठीमागे उत्तर दिशेला एका विस्तृत छत्रपती शिवाजी महाराजांच्या सदरेच्या दालनाचे अवशेष आढळतात. तसेच रामेश्वर, गणेश, कालेश्वर, भागिरथी, मारूती यांच्या मंदिरांचा समूह आढळतो. तिसऱ्या मजल्यावर टेहळणीसाठी झरोक्यांची व्यवस्था केली आहे. तेथे नाल नावाचे एक भुयार ही आहे.

संजीवनी माचीची रचना ही तीन मजली इमारती सारखी करण्यात आलेली आहे. तिची लांबी २.५ कि.मी. असून समुद्र सपाटीपासून उंची ११८५ मीटर आहे. तिच्या उत्तर बाजूला बुरूज बांधलेले आहेत. येथे काही इमारतीचे भग्नावशेष आढळतात. या माचीवर पाण्याचा तलाव बांधला गेलेला आहे.

पद्मावती माचीची समुद्र सपाटीपासूनची उंची ११९५ मीटर आहे. या माचीवर लष्करी ठाणे तसेच राजांचे निवासस्थान ही होते. संरक्षणाच्या दृष्टीने याचे बांधकाम किल्ल्यासारखे भक्कम केले होते.[१०६]

### २) पालीगेट

पालीगेट म्हणजे पद्मावती माचीवर जाण्याचा ईशान्येकडील रस्ता होय. या दरवाजाची उंची व रूंदी एवढी होती की, अंबारीसह हत्तीवरून जाता येत होते. या दरवाज्याच्या दोन्ही बाजूस दगडात बांधलेले दोन बुरूज होते. या दरवाजास निमुळती टोकदार कमान आहे. त्याच्या दोन्ही बाजूस बुरूज असून त्यास लहान लहान छिद्रे आहेत. याचा वापर बंदुकीचा मारा करण्यासाठी केला जात होता.

### ३) अंबारखाना

पद्मावती माचीवर अनेक इमारतीचे भग्नावशेष आहेत. त्याच्यात एक अंबारखाना आहे. त्याची लांबी ९.९५ मीटर आणि रूंदी ३.६५ मीटर होती. याशिवाय तेथे एक शस्त्रागाराच्या इमारतीचे अवशेष आढळून येतात.

### ४) बालेकिल्ला

बालेकिल्ल्याची उंची १,३९४ मीटर आहे. बालेकिल्ला हा एका टेकडीवर असून त्याच्या सभोवती संरक्षणाच्या दृष्टीने १.५ मीटर उंचीची भिंत आणि अधून मधून बुरूज बांधलेले आहेत. बालेकिल्ल्यात जाण्यासाठी अतिशय अरूंद व दुर्गम रस्ता तयार करण्यात आलेला आहे. रस्त्याच्या एका बाजूस खोल दरी आहे. त्यामुळे किल्ला चढून जाणे अतिशय अवघड बनले आहे. बालेकिल्ल्याच्या दरवाजाला निमुळती टोकदार कमान आहे. त्याची उंची ५.४० मीटर आहे.

बालेकिल्ल्यावर 'जनाई' व ब्रम्हर्षी' अशी दोन मंदिरे आहेत. ब्रम्हर्षी मंदिराच्या मागे बाजारपेठेचे भग्न अवशेष पडलेले आहेत. याशिवाय तेथे एका खडकात खोदलेला तलाव असून तो चार कप्प्यात विभागला आहे.[१०७]

**ब) किल्ल्याचा इतिहास**

छत्रपती शिवाजी महाराजांची ही पहिली राजधानी होय. अहमदनगरचा निजामशहा अहमंद घोरीने इ.स.१४९० मध्ये हा किल्ला जिंकला होता. पुढे बहामनीशाहीची शकले पडल्यावर हा किल्ला आदिलशहाने सन १६२५ मध्ये निजामशहाकडून जिंकून घेतला. पुढे सन १६३० मध्ये तो पुन्हा निजामशहाने जिंकून घेतला. त्याचवेळी शहाजीराजे आदिलशाहीकडून निजामशाहीत आले होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला सन १६४२–४३ मध्ये जिंकून घेतला होता. त्याचे पुर्वीचे नाव मुरूमगड बदलून 'राजगड' ठेवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची सुरूवात सन १६४८–४९ मध्ये या किल्ल्यावर झाली होती. सिद्धी जोहारने पन्हाळयाला वेढा घातला त्यावेळी सन १६६० मध्ये शाहिस्तेखानाने या किल्ल्याभोवतालचा प्रदेश उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. पन्हाळयावर अडकलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मदतीला मातोश्री जिजाबाईने याच किल्ल्यावरून नेताजी पालकर व सिद्दी हिलाल यांना पाठवले होते.

छत्रपती शिवाजी राजांनी ५ एप्रिल १६६३ च्या मध्यरात्री शाहिस्तेखानावर छापा घातला. सुरतेची पहिली लूट (३१ डिसेंबर १६६३) या सर्व घटना राजगडावरूनच साध्य केल्या होत्या. इ. स.१६६५ मध्ये मिर्झा राजा जयसिंग याने राजगड किल्ला जिंकण्यासाठी दौलतखानास पाठविले होते. परंतु मुघलांना त्यामध्ये यश मिळाले नाही. पुरंदरच्या तहानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी मिर्झा राजा जयसिंगास हा किल्ला दिला नाही. आग्रा सुटकेनंतर राजे प्रथमतः राजगडावर आले होते.

२४ फेब्रुवारी १६७० मध्ये छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म या किल्ल्यावर झाला. इ.स.१६७१–७२ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपली राजधानी राजगडहून रायगडला नेली. तरी राजगडकडे दुर्लक्ष केले नाही. उलट या किल्ल्याच्या दुरूस्तीसाठी १० हजार होन एवढी रक्कम मंजूर केली होती.[१०८]

छत्रपती संभाजीच्या काळात रोहिड खोऱ्यात आणि शेजारच्या प्रदेशात सैन्याची कुमक पाठविण्याचे राजगड हेच प्रमुख केंद्र होते. छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर 'किशोरसिंह हाडा' या मोगल सरदाराने जून १६८९ मध्ये राजगड जिंकून घेतला. औरंगजेबाने अबूलखेरखान याची या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून नेमणूक केली. त्या संदर्भात घडलेल्या एका वैशिष्टयपूर्ण घटनेचा उल्लेख केला आहे. मराठयांनी मोठया धाडसाने अबूल खेरखानच्या बायका-मुलांना पकडले. व त्यास किल्ला सोडून जाण्यास सांगितले. तेव्हा मराठयांनी त्याच्याकडील मौल्यवान वस्तू हस्तगत केल्या. बादशहाने त्याला तेथून काढून टाकले.

मे १६९० मध्ये रामचंद्रपंत अमात्यानी राजगड पुन्हा जिंकून घेतला. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात राजगड मराठयांच्या हालचालीचे प्रमुख केंद्र होते. राजाराम महाराज जिंजीहून परतल्यावर प्रथम राजगडावर आले व तेथून ते कोंडाणा किल्ल्यावर गेले. तेथे त्यांचा इ.स. १७०० मध्ये मृत्यू झाला. दुसऱ्या शिवाजीच्या काळात नोव्हेंबर १७०३ मध्ये औरंगजेब याने स्वतः राजगडाला वेढा दिला होता. मोगलानी राजगड किल्ल्याच्या उंची इतका मनोरा बनवून ६ फेब्रुवारी १७०४ रोजी किल्ल्यावर तोफगोळयांचा भडीमार केला व किल्ल्याची तटबंदी उध्वस्त केली व घनघोर लढाईनंतर हा किल्ला जिंकला. बादशहाने या किल्ल्याचे नाव नबीशागड हे ठेवले. या गडाचे रक्षण करताना मराठयांचे संताजी सिलीमकर व शिदोजी थोपटे सुवेळा माचीवर धारातीर्थी पडले. बादशहाने या किल्ल्यावर प्रथम इरादखान व नंतर मन्सूरखानला किल्लेदार म्हणून ठेवले.

मराठयांच्या गुणाजी सांवत याने हा किल्ला इ.स.१७०७ मध्ये पुन्हा जिंकून घेतला. मोगलाच्या कैदेतून छत्रपती शाहूची सुटका झाल्यावर त्याने महाराणी ताराबाईकडून जे अनेक किल्ले जिंकून घेतले त्यामध्ये राजगड हा किल्ला होता. इ.स.१७०८ मध्ये छत्रपती शाहूने जंजिऱ्याची मोहिम हाती घेतली त्यावेळी राजगडावरील सचिवाकडे जंजिऱ्याच्या सिद्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी २००० फौज ठेवली होती.[१०९]

पेशवे काळात मराठा राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती त्यामुळे किल्ल्यावरील अधिकाऱ्याचे पगार नियमित होत नव्हते. सन १८१८ मध्ये राजगड किल्ल्याचा तााबा इंग्रजांच्याकडे गेला. पुढे सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर भोर संस्थान हिंदी संघराज्यात विलीन झाले त्यावेळी राजगडचा ताबा त्यांच्याकडे होता.[११०]

## २.६.७ पुरंदर

पुणे जिल्हयातील सासवडच्या नैऋत्येस ९ किलोमीटर अंतरावर पुरंदरचा किल्ला आहे. त्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ४५६० फूट आहे. हा जोडकिल्ला असून त्याला लागून पूर्वेस वज्रगड हा किल्ला आहे. सासवड हे याचे मुख्य केंद्र आहे. या किल्ल्यावर १४ मे १६५७ रोजी राणी सईबाईच्या पोटी छत्रपती संभाजी राजांचा जन्म झाला. या किल्ल्याने मराठा काळात फार मोठी कामगिरी बजावली आहे. [१११]

### अ) पुरंदर किल्ल्याचे वर्णन

पुरंदर व वज्रगड यामध्ये पुरंदर हा किल्ला अधिक उंच आहे. पुरंदरच्या सर्वात उंच ठिकाणी महादेवाच मंदिर आहे. त्याच्या उत्तरेस खालच्या बाजूस ३०० फूटावर एक भैरवनाथ मंदिर आहे. मंदिराच्या वरच्या बाजूस एक पठार आहे. या सपाट जागेच्या उत्तरेकडील कडा, एका भिंतीमुळे सुरक्षित असून त्यात अनेक कठडे आहेत. किल्ल्यावरील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस मनोरे आहेत.

छावणीच्या मध्यभागातून रस्ता किल्ल्याच्या वरच्या भागाकडे जातो. वरच्या भागात दगडी पायऱ्याशेजारी दगडी मनोरे रचलेले आहेत. दिल्ली दरवाजाच्या डावीकडून एक रस्ता चिंचोळया पर्वत रांगातून जातो. त्याच्या दोन्ही बाजूस वक्राकार भिंती आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूस ३०० फूट निमुळती खोली असून हा रस्ता पुरंदरच्या पूर्वेकडील कडयाच्या टोकापर्यंत जातो. तेथे कर्नल लिसनने बांधलेला एक अतिशय जुना बंगला आहे. या बंगल्याजवळ एक पाण्याचा हौद आहे. तेथे ‘चोर दिंडी दरवाजा’ असून त्याचा टेहळणीसाठी उपयोग केला जात होता. हा दरवाजा दिल्ली दरवाजापर्यंत जातो. त्याच्या डावीकडे एक गणेश मूर्ती आहे.

तिसऱ्या दरवाजातील बावटा बुरूजाच्या उजवीकडून एक रस्ता धान्याच्या कोठाराकडे जातो. त्याच्या शेजारी एक राजवाडा आहे. आबाजी पुरंदरे नावाच्या देशस्थ ब्राह्मणाने तो बांधलेला आहे. तो पुरंदरे कुटुंबाचा मुळ पुरूष होय. तेथून थोडया अंतरावर ‘इगल नेस्ट’ या नावाचा बंगला असून त्याच्या पाठीशी एक मशीद आहे. तेथील रस्त्याच्या पश्चिमेकडे दोन कढईसारखी बांधकामे दिसतात. याचा उपयोग सैन्यासाठी तेल व तूप ठेवण्यासाठी केला जात होता. याच्या उजव्या बाजूस दारूगोळा ठेवण्याचे कोठार आहे. या ठिकाणी असणाऱ्या उंचवटयावरील इमारतीस राजाचा वाडा असे म्हणतात. कारण येथे छत्रपती शाहू महाराजांनी

(इ.स.१७०८ ते १७४९) या काळात राजवाडा बांधण्यास सुरूवात केली होती. तेथे एक म्हसोबा नावाची पाण्याची टाकी आहे.

पुरंदर किल्ल्याच्या एका कडयाच्या टोकास फत्ते बुरूज या नावाचा बुरूज आहे. किल्ल्याच्या नैऋत्यकडील टोकास ३०० फूट उंचीचा कोकणी बुरूज आहे. त्याच्या शेजारी २० माणसे राहतील एवढया आकाराची खोली आहे.[११२]

किल्ल्याच्या वायव्येकडील बाजूस हत्तीच्या डोक्याच्या आकाराचा एक तिहेरी बुरूज असून त्यास हत्ती बुरूज असे म्हटले जाते. त्याच्या पुढे शेंडी बुरूज आहे. या बुरूजाखाली एका विवाहित जोडप्याला जिवंत गाढले होते. इनाम कमिशन ऑफिसमध्ये सापडलेल्या दोन ताम्रपटानुसार शेंडी बुरूजाचा पाया अनेकदा ढासळला होता. बेदरच्या राजाने असे स्पष्ट केले की, एखादा ज्येष्ठ पुत्र व त्याची पत्नी यांचा बळी दिल्याशिवाय बुरूजाचे काम व्यवस्थित व मजबूत होणार नाही. त्यानुसार नाथ नाईक व त्याची पत्नी देवकी यांना तेथे जिवंत गाढले गेले. बेदरच्या राजांने हे काम स्वतः येऊन पाहिले व तेथे येसाजी नाईक याच्या ताब्यात तो किल्ला दिला. पायात गाढलेल्या नाथ नाईकाच्या वडिलास दोन गावे इनाम दिली.[११३]

शेंडी बुरूजापासून एक रस्ता साखरी तलावाकडे जातो. या तलावाशेजारी माधवराव पेशव्याने धान्याचे कोठार बांधले आहे. अशाप्रकारे या किल्ल्याचा विस्तार दोन मैलांचा असून तीन दरवाजे व सहा मुख्य बुरूज आहेत.[११४]

**ब) पुरंदर किल्ल्याचा इतिहास**

पुरंदर किल्ल्याचा प्राचीन इतिहास ज्ञात नाही. बहामनी राज्याचा पहिला राजा अल्लाउद्दिन हसन गंगू याचे राज्य पुरंदरपासून कावेरीपर्यत सर्व महाराष्ट्रभर पसरले होते. इ.स.१३५० मध्ये त्याने पुरंदरची तटबंदी बांधली. पाचवा बहामनी राज मोहम्मद पहिला याने किल्ल्यावर अर्धचंद्राकार बुरूज बांधले.[११५]

निजामशाहीच्या काळात निजाम अहमद याने पुणे विभागातील पुरंदर किल्ल्यासह अनेक किल्ले जिंकल्याचा उल्लेख मिळतो. हा किल्ला निजामशाहाच्या ताब्यात १०० वर्षे होता. अहमदनगरच्या बहादूर निजामशहाने सन १५९६ ते १५९९ या दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजेंना पुणे, सुपे येथील जहागिरी दिल्यानंतर हा किल्ला मालोजीराजेच्या ताब्यात गेला. पुढे मोगलांनी हा किल्ला १६२७ मध्ये जिंकून घेतला. सन

१६३७ मध्ये आदिलशहाने किल्ला जिंकून घेतला. पुढे मोगल व आदिलशहा यांच्यात झालेल्या तहानुसार हा किल्ला आदिलशहाकडे राहिला होता. मात्र तेथे किल्लेदार म्हणून हिंदू अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६४७ मध्ये पुरंदराच्या किल्लेदाराच्या भावा–भावातील भांडण मिटविण्याच्या हेतूने दिवाळीच्या सणादिवशी किल्ल्यावर निवडक साथीदारासह प्रवेश केला. त्या भावांना कैद करून किल्ला आपल्या ताब्यात घेतला. शेवटी त्या सर्व चार भावांनी अखेरपर्यंत महाराजांची इनामे इतबारे सेवा केली.

विजापूरच्या आदिलशहाने शिवाजीराजांच्या विरूद्ध फत्तेखानास पाठविले छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या फौजेपेक्षा चौपट असणारी आदिलशाही फौजेस पुरंदर किल्ल्याच्या साहाय्याने पळवून लावले. या सुमारास राजांनी गडावर तोफा ओतण्याचा कारखाना सुरू केला होता.[११६]

इ.स.१६६५ मध्ये औरंगजेब बादशहाने छत्रपती शिवाजी महाराजांना वठणीवर आणण्यासाठी जयसिंग व दिलेरखान यांना पाठविले. जयसिंगाने सासवड येथे आपला तळ दिला. दिलेरखानाने पुरंदर किल्ल्यावर हल्ला चढविला. मराठयांनी त्यास प्रतिकार केला. मुरारबाजी देशपांडे याने मोठा पराक्रम गाजविला. परंतु तो धारातिर्थी पडला. शेवटी कोणालाही यश मिळेना तेव्हा मराठे व मुघल यांच्यात पुरंदरचा तह झाला. त्यानुसार पुरंदर किल्ला इ.स.१६७० पर्यत मोगलांच्या ताब्यात राहिला. इ.स.१७०७ मध्ये हा किल्ला पुन्हा मोगलांच्या ताब्यात गेला. औरंगजेब बादशहाचा मृत्यूनंतर सचिव शंकराजी नारायण याने हा किल्ला पुन्हा जिंकून घेतला.[११७]

इ.स.१७०७ मध्ये मोगल बादशहा बहादूरशहाने छत्रपती शाहू महाराजांची मोगलाच्या कैदेतून सुटका केली. तेव्हा शाहू महाराजांनी पुण्यास येऊन पंतसचिवकडे पुरंदर किल्ल्याची मागणी केली. मात्र शंकराजी नारायण यांनी शाहूची आज्ञा पाळली नाही. पुढे चंद्रसेन जाधव व शाहूचा पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्यात लढाई झाली. ती शाहूने जिंकली. यावेळी दमाजी थोरात यांनी पंतसचिव शंकराजी नारायण यांना कैद करून पुण्याजवळील हिंगणे गावी ठेवले होते. त्याची बाळाजी विश्वनाथ याने सुटका केली होती. त्या मोबदल्यात पंतसचिवाच्या आईने पुरंदर किल्ला बाळाजी विश्वनाथ यांना देऊन टाकला. बाळाजी विश्वनाथाच्या कुटुंबाचे ठाणे

सासवडला असल्याने एक सुरक्षित ठिकाण म्हणून पुरंदर किल्ला बाळाजीला देऊन टाकला. छत्रपती शाहू महाराजांनी यास संमती दिली.[११८]

पुढे १७६२ पर्यंत हा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात राहिला. नारायण पेशव्याचा खून ३० जानेवारी १७७४ रोजी झाला. त्यानंतर त्याची गरोदर पत्नी गंगाबाईस सुरक्षिततेसाठी नाना फडणीस व हरिपंत फडके यांनी पुरंदर किल्ल्यावर ठेवले. तिने तेथे सवाई माधवराव या पेशव्यास जन्म दिला. काही दिवसानंतर हरीपंत फडके यांनी बुऱ्हाणपूरजवळ काही कागदपत्रे हस्तगत केली. त्यावरून मोरोबा व बजाबा यांनी गंगाबाई व तिच्या अर्भकास ताब्यात घेण्यासाठी जो कट रचला होता तो उघड झाला. मात्र नाना फडणीस व सखाराम बापूंनी पुरंदर किल्ल्यावरून सर्व राज्यकारभार पाहण्यास सुरूवात केली.[११९]

मराठा मंडळात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात नाना फडणीस यांचा पुतण्या मोरोबा फडणीस याच्या वाढत्या सामर्थ्याला घाबरून जाऊन नाना फडणीस यांनी पुरंदर किल्ल्याचा आश्रय घेतला होता. ८ जून १७७८ रोजी हरीपंत फडके व महादजी शिंदे पुरंदराला नाना फडणीस यांना येऊन मिळाले. एवढेच नव्हे तर नऊ लाख रूपयांची लाच देऊन होळकरांना नाना फडणीसांच्या बाजूने वळविले. सन १८१७ मध्ये पुण्याचा रेसिडेंट एलफिन्स्टनने ज्या तीन किल्ल्यासाठी दुसऱ्या बाजीरावास शरण येण्यास सांगितले होते. त्यापैकी पुरंदर हा एक किल्ला होता. शेवटी १६ मार्च १८१७ रोजी ब्रिटिशांचा ध्वज पुरंदर किल्ल्यावर फडकला.[१२०]

### २.६.८ वज्रगड

पुरंदर किल्ल्यास लागून वज्रगड हा जोड किल्ला आहे. हा गिरीदुर्ग असून याची समुद्र सपाटीपासूनची उंची सुमारे ४४२२ फूट आहे. या किल्ल्यावर जाण्यासाठी दोन दरवाजे पार करावे लागतात. वज्रगड हा किल्ला रूद्रमाळ या नावाने ही ओळखला जातो. बालेकिल्यावर एक मोठे प्रस्तर आहे. बालेकिल्ल्याच्या पुर्वेकडे एक दिंडी दरवाजा आहे. या ठिकाणी रूद्रेश्वर महादेवाच लहान मंदिर आहे. त्याच्या जवळ पाण्याची दोन टाकी आहेत. संपूर्ण वज्रगड हा किल्ला तट व बुरूजांनी बंदिस्त आहे. वज्रगडावर फारसे अवशेष नाहीत.[१२१]

### २.६.९ शनिवारवाडा

शनिवारवाडा ही एक ऐतिहासिक वास्तु असून मराठी साम्राज्याचे वैभव आहे. पेशव्यांचा पुण्यातील शनिवारवाडा हा महाराष्ट्रामध्ये पहिल्या प्रतीचा वाडा होय. आज तो वाडा तटभिंत व दिल्ली दरवाजावरील नगारखाना एवढया स्वरूपातच शिल्लक आहे. हा वाडा इ. स. १८२७ मध्ये जळाल्यावर पुढे इंग्रज सरकारने वाडयाच्या जागेत कोर्टाच्या इमारती बांधल्या. लॉर्ड चेम्सफर्डने या वाड्यातील कोर्ट कचेऱ्या पाडल्या. पुराणवस्तू संशोधन खात्याकडून मातीचे ढिगारे उपसले. तेव्हा त्याखालील वाडयाचे चौथरे व काही अवशेष दिसले. इ.स.१९१९ मध्ये प्राचीन वस्तु–संरक्षणाच्या कायद्यान्वये हा वाडा संरक्षित ठरविला गेला. मूळ वाडयाच्या इमारतीचे अवशेष फक्त चौथरे, कारंजी व हौद अशा स्वरूपात शिल्लक आहेत.

छत्रपती शाहू महाराजानी इ. स. १७१४ मध्ये बाळाजी विश्वनाथ भट यांना पेशवेपद दिले. ते मूळचे श्रीवर्धनचे नशीब काढण्यासाठी देशावर आले. आपल्या कर्तबगारीने पेशवे झाले. बाळाजी विश्वनाथांनी सासवडहून कारभार पाहिला. त्यांच्या मृत्यूनंतर पेशवे हेच खरेखुरे राज्यकर्ते बनले. इ.स.१७२१ मध्ये बापूजी श्रीपत चित्राव हे बाजीरावांचे पुणे प्रातांचे सुभेदार असताना, बाजीराव पेशवे धडफळे यांच्या वाडयात येऊन राहिले. पुण्यात आपले कायम वास्तव्य व्हावे, व येथून कारभार पाहता यावा या दृष्टीने बाजीरावांनी एक मोठा वाडा बांधला. तोच शनिवारवाडा म्हणून ओळखला जातो. हा वाडा छत्रपती शिवाजी महाराजांच्या लाल महालाच्या पश्चिमेला असणाऱ्या मोकळया पटागंणात आहे.[१२२]

शनिवारवाडा बांधण्यास १० जानेवारी १७३० रोजी सुरूवात केली. रंगभट चित्रावशास्त्री इंजिनियर म्हणून, अभ्यंकर, निंबाळकर यांची कत्रांटदार म्हणून नेमणूक केली होती. नारो बाबाजी नगरकरांकडे वाडयाला लाकूड पुरविण्याचे काम होते. खासगीवाले या कामासाठी व्यवस्थापक होते. चुना, वाळू, लाख, डिंक, मेण, गूळ, ताक चाळीस दिवस घाणीमध्ये मळून ते वापरल्याने बांधकामात पक्केपणा आलेला आहे. या वाडयाचे पहिल्या टप्प्यातील बांधकाम २२ जानेवारी १७३२ रोजी पुर्ण झाले. या बांधकामास १६,१२० रूपये खर्च आला.[१२३]

श्रीमंत बाजीराव पेशव्यांनी बांधलेला हा वाडा दोन मजली आणि दोन चौकी होता. वाडा बांधल्यावर ८५ वर्षाच्या कालावधीत तेथून सात पेशव्यांनी राज्यकारभार केला. तेव्हा आपापल्या आवडीनुसार व गरजेनुसार त्यांनी वाडयाच्या वैभवात भर टाकली. आज जी

वाडयात तटभिंत आहे ती छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर बांधली आहे. या तटास ठिकठिकाणी जिने व टेहळणसाठी झरोके आहेत. तटभिंत पोकळ असून त्यात शस्त्रे ठेवण्याची व सैन्य लपविण्याची सोय केलेली होती. सुमारे साडेचार एकर जागेतील बांधकामाचे जोते चार फूट, तर काही ठिकाणी सहा फूट उंचीवर आहे. तटभिंतीला नऊ बुरूज, भिंतीत पाच दरवाजे व प्रवेशद्वारावर नगारखाना होता.

या तटभिंतीला जो दिल्ली दरवाजा आहे त्याचे तोंड उत्तरेकडे असून या दरवाजाची उंची २१ फूट, रूंदी १४ फूट आहे. त्याच्या फळया जाड पऱ्याने अणकुचीदार खिळे ठोकून भक्कम केलेल्या आहेत. गणेश दरवाजा कसबा गणपतीकडे तोंड करून असून त्याचा वापर पेशव्यांच्या स्त्रिया कसबा गणपतीच्या दर्शनास जाण्यासाठी केला जात होता. उत्तरेस मस्तानी दरवाजा असून येथून थोरल्या बाजीरावाची पत्नी मस्तानी व तिचे पुत्र प्रवेश करीत, दक्षिणेस नारायण दरवाजा आहे या दरवाजातून पेशवा नारायणरावाचा खुन झाल्यानंतर त्याचे प्रेत बाहेर काढले होते. खिडकी दरवाजा हा येणाऱ्या पाहुण्यासाठी राखून ठेवलेला असे. येथून ब्रिटिश वकील व सरदार प्रवेश करीत असत. असे एकूण पाच दरवाजे आहेत. कोटाच्या बुरूजाचे काम चिरेबंदी असून प्रत्येक बुरूजावर शिबंदी ठेवलेली होती.[१२४]

वाडयाच्या आतमध्ये पूर्वीच्या महालांच्या दिवाणखान्यांचे चौथरे आहेत. तसेच सवाई माधवराव यांनी तयार केलेली कारंजे. याच कारंज्यावर उडी घेऊन सवाई माधवरावांनी आत्महत्या केली होती. याच ठिकाणी एकूण ४० दालने आहेत. त्यातील गणेश महाल सर्वागसुंदर होता. या महालामध्ये दरबार भरला आहे. सवाई माधवराव पेशवे यांच्यासमोर ब्रिटिश रेसिडेंट नजराणा सादर करीत आहे, असे रंगीत चित्र उपलब्ध आहे.

नानासाहेब पेशव्याने या वाडयात गणपती रंगमहाल बांधला. याशिवाय वाडयात आरसे महाल व गौरीचा महाल इत्यादी होते. नाना फडणविसाच्या काळात नवी दालने. दिवाणखाने बांधले. दिवाणखान्यात थोरल्या बाजीरावसाहेबांचा दिवाणखाना, रमाबाई साहेबांचा दिवाणखाना, अमृतरावसाहेबांचा दिवाणखाना इत्यादी होते. या वाडयाला चार मोठे चौक होते. या चौकांची नावे म्हणजे नवा चौक, जुना थोरला पंगतीचा चौक, गोदुबाईचा चौक व बकुळीचा चौक इत्यादीची नावे आहेत. सोप्यांना हुजुरातीच्या चौकीचा, दुमजलीचा, कचेरीचा, खासबारदारांचा, जरीपटका ठेवण्याचा इत्यादी विशेषणे लावलेली आहेत. तेथे होमशाळा, जवाहिरखाना,

गोशाळा, पागा यांचाही समावेश आहे. वाडयाच्या नैऋत्य कोपऱ्यात  दादासाहेबांचा बदामी बंगला होता. ईशान्येच्या कोपऱ्यात अलीबहाद्दर  याची राहण्याची इमारत होती. या वाडयातील सभामंडपाचे खांब सुरूचे असून कडीपाट लाकडी नक्षीदार होते. त्यात जयपूरचा कारागीर भोजराज यास आणवून त्याच्याकडून रामायण व महाभारत यातील कथाप्रसंगाची चित्रे काढली आहेत.[१२५]

शनिवारवाडयात थोरले बाजीराव, नानासाहेब पेशवे, माधवराव पेशवे, नारायणराव पेशवे, रघुनाथराव, सवाई माधवराव पेशवे व शेवटचे दुसरे बाजीराव पेशवे राहिले होते. ब्रिटिशांनी १७ नोव्हेंबर १८१७ रोजी शनिवार वाडयावर युनियन जॅक फडकविला. पुढे स्वातंत्र्यानंतर पुन्हा तिरंगी राष्ट्रध्वज फडकविला गेला.[१२६]

### २.६.९ महादजी शिंदे यांची छत्री

महादजी शिंदे हे मराठेशाहीतील प्रसिद्ध सरदार व मुत्सद्दी होते. यांनी सन १७८५ मध्ये दिल्लीच्या बहादूरशहा बादशाहावर आपले वर्चस्व स्थापन केले होते. कवायती फौजा व तोफा यांचे महत्त्व महादजी शिंदे यांनी ओळखून फ्रेंचाच्या साहाय्याने आपल्या मराठी सैनिकांच्या पलटणी तयार केल्या होत्या. त्यांच्याजवळ ३० हजार कवायती पायदळ, ५०० तोफा व एक लाख घोडदळ होते. महादजी शिंदे यांची राजधानी उज्जैनी ही होती. पुढे ग्वाल्हेर ही राजधानी बनविली. शिंदे व होळकर ही मराठेशाहीतील सरदारांची जोडी प्रसिद्ध होती. मल्हारराव होळकर वारल्यानंतर होळकरशाहीचा बचाव महादजीनी केला. होळकरांनी इंदूर येथे आपले मुख्य ठाणे वसविले. त्यामुळे मराठयांच्या विस्तार माळव्यात झाला.

महादजी शिंदे हा कोणत्याही संकटाला न घाबरणारा शूर, मुत्सुद्दी, व उत्तम राज्यकारभार ठेवणारा होता. त्याने उत्तर हिंदुस्थान काबूत आणल्यानंतर १२ फेब्रुवारी १७९४ रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी नवज्वर होऊन वानवडी येथे मृत्यू झाला. त्यांची छत्री वानवडी येथे आहे. या इमारतीत दोन भाग असून डावीकडे एका छोटया मंदिरात महादजी शिंदे यांची समाधी आहे. तेथे श्रीशिवलिंग ही आहे. याशिवाय शिंदे घराण्यातील प्रसिद्ध व्यक्तीच्या तसबिरी लावण्यात आलेले आहेत. विजयाराजे शिंदे व काँग्रेसचे खासदार माधवराव शिंदे हे महादजी शिंदे यांचे वारस आहेत. ही दुमजली इमारत असून यावरील नक्षीकाम व रंगकाम अप्रतिम आहे.[१२७]

### २.६.१० राजा दिनकर केळकर वस्तुसंग्रहालय

पुणे शहरातील राजा दिनकर केळकर वस्तुसंग्रहालय हे महाराष्ट्राचे प्रसिद्ध संग्रहालय मानले जाते. दिनकर गंगाधर केळकर यांनी आयुष्यात ६० वर्षे भारतभर फिरून अंदाजे २० हजार विविध प्रकारच्या वस्तू त्यांनी जमविल्या आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल भारत सरकारने पद्मश्री ही पदवी बहाल केली तर पुणे विद्यापीठाने त्यांना डी.लिट्. ही पदवी बहाल केली. पुणेकरांनी त्यांना पुण्यभूषण हा पुरस्कार बहाल केला. त्यांचा मृत्यू १७ एप्रिल १९९० रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी झाला. तरीही त्यांच्या स्मृती आज या संग्रहालयाच्या रूपाने टिकून आहेत. केळकर संग्रहालय हे पुणे शहराच्या मध्यभागात बाजीराव रस्त्यावर मंडई जवळ आहे. या संग्रहालयात एकूण १५ दालने आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे

**१) लाकडी कोरीव काम व शिल्पेः–**

या दालनात लाकडी नक्षीकाम असलेले दरवाजे, खिडक्या, छत व सुरूचे खांब ठेवण्यात आले आहेत. दक्षिण भारत, ओरिसा व गुजरात येथील दरवाजे व खिडक्या ठेवलेल्या आहेत. याशिवाय संगमरवरी व कुरूंदाच्या दगडाची शिल्पे ठेवण्यात आली आहेत.

**२) प्रसाधने व गुजराथ दालनः–**

सोफा, देव्हारा, दरवाजा, खिडकीभोवतीचे मण्यांचे तोरण, झोपाळा पेटारा, नक्षीचे खांब आहेत. तसेच प्रसाधने व लाकडाच्या काही वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत.[१२८]

**३) भारतीय चित्रकलाः–**

कागद, कापड, चामडे, काच यावरील रंगीत चित्रांचा समावेश केलेला आहे.

**४) भांडीः–**

या दालनामध्ये स्वयंपाकाची सर्व प्रकारची भांडी, तेलाचे उंटाच्या कातडयाचे बुधले, दागिने ठेवलेले आहेत.

**५) खेळणी**

यामध्ये पांगुळगाडा, बाहुल्या, तुळशी वृंदावने व भरतकाम केलेली कच्छी घोडा इत्यादी लहान मुलांची खेळणी ठेवलेली आहेत.

**६) कपडे, पैठणी**

या दालनात पैठण्या, शालू यांच्यावर जरीकाम केलेली आहे. याशिवाय गंगा जमुना साडया, क्रोशाचे रूमाल, कशिदाकारी चंद्रकला व मणिकाम केलेले विविध प्रकारचे तोरण ठेवण्यात आलेले आहे.

**७) दिवे, तांबूल–साहित्य, मूर्तीः–**

यामध्ये प्राणी दिवे, पक्षी दिवे, नेपाळी दिवे, १७ व्या शतकातील सूर्य दिवा, पंचारत्या व इतर प्रकारचे काही दिवे ठेवण्यात आलेले आहेत. याशिवाय तांबूल साहित्य व अनेक प्रकारच्या मूर्ती ठेवण्यात आलेल्या आहेत.

**८) शस्त्रे व अस्त्रे :–**

१७व्या ते १९व्या शतकातील शस्त्रे या दालनात ठेवलेली आहेत. यामध्ये कोल्हापूरच्या शहाजीराजांची तलवार असून त्या तलवारीवर पर्शियन भाषेत त्यांचे नाव लिहीलेले आहे.

**९) वाद्येः–**

या दालनात विविध प्रकारची वाद्य ठेवली आहेत. या वाद्यामध्ये तंतुवाद्य, तोंडाने वाजवायची वाद्य ठेवण्यात आलेली आहेत.

**१०) मस्तानी महाल :–**

थोरले बाजीराव पेशवे यांनी मस्तानी महाल कोथरूड पुणे येथे बांधला होता. तो महाल आहे तसा आणून या दालनात ठेवण्यात आलेला आहे.

**११) हस्तिदंत दालन**

१७ व्या शतकातील नेपाळी हस्तिदंती गणेश, बुद्धिबळाच्या सोंगटया, फासे, प्रसाधन साहित्य, चैत्रगौरीचा पाळणा, अत्तरदाणी, गुलाबदाणी इत्यादी वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत.

**१२) दरवाजे विभाग**

या दालनात भारतातील निरनिराळ्या ठिकाणाचे जुन्या वाडयांचे, मंदिरांचे नक्षीदार व रंगीत दरवाजे मांडले आहेत.यात काही हस्तिदंती दरवाजे पण आहेत. यातील अश्वमेघ यज्ञाचा घोडा लक्षणीय आहे.

**१३) संदर्भ ग्रंथालय–**

या दालनात विविध संदर्भ ग्रंथ ठेवण्यात आलेले आहेत.

१४) **संरक्षण प्रयोगशाळा :–**

या दालनात प्रयोगशाळेसाठी लागणारे सर्व साहित्य ठेवण्यात आलेले आहे.

१५) **प्रकाशने :–**

या दालनात ग्रंथ संग्रहालय ठेवण्यात आलेले आहे. या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी केंद्र सरकारने आर्थिक मदत केल्यामुळे अंत्यत स्वस्तात पुढील प्रकाशने उपलब्ध आहेत. चित्रकथी, डिपिंग इन्टू दि ग्लोरियस पास्ट, सनबीम्स इन दि डार्क, इन ताम्बूल ट्रॅडिशन व वर्डस ॲण्ड ॲनिमल इन इंडियन आर्ट ॲण्ड क्रॅफ्टस इत्यादी प्रकाशने ठेवलेली आहेत.[१२९]

अशा प्रकारे राजा दिनकर केळकर वस्तुसंग्रहालय हे पुण्यातील महत्त्वपुर्ण वस्तुसंग्रहालय आहे. त्याने पुणे शहराच्या वैभवात भर टाकली आहे.

## २.७ समारोप

पुणे जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे ही महत्त्वपूर्ण आहेत. यातील काही स्थळे ही प्राचीन, काही मध्ययुगीन व काही आधुनिक काळातील आहेत. या धार्मिक स्थळाच्या ठिकाणी सण उत्सव व यात्रा साजऱ्या केल्या जातात. यावरून या स्थळांचे महत्त्व दिसून येते. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही धार्मिक स्थळे आजच्या काळातही आपले आध्यात्मिक महत्त्व टिकवून आहेत, हे स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक विश्वाची जवळून ओळख करून घेण्यासाठी या स्थळांचे महत्त्व मोठया प्रमाणावर आहे. या धार्मिक स्थळांची माहिती पाहिली असता त्यातून मराठी मनाच्या धार्मिकतेचा प्रत्यय येतो. या धार्मिक स्थळांनी महाराष्ट्राचे नव्हे, तर भारताचे आध्यात्म टिकवून ठेवले आहे. पुणे जिल्हयातील आळंदी व देहू सारख्या धार्मिक ठिकाणांना अध्यात्माच्यादृष्टीने महत्त्व लाभले होते. या ठिकाणी निर्माण झालेल्या संतानी ज्या धार्मिक परंपरा निर्माण केल्या त्या अजूनही टिकून आहेत. त्यामुळे सामाजिक व धार्मिक एकता वाढण्यास मदत झालेली आहे.

पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात मोठी भर घातली आहे. यातील काही स्थळे ही प्राचीन काळातील असल्याने त्या काळातील इतिहास समजण्यास मदत झाली आहे. मध्ययुगीन व आधुनिक काळातील इतिहास जाणून घेण्यासाठी त्या काळातील स्थळे ही पुणे जिल्हयात खूप आहेत. या स्थळावरून त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे. त्यावेळचे

रितीरिवाज, राहणीमान याचा ही प्रत्यय येतो. पुणे जिल्हयात महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना या स्थळाच्या माध्यमातून घडल्या होत्या.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. युवराज संभाजी यांचाही जन्म पुरंदर किल्ल्यावर केला. छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याच्या कार्याचा प्रारंभ पुणे जिल्हयात झाला. एवढेच नव्हे तर स्वराज्याची प्रारंभीची राजधानी ही पुणे जिल्हयातील राजगड किल्ला ही होती. छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म राजगड किल्ल्यावर झाला तर मृत्यू ही पुणे जिल्हयातील सिंहगड किल्ल्यावर झाला. पुढे छ.शाहूच्या काळात तर पेशव्यांनी पुण्याचे महत्त्व वाढवून पुणे येथून मराठी राज्याचा कारभार सुरू झाला होता. अशा अनेक ऐतिहासिक घटना पुणे जिल्हयात घडल्याने पुणे जिल्हयाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे हे स्पष्ट होते.

## संदर्भ

१) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड– ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८०, पृ.७८७

२) कित्ता, पृ.७८८

३) पुणे जिल्हा, जनगणना अहवाल, २००१, पृ.२

४) पाठक अरूण (संपा.), पुणे जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९९९, पृ.१२७२

५) जोशी ल.बा.(संपा.), उपरोक्त, पृ. ७८८

६) महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, २००४, पृ.८

७) पाठक अरूण (संपा.), उपरोक्त, पृ. १३०

८) पुणे जिल्हा, जनगणना अहवाल, १९७१, पृ.३

९) पाठक अरूण (संपा.), उपरोक्त, पृ १३५

१०) कित्ता, पृ. १३६

११) काळदाते सुधा, भारतीय संस्कृती, १९८०, पृ. ७७

१२) महाजन शां.ग., उपरोक्त, पृ.१५

१३) कित्ता, पृ. १६

१४) दैनिक सकाळ, ४ जुलै २००३, पृ.४

१५) महाजन शां.ग., उपरोक्त, पृ. १६

१६) कित्ता, पृ. १६

१७) कित्ता, पृ.१६

१८) कित्ता, पृ.१७

१९) रानडे म.गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, मुंबई, १९८९, पृ. ७६

२०) कित्ता, पृ.७९

२१) जोशी ना.वि., पुणे शहराचे वर्णन–१८६८, पुणे, १९९४, पृ.७६

२२) कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास, , १९९३ मुंबई, पृ. १२४

२३) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४

२४) फडके य.दि, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड–१, १९८९, पृ. १०४

२५) कित्ता, पृ.१२१

२६) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २४

२७) फडके य.दि., उपरोक्त, पृ.५९

२८) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २५

२९) मोहिते अनंत गोपाळ, तीर्थे महाराष्ट्राची, १५ ऑगस्ट २०११, पृ.६

३०) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड १३, १९८९, पृ. १२६२

३१) कित्ता, पृ.१२६२

३२) घाणेकर प्र.के., इथे महाराष्ट्र देशी, पुणे १९९४, पृ. १८

३३) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड १३, पृ.१२६२

३४) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.१७,१८

३५) कित्ता, पृ.३०

३६) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२१

३७) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृति कोश खंड–४, पृ. २५४

३८) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.३२

३९) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२२

४०) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.३७

४१) कित्ता, पृ.३४

४२) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२१

४३) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.३५

४४) कित्ता, पृ.३९

४५) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२२

४६) थोरले माधवराव पेशवे यांची सन १७६८ मधील सनद

४७) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.४९

४८) काळे–पाटसकर भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड प्रकाशन, पुणे २००९, पृ. ८८

४९) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.५०

५०) कित्ता, पृ.५०

५१) कित्ता, पृ.२४६

५२) Pathak Arun (Ed.), Gazetteer of Pune District, 1885, P.1079

५३) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.२४७

५४) कित्ता, पृ. २४८

५५) जेजूरी गडावरील शिलालेखातील वर्णन

५६) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.२४८

५७) हरवंदे गीता आदिनाथ, महाराष्ट्रातील तीर्थयात्रा, पुणे २०११, पृ.३६

५८) कित्ता, पृ.३७

५९) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.२५०

६०) कित्ता, पृ. २५१

६१) हरवंदे गीता आदिनाथ, उपरोक्त, पृ.३६

६२) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. २०६

६३) कित्ता, पृ.१२२

६४) श्री भाटये, पुण्याची पर्वती, १९९३, पृ.२३

६५) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ.१२२

६६) नूलकर व.कृ., पर्वती मंदिरे व इतिहास, पुणे १९९६ पृ.५४

६७) कित्ता, पृ.६०

६८) हरवंदे गीता आदिनाथ, उपरोक्त, पृ.२०८

६९) कित्ता, पृ.२११,२१२

७०) श्री संत तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री मुंबई, १९६७, पृ.३४३

७१) हरवंदे गीता आदिनाथ, उपरोक्त, पृ.१८६

७२) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.१८७

७३) कित्ता, पृ.१८८

७४) कित्ता, पृ.१९०

७५) संत नामदेव महाराजांच्या अभंगातील वर्णन

७६) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.१९०

७७) छत्रपती शिवाजी महाराजांची सन १६५३ मधील सनद

७८) पेशवे बाळाजी बाजीराव यांनी नाना फडणीस याना सन १७६१ मध्ये पाठविलेले पत्र

७९) गडकरी माधव, असा हा महाराष्ट्र, १९९६, पृ.१७३

८०) कित्ता, पृ.१७७

८१)अक्कलकोट सतीश, दुर्ग. सहयाद्री दुर्ग भ्रमण मंडळ सांगली, २००९, पृ.४०७

८२) कित्ता, पृ.४०८

८३) घाणेकर प्र.के., साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची, १९९५, पृ.२५५

८४) चिले भगवान, गडकोट, २००४, पृ.७५

८५) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२५४

८६) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.२५४

८७) चिले भगवान, उपरोक्त, पृ.३३

८८) देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, पुणे, २०११, पृ.१९५

८९) घाणेकर प्र.के., उपरोक्त,पृ.२००

९०) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४२९

९१) कित्ता, पृ.४२९

९२) चिले भगवान, उपरोक्त, पृ.३५

९३) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४३६

९४) देशपांडे द.ग., उपरोक्त, पृ.१९६

९५) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४२१

९६) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.२२९

९७) देशपांडे द.ग., उपरोक्त, पृ.२७, २८

९८) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४२४

९९) कित्ता, पृ.४२४

१००) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.१०७

१०१) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४४१,४४२

१०२) मासिक, सुर्यकांत, भोर विशेषांक, १९३४, पृ.३

१०३) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४४५

१०४) घाणेकर प्र.के., उपरोक्त, पृ.१७५

१०५) देशपांडे पी.एन., राजगड दर्शन, १९८६, पृ.३

१०६) कित्ता, पृ.२६९

१०७) गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, सातारा, २००९, पृ.१३०

१०८) कित्ता, पृ.१३२

१०९) कित्ता, पृ.१३३

११०) कुलकर्णी अ.रा., राजगड शिवाजीची पहिली राजधानी, १९९३, पृ.१५७

१११) देशपांडे पी.एन., मराठयांचे किल्ले, १९९९, पृ.७७

११२) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ.११५,११६

११३) मुंबई प्रांत गॅझिटियर, पुणे जिल्हा, पृ.९७,९८

११४) पाठक अरूण (संपा.), उपरोक्त, पृ. १२०

११५) ब्रिग्डा फरिस्ता, खंड–३, पृ.५३

११६) ग्रँट डफ, मराठयांचा इतिहास खंड–२, पृ.५३

११७) कित्ता, पृ.१८०

११८) सातारा राज्याचे दप्तर खंड–४, १९७७, पृ.३४

११९) ग्रँट डफ, उपरोक्त, पृ. ३६८

१२०) कित्ता, पृ.६३४

१२१) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.४७७

१२२) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयाचे, पुणे, १९९२, पृ.११०

१२३) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. १४८

१२४) कित्ता, पृ.१४९

१२५) भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, पुणे,१९९८, पृ.२२

१२६) महाजन शां.गो., उपरोक्त, पृ. १५०

१२७) कित्ता, पृ. १५६

१२८) कित्ता, पृ. ११०

१२९) कित्ता, पृ. १११

# प्रकरण तिसरे

# सातारा जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

## ३.१ प्रस्तावना

सहयाद्री पर्वतामुळे सातारा जिल्हयास वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे. सातारा जिल्हयास प्रागैतिहासिक काळापासून राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे सातारा जिल्हयास महाराष्ट्राच्या इतिहासात गौरवशाली स्थान प्राप्त झाले आहे. दुर्गमता हे सातारा जिल्हयाचे भौगोलिक वैशिष्टय आहे. या वैशिष्टयामुळे येथे शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना केली. आपले स्वातंत्र्य दिर्घकाळ टिकविण्याचा प्रयत्न या जिल्हयात झाला. सातारा जिल्हयाला या वैभवशाली ऐतिहासिक परंपरेचा सार्थ अभिमान आहे. सातारा जिल्हयात घडलेल्या राजकीय परिवर्तनाचे दुरगामी परिणाम समाज जीवनावर झाले. या परिवर्तनामुळे सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनात विकास होत गेला. यातून ऐतिहासिक स्थळे निर्माण झाली आहेत.

या प्रकरणात सातारा जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. धार्मिक स्थळामध्ये शिखर–शिंगणापूर, औंधची यमाईदेवी, मांढरदेवी, जबरेश्वर मंदिर, चाफळचे राममंदिर, संगम माहूली, वाईचा गणपती, पाली, मेरूलिंग, यवतेश्वर व मशिद इत्यादी धार्मिक स्थळांचा तर ऐतिहासिक स्थळांमध्ये अदालतवाडा, चारभिंती, सापचा वाडा, फाशीचा वड, मेणवलीचा राजवाडा, अजिंक्यतारा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, रंगमहाल, जुने जलमंदिर, नवे जलमंदिर, छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालय, प्रतापगड, सज्जनगड, वैराटगड व सदाशिवगड इत्यादी चा समावेश केलेला आहे. त्यांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे–

## ३.२ सातारा जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती

सातारा जिल्हयाचे सन १८४८ मध्ये अकरा शासकीय विभाग होते. विजापूर, जावळी, कराड, खानापूर, खटाव, कोरेगाव, पंढरपूर, सातारा, तासगाव, वाळवा व वाई इत्यादी होते. इ.स.१९४७ नंतर साताराचे विलीनीकरण झाले व त्यातून सातारा जिल्हयाचे दोन विभाग करण्यात आल होते. सन १८६२ मध्ये विजापूर विभाग बेळगाव जिल्हयास जोडण्यात आला.

सन १८६७ मध्ये तासगाव तालुका रद्द केला. खानापूर, तासगाव, वाळवा व शिराळापेठ या तालुक्याचा समावेश असलेला 'दक्षिण सातारा' विभाग, तर जावली, कराड, खटाव, कोरेगाव, सातारा व वाई या विभागास उत्तर सातारा जिल्हा म्हणून संबोधण्यात आले. इ.स. १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्हयाचे 'सातारा' व दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव 'सांगली' ठेवण्यात आले. सातारा जिल्हयाचे सातारा, महाबळेश्वर, पाटण, फलटण हे चार उपविभाग असून त्यात सातारा, कोरेगाव, जावली, वाई, महाबळेश्वर पाटण, कराड, फलटण, खटाव, खंडाळा व माण असे ११ तालुके आहेत.[१]

### ३.२.२ सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ

सन २००१ च्या जनगणनेनुसार सातारा जिल्हयाचे क्षेत्रफळ १०,७८० चौ. कि.मी.आहे. अरबी समुद्रापासून ६० मैल दूर आहे. व लोकसंख्या २८,०८,९९४ ही आहे. १४,०८,३३६ पुरूष व १४,०६६८ स्त्रियांची संख्या आहे.[२] जिल्हयात एकूण ११ तालुके, ८ नगरपालिका व १,५४७ खेडी आहेत. जिल्हयाची समुद्र सपाटीपासूनची उंची २,३२० फुट आहे.[३]

### ३.२.३ स्थान व सीमा

सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिणेच्या मध्यभागी आहे. तो दक्षिण पठाराच्या पश्चिम मध्यवर्ती भागात १७° ५० ते १८° ११ उत्तर अक्षांश आणि ७३° ३३ ते ७४° ५४ पुर्व रेखांशावर आहे. जिल्हयाच्या पूर्वपश्चिम विस्तार सुमारे १४५ कि. मी. आहे व दक्षिणोत्तर विस्तार सुमारे १२० कि.मी. आहे.[४] पूर्वेस सोलापूर जिल्हा, पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा, दक्षिण व आग्नेय दिशेस सांगली जिल्हा व उत्तर दिशेला निरा नदी आहे. सातारा जिल्हयाच्या वायव्येस रायगड जिल्हा आहे. नैऋत्येस सहयाद्रीच्या मुख्य रांगानी सीमा निर्धातीत केल्या आहेत.[५]

### ३.२.४ हवामान

सातारा जिल्हयाचे किमान तापमान ११.६° सें व कमाल तापमान ३७.५° सें. इतके असते. भौगोलिकदृष्टया साताऱ्याचे हवामान उष्ण व कोरडे असून उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तीन ऋतु आहेत. सहयाद्री पर्वतरांगेत सर्वात जास्त पाऊस पडतो. जुलै महिन्यात सर्वाधिक पर्जन्य असते. मे महिन्यात काही वेळा वळीव पाऊस पडतो. महाराष्ट्राप्रमाणे सातारा जिल्हयात जून ते सप्टेंबर या कालावधीत पावसाळा असतो. हिवाळयात थंडी असून उन्हाळयात मोठया प्रमाणात तापमान वाढते. सातारा जिल्हयात हवामान विषयक वेदशाळा

महाबळेश्वर येथे असून या हवामान शाळेतील आकडेवारी पश्चिम घाट प्रदेशासाठी प्रमाण मानली जाते.[६]

### ३.२.५ लोकसंख्या

**सातारा जिल्हयातील सन १९०१ ते २०११ पर्यतची लोकसंख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.न. | वर्ष | लोकसंख्या | अ.न. | वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९०१ | ८,४९,६७२ | ७. | १९६१ | १४,३०,१०५ |
| २. | १९११ | ८,३५,३३७ | ८. | १९७१ | १७,२७,३७६ |
| ३. | १९२१ | ७,८६,४३६ | ९. | १९८१ | २०,३८,६७७ |
| ४. | १९३१ | ८,९५,०१४ | १०. | १९९१ | २४,५१,३७२ |
| ५. | १९४१ | १०,१३,२१२ | ११. | २००१ | २७,९६,९०६ |
| ६. | १९५१ | ११,७७,०१६ | १२ | २०११ | २८,०८,९९४[७] |

१९९१ च्या जनगणनेपेक्षा २००१ ची लोकसंख्या ही १४.३९ टक्क्यानी वाढलेली आहे. जिल्हयाची वार्षिक लोकसंख्या वाढ दर १.५ टक्के आहे. लोकसंख्येची घनता १९९१ मध्ये २३३ प्रती चौ.कि.मी. आहे. तर २००१ मध्ये २६७ प्रती चौ.कि.मी. आहे.[८]

### ३.२.६ नदीप्रणाली व जलाशये

सातारा जिल्हयात प्रामुख्याने चार नद्यांची खोरी आहेत. कृष्णा या नदीचे खोरे, नीरा नदीचे खोरे, माणगंगा नदीचे खोरे व येरळा नदी खोरे इत्यादी आहेत.

#### ३.२.६.१ कृष्णा

कृष्णा नदीची लांबी १,२८० कि. मी. असून तिचे एकूण पाणलोट क्षेत्र २,४३,६१० चौ. कि. मी. भरते. कृष्णा नदीची सातारा जिल्हयातील लांबी १७६ कि. मी. आहे. वाई तालुक्याच्या अतिपश्चिम भागात कृष्णा नदी महाबळेश्वर पठाराच्या पुर्वेकडील उंच भागात (१,३६४ मी.) उगम पावते. सातारा जिल्हयातील कुडाळी, वेण्णा, उरमोडी, तारळी, वसना नदी व कोयना या नद्या पश्चिमेकडून वाहत जाऊन कृष्णेला मिळतात. या नदीवर १९७६–७७ मध्ये वाई तालुक्यातील धोम गावाजवळ धरण बांधले आहे. त्याचा उजवा कालवा ५९ कि.मी. व डावा कालवा ११३ कि. मी. लांबीचा आहे.

### ३.२.६.२ नीरा

नीरा नदी पुणे जिल्हयाच्या भोर तालुक्यातील सहयाद्री रांगेत उगम पावते. ती खंडाळा आणि फलटण या तालुक्यांच्या उत्तर सीमेवरून पूर्वेस वाहत जाते. नीरा नदी पुणे सातारा सीमा निर्धारित करते. या नदीवर पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील वीर गावाजवळ १९६५ मध्ये धरण बांधले असून त्याचा ७६ कि. मी. लांबीचा उजवा कालवा सातारा जिल्हयातून गेला आहे.

### ३.२.६ .३ माणगंगा

माणगंगा ही नदी माण तालुक्यात दहिवडीच्या वायव्येस टिटा डोंगरावर उगम पावते. माणगंगा नदीच्या मार्गाची एकूण लांबी १६० कि.मी. असून सातारा जिल्हयात फक्त ६४ कि. मी. आहे. या भागात पर्जन्यमान फार कमी असल्याने या नदीस पावसाळयात ६० से.मी ते १.८ मी. खोल एवढे पाणी असते. उन्हाळयात पाण्याची खोली ६० से. मी. पेक्षा खाली जाते काही ठिकाणी पात्र कोरडे पडते.

### ३.२.६ .४ येरळा

ही नदी खटाव तालुक्यात उत्तरेस सोलकनाथ टेकडीत उगम पावते. ही नदी पश्चिमेस वर्धनगड श्रेणी व पूर्वेस महिमानगड श्रेणी यांच्या दरम्यान खटाव तालुक्यात सुमारे १२० कि.मी. वाहत जाते. सातारा जिल्हयातील या नदीची लांबी एकूण १२० कि.मी. इतकी आहे. याशिवाय सातारा जिल्हयात ज्या उपनद्या आहेत. त्यामध्ये तारळी, उरमोडी, वेण्णा, कुडाळी, कोयना व वसना इत्यादी आहेत. कोयना नदी ही महाबळेश्वर पठाराच्या पश्चिम भागी एल्फिन्स्टन पॉइंटजवळ उगम पावते. कोयना नदीवर देशमुखवाडी जवळ १९५४ मध्ये कोयना जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम सुरू होऊन ते १९६० ला पूर्ण झाले. आर्थिकदृष्टया कोयना महाराष्ट्राची भाग्यरेषा बनली आहे.[९]

## ३.३ सातारा जिल्हयाची सामाजिक पार्श्वभूमी

### ३.३.१ सातारा जिल्हयाची सामाजिक परिस्थिती

सातारा जिल्हयातील बहुसंख्य लोक खेडयात राहात असत. येथील समाजात स्वास्थ व सुरक्षितता असल्याने मोठया प्रमाणावर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण झाले. समाजात हिंदु धर्माचे प्रमाण सर्वाधिक होते. त्यामुळे समाजात रूढी परंपराचे जतन मोठया प्रमाणावर केले जात आहे.

### ३.३.१.१ पोषाख–

हिंदु पुरूष हे धोतर, पायजमा, सदरा, शर्ट, डोक्यावर फेटा किंवा गांधी टोपी व स्त्रिया अंगात चोळी व ब्लाऊज घालतात व गोल साडी नेसतात. मुसलमान पुरूष हे शेरवानी, पायजमा, चुडीदार, सलवार, लुंगी, शर्ट, डोक्यावर गोल टोपी हा पोषाख वापरतात. स्त्रिया अंगात चोळी, ब्लाऊज घालतात व गोल साडी नेसतात. त्या डोक्यावर साडीचा पदर घेऊन त्यावर बुरखा घेतात. बोहरा स्त्रीया मात्र घागरा, चोळी किंवा ब्लाऊज व ओढणी असा पोशाख आहे.[१०]

### ३.३.१.२ आहार

सातारा जिल्हयातील लोकांचा शाकाहारी व मांसाहारी या दोन्ही स्वरूपाचा आहार असतो. शाकाहारी जेवणात ज्वारी, बाजरी, गहू इत्यादी पिकांचा व पालेभाज्या यांचा समावेश आहे. मांसाहारी जेवणात मटण, मासे इत्यादीचा समावेश होतो.[११]

### ३.३.१.३ घरे

सातारा जिल्हयात शहरी विभागात सिमेंटची एकमजली, बहूमजली घरे आहेत. ग्रामीण भागातील बहुतांशी शेतकऱ्यांची घरे दगडाची, कच्च्या विटांची, कौलाची किंवा धाब्याची दिसून येतात. डोंगराळ भागातील गरीब शेतकरी, शेतमजूर, मागास जातीतील लोकांच्या झोपडया दिसून येतात.[१२]

### ३.३.१.४ दागदागिने

सातारा जिल्हयात पुरूष शिरोभूषण, कर्णभूषण, कंठभूषण, हस्तभूषण, कलगीतुरा हे शिरपेच, शिरोभूषण, भिकबाळी, चौकडा ही कर्णभूषणे, कंठी, गोफ, ही कंठभूषणे पुरूष वापरत. कंबरेचा करगोटा सर्वजण आपापल्या ऐपतीप्रमाणे रेशमी, चांदी, सोन्याचा वापरत असत. गरिब लोक चांदी व रूप्याचे दागिने वापरत. पुरूषामध्ये श्रीमंत लोक भिकबाळी, अंगठी, पोची, गोफ, कंठा तर स्त्रिया माळा, हार, बाजूभूषणे, कंकणे, पाटल्या, बिलवर, मोहनमाळ, ठुशीचीमाळ व गोठ इत्यादी दागिने वापरत. याशिवाय चंद्रहार, राणीहार, चपलाहार, जोधंळीपोत, बकुळीहार, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळयाची माळ व कोल्हापुरी साज इत्यादी दागिने समारंभात घालतात. तसेच नाकात नथ, चमकी, फुली, मुरणी वापरतात. लहान मुलांना बिंदल्या, मनगटया, कडीतोडे, वाळे, तोरडया, चाळा, करगोटे, कडया इत्यादी सोन्या चांदीचे दागिने घालतात.[१३]

### ३.३.१.४ सण व उत्सव

समाज निर्मितीमध्ये सण समारंभाचे महत्त्वाचे स्थान आहे. हे लोक बारा महिने विविध सण व उत्सव मोठया उत्साहाने साजरे करतात. याचे प्रतिबिंब लोकसाहित्यामध्ये सुद्धा पाहावयास मिळते. गुढीपाडवा, रामनवमी, गौरी गणपती, बसवेश्वर जयंती, वटपौर्णिमा, अक्षयतृतीया, बेंदूर, नारळी पौर्णिमा, दिवाळी, दसरा, होळी, मकरसंक्रात, बकरी ईद, रमजान, पारशी दिन, मोहरम, ख्रिसमस इत्यादी सण उत्सव साजरे करतात. याशिवाय नाताळ, मोहरम, रमजान ईद,पारशी दिन व बौद्ध पौर्णिमा असे इतर धर्मियांचे सण ही उत्साहात साजरे केले जातात.[१४]

## ३.४ धार्मिक परिस्थिती

सातारा जिल्हयात विविध जाती धर्माचे लोक वास्तव्य करतात. यामध्ये हिंदू, ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध, शीख, व पारशी इत्यादी त्यांच्या सामाजिक चालीरिती, आचारसहिंता व जीवनपद्धतीमध्ये विविधता आढळते.

### ३.४.१ हिंदू धर्म

सातारा जिल्हयातील हिंदू धर्मीय लोकांची संख्या सर्वात जास्त असल्याचे आढळून येते. हिंदू धर्मात अनेक जाती व उपजाती आहेत. या जातीतून मध्ययुगात अनेक संत निर्माण झाले होते. त्यांनी समाजात एकता निर्माण होण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. हिंदू धर्माला हजारो वर्षाचा इतिहास असल्याने अनेक धर्मग्रंथ निर्माण झालेले आहेत यावरून हिंदू धर्मातील धार्मिक विधी रितीरिवाज आचार, विचार यात विविधता दिसून येते.[१५]

### ३.४.२ ख्रिश्चन धर्म

सातारा जिल्हयात अमेरिकन मराठी मिशनचे काम इ.स.१८६४ मध्ये सुरू झाले. सातारा जिल्हयात ख्रिस्ती धर्माचे तत्वज्ञान आत्मसात करणारे लोक आढळतात. ख्रिस्ती धर्माची बैठक प्रेम, करूणा, सेवा या मुल्यांवर आधारलेली आहे. त्यांचे राहणीमान साधे असून चर्चमध्ये प्रार्थना करीतात त्यांचे वेगळेपण म्हणजे ते मांसाहार मोठया प्रमाणात करीत होते.[१६]

### ३.४.३ इस्लाम धर्म

सातारा जिल्हयात इस्लाम धर्माचे लोक आहेत. कुराण हा इस्लाम धर्माचा पवित्र धर्मग्रंथ मानला जातो. या ग्रंथात महंमद पैंगबरानी परमेश्वराजवळ जाण्याचा दुःखापासून,

पापापासून मुक्त होण्याचा आणि आदर्श जीवन जगण्याचा मार्ग कुराण ग्रंथात सांगितला आहे. मुसलमान व्यवसायानुसार तीस पोटभेद आहेत. त्यामध्ये मुगल, पठाण, शेख, सय्यद, अत्तार कलाईगार, महावत, मणियार, नालबंद तसेच गुजरात व कच्छमधून आलेले बोहरा आणि मेहमान म्हैसूरमधून आलेले मुकरी व गायकसाब, बागवान, तांबोळी, धावड लोहार, धोंडफोडे गवंडी विटांचे बांधकाम करणारे, झारस (राख गाळणारे), बकर कसाब (मटण विकणारे), मोमीन (विणकाम करणारे), पटवेगार (रेशीमकाम करणारे), पिंजारी (कापुस पिंजणारे), रंगारी (रंगकाम करणार), शिकलगार (हत्यारांना धार लावणारे) धोबी, हजाम आणि पखाली हे नोकरी करणारे तर नगारजी आणि गारूडी इत्यादी लोक होते. हे लोक घरात उर्दू भाषा तसेच बाहेर मराठी भाषा बोलतात.[१७]

### ३.४.४ जैन

सातारा जिल्हयात जैन लोक घरात कानडी व मराठी भाषा बोलतात. जैन लोक हे महावीर यास मानणारे असून ते कुणबी जमीनदारासारखे दिसतात. काही जैन लोक शेती करणारे शेतकरी असून ते शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्पादन मोठया प्रमाणावर काढतात. काही व्यापार व दुकानदारी करतात. आजचे शैव किंवा लिंगायत हे मूळचे जैनधर्मीय होते.[१८]

### ३.४.५ बौद्ध

बौद्ध धर्मिय लोक गावसेवक म्हणून गावकीची कामे करीत. १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यावर हजारो महार लोकांनी त्यांचे अनुकरण केले. यास धम्मचक्र परिवर्तन म्हणतात. धम्मचक्र परिवर्तनानंतर बौद्धांचे धार्मिक व सामाजिक विधी बौद्ध भिक्षूद्वारे होत असले तरी काही जुन्या रूढींचे अनुपालन काही लोक करतात.[१९]

### ३.४.६ शीख धर्म

शीख धर्माने ईश्वराच्या एकतेवर भर दिला आहे. हिंदू धर्माप्रमाणेच शीख धर्मात आत्मा, शरीर, पुनर्जन्म, मोक्ष या धर्माचे तत्वज्ञान आचरणारे लोक सातारा जिल्हयात आढळतात.

### ३.४.७ पारशी धर्म

भारताप्रमाणे महाराष्ट्रात व साताऱ्यातही पारशी धर्माचे लोक राहतात. परंतु इतर धर्मियांपेक्षा त्यांची संख्या कमी आहे.[२०]

अशाप्रकारे सातारा जिल्हयात अनेक धर्माचे लोक एकत्र राहत आहेत. हे लोक आपापले सण व उत्सव साजरे करीत आहेत. या लोकांचे धार्मिक श्रद्धास्थान हे भिन्न असले तरी हिंदू धर्माशी मिळते जुळते होऊन जीवन जगताना दिसतात. काही इतर धर्मीय हिंदू समाजातील सण व उत्सव साजरे करीत असताना दिसतात.

## ३.५ सातारा जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सातारा या शब्दाचे अनेक अर्थ व उत्पत्ती सांगण्यात येतात साताऱ्याच्या दक्षिणेस सपाट माथ्याच्या टेकडीवर पन्हाळयाचा शिलाहार राजा दुसरा भोज याने इ.स. ११९० च्या सुमारास सातारा किल्ला बांधला. या किल्ल्याच्या भिंतींना सतरा बुरूज आणि सतरा दरवाजे होते आणि त्यावरून या किल्ल्यास व किल्ल्याजवळील वस्तीस 'सातारा' हे नाव पडले आहे.[२१] 'सातदरा' वरून सातारा, 'सप्ततारा' पासून सातारा अजिंक्यताऱ्यावरील सप्तऋषीच्या देवालयावरून सातारा ही विशेषतः व्यक्त करणारी म्हणून 'सात' म्हणजे विपुल या अर्थाच्या शब्दावरून सातारा या संकल्पनेची उत्पत्ती सांगितली जाते.[२२] 'सातारा' या संज्ञेचे अनेक अर्थ सांगण्यात येतात . सात–सातर, म्हणजे विस्तार असा अर्थ निघतो. विस्तार करणारा तो 'सातारा' हे विशेषनाम भाषाशास्त्रीय दृष्टीने योग्य ठरते. अशा रीतीने 'सात–सातर–सातारा' अशी व्यत्पत्ती अधिक सार्थ ठरते.[२३]

### ३.५.१ सातारा जिल्हयाची राजकीय परिस्थिती

#### ३.५.१ .१ प्राचीन काळ

प्राचीन अश्मयुगीन कालखंडातील मानवाचे अस्तित्त्व दाखविणारे पुरावे सातारा जिल्हयात सापडले आहेत. यामध्ये लिंब, मर्ढे, माहुली, सोनगाव, पाचवड व आसगाव इत्यादी ठिकाणी अश्मयुगीन मानवाची अस्तित्त्व दाखविणारी हत्यारे सापडली आहेत. मध्य पुराश्मयुगीन हत्यारे चिंचनेर, मर्ढे, लिंब, सोनगाव, कोपार्डे, टेंभू, उंब्रज, धामणेर, तासगाव व पाचवड इत्यादी ठिकाणी सापडले आहेत. त्याच प्रमाणे सातारा जिल्हयात उत्तर पुराश्मयुगीन व ताम्रपाषाणयुगीन मानवाचे अस्तित्व कृष्णा व कोयना खोऱ्यात असल्याचे जाणवते.[२४]

इ. स. पूर्व तिसरे शतक ते इ. स. तिसरे शतक या कालखंडात संपूर्ण महाराष्ट्रावर सातवाहनांचे साम्राज्य पसरले होते. इ.स.पू. दुसऱ्या शतकात सातारा जिल्हयातील कराड या गावच्या यात्रेकरूंनी मध्यप्रदेशातील सुप्रसिद्ध भारहूत येथील स्तूपाच्या वेदिकेच्या बांधणीसाठी काही अनुदाने दिल्याचा तेथील अभिलेखात उल्लेख आहे.[२५] यावरून सातवाहन काळात या परिसरातील लोक इतर प्रांताच्या संपर्कात आले होते. त्यापैकी काहीजण बौद्धधर्मीय होते. कराड, शिरवळ, वाई, भोसे, माळवाडी, कुंडल इत्यादी ठिकाणच्या गुंफा सातवाहनांच्या काळात खोदलेल्या आहेत.[२६]

सातारा जिल्हयाच्या परिसरात राष्ट्रकूटांचे राज्य स्थापन झाले याची माहिती कोल्हापूर येथील पांडुरंगपल्ली ताम्रपटात आढळून येते. मानपूर येथील माण नदीच्या काठावरील राष्ट्रकूट राजांनी महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, सातारा इत्यादी जिल्हयाच्या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित केली होती. जेजुरी ताम्रपटाद्वारे चालुक्यांचा सातारा जिल्हयाशी संबंध असल्याचे दिसून येते.[२७]

प्राचीन काळात सातारा जिल्हयावर सातवाहन, राष्ट्रकूट, वाकाटक, चालुक्य, कलचुरी, शिलाहार घराणे व देवगिरीचे यादव यांचे राज्य होते.

### ३.५.१ .२ मध्ययुगीन कालखंड

शिलाहार घराण्यातील द्वितीय जतिग(सन १००० ते १०२०) याच्या कारकिर्दीपासून सातारा जिल्हयाशी संबंध आला होता. पुढे मारसिंह हा राजा बनला तेंव्हा त्याचा विवाह शिलाहार राजकन्या चंद्रलेखा हिच्याशी स्वयंवर पद्धतीने कराड येथे पार पडला.[२८] पुढे शिलाहार वंशातील इ. स.११४० मध्ये सत्तेवर आलेला राजा विजयादित्य याची बिज्जल कलचुरीशी लढाई इ.स. ११४२ मध्ये झाली होती. त्यात बिज्जलाचा पराभव झाला. ही लढाई सातारा जिल्हयात कराडच्या आसपास झालेली होती. विजयादित्याचा मुलगा द्वितीय भोज इ.स.११७५ मध्ये सत्तेवर आला. मात्र सिंघण यादवाने त्याचा पराभव करून त्याला पन्हाळा किल्ल्यावर अटकेत ठेवले. अशाप्रकारे शिलाहार वंशातील राजांचे राज्य संपवून देवगिरीच्या यादवांचे राज्य सुरू झाले.[२९]

इ.स.१२१५ मध्ये महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांची सत्ता निर्माण झाली. इ.स.१३९८ साली यादव घराण्याचा शेवट होवून दक्षिणेवर मुस्लिम राजवट सुरू झाली. महमद गवानच्या मृत्यूनंतर बहामनी सत्तेचे पाच शाहयात विभाजन झाले. या पाच शाहयातील परस्परातील

हेवेदाव्यामुळे मुघल आक्रमणास बळी ठरल्या. सातार्‍यावर त्याकाळी विजापूरच्या अदिलशाहीची सत्ता या प्रदेशावर होती.[३०]

## मराठा काळ

१७ व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय झाला. या काळात महाराष्ट्राचा मोठा प्रदेश अहमदनगरचा निजामशहा व विजापूरचा अदिलशहा यांच्या नियंत्रणाखाली होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळीचा प्रदेश १५ जानेवारी १६५६ रोजी जिंकला. छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरची आदिलशाही, उत्तरेकडील मुघल सत्ता, गोव्यातील पोर्तुगीज, कोकणातील सिद्दी व इंग्रज यांच्याशी अविश्रांत संघर्ष करुन मराठयाचे स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण केले. २७ जुलै १६७३ रोजी सातारा किल्लाही काबीज केला. इ.स.१६७६ च्या सुमारास शिवाजी महाराज सातार्‍यात आजारी पडले. या वेळी तीन महिने त्यांचे वास्तव्य सातारा किल्ल्यावर होती. सन १६७७ साली राजांनी छत्रपती संभाजीच्या वागणूकीत सुधारणा व्हावी, म्हणून त्यांना समर्थ रामदासांच्या सहवासात सज्जनगड (परळी) येथे ठेवले. परंतु छत्रपती. संभाजी राजे सन १६७८ मध्ये मुघलांना जावून मिळाले. पुढे ३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले.[३१]

छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज सत्तेवर आले. छत्रपती संभाजी राजांना एकाच वेळी मुघल, सिद्दी, या सर्व शत्रूंना लढा दयावा लागला. वाई येथे सर्जाखान व हंबीरराव मोहिते यांच्या लढाईत विजय मराठयांचा झाला. परंतु हंबीरराव मोहिते ठार झाले. कोल्हापूर प्रांतावर नेमणूकीस असणार्‍या मुकर्रबखानास छत्रपती संभाजी राजांना संगमेश्वर येथे पकडण्यात यश मिळाले. ११ मार्च १६८९ रोजी छत्रपती संभाजी राजांना हालहाल करून ठार करण्यात आले. सन १६८९ च्या सप्टेंबरपर्यंत सातारा परिसरातील सातारा, परळी, निंब, चंदनवंदन व मसूर इत्यादी प्रदेश मराठयांच्या ताब्यात होता. छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर ११ मार्च १६८९ रोजी छत्रपती राजारामास गादीवर बसविण्यात आले व त्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी जिंजीस पाठविण्यात आले. इकडे सातारा परिसरातील विविध किल्ले सन १६९० पर्यत मुघलांनी जिंकून घेतले. रायगडाचा किल्ला मुघलांनी जिंकल्यानंतर ६ नोव्हेंबर १६८९ रोजी येसूबाई आणि बाल शाहूस कैद केले. पुढे मात्र स्वराज्यातील एक–एक किल्ला मराठी फौजा जिंकू लागल्या.[३२]

छत्रपती राजाराम महाराज जिजिंत असल्याने जिंजी जिंकण्यासाठी झुल्फीकारखानास पाठवण्यात आले. मराठयानी आठ वर्षे जिंजी लढवली. पण १६९८ साली जिंजी किल्ला मुघलांनी जिंकला. परंतु त्या आधी छत्रपती राजाराम महाराज जिंजिहून विशाळगडावर आलेले होते. त्यांनी ऑक्टोबर १६९८ मध्ये विशाळगडावरून गादी साताऱ्यास आणली. सन १६९९ मध्ये वसंतगड व सातारा हे किल्ले जिंकून घेतले. छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० साली सिंहगड किल्ल्यावर मृत्यू झाला. [३३]

महाराणी ताराबाईने राज्याची सुत्रे हाती घेतली, तेव्हा औरंगजेब बादशहाचा सातारच्या किल्ल्याचा वेढा चालूच होता. शेवटी २१ एप्रिल १७०० रोजी वाटाघाटी करून मराठयांनी मुघलांना हा किल्ला दिला. शाहजादा आझम याने केलेल्या वाटाघाटींमुळे किल्ला मुघलांना मिळाला. म्हणून औरंगजेबाने या किल्ल्याचे नाव 'आझमतारा' असे ठेवले. २२ एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यात प्रवेश केला. छत्रसाल राठोड याची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. परळी किल्ला १० जून १७०० रोजी मुघलांच्या ताब्यात आला. औरंगजेब बादशहाने त्याचे नाव 'नवरसतारा' असे ठेवले. इकडे बादशहा मराठयांचे किल्ले घेत होता. तिकडे मराठा फौजा मुघलांच्या मुलखात मोहिमा काढत होत्या. पंचवीस वर्षाच्या प्रदिर्घ लढयानंतरही औरंगजेब मराठयांच्या राज्यावर ताबा मिळवू शकला नाही. विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर मुक्कामी तो मरण पावला.

औरंगजेब बादशहानंतर आझमशहा सत्तेवर आला. त्याने शाहूची ८ मे १७०७ रोजी कैदेतून सुटका केली. यामागे शाहू व ताराबाई यांच्यात यादवी होऊन मराठयांची शक्ती क्षीण व्हावी हा अंतस्थ हेतू होता. शाहूची सुटका झाल्यानंतर तो दक्षिणेकडे आला त्यावेळी मराठी सत्तेचे प्रमुख केंद्र सातारा होते. येथूनच राणी ताराबाई कारभार पहात होती. खेडच्या युद्धात (१२ ऑक्टोबर,१७०७) ताराबाईच्या पक्षाचा पराभव झाला. त्यामुळे ताराबाईने परशुरामपंत प्रतिनिधीवर साताऱ्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून स्वतः पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला. सातारा किल्ल्याचा किल्लेदार शेखमिरा यास छत्रपती शाहूने शरण आणले. १२ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहूने स्वतःस राज्याभिषेक करून घेतला व सातारा ही राजधानी त्याने निश्चित केली. पुढे मुघल बादशहा बहादूरशहा याने छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळण्यासाठी उपाय सांगितला की,

"तुमच्यामध्ये लढाई करून जो विजय प्राप्त करेल त्याला या सनदा देण्यात येतील. त्यामुळे या दोघातील संघर्ष वाढतच गेला. यात छत्रपती शाहूचा विजय झाला. त्यामुळे त्याचे साम्राज्य सातारच्या गादीवर निर्माण झाले."

छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा सत्तेवर आला. त्यानंतर ११ डिसेंबर १७७८ रोजी छत्रपती दुसरा शाहू सत्तेवर आला. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह १६ मे १८०८ रोजी गादीवर आला. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी झाले. पेशव्यांनी अखेरच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांना बंदिवासाची वागणूक दिली.[३४]

### ३.५.१ .३ आधुनिक कालखंड

सातारा जिल्हयाच्या इतिहासातील आधुनिकतेचे पर्व श्रीमंत प्रतापसिंह राजे यांच्या काळापासून (इ.स.१८०८) सुरू होते. दुसरा बाजीराव व श्रीमंत प्रतापसिंह राजे यांच्यात एकजूट नसल्यामुळे दोघाचांही एकमेकावर विश्वास नव्हता. सन १८१८ मध्ये वसईचा तह होऊन पेशवाईचा नाश झाला. इंग्रजानी महाराष्ट्रातील सर्व किल्ले जिंकून घेतले ब्रिटिशानी सातारा हस्तगत केला. प्रतापसिंह अल्पवयीन असल्याने त्यांना शिक्षण व राज्यकारभार पाहण्यासाठी ग्रँट डफ रेसिडंट म्हणून साताऱ्यास नेमण्यात आला. २५ सप्टेंबर १८१९ च्या तहानुसार इंग्रजांचे सार्वभौमत्व मान्य करून छत्रपती प्रतापसिंह राजांना मराठा गादी प्राप्त झाली. मात्र ब्रिटिशांनी प्रतापसिंहाना सर्वाधिकार न देता सातारला इंग्रज रेसिडेंट नियुक्त केला होता. व त्याच्या सहमतीने राजांना या राज्यांचा राज्यकारभार पाहणे गरजेचे ठरवले होते. या योजनेनुसार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ साताऱ्याचा पहिला रेसिंडेंट म्हणून कार्यरत झाला. व त्याला सहाय्यक म्हणून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या विश्वासातील बाळाजीपंत नातू याची नियुक्ती करण्यात आली.[३५]

सन १८५७ च्या उठावास सातारा जिल्हयाने पाठिंबा दिला होता. या उठावाच्या वेळी सातारा संस्थानाकडे ब्रिटिशांचा पाहण्याचा हेतू स्वार्थी व शोषण करण्याचा होता. सातारा संस्थान खालसा करण्याच्या इंग्रजांच्या स्वार्थी कृतीने संस्थानिकावर निष्ठा बाळगून असलेले सरदार घराणे व इतर लोकातही असंतोष पसरला होता. अशावेळी रंगो बापूने सर्व लोकांना संघटित केले. सातारा जिल्हयाने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर मवाळ व जहाल गटाच्या नेतृत्त्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढा लढला जाऊ लागला. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेले गणेश उत्सव व शिवजयंती उत्सव यासही सातारा जिल्हयात मोठया प्रमाणावर प्रतिसाद मिळाला होता. गणेश मेळा चळवळ, होमरूल चळवळ, सत्यशोधक चळवळ, असहकार चळवळ, औंध संस्थानातील लढा, सविनय कायदेभंग चळवळ, बिळाशीचे बंड, सन १९४२ चे चले जाव आंदोलन, छोडो भारत लढा व प्रतिसरकार, साताऱ्याने सन १९४७ चा स्वातंत्र्य लढा यामध्ये सहभाग घेतला होता. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केला होता.[३६]

## ३.६ सातारा जिल्हयातील धार्मिक स्थळे–

### ३.६.१ शिखर शिंगणापूर–

सातारा जिल्हयातील माण तालुक्यात ईशान्येला डोंगरावर असलेले एक पवित्र व पुरातन तीर्थस्थान म्हणजे शिखर शिंगणापूर होय. शंभू महादेव हे शिवाजी महाराजांच्या घराण्याचे कुलदैवत आहे. ही डोंगररांग वाई येथे सुरू होऊन शिंगणापूर येथे संपते. या रांगेला कोथलगिरी पर्वत किंवा शिंगणापूरचा डोंगर असे म्हणतात. ३२०० फूट उंच व १२०० चौ. फूट क्षेत्र असलेल्या पठारावर हे देवस्थान वसविले आहे. या मंदिराची उभारणी देवगिरीच्या यादव वंशातील सिंघण राजाने १२ व्या शतकात केली आहे. कारण त्याकाळात शिंगणापुरचे नाव सिंघणपूर असे होते. या नावावरून पुढे शिंगणापूर हे रूढ झाले.[३७] या ठिकाणी अतिप्राचीन व भव्य शिवालय आहे. या मंदिराचे शिखर ५५ फूट उंचीचे आहे. मंदिरात जाण्यासाठी तळापासून दगडी पायऱ्या आहेत. हे अंतर १८३ मी. उंचीची चढण चढावी लागते. तेथे मंदिरात जाण्यासाठी पहिले महाद्वार लागते त्या महाद्वाराची कमान (१२.५×१२.२४×९.४५ मीटर) आहे. या कमानीतील दरवाजा १६ मी. उंचीचा आहे. हा दरवाजा सरदार शेंडगे यांनी बांधला आहे.[३८]

महाद्वारापासून १५० पायऱ्या चढून गेल्यावर दुसरा दरवाजा लागतो. येथूनच मुख्य मंदिराचे प्रांगण सुरू होते. हे प्रवेशद्वार १०.३६ मी.रूंदीचे व ११.५८ मी.उंचीचे असून कमान ७.९२ मी.उंच व ४.३२ मी. रूंदीची आहे. या दरवाज्याच्या सभोवती गवाक्षे आहेत. कमानीच्या भिंतीवर नाग, नागीण, यांच्या वेटोळयाचे शिल्प व श्रीकृष्ण पंचफण्याच्या नागावर आरूढ झाल्याचे अर्ध शिल्प उठावातील आहे. दरवाज्याच्या उंच उंबरठयावर मधोमध भंडारक व कीर्तिमुखे आहेत. हा उंबरठा ओलांडल्यावर अकरा पायऱ्या चढून गेल्यानंतर मंदिराच्या प्रांगणात

प्रवेश होतो. तेथे प्रारंभीच दोन्ही बाजूस दोन दिपमाळा आहेत. या दिपमाळा मंदिराच्या शिखराच्या उंची एवढया आहेत.

प्रांगण फरसबंद असून सगळीकडे प्राकार भिंत आहे. या भिंतीची उंची २.४३ मीटर आहे. प्रांगणाला ईशान्य, वायव्य, पश्चिम व दक्षिण या चार दिशांना चार प्रवेशद्वारे आहेत. पश्चिम द्वारातून बाहेर गेल्यावर कडयाच्या टोकावर दोन उपदेवळे आहेत. येथे चैत्र शुद्ध अष्टमीला शिव पार्वतीच्या प्रतिकात्मक विवाह गावकरी साजरा करीत असतात. प्राकार भिंतीत देवळाच्या मागील बाजूस लहान लहान खोल्या आहेत. त्यापैकी काही देवस्थानच्या घोडयांचे तबेले आहेत. काही भांडारगृहासाठी व कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी उपयोगात आणल्या जातात.[३९]

प्रागंणात मधोमध शंभू महादेवाचे देवालय आहे. हे मंदिर गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुखमंडप, व नंदीमंडप यांनी युक्त आहे. गाभारा मोठा असून मधोमध चौकोनी व टोकाला त्रिकोणी होत गेलेला आहे. येथील वैशिष्टय म्हणजे एकापुढील एक अशा दोन पिंडी. या शिव–शक्तीच्या स्वयंभू आहेत. मूर्तिशास्त्राप्रमाणे या पिंडी म्हणजे अव्यक्त मूर्तीच आहेत. गाभाऱ्याच्या मागील बाजूस भिंतीतील देवकाष्ठात विष्णुची मूर्ती आहे. ती संगमरवरी असून अलीकडच्या काळातील आहे. गाभाऱ्याच्या दक्षिण भिंतीत १.२२×१.८३ मी. एवढा मोठा कोनाडा आहे.

गाभाऱ्याचे प्रवेशद्वार पंचशाखायुक्त असून ते मध्यद्वार आहे. गाभाऱ्याच्या समोरच्या दालनाला अंतराळ म्हणतात. हे अंतराळ २.४७×३.६६ मी.आहे. याच्या प्रवेशमार्गावर दोन स्तंभ आहेत. सभामंडपाचे वितान अर्धस्तंभ व स्तंभ याच्या रचनेमुळे नऊ भागात विभागले असल्याने त्याला नवरंग मंडप असे म्हणतात. या मंडपात चारही अंगावर शिल्पे कोरली आहेत. त्यात शिकारीचे प्रसंग चितारले आहे. तसेच गोपी वस्त्रहरण, शिवमूर्ती, गोपालकृष्ण, वीणाधारी संत इत्यादी शिल्पे तसेच माकडे, हंस, कुस्तीचे प्रसंगही कोरलेले आहेत. उत्तरेकडील मुखमंडपाचे बाजूकडील स्तंभावर कामशिल्पे आहेत. स्तंभशीर्षाचे वर कीचक आहेत. या मंडपात दक्षिणेला गणेशाची मूर्ती आहे. गणेशाच्या मूर्तीजवळच उमा महेश्वराची अलिंगनमूर्ती आहे. या मंडपात पितळी पत्र्याने मढविलेले पाच नंदी आहेत. हे सर्व नंदी गाभाऱ्याकडे तोंड करून आहेत.[४०]

गाभाऱ्यावरील शिखर १८.३९ मी. उंचीचे आहे. या शिखराच्या चोहोबाजूने मध्यातून जाणाऱ्या उभ्या नक्षीकाम असलेल्या पट्टयामुळे हे चार भागात विभागले आहे. या पट्टयाना रहपग म्हणतात. याच्या तळाशी एक लहान कमान आहे. त्यास शूरसेनक असे म्हणतात. अशा

प्रकारची रचना हे हेमाडपंती मंदिराचे ते एक वैशिष्टय असते. या मंदिरास तीन शूरसेनके आहेत. हेमाडपंती मंदिरात ही शूरसेनके तीन बाजूस असतात व चौथ्या बाजूस म्हणजे दर्शनी भागात अंतराळावरील छत येते. त्याला शुकनासिका म्हणतात. यावर जे आडवे पट्टे आहेत त्यात सुरसुंदरी, अप्सरा, नर्तिका, भक्तगण, साधू इत्यादींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत.[४१] या मंदिराचा जिर्णोद्धार इ. स. १९७६ मध्ये शिवकांचीच्या एम.के.रामस्वामी यांच्या हस्ते केला आहे.[४२]

मंदिराच्या दक्षिणेस सुमारे ९१.४४ मीटरवर टेकडीच्या काठावर एक आडवी पसरलेली दगडी इमारत आहे. तिला 'सदर सोपा' असे म्हणतात. या इमारतीत शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिकात्मक समाध्या आहेत. या मंदिर परिसरात अमृतेश्वराचे मंदिर आहे. तसेच खडकेश्वर, मांगोबा व सदाशिवाचे मंदिरही आहे.

शिखर शिंगणापूरची यात्रा चैत्र पंचमीला सुरू होऊन पौर्णिमेला संपते. या काळात शंभुमहादेवाचा विवाह सोहळा चालतो. यात्राकाळात संपूर्ण महाराष्ट्रातून ३०० ते ४०० कावडी येतात. या कावडीतून आपापल्या भागातील पाणी आणले जाते. या पाण्याने देवाचा अभिषेक केला जातो. याशिवाय श्रावणी सोमवार, अमावस्या, महाशिवरात्र, एकादशी व भौमप्रदोष या दिवशी तेथे मोठया प्रमाणावर गर्दी असते.[४३]

**ऐतिहासिक महत्त्व–**

देवगिरीच्या यादव वंशातील सिंघण राजाने १२ व्या शतकात हे मंदिर बांधले. शहाजीराजांचे वडील मालोजीराजे भोसले हे शिंगणापूरच्या शंभू महादेवाचे भक्त होते. शिंगणापूरला पाण्याचा दुष्काळ होता. तो दूर करण्यासाठी सिंघण राजाने बांधलेला तलाव इ.स.१५९१ मध्ये दुरूस्त केला. या तलावास पुष्करतीर्थ असे म्हणतात. मालोजीराजांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. घाटगे नावाच्या सरदाराने शिंगणापूर गाव शहाजी भोसलेंना वंशपरंपरेने दिले. फलटणच्या बजाजी नाईक निंबाळकरचे इ. स.१६४४ मध्ये जबरदस्तीने इस्लाम धर्मात धर्मातंर केले गेले. त्यावेळी मातोश्री जिजाबाईच्या सांगण्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यास शुद्ध करून इ. स. १६५१ मध्ये हिंदू धर्मात घेतले. या शुद्धीकरण समारंभास शिंगणापूरच्या बडवे लोकांनी पुढाकार घेतला होता. तेंव्हा त्याना इनाम म्हणून बजाजी निंबाळकरांनी गिरवी येथील जमिनी इनाम दिल्या होत्या. शिखर शिंगणापूर येथे

अहिल्याबाई होळकर यांनी यात्रेकरूसाठी चार विहीरी खोदल्या आहेत. त्र्यंबकजी डेंगळे यास इंग्रजांनी ठाणे येथील कारागृहात डांबून ठेवले होते. तेथून तो सन १८१६ मध्ये निसटून थेट शिंगणापूरच्या डोंगरात आला. येथे त्याने १८०० सैन्य जमविले. त्याने इंग्रजांना हैराण केले. जनरल स्मिथने त्याला तेथून हुसकावून लावले. पुढे पंढरपूर येथे डेंगळेचा खुन झाला.[४४]

### ३.६.२ यमाई देवी–

सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यात औंध गावाच्या नैऋत्येस २४० मीटर अंतरावरील टेकडीवर यमाई देवीचे मूळपीठ आहे. दुसरे यमाई देवीचे मंदिर औंध गावात आहे. गावातील यमाई मंदिर पूर्वाभिमुख असून समोर औंधेश्वराची मूर्ती आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. या मंदिराच्या प्रांगणात चार दीपमाळा असून त्यापैकी एक १८ मीटर उंचीची आहे. तिच्यावर १७६ दिवे लावण्याची व्यवस्था आहे. मंदिराचा सभामंडप एकमजली आधुनिक पद्धतीचा असून संपूर्ण लाकडी बांधकाम आहे.[४५] मंडपात प्रवेशद्वाराच्या दगडावर शिलालेख कोरलेला आहे त्यातील मजकूर यमाई देवी संस्थान औंध यांचे मंदिर मंडपास शके ११२३ सन १९०१ मध्ये श्रीमंत श्रीनिवासराव परशुराम पंडित प्रतिनिधी यांनी प्रारंभ केला. श्रीमंत परशुराम श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी यांनी शके १८३१ सन १९१० मध्ये पूर्ण केला. कामास एकंदर खर्च ६५ हजार रूपये असा आहे. मंडपात बाळासाहेब पंत प्रतिनिधीनी स्वतः चितारलेली विविध दैवतांची भित्तिचित्रे आहेत. मंदिरात मोठी घंटा असून तिच्यावर १७४४ असे अंक कोरलेले आहेत. गाभाऱ्यात एक पाषाणाची व दुसरी पंचधातूची मूर्ती आहे. मूर्तीच्या पाठीमागे चांदीची प्रभावळ आहे.[४६]

मंदिरासभोवती तटबंदी असून तिला दहा बुरूज आहेत. तटबंदीस उत्तरेस व दक्षिणेस प्रवेशद्वारे आहेत. मुख्य प्रवेशद्वार उत्तरेस आहे. हे मध्ययुगातील तारकाकृती मंदिर असून त्यास मुखमंडप व गर्भगृह आहे. हे मंदिर दोन फूट उंचीवर असून ते हेमाडपंथीय आहे. मंदिरात अनेक देवदेवता, विष्णू दशावताराच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. गाभाऱ्यात साडे सहा फुटांची यमाई देवीची प्रसन्न मूर्ती आहे. गाभाऱ्यावर दगडविटांचे शिखर आहे. मंदिरासमोर १८ फूट उंचीची दिपमाळ आहे. देवीची यात्रा पौष पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंत असते. या मंदिराच्या पूर्वेकडील व उत्तरेकडील तटभिंतीवर एक शिलालेख कोरलेला आहे.[४७]

**ऐतिहासिक महत्त्व**

यमाई देवी ही औंधच्या पंतप्रतिनिधीचे कुलदैवत आहे. तसेच औंध गाव पंतप्रतिनिधीच्या जहागिरीचे मुख्य ठिकाण होते. ते भारतातील एक लोकशाही संस्थान म्हणून ओळखले जात होते. गावातील यमाई मंदिर हे पंतप्रतिनीधीच्या वाडयाजवळ आहे. इ.स.१६५९ मध्ये अफझलखान स्वारीच्या वेळेस या मंदिरातील मूर्तीची तोडफोड झाली परंतु तेथील १८ मीटर उंचीची दीपमाळ मात्र सुव्यवस्थित राहीली आहे.[४८]

### ३.६.३ मांढरदेवी–

वाईच्या उत्तरेस शंभूमहादेव डोंगर रांगेत पांडवगडाला लागून मांढरदेवीचा डोंगर आहे. या डोंगरावर काळुबाईचे मंदिर आहे. हे मंदिर इ.स.१६५० ते १६७० या काळात बांधले गेले आहे. मंदिराचा गाभारा ६×४.५ मीटरचा असून मंडप ८×९ मीटरचा आहे. मुख्य मंदिर पूर्वाभिमुख असून त्याच्या ईशान्येस मांगीबाबा मंदिर, वायव्येस गोंडीबाबा मंदिर आहे. या मंदिराच्या बाजूला गंगाजीबाबा मंदिर आहे. मंदिरासमोर दोन दीपमाला आणि मंदिराच्या तिन्ही बाजूस सभागृहे आहेत. या मंदिरात दगडी मूर्तीला चांदीचा मुखवटा व साडी नेसवली आहे.[४९] सभामंडपात चार दगडी स्तंभाच्यामध्ये संगमरवरी सिंहाची मूर्ती आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार लाकडी आहे. गर्भगृह चौरसाकृती असून त्यात तीन दालने आहेत. दक्षिणेकडील दालनात उत्तराभिमुख मारूतीची मूर्ती आहे. मंदिरामागे तेलीबाबाची समाधी आहे. शेजारी मारूतीचे मंदिर आहे. या मंदिराच्या जवळच हेमाडपंथी शैलीतील महादेवाचे प्राचीन मंदिर आहे. येथे पौष पौर्णिमेला देवीची यात्रा मोठया उत्साहात भरते. [५०]

**ऐतिहासिक महत्त्व–**

महिषासूर वधानंतर देवीने या मांदार पर्वतावर वास्तव्य केले. या मंदिराचा जिर्णोद्धार इ.स.१६०० मध्ये केला गेला. नंतर पुन्हा १८२६ साली हैदराबादच्या निजामाच्या हिंदू पत्नी लक्ष्मीबाई यांनी गाभाऱ्याचे काम केले.[५१] मांढरदेव पठारावर ब्रिटिश काळात सैनिकासाठी आरोग्यधाम बनविण्याची योजना होती. या पठारावर पश्चिमेला भोर घराण्यातील ताईसाहेब सचिवांनी बांधलेली धर्मशाळा, बाग व पाण्याची टाकी आहे.[५२]

### ३.६.४ जबरेश्वरी मंदिर–

सातारा जिल्हयात फलटण या तालुक्याच्या ठिकाणी जबरेश्वरी मंदिर आहे. हे मंदिर उत्तराभिमुख असून मुखमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह अशा भागात विभागले आहे. या मंदिराच्या रथ प्रकारावरून हे मंदिर सप्तभूम मंदिर आहे. मंदिराच्या शिखरावरील मंडोवरात जाडंब, तवंगयुक्त कुंभ कलश, मंची कपोत, जंधा, उद्गम, भरणी शिरवटी व छादय हे घटक आहेत. छादयाच्या वर कपोत आणि मंची असे दोन घटक येतात. त्यांच्यावर भूमिज शिखरांचे कूटस्तंभ आहेत. शिखर पातळीवर सर्वसाधारणपणे इतर भूमिज शिखरावर आढळते त्याप्रमाणे शिखराच्या पायावरच शूरसेनक असण्याऐवजी येथे प्रथम शिखराची एक प्रतिकृती असून त्यावर शूरसेनक आहे. मंडोराच्या जंधा भागावर स्त्रीयुग्मे व मिथुन मूर्ती कोरलेल्या आहेत.

जबरेश्वरीचे मंदिर उत्तराभिमुख असून मंडपाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस देवकोष्ठे आहेत. त्यात मूर्ती आहेत. प्रवेशद्वार पंचशाखा प्रकारचे असून त्यावर उंबऱ्याच्या वरच्या पातळीवर प्रतिहार मूर्ती आहेत. त्या दरवाजापासून अनुक्रमे कुंभधारक, कमलधारक, पाश आणि अंकुश आहेत. तेथे मंदिराच्या गाभाऱ्यापासून बाहेरपर्यत अनुक्रमे कल्पकता, गंधर्वस्तंभ, पद्मलता आणि व्याल यांनी सजविले आहे. ललाटबिंबावर आणि त्याच्या वरील बाजूस असलेल्या पाच छोटया रथिकात तीर्थकरांच्या मूर्ती आहेत.

या मंदिराचा मंडप अष्टकोनीय असून त्याचे छत करोटक पद्धतीचे आहे. या मंडपाचे छत दगडी वलयांनी बनवले आहे. अंतराळातून गर्भगृहात प्रवेश करण्यासाठी जे द्वार आहे त्यावर एक नागफणा असलेला वादक हे शिल्प कोरलेला आहे. स्तंभशाखेवर प्रतिहार दाखविण्यात आले आहेत. तसेच त्याचे वाहन हत्ती दाखविला आहे. त्याच्या हातात परशू, पाश, अंकुश व पुष्प काढलेली आहेत. चौथा हात वरमुद्रेत आहे. अंतराळ व गर्भगृहाची छतेही करोटक पद्धतीची आहेत. उत्तरांगावर मध्यभागी पार्श्वनाथाची मूर्ती आहे.

मंदिराच्या शिखरावर देवता कोरलेल्या आहेत. पूर्वेकडील बाजूला देवतेचे वाहन हंस असून देवीचे चित्र कोरले आहे. दक्षिणेकडील बाजूला आणखी एक देवतेचे चित्र असून त्याचे वाहन बैल आहे. पश्चिम बाजूला असलेल्या देवतेच्या मूर्तीची मोडतोड झालेली असून तिच्या पायाजवळ गरूडमूर्तीचे अवशेष आहेत. हे मंदिर भूमिज मंदिर असून ते १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात बांधलेले आहे.[५३]

फलटण शहरातील जब्रेश्वरी मंदिर हे शिवाचे स्थान असून फलटण शहरातील लोकांच्यासह ते तालुक्यातील लोकांचे अढळ श्रद्धास्थान आहे. या मंदिराची रचना प्राचीन काळातील असून फलटण शहरात अशी रचना असणारे ते एकमेव मंदिर आहे. या मंदिरावरून प्राचीन काळातील मंदिर शिल्पशैली व कलात्मकता समजण्यास मदत होते. या मंदिरावर द्रविड दक्षिणेकडील होयसळ शैलीची छाप पडलेली आहे. त्यामुळे अशा प्रकारची मंदिरे थोडया प्रमाणावर असलेली दिसून येतात. या मंदिरातील गाभाऱ्यात शिवलिंग असून त्याची स्थापना पूर्व–पश्चिम आहे. या मंदिरातील शिल्पकाम व नक्षीकाम अत्यंत कल्पकतेने केल्यामुळे या मंदिरास वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

**३.६.५ चाफळचे राममंदिर–**

सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यात उंब्रजजवळ मांड नदीच्या काठी चाफळ हे गाव आहे. तेथे श्री.समर्थ रामदास स्वामी यांनी इ. स.१६४७ साली बांधलेले राममंदिर प्रसिद्ध आहे. हे मंदिर हेमाडपंथी आहे. रामाची मूर्ती रामदास स्वामींना अंगापूरच्या डोहात सापडली. म्हणून अंगापूरच्या ग्रामस्थांना रामदास स्वामींनी उत्सवासाठी मानाच्या काठीचा मान दिला. समर्थ रामदासांनी स्थापन केलेले ११ मारूतीपैकी ३ मारूती याच परिसरात आहेत. दास मारूती हा मंदिराच्या समोरच आहे. मंदिरामागे दोनशे फुटावर वीर मारूती आहे व तिसरा खडा मारूती शिंगणवाडीत आहे.[५४]

समर्थ रामदास स्वामींनी बांधलेले राम मंदिर त्यांच्या पश्चात त्याची व्यवस्था न झाल्याने मोडकळीस आले. पेशवेकाळानंतर मंदिराची अवस्था आणखीच बिकट झाली. डिसेंबर १९६७ च्या कोयना भूकंपात मंदिरास भेगा पडल्या त्यामुळे त्याची दैन्यावस्था झाली. मार्च १९७२ मध्ये भूकंपग्रस्त भागाच्या पाहणी पथकाबरोबर मुंबईचे उद्योगपती अरविंद मफतलाल आले होते. त्यांनी मंदिराची बिकट अवस्था पाहिली. हे मंदिर पाडून त्या जागी १९७२ मध्ये नवीन मंदिर बांधले.[५५]

राममंदिर हे दगडी चौथऱ्यावर असून तारकाकृती आहे. मंदिरात प्रवेश करण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. मंदिराभोवती दगडी तटबंदी असून तिला चार बुरूज आहेत. राममंदिरास पाच शिखरे असून गाभाऱ्यावरील सर्वात उंच शिखर २८.२५ मीटर उंचीचे आहे. त्यावर सुमारे ९० से.मी.उंचीचा सुवर्णकलश व ६.०९ मीटर उंचीचा तांब्याचा ध्वज आहे. मुख्य मंडपावर व

त्यापुढील मंडपावर प्रत्येकी एक शिखर व मुख्य मंडपाच्या उत्तर व दक्षिण बाजूच्या दोन चौक्यावर शिखरे आहेत. या मंदिराच्या बांधकामात कुठेही लोखंड वापरलेले नाही. मंदिर ज्या चौथऱ्यावर उभे आहे तो काळया दगडांचा असून त्याची रूंदी १.८२ मीटर आहे. मंदिराच्या दर्शनी दोन्ही खांबावर उजव्या बाजूस, मत्स्य, कुर्म, वराह व नरसिंह तर डाव्या बाजूच्या खांबावर वामन, परशुराम, बौद्ध व कलंकी या विष्णुच्या आठ अवताराच्या मूर्ती कोरलेल्या असून राहिलेले दोन अवतार उत्तरेच्या बाजूला असलेल्या भिंतीवर कोरलेले आहेत. पुढील दोन खांबाच्या आठ अवतारांच्याखाली सप्तमातृका व गणेशाची मूर्ती आहे. त्याखाली वराही देवी मूर्ती कोरलेली आहे. दासमारूती मंदिराच्या समोर छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी यांची मूर्ती आहे.

मुख्य मंडपात पूर्वाभिमुख तीन प्रशस्त लाकडी दरवाजे आहेत. या सर्व दरवाजाच्या दोन्ही बाजूच्या दगडी खांबावर जय–विजय, चंड–प्रचंड, द्वारपालाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. बाहेरील मंडपाच्या घुमटाच्या अंतर्भागात अष्टदिक्पालाच्या आठ मोठया मूर्ती, त्याखाली नवग्रहांच्या मूर्ती आहेत. मंडपाच्या आठ खांबावर अष्ट विद्याधरांच्या आठ मूर्ती आहेत. मुख्य मंडपाच्या मध्यभागी चांदीच्या सिंहासनावर रामाची मूर्ती आहे. मूर्तीच्या वरील बाजूस संगमरवरी सिंहासनावर राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. मूळ मूर्तीच्या खाली समर्थ व हनुमान यांच्या छोटया संगमरवरी मूर्ती आहेत. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर कोनाडयात अनेक देवदेवतांच्या मूर्ती आहेत.[५६]

मुख्य मंदिराशेजारी दासमारूती व गणपतीची मूर्ती समर्थानी स्थापलेले एक मंदिर आहे. हे मंदिर समर्थ रामदास स्वामींच्या काळात बांधलेले आहे. मुख्य मंदिराच्या पाठीमागे वीर मारूतीचे मंदिर आहे. या मारूतीची स्थापना ही समर्थ रामदास स्वामींनी केलेली आहे. या मंदिर परिसरात समर्थ रामदास स्वामींची एकांतात ध्यानधारणेची गुंफा आहे. याशिवाय ध्यानधारणेच्या गुंफेशेजारी समर्थाचे अस्थिवृंदावन आहे. रामदास स्वामीनी सज्जनगडावर माघ वद्य नवमी शके १६०३ रोजी देहत्याग केल्यावर त्यांचा अस्थिकलश या ठिकाणी ठेवण्यात आला होता. अस्थी वृदांवनावर एक पिंड आहे. पिंडीच्या वरच्या बाजूस तुळशीवृंदावन आहे. चाफळला चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून चैत्र शुद्ध एकादशीपर्यत उत्सव असतो.[५७]

**ऐतिहासिक महत्त्व**

महाराष्ट्रात समर्थ रामदासांनी स्थापन केलेल्या ११ मारूती मंदिरापैकी तीन मारूती याच मंदिर परिसरात आहेत. हे राममंदिर शिवकालीन आहे. चाफळजवळ असणाऱ्या शिंगणवाडी गावात रामदास स्वामी व शिवाजी महाराजांची पहिली भेट ८ एप्रिल १६४९ रोजी खडीचा मारूती येथे झाली. त्या भेटीत रामदास स्वामींनी शिवाजी महाराजांना व त्यांच्याबरोबर असलेले निळोजी सोनदेव व बाळाजी आवजी यांनाही अनुग्रह दिला होता. तेथे आज रामदास स्वामी आणि शिवाजी महाराजांच्या मूर्ती ठेवल्या आहेत. चाफळ ते सज्जनगड मार्गात रामघळ हे ठिकाण याच परिसरात आहे.[५८]

**३.६.६ संगम माहुली –**

सातारा जिल्हयातील सातारा शहराजवळ पाच कि.मी.अंतरावर संगम माहूली हे गाव आहे. या ठिकाणी कृष्णा व वेण्णा नद्यांचा संगम झालेला असल्याने या गावास संगम माहुली असे म्हणतात. हे गाव दोन विभागात विभागले असून कृष्णा नदीच्या पूर्व काठावर क्षेत्र माहुली तर पश्चिम काठावर संगम माहुली हे गाव आहे. संगम माहुलीची स्थापना पंत प्रतिनिधीनी सन १७१९ च्या सुमारास केली. छ. शाहू महाराजांनी श्रीपतराव प्रतिनिधीने संकल्प सांगितल्याबद्दल अर्धा चाहूर जमीन दान दिली होती. या जागेत प्रतिनिधींनी वस्ती केली. तेव्हापासून येथे कृष्णा–वेण्णीचा उत्सव प्रतिवर्षी माघ महिन्यात साजरा केला जातो.[५९] प्रतिनिधी घराण्याने अठराव्या शतकात संगम माहुलीत दहा मंदिरे बांधली. त्यातील निवडक मंदिराची माहिती पुढीलप्रमाणे–

**३.६.६.१ राधाशंकर मंदिर–**

कृष्णा नदीच्या पूर्व तीरावरील गिरी घाटावर हे मंदिर आहे. हा घाट इ.स.१७८० मध्ये बापूभट गोविंदभट यांनी बांधला. मंदिराचे बांधकाम संपूर्ण दगडी असून त्यास शिखर आहे. शिखरावर देवळया असून त्यामध्ये देव–देवतांच्या मूर्ती आहेत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन दीपमाळा आहेत. या कमानी भोरच्या पंतसचिवांच्या घराण्यातील ताईसाहेबांनी सन १८२५ मध्ये बांधल्या आहेत.[६०]

### ३.६.६.२ रामेश्वर मंदिर–

हे मंदिर कृष्णा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर बांधलेले आहे. हे मंदिर इ.स.१७०० मध्ये देगावच्या परशुराम नारायण अनगळ याने बांधले आहे. मंदिरासमोर ३५ पायऱ्यांचा घाट आहे. या ठिकाणी दुसरा एक घाट दुसरा बाजीराव पेशवा याने अर्धवट बांधलेला आहे. या मंदिराशेजारी मठ आहे. तसेच दोन दीपमाळा आहे. दीपमाळेच्या उजव्या बाजूला दत्तात्रेय महाराजांची मूर्ती आहे. मुख्य मंदिरासमोर नंदी आहे. या नंदीच्या पायाजवळ एक लिंग आहे. त्यावर फणाधारी नाग असून शेजारी पूजा करणाऱ्या दोन महिला आहेत. या नंदीवर छत आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात मध्यभागी शिवपार्वतीची मूर्ती असून अन्य काळया पाषाणातील पाच मूर्ती आहे. या मंदिराच्या पाठीमागे पाच कमानी असलेला एक मठ आहे.[६१]

### ३.६.६.३ बिल्वेश्वर मंदिर–

हे मंदिर कृष्णा नदीच्या पूर्व किनाऱ्यावर इ.स.१७४२ मध्ये श्रीपतराव पंतप्रतिनिधींनी बांधले. या मंदिराला देवडी व गाभारा आहे. या मंदिराच्या लहान दरवाजाजवळ एक नंदी असून त्यावर कमानीची मेघडंबरी आहे. मंदिरावर विटांचे शिखर असून त्यावर गिलाव्यात नक्षीकाम केलेले आहे. मंदिराचे बांधकाम राखाडी रंगाच्या दगडात केलेले आहे. त्याच्या पलीकडे अंगापूरचे आनंदराव भिवराव देशमुख यांनी इ.स.१७३८ मध्ये बांधलेला घाट आहे.[६२]

### ३.६.६.४ संगमेश्वर महादेव मंदिर–

हे मंदिर कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स.१७४२ मध्ये श्रीपतराव पंतप्रतिनिधींनी केले. कृष्णा नदीच्या काठापासून मंदिराच्या प्रांगणापर्यंत घाटाच्या पायऱ्या आहेत. या मंदिराच्या व्हरांडयात लक्ष्मीची प्रतिमा चितारालेली आहे. गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. मंदिरासमोर नंदी असून त्यावर मेघडंबरी आहे. नंदीच्या चौथऱ्यावर व घुमटाच्या वरच्या भागावर फुलपाखरांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराच्या जवळच त्रिकोणी जागेत बनशापूरी साधूची व त्याच्या शिष्यांची समाधी आहे.[६३]

### ३.६.६.५ विश्वेशर महादेव मंदिर–

हे मंदिर कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर आहे. या मंदिराचे बांधकाम इ.स.१७४२ मध्ये श्रीपतराव पंतप्रतिनिधींनी केले. हे मंदिर यादव शैलीचे अनुकरण करून उभारण्यात आले आहे. हे मंदिर अर्धा मीटर उंचीच्या अधिष्ठानावर असून तारकाकृती विधानाचे आहे. याची

गर्भगृह, अंतराळ व सभामंडप अशी रचना आहे. गर्भगृहात शिवपिंड आहे. अंतराळ चार स्तंभावर उभारलेले असून त्यापैकी दोन अर्धस्तंभ व दोन पूर्णस्तंभ आहेत. सभामंडप तिन्ही बाजूने मोकळा असून त्यास मुखमंडप आहे. सभा मंडपाचे खांब पायाला चौकोनी तर मध्यभागावर दंडगोलाकृती आहेत. खांबाच्या वरील भागावर पुष्पवेली कोरलेल्या आहेत. मुख्य मंडपाच्यावर तिन्ही बाजूस विटा चुन्यात मेघडंबरी उभारलेली आहे. सभा मंडपातील घंटा इ.स.१७३९ मध्ये मराठयांनी वसई जिंकल्यानंतर पोर्तुगीज चर्चमधून आणलेली आहे. मंदिरासमोर नंदीमंडप असून यावर अष्टकोनीय शिखर आहे. मुख्य मंदिराच्या शिखरावर देवकोष्ठे असून त्यामध्ये पौराणिक कथानक कोरले आहे. दोन देवकोष्ठकामधील भागात माहुतासह हत्तीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराच्या उत्तर व पश्चिम बाजूला ओवऱ्या आहेत.[६४]

**३.६.६.६ रामचंद्र मंदिर–**

त्रिंबक विश्वनाथ पेठे यांनी इ.स.१७७२ मध्ये हे मंदिर बांधले. हे मंदिर आकाराने लहान असून गाभाऱ्यात राम, लक्ष्मण व सीता यांच्या पितळी पत्र्याच्या मूर्ती आहेत. मूर्तीच्या मागील भिंतीत कमानी असून त्यावर विविध फुलांच्या आकृत्या कोरलेल्या आहेत.

**३.६.६.७ विठोबा मंदिर–**

इ.स.१७३० मध्ये चिंचणेरच्या जोतिपंत भागवताने हे मंदिर बांधले आहे. या मंदिराचा मंडप इ.स.१८६० मध्ये बांधला आहे. हे मंदिर छोटे असून व्हरांडा लहान आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावर कमान आहे. या मंदिरात विठोबाची मूर्ती आहे.

**३.६.६.८ भैरव मंदिर–**

इ.स.१७७० मध्ये कृष्णभट टाळके याने बांधले. हे मंदिर आकाराने लहान असून गाभाऱ्याच्या पुढे तीन लहान कमानी आहेत.

**३.६.६.९ कृष्णेश्वर महादेव मंदिर–**

इ.स.१७९० मध्ये कृष्णा दीक्षित याने हे मंदिर बांधले. हे मंदिर कृष्णा नदीच्या पश्चिम काठावर बांधलेले आहे. इ.स.१८६५ मध्ये राणी सगुणाबाईनी एक वास्तू बांधली आहे. वास्तूच्या मध्यभागी असलेल्या मैदानातील उंच चौथऱ्यावर मंदिराची निर्मिती करण्यात आली. गर्भगृहात शिवपिंड असून त्यामागे कोनात्मक संगमरवराची पद्मासनस्थ मानवी मूर्ती आहे. गर्भगृहाच्यापुढे राजदरबारासारखा मंडप आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दुमजली इमारत आहे.[६५]

### ऐतिहासिक महत्त्व

संगम माहुली हे गाव मराठयांची राजधानी असलेल्या सातारा शहराजवळ असल्याने त्याला ऐतिहासिकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. या ठिकाणी साताऱ्याच्या राजघराण्यातील व्यक्तींच्या समाध्या आहेत. नदीच्या पात्रात छत्रपती संभाजीची पत्नी येसूबाईची समाधी आहे. या समाधीवर छत्रपती शाहूने मेघडंबरी बांधली होती. या मेघडंबरीचा शोध घेण्याचा वा.सी. बेंद्रेनी प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही.[६६] महाराणी ताराबाई १० डिसेंबर १७६१ रोजी सातारा येथे मृत्यू पावल्या. तिचे क्रियाकर्म छत्रपती रामराजा यांनी संगम माहुली येथे केले आहे.[६७] छत्रपती शाहूची समाधी येथे आहे. संगम माहुली या गावात प्रवेश करतेवेळी डाव्या बाजूस छत्रपती शहाजी उर्फ आप्पासाहेब महाराजांचे स्मारक आहे. परशुराम त्रिंबक प्रतिनिधीचे वृंदावन विश्वेश्वर मंदिर व शाहू स्मारकाच्यामध्ये आहे.[६८]

क्षेत्र माहुली हे रामशास्त्री प्रभुणे यांचे गाव आहे. सन १९७९ मध्ये येथे त्यांचा अर्धपुतळा उभारला आहे. ८ जानेवारी १७३४ रोजी राघोबादादांचा जन्म याच गावी झाला. सन १८१७ मध्ये दुसरा बाजीराव पेशवा पंढरपूरहून येथे आल्यावर अधिक श्रावण मासात बराच काळ येथे राहिला असताना त्याची व ब्रिटिश अधिकारी सर जॉन माल्कमची येथे भेट झाली होती.[६९] नोव्हेंबर १८१८ मध्ये दुसरा बाजीराव त्याच्या धावपळीच्या कालावधीत येथे काही दिवस मुक्कामास होता. आज या गावात एक प्रशस्त वाडा असून त्या वाडयाच्या पहिल्या मजल्यावरील दिवाणखान्यात मराठा शैलीतील भित्तिचित्रे काढलेली आहेत.[७०]

### ३.६.७ वाईचा गणपती–

महागणपती मंदिर गणपतराव भिकाजी रास्ते यांनी सन १७६२ मध्ये बांधले. ते कृष्णा नदीच्या पात्रात गणपती घाटावर आहे. हे मंदिर बांधण्यासाठी एक लाख साठ हजार रूपये खर्च आला आहे. हे मंदिर पुर्वाभिमुख असून ते गर्भगृह व सभामंडप या दोन दालनात विभागले आहे. गर्भगृहात अर्धा मीटर उंच चौथऱ्यावर गजाननाची रेखीव बैठी एक मीटर, ८० सें.मी.उंच व दोन मीटर रूंद डाव्या सोंडेची भव्य मूर्ती आहे. ही मूर्ती एकसंध काळया दगडात खोदलेली आहे. मूर्तीच्या मागील अर्धचंद्राकृती प्रभावळ ३.६ मीटर उंच आहे. गणपतीच्या हातात अनुक्रमे मोदक, परशू, पाश व दात या वस्तू आहेत. पुढे उंदराची प्रतिमा आहे. या मंदिरातील मूर्तीच्या भव्यतेमुळे ते ढोल्या गणपती या नावानेही प्रसिद्ध आहे. या मंदिरातील विष्णू सुरेख असून

लक्ष्मी विष्णूचे पाय चुरत आहे. विष्णूचा डौल व नागाचा फणा इत्यादी चित्र कलाकाराने काढले आहे.[७१]

या मंदिराचे विन्यास (विधान) तारकाकृती असून वारंवार येणाऱ्या पुरापासून संरक्षण व्हावे म्हणून गर्भगृहाच्या पश्चिमेकडील मागील भिंतीची रचना मधोमध त्रिकोणी आकार देऊन नावेच्या टोकासारखी म्हणजे मत्स्याकार केली आहे. त्यामुळे पुराच्यावेळी पाणी दुभंगले जाऊन पाण्याचा दाब कमी होतो व मंदिर सुरक्षित राहते. गर्भगृहाच्यावर सुमारे तीन मीटर उंचीच्या चौथऱ्यावर हे शिखर पक्क्या विटा व चुन्यात बांधले असून ते समोच्चतादर्शक रेषांनी ज्या ठिकाणी चौथऱ्यावर टेकते. त्याठिकाणी एक उमललेल्या सोळा पाकळयांचे भव्य कमळ आहे. या शिखराच्या चारी कोपऱ्यात मूळ शिखराच्या लहान प्रतिकृती आहेत. मूळ शिखर पिरॅमिडप्रमाणे काहीसे शंक्वाकार, एखाद्या सुळक्यासारखे आकाशाकडे झेपावले आहे. त्यावर नलिकासदृश्य चुनेगच्चीतील कामटया (रथ) आहेत. त्याच्यावर एक उलटे कमळ आहे. त्याच्या देठातून एक  कमळ पुन्हा वर आले असून त्या कमळात कमळ पाकळयांनी वेढलेला कुंभ आहे. त्यातून मधोमध वर कळस आला आहे.[७२]

**३.६.८ मशीद–**

सातारा जिल्हयात इस्लाम धर्मियांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे सर्व शहरात व खेडयात मशिदी आहेत. सातारा शहरातील मशिदी पुढीलप्रमाणे–

**३.६.८.१ खतिबा मशीद–**

औरंगजेबची मुलगी झेबुन्निसा हिने छत्रपती शाहूचा चांगला सांभाळ केला होता. तिने छत्रपती शाहूचे धर्मातंर होऊ दिले नाही. म्हणून छत्रपती शाहूने तिच्या स्मरणार्थ मोहरमध्ये डोला सुरू करून ही मशीद १७१९ मध्ये बांधली. हा डोला राजघराण्यांने अजूनही चालू ठेवला आहे. राजघराण्याचा ताबूत अजूनही अग्रभागी असतो.

**३.६.८.२ शाही मशीद–**

सातारा शहरात दुर्गा पेठेतील ही मशीद छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी कलावंतीण अमिना हिच्या सुचनेनुसार १८२१ मध्ये बांधली. या मशिदीवर उत्तम नक्षीकाम केलेले आहे. या मशिदीच्या बांधकामासाठी एक लाख रूपये खर्च आला होता.[७३]

### ३.६.८.३ हेडक्वार्टर मशीद–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांचा विश्वासू सेवक दौलतखान याने सन १८३५ ते ४० च्या सुमारास ही मशीद बांधली. या मशिदीच्या आवारात दौलतखानाच्या वंशजांच्या काही कबरी आहेत.

### ३.६.८.४ खड्डा मशीद–

साताऱ्याच्या न्यायालयातील एका दादामिया नावाच्या बेलिफाने गुरूवार पेठेत ही मशीद सन १८८५ मध्ये बांधली. मशीद ज्या ठिकाणी बांधली आहे. त्याठिकाणी पूर्वी खड्डा होता म्हणून त्या मशीदीस खड्डा मशीद असे म्हणतात.

### ३.६.८.५ पोवई नाका मशीद–

दौलतखानाचा मोठा मुलगा सरदारखान याने रविवार पेठेत सन १८४५ च्या सुमारास आपल्या वडीलांचे स्मारक व मशिद बांधली. येथे त्याच्या वंशजाच्या काही कबरी आहेत.

### ३.६.८.६ बेगम मशीद–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८३५ च्या सुमारास मुस्लिम बांधवासाठी बेगम मशिद बांधून दिली.

### ३.६.८.७ शनिवार मशिद–

ही मशीद एका शेर अलीमौद्दिन नावाच्या अरब व्यक्तीने बांधून मुस्लिम बागवान समाजाकडे देखरेखीसाठी दिली. सुमारे १५० वर्षापूर्वी सातारा शहरात शेर अलीमौद्दिन नावाचा प्रसिद्ध अवलिया राहत होता.

याशिवाय सातारा शहरात सदर बाजार मशीद, गुरूवार परज खाटिक मशीद, मंगळवार खाटिक मशीद या मशीदी आहेत. या मशीदींचा उपयोग मुस्लिम बांधवांना नमाज पढण्यासाठी होतो. मुस्लिम लोक सण व उत्सवाच्यावेळी या मशिदीत एकत्र जमत असतात.[७४]

### ३.६.९ पाली–

सातारा जिल्हयात कराड तालुक्यात तारळी नदीच्या दोन्ही काठावर पाली हे खेडेगाव वसलेले आहे. या गावाचे मूळ नाव राजापूर असून येथील खंडोबाचे मंदिर प्रसिद्ध आहे. म्हणून या गावास खंडोबाची पाल म्हणून ओळखले जाते.[७५]

तारळी नदीच्या डाव्या तीरावर खंडोबाचे मंदिर आहे. हे मंदिर ५०० ते ५५० वर्षापूर्वी आबाबिन शेठी पाघोडे नावाच्या वाण्याने बांधले. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम दगडात केलेले आहे. या मंदिराचे गर्भगृह व त्याच्या बाहेरील बाजूस १०.६६×८.५३ मी. या आकाराचा द्वारमंडप बांधलेला आहे. हा मंडप चार स्तंभावर आधारीत आहे. मंदिराचे गर्भगृह १.४८×१.४८ मी. आकाराचे असून त्यात दोन लिंगे आहेत. त्यापैकी एकावर खंडोबाचा व दुसऱ्यावर म्हाळसाबाईचा पितळी मुखवटा आहे. त्याच्या शेजारीच उजव्या बाजूला काळया दगडातील खंडोबाची दुसरी पत्नी बानुबाईची मूर्ती आहे. त्याच्या पाठीमागे त्याचा मुख्य प्रधान हेगडी पेंढारी व त्याची पत्नी यांच्या घोडयावर बसलेल्या पितळेच्या मूर्ती आहेत. मंदिरातील मुख्य मूर्तीवर सतत पाण्याचा अभिषेक होण्यासाठी उत्तरेकडून एक दगडी नाली काढण्यात आली असून तिच्याखाली दगडी घोडयाची मूर्ती आहे. मराठयांचा सेनापती संताजी घोरपडे याने इ.स. १७९० मध्ये प्राकारात बांधलेला ६.३×६.३ मीटरचा मंडप बांधलेला आहे. तो १२ स्तंभावर आधारीत असून चहुबाजूंनी उघडा ठेवलेला आहे. मंडपाच्या प्रत्येक कोपऱ्यावर लहान कळस आहेत व मध्यभागी लहान शिखर आहे. द्वारमंडपावर शिखर असून गाभाऱ्यावरही मुख्य शिखर आहे. या शिखरावर ठिकठिकाणी देवळया असून त्यामध्ये देवदेवतांच्या मूर्ती बसविलेल्या आहेत. द्वारमंडपातील उत्तरेकडील देवळीत गणपतीची व दक्षिणेकडील देवळीत सिद्धवासिनीची मूर्ती बसविण्यात आलेली आहे.

खंडोबाच्या मंदिराच्या प्राकारात पूर्व–पश्चिम ४२.६२ मीटर लांब व उत्तर–दक्षिण २४.३८ मीटर रूंदीचा फरसबंदी चौक आहे. या चौकात वायव्येस ओंकारेश्वर महादेवाची मूर्ती व नैऋत्येस हेगडीची मूर्ती आहे. मंडपाच्यासमोर पूर्वेला दगडी छताखाली पितळी पत्र्याचे आवरण असलेली नंदीची मूर्ती आहे. त्याच्या दोन्ही बाजूला घडीव दगडाच्या ३.५७ मीटर उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. दीपमाळा गज व वृषभांनी तोलून धरलेल्या असून खालच्या बाजूस मानव, पशू व वृक्षवल्लींचे कोरीव काम केलेले आहे. याच्यापुढे पूर्वेला नक्षिकाम केलेल्या पितळी पत्र्याने आच्छादलेला दगडी हत्ती आहे. यावर दगडी छत आहे. नंदीच्या दक्षिणेला एक शिवकालीन मंदिर आहे. प्रांगणाच्या भिंतीत उत्तरेकडील अर्ध्या भागात चिरेबंदी दगडांचे बांधकाम केलेले मठ आहेत. नक्षीकाम केलेल्या कमानी आहेत. या मठाचे सुरूवातीचे बांधकाम मराठा सरदार महादजी शिंदे व उर्वरित बांधकाम सेनापती धनाजी जाधवने केलेले आहे.[७६]

या मंदिरास तीन प्रवेशद्वार आहेत. पूर्वेकडील प्रवेशद्वार लहान असून त्याच्या आतील बाजूस ९.१४ मी. उंचीच्या दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळांचे बांधकाम नेर गावचा पाटील गमाजी चव्हाण याने सन १७६६ मध्ये केले आहे.[७७] उत्तरेकडील प्रवेशद्वार लहान असून ते मराठा सरदार महादजी शिंदे यांनी सन १७७० मध्ये बांधले आहे. दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वार ३.६५ मीटर उंच व ५२ मीटर रूंद आहे. या प्रवेशद्वारजवळ नगारखाना असून त्याची व प्रवेशद्वाराच्या कमानीचे बांधकाम रहिमतपूरच्या माने यांनी सन १८०० मध्ये केले आहे. दक्षिणेकडील पूर्व बाजूला ज्या इमारती आहेत. या इमारतींच्या बाजूला घडीव दगडाचे ९.१४ मी.उंचीचे, ६.०९ मी. रूंदीचे व आतील बाजूने १.८२ मी. रूंदीची कमान असलेले महाद्वार आहे. याचे बांधकाम कराडच्या मुतालिक घराण्यातील यमाजी शिवदेव याने केले आहे. याचा जीर्णोद्धार केला आहे.[७८]

पाली येथे पौष महिन्यात फार मोठी यात्रा भरते. यात्रेच्या दिवशी उत्सव मूर्तीस पितळी पत्र्याचे मुखवटे घालून हत्तीवरून मिरवणूक काढली जाते. यात्रा चार दिवस चालते. शेवटच्या दिवशी खंडोबाचे लग्न लावले जाते. सन १८८५ मध्ये शासनाकडून या मंदिराच्या उत्सवास वार्षिक ३०० रूपये अनुदान मिळत होते.[७९]

**ऐतिहासिक महत्त्व**

पाली हे ठिकाण मराठा काळात कसब्याचे ठिकाण होते. चतुरसिंगाने आपला भाऊ कोल्हापूरचा छत्रपती तिसरा शिवाजी याच्या पराभवाचा फेब्रुवारी १७९९ मध्ये जो बदला घेतला त्याच्याशी खंडोबाच्या मंदिराचा संबंध येतो. पेशव्यातर्फे रास्तेनी सुमारे २ ते ३ हजाराची फौज घेऊन सातारा किल्ल्याजवळ तळ दिला आहे असे चतुरसिंगास समजताच तो आपले ६०० सैनिक घेऊन या गावाजवळच्या डोंगरात दबा धरून बसला. त्यानंतर त्याने देवळात जाऊन खंडोबाची विधीपूर्वक पूजा केली व रास्तेंवर हल्ला चढविला. शत्रू बेसावध असला तरी बंदुकीच्या आवाजाने त्यांनी तलवारी व बंदुका हातात घेतल्या. त्यानंतर काही वेळातच चतुरसिंगाच्या सैन्याची पांगापांग झाली. चतुरसिंग कोल्हापूरला पळून गेला. याशिवाय तेथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात बांधलेले मंदिर आहे. यावरून शिवकाळात ही या मंदिरास महत्त्व होते हे स्पष्ट होते. या मंदिराशी मराठा सेनापती संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांचा सहभाग होता व मराठा सरदार महादजी शिंदे, मुतालिक यमाजी शिवदेव यांचाही संबंध आलेला आहे.[८०]

### ३.६.१० मेरूलिंग–

सातारा जिल्हयात जावली तालुक्यात मेढया जवळ मोरघर येथील डोंगरावर मेरूलिंग हे देवस्थान आहे. येथील मंदिराची रचना ७० फूट लांब व २७ फूट रूंद व ६० ते ६५ फूट उंच अशी आहे. मंदिराच्या आतील बाजूस तीन गाभारे व तीन शिखरे आहेत. या मंदिराच्या मागील बाजूस रूद्राक्षांच्या आकाराची स्वयंभू अशी पिंड आहे. पिंडीच्या मागील सिंहासनावर पोशाख घातलेल्या शिवपार्वतीच्या मूर्ती आहेत. पिंडीवर फणा काढलेली पंचमुखी पितळी मूर्ती आहे. बाहेरील गाभाऱ्यात गणपतीची मूर्ती आहे. या मूर्तीसमोर चौथऱ्यावर नंदी आहे. मंदिरापुढे ६० फूट उंचीची दीपमाळ उभारण्यात आलेली आहे. मेरूलिंग येथील यात्रा चैत्र शुद्ध दशमीला भरते. चैत्र शुद्ध एकादशीला रात्री मेरूलिंग विवाह होतो. हा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो.[८१]

### ऐतिहासिक महत्त्व

मेरूलिंग या ठिकाणच्या नरकदेव शब्दाचा अपभ्रंश नरफदेव  कैलासपती शंकराच्या वरदहस्ताने नरकासूर दैत्य अति पुंड झाला होता. भगवान श्रीकृष्णानी त्याचा वध केला. म्हणून या ठिकाणास नरकदेव किंवा नरफदेव असे म्हणतात. या गावाला मेरूलिंग असे संबोधले जाते. पुराण काळापासून याला मेरूपर्वत असे म्हणतात. हे मंदिर पांडवांनी बांधले आहे. हे मंदिराच्या रचनेवरून स्पष्ट करता येते. याशिवाय याठिकाणी पांडवांनी पाण्याचे झरे व तीर्थकुंडे बांधली आहेत.

इ.स. १७०२ मध्ये कोकणस्थ चिपळूण परशुरामक्षेत्री श्री.ब्रम्हेंद्रस्वामी वास्तव्यास होते. स्वामींना हबशी राजाच्या मुलखातील रयतेने त्रास देण्यास सुरूवात केली. स्वामी हे सातारा प्रांतात जावळीतील घनदाट अशा नरकदेव या ठिकाणी येऊन तपसाधना करू लागले. मेरूलिंगाचे शेजारी एका मोठया दगडात कोरलेली गुहा आहे. तेथे स्वामी लोकांना दर्शन देऊ लागले. सातारा संस्थानचे छत्रपती शाहू महाराज यांनी स्वामींचे शिष्यत्व पत्करले. राजकीय सल्ला मसलतीसाठी छत्रपती शाहू महाराज मेरूलिंग येथे  स्वामींकडे येत असत.

वसईचा किल्ला जिंकण्यासाठी चिमाजीआप्पा हा श्री.ब्रम्हेंद्रस्वामींचा आशीर्वाद घेण्यासाठी सन १७५६ मध्ये आपली स्वारी घेऊन मेरूलिंग महादेव मंदिरात आला होता. त्यांनी वसईचा किल्ला जिंकल्यावर नवस फेडण्यासाठी पुन्हा मेरूलिंगास येऊन १२ मण तीळ,

तूप, तांदूळ, चार तोळे केशर इत्यादी देऊन या मंदिरात होमहवन, अभिषेक करून मणभर शोभेच्या दारूगोळयाने आतिषबाजी करून या ठिकाणी वसई किल्ल्यातील भली मोठी घंटा आणून गाभाऱ्यात बांधून घंटानाद केला होता.[८२]

### ३.६.११ यवतेश्वर–

सातारा शहराच्या जवळच पश्चिमेस पाच कि.मी. अंतरावर यवतेश्वर डोंगरावर हे धार्मिक स्थळ आहे. पूर्वीच्या काळात येथे बांबूची खूप बेटे होती या ठिकाणी यवतेश्वर महादेवाचे मंदिर आहे. यावरून या गावास यवतेश्वर हे नाव पडले आहे.[८३] हे मंदिर छत्रपती शाहू महाराजांच्या काळात बांधलेले आहे. मंदिराच्या सभोवती धर्मशाळा असून दक्षिणेस रामेश्वराचे व मारूतीचे, उत्तरेस काळभैरवाचे व घाटाई देवीचे आणि समोर गणपतीचे मंदिर आहे. मंदिराच्या आवारात मोठा दीपस्तंभ आहे. मंदिराचे एकूण तीन भाग असून मुख्य गाभारा जमिनीच्या सपाटीपासून खाली आहे. येथे कार्तिक शुद्ध प्रतिपदेला यात्रा भरते. श्रावणी सोमवारीही यात्रा भरते. महाशिवरात्रीला मोठा उत्सव असतो.[८४]

## ३.७ सातारा जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सातारा जिल्हा ऐतिहासिक जिल्हा म्हणून नावारूपास आला. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना या जिल्हयात केली. त्यांनी स्वराज्याचा विस्तार याच जिल्हयापासून सुरू केला. पुढे छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात या जिल्हयात अनेक लढाया झाल्या होत्या. छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात तर सातारा हे स्वराज्याची राजधानी होती. स्वराज्याची सूत्रे सातारा येथून हलविली जात होती. पुढे पेशवेकाळात पुण्याचे महत्त्व वाढले असले तरी पेशवे हे छत्रपतींच्या सल्ल्याने मार्गदर्शनाने कारभार करीत असत. ब्रिटिश काळात सातारा जिल्हयास महत्त्वाचे स्थान होते. सातारा जिल्हयात अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत.

### ३.७.१ अदालतवाडा–

अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी बोगद्यावर जाणाऱ्या रस्त्यावर छत्रपती शाहू महाराजांनी सन १७३६ मध्ये बांधलेला अदालतवाडा आहे. छत्रपती शाहू महाराज याचा उपयोग

न्यायालयासारखा करीत असत. पेशव्यांचे या काळात तिचा खाजगी वापरासाठी उपयोग केला जात होता. या वाडयाचा पाया दहा फूट उंच आहे. प्रवेशद्वार साधे असून न्यायासनाकडे जाण्यासाठी इमारती भोवताली मोठया आयताकृती पायऱ्या आहेत. ही इमारत मोठया दगडात बांधलेली असून तिची लांबी ६७.५ मी.लांब व ४८ मी. रूंद आहे. इ.स.१८७६ पर्यंत या वाडयाचा उपयोग दिवाणी न्यायालय म्हणून करण्यात येत असे. आज या वाडयात राजकुळातील वंशज राहत आहेत.[८४]

**३.७. २ चारभिंती–**

अजिंक्यतारा किल्ल्याच्या पूर्वेकडील टेकडीवर चार भिंती आहेत. चार भिंतीचे ठिकाण छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बांधले. राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक पाहण्यासाठी या भिंतीचा उपयोग करीत असत. त्यापूर्वी या इमारतीचा वापर टेहळणीसाठी केला जात असे.[८६] इ.स.१८५७ च्या उठावात ब्रिटिशांनी तोफा डागून ही इमारत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी या इमारतीचे छप्पर उडविले त्यामुळे या चार भिंती उरल्या आहेत. इ.स.१८५७ च्या इंग्रजाविरूद्व झालेल्या उठावाच्या शताब्दिनिमित्त सन १९५७ मध्ये या ठिकाणी स्मारकस्तंभ उभारण्यात आला आहे. स्तंभाच्या डाव्या बाजूवर सन १८५७ च्या उठावातील हिंदुस्थानचा नकाशा व भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ठळक घटना दिल्या आहेत.[८७]

या स्मारकाच्या मध्ये चौकोनी स्तंभ असून त्याच्या दक्षिणेकडील बाजूवर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा भितींत अर्धपुतळा बसविलेला असून त्याखाली त्यांचे चरित्र लिहीलेले आहे. भिंतीच्या उत्तरेकडील बाजूवर प्रतापसिंह महाराजांचे वकील रंगो बापूजी गुप्ते यांचा अर्थ पुतळा असून त्याखाली त्यांच्या कामगिरीचे वर्णन केले आहे.[८८]

**३.७. ३ सापचा वाडा –**

सातारा जिल्हयात कोरेगाव तालुक्यात रहिमतपूरपासून ३ कि.मी.अंतरावर साप या गावात वाडा आहे. राजवाडयाचे प्रवेशद्वार प्रशस्त सागवानी लाकडाचे असून त्यावर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. या वाडयाचे क्षेत्र तीन एकराचे आहे. या राजवाडयात दोन मोठी भुयारे आहेत. वाडयात तांब्याचे हंडे व शेतीची जुन्या प्रकारची अवजारे ठेवली आहेत. वाडयात एक दरबार हॉल असून त्यातील सागवानावर नक्षीचे कोरीव काम केलेले आहे. वाडयात दोन विहिरी आहेत. त्या पाण्यावर नारळाची बाग लावलेली आहे. विहिरीच्या आतील बाजूस एक मोडी

भाषेतील लेख कोरलेला आहे. हा वाडा ग्वाल्हेरच्या सरदार महादजी शिंदे यांचा आहे. सध्या या वाडयात कोणीही राहत नाही.[८९]

### ३.७. ४ फाशीचा वड–

सातारा शहरात शाहूपुरी रस्त्यावर स्वातंत्र्य लढयातील घटनांचा साक्षीदार म्हणून एक स्तंभ उभारला आहे. त्यास फाशीचा वड असे म्हटले जाते. ८ सप्टेंबर १८५७ रोजी झालेल्या उठावात सातारा येथील १७ जणांनी हौतात्म्य पत्करले. त्यातील काही जणांना तोफेच्या तोंडी, तर काहींना गोळया घालून ठार मारण्यात आले. त्यावेळी पाच जणांना फाशी देण्यात आले. त्यात सीताराम गुप्ते, विठ्ठल वाकनीस, केशव चित्रे, नारायण पावस्कर आणि शिवराम कुलकर्णी यांचा समावेश होता. या लोकांना फाशी दिलेला जुना वड कोसळल्यानंतर तेथे नवीन वड लावण्यात आला. तसेच तेथे एक स्तंभ उभारण्यात आला आहे.[९०]

### ३.७. ५ मेणवली–

नाना फडणीस यांना इ.स.१७६८ मध्ये वाईच्या पश्चिमेकडील काही भाग इनाम म्हणून मिळाला होता. हा भाग छत्रपती रामराजा यांचे सरदार भगवंतराव त्र्यंबक पंतप्रतिनिधी आणि रघुनाथ घनश्याम मंत्री यांनी दिला होता.[९१] त्या ठिकाणी नाना फडणीस यांनी कृष्णा नदीकाठी मेणवली गाव वसवून इ.स.१७७० मध्ये तेथे मोठा वाडा बांधला. पुण्याच्या धकाधकीच्या राजकारणातून कधीतरी एकांतवास मिळावा म्हणून नाना फडणीसांनी हा वाडा बांधला. वाडयाचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेस आहे. या दुमजली व पोटमाळा असलेल्या वाडयाच्याभोवती दगडी भक्कम तटभिंत बांधली आहे. वाडयाच्या पश्चिमेकडील मागील बाजूस कृष्णेत उतरण्यासाठी पायऱ्यांचा घाट आहे. मुख्य प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. वाडयाच्या पाठीमागे अमृतेश्वर मंदिर, लक्ष्मीवासुदेव मंदिर व कृष्णेचा घाट बांधला आहे.

या वाडयात तळमजल्यावर एक सोपा आहे. त्यावर कारंजे असून त्या सोप्याच्या उजव्या बाजूस मोठी विहीर आहे. सोप्याच्या दोन्ही बाजूस देवडया आहेत. वाडयाच्या भिंती सव्वा ते दीड मीटर रूंदीच्या आहेत. या वाडयाचा दिवाणखाना सहाखणी आहे. त्याच्या कमानी व छत लाकडी असून नक्षीदार व कलाकुसरयुक्त समांतर समभुज चौकोनी रचनेच्या आहेत. त्यावर झुंबरे व हंडया अडकवण्यासाठी आकडे ठेवलेले आहेत. वाडयातील दिवाखान्याला लागून नाना फडणीसांचे शयनगृह होते. त्यात त्यांना पलंग ठेवण्यात आलेला आहे.[९२]

मेणवलीचा हा वाडा उंच तटबंदीने धुळविरहित केला आहे. त्यास मोकळे वायुविजन व पुरेशा प्रकाशाची तरतूद केली आहे. वाडयात सहा चौक असून प्रत्येक चौकाच्या मध्यभागी एक मीटर खोल कुंड आहेत. या कुंडामध्ये जमा होणारे पावसाचे पाणी बंदिस्त गटाराद्वारे बाहेर काढले आहे. वाडयाच्या बाहय तटभिंतीस खिडक्या नाहीत. हा वाडा मराठा वास्तुशैलीत बांधला असून तो ऐतिहासिक आहे.[९३]

वाडयातील उत्तरेकडील खोली ही नाना फडणीसाच्या शेवटची पत्नी जिजाऊची खोली म्हणून ओळखली जाते. या खोलीच्या छतास लाल रंग दिलेला आहे. छतातील लाकडात कोरलेल्या वेलबुट्टीस लाल रंग दिलेला आहे. या खोलीच्या भिंती जमिनीपासून १.२ मीटर उंचीवर हिरव्या गर्द रंगात रंगविल्या आहेत. या खोलीतील भित्तीचित्रे चांगल्या स्थितीत आहेत.[९४]

मेणवलीचा वाडा हा निवासस्थान कार्यालय आणि अन्य दैनंदिन व्यवहारासाठी वापरला जाई. या वाडयाचा दर्शनी भाग गढीसारखा व संरक्षणाच्या दृष्टिने भक्कम आहे. त्यामुळे वाडयाच्या सभोवती भक्कम दगडी संरक्षक भिंत बांधण्यात आली आहे. वाडयाचे दरवाजे मोठे आहेत. या वाडयाला देवडी व नंतर पहिला चौक, चौकात कारंजे व हौद, नंतर मुख्य वाडयाचे जोते आहे. त्यापुढे ओसरी, माजघर, स्वयंपाकघर ही इतर दालने क्रमाने आहेत. दिवाणखाना पहिल्या मजल्यावर आहे. दिवाणखान्यात स्त्रियांची स्वतंत्र उठण्या बसण्याची स्वतंत्र व्यवस्था केली आहे. त्याच्यासाठी जिनेही वेगळे आहेत. हे जिने भिंतीत आहेत. तेथील एका खोलीत रूंद भिंतीत जडजवाहिर ठेवण्याच्या दृष्टिने सोय केलेली आहे. दिवाणखाना, महालातील भिंतीवर, ओसरीवर, मुख्य भिंतीवर, चौकात इत्यादी ठिकाणी सुशोभनासाठी पौराणिक प्रसंगावरील चित्रे काढली आहेत.

या वाडयाच्या भिंतीच्या बांधकामासाठी मातीत चुना, गवत, गूळ, राळ, साबुदाणा, डिंक व सरस वगैरेचा वापर केला आहे. त्यामुळे भिंतीला भेगा पडल्या नाहीत. या वाडयाच्या पायाचे बांधकाम करीत असताना शिशाचा उपयोग केला आहे. दगडाच्या भिंती बांधतांनाही त्यातील सांधे घट्ट होण्यासाठी सांधण्यासाठी शिशाचा रस ओतला आहे.[९५]

**ऐतिहासिक महत्त्व**

नाना फडणिसांनी या वाडयाचा उपयोग त्यांच्याकडे असलेल्या काही मौल्यवान वस्तू, कागदपत्रे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ठेवण्यासाठी केला होता. त्यांचे जतन व संरक्षण त्यांची शेवटची पत्नी जिऊबाईंनी केले. या वाडयातील कागदपत्रे पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये ठेवली आहेत. नाना फडणिस इ.स.१७९१ मध्ये सवाई माधवराव पेशव्यांबरोबर वाईस आले असता त्यांचा मुक्काम मेणवली येथे असल्याची नोंद आहे. तसेच दुसरा बाजीराव याने इ.स.१७९७ मध्ये नाना फडणिसांना बडतर्फ केल्यानंतर ते वाडयात काही दिवस मुक्कामास होते. याशिवाय पहिल्या माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत(१७६१ ते १७७३) त्यांनी वाडयाचे बांधकाम केल्यानंतर सपत्नीक मुक्काम अनेक दिवस केला होता.[९६]

**३.७. ६ अंजिक्यतारा–**

**किल्ल्याची व्युत्पत्ती–**

सातारा शहरास लागून असलेला अंजिक्यतारा किल्ला हा इतिहास प्रसिद्ध आहे. या किल्ल्याचे जुने नाव सप्तर्षी हे होते.[९७] इ.स.११७८ ते ११९३ या कालखंडात राजा दुसरा भोज याचे पन्हाळा किल्ल्यावर राज्य होते. त्यावेळी त्याने जे १५ किल्ले बांधले होते. त्या पंधरा किल्ल्यात सातारा किल्ल्याची नोंद मिळते.[९८] सातारा शहरास या किल्ल्यावरूनच सातारा हे नाव मिळाले आहे. सातारा किल्ल्यास मंगळाई, सप्तर्षी, सतारे, उकाबैन, इसमतआरा, शाहगड व अजीमतारा अशी नावे आहेत. यापैकी पहिली तीन नावे प्राचीन असून उकाबैन नाव बहमनी राज्यातील व त्यानंतरच्या आदिलशाहीतील आहे. इसमतआरा नाव अहमदनगरचा बादशहा हुसेन निजामशहा याची मुलगी व विजापूरचा बादशहा अली आदिलशहा याची बेगम चांदबिबी हिला तिचा वजीर किशवरखान याने इ.स.१५८२ साली सातारा किल्ल्यात कैद करून ठेवले होते. त्यावेळी मिळाले होते. अजीमतारा नाव इ .स. १७०० मध्ये औरंगजेब बादशहाने हा किल्ला जिंकून घेतला. त्यावेळी त्याचा मुलगा अजीमशहा याचे नावावरून दिले आहे.[९९]

प्राचीन काळात आर्यावतात अनेक ऋषी होऊन गेले. या ऋषीपैकी कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी व वसिष्ठ या प्रसिद्ध ऋषींची नोंद सप्तर्षी या नावाने होते. आकाशात दिसणाऱ्या एका सात ताऱ्यांच्या पुंजक्यास त्यांचे सप्तर्षी नाव देण्यात आले आहे. या सात ऋषींच्या सप्तर्षी देवालयावरून किल्ल्यास सप्तर्षी अथवा सात दरे असे नाव पडले

असावे.[१००] सातारा किल्ल्यावर दूधबावी, सागरी सुलतान पीर, मंगळाई, शिवसागर, सप्तऋषी, कोटी व भवानी नावाची सात तळी आहेत. त्यांचाही साताऱ्याच्या उत्पत्तीविषयी संबंध आहे.[१०१]

**किल्ल्याचे वर्णन**

अजिंक्यतारा किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची १०६७ मी. आहे. अजिंक्यतारा किल्ल्याचा पश्चिमेकडे तोंड करून महादरवाजा आहे. या लाकडी दरवाजाची चौकट मजबूत कलापूर्ण आहे. या दगडावर वाली आणि सुग्रीव यांची कथा कोरलेली आहे. या दरवाजातून पुढे आल्यावर दुसरा दरवाजा आहे. तेथे हनुमानाचे मंदिर आहे. तेथून पुढे गडावरील पठार आहे. या पठाराची पूर्व–पश्चिम लांबी १०० मी. आहे. गडावर सभोवती १० फूट रूंदीची भक्कम तटबंदी आहे. गडावर तीन तलाव, विहीर आणि पडक्या इमारती आहेत. त्यामध्ये महाराणी ताराबाईचा वाडा पडलेल्या स्थितीत आहे. या वाडयाजवळ पाण्याचे रांजण आहेत. वाडयाच्या उत्तरेस महादेवाचे, ईशान्येस मंगळाईचे मंदिर चांगल्या अवस्थेत आहे. गडाच्या दक्षिणेस कडेलोटाची जागा, बुरूज व बुलंद दरवाजा आहे. पश्चिमेस विहीर व बांधीव तळी आहेत. आज गडावर वायरलेस यंत्रणा व दूरदर्शनचे टॉवर बसविले आहेत.[१०२]

**ऐतिहासिक महत्त्व**

पन्हाळयाचा राजा दुसरा भोज याच्याकडून हा किल्ला देवगिरीच्या सिंघणदेव यादव राजाने जिंकला. त्यानंतर बहामनी सुलतान मुहम्मदशाह याने इ.स.१३५८ ते १३७५ या दरम्यान जिंकला. पुढील काळात विजापूरच्या आदिलशहाने जिंकला. इ.स.१५७९ मध्ये विजापूर सरदार किशवरखानाने विजापूरची राणी चांदबिबीवर आरोप ठेवून तिला सातारा किल्ल्यावर कैद करून ठेवले.[१०३] परंतु त्याचवर्षी किश्वरखानाचा पाडाव झाल्याने चांदबिबीची सुटका झाली. सन १५९२ मध्ये विजापूरचा वकील दिलावरखान यास सातारा किल्ल्यावर बंदी म्हणून पाठविण्यात आले होते. काही दिवसानंतर तो येथे मरण पावला.[१०४]

विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातून हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी २७ जुलै १६७३ रोजी आपल्या ताब्यात घेतला.[१०५] शिवाजी महाराज आजारी पडले त्यावेळी डिसेंबर १६७५ ते जानेवारी १६७६ या दरम्यान मुक्कामास या किल्ल्यावर होते. या किल्ल्यावरून त्यांनी देशसेवा, अनुष्ठाने व दानधर्म केला.[१०६] जून १६९८ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी

विशाळगड किल्ल्यावरून राजधानी या किल्ल्यावर आणली.[१०७] औरंगजेब बादशहाने दक्षिण मोहिमेत हा किल्ला मुघल साम्राज्यास जोडला. ८ डिसेंबर १६९९ ते २१ एप्रिल १७०० या काळात औरंगजेब बादशहाने या किल्ल्यास वेढा देऊन तो जिंकून घेतला होता.[१०८]

इ.स.१७०६ मध्ये हा किल्ला मराठा प्रतिनिधी परशुराम त्रिबंकने पुन्हा काबीज केला. त्यावेळी महाराणी ताराबाईची सत्ता होती. ८ मे १७०७ रोजी संभाजीपुत्र शाहूची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. तो शिरवळहून सातारा शेजारील चंदन वंदन या किल्ल्यावर आला. तेथून त्याने सातारा किल्ला आपल्या ताब्यात द्यावा असे प्रतिनिधींना सांगितले. त्यावेळी महाराणी ताराबाई प्रतिनिधीकडे किल्ला सोपवून पन्हाळयाकडे निघून गेल्या. त्यावेळी सातारा किल्ल्याचा किल्लेदार वाईचा शेखमिरा होता. तो किल्ला छत्रपती शाहू महाराजांना देण्यास तयार नव्हता म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या मुलास वाईहून पकडून आणून तोफेच्या तोंडी देण्याची धमकी दिली. तेव्हा शेख मिराने प्रतिनिधीस किल्ला छत्रपती शाहूचे स्वाधीन करण्याचा सल्ला दिला. प्रतिनिधीने तो सल्ला न मानल्यामुळे शेख मिराने प्रतिनिधीस पकडून किल्ला छत्रपती शाहू महाराजांच्या स्वाधीन केला.[१०९]

सातारा येथे राजधानी जिंकून घेऊन छत्रपती शाहू महाराज मराठी साम्राज्याचा अधिपती बनले. एवढेच नव्हे तर त्याने माघ शुद्ध १, सोमवार, शके १८२९ म्हणजेच १२ जानेवारी १७०८ रोजी आपला राज्याभिषेक केला. छत्रपती शाहू महाराजांनी सातारा शहर वसविले. नानासाहेब पेशवा इ.स.१७४९ मध्ये साताऱ्यास आले होते. त्यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी नानासाहेबांच्या विरोधकांचे ऐकून त्यांचे प्रधानपद दूर केले होते. परंतु नानासाहेबांची स्वामीनिष्ठा पाहून ते पद पुन्हा दिले.[११०]

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात श्रीपतराव प्रतिनिधींचा मृत्यू २१ नोंव्हेंबर १७४६ रोजी सातारा किल्ल्यावर झाला. छत्रपती शाहू महाराजांचा मृत्यू १५ डिसेंबर १७४९ रोजी सातारा येथील रंगमहालात झाला. ४ जानेवारी १७५० रोजी सातारा गादीवर रामराजा आला. परंतु त्याने पेशव्यांच्या हाती कारभार दिल्याने ही गोष्ट महाराणी ताराबाईला आवडली नाही. तेव्हा महाराणी ताराबाईने २४ नाव्हेंबर १७५० रोजी रामराजास अजिंक्यतारा किल्ल्यावर बोलावून कैद केले. येथे तो बारा वर्षे कैदेत होता. महाराणी ताराबाईच्या संमतीने रामराजाकडून २० जुलै १७६१ रोजी माधवराव पेशव्यास पेशवाईची वस्त्रे मिळाली. याच वेळी आबा पुरंदरे

यास मुतालकीची व सखाराम बापू यास दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली. सातारा येथे १० डिसेंबर १७६१ रोजी महाराणी ताराबाईचे देहावसन झाले. पुढे पेशवा माधवराव यांच्या मृत्यूनंतर १३ डिसेंबर १७७२ रोजी रामराजाने नारायणरावास पेशवाईची वस्त्रे बहाल केली. या वेळी अष्टप्रधान मंडळाचीही वस्त्रे देण्यात आली.[१११]

छत्रपती रामराजाचा मृत्यू ९ डिसेंबर १७७७ रोजी झाला. सातारच्या गादीवर त्याचा दत्तक पुत्र धाकटे शाहुराजे यांना बसविण्यात आले. व नारायणराव पेशव्याच्या मृत्यूनंतर सवाई माधवराव यास पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली. छत्रपती दुसऱ्या शाहूनंतर ४ मे १८०८ रोजी गादीवर छत्रपती प्रतापसिंह महाराज आले. गव्हर्नर एल्फिन्स्टन सातारा येथे १० फेब्रुवारी १८१८ रोजी आला असता ब्रिटिशांनी अजिंक्यतारा किल्ला हस्तगत केला. दुसऱ्या दिवशी एल्फिन्स्टनने दरबार भरवून प्रतापसिंह महाराजांच्या छत्रपती पदाचा जाहीरनामा काढून त्याच्या मदतीस ग्रॅण्ट डफची नेमणूक केली. १३ फेब्रुवारी १८१८ पासून छत्रपती प्रतापसिंह महाराज अजिंक्यतारा किल्ल्यावर राहण्यासाठी गेले. २५ सप्टेंबर १८१८ रोजी छत्रपती प्रतापसिंह महाराज व इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार २३ लाख रूपयांचा महसूल असलेला साताऱ्याचा मुलूख प्रतापसिंह महाराजांच्याकडे ठेवून त्यास ब्रिटिशांनी कडक नियमामध्ये जखडून ठेवले. ६४ लाखाचा पेशव्यांचा मुलूख व २५ लाखांचा जहागिरदारांचा मुलूख ब्रिटिशांनी बळकावला.

पुढे प्रतापसिंह महाराज व ब्रिटिश यांच्यात मतभेद झाले त्यावेळी मुंबईचा गव्हर्नर म्हणून राबर्ट ग्रॅण्ट हा होता. त्याने प्रतापसिंह महाराजांच्या ब्रिटिश निष्ठेबाबत संशय व्यक्त करून त्यावर राजद्रोहाचा खटला भरला. शेवटी ४ सप्टेंबर १८३९ रोजी प्रतापसिंह महाराजांना पदावरून दूर करून त्यांच्या जागी आप्पासाहेबांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी इंग्रजानी आप्पासाहेब महाराजांच्याबरोबर तह करून छत्रपतीचे सर्व अधिकार काढून घेतले. तसेच १६ मे १८४९ रोजी सातारा राज्य दत्तकविधान नामंजूर करून वारसा अभावी खालसा केले.[११२]

**३.७. ७ जुना राजवाडा–**

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी हा राजवाडा इ.स.१८२४ मध्ये बांधला. या वाडयाचा दरवाजा फार मोठा आहे. या वाडयाच्या पहिल्या मजल्यावर सभागृहाच्या भिंती, स्तंभ, खिडक्या, प्रवेशद्वार यावर भित्तिचित्रे काढलेली आहेत. भिंतीच्या वरील बाजूस पिसारा फुलविलेली मोरांची जोडी काढलेली आहे. या वाडयात प्रतापसिंह हायस्कूल भरविले जाते.[११३]

### ३.७. ८ नवीन राजवाडा–

हा राजवाडा आप्पासाहेब महाराजांनी इ.स.१८४४ मध्ये बांधला. या वाडयाच्या पुढील मंडपाची लांबी २५ मीटर, रूंदी १२.५ मीटर व उंची ७.५ मीटर आहे. वाडयात दोन्ही बाजूस दोन कारंजे तयार करण्यात आली होती. छतातील लाकडी वास्यामुळे अकरा खण निर्माण झाले असल्याने सभागृहास अकरा खणी सभागृह असे म्हणतात. सभागृहाच्या दक्षिणेस असलेल्या भिंतीत खिडक्या व प्रवेशद्वार बांधून भित्तिचित्रावर प्रकाशाची योजना केली आहे. तेथून वायूविजनही होण्यास मदत झाली आहे.[११४]

राजवाडयातील भिंतीवर रामायण व महाभारत या महाकाव्यातील अनेक प्रसंगातील चित्रे काढलेली आहेत. ही भित्तिचित्रे वाई व मेणवलीच्या भित्ति चित्रापेक्षा वेगळया शैलीची व त्यानंतरच्या कालावधीतील आहेत. या भित्तिचित्रामधील मांडणी, सामग्री व रेखाटन पूर्ण मराठा शैलीची आहेत. येथील रंगही वाई मेणवलीतील भित्तिचित्रांच्या रंगाप्रमाणे वापरलेले आहेत.[११५]

### ३.७.९ रंगमहाल–

रंगमहाल ही वास्तू अदालतवाडयाच्या पूर्वेस सुमारे २०० मी. अंतरावर आहे. मूळ इमारत ३० मी.लांब व १५ मी. रूंदीची असून नवीन इमारत जोडून बांधली आहे. मूळ इमारत तीन मजली होती. छत्रपती शाहूनी ही रंगमहाल वास्तू १७३४ मध्ये बांधली. छत्रपती शाहूंच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आले आहे. सन १८७४ मध्ये या रंगमहालास आग लागली. त्यामध्ये ही वास्तू भस्मसात झाली होती. ती नंतर दुरूस्त करण्यात आली. छत्रपती शाहू महाराजांचे या वाडयातच निधन झाले. सध्या या इमारतीचा अर्धा भाग कूपर कारखान्याच्या ताब्यात आहे. इमारतीसमोर सेनापतीचा वाडा होता.

रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी केला जात असे. याच्या उत्तरेस मामलेदार कचेरी होती. तिचा पूर्वेचा भाग शिर्के यांच्या मालकीचा होता. सन १८५७ च्या उठावात शिर्के यांच्यांवर आरोप ठेवून ती इमारत सरकारजमा करण्यात आली.[११६]

### ३.७. १० जुने जलमंदिर–

छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी सन १८२४–२५ मध्ये हे जलमंदिर बांधले. ही इमारत एकमजली असून पूर्वी या इमारतीला गोल बंगला म्हणत. या इमारतीत एका खोलीच्या भिंतीत व छतात आरसे बसविले आहेत. तसेच इमारतीच्या सभोवती अनेक कारंजे बसविले आहेत. या इमारतीजवळच एक उद्यान असून त्याच्याजवळ तलाव आहे.[११७]

### ३.७. ११ नवे जलमंदिर

छत्रपती आप्पासाहेब महाराजांनी नवे जलमंदिर इ.स.१८४५ मध्ये बांधले. या नवीन जलमंदिरात एक खोली आहे. या खोलीच्या चारही बाजूस आरसे बसविले आहेत. म्हणून त्याला आरसे महाल असेही म्हणतात. जलमंदिराच्या पाठीमागील बाजूस बदामाच्या आकाराची एक विहीर आहे. या विहिरीत गणपतीची मूर्ती आहे. उत्तरेच्या बाजूस एक मोठी विहिर आहे. तिला बाजीरावाची किंवा पेशव्यांची विहीर असे म्हणतात. या वाडयाजवळ एक भवानीदेवीचे मंदिर आहे. छत्रपतीचे खाजगी दैवत आहे. २३ जुलै १९५२ रोजी जलमंदिरातील ४३५ भार वजनाच्या सोन्याच्या मूर्ती चोरीस गेल्या. नंतर सुमित्राराजे भोसले यांनी चांदीच्या मूर्ती करून त्यांची मंदिरात स्थापना केली.[११८]

### ३.७. १२ श्री.छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय–

या वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीच्या बांधकामास सन १९६६ मध्ये सुरूवात झाली. या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून श्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १३ जानेवारी १९७० रोजी उद्घाटन झाले. हे वस्तुसंग्रहालय पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे नियंत्रणाखाली आहे. या वस्तुसंग्रहालयाचे दोन विभाग असून यामध्ये बहिस्थ विभाग व मराठा आर्ट गॅलरी यांचा समावेश त्यामध्ये होतो. बहिस्थ विभागात शस्त्र विभाग, अभिलेख विभाग, रंगचित्र विभाग व वस्त्र विभाग असे चार भाग पडतात.[११९]

श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामध्ये जाताना मुख्य दरवाजातून आत गेल्यावर नळदुर्ग किल्ल्यावरून आणलेल्या दोन तोफा ठेवलेल्या आहेत. याशिवाय जात्याच्या अनेक चाकापासून सजावट केलेली दिसते. तसेच अनेक शिल्पावशेष व शिलालेख ठेवलेले आहेत. या सर्व वस्तू ३०० ते ४०० वर्षापूर्वीच्या आहेत.[१२०] या संग्रहालयातील विविध विभागाची माहिती पुढीलप्रमाणे–

### ३.७. १२.१ शस्त्र विभाग–

या विभागात प्रवेश करत असताना दरवाजातून आत जाताना दोन्ही बाजूस जय–विजय यांची चित्रे आहेत. या विभागात समोर छत्रपती शिवाजी महाराजांचे राजगड किल्ल्यावरील तख्त आहे. तख्ताच्या पाठीमागे दोन मोरचेल ठेवलेली आहेत. तख्ताच्या दोन्ही बाजूस शामदान ठेवले आहे. पुढील बाजूस ३ फूट उंचीच्या समई ठेवल्या आहेत. तख्ताच्या पाठीमागील खांब लाकडी असून ते जयराम स्वामी वडगाव येथील १७ व्या शतकातील आहेत. या तख्ताच्या पाठीमागील भिंतीवर लावलेले फ्रेंच कलाकाराने प्रथम शिवाजीराजांचे काढलेले तैलचित्र जे 'प्रिन्स ऑफ वेल्स' या मुंबई वस्तुसंग्रहातील प्रतिकृती श्री आठवले गुरूजी यांनी काढलेली आहे.[१२१]

शस्त्र विभागात मराठाकालीन शस्त्रे ठेवण्यात आली आहेत. त्यामध्ये उष्टरनळा, फिलनळा, हातनळा, विविध प्रकारच्या ढाली व तलवारी, विविध प्रकारची कटयारे, दोन प्रकारची शिरस्त्राणे, दोन प्रकारची वाघनखे, विविध प्रकारचे भाले, अंकुश, जांबिया, मानाची चिन्हे, खंजिर, कुकरी, अडकित्ता, शिंगाडा, विविध प्रकारच्या बंदुका, पिस्तुल, चिलखत, बिचवा, रणशिंग, गुप्ती, सोनसळी पट्टे, तोफगोळे, जिरेटोप, जेडची मूठ, संगीन, परशु, गुर्झ व धनुष्यबाण इत्यादी शस्त्रास्त्रे मांडलेली आहेत.[१२२]

### ३.७. १२. २ अभिलेख किंवा व्हरांडा विभाग–

श्री.छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयामधील हा दुसरा विभाग आहे. या विभागात मराठाकालीन राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते. या अभिलेखामध्ये मिनीचर पेंटीग केलेले दिसून येते. हे पेंटीग मराठाकालीन प्राथमिक साधनावर आधारीत आहेत. यावरून मराठाकालीन सत्य माहिती समजण्यास मदत होते. या पेन्टीगमध्ये श्री. शिवराम ज्योतिषी यांनी काढलेली शिवाजी महाराजांची कुंडली, छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे यांच्यापासून ते आजचे श्री.छत्रपती उदयनराजे व श्री.छत्रपती शिवेंद्रसिंह महाराज भोसले यांची वंशावळ, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून मृत्यूपर्यतच्या काळापर्यत घडलेल्या घटना व त्यांनी केलेले पराक्रम याची माहिती व राजमुद्रा यांचा समावेश केला आहे.

या विभागात श्री.बजाबा नेने यांची १८व्या शतकातील काढलेली प्रसिद्ध रेखाचित्रे आहेत. यामध्ये चैत्रगौरीचा पडदा, छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजांच्या जीवनातील

विविध प्रसंगाची छायाचित्रे व किल्ल्याची चित्रे काढलेली आहेत. याशिवाय पुंडलिकाच्या देवालयाचा देखावा, फलटण, आबासाहेब भोईटयांचे हिंगणगाव, माढयाचा किल्ला, लक्ष्मण कुंड, श्रीक्षेत्र रामेश्वर, तिरमळ नायकाचा वाडा, कुरूंदकरांचा वाडा, मधुरा, देवराम बाबा देशमुख यांचा वाडा, जटायु तीर्थ, नरसोबाच्या वाडीचे चित्र व गिरीचा बालाजी इत्यादी चित्रे लावण्यात आली आहेत.[१२३]

### ३.७. १२. ३ वस्त्र विभाग–

या विभागात मराठाकालीन स्त्रिया व पुरूष यांची कपडे ठेवलेली आहेत. स्त्रियांच्या कपडयामध्ये लुगडे, चोळीखण, जरीची साडी सरदार व श्रीमंत स्त्रिया पैठणी, बनारसी साडया वापरीत. इस्लामच्या आक्रमणामुळे क्षत्रियामध्ये पडदापद्धती सुरू झाली व पोलका यांचा समावेश होतो. पुरूषांच्या कपडयामध्ये शेला, पागोटे, फेटे, पगडी, टोपी, अंगात घालण्यासाठी झगा, बाहू आच्छादन, अंगरखा, कुडते व बाराबंदी इत्यादी ठेवलेली आहेत.

याशिवाय या दालनात भांडी व दैनंदिन वस्तू ठेवलेल्या आहेत. यामध्ये ताम्हण, नक्षीचे ताट, लोखंडी पळी, पितळी वॉटरबॅग, दगडी भांडे, पिकदाणी, पितळेचे पेले, पितळेची पिचकारी, मेणबत्तीचे स्टँड, वाटी करंडा, पितळी उदबत्तीचे घर, कुंकवाचा सहावाटी असलेला करंडा, पितळी गौरीचा मुखवटा, नक्षीचे तबक, चुन्याची डबी, गडू, तांब्याचे पाच हंडे, चामडयाची तेलाची बुधली ही गेंडयाच्या कातडीपासून बनविलेली आहे. लामणदिवा, कात्री, तीन धातूचे मोठे हंडे हे १७ व्या शतकातील आहेत. फिरकी, लाकडी डबा, लाकडी बाटली, बांबूची आवरण असलेली अत्तराची बाटली, काचेची अत्तराची बाटली, माकडाचे घर इत्यादी अनेक वस्तू या विभागात ठेवलेल्या आहेत.

या विभागात मनोरंजन व वाद्य साहित्य ठेवले आहे. त्यामध्ये माणिक दशावतारी, सोंगटया, हस्तीदंती फासे, हस्तीदंती, विळा, फासे, लाकडी भोवरे, बुद्धीबळ व गंजिफा, दशावतारी इ. खेळांचे साहित्य ठेवले आहेत. येथे शिक्का व मोर्तब ठेवलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उजव्या हाताचा ठसा ठेवलेला आहे. मराठेकालीन नाणी आहेत. त्यामध्ये शिवकालीन नाणी दाम, होन, शिवराई होन, रूपया, रूका–टका, मोहर, लारी इत्यादी आहेत. याशिवाय छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळातील नाणी ठेवलेली आहेत. तसेच पेशवेकालीन नाणीही आहेत.[१२४]

### ३.७. १२. ४ चित्र विभाग–

श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहातील चित्र विभागात पहिले चित्र हे छत्रपती शाहू महाराजांचे आहे. याशिवाय लघुचित्र शैलीतील संगीत व कला याविषयीची चित्रे आहेत. रागशमिणीची चित्रे असून त्यामध्ये राग गुणकली, भांडे घेतलेली स्त्री, राग आसावरी, राग हमीर, राग केदार इत्यादी चित्रे आहेत. तसेच मराठाकाळात ज्यांनी पराक्रम गाजवला अशा पुरूषांची चित्रे लावलेली आहेत. ही चित्रे रंगीत पारदर्शक चित्रे आहेत. रामायण व महाभारतातील पारंपरिक चित्रे ही चित्रे गोविंद रामचंद्र माटे यांनी काढलेली आहेत. श्री जयराम स्वामींच्या मठातील भित्तिचित्रे ही येथे ठेवण्यात आलेली आहेत. या विभागात काचचित्रे आहेत या चित्रामध्ये व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. तसेच रामायण व महाभारतातील प्रसंग रेखाटलेला आहे.[१२५]

### ३.७.१३ औंध वस्तुसंग्रहालय

सातारा जिल्हयातील खटाव तालुक्यात औंध या गावी यमाई डोंगरावर हे वस्तुसंग्रहालय आहे. हे वस्तुसंग्रहालय बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी सन १९३८ मध्ये बांधले. हे संग्रहालय महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय विभागाच्या ताब्यात आहे. बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी यांनी देशी व परदेशी अमूल्य आणि दुर्मिळ अशा कलाकृती ठेवलेल्या आहेत. त्यामध्ये रंगचित्रे, पाश्चात्य रंगचित्रे, शिल्पाकृती, चंदनी, हस्तीदंती व संगमरवरी कोरीव कलावस्तू ठेवलेल्या आहेत. या चित्रसंग्रहालयात पुढील विभाग आहेत.[१२६]

### ३.७.१३.१ चित्रकला विभाग–

या विभागात बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी स्वतः चित्रांकित केलेली रंगचित्रे आहेत. याशिवाय राज रविवर्मा, पंडित सातवळेकर, मुल्लर हळदणकर, ठाकूरसिंग व बाबूराव पेंटर यांच्या कलाकृती ठेवण्यात आलेल्या आहेत. मोनालिसा रंगचित्राचाही समावेश केलेला आहे. बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी अंजिठा येथील लेणी क्र.१,२,१६ व १७ मधील एकूण ५७ रंगचित्रांच्या प्रतिकृती यांचाही येथे समावेश केलेला आहे.

### ३.७.१३.२ शिल्पकला विभाग–

पाश्चात्य व भारतीय कलाकारांनी तयार केलेल्या ब्राँझ व संगमरवरामधील शिल्पाकृती येथे ठेवलेल्या आहेत. चंदनाच्या व हस्तीदंती कोरीव काम विभागात गुडीयार यांनी चंदनावर

हुबेहुब कोरलेले शिवचरित्र, रामायण, दशावतार, इत्यादी प्रसंग लक्ष वेधून घेतात. तसेच औंधमधील स्थानिक कलाकारांनी संगमरवर व हस्तिदंतावर केलेल्या कोरीव कामाचे नमुनेही येथे ठेवलेले आहेत.

### ३.७.१३.३ कला विभाग

या विभागात भरतकाम, हस्तिदंतावर काढलेली चित्रे व जुनी दुर्मिळ नाणी आहेत. तसेच तांदळाच्या दाण्यावर कोरलेला श्लोक, वेगवेगळया प्रकारची माती वापरून तयार केलेली रंगचित्रे, वल्कल, पितांबर, चांदीच्या पानावर कोरलेले रामायण व महाभारत, मौल्यवान रत्ने, माणकाचा गणपती, नीलमण्यावर कोरलेला कालियामर्दन, पोवळयामध्ये कोरलेले गुलाबाचे फुल अशा अनेक मौल्यवान कलावस्तूंचा संग्रह आहे.

### ३.७.१३.४ चंदनी व हस्तीदंती विभाग–

या विभागात चंदनी लाकूड, हस्तिदंत, संगमरवर यावर केलेले नक्षीकाम ठेवलेले आहे. चंदनी डब्या, चंदनी पेटया, अत्तराच्या पेटया, जाळीदार नक्षी, हस्तिदंताच्या फण्या, कंगवे व भांडयाचे विविध नमुने ठेवलेले आहेत.

### ३.७.१३.५ पुरातत्त्व व पुराभिलेख विभाग

या विभागात मातीची भांडी, हाडांचे सापळे, खेळणी, दागिने, कपडे, जुनी उपकरणे व जहांगीर बादशहाची रत्नजडित काठी इत्यादी वस्तू ठेवलेल्या आहेत. जुने ताम्रपट, शिलालेख, दगडी व लाकडी शिल्पांचे नमुने ठेवलेले आहेत. कांही ताम्रपट मोडी व उर्दुमध्ये आहेत.[१२७]

### ३.७.१४ प्रतापगड

सातारा जिल्हयातील महाबळेश्वर डोंगररांगेत आंबेनळी घाट व पार घाटामध्ये प्रतापगड किल्ला आहे. हा किल्ला भोरप्या नावाच्या डोंगरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५६ मध्ये बांधला. वाई, सातारा व महाड या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याचे बांधकाम करण्यात आले होते.[१२८]

प्रतापगड किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ३५४३ मीटर एवढी आहे. किल्ल्याचा पश्चिम व उत्तर भाग हा अत्यंत निमुळता आणि अंजिक्य आहे. पूर्व व दक्षिणेला प्रचंड खडकांचे कडेकपाऱ्यांनी व विस्तृत ढिगाऱ्यांनी व्याप्त आहे. या बाजूच्या टेकडया अत्यंत निमुळत्या असून घनदाट अरण्यांनी व्यापलेल्या आहेत.[१२९]

**किल्ल्याचे वर्णन**

प्रतापगड किल्ला दोन किल्ल्यांचा मिळून बनलेला किल्ला आहे. हा किल्ला डोंगराच्या शिखरावर असून त्याच्याखाली आग्नेयेला दुसरा किल्ला आहे. प्रतापगड किल्ल्याला चोहोबाजूंनी भिंत असून त्याची उंची डोंगराच्या उंचीनुसार कमी–जास्त आहे. किल्ल्याच्या पश्चिम व उत्तर बाजूला प्रचंड सुळके आहेत. काही ठिकाणी ७०० ते ८०० मीटर खोलीच्या दऱ्या आहेत. दक्षिणेला व पूर्वेला ३० ते ४० फूट उंचीचे घुमट व बुरूज आहेत.

**अ)अफझलखानाची कबर व दर्गा–**

प्रवेशद्वारातून पुढे गेल्यावर उजव्या बाजूला अब्दुल्ला बुरूजाचे बाहेरील बांधकाम दिसते. वरील किल्ल्यावर जाणारा मार्ग शिखरावर सुमारे २००×२०० यार्ड लांबी–रूंदीचा रस्ता आहे.[१३०] किल्ल्याच्या पूर्वेकडील सर्वात बाहेरील भिंती येथे अफझलखानाचे शीर पुरले त्यावरून त्याला अब्दुल्ला बुरूज असे म्हणतात. सन १८९५ मध्ये हैद्राबादच्या निजामाने तेथे एक प्रचंड थडगे बांधले आणि त्याच्याजवळ सय्यद बंडाचे थडगे आहे.[१३१] ते मखमली वस्त्राने सजवलेले आहे. या थडग्याची व्यवस्था अफझलखान स्मृती समितीकडे आहे.

**ब) प्रवेशद्वार–**

या किल्ल्यावरून खालील किल्ल्यात येण्यासाठी दोन प्रवेशद्वार असून त्यातील मुख्य प्रवेशद्वार हे बिनदरवाजाचे आहे. डोंगराच्या पूर्व व दक्षिण बाजूला ३५० यार्ड रूंद असा किल्ल्याचा विस्तार आहे. त्याची दक्षिण बाजूही खडकाळ व अत्यंत निमुळती आहे. पूर्व बाजूला अब्दुल्ला बुरूजाच्या भक्कम बांधकामाच्या बाहेरच्या बाजूचा शेवट होतो.[१३२]

**क) भवानी मंदिर–**

किल्ल्यावर ब्राम्हणांच्या झोपडया असून त्या ठिकाणी भवानी मातेचे मंदिर आहे. त्याचे बांधकाम साधे असले तरी त्याला ऐतिहासिकदृष्टया अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. 'भवानीदेवी' ही भोसल्यांची कुलदेवता होती. तुळजापूर येथील मूळ निवासस्थानावरून प्रतापगडावर तिची स्थापना केल्याच्या संदर्भात समकालीन कागदपत्रात अनेक आख्यायिका आहेत. शिवाजी राजांनी मंबाजी नाईक पानसरे यांना नेपाळ नरेश लालसेन याची भेट घेऊन त्याच्याकडून गंडकीशिळा आणली. नेपाळी मूर्तिकारांच्याकडून अतिशय सुरेख अशी भवानी देवीची मूर्ती घडवून घेतली.[१३३]

या मंदिरात एक सभामंडप व एक गाभारा आहे. सभामंडप लाकडी खांबाचा असून त्याची लांबी ५० मीटर, रूंदी ३० मीटर व उंची १२ मीटर आहे. गाभारा दगडी आहे. गाभाऱ्यात भवानी देवीची गंडकी शिळेची मूर्ती असून ती मौल्यवान अशा रेशमी वस्त्रांनी सजवलेली आहे. मंदिराचे छप्पर आतून सपाट असून बाहेरील बाजूस सातारचे राजा छत्रपती प्रतापसिंह यांनी १८२१ मध्ये शिशाचे आच्छादन घातले आहे.[१३४] या मंदिरात एक शिवलिंग आहे.

**ड) रेडका बुरूज–**

किल्ल्यावर वायव्य बाजूला 'रेडका बुरूज' आहे. त्याठिकाणी दरवर्षी दसऱ्याला महार जातीचे लोक रेडा कापतात. याशिवाय किल्ल्यावर दख्खन बुरूज, यशवंत बुरूज व कडेलोट बुरूज आहेत. बालेकिल्ल्यावर राजवाडा होता.[१३५]

**इ)नगारखाना–**

भवानी देवीच्या मंदिरासमोर नगारखान्याची इमारत आहे. तिचा जिर्णोद्धार सन १९३५ मध्ये करण्यात आला. नगारखान्याच्या जुन्या भागात मोठे नगारे ठेवले आहेत. त्याचबरोबर जुन्या सनया, पदघम, संबळ इत्यादी वाद्येही आहेत. दुसऱ्या भागात अनेक घंटा टांगलेल्या आहेत.

**ई) शिवरायांचा पुतळा–**

छत्रपती शिवाजी महाराजांचा वाडा असलेल्या ठिकाणी ६.०८ मी.उंचीच्या चौथऱ्यावर शिवस्मारक समितीने उभारलेला शिवाजी महाराजांचा ५.१ मी. उंचीचा भव्य ब्राँझचा अश्वारूढ पुतळा आहे. हा पुतळा उभारण्याची कल्पना मुंबई राज्याचे माजी राज्यपाल हरेकृष्ण मेहताबांची होती. त्याचे अनावरण २० नोव्हेंबर १९५७ ला पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हस्ते झाले. तलवार उंच उभारलेला महाराजांचा हा पुतळा अतिशय तेजस्वी वाटतो. सन १९६० मध्ये पुतळयाजवळ एक विश्रामगृह आणि राष्ट्रीय उद्यान उभारण्यात आले आहे.[१३६]

**ऐतिहासिक महत्त्व**

इ. स. ५ ते ७ व्या शतकामध्ये जावळी भागावर राष्ट्रकुटांची सत्ता होती. बहमनी राज्याची पाच शकले झाल्यावर विजापूरचा आदिलशहा युसूफ आदिलखान याने जावळी प्रांतावर मोरे घराण्याची वंशपरंपरागत सत्ता प्रस्थापित केली. पुढे यशवंतराव मोरेच्या काळात हा प्रांत छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५६ मध्ये जिंकून घेतला.[१३७]

महाराणी सईबाई आजारी असताना जुलै १६५९ मध्ये प्रतापगडावर मुक्कामी होत्या. जेधे शकावलीनुसार छत्रपती शिवाजी महाराज त्यावेळी ११ जुलै १६५९ रोजी जावळीत आले होते. सईबाईचा आजार वाढल्याने ते प्रतापगडावर आले व ५ सप्टेंबर १६५९ रोजी सईबाईचे निधन झाल्यावर अंत्यसमयी येथे होते.[१३८]

प्रतापगडाच्या पायथ्याला १० नोव्हेंबर १६५९ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध केला. २५ सप्टेंबर १६७४ रोजी किल्ल्यावर वीज पडून देवीच्या देवळाची पडझड झाली व काही हत्ती-घोडे मरण पावले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी राजांनी १९ मे १६७४ रोजी भवानी देवीच्या दर्शनासाठी प्रतापगडावर आले. यावेळी तीन मण वजनाचे सुवर्णछत्र भवानीदेवीस अर्पण केले.[१३९]

रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला पुढे छत्रपती संभाजी महाराज पन्हाळयावरून सुटका झाली. त्यानंतर पहिल्यांदा प्रतापगडावर येऊन भवानी देवीची पूजा करून १४ जून १६८० रोजी रायगडावर पोहाचले.[१४०] संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मुघलांनी रायगड किल्ल्यास वेढा दिला. तेव्हा येसूबाईने हुशारीने छत्रपती राजारामास रायगडावरून प्रतापगडावर पाठविले.[१४१] तेथून पुढे ते पन्हाळयास निघून गेला. पुढे जिंजीहून छत्रपती राजाराम महाराज महाराष्ट्रात परत आला. त्याने १६९९ मध्ये छत्रपती राजाराम महाराज ताराबाईसह उत्तर कोकणच्या स्वारीवर रवाना झाले. या मोहिमेवरून परत येताना प्रतापगडावर थांबले होते. औरंगजेब बादशहाने पन्हाळा किल्ला काबीज केल्यानंतर सन १७०२ मध्ये विशाळगडची मोहिम हाती घेतल्यामुळे ताराबाई विशाळगडावरून प्रतापगडावर आल्या.[१४२]

नाना फडणीस व महादजी शिंद्यानी सखाराम बापू बोकिलास फितुरीच्या आरोपावरून कैद करून सिंहगडावर ठेवले. परंतु दोन महिन्यांनी म्हणजे मे च्या आरंभी त्यास प्रतापगडावर पाठविले. पेशवाईच्या अखेरीस इंग्रजांनी किल्लेदाराशी गुप्त बोलणी करून १८१८ मध्ये किल्ला रक्त न सांडता ताब्यात घेतला. सातारा काबीज केल्यावर इंग्रजांनी प्रतापगड व त्यावरील भवानीदेवी मंदिर छत्रपती प्रतापसिंहाच्या राज्यात नव्हते. म्हणून छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी मागणी केल्यावर सन १८२३ मध्ये हा किल्ला त्यास दिला.[१४३]

### ३.७.१५ सज्जनगड

सातारा शहरापासून १० कि.मी. अंतरावर परळी गावाजवळ सज्जनगड हा किल्ला आहे. या किल्ल्यास समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्यामुळे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या किल्ल्याचे जुने नाव आश्वालयन गड होते. या किल्ल्यावर आश्वालयन ऋषींचे वास्तव्य होते. म्हणून हे नाव त्या ऋषीच्या नावावरून पडले होते.[१४४] पुढे त्याचे नाव सज्जनगड हे पडले.

**किल्ल्याचे वर्णन**

सज्जनगड किल्ल्यावर रस्त्यावर समर्थ रामदास यांचे शिष्य कल्याण स्वामींचे मंदिर आहे. पुढे मारूती व गोमतीचे मंदिर आहे. किल्ल्यास घडीव दगडाची दोन प्रवेशद्वारे आहेत. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ ३०.४८ मीटर उंचीचे नैसर्गिक कडे आहेत. किल्ल्यावर अनेक पाण्याची तळी आहेत. दरवाज्यात श्रीधर स्वामींनी स्थापन केलेल्या हनुमान व वराहाची मूर्ती आहे. उजव्या भिंतीत अस्पष्ट फारशी भाषेतील शिलालेख आहे. किल्ल्यात प्रवेशद्वाराच्या डाव्या बुरूजाजवळ आंग्लाई देवीचे मंदिर आहे. रस्त्याच्या उजव्या बाजूला दोन कबरी आहेत.[१४५]

पुढे रस्त्यावर मारूतीचे मंदिर असून त्याच्यामागे पाण्याची बारव व समर्थांची कुटी आहे. त्याच्यापुढे समर्थांचा मठ आहे. त्यात समर्थांची समाधी व श्रीराम मंदिर आहे. माची मूळ वास्तू छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधली होती. समर्थ येथे राहत असत. त्यांचे शेजघरात पितळी, समर्थांचे चित्र, खुरांचा पलंग, नित्याच्या वापरातील विविध वस्तू जपून ठेवल्या आहेत. त्यांनी सन १६८२ च्या माघ वद्य प्रतिपदेपासून अन्नपाणी वर्ज्य करून श्रीरामासमोर समाधीस्त झाले. माघ वद्य नवमीस त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्याचा देह या ठिकाणी दहन केल्यावर तेथे समाधी बांधून तेथे पादुकांची स्थापना केली. समाधीवर राममूर्ती बसवून शिष्यांनी त्यावर एक लहानसे देऊळ बांधले होते. छ. संभाजी महाराजांनी त्यावर सभामंडप बांधला आहे.[१४६]

**किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व**

सन १६६२ मध्ये हा किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता त्यावेळी किल्लेदार म्हणून फाझलखान होता. एप्रिल १६७३ मध्ये हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला.[१४७] समर्थ रामदास स्वामी या किल्ल्यावर कायम वास्तव्यासाठी सन १६७३ मध्ये आले. तेव्हा छत्रपती शिवाजी राजांनी हा किल्ला समर्थांना इनाम दिला. युवराज संभाजीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून त्यास समर्थांच्या सान्निध्यात ठेवले होते.[१४८] ३१ डिसेंबर १६७९ ते ४ फेब्रुवारी

१६८० पर्यत शिवाजी महाराज सज्जनगडावर मुक्कामी होते.[१४९] सन १६९९ मध्ये साताऱ्याचा किल्लेदार परशुराम त्र्यंबक प्रतिनिधीने सज्जनगडावरून धान्य, दारूगोळा पाठवून सातारच्या किल्लेदारास मदत केली होती. ९ जून १७०० रोजी हा किल्ला औरंगजेब बादशहाच्या स्वाधीन केला. सन १७०४ मध्ये मराठयांनी हा किल्ला पुन्हा जिंकून घेतला. सन १८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजानी जिंकला. सन १८५७ मध्ये रंगो बापू याने इंग्रजाविरूद्ध बंड करण्याच्या हेतूने या किल्ल्यावरून सुत्रे हलविली होती. परंतु त्याची ही योजना यशस्वी झाली नाही.[१५०]

### ३.७. १६ वैराटगड

वैराटगड हा किल्ला सातारा जिल्हयातील वाई व जावली तालुक्याच्या सरहद्दीवर आहे. हा किल्ला कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यातील पन्हाळयाचा राजा भोज दुसरा(११७८ ते११९३) या दरम्यान बांधला आहे.[१५१] या किल्ल्याच्या सभोवती नऊ मीटर उंचीचा कडा आहे. किल्ल्यावर सर्व बाजूंनी तटबंदी असून तिला ठिकठिकाणी जंग्या आहेत. किल्ल्यावर पडक्या इमारतीचे अवशेष आहेत. १२ मीटर व्यासाच्या दगडी बांधकाम केलेल्या पाच पुष्करिणी आहेत. किल्ल्याच्या बाहेर खडकात खोदलेले टाके आहे. या किल्ल्यावर प्राचीन काळात विराट नावाची रानटी जमात राहत होती. पांडवांनी त्यांना पराभूत केले. या जमातीवरून यास वैराटगड नाव पडले असावे.[१५२]

### ३.७.१७ सदाशिवगड

सातारा जिल्हयातील कराड शहराच्या ईशान्येस ६ कि.मी अंतरावर सदाशिवगड हा किल्ला आहे. हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधला.[१५३] या किल्ल्याचे क्षेत्रफळ ९ हेक्टर एवढे आहे. किल्ल्याचे प्रवेशद्वार उत्तरेच्या बाजूला असून त्याची पडझड झाली आहे. किल्ल्यावर पाणी नसलेली अनेक तळी पाहावयास मिळतात. या किल्ल्याच्या पायथ्याशी बाबरमाची, हजारमाची, राजमाची व गडमाची आहेत. स्वराज्यातील इतर कोणत्याही किल्ल्यावर अशा माची पाहावयास मिळत नाहीत. या माच्यामध्ये त्यावेळचे वतनदार, इनामदारांचे वंशज राहत.[१५४] किल्ल्यावर महादेवाचे जुने लहान मंदिर आहे. शेवटच्या श्रावणी सोमवारी येथे यात्रा भरते.

## ३.८ समारोप

सातारा जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगली कामगिरी बजावली आहे. त्याच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा जिल्हयात स्वराज्याची स्थापना करून स्वराज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले. त्यांना यश मिळवून देण्यासाठी येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी फार मोठे काम केले आहे.

छत्रपती शाहूच्या काळात सातारा ही मराठयांची राजधानी होती. पेशवे जरी पुण्यातून कारभार पाहत असले तरी ते सातारच्या छत्रपतीच्या सल्ल्याने पाहत होते. त्यांना पेशवाईची वस्त्रे ही सातारच्या छत्रपतीकडून दिली जात होती. यावरून सातारा जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व दिसून येते.

## संदर्भ


१) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९, पृ.५९५

२) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, २००१, पृ.४

३) काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९–१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

४) भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ. स.१६०० ते १९००), टि. म. वि. पुणे, एम. फिल. प्रबंध, ऑक्टोबर २००८ पृ.६

५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.४

६) पाठक अरूणचंद्र(संपा.), सातारा जिल्हा गॅझेटियर, १८८५ पृ.१७

७) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, सन १९०१ ते २००१

८) सातारा जिल्हा जनगणना अहवाल, ११९१, २००१

९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.१४, १५

१०) बहुलेकर बाळासाहेब, आपला सातारा, १९९४, पृ.१५

११) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२४४

१२) कित्ता, पृ.२४३

१३) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास खंड–२, १९८५, पृ.३३४

१४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ.२५२

१५) कुलकर्णी पी.के. भारतातील धर्म, १९८७, पृ.६

१६) Gazetter Of Satara District, 1885, P.418-421.

१७) Sensex Of India 1991, Series 14 Maharashtra, Port 4(B)(2) Religion Table C 9, P.127-132.

१८) Sensex Of India 1991, Op. Cit., P.129.

१९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.३००–३०१

२०) कित्ता, पृ.३०१

२१) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृति(त्रैमासिक), पुस्तक ३७ वे, (एप्रिल १९७३), मुंबई, पृ.३८

२२) Gazetter Of Satara District, Opp.Cit, P.551

२३) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतिबंध, सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा, रौप्य महोत्सवी अंक, सातारा, १९८७. पृ.३

२४) पाठक अरूणचंद्र(संपा.),उपरोक्त, १९९९, पृ.७७

२५) कॅनिंगहॅम, स्तुप ऑफ बारहूत, लेख क्र.१३५,१३८ व १३९

२६) पाठक अरूणचंद्र(संपा.),उपरोक्त, १९९९, पृ.८३

२७) Mirashi V.V., The Rashtrakut\s of Manpur, in studies in indology, Nagpur, 1968,Vol.I P.195-205

२८) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख १९७४, पृ.५०

२९) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, १९८५, पृ.१३६

३०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१२०–१२३

३१) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९६३, पृ.७५

३२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड–१, मुंबई १९८८ पृ.१६६.

३३) कित्ता, पृ. २११

३४) पाठक अरूणचंद्र (संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.१५० ते १६०

३५) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, १९८८, पृ.१२१,१२२

३६) मंत्री रमेश, सुंदर सातारा, १९८६, पृ.२६

३७) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, २०११, पृ.११३

३८) दै.ऐक्य, १३ एप्रिल २००८, पृ.४

३९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८८५, ८८६

४०) कित्ता, पृ.८८७

४१) ढेरे रा.चि., शिखर शंगणापूरचा शंभू महादेव, २००१, पृ.८८

४२) शिखर शिंगणापूरच्या मंदिरात दक्षिणेकडील मुख्य मंडपाच्या कठडयावरील नोंदीनुसार

४३) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे, पृ.४६

४४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८८४

४५) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१०३

४६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.७३७

४७) कित्ता, पृ.७३७

४८) कित्ता, पृ.७३७

४९) लांजेकर ज.रा., वाई परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, मार्च २०००, पृ.२०,२१

५०) जगताप बाळासाहेब, श्री क्षेत्र मांढरदेवी वर्णन, १९७६, पृ.७

५१) कित्ता, पृ.९

५२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५०

५३) कित्ता, पृ.८१७,८१८

५४) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.७१

५५) रूद्रभटे दिलीप, दैनिक ऐक्यमधील लेख, १२ एप्रिल १९९२, पृ.५

५६) कित्ता, पृ.१८,१९

५७) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.७७३

५८) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.७३

५९) केळकर य. न., रामशास्त्री प्रभुणे, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल १९९६, पृ.९६

६०) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१९

६१) पाठक अरूणचंद्र(संपा.),सातारा जिल्हा गॅझेटियर, १९६३, पृ.८४५

६२) कित्ता, पृ.८४४

६३) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१८

६४) कित्ता, पृ.१९

६५) पाठक अरूणचंद्र(संपा.),सातारा जिल्हा गॅझेटियर, उपरोेत, १९६३ पृ. ८४८,८४९

६६) बेंद्रे वा.सी., राणी येसूबाई साहेब, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै १९६४, पृ.५६

६७) गर्गे स.मा., छत्रपतींची धाकटी पाती, मराठयांचा इतिहास, खंड–२, १९८५, पृ.१९०

६८) माटे गो. रा., उपरोक्त, पृ.९६

६९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड८, मुंबई १९९२, पृ.१९२.

७०) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५०

७१) सातारा जिल्हा गॅझटियर, १९९९, पृ.८७१

७२) देशपांडे सु. र., 'वाई कला आणि संस्कृती', २०११, पृ.६०

७३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०८

७४) कित्ता, पृ.९०९

७५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९६३, पृ.८५६

७६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.७९६

७७) Gazetter Of Satara District, Opp. Cit., P.531

७८) Ibid, p.531

७९) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.७९७

८०) कित्ता, पृ. ७९७

८१) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१२४

८२) कित्ता, पृ.१२५

८३) सपकाळ सुभाष, निसर्गरम्य–क्षेत्र यवतेश्वर, दैनिक ऐक्य, १० ऑगस्ट, १९९२, पृ.६

८४) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५९

८५) कित्ता, पृ.९०३

८६) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१९

८७) लांजेकर रू. ज., उपरोक्त, पृ.१५

८८) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, २०००, पृ.१३२

८९) लांजेकर रू. ज., उपरोक्त, पृ.१३४

९०) कित्ता, पृ.१५

९१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८५१

९२) प्रा. डॉ. कोरडे डी. डी., “वाई शहराचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००)” पीएच. डी. शोधप्रबंध, टि. म. वि. पुणे, ऑक्टोबर २०१३, पृ. २६३

९३) जोशी ल. बा. (संपा.), ‘मराठी विश्वकोश खंड १२’, पृ.५१४

९४) सातारा जिल्हा गॅझटियर, ‘उपरोक्त’, १९९९, पृ.८५४

९५) देशपांडे सु.र., ‘उपरोक्त’, पृ.८८,८९

९६) कित्ता, पृ. ९७, ९८

९७) पाटणे संभाजीराव, अजिंक्यताऱ्यावरून, अजिंक्य, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३, पृ.५१

९८) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३, पृ.२८

९९) कित्ता, पृ.३८

१००) कित्ता, पृ.४१

१०१) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक१९५४, पृ.१

१०२) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१६

१०३) Joshi P.M.,The Adilshahi and the baridi, History of medival Deccan (1295-1724), Vol.I, P.338

१०४) Ibid, P.341

१०५) सरदेसाई गो.स., उपरोक्त, मराठी रियासत खंड–१, मुंबई १९९२, पृ.३०४

१०६) केपन डेव्हिड, मराठयांची बखर, पृ.७८

१०७) Kulkarni A.R., The Maratha\s, History of medival Deccan, Vol.II, P.591

१०८) सरदेसाई गो. स., उपरोक्त, मराठी रियासत खंड–२, पृ.१५९

१०९) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड ३, पृ.४९,५०

११०) कित्ता, पृ.११६

१११) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड ५, पृ.२९८,२९९

११२) सरदेसाई गो.स., उपरोक्त, खंड ८, पृ.५६६

११३) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०४

११४) कित्ता, पृ.९०४

११५) आपटे बी. के..उपरोक्त, पृ.१०

११६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.९०३

११७) भोसले एस. एच., उपरोक्त, पृ.५२

११८) स्मरणिका, आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका, १९६७, पृ.२४

११९) कित्ता, पृ.२५

१२०) दैनिक लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १२ एप्रिल २००९, पृ.३

१२१) श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा यांची मार्गदर्शक पुस्तिका, पृ.१

१२२) कित्ता, पृ.३

१२३) प्रत्यक्ष पाहणी, सर्वेक्षण व मुलाखत– गोसावी अश्विनकुमार गोसावी, दि.२२.१२.२०१३, स्थळ– श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा, वेळ–३.३० वा.

१२४) मुलाखत– द्रविड मॅडम, दि.२३.१२.२०१३, स्थळ–श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा, वेळ–३.३० वा.

१२५) मुलाखत– शिंदे पी.डी. श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा,

१२६) देशपांडे महेश, उपरोक्त, पृ.१०३

१२७) गायकवाड, हणमाने व सरदेसाई,उपरोक्त, पृ.१७५, १७६

१२८) देसाई रमेश, शिवाजी किल्ल्यांचा शेवटचा रचनाकार, १९९३, पृ.१२१

१२९) मुंबई प्रांत गॅझेटियर, – खंड–१९, पृ.५४५

१३०) शिवचरित्र निबंधावली, पुणे, १९३०, पृ.१५०

१३२) मुंबई प्रांत गॅझेटियर – खंड–१९, पृ.५४५

१३२) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८११

१३३) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड २, पृ.१६८

१३४) जोशी श. ना., शिवकालीन पत्रसारसंग्रह, पृ.२५९९

१३५) पुरंदरे बो. म., प्रतापगड आणि शिवदर्शन, पृ.५४

१३६) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८०४

१३७) कित्ता, पृ.८१२

१३८) गोखले श्री. वि., अफझलखान वध– कार्यकारण मीमांसा, भारतीय इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, जुलै १९६४, पृ.९२,९३

१३९) देशपांडे प्र. न., रायगड दर्शन, १९९३, पृ.९

१४०) गोखले कमल, छत्रपती संभाजी, मराठयांचा इतिहास, खंड १ पृ.३८१

१४१) रायगड जिल्हा गॅझेटियर, १९९३, पृ.८४७

१४२) पवार ज. भा., महाराणी ताराबाई, पृ.१५३

१४३) ठाकरे प्रबोधनकार, प्रतापसिंह महाराज आणि रंगो बापूजी, १९९६, पृ. ९१, ९२

१४४) देवळे शं. रा., महाराष्ट्रातील किल्ले, १९८१, पृ.१५६.

१४५) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९९९, पृ.८९२

१४६) माटे, उपरोक्त, पृ.१११

१४७) जोशी पु. म. मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४, पृ.१६६

१४८) कुलकर्णी गो. त्र्यं., मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४, पृ.२०९

१४९) सरदेसाई गो. स., उपरोक्त, खंड १, पृ.३४०

१५०) पवार जयसिंग, महाराणी ताराबाई स्वातंत्र्य संग्राम, मराठयांचा इतिहास, खंड१, १९८४, पृ.४४४

१५१) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, १९६३, पृ.९२३

१५२) कित्ता, पृ.९२३

१५३) Gazetter Of Satara District, Opp. Cit., P.551

१५४) ढवळे ना.वा., श्रावणातील आकर्षण सदाशिवगड, दैनिक सकाळ (कोल्हापूर), १९ ऑगस्ट १९९२.

# प्रकरण चौथे

# सांगली जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

## ४.१ प्रस्तावना–

सांगली जिल्हयास ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे. सांगली जिल्हयातील ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक दृष्टिनी अनेक स्थळे महत्त्वाची आहेत. सांगली हे शहर ऐतिहासिक व धार्मिकतेच्या दृष्टिने प्रसिद्ध आहे. सांगली जिल्हयातील धार्मिक स्थळे यामध्ये औंदुबर (दत्तमंदिर), गणपती मंदिर सांगली, दंडोबा येथील प्राचीन गुंफा मंदिर, सिद्धनाथ खरसुंडी, रेवणसिद्ध मंदिर रेणावी, भुवनेश्वरी मंदिर भिलवडी, सागरेश्वर, हजरत ख्वाजा शमसुद्दीन मिरासाहेब दर्गा मिरज, बुवाफन बाबा दर्गा मालगाव इत्यादी. सांगली जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे यामध्ये जुना पन्हाळा, गणेश दुर्ग, आयर्विन पुल, मिरजेचा भुईकोट किल्ला, कृष्णा घाट(मिरज), प्रचितगड, मच्छिंद्रगड, सांगलीचे वस्तुसंग्रहालय, कोळदुर्ग, रामदुर्ग, कुंडल लेणी, विलासगड, बहादूरगड इत्यादींनी सांगली जिल्हयाच्या सांस्कृतिक इतिहासात भर टाकलेली आहे. सांगलीस फार प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. सांगली जिल्हयाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सहकार व सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र प्रगती केलेली आहे.

सांगली जिल्हयास प्राचीन काळात राष्ट्रकुट, सातवाहन, वाकाटक, शिलाहार व यादव घराण्यातील राजांनी राज्य केल्याचे अनेक पुरावे मिळतात. मध्ययुगीन कालखंडात देवगिरीचे यादव, सुलतानशाही कालखंडात खिलजी व तुघलकांनी सांगली जिल्हयावर राज्य केले होते. पुढे आदिलशहाने या भागावर राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मिरज काही काळ मराठयांच्याकडे होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर हा प्रदेश मोगलांनी जिंकून घेतला. पुढे पेशवेकाळात सातारच्या छत्रपती शाहू महाराजांनी ३ ऑक्टोबर १७३९ रोजी सांगलीचा प्रदेश मोगलाच्या ताब्यातून जिंकून घेतला व तो प्रदेश साताऱ्यास जोडला. या कालावधीत तेथे अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची निर्मिती झाली.

आधुनिक काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक क्रांतिकारकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांतीवीर जी. डी. लाड, वसंतदादा पाटील, आर. पी. पाटील, गणपतराव कोळी व धोंडीराम माळी यांचा

समावेश होता. या क्रांतीकारकांनी केलेल्या कामगिरीमुळे सांगली जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशावर आलेला आहे. या प्रकरणात  सांगली जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळाची माहिती  दिली आहे.

## ४.२ सांगली जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी–

स्वातंत्र्योत्तर काळात पूर्वीच्या भारतीय मांडलिक संस्थानांचे विलीनीकरण झाले. सन १९४९ मध्ये सातारा जिल्हयाचे उत्तर सातारा व दक्षिण सातारा असे दोन भाग पडले. दक्षिण सातारा जिल्हयाचे मुख्यालय सांगलीला होते. यामध्ये खानापूर, तासगाव, वाळवा व शिराळा पेटा या तालुक्यांचा समावेश होत होता. सन १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना झाल्यावर या जिल्हयाचा तत्कालीन मुंबई राज्यात अंतर्भाव करण्यात आला होता. सन १९५८ मध्ये दक्षिण सातारा जिल्हयातील खानापूर तालुक्यातील एक खेडे कराड तालुक्यात समाविष्ट करण्यात आले होते. २१ नोव्हेंबर १९६० मध्ये उत्तर सातारा जिल्हयाचे नाव सातारा आणि दक्षिण सातारा जिल्हयाचे नाव सांगली जिल्हा असे ठेवण्यात आले. सन १९६१ च्या जनगणनेच्या वेळी सांगली जिल्हयात वाळवे आणि मिरज असे दोन प्रांत निर्माण करण्यात आले होते. त्यावेळी वाळवा प्रांतात खानापूर, शिराळा, वाळवा हे तीन तालुके तर मिरज प्रांतात तासगाव, जत, मिरज असे तीन तालुके निर्माण झाले होते. म्हणजे एकूण सहा तालुके निर्माण झाले होते. पुढे १ ऑगस्ट १९६४ रोजी खानापूर तालुक्यात आटपाडी महाल व मिरज तालुक्यात कवठे महांकाळ महाल असे दोन महसुली विभाग बनवण्यात आले होते. या महालांना सन १९७० मध्ये तालुक्याचा दर्जा देण्यात आला. यामध्ये आणखी पलूस व कडेगाव या तालुक्यांची निर्मिती करण्यात आली. अशा प्रकारे सांगली जिल्हयात एकूण दहा तालुके निर्माण झाले आहेत. ते म्हणजे वाळवा, खानापूर, शिराळा, मिरज, तासगाव, जत, आटपाडी, पलूस, कडेगाव व कवठेमहांकाळ इत्यादी.[१]

### ४.२.१ भौगोलिक विभाग

सांगली जिल्हयाचे प्राकृतिक रचनेनुसार तीन विभाग पडतात. यामध्ये कृष्णा व येरळा नदीचे खोरे, वारणा नदीचे खोरे व पठारी प्रदेश यांचा समावेश होतो. कृष्णा व येरळा नदीच्या खोऱ्यात खानापुर, मिरज, पलुस, तासगाव व वाळवा तालुक्यांचा समावेश होतो. वारणा नदीच्या खोऱ्यात शिराळा तालुका व वाळवा तालुक्याचा काही भागाचा समावेश होतो. पठारी

प्रदेशात आटपाडी, जत, कवठे महांकाळ, कडेगाव व खानापूर या तालुक्यांचा समावेश होतो.[२]

सांगली जिल्हयाच्या मध्य भागात शुक्राचार्य व आडवा डोंगर, होनाई, दंडोबा डोंगर, रामगड व मुचंडी इत्यादी टेकडया आहेत. याशिवाय पश्चिम व दक्षिण बाजूस कृष्णा नदीचे खोरे आहे. पश्चिमेस काळभैरव डोंगर व आष्टा डोंगररांग आहे.[३]

### ४.२.१ क्षेत्रफळ–

सांगली जिल्हयात एकूण ७३१ गावे असून दहा तालुके आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार सांगली जिल्हयाची लोकसंख्या २७,७२,३४८ एवढी होती. यामध्ये १४,१९,९६५ पुरूष व १३,५२,३८३ एवढी स्त्रीयांची संख्या होती. जिल्हयात साक्षरतेचे प्रमाण ८६.७० टक्के आहे. सांगली जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ ८५७५ स्क्वे.कि.मी आहे.[४] सांगली जिल्हयात आष्टा, तासगाव, विटा व इस्लामपूर या नगरपालिका आहेत व सांगली–मिरज–कुपवाड अशी संयुक्त महानगरपालिका आहे.[५]

### ४.२.२ स्थान व सीमा

सांगली जिल्हयाचे भौगोलिक स्थान १६°,४३'' ते १७°,३८'' उत्तर अक्षांश आणि ७३°,४१'' ते ७५°,४१'' पूर्व रेखांशावर आहे.[६] सांगली जिल्हयाच्या पूर्वेस कर्नाटक राज्य आहे. पश्चिमेस रत्नागिरी व कोल्हापूर जिल्हे आहेत तसेच सहयाद्री पर्वतरांग आहे. दक्षिणेस कर्नाटक राज्य व कोल्हापूर जिल्हा आहे. उत्तरेस सातारा व सोलापूर जिल्हे आहेत.[७]

### ४.२.३ हवामान–

सांगली जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भागातील हवामान थंड असून तेथे पाऊसही मोठया प्रमाणावर पडतो. मिरज, वाळवा व शिराळा तालुक्यात जास्त पाऊस पडतो. जिल्हयाच्या मध्यभागी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडतो तर जत, आटपाडी, कडेगाव, कवठेमहांकाळ, खानापूर या तालुक्यात कमी पाऊस पडतो.सांगली जिल्हयाचे किमान तापमान १४.३° व कमाल तापमान ३७.५° इतके आहे.[८]

### ४.२.४ नदीप्रणाली

सांगली जिल्हयात कृष्णा, वारणा, येरळा, मोरणा, माणगंगा, अग्रणी, नन्नी आणि बोर या महत्त्वाच्या नद्या आहेत. त्यातील कृष्णा आणि वारणा या मोठया नद्या आहेत. कृष्णा नदी वाळवा, तासगाव, पलूस आणि मिरज या तालुक्यातून वाहते. तर वारणा व मोरणा, या नद्या

शिराळा व वाळवा तालुक्यातून वाहतात. येरळा नदी तासगाव, खानापूर व मिरज तालुक्यातून वाहते, अग्रणी नदी तासगाव, खानापूर तालुक्यातून नन्नी नदी आणि जत तालुक्यातून बोर नदी वाहते.[९]

सांगली जिल्हयात 'चांदोली' हे धरण वारणा नदीवर बांधले असून ते शिराळा तालुक्यात आहे. 'बलवडी' येथे येरळा, अग्रणी व वज्रचौंडे या नद्यावर धरणे बांधलेली आहेत. या धरणांचा उपयोग प्रामुख्याने शेती उत्पादन वाढविण्यासाठी झालेला आहे. आटपाडी, खंडेराजुरी, लाडंगेवाडी, कुची व अंजनी इत्यादी ठिकाणी तलाव बांधले आहेत. जत, पलुस, कडेगाव, खानापूर, वाळवा व तासगाव येथे पाझर तलावाचे बांधकाम झाले आहे. या तलावामुळे सांगली जिल्हयातील जमिनीचे बहुतांशी क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत झालेली आहे.[१०]

## ४.३ सांगली जिल्हयाची सामाजिक पार्श्वभूमी

सांगली जिल्हयात ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या जिल्हयात हिंदू, मुस्लिम, जैन व बौद्ध इत्यादी धर्माचे लोक राहतात. या जिल्हयातील लोक परंपरेने चालत आलेल्या रूढी, परंपरा व व्रतवैकल्य यास अनुसरून आपले दैनंदिन कामकाज करीत असतात. या लोकांची ग्रामदैवते खंडोबा, विठोबा, शिव, विष्णू, गणेश , भवानी, म्हसोबा, वेताळ इत्यादी आहेत. सांगली जिल्हयातील लोक मराठी भाषेप्रमाणे हिंदी व उर्दु भाषाही बोलतात. मध्ययुगीन काळात सांगली जिल्हयात अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळे निर्माण झाली आहेत. ही स्थळे समाजात स्थिरता असल्याने सुरक्षित राहिली आहेत. आजही या स्थळाचे मोठया प्रमाणावर संरक्षण झालेले आहे.

सांगली जिल्हयातील लोकांचे राहणीमान साधे आहे. त्यांचा आहार शाकाहारी व मांसाहारी असा समिश्र आहे. शहरी भागातील लोक चपाती, वरण, भात, तूप, लोणचे व पापड यांचा रोजच्या आहारात वापर करतात. खेडयातील लोक आपल्या रोजच्या आहारात भाकरी, चपाती, वरण, भात, तूप, लोणचे व पापड, भाज्या, कांदा, ठेचा डाळी व झुणका यांचा वापर करतात. मराठा लोक सण समारंभास गोड जेवण करतात. तर मुस्लिम लोक सण उत्सवाच्या वेळी मांसाहारी जेवण करतात.[११]

सांगली जिल्हयातील पुरूष हे धोतर, अंगरखा, विजार, डोक्यावर टोपी किंवा फेटा घालतात. स्त्रिया लुगडे व चोळी परिधान करतात. लहान मुले विजार, बंडी, आज पुरूष पँट,

शर्ट तर स्त्रिया पंजाबी ड्रेस व आधुनिक फॅशनच्या साड्या वापरतात. लहान मुली परकर व चोळी परिधान करतात.[१२] श्रीमंत लोक घरी असताना सदरा व उपरणे वापरतात, तर घराबाहेर पडताना सदरा, कोट, पागोटे, बाराबंदी, पंचा धोतर, कोपरी, कबजा अंगरखा, शेरवानी डगला व जोडे घालतात. श्रीमंत स्त्रिया रंगीत साडी व पोलके हा पोषाख परिधान करीत असत.[१३] प्रत्येक धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे हे लोक पोषाख परिधान करतात. मुस्लिम लोक शेरवानी व पायजमा परिधान करतात, मुस्लिम स्त्रिया या विशेषतः बुरखा पद्धतीचा वापर करीत होत्या परंतु सध्या ते प्रमाण फारच कमी झाले आहे.[१४]

सांगली जिल्हयातील शेतकऱ्यांची घरे ही दगडांची, कच्च्या विटांची दोन खोल्यांची कौलारू किंवा धाब्याची आहेत. श्रीमंत लोकांची घरे ही वाडयाप्रमाणे असत. आज या सर्व परिस्थितीत बदल झालेला असून ही घरे सिमेंटची बंगलेवजा एकमजली व बहुमजली आहेत. तेथे झोपडीवजा घरे कमी प्रमाणात आहेत. भटक्या जमातीची घरे ही जाडया भरडया कापडाचे लहान तंबु अथवा पाल बांबूच्या कामटयापासून किंवा ताडाच्या झावळयापासून बनविलेली आहेत.[१५]

सांगली जिल्हयात ग्रामीण व शहरी भागात आपापल्या कुवतीनुसार गरीब व श्रीमंत लोक दागदागिने वापरत आहेत. यामध्ये स्त्रीया मंगळसूत्र, नथ, बांगडया, बोरमाळ, ठुसी, जोंधळीहार, चपलाहार, तांदुळीहार, चंद्रहार, बिंदी, जोडवे, बिरोदे, कर्णभूषणे, अंगठी असे अनेक अलंकार वापरतात, पुरूष अंगठी, गळयात चैन, हातात कडी वगैरे दागिने वापरतात.[१६]

### ४.३.१ सण व उत्सव

समाज निर्मितीमध्ये सण समारंभाचे महत्त्वाचे स्थान आहे. सांगली जिल्हयातील लोक बाराही महिने विविध सण व उत्सव मोठया उत्साहाने साजरे करतात. याचे प्रतिबिंब लोकसाहित्यामध्ये सुद्धा पाहावयास मिळते.

#### ४.३.१ .१ गुढीपाडवा

गुढीपाडवा हा सण वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त मानला जातो. या दिवशी नवीन कामाचा आरंभ करतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेचा हा गुढीपाडवा सण संपूर्ण देशभरात उत्साहात साजरा केला जातो.

### ४.३.१ .२ रामनवमी

चैत्र शुद्ध नवमीला दुपारी १२ वाजता राममंदिरात रामजन्मोत्सव हा सण साजरा करतात. प्रतिपदेपासून या उत्सवाला सुरूवात होते.

### ४.३.१ .३ अक्षयतृतिया

हा सण वैशाख शुद्ध तृतियेस येत असून यास साडेतीन मुहूर्तांपैकी यास अर्धा मुहूर्त समजतात. या दिवशी पितराची पूजा करून कलश दान देतात.

### ४.३.१ .४ वटपौर्णिमा

जेष्ट शुद्ध पौर्णिमेस वटपौर्णिमा म्हणतात. हिंदू स्त्रिया या दिवशी उपवास करतात व पतीला दिर्घायुष्य मिळावे म्हणून प्रार्थना करतात.

### ४.३.१ .५ आषाढी एकादशी

आषाढ शुद्ध एकादशीला वारकरी पंथाचे लोक उपवास करतात. कार्तिक एकादशीही अशीच असते. वारकरी पंथाचे लोक पंढरपुरास विठोबाच्या दर्शनासाठी आषाढी व कार्तिकी एकादशीला जातात.

### ४.३.१ .६ बेंदूर

बेंदूर म्हणजे पोळा. हा सण आषाढ शुद्ध त्रयोदशीला साजरा करतात. बेंदराच्या दिवशी बैलांना रंगवून, सजवून त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढतात. त्यानंतर बैलांची व मालकाची ओवाळणी करतात आणि बैलांना पुरणपोळीचा नैवद्य खावयास देतात.

### ४.३.१ .७ नारळी पौर्णिमा

श्रावण शुद्ध पौर्णिमेला नारळी पौर्णिमा म्हणतात. वरूण देवतेची पूजा म्हणून नदी अथवा तलावात नारळ अर्पण करतात.

### ४.३.१ .८ गोकुळाष्टमी

श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माप्रित्यर्थ जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी साजरी करतात. या दिवशी श्रीकृष्णाची पूजा विशेष प्रकारे होते. जन्मोत्सव मध्यरात्री होतो. दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो.

### ४.३.१ .९ गणेशचतुर्थी

भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून गणशोत्सवास प्रारंभ होतो. या उत्सवास धार्मिक तसेच सामाजिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दहा दिवसांच्या या गणेशोत्सवाचे अनंत चतुदर्शीला गणपतीचे विसर्जन करून समाप्ती होते.

### ४.३.१ .१० दसरा

नवरात्रौत्सवाचा प्रांरभ आश्विन शुद्ध प्रतिपदेला होऊन दहाव्या दिवशी म्हणजे दसऱ्याला समाप्ती होते. प्रतिपदेला घटस्थापना करून नऊ दिवस महालक्ष्मीची पूजा करतात. गाव सीमेवर शमी व आपटयाची पाने लुटून सोने म्हणून ते एकमेकांना वाटण्याचा समारंभ होतो.

### ४.३.१.११ दिवाळी

दिवाळी अथवा दिपावली आश्विन महिन्याच्या वद्य त्रयोदशीपासून सुरू होऊन कार्तिक शुद्ध द्वितीयेला संपते. पाच दिवस हा सण मोठया उत्साहात साजरा करतात. धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा किंवा पाडवा आणि भाऊबीज (यमद्वितिया) हे सणांचे पाच दिवस उत्साहाने साजरे होतात.

### ४.३.१ .१२ मकरसक्रांत

सूर्य मकर राशीत सामान्यत: जानेवारीच्या १४ तारखेला प्रवेश करतो. या दिवशी मकरसंक्रात सण साजरा करतात. हा सण एकमेकांना तिळगूळ देऊन साजरा करतात. संक्रातीच्या आदल्या दिवसाला भोगी असे म्हणतात.

### ४.३.१.१३ महाशिवरात्र

माघ वद्य चतुर्दशीला शिवोपासक उपवास करतात. शिवस्तुतीपर भजने म्हणतात. दुसऱ्या दिवशी शिवपूजनानंतर उपवास सोडतात.

### ४.३.१.१४ होळी

फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला रात्री होळीची पूजा केल्यानंतर ती पेटवितात. दुसऱ्या दिवशी धुलिवंदनाचा सण असतो. फाल्गुन वद्य पंचमी हा दिवस रंगपंचमी म्हणून साजरा करतात. तेव्हा एकमेकांवर रंग उडवितात.

हे सर्व सण, उत्सव उत्साहाने व आनंदाने साजरे केले जातात. याशिवाय नाताळ, मोहरम, रमजान ईद, पारशी दिन व बौद्ध पौर्णिमा असे इतर धर्मियांचे सण ही उत्साहात साजरे केले जातात. सण व उत्सवाच्यावेळी सर्व लोक एकत्र येऊन आनंद लुटतात.[१७]

## ४.४ सांगली जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

सांगली जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय इतिहास आहे. प्राचीन काळात सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य व कलचुरी इत्यादी राजवंशाच्या अधिपत्याखाली सांगली जिल्हयाचा भाग होता. मध्ययुगीन काळात सुलतानशाही, मुघल व मराठे यांचे वर्चस्व सांगली जिल्हयावर होते. सांगली जिल्हयातील लोकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसने जे विविध उपक्रम राबविले होते. त्यामध्ये सांगली जिल्हयानेही सहभाग घेतलेला होता. आधुनिक काळात भारताच्या इतिहासात सातारचे प्रतिसरकार जे प्रसिद्ध आहे. ते प्रतिसरकार सांगली जिल्हयात होते.

### ४.४.१ प्राचीन काळ

सांगली जिल्हयातील भाळवणी व देशिंग बोरगांव येथील शिलालेखांत खानदेश, मराठवाडा व विदर्भ या गावाचा उल्लेख आलेला आहे. सांगली जिल्हयात सापडलेल्या ताम्रपटात बंगालमधील गावांचा संदर्भ आहे तसेच कोल्हापूर, मिरज, कराडचा प्रांत किंवा देश म्हणून अनेक ठिकाणी उल्लेख आहे. यावरून प्राचीन काळातील सांगली जिल्हयाचा इतिहास समजण्यास मदत होते.[१८]

महाराष्ट्रावर सातवाहनांची सत्ता होती त्यावेळी सांगली जिल्हयात इ.स.दुसऱ्या शतकात सातवाहन सम्राट गौतमीपुत्र सातकर्णी याचा वारसदार वसिष्ठीपुत्र पुलुमावि याच्या कारकिर्दीतील काही नाणी वाळवे तालुक्यात सापडली आहेत. यावरून सांगली जिल्हयाचा काही भाग सातवाहनांच्या नियंत्रणाखाली होता हे स्पष्ट होते. कोल्हापूर येथील पांडुरंगपल्ली ताम्रपटातील माहितीवरून सांगली जिल्हयात राष्ट्रकुटांचे इ. स.१००४ मध्ये राज्य होते. हे स्पष्ट होते. या ताम्रपटात मानाङ्ःकाचे समृद्ध कुंतल देशाचा अधिपती असे वर्णन आहे.[१९]

राष्ट्रकुट राजांनी माण नदीच्या काठी सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हयाच्या प्रदेशावर आपले राज्य निर्माण केले होते.[२०] पुढे शिलाहार घराण्यातील गौंक या राजाने मिरिंच (मिरज), व करहाटक (कराड) व दक्षिण कोकण हा प्रांत जिंकून घेतला होता.[२१] राजा

गण्डरादित्याच्या शके १०३७ च्या कोल्हापूर ताम्रपटात मिरज देशातील काही गावे दान दिल्याचा उल्लेख आहे. उदा.अंकलखोप, भिलवडी, कुंडल, औदुंबर वगैरे.[२२]

सांगली जिल्हयावर प्राचीन काळात सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, कलचुरी, शिलाहार व यादव इत्यादी राजघराण्याची सत्ता होती. हे स्पष्ट होते.

### ४.४.२ मध्ययुगीन कालखंड

कोल्हापूर ताम्रपटात केलेल्या उल्लेखानुसार शिलाहार घराण्यातील राजा भोज याने कुमार किर्ती नावाच्या जैन भिक्षूला मिरज प्रांतातील कोरंबी हे गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. याशिवाय मिरज प्रांतातील आणखी काही गावांच्या नावाचा उल्लेख आहे.[२३] तेरदाळ येथील शिलालेखात शिलाहार राजा गंगादित्य याने सन १२०५ मध्ये मिरज भागात इसकुडी या गावात तलाव बांधल्याचा उल्लेख आहे.[२४] खिद्रापूरच्या शिलालेखात कोपेश्वर देव मंदिरासाठी यादव राजा सिंघणदेव याने जमीन दान दिल्याची नोंद आहे.[२५]

### ४.४.२.१ सुलतानशाही कालखंड

इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेत यादवावर पहिली स्वारी केली व त्यांना पराभूत केले. या स्वारीमुळेच इस्लामी सत्तेचा दक्षिणेत प्रवेश झाला. यानंतर अवघ्या २५ वर्षात इस्लामी सत्तेने सर्व हिंदू राज्ये नष्ट केली व सर्व दक्षिण त्याने आपल्या वर्चस्वाखाली आणला. सन १३१९ ते १३४७ या दरम्यान सांगली जिल्हयातील काही भागावर खिलजी व तुघलकांनी आपली सत्ता निर्माण केली होती.[२६] पुढे हसन गंगु बहामनी यांने इ. स.१३४७ मध्ये बहामनी साम्राज्याची स्थापना केली. तेव्हापासून दिडशे वर्षे दक्षिण भारतावर त्याची सत्ता होती. त्यांची राजधानी  गुलबर्गा सांगलीपासून पुर्वेकडे केवळ २०० कि. मी. अंतरावर आहे.

बहामनी काळात मिरज हे मुबारकबाद या नावाने ओळखले जात होते. या मिरजवर सन १४२३ साली मलिक इमाद–उल–मुल्क याने सत्ता निर्माण केली.[२७] बहामनीचे शकले पडल्यानंतर सांगली जिल्हा  हा विजापूरच्या आदिलशाहीच्या वर्चस्वाखाली होता. या दरम्यान जतचे डफळे व मुधोळचे घोरपडे ही दोन घराणी उदयास आली.[२८]

### ४.४.२.२ मराठा काळ

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केली. त्यावेळी सांगली जिल्हा विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी १० नोव्हेंबर

१६५९ रोजी आदिलशाही सरदार अफझलखान याचा प्रतापगडाच्या पायथ्याशी वध केला. त्यावेळी लगेचच छत्रपती शिवाजी राजांनी आदिलशाही प्रदेशावर स्वाऱ्या केल्या होत्या. त्यावेळी सांगली जिल्हयातील इस्लामपूर व कामेरी ही गावे जिंकून घेतली होती, सांगली, कुंडल व मिरज ही गावे लुटली होती. स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांनी मिरजेच्या किल्ल्यास वेढा घातला होता. परंतु तो वेढा लवकरच उठवावा लागला होता. मात्र भूपाळगड जिंकण्यात यश मिळवले होते.[२९]

छत्रपती संभाजी महाराज मुघलांना जावून मिळाले होते त्यावेळी दिलेरखान व संभाजीराजे यांनी दक्षिणेत काढलेली मोहीम सांगली जिल्हयातील भूपाळगड, विलासगड, मच्छिंद्रगड, प्रचितगड व या किल्ल्याच्या भोवतालचा परिसर हा सांगली जिल्हा यातीलच आहे. हा सर्व प्रदेश मुघलांच्या ताब्यात गेला होता. याशिवाय मराठयांचे सेनापती प्रतापराव गुजर यांनी आदिलशाही सरदार बहलोलखानाचा पराभव करून उमराणी हे गाव जिंकून घेतले होते. हे गाव सांगली जिल्हयातच आहे.[३०]

सन १६८६ मध्ये औरंगजेब बादशहाने आदिलशाहीचा शेवट केला. त्याच वर्षी बादशहाने मिरजचा किल्ला जिंकून घेतला. या किल्ल्यावर औरंगजेब बादशहाने सन १७०१ मध्ये रमजानचा संपूर्ण महिना मुक्काम केलेला होता. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर (१७०७) मिरज हा प्रांत म्हणून जाहीर करण्यात आला होता. अशाप्रकारे विजापूर विभागात मिरज आणि पन्हाळा असे दोन प्रांत होते.[३१]

सन १७०७ नंतर मुघल साम्राज्यास उतरती कळा लागली होती. त्याचाच फायदा मराठयांनी घेऊन तेथे पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सन १७१६–१७ मध्ये मराठी सरदार उदाजी चव्हाण यांनी सांगली जिल्हयातील बत्तीस शिराळा हा किल्ला ताब्यात घेतला. सन १७१८ मध्ये सिधाजी थोरात याने वडगाव, शिराळा, आष्टा येथे मराठयांचे वर्चस्व प्रस्थापित केले. साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज यांनी सन १७३९ मध्ये अथणी आणि मिरजेचा किल्ला जिंकून घेण्यासाठी मोहिम काढली त्यानुसार श्रीपतराव प्रतिनिधीनी ही ठाणी जिंकली. ३ ऑक्टोबर १७३९ या दिवशी मिरज प्रांतावर छत्रपती शाहूचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. यावेळी मिरज किल्ला शिवाजी साळुंखे यांच्याकडे देखरेखीसाठी सोपविला होता.[३२]

पानिपत युद्धात मराठयांचा पराभव झाला. तेव्हा माधवराव पेशवे यांनी मिरजेचा किल्ला आणि परिसराची जहागिरी गोविंद हरी पटवर्धन यांच्याकडे दिली होती. ती त्यांनी चांगल्या पद्धतीने सांभाळली. पुढे रघुनाथराव व माधवराव पेशवे यांच्यात गृहकलह निर्माण झाला त्यावेळी पटवर्धनांकडून काही काळ जहागिरी काढून घेण्यात आली होती. पटवर्धनांना ही जहागिरी परत देण्यात आली.

### ४.४.२.३ आधुनिक काळ

दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात सन १८०१ मध्ये सांगली हे चिंतामणराव आप्पासाहेब यांचे राजधानीचे ठिकाण बनले होते. यावेळी चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीस राहण्यासाठी आले. पुढे सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठा राज्य जिंकून घेतल्यानंतर त्यांनी तेथील सर्व सरदारांना व जहागिरदारांना नोकरी करण्याचा आदेश दिला. त्यास चिंतामणराव यांनी विरोध केला. त्यांनी ब्रिटिशांना १लाख ३८ हजार ९९५ रूपयांचा मुलूख तोडून दिला. जुलै १८५१ मध्ये चिंतामणराव पटवर्धन यांचा मृत्यू झाला.[३३]

पुढे इ. स.१८७४ ते १८८७ या दरम्यान मिरज हे ठिकाण सदर्न मराठा एजन्सीच्या ताब्यात होते. सन १८७८ मध्ये मेजर वेस्ट हा तेथील प्रशासक होता. सन १९०१ पासून मिरज प्रांताचा प्रशासक ब्रिटिशांऐवजी भारतीय निवडण्यात येऊ लागला. तेव्हा हे पद प्रथमतः अच्युत भास्कर देसाई यांना दिले गेले. सन १९०५ ते १९१० या काळात सांगलीचा प्रशासक म्हणून कॅप्टन बर्क यांची नेमणूक करण्यात आली. त्याने आपल्या कारकिर्दीत सांगली जिल्हयात मोठया प्रमाणावर सुधारणा केल्या होत्या. सन १९१० मध्ये कॅप्टन बर्क यांनी सांगली संस्थानचा कारभार दुसरे चिंतामणराव आप्पासाहेब यांच्याकडे सोपविला. तो त्यांनी इ.स.१९४७ पर्यत सांभाळला होता.[३४]

### स्वातंत्र्य चळवळ

इंग्रजांनी इ.स.१६०० मध्ये पुर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी लंडन येथे ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. इंग्रजांनी प्रारंभी व्यापाराच्या उद्देश्याने भारतात प्रवेश केला असला तरी पुढे राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन भारतामध्ये व्यापाराबरोबरच राजकीय साम्राज्यही निर्माण करण्यास बंगालमध्ये सन १७५७ च्या प्लासीच्या लढाईपासून सुरूवात केली. तर बक्सारच्या लढाईने (इ.स.१७६४) आपली सत्ता स्थिर केली. बंगालबरोबरच पंजाब,

म्हैसूर, अवध व महाराष्ट्र या राज्यातही आपली सत्ता दृढ केली. महाराष्ट्रात इ.स.१८१८ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या काळात पुणे येथील शनिवार वाडयावर युनियन जॅक हा ब्रिटिश ध्वज चढवून सत्तेस प्रारंभ केला. पुण्याबरोबरच सातारा, सांगली, कोल्हापूर या प्रांतातही ब्रिटिशांची सत्ता सुरू झाली. ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानात भक्कम झाल्यानंतर त्यांच्या ताब्यातून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी सन १८८५ पासून जे प्रयत्न झाले. त्यात सांगली जिल्हयानेही सहभाग घेतला होता. वंगभंग आंदोलन भारतात सुरू झाले होते. त्याचे पडसाद सांगली जिल्हयात होऊन परदेशी कापडांची होळी, स्वदेशीला प्रोत्साहन देणे हे कार्यक्रम सुरू होते. दारूबंदीचा प्रचार सर्वत्र सुरू झालेला होता. त्यामुळे तेथे सर्वसामान्यांच्यामध्ये जागृती घडून आली. सन १९०४ पासून सांगली जिल्हयात स्वदेशीचा प्रसार होऊन सर्वत्र खादीचा वापर केला जाऊ लागला. सांगली जिल्हयात स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला त्यावेळी अनेक क्रांतिकारक निर्माण झाले. त्यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतीवीर नागनाथ नायकवडी, क्रांतीअग्रणी भाई जी.डी.लाड, पद्मभूषण वसंतदादा पाटील, देशभक्त आर. पी. पाटील, गणपतराव कोळी, धुळाप्पाणा नवले, बळवंतराव बिरनाळे, रावसो कळके, बाबूजी पाटणकर इत्यादींचा सहभाग होता.[३५]

महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह चळवळीत सांगली जिल्हयातील शिराळा तालुक्याने इतिहास घडविला आहे. बिळाशी येथे सन १९३० च्या सत्याग्रहात अनेक स्वातंत्र्यवीरांनी सहभाग घेतला होता. या लढयासंबंधी इंग्लडच्या पार्लमेंटमध्ये प्रश्नोत्तरे झाली. वाळवा तालुका जंगल सत्याग्रहासाठी गाजला होता. स्वातंत्र्य लढयात सांगली जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला होता. पद्मभूषण वसंतदादा पाटील, वि.स.पागे, क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद भारती, यांच्या सारख्या अनेक क्रांतिकारकांनी या लढयात भाग घेतला. काहीनी बलिदान दिले. क्रांतिसिंह नाना पाटील, पांडू मास्तर आणि त्यांचे सहकारी या क्रांतीकारकांनी अवघा महाराष्ट्र हालविला. ब्रिटिश सत्तेविरूद्ध लढा अधिक तीव्र करून प्रतिसरकाराच्या माध्यमातून ग्रामराज्य व लोकराज्य संकल्पना प्रत्यक्षात राबविली. सर्वसामान्य शेतकऱ्यांना धीर दिला. प्रतिसरकारच्या योजना या गरिबांच्या हिताच्या होत्या. त्यामुळे प्रतिसरकार हे जनमाणसांचे आधारस्तंभ बनले होते. सांगली जिल्हयात स्वातंत्र्य संग्रामात अनेक हुतात्मे झाले. असंख्य स्वातंत्र्य सैनिक होऊन गेले. म्हणूनच या जिल्हयाला स्वातंत्र्य सैनिकांची खाण म्हटले जाते.[३६]

## ४.५ सांगली जिल्हयातील धार्मिक स्थळे

सांगली जिल्हयामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने अनेक धार्मिक स्थळे निर्माण केली आहेत. सांगली जिल्हयात हिंदूची अनेक मंदिरे, मुस्लिमांच्या मशिदी, ख्रिश्चनांचे चर्च, जैन मंदिर व पारशींचे आग्यारी मोठया प्रमाणात आहेत. सांगली जिल्हयात सर्व जाती–धर्माचे लोक राहतात. हे लोक परंपरेने चालत आलेल्या धार्मिक श्रद्धा मानत असल्याने अनेक धार्मिक स्थळे निर्माण झालेली आहेत. ती धार्मिक स्थळे पुढीलप्रमाणे आहेत.

### ४.५ .१ औदुंबर–(दत्तमंदिर)

सांगली जिल्हयात सांगलीपासून २२ कि.मी.अंतरावर पलूस तालुक्यातील अंकलखोप गावाजवळ कृष्णा नदीकाठावर हे दत्तमंदिर आहे. दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख दत्तस्थान श्री दत्तावतार नृसिंह सरस्वतीचे स्थान म्हणून ओळखले जाते. श्री नृसिंह सरस्वतीच्या वास्तव्यामुळे या स्थानास धार्मिक वारसा लाभला आहे.[३७]

श्री नृसिंह सरस्वतींनी सन १८४२ च्या वर्षातील चातुर्मासाचा काळ औदुंबरला घालविला. चातुर्मास संपल्यानंतर ते निघून गेले. मात्र त्यांनी जाताना आपल्या पवित्र पादुका स्वतःच्या हाताने आपल्या बैठकीच्या जागी औदुंबर वृक्षाच्या सावलीत ठेवल्या. जाताना ते म्हणाले की, ‘मी जात असलो तरी या पादुकांच्या स्वरूपात येथे मी निरंतन आहे.’[३८]

औदुंबर याठिकाणी असणाऱ्या उघडया पादुकावर सन १८५० मध्ये अकंलखोपच्या देशपांडे यांनी दत्तदृष्टांत झाल्यामुळे मंदिर बांधले. सन १८६० मध्ये पुण्याचे दत्तभक्त श्री.कृष्णाजी त्रिंबक बापट यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला व सेवेकऱ्यांसाठी धर्मशाळा बांधली. बापट हे सातारा जिल्हयातील वाळवा तालुक्यात मामलेदार होते.[३९] कृष्णेच्या घाटावरील श्री दत्तात्रयांचे मंदिर, ब्रह्मानंद स्वामींचा मठ, श्री भविनेश्वरी देवीचे मंदिर समुहामुळे या परिसराचे महत्त्व वाढले आहे. सन १९०० मध्ये श्री ब्रह्मानंद स्वामीचे शिष्य श्री सहजानंद यांनी आपल्या भक्ताकडून कृष्णा नदीवर घाट बांधला. सन १९२६ मध्ये पुण्याचे परशुराम नारायण रानडे यांनी पुजेचे व देवस्थानचे साहित्य ठेवण्यासाठी देवघर बांधले. सन १९५६ मध्ये मुंबईचे श्री प्रभाकर रानडे यांनी दत्त भक्तांच्या सहकार्याने मंदिरापुढे सभामंडप बांधला. पुण्याचे श्री आबासाहेब मुजुमदार यांनी मंदिराच्या आवारात फरशी बसविली.[४०]

कृष्णा नदी पलिकडे श्री भूवनेश्वरी देवीचे सुंदर मंदिर आहे. देवीची मुर्ती काळया दगडाची असून सुंदर आहे. एक जुनी शिल्पकला म्हणून देवळावरील गोपूर पाहण्यासारखे आहेत. दरवर्षी महाशिवरात्रीस या ठिकाणी मोठी यात्रा भरते. दत्तपादुकावर  दगडी देवालय बांधले असून ते पुर्वाभिमुखी आहे. अंकलखोपचे आण्णासाहेब गोगटे यांनी तेथे फुलबाग लावली. इंदूरच्या राणी साहेबांनी या मंदिरात चौघडयाची व्यवस्था केली होती. बेळगावचे व्यापारी संमत आप्पा यांनी मंदिराच्या भोवताली ओवऱ्या बांधल्या. अंकलखोप ग्रामपंचायतीत एक धर्मशाळा आहे याठिकाणी रामदूत मंडळ ही संस्था अन्नदानाचे काम करीत आहे.[४१]

औदुंबर येथे चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून ज्येष्ठ शुद्ध दशमीपर्यत श्री दत्तमहाराजांच्या पादुकावर गंधलेपन केले जाते. भाद्रपद शुद्ध चतुर्थीस श्रीपाद श्रीवल्लभ जयंती साजरी केली जाते. मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेस दत्तजयंती मोठया उत्साहात साजरी केली जाते. हजारो भाविक यावेळी दर्शनासाठी येतात. विजयादशमीस श्री गुरूंची पालखीतून स्वारी सीमोल्लंघन करते. दर शनिवारी व पौर्णिमेस पालखी व महापूजा असते. येथील पूजाअर्चाचे काम वंशपरंपरेने गार्ग्यगोत्री जोशी घराण्याकडे आहे.[४२]

### ४.५.२ सांगली गणपती मंदिर

माधवराव पेशव्यांच्या काळात मिरजेचा किल्ला व परिसराची जहागिरी गोविंद हरी पटवर्धन यांच्याकडे इ.स.१७६१ मध्ये सोपविली. त्यावेळी मिरजकर पटवर्धनांनी हैदर आणि टिपू विरूद्धच्या मोहिमेत पेशव्यांना मदत केली. मिरज पटवर्धनांचे संस्थान हे मुळचे, नंतरच्या काळातील तासगाव, सांगली, जमखंडी, कुरूंदवाड, बुधगाव व कागवाड अशी अनेक छोटी संस्थाने होती. सांगलीचे पहिले अधिपती श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी सन १८४३ मध्ये हे गणपती मंदिर बांधले. दुसरे बाजीराव पेशवे यांनी मिरज जहागिरीच्या वाटण्या करण्यास परवानगी दिली. यावेळी मिरज व सांगली वाटणीनंतर कै.आप्पासाहेब पटवर्धन हे सन १८०८ पूर्वी सांगलीस आले व सांगली हेच त्यांनी राजधानीचे ठिकाण ठरविले. श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन हे सांगलीला आले त्यावेळी सांगली शहर हे केवळ पाच हजार लोकवस्तीचे लहान गाव होते. ते राजधानीचे ठिकाण केल्याने गणेशदुर्ग किल्ल्याची उभारणी करण्यात आली. त्याचवेळी सन १८११ च्या सुमारास श्री गणपती मंदिराच्या कामास सुरूवात झाली.[४३]

सांगलीत मंदिर बांधण्याचे निश्चित केल्यावर आप्पासाहेबांनी नारायण तात्यासाहेब मिरजकर यांना एक पत्र पाठवून श्री माधवजीच्या देवालयाचा नकाशा पाठविण्यासाठी विनंती केली होती. मिरजेतून नकाशा आल्यावर लगेचच देवालयाचे काम सुरू झाले होते. कामाचा व्याप लक्षात घेऊन मंदिराच्या परिसरात मोठा कारखाना उभा केला असावा. कारण तात्कालींन कागदपत्रात, श्री गणपती देवालयाचे कारखान्याकडे मार्गशीर्ष मास शके १७३२ (१८१०) विद्यमान केसो गणेश खाडीलकर खर्च सर्व हुकेरी, असे लिहीले आहे. यावरून श्री गणपती देवालयाचे कारखान्याकडे अशा शब्दात खर्चाची नोंद आहे. चुना खाणीतील दगड काढण्यासाठी सुरूंगाची दारू व टाक्या तयार करण्यासाठी पोलादाचा खर्च दाखवलेले आहे.[४४]

कृष्णा नदीच्या काठी हे मंदिर बांधलेले असून पूरापासून ते सुरक्षित रहावे म्हणून या मंदिराचा कल्पकतेने उभारणी करणाऱ्यात आली आहे. सर्व मंदिराचा आकार तीस ते चाळीस फूट खोल चुनेगच्चीने भरून कितीही पाणी वाढले तरी ते देवालयात येणार नाही अशी रचना करण्यात आली आहे. श्री गणपती मंदिर हे सांगली संस्थानाचे आराध्य दैवत असून सांगलीकर नागरिकांचे श्रद्धास्थान आहे. केवळ हिंदूच नव्हे तर सर्व धर्मियांची या श्री गजाननावर दृढ श्रद्धा आहे.

कृष्णाकाठावर वसलेल्या सांगलीची जी काही महत्त्वाची वैशिष्टये आहेत. त्यामध्ये सांगलीतील श्री गणपती मंदिर हे एक प्रमुख आकर्षण आणि वैशिष्टय आहे. सांगलीचा गणपती सांगलीचे ग्रामदैवतच आहे. कोणताही नवा उपक्रम किंवा व्यवहारही करावयाचा झाल्यास गणपतीच्या दर्शनाशिवाय होत नाही.[४५]

गणेश मंदिरात रिद्धी-सिद्धी आणि गणेश यांच्यासह सर्व देवतांच्या मुर्ती इ.स. १८४४ मधील आहेत. या मंदिरातील श्री गणपती पंचायतनाच्या पाचही देवांच्या मूर्ती पांढऱ्या संगमरवरी दगडाच्या आहेत. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथे अहिल्याबाई होळकर यांनी आणलेल्या दगडापैकी शिल्लक राहिलेल्या दगड श्री आप्पासाहेबांनी मिळविला व देवालय बांधण्यास सुरूवात केली.[४६]

या मंदिरातील सिंहासन घडविण्यासाठी जोतिबाच्या डोंगरावरील दगड वापरण्यात आलेला आहे. श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांना ब्रिटिश अधिकाऱ्याकडून स्वतःसाठी मिळालेले हिरे, पाचू आणि मोती त्यांनी गणपतीस दिले. या मंदिराच्या शिखरावर कळसासाठी तांबे वापरून त्याला सोन्याचा मुलामा आहे. मंदिरात संगमरवरी दगडाची घडवणूक केली आहे.[४७]

या मंदिराचा परिसर दोन एकराचा असून पंचायतनातील डाव्या बाजूस श्री चिंतामणेश्वरी व लक्ष्मी नारायण हे दैवत सन १८४४ मध्ये श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी स्थापन केले आहे. सुर्यनारायण व चिंतामणेश्वरी ही मंदिरे या परिसरात आहेत. या मंदिरास भव्य कमान, तटभिंत, नगारखाना, प्रशस्त सभामंडप आहे. हे मंदिर ९० फुट लांब व ६० फुट रूंदीचे आहे. या मंदिराचा सभामंडप ४ फुट उंचावर आहे. आठ दगडी खांबावर आधारित ४० बाय ५० चा दोन मजली भव्य सभामंडप आहे. या सभामंडपाचा वरचा मजलाही दगडी बांधकामाचा आहे. सभामंडपानंतर ४ फुट उंचावर ३० बाय २० चा अर्धमंडप व गाभारा आहे. या गाभाऱ्यात श्री गणेशाची मूर्ती असून या मूर्तीच्या बाजूस रिद्धी–सिद्धी असून मूर्ती चतुर्भुज व डाव्या सोंडेची आहे.[४८]

या मंदिराच्या परिसराचा विकास सांगलीतील पटवर्धन राजघराण्यातील राजांनी केला. त्यामध्ये श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी या मंदिराची स्थापना केली. त्यानंतर गादीवर आलेले श्रीमंत धुंडीराज महाराज यांनी या मंदिराचे वैभव वाढविले. त्यानंतर गादीवर आलेले दुसरे चिंतामणराव यांनी सांगलीत विलिंग्डन कॉलेज सुरू केले. तसेच श्री गणपती मंदिराचा सभामंडप बांधला गेला व महाद्वार बांधण्यास सुरूवात केली.

दुसरे चिंतामणराव यांच्यानंतर गादीवर आलेले विजयसिंह पटवर्धन यांनी या मंदिराच्या वैभवात भर टाकली. त्यांनी मंदिरापुढील कारंजे बांधले, पदपथ बनवले आणि उद्याने सुशोभित केली. एकात्मता भवन हा विजयसिंहराजेच्या विचारांचा अविष्कार आहे. आपल्याला अवगत असलेली भाषा समाजातील इतर घटकांना शिकता यावी म्हणून त्यांनी 'एकात्मता भवन' स्थापन केले. त्यामुळे सर्व धर्मियात एकात्मता निर्माण होण्यास मदत झाली आहे. दुतर्फा लाल दगडाचे रस्ते बनविले गेले. रस्त्यात दोन्ही बाजूना हिरवे लॉन व त्यात मोरपंखी झाडांचे सुशोभिकरण करून हा भाग अत्यंत रमणीय केला. विजयसिंह पटवर्धन यांच्या काळात जयपूरमधून लाल दगड मागवून मंदिराचा परिसर लाल दगडात सुशोभित केला. दुतर्फा असलेले रस्ते गोकाकमधून मागविलेल्या लाल दगडानीच बनविले कारण महाद्वाराचा दगडही गोकाकमधूनच आणला होता. या राजाने मंदिरात पावित्र्य व प्रसन्नता वाढविण्यासाठी सर्व शिखरांचा जिर्णोद्धार, जुन्या प्रशासकीय वास्तूंचा जिर्णोद्धार करून सुनीती भवन असे नाव दिले. सांगलीच्या मंदिरात त्यांनी सर्व धर्मातील लोकांना विवाहासाठी समृद्धी मंगल कार्यालय

बनविले. पाणपोई आणि स्वच्छतागृहे बांधली, अन्नछत्र सुरू केले. याशिवाय भक्तजणासाठी वैद्यकीय सल्ला केंद्र व मोफत वैद्यकीय शिबीरे भरविली, दरबार हॉलची पुनर्बाधणी केली. श्रीमंत पहिल्या चिंतामणरावचा १४ फुटी पुतळा उभारला. सांगलीतील जनतेचे श्रद्धास्थान असणारा बबलू हत्ती याच्यासाठी श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन यांनी भव्य अंबरखान्याची आधुनिक पद्धतीने बांधणी केली आहे. असे वेगवेगळे उपक्रम याठिकाणी विजयसिंहराजे यांनी सुरू केले.[४९]

### ४.५.३ दंडोबा येथील प्राचीन गुंफा मंदिर

मिरज तालुक्यातील हे इतिहास प्रसिद्ध गाव आहे. येथे प्राचीन जैन मंदिर तसेच दंडोबा डोंगररांगेतील प्रसिद्ध श्री दंडोबा मंदिर आहे. कौंडिण्यपूरचा राजा हिंगणदेव याने हे मंदिर सन ६८९ च्या सुमारास बांधले असावे, असे म्हटले जाते. हे मंदिर १२०० फुट उंचीवर असून ते १३ व्या शतकात देवगिरीचा यादव राजा सिंघणदेव याने दक्षिण महाराष्ट्रातील स्वारीच्या वेळी बांधले असावे, असे इतिहास तज्ज्ञाचे मत आहे. हे एक गुहा मंदिर आहे. मुख्य मंदिराच्या आवारात गणपती, नंदी, श्री भवानीदेवी, वीरभद्र यांच्या मूर्ती आहेत. या मंदिरावरील कळस व भिंतीचे बांधकाम सांगली संस्थानचे संस्थापक श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी केले आहे. मुख्य मंदिराच्या अनेक लहान मोठया गुफा आहेत.[५०]

या गुफा मंदिरात तीन फुट उंचीची चौकोनी शिवपिंडी असून महिषासुरमर्दिनी, विष्णु आणि इतर देवतांच्या मूर्तीचे काही भग्नावशेष असलेले पाहावयास मिळतात. सभामंडपाच्या प्रवेश द्वारापाशी स्त्री व पुरूष प्रतिमा कोरल्या आहेत. ते द्वारपाल असावेत. येथील एका दगडावर अस्पष्ट शिलालेख कोरलेले आढळतात. त्यापैकी एकावर शके १६९५ म्हणजेच सन १७७३ असा कालनिर्देश आढळतो. तर दुसऱ्या मुर्तीखाली जयाप्पा ताटवटे यांची मुले शिवाप्पा व बाळाप्पा ताटवटे राहणार सानिक सावेमाने राजोजी अशी अलिकडच्या काळात कोरलेली अक्षरे दिसतात.[५१]

या गुहेत एक प्राचीन कन्नड शिलालेख कोरलेला आहे. या लेखावर शके ६११ म्हणजे सन ६८९ असा कालनिर्देश आहे. तसेच श्रीगण राजा असा शब्द कोरलेला आहे. यावरून संशोधकांच्या मतानुसार यादव घराण्यातील सिंघन हा राजा असावा. यावरून हे मंदिर इ.स. ६८९ मध्ये बांधले गेले असा अंदाज काढता येतो.[५२]

दंडोबाच्या मुख्य गुहेशेजारी दुसऱ्या गुहेत जैन तीर्थकरांची भग्न मुर्ती असून त्यावर मोठे जैनमंदिर बांधण्यात आले आहे. अशाप्रकारे या गुंफा म्हणजे जैन साधूंची ध्यानमंदिरे होती हे स्पष्ट होते.[५३]

सांगलीतील पटवर्धन संस्थानाच्या कागदपत्रात या मंदिराचा उल्लेख येत असल्याने या मंदिरावर त्यांची श्रद्धा होती हे स्पष्ट होते. या मंदिराच्या शिखराचे बांधकाम पहिले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या कारकिर्दीत करण्यात आले आहे. या ठिकाणी त्यांचा हत्ती जावा यासाठी हत्तीवाट केलेली दिसते. श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी येथे मोठी यात्रा भरते. अलिकडे शासनाने हे पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे.[५४]

### ४.५.४ सिद्धनाथ खरसुंडी

आटपाडी तालुक्यातील खरसुंडी येथील सिद्धनाथचे मंदिर इतिहास प्रसिद्ध आहे. हे मंदिर अखंड दगडात कोरलेले असून हेमाडपंथी आहे. म्हसवडच्या सिद्धनाथ मंदिराशी याचा संबंध दिलेला आहे. आटपाडी तालुक्यातील चिंचोळी गावचा नायबा गवळी हा भक्त म्हसवडला सिद्धनाथांच्या दर्शनाला नेहमी कावड घेऊन जात असे. तेव्हा चिंचोळी या गावात सिद्धनाथाचे मंदिर बांधले गेले. त्या गावचे नावही बदलून खरसुंडी ठेवण्यात आले.[५५]

या मंदिरास दोन प्रवेशद्वारे व दोन तटभिंती आहेत. प्रवेशद्वाराजवळच एक नगारखाना आहे. या मंदिराच्या प्रांगणात २० ते ३० फुट उंचीच्या ११ दिपमाळा आहेत. दुसऱ्या प्रवेश द्वारातून आत गेल्यावर एक मोठा सभामंडप आहे. या सभामंडपाच्या व गाभाऱ्याच्यादरवाजांना चांदीच्या पत्र्याने मढविले आहे. गाभाऱ्याच्या प्रवेशद्वाराच्या चौकटीवर कीर्तीमुख गणेशपट्टी आहे. गाभाऱ्यात श्रीसिद्धनाथ याचे मुळस्थान आहे. मुख्य गाभाऱ्यात ५० किलो चांदीच्या मखरात श्रीसिद्धनाथ व बाळाईदेवी यांच्या मुर्ती आहेत. पुढे दोन स्वयंभू लिंग असून मंदिरात भव्य गाय असून तिला पितळी पत्र्याने मढविले आहे.

या मंदिरात जात असताना एक विघ्नाची पायरी आहे. ही पायरी सिद्धनाथाला एकूण सात बायका होत्या त्यापैकी सातवी बायको राक्षसी होती. ती येथे गुप्त झाली होती. तिच्या नावावरून या पायरीचे नाव पडले आहे.[५६]

सिद्धनाथाचे मंदिर म्हणजे एक प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. येथील मंदिराच्या दगडावर अप्रतिम कलाकुसर कोरलेली आहे. सिद्धनाथाची यात्रा चैत्र महिन्यात

दुसऱ्या एकादशीला भरते. पौष महिन्यात पौर्णिमेला दुसरी यात्रा भरते. या यात्रेत बलुतेदारांना मोठा मान दिला जातो. त्यावेळी गाय, बैल यांचा मोठा बाजार भरतो. या मंदिराची देखभाल व पुजा–अर्चा करण्यासाठी उपाध्ये, पाटील, भांगे, पुजारी इत्यादी आडनावाचे गुरव मंडळी आहेत.[५७]

### ४.५.५ रेवणसिद्ध मंदिर रेणावी

विटा–जत मार्गावर रेवणसिद्ध घाटामध्ये हे मंदिर आहे.या मंदिराला बाहेरील बाजूने तटबंदी असून हे मंदिर सोळाव्या शतकात बांधलेले आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर नगारखाना बांधलेला आहे. तटबंदीला याशिवाय उजव्या बाजूस आणखी एक लहान दरवाजा आहे. त्याच्याजवळ काही समाधी वृंदावन आणि तीन छोटेखानी मंदिर आहेत. बाहेरच्या बाजूस चार दिपमाळा आहेत. या दरवाज्यातून आत आल्यावर, डाव्या बाजूला काही वीरगळ शिल्प ठेवलेली आहेत. शिवाय मंदिराच्या तीनही बाजूस १६ ओवऱ्या आहेत. हे मंदिर हेमाडपंती शैलीत बांधलेले आहे. त्याला गाभारा आणि मंडप असे दोन भाग असले तरी त्यांना जोडणाऱ्या अंतराळामध्ये डाव्या–उजव्या बाजूला लहान आकाराच्या खोल्या आहेत. त्यापैकी उजव्या बाजूच्या खोलीमध्ये दगडी चौथऱ्यावर चांदी–पितळेचे काही मुखवटे ठेवलेले आहेत. मंडप आणि अंतराळ यांच्या मध्यभागी नंदी स्थापन केलेला आहे. गाभाऱ्यात भव्य शिवलिंग असून त्यावर पितळेचा मुखवटा ठेवलेला आहे.[५८]

रेवणनाथ हे नवनाथापैकी चमस नारायणाचे अवतार यांचा जन्म रेवातीरी झाला. ते तीर्थयात्रा करीत असताना शिखर शिंगणापूरच्या महादेवाचे दर्शन घेतल्यानंतर ते येथे आले. या ठिकाणी येण्याचे कारण हे ठिकाण उंच डोंगरावर असून या ठिकाणाहून शिखर शिंगणापूरचे मंदिर दिसते. हे ठिकाण पाहण्यासाठी दुर्बिणीचा वापर करावा लागतो. रेवणनाथ हे पुढे आपल्या भक्तासाठी खडकात प्रगट झाले. या खडकावर एकून १२ लिंगे आहेत. या ठिकाणी सतत पाणी असते.[५९]

रेणावी गावी असणारे रेवणसिद्ध हे खानापूर तालुक्याचे आराध्य दैवत आहे. येथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.[६०]

### ४.५.६ भुवनेश्वरी मंदिर भिलवडी

भुवनेश्वरीचे मंदिर हेमाडपंथी पद्धतीचे असून ते प्रशस्त व परिसर झाडाझुडपांनी वेढलेला आहे. मंदिरासमोर दोन दीपमाळा व मंदिरापुढे मोठा सभामंडप आहे. या सभामंडपाजवळ मंदिराचा गाभाराही प्रशस्त आहे. या गाभाऱ्यातील देवीची मुर्ती अष्टभुजा, महिषासुरमर्दिनी रूपातील आहे. मूर्तीच्या पाठीमागे पितळी प्रभावळ, समोर दोन उत्सव मुर्ती व दोन पितळी वाघ आहेत. मंदिराच्या आवारात महादेव, भैरव, मारूती व मांतगीदेवी इत्यादी मंदिरे आहेत. सभा मंडपात एक तळघर आहे. येथे ध्यानधारणा केली जाते. ही देवी पुण्याचे देवेकर, कोल्हापूरचे जोशी, हेर्लेकर, आजरेकर जोशी, वडगावकर जोशी, संस्थानिक शिरगुरकर तसेच आंध्रप्रदेश व कर्नाटकातील अनेकांची ही कुलदैवत आहे. तसेच भिलवडीच्या १२ वाडयांची ही ग्रामदेवता आहे.[६१]

भुवनेश्वरी हे पार्वतीचे रूप मानले जाते. भिलवडी येथील कृष्णा नदीच्या परिसरात महिषासुर याने सर्व लोकांना त्रास दिला होता. त्यावेळी त्या महिषासुराचा नाश करण्यासाठी ब्रम्हा, विष्णु आणि महेश यांनी पार्वती देवीकडे साकडे घातले होते. तेव्हा पार्वतीने अवतार घेऊन महिषासुराचा नाश केला. यावेळी कृष्णा देवीने पार्वतीकडे इच्छा प्रकट केली की, तू आता इथेच माझ्याबरोबर राहा. तेव्हापासून पार्वती येथेच भुवनेश्वरी देवीच्या रूपाने राहू लागली.[६२]

भुवनेश्वरी देवीची यात्रा पौष महिन्यात पौर्णिमेला भरते. या यात्रेत उत्सवाचे वेळी भिलवडीचे कै.बाळासाहेब पाटील व चौगुले घराण्याकडे गुलाल टाकण्याचा मान दिला जातो. दर पौर्णिमा व नवरात्र उत्सव यात मोठा उत्सव साजरा केला जातो. तसेच दर मंगळवार व शुक्रवारी देवीला अभिषेक केला जातो.[६३]

### ४.५.७ सागरेश्वर

तासगाव, पलुस, खानापुर व वाळवा या चार तालुक्याच्या सरहद्दीवर सागरेश्वर अभयारण्याशेजारी सागरेश्वराचे मंदिर आहे. हे मंदिर काळया ताशीवर दगडांनी बांधलेले हेमाडपंथी मंदिर आहे. या मंदिराचा गाभारा ६ × ४ फुट लांबी व रूंदीचा तसेच ५ गट ८ इंच उंचीचा आहे. या मंदिराच्या सभामंडपातील खांबावर उलटे नाग कोरले आहेत. या सभामंडपातच एक पितळी मुखवटा आहे. सभा मंडपापुढील गाभाऱ्यात खोलगट भागात एक

शिवपिंडी आहे. येथे जुन्या काळातील दगडी ओवऱ्यांचे काही अवशेष आजही स्पष्ट आहेत. या मंदिराच्या आवारात बारा ज्योतिर्लींग आहेत. तिथेच दोन प्राचीन शिलालेख आहेत. परंतु ते झिजलेले आहेत, त्यामुळे ते वाचता येत नाहीत. तसेच याच ठिकाणी एक धर्मशाळा व जलकुंड आहे.[६४]

सागरेश्वर अभयारण्याशेजारी अनेक मंदिरे आहेत. यामध्ये नागेश्वर, सोमेश्वर, काशी विश्वेश्वर, केदारेश्वर, ओंकारेश्वर, भीमेश्वर, महांकाळेश्वर, नंदिकेश्वर, सिद्धेश्वर, गणपती, अंबाबाई अशी एकूण ४३ मंदिरे आहेत. ही मंदिरे भिल्ल राजा बलिराजा व गिरीराजा यांनी बांधली आहेत.[६५] पुढे या मंदिराचा जिर्णोद्धार म्हासुर्णे ता.खटाव येथील हिंगणदेव राजाने बांधल्याचा असे उल्लेख आहेत.[६६]

या मंदिराची देखभाल व पुजा–अर्चा करण्याचे काम देवराष्ट्रे गावाजवळील शिरगाव येथील श्री हर्षल भालचंद्र गुळवणी यांच्या घराण्याकडे आहे. तसेच महाशिवरात्री व दसऱ्याला जो पालखी सोहळा असतो, त्यामध्ये पालखीचा मान शिरगाव मधील पाटील लोकांना दिला जातो. या मंदिरात दर रविवारी प्रसाद असतो.[६७]

### ४.५.८ हजरत ख्वाजा शमसुद्दीन मिरासाहेब दर्गा मिरज–

देवगिरीच्या यादवाचा अल्लाउद्दीन खिलजी याने पराभव केल्यानंतर महाराष्ट्रात मुस्लिम सत्तेचा दक्षिणेत साम्राज्यविस्तार होऊ लागला याचवेळी हसन गंगु बहामनी याने दक्षिणेत तुंगभद्रा नदीच्या काठी बहामनी शाहीची स्थापना केली. त्यानंतर हसन गंगु बहामनी काही दिवस मिरज शहरात राहीला होता. या वेळी सन १४९३ मध्ये मिरज शहरात सुफी साधुंनी येऊन मीरासाहेब दर्गा बांधला. त्यामुळे पुर्वीचे रहिवाशी असलेले हिंदु व येथे नवीन आलेले मुस्लिम लोक यांच्यातून हिंदु मुस्लिम संस्कृतीचा एक वेगळाच संगम झालेला दिसतो. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणून मिरासाहेब दर्गा हे होय.[६८]

मिरजेच्या या दर्ग्यास चारी बाजूने तटबंदी आहे. या तटबंदीत पुर्वेच्या बाजूस मुख्य प्रवेशद्वार आहे. हा दरवाजा ब्रासच्या पत्र्यापासून बनविला आहे. या दरवाजातून आतमध्ये प्रवेश केल्यावर दोन चौथरे आहेत. समोरच उंचवटयावर दर्ग्याचे बांधकाम केलेले आहे. हा दर्गा आठ मिनाराच्या खांबाच्या चौकोनी बैठकीवर उभारला आहे. या दर्ग्यामध्ये १८×६ लांबी–रूंदीच्या जागेत मिरासाहेब यांचे थडगे व इतर लहान थडगी आहेत.या दर्ग्याच्या पुढे नऊ मिनार आहेत.

तर पाठीमागे मोठी विहीर आहे. या दर्ग्याला लागूनच काही इमारती आहेत. तटबंदीत आणखी काही लहान दरवाजे आहेत.[६९]

हजरत ख्वाजा शमशुद्दीन हे हजरत मंहमद पैंगबरांची शिकवण घेऊन इस्लामचा प्रसार करण्यासाठी १४ व्या शतकात भारतात आले. येथे त्यांनी जो मानव जातीची सेवा करतो तो सर्वश्रेष्ठ होय, अशी शिकवण दिली. तसेच त्यांनी मानवतावादी तत्त्वांचे आचरण करून सामान्य जनतेवर होणारा अन्याय व जुलुम नष्ट केला. गोरगरिबांना सुखाने जीवन जगण्याचा हक्क सुफी संतानी अनेक हालअपेष्टा सहन करुन मिळवून दिला. हजरत ख्वॉजा शमशुद्दीन हे पैंगबरानी दिलेल्या आदेशाचे पालन करणारे सुफी संत होते. या आदेशानुसार त्यांनी मक्का व मदिनेची हज यात्रा केली होती. भारतात त्यांनी सामान्य जनतेवर होणारा अन्याय व जुलुम नाहीशा करण्याचा प्रयत्न केला. पुढे ते बगदाद, दिल्ली, अजमेर, औरंगाबाद, खुल्दाबाद या मार्गाने ते दक्षिण भारतातील मिरज याठिकाणी पोहचले.[७०]

सन १३८४ मध्ये हजरत ख्वॉजा शमशुद्दीन यांचा मिरज येथे मृत्यू झाला. त्यांचे दफन या दर्ग्यामध्ये करण्यात आले. बहामनी सुलतानाने साडेचार लाख रूपये खर्च करून या दर्ग्याचे व त्या पाठीमागील लहानश्या मस्जीदीचे बांधकाम केले.[७१] मिरज येथील या दर्ग्याचा मोठा उरूस २४ रज्जब रोजी साजरा केला जातो. यावेळी या दर्ग्यातील थडग्यावर गलेफ घालण्याचा मान चांभार समाजाकडे वंशपरंपरेने दिला जातो. गलेफ म्हणजे गलांडा नावाच्या जातीची पांढऱ्या फुलांचा हार एकमेकात गुंफून तयार केलेला व थडग्यावर टाकावयाचा मोठा हार होय. हजरत ख्वॉजा शमशुद्दीन यांनी समाजातील सर्व धर्म व जातीच्या लोकासाठी अहोरात्र कार्य केले म्हणूनच त्यांना अल्लाच्या गुप्त अनमोल ज्ञानाचा खजिनाच आहे असे म्हटले जाते. त्यांना कवी मुशर्रक यांनी 'धर्माचा सुर्य' असे म्हटले आहे.[७२]

### ४.५.९ बुवाफन बाबा दर्गा मालगाव

मिरज तालुक्यात मालगाव येथे बुवाफन हा दर्गा मालगाव मिरज रस्त्यावर आहे. हा दर्गा मुघल बादशहा औरंगजेब याच्या कारकिर्दीत बांधला आहे.येथे कार्तिक पौर्णिमेनंतर पहिल्या मंगळवारी मोठा उरूस असतो. या उरूसासाठी हजारो हिंदु व मुस्लिम भाविक गर्दी करतात. हा उरूस दोन दिवस चालतो. त्यामुळे हे धार्मिक ठिकाण हिंदू व मुस्लिम यांच्या धार्मिक ऐक्याचे प्रतीक बनले आहे.[७३]

या दर्ग्याचे बांधकाम चिरेबंदी दगडात केले असून चारी बाजूंनी तटबंदी केलेली आहे. दर्ग्यापर्यंत जाण्यासाठी दोन दरवाजे पार करावे लागतात. दुसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर एक दगडी चौथरा आहे. त्याच्या शेजारील मैदानावर बुवाफन बाबांची समाधी आहे. बुवाफन बाबा यांच्याबद्दल अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. त्यांच्या साक्षात्काराच्या आणि भक्तांना अनुभवाच्या अनेक कथा मालगाव ग्रामस्थ सांगतात. त्यामध्ये एखाद्या स्त्रीला मूल होत नसेल तर नवस बोलले जातात. नवस पूर्ण झाल्यावर स्त्रिया सोने, चांदी, लाकडी पाळणे अर्पण करतात. अशाप्रकारे सर्व धर्माचे ऐक्य साधण्याचा प्रयत्न या देवस्थानामुळे झालेला आहे. या दर्ग्याच्या पाठीमागे एक विहीर असून तिला पवित्र गंगा मानले जाते. या विहीरीतील पाण्याने लोकांचे आजार दूर होतात अशी श्रद्धा आहे.[७४]

## ४.६ सांगली जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे

### ४.६.१ जुना पन्हाळा–

कोल्हापूरच्या पन्हाळगडाशी नामसाधर्म्य दाखविणारा सांगली जिल्हयातील जुना पन्हाळा हा किल्ला आहे. आज या ठिकाणी किल्ला म्हणून कोणतेही अवशेष शिल्लक नाहीत. या किल्ल्यास एकच तटबंदीची भिंत शिल्लक आहे. या किल्ल्याच्या दोन्ही बाजूला दोन मंदिरे आहेत. यातील कुकटोळी गावाच्या बाजूला गिरीलिंग मंदिर आहे. तर गडाच्या दुसऱ्या बाजूला बेळुकी गावाजवळ तीन नैसर्गिक गुहा व शिवमंदिर आहे. ही मंदिरे जांभ्या दगडातील असून हेमाडपंथी शैलीतील आहे. यावरून हे मंदिर १३ व्या शतकाच्या सुमारास बांधले असावे असे वाटते. या मंदिराच्या आवारात मंदिरालगत एक गुहा आहे त्यामध्ये काही चौकोनी खांब व शिवलिंग स्थापन केलेले दिसते. या कातळाखालचा भाग गुहेचाच आहे. त्याला पुढच्या बाजूने भिंती घालून मठ तयार केला आहे. मठासमोर येथील महाराजांचे निवासस्थान आहे.

मुख्य मंदिराला मध्यभागी रंगशिळा आहे. रंगशिळा म्हणजे रंगीत दगडी स्तंभ होय. दर्शनी बाजूच्या भिंतीत आतमध्ये बसण्यासाठी ओठे आहेत. येथील मंडपात गणपती, महिषासुरमर्दिनी, हनुमान, नाग यांच्या मूर्ती आहेत. मंडपापासून एक मीटर उंचीच्या चौथऱ्यावर एका वेगळया गुहेमध्ये गिरिलिंग (शिवलिंग) आहे.[७५]

### ऐतिहासिक महत्त्व

छत्रपती शिवाजी महाराज यांचे काही काळ वास्तव्य या किल्ल्यावर होते. शिवाजी राजांनी अत्यंत अवघड आणि निसर्ग निर्मित तटबंदी, उंच कडा, खोल दरी असलेल्या या किल्ल्यावर पन्हाळागड बांधण्याचा छत्रपती शिवाजी राजांनी मनसुबा रचला होता. हा किल्ला बांधण्यास डोंगराच्या भौगोलिक रचनेची पाहणी कारणीभूत ठरते. तसेच तेथील अनेक गुहा ही महत्त्वपुर्ण आहेत. पाराशर ऋषींचे निवासस्थान म्हणून एक गुहा प्रसिद्ध आहे.[७६]

### ४.६.२ गणेश दुर्ग

सांगली हे ठिकाण राजधानीचे ठिकाण म्हणून निवडल्यानंतर श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांनी गणेश दुर्ग हा भुईकोट किल्ला बांधला. त्यांनी सन १८०२ मध्ये हा किल्ला बांधण्यास सुरूवात केली व सन १८०७ मध्ये या किल्ल्याचे बांधकाम पुर्ण केले. या किल्ल्यात आतमध्ये एक राजवाडा बांधण्यात आलेला आहे. या वाडयाच्या सभोवती तटबंदी व खंदक होते. परंतु ती तटभिंत पडलेली आहे. खंदक बुजले आहेत. त्या ठिकाणी फक्त अवशेष दिसतात.[७७]

गणेश दुर्गाच्या दरवाजास काटे दरवाजा असे म्हटले जाते. या प्रवेशद्वाराच्यावर 'तुमचे स्वागत असो' असे संस्कृत भाषेमध्ये लिहिलेले वाक्य आहे. हा दरवाजा अजुनही चांगल्या परिस्थितीत आहे. या काटे दरवाजाच्या दोन्ही बाजूला जय आणि विजय असे दोन बुरूज आहेत. याशिवाय काटे दरवाजाच्यासमोर श्री.गणेश बुरूज, संगमेश्वर, नाग, कृष्णा, चांद व सीकीचा हे पाच बुरूज आहेत.[७८]

या गणेशदुर्गाच्या तटभिंतीमध्ये काही इमारतीचे अवशेष आहेत. त्यामध्ये कारागृह व पोलिसांची चाळ, पागा व शस्त्रास्त्रे ठेवण्याची इमारत इत्यादी आहेत. गणेशदुर्गाच्या प्रवेशद्वाराजवळ जिल्हा न्यायालय आहे. आतील बाजूस सांगली स्टेट म्युझियम आहे. खरेदी विक्री संघ, विवाह नोंदणी कार्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पटवर्धन हायस्कूल इत्यादी कार्यालये आहेत. याशिवाय आतमध्ये एक शिलेखान चौक आहे.[७९]

### ऐतिहासिक महत्त्व

गणेशदुर्ग येथील वाडयामध्ये श्रीमंत थोरले चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या राजघराण्यातील मंडळी राहत होती. याच राजवाडयात दरबार हॉलमध्ये सांगलीच्या

संस्थानातील प्रजा परिषदेचे कामकाज चालत असे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सन १९४२ च्या चले जाव आंदोलनाच्या वेळी गणेश दुर्गने महत्त्वाची भुमिका बजावली आहे. ती म्हणजे या चळवळीत भूमिगत असलेले वसंतदादा पाटील यांना या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवले होते. तेव्हा त्यानी २४ जुलै १९४३ रोजी आपल्या सहकाऱ्यासह तुरूंगभोवतीच्या तटावरून उडया मारून पलायन केले होते.[८०]

### ४.६.४ मिरजेचा भुईकोट किल्ला

मिरज येथील भुईकोट किल्ला प्राचीन काळातील असून तो कोणी बांधला याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. मात्र या किल्ल्यात असलेल्या शिलालेखावरून असा तर्क काढला जातो की, तो किल्ला शिलाहार वंशीय राजा भोज याने बांधला असावा. तसेच या शिलालेख व ताम्रपटावरून हा किल्ला इ.स.१००० च्या सुमारास किंवा त्यापूर्वीही बांधला गेला असावा असेही अनुमान काढले जाते.

### किल्ल्याचे वर्णन

मिरजेच्या भुईकोट किल्ल्याच्या बाहेर सभोवती खदंक व तटबंदी यामुळे हा किल्ला लष्करीदृष्टया अभेद्य होता. या किल्ल्यास एकूण २७ बुरूज होते. तसेच या किल्ल्यास तीन दरवाजे असून त्यातील पुर्वेच्या बाजूला तोंड करून एक दरवाजा आहे. मिरजेच्या किल्ल्यावर राज्य करणाऱ्या आदिलशाहाच्या राजधानीचे ठिकाण विजापूर हे मिरजेच्या पुर्वेस होते. म्हणून या पुर्वाभिमुखी दरवाजास विजापुर दरवाजा असे म्हणत असत. उत्तरेकडे तोंड असणाऱ्या दरवाजास बंकाचा दरवाजा असे नाव आहे. विजापूर दरवाजापासून जवळच जिभी नावाची मोठी चौकी आहे. जिभी म्हणजे जिभेच्या आकारासारखी मोठी चौकी किल्ला व जिभी यांच्यामध्ये खंदक होता. किल्ल्यातून जिभीवर जाण्यासाठी खंदकावर लाकडी पुल होता. शत्रूचे आक्रमण झाले तर हा लाकडी पुल जाळून टाकण्यात येत असे. किल्ल्याच्या पूर्व व उत्तर बाजूला चौक्या होत्या. त्या चौक्यांना रेवणी असे म्हणत.[८१]

सन १७६२ मध्ये हा किल्ला पेशव्यांनी गोविंद हरी पटवर्धन यांना दिला होता. तेव्हापासून या किल्ल्यावर पटवर्धनांचे वास्तव्य होते. पटवर्धनांनी त्या किल्ल्यावर एक भव्य राजवाडा व दिवाणखाना बांधला आहे. किल्ल्यावर राजवाडयाभोवती भक्कम तटबंदी आहे. या किल्ल्यावर माधवजी देवालय, कृष्णेश्वर मंदिर, श्री गणेश मंदिर, मीरासाहेब यांचा दर्गा हा दर्गा

सन १३५५ मध्ये बांधला गेला असावा. याशिवाय या किल्ल्यावर पंचरसी तोफा करण्याचा कारखाना, मोठा तुरूंग, पागा, सरकारी कचेरी, नरसिंह व मारूती यांची मंदिरे अशा वास्तू होत्या. आज त्याठिकाणी अवशेष पाहावयास मिळतात.[८२]

**किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व**

हसन गंगू बहामनी याने इ.स.१३४६ च्या सुमारास मिरजेवर स्वारी केली. त्याला मिरजेजवळ एक तलाव खोदताना धनाचा साठा सापडला. त्या धनाच्या जोरावर त्याने सैन्याची उभारणी केली आणि मिरजेच्या किल्ल्यावर मोर्चे लावले. या मिरजेच्या भुईकोट किल्ल्याची किल्लेदार राणी दुर्गावती हिने बहामनी फौजेला अतिशय कडवा विरोध केला. मात्र अखेर प्रचंड संख्येने असलेल्या घोडदळ, तिरंदाज आणि हत्ती यांच्या जोरावर बहामनी सैन्याने हा किल्ला जिंकला. राणी दुर्गावती ही देवगिरीच्या यादव घराण्यातील होती. मिरजेचा किल्ला ताब्यात आल्यानंतर त्या विजयाप्रित्यर्थ बहामनी यांनी मिरजेचे नाव मुबारकबाद असे ठेवले.

सुलतान मोहम्मद (इ.स.१४८२ ते १५१८) च्या काळातील बहादूर गिलानी याच्या इ. स.१४९४ मधील फेरस्तीमध्ये मिरजेचा उल्लेख आहे. इ. स.१४९० मध्ये बहामनी साम्राज्याची शकले झाली. त्यात मिरजेचा किल्ला विजापूरच्या आदिलशाहीच्या अखत्यारित गेला. विजापूरचा सुलतान इब्राहिम आदिलशहा पहिला व दुसरा अली अदिलशहा आणि इब्राहिम आदिलशहा यांच्या कारकिर्दीत मिरजेचा किल्ला आदिलशाहीकडे होता.

विजापूरचा सरदार अफझलखान याच्या वधानंतर अठरा दिवसांत छत्रपती शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून अण्णाजी दत्तो यांनी पन्हाळा किल्ला सर केला. तर सेनापती नेताजी पालकर यांना मिरजेच्या स्वारीवर पाठवले. जानेवारी १६६० मध्ये स्वतः महाराज मिरजेत आले आणि किल्ल्याला दिलेल्या वेढयाचे नेतृत्त्व करू लागले. त्यावेळी दोन ते तीन महिने तो वेढा सुरू होता. याच दरम्यान विजापूरमधून सिद्दी जोहर आणि फाजलखान हे दोघे मोठा फौज–फाटा घेऊन स्वराज्यावर चालून आल्याची खबर मिळाली. त्यामुळे मिरजेचा वेढा उठवून महाराज तातडीने पन्हाळागडाकडे रवाना झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत मात्र मिरजेचा किल्ला सेनापती संताजी घोरपडे यांच्या ताब्यात होता. त्यावेळी मोगल बादशहा औरंगजेब स्वतः पश्चिम महाराष्ट्रात तळ ठोकून होता. इ. स.१६८७ मध्ये विजापूरची आदिलशाही जवळजवळ संपुष्टात आली. त्यामुळे

औरंगजेब बादशहाने आपले लक्ष या किल्ल्याकडे वळविले. त्यानंतर मिरज आणि मिरजेचा किल्ला हा मराठयांच्या हातून सन १६८७ मध्ये मोगलांच्या ताब्यात गेला. सन १७०१ बादशहा औरंगजेब आणि त्याच्या फौजेचा तळ तब्बल महिना ते दिड महिना मिरजेजवळच्या मोकळया मैदानावर होता. छत्रपती शाहू महाराजांनी साताऱ्यात साम्राज्य स्थापन केले. त्यानंतर स्वतः छत्रपती शाहू महाराज मिरजेत आले आणि त्यांच्या नेतृत्त्वाखाली मराठा सैन्याने मिरजेच्या किल्ल्याला वेढा दिला. ३ ऑक्टोबर १७३९ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी मिरजेचा किल्ला जिंकून घेतला. तेव्हापासून तो मोगलाच्या ताब्यातून स्वराज्यात सामील झाला.

इ. स.१७६१ मध्ये माधवराव पेशवे यांनी मिरजेचा किल्ला व काही ठाणी ही सरदार गोविंदराव पटवर्धन यांच्या सैन्याची देखभालीसाठी त्यांना बहाल केली. पेशव्यांनी हैदर आणि म्हैसूरचा टिपू सुलतान याच्यावर जेव्हा स्वारी केली, त्यावेळी गोविंदराव पटवर्धन फौजेसह मिरजेतून जाऊन त्या स्वारीत सामील झाले होते.[८३]

### ४.६.६ प्रचितगड

#### किल्ल्याचे वर्णन

सांगली जिल्हयातील शिराळा तालुक्यात प्रचितगड हा किल्ला आहे. एका टोकाला घनदाट अरण्य आणि दुसऱ्या टोकाला खोल दऱ्या यामुळे हा किल्ला दुर्गम बनला आहे. हा गड चढण्यास व उतरण्यास अतिशय अवघड असल्याची प्रचिती शत्रूला येत असल्याने या किल्ल्याला प्रचितगड असे नाव पडले असावे. हा किल्ला चांदोली अभयारण्यात असल्याने तेथे गवा, रानडुक्कर, अस्वल, गेंडा, सांबर, साळींदर, बिबटया व पट्टेवाला वाघ अशी वन्यजीव वावरताना दिसतात.[८४]

प्रचितगड किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ९७१ मीटर आहे. या किल्ल्याच्या तिन्ही बाजू तासलेल्या कडयाप्रमाणे असून याची उत्तरेकडील बाजू सहयाद्रीच्या मुख्य रांगेला चिकटलेली आहे. या गडावर जाण्यासाठी पाच मार्ग आहेत. प्रचितगडाच्या प्रवेशद्वाराचा उजवीकडील बुरूज व त्याच्या शेजारील दगडी खांब एवढेच अवशेष आज तेथे पाहावयास मिळतात. गडावर वाडयांचे व घरांचे अवशेष पाहावयास मिळतात. तेथेच एका घुमटीमध्ये भवानी देवीच्या मूर्तीसह आणखी दोन मूर्ती आहेत. या भवानी मंदिराच्यासमोर प्रचितगडाच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या चार तोफा ठेवलेल्या आहेत.

प्रचितगडावर पूर्व दिशेला खडकात खोदलेल्या पाच पाण्याच्या टाक्या आहेत. त्यातील एका टाकीचे तोंड उघडे असून त्यात आत उतरण्यासाठी पायऱ्याही आहेत. या टाक्याचे पाणी खडकातून पाझरणारे असल्याने स्फटिकासारखे शुभ्र व थंडगार आहे. तसेच गडावर दारूचे कोठाराची छत नसलेली इमारत आहे. या गडाचा कोकणाकडील जो उतार आहे. तेथे खडकात खोदलेला एक बुरूज आहे. या समोरच एक सुळकेवजा भाग आहे. त्यास 'वांदरटेंभा सुळका' असे म्हणतात.[८५]

## किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

प्रचितगड कोणी बांधला याबाबत इतिहासात नोंद नाही. पण या किल्ल्याची कातळकोरीव टाकी, बुरूज पाहता याची बांधणी शिवपूर्वकालात झाली. या गडावरून एकाचवेळी कोकण, सातारा व कोल्हापूरकडील हालचालीवर लक्ष ठेवता येत असे.

सन १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी दाभोळ जिंकले त्यावेळी तेथील आदिलशाही सरदार जसवंतराव हा पळून शृंगारपूरच्या सुर्वेच्या आश्रयास आला. शिवकाळात शृंगारपूर गाव प्रसिद्ध होते. तेथे सूर्यराव सुर्वे हा राज्य करीत होता. प्रचितगडावर त्यांची हुकमत होती. छत्रपती शिवाजी राजांनी सूर्यराव सुर्वेस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. जसवंतरावास आपल्या ताब्यात देण्यास सांगितले परंतु तो दाद देत नाही हे पाहून छत्रपती शिवाजी राजांनी २९ एप्रिल १६६१ रोजी शृंगारपूर जिंकून घेतले. त्याचवेळी प्रचितगडही स्वराज्यात सामील केला.

सन १६६४–६५ मध्ये पिलाजी शिर्के यांची कन्या येसूबाई हिचा विवाह छत्रपती संभाजी राजांशी झाला. छत्रपती शिवाजी महाराज १ नोव्हेंबर १६७६ रोजी कर्नाटक मोहिमेवर गेले त्यावेळी छत्रपती संभाजी येसुबाईसह शृंगारपूर येथे दोन वर्षे मुक्कामी होते. त्यावेळी त्यांचा प्रचितगडासी कितीतरी वेळा संबंध आलेला होता. या मुक्कामात त्यांनी 'बुधभूषणम्' हा ग्रंथ लिहीला. पुढे १६८८ साली शिर्केनी छत्रपती संभाजी महाराजांच्याविरूद्ध बंडखोरी केली. छत्रपती संभाजी राजांनी त्यांचा पराभव करून रायगडला जाताना वाटेत संगमेश्वर येथे मुक्काम केला. दुर्दैवाने शिर्केच्या फंदफितुरीमुळे मुकर्रबखानाने संगमेश्वरला संभाजीराजांना कैद केले. पुढे सन १७१२ मधील छत्रपती शाहू महाराज व रामचंद्रपंत अमात्य यांच्या करारात प्रचितगडाचा उल्लेख आला आहे.[८६]

उत्तर पेशवाईच्या काळात चतुरसिंगाने १८१५ च्या सुमारास प्रचितगड ताब्यात घेतला आणि त्याच्या आधाराने त्याने आजूबाजूच्या प्रदेशावर ताबा ठेवला. पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिशांनी प्रचितगडावर विशेष मोहिम काढली. यावेळी कर्नल कनिंगहॅम आणि कॅप्टन स्लिपर यांनी प्रचितगडाच्या जवळ लांब पल्ल्याच्या तोफा चढवल्या. तोफगोळयाचा भेदक मारा करून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी चतुरसिंगास शरण येण्यासाठी आवाहन केले. मात्र चतुरसिंगाने बंदुकीच्या साहाय्याने ब्रिटिशांना चोख प्रत्युत्तर दिले. शेवटी १० जून १८१८ रोजी किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला. ब्रिटिश सैनिक किल्ल्यात घुसून चतुरसिंगास कैद केले. प्रचितगड किल्ला ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतला.[८७]

### ४.६.७ मच्छिंद्रगड

मच्छिंद्रगड किल्ला सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यात असून कमळभैरवाच्या एक वाटोळया टेकडीवर उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी १० नोव्हेंबर १६५९ रोजी अफझलखानाचा वध केल्यानंतर १३ नोव्हेंबर १६५९ ते १५ फेब्रुवारी १६६० च्या दरम्यान मच्छिंद्रनाथ डोंगर जिंकून घेतला. असा उल्लेख जेधे शकावली व कवी परमानंदाच्या शिवभारत यामध्ये आला आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराज पन्हाळयाच्या वेढयात अडकले असताना सिद्दी जोहरने मराठयांनी जिंकलेल्या मच्छिंद्रनाथ डोंगर व मुलूखावर पुन्हा आदिलशाहीचे वर्चस्व निर्माण केले. चिटणीस बखरीमध्ये असा उल्लेख आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील निंबाळकर व घाटगे हे सरदार पुंडपणा करत होते तेव्हा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सन १६७०–७१ मध्ये मच्छिंद्रगड हा नविन किल्ला बांधला. यावरून हा किल्ला शिवकाळात बांधला.[८८]

#### किल्ल्याचे वर्णन

मच्छिंद्रगडाचा माथा आकाराने लहान आहे. तरीही किल्ल्यावर वास्तू भरपूर आहेत. या वास्तूमध्ये मच्छिंद्रनाथ मंदिर, राम मंदिर, चोखामेळा यांचे स्मारक इत्यादी आहेत. तर या गडावरील मुख्य मंदिर मच्छिंद्रनाथाचे आहे. अलिकडच्या काळात या मंदिराचा जिर्णोद्धार केलेला असून त्याला आतून रंग लावलेला आहे. याच्या मंडपामध्ये पूजेच्या साहित्याचे दुकान आहे. तर गाभाऱ्यात, मध्यभागी मच्छिंद्रनाथांचा मुखवटा आहे. एक मीटरच्या चौथऱ्यावर चांदीच्या प्रभावळीत हा पितळी मुखवटा स्थापन केलेला आहे.

मंदिराच्या प्रांगणात समोरच्या बाजूला दोन लहान तोफा आहेत. त्या निम्म्यापेक्षा जास्त जमिनीत उभ्या पुरलेल्या आहेत. त्यातील एका तोफेजवळ होमकुंड आणि काही भग्न मूर्ती ठेवलेल्या आहेत. किल्ल्यावर नवनाथाचे लहान मंदिर आहे. गडावर लेणीसदृश्य खोदलेले एक राममंदिर ही आहे. मच्छिंद्रगडावरील तटबंदी ढासळलेली आहे. बुरूज मात्र सुस्थितीत आहेत.[८९]

**ऐतिहासिक महत्त्व**

चिटणीस बखरीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६७०–७१ च्या दरम्यान हा किल्ला बांधला. मराठयांच्याकडून हा किल्ला औरंगजेबाने सन १६९३ मध्ये जिंकून घेतला. त्यावेळी या किल्ल्याचा किल्लेदार देवीसिंग हा होता. १२ नोव्हेंबर १६९३ रोजी बादशहा औरंगजेब या गडाच्या पायथ्यास आला होता. यावेळी औरंगजेब बादशहाने गडावरील तोफा उडविण्याचा हुकूम दिला होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हा गड पुन्हा मराठयांनी जिंकून घेतला. छत्रपती शाहू महाराजांनी मराठी राज्य आपल्या प्रधानमंडळात विभागून दिले. त्यानुसार मच्छिंद्रगड पंतप्रतिनिधीच्या ताब्यात होता. असा उल्लेख ५ एप्रिल १७५५ च्या यमाजी शिवदेव याच्या पत्रात येतो. सन १८१० पर्यत हा गड पंतप्रतिनिधीच्या ताब्यात होता. पुढे इ.स.१८१० मध्ये बापू गोखल्यांनी हा किल्ला प्रतिनिधींच्या ताब्यातून जिंकून घेतला. नंतर इ.स.१८१८ पर्यंत पेशव्यांच्यावतीने बापू गोखले या गडाची देखरेख करीत असत. १८१९ मध्ये कर्नल हेविट या इंग्रज अधिकाऱ्याच्या नेतृत्त्वाखाली हा गड इंग्रजानी जिंकून घेतला.[९०]

### ४.६.८ कोळदुर्ग

सांगली जिल्हयात पळशी गावापासून तीन कि.मी. अंतरावर कोळदुर्ग हा किल्ला वसवलेला आहे. पन्हाळगडावर भोज राजाची सत्ता असताना त्याच्या विरोधात बंड करण्यासाठी हे एक महत्त्वाचे ठिकाण असल्याने येथे कोळी राजाने हा कोळदुर्ग किल्ला बांधला. हा किल्ला १२ व्या शतकात बांधला गेला आहे हे तेथे सापडलेल्या हेमाडपंथी दगडी अवशेषावरून स्पष्ट होते. या किल्ल्यावर काही दगडी खांबाचे चौथरे व घराचे काही अवशेष असल्याचे दिसून येते. किल्ल्यावर वीरगळ व तुटलेल्या पिंडीचे अवशेष आढळतात.

कोळदुर्गाच्या तटबंदी पडलेल्या ठिकाणी अनेक नक्षीदार दगड आणि मूर्ती पडल्याचे दिसतात. या किल्ल्याला तीन बाजूने नैसर्गिक संरक्षण आहे. या किल्ल्यावरील घडीचे आणि कोरीव काम केलेले दगड आहेत. किल्ल्याच्या पश्चिमेला बांधलेल्या दगडी बंधाऱ्यासाठी याच

किल्ल्याच्या दगडाचा वापर करण्यात आलेला आहे.[९१]

### ४.६.९ रामदुर्ग

जत–कवठेमहांकाळ मार्गावर जतपासून पाच कि.मी. अंतरावर रामपूर गावाजवळ हा एक लहानसा किल्ला आहे. गडाच्या डाव्या बाजूला तटबंदीच्या साखळीतून वेगळा काढलेला पण उंच बांधलेला टेहळणी बुरूज आहे. या बुरुजावर भगवे निशाण लावलेले आहे. तटबंदीमध्ये साधा दरवाजा बांधलेला आहे. या दरवाज्याच्या बांधणीवरून हा पेशवे काळातील असावा. त्या दरवाजाची कमान आजही टिकून आहे. दरवाजाच्या आतील देवडया, पायऱ्या या पूर्णपणे ढासळलेल्या आहेत. किल्ल्यावर वाडयाचे अवशेष आहेत. या वाडयाच्यासमोर शिवमंदिर आहे. त्याला अर्धमंडप आणि गाभारा असे भाग असून मंडपातील खांब घडीव दगडाचे व गोलाकार आहेत. या व्यतिरिक्त किल्ल्यावर कोणतेही अवशेष अगर वास्तू नाहीत.[९२]

### ऐतिहासिक महत्त्व

रामदुर्ग हा किल्ला शिवकाळात जतचे आदिलशाही सरदार डफळे यांच्या ताब्यात होता. डफळयांचे पुर्वज राजस्थानचे राजपुत आहेत. या राजपुत परिवाराने मुघलांच्या विरूद्ध पराक्रम गाजवला होता. डफळे घराण्याला विजापूरच्या आदिलशहाकडून अथणी व जतची जहागीर मिळाली होती. या गडाचा वापर टेहळणीसाठी केला जात होता.[९३]

### ४.६.१० विलासगड

विलासगड हा किल्ला सांगली जिल्हयातील येडे निपाणी या गावाजवळ आहे. हा किल्ला कधी बांधला यासंबंधीचा उल्लेख इतिहासात सापडत नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६७०–७१ च्या सुमारास या गडाची पुनर्बांधणी केली. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ८२० मीटर आहे.

### किल्ल्याचे वर्णन

विलासगड या किल्ल्यावर किल्ला म्हणून तटबंदी व दरवाज्याचे कोणतेही अवशेष शिल्लक नाहीत. या किल्ल्यावर प्रसिद्ध असे मल्लिकार्जुन मंदिर आहे. या मंदिराच्या नावावरून या किल्ल्यासही मल्लिकार्जुनगड असे म्हटले जाते. या किल्यावरील मल्लिकार्जुन मंदिर आवाराला बाहेरून तटबंदी केलेली आहे. त्याच्या प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. दरवाजातून आत प्रवेश केल्यानंतर ओवऱ्यांचे बांधकाम केलेले आहे. मुख्य दरवाजाकडे तोंड करून एक विष्णूचे मंदिर

आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला दोन लेण्या खोदलेल्या आहेत. त्याच्या समोरच्या बाजूला छताला तोलून धरण्यासाठी एक खांब बसविलेला आहे.

या लेण्याला जोडूनच मल्लिकार्जुनाच मुख्य मंदिर आहे. या मंदिराचा दर्शनी भाग हेमाडपंथी पद्धतीने बांधलेला आहे. या मंदिरातील छताला तोलून धरण्यासाठी सहा कोरीव खांब उभारलेले आहेत. वेली व फुलांचे नक्षीकाम असलेले कोरीव खांब आहेत. यांची बांधणी मानमोडी(जुन्नर) लेणी क्र.१ मधील खांबासारखी आहे. या गर्भगृहाच्या छताच्या बाजूला एक उलटा कुंभ कोरलेला आहे. दरवाजासमोर एक पायरी सोडून मंडपामध्ये शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. स्थानिक लोक त्याला सोमेश्वर म्हणतात. याच्या उजवीकडे एक विहार आहे. या मंदिराच्या उजव्या बाजूला लिंग दुसऱ्या विहारात स्थापन केलेले आहे. विहाराच्या चौकटीवर गणेशपट्टीच्या दोन्ही बाजूला एक-एक अश्वमुख कोरलेले आहे. मंदिराच्या अलिकडे डाव्या बाजूच्या एका कोनाडयात भैरवाची मूर्ती ठेवलेली आहे. खांबालगत काही जिनमूर्ती व नागशिळा कोरलेल्या आहेत.

मल्लिकार्जुन मंदिराचा गाभारा म्हणजे एक स्वतंत्र विहार आहे. त्यामध्ये दरवाजाजवळ शिवलिंगाची स्थापना केलेली आहे. त्यावर पितळी घोडयाच्या काही मूर्ती ठेवलेल्या आहेत. शिवलिंगाच्या मागे अर्धा मीटर × अर्धा मीटरची एक खिडकी काढलेली आहे. त्यातून बाहेरील अर्धवट सोडून दिलेल्या लेण्या पाहावयास मिळतात. मंदिराच्या प्रांगणात मोठया चौथऱ्यावर दीपमाळ, तुळशी वृंदावन व एक स्तंभ उभारलेला आहे. मंदिराच्या तटबंदीच्या बाहेरील बाजूस सहा ओळीचा शिलालेख कोरलेला आहे. तो शिलालेख वाचण्यास अद्याप यश मिळालेले नाही.

गडाच्या माथ्यावर चौथऱ्यावर एक मशीद आहे व त्याच चौथऱ्यावर एक मंदिर असून त्यामध्ये विठ्ठल-रूक्मिणीची मूर्ती आहेत. या मशिदीच्या आवारात काही कबरी आहेत. याच प्रांगणात एक कृष्णाचे मंदिर आहे. या मंदिरासमोर ३ × ३ × ३ मीटर लांबी, रूंदी व उंची असलेला खड्डा आहे. यामध्ये उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या खड्ड्याचा वापर देवपूजेचे साहित्य ठेवण्यासाठी केला जात असे, की धान्य कोठारासारखा की युद्धाच्या दरम्यान शत्रू गडावर आला तर जवळील मौल्यवान वस्तू लपवून ठेवण्यासाठी याचा वापर होत असावा.[१४]

**ऐतिहासिक महत्त्व**

छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्याची पुनर्बांधणी सन १६७०–७१ मध्ये केली. सन १७१७–१८ च्या छत्रपती शाहू महाराजांच्या यादीत या किल्ल्याचा उल्लेख येतो. मोगल आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यामध्ये सन १७१७–१८ मध्ये झालेल्या करारानुसार दिलेले सुभे व त्यामधील गडांच्या यादीप्रमाणे राजश्री संभाजीराजे (करवीर) यांच्या ताब्यातील सुभ्यात विलासगडचा उल्लेख येतो. तो असा. ३ पनाला (सुभा)–पनाला, पावन, विलास आणि पन्हाळा सुभ्यात विलासगड उर्फ मल्लिकार्जुन व्यतिरिक्त अन्य कुठलाही गड नाही. म्हणजे सन १७१७–१८ मधील विलासगड १७९८ च्या आधी काही वर्षे ओस पडला असावा. असा अंदाज करता येईल.[९५]

**४.६.११ बहादूरगड**

**किल्ल्याचे वर्णन**

सांगली जिल्हयात सातारा व कोल्हापूर जिल्हयाच्या सीमेवर बहादुरवाडी गावाजवळ बहादुरगड हा भुईकोट किल्ला आहे. या किल्ल्याचे बांधकाम माधवराव पेशवे यांनी १७६१ ते १७७२ मध्ये केले. किल्ल्याच्या बाहेरील बाजूस मोठा खंदक खोदलेला आहे. महादरवाज्यासमोर फक्त त्यामध्ये भर घालून गडात जाण्यासाठी रस्ता तयार केलेला आहे. महादरवाजा हा दोन बुरूजाच्यामध्ये बांधलेला आहे. दरवाजाच्या आतील बाजूस समोरच घोडयाची पागा आणि त्याच्या डाव्या बाजूला उंच बुरूज आहे. गडावर पडक्या वास्तूचे अवशेष पाहावयास मिळतात.

बहादूरवाडी गडाला एकात एक तीन तटबंदी आहेत. बाहेरच्या पहिल्या तटबंदीला लागूनच प्रचंड मोठा खंदक आहे. त्यात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या खड्ड्यात एकात एक खाली उतरलेल्या चार कमानी आहेत. याला भुयार म्हटले जाते. पहिली तटबंदी चार मीटर दगडाची आणि त्यावर पुन्हा दोन मीटर विटांनी बांधलेली आहे. या तटबंदीमध्ये एकूण नऊ मोठे बुरूज आहेत. दुसरी मधली तटबंदी पहिल्यापेक्षा चार मीटर आतमध्ये असून त्याला आठ बुरूज आहेत. ही तटबंदी पुर्णपणे विटांनी बांधलेली आहे. या दोन्ही ही तटबंदीचा आकार गोलाकार आहे. तिसरी तटबंदी ही दगडाची असून चौकोनी आहे. या तटबंदीमध्ये एक मोठी विहीर, वाडयाचे काही अवशेष व भग्न वास्तू शिल्लक आहेत.[९६]

### ऐतिहासिक महत्त्व

थोरले माधवराव पेशवे यांनी सन १७६१–७२ या काळात करवीरकारांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी बहादुरगड हा भुईकोट किल्ला प्रथम मिरजेचे पटवर्धन सरदार यांच्याकडे दिला होता. करवीर छत्रपतींनी बहादुरगड पाडून टाकण्याची आज्ञा दिली होती. पुढे पेशव्यांनी हा भुईकोट किल्ला मुधोळ घराण्यातील रामचंद्र महिपतराव घोरपडे यांच्याकडे दिला होता. सध्या हा भुईकोट किल्ला प्रतापसिंहराजे घोरपडे यांच्या ताब्यात आहे.[९७]

पेशवेकाळात बहादूरगड हा कोल्हापूरच्या बाजूकडील महत्त्वाचे लष्करी ठाणे होते. हा किल्ला भक्कम असून त्यावर भरपूर शिबंदी, तोफा व बंदुका होत्या. सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर इंग्रजानी उठावाला रोखण्यासाठी बहादुरगडाचे निःशस्त्रीकरण केले.[९८]

### ४.६.१२ सांगलीचे वस्तुसंग्रहालय

सांगली शहरात सांस्कृतिकदृष्टया महत्त्वाचे उत्कृष्ट चित्रसंग्रह असलेले एक छोटेखानी संग्रहालय आहे. सांगली संस्थानाचे दिवंगत राजे श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी रसिक आणि संग्रहाक वृत्तीने ज्या कलात्मक वस्तूंचा संग्रह केला त्या वस्तू जनतेला पाहता याव्यात या उद्देशाने राजवाडयाच्या इमारतीत एक छोटेखानी संग्रहालयात करण्यात आले आहे. या संग्रहालयाचे उद्‌घाटन ९ जानेवारी १९५४ रोजी भारताचे उपराष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे हस्ते करण्यात आले.[९९] सांगली संग्रहालय जरी आकारने लहान असले तरी त्यातील कलाकृती या नामांकित संग्रहालयाच्या तोडीच्या निश्चितच आहेत.

### ४.६.१२.१ चित्रकला विभाग

सांगली संग्रहालयाचे वैशिष्टय म्हणजे परदेशी कलाकार जेम्स वेल्स यांची तैलरंगातील उत्कृष्ट चित्रे या संग्रहालयात प्रदर्शित केलेली आहेत. जेम्स वेल्स या चित्रकाराने इ.स.१७९२ साली प्रेसिडेंट चार्ल्स मॅलेट यांच्या शिफारसीने भारतातील अनेक संस्थानिकांची चित्रे त्यांच्याकडे जावून चितराली होती. त्यातील सवाई माधवराव पेशवे व नाना फडणवीस या इतिहास प्रसिद्ध व्यक्तींची त्याने चितारालेली मूळ चित्रे ही या संग्रहालयात पाहावयास मिळतात. तर भारतीय चित्रकारापैकी रा. धुरंधर, व्ही. व्ही. साठे, गांगुली यांची चित्रे देखील या संग्रहालयात प्रदर्शित केलेली आहेत. ए. एच. मुल्लर यांची रामायणातील प्रसंगावर आधारित १५ तैलरंगचित्रे हा या संग्रहालयाचा अनमोल ठेवा आहे. ए. एच. मुल्लर यांच्या एका चित्रास १९११

साली बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्णपदक मिळाले होते. ते चित्र राजकन्या ब्राम्हणाच्या मुलास दान देताना या संग्रहालयात प्रदर्शित करण्यात आलेले आहे.[१००]

### ४.६.१२.२ शिल्पकला विभाग

मुंबईचे प्रसिद्ध शिल्पकार गणपतराव म्हात्रे यांचे शबरीच्या वेषातील पार्वती हे एक वैशिष्टयपूर्ण शिल्प या संग्रहालयात प्रदर्शित केलेले आहे. या शिल्पाकृतीस दिल्ली येथील प्रदर्शनात १९०२ मध्ये लॉर्ड कर्झन यांचे हस्ते सुवर्णपदक मिळाले होते. पुढे बळवंत गोविंद पोतदार यांनी पुन्हा हा विषय घेवून शबरी लाकडामध्ये घडविली तीही या संग्रहालयात पहावयास मिळते. याशिवाय या विभागात बकरी घेऊन चाललेला शेतकरी हे शिल्प ही सुंदर आहे. चंदनी पेटया, बांगडया ठेवण्याचे करंडे चंदनी पंखे व चवऱ्या या सर्व वस्तूवरील नक्षीकाम व कोरीवकाम अप्रतिम आहे. इतिहासकालीन हंडया, झुंबर, लामणदिवा, तांब्या पितळेची कलात्मक भांडी, उठावाची काष्ठशिल्पे, चंदनी पंखे, वेगवेगळया आकाराच्या वैशिष्टयपूर्ण चिनीमातीच्या फुलदाण्या, पितळी बैलगाडया, प्रतापगडावर सापडलेल्या कलात्मक दिव्यांच्या माळा, चिंचोक्यावर कोरलेला वाघ व हत्ती, चिंचोक्याच्या आकाराएवढया चंदनी लाकडामध्ये कोरलेला नंदी व गणपती या छोटया कलाकृती वैशिष्टयपूर्ण आहेत. या वस्तू संग्रहालयात आहेत. रोमन पद्धतीचे घडयाळ व हस्तीदंती चटई इत्यादी शिल्पे याठिकाणी ठेवलेली आहेत.[१०१]

वरील शिल्पाशिवाय संग्रहालयाच्या दारातच इजिप्शियन पृथ्वीदेवता इसिस, न्यायदेवता ओसोरीज, गायक मुसे, तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस, रशियन राजा पिटर द ग्रेट, सूर अलेक्झांडर, रोमनांचा राजा टोजन, जुलमी बादशहा निरो, ज्युलियस सिझर, इजिप्तची राणी क्लिओपात्रा, रोमन युद्धदेव देवता, अशी अनेक महान व्यक्तिमत्त्वे या प्लास्टरच्या माध्यमातून आपली ओळख दाखवितात.[१०२]

### ४.६.१२.३ ताम्रपट–

या संग्रहालयाकडे असणाऱ्या वैशिष्टयपूर्ण वस्तूमध्ये ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाची वस्तू म्हणजे विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा ताम्रपट, हा ताम्रपट संस्थान काळात शिरहट्टी तालुक्यातील तुंगभद्रा नदीच्या काठी वसलेल्या बिदरहळ्ळी या गावी एका शेतकऱ्यास शेत नांगरताना सापडला. तेथून तो येथे संग्रहालयात ठेवण्यात आलेला आहे. या ताम्रपटाचे वाचन

इतिहास संशोधक म. गो. दिक्षित यांनी केले आहे. या ताम्रपटावरील सर्व मजकूर देवनागरीत असला तरी शेवटी 'श्री विरूपाक्ष' एवढीच अक्षरे कन्नड–तेलगु शैलीत आहेत. या ताम्रपटात आश्विन शुद्ध १५, अंगीरस संवत्सर सोमवार, शालिवाहन शके १४३४ यादिवशी चंद्रग्रहणा–निमित्त दिलेल्या दानांचा उल्लेख आहे.[१०३]

### ४.६.१२. ४ ऐतिहासिक वस्तु

सांगली संग्रहालयाकडे असणाऱ्या वस्तूमध्ये इटली येथील पिसाच्या झुकत्या मनोऱ्याची मार्बलमधील प्रतिकृती तसेच फत्तेपूरशिक्री या ठिकाणी असणाऱ्या सलीम चिस्ती यांच्या कबरीची मार्बलमधील प्रतिकृती, या प्रतिकृती असूनदेखील संबंधित वास्तूच्या वैशिष्टासह परिपूर्णतने साकारण्यात आलेल्या आहेत. जपानमधील गौतमबुद्धाचे सुवर्णमंदिर तसेच सांगलीच्या आयर्विन पुलाची लाकडी प्रतिकृती येथे पाहावयास मिळते. प्रतापगडावरील भवानीमातेच्या मंदिरातील लोखंडी साखळया, इंग्लडचे जुने घडयाळ तसेच सांगलीच्या राजेसाहेबांनी महाबळेश्वराच्या जंगलात मारलेला ढाण्या वाघ आणि तळसंगीच्या तलावात मारलेली सुसर इत्यादी प्राणी म्हैसुरहून पेंढा भरून आणून ठेवलेली आहेत.[१०४]

अशा प्रकारे सांगलीचे वस्तुसंग्रहालय आकाराने लहान असले तरी यामध्ये दुर्मिळ वस्तू ठेवल्या आहेत. त्यामुळे या वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व वाढण्यास मदत झालेली आहे. या वस्तुसंग्रहालयातील शिल्पकला विभाग, चित्रकला विभाग, ऐतिहासिक वस्तू विभाग व ताम्रपट विभाग एवढेच असले तरी हे संग्रहालय हैद्राबाद, म्हैसूर व औंध संग्रहालयाच्या तोडीचे मानले जाते. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभागाकडे याची व्यवस्था आहे.

### ४.६.१३ आयर्विन पुल

श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी आयर्विन पुल बांधण्याचा निर्णय घेतला कारण त्यांच्या काळात सांगली संस्थानातील अनेक गावे कृष्णा नदीपलिकडे होती. तेव्हा इस्लामपुर व शिराळा येथील गावांचा संपर्क सांगलीशी वाढावा या उद्देशाने या पुलाची निर्मिती करण्यात आली. या पुलाचे उद्घाटन १८ नोव्हेंबर १९२९ रोजी गव्हर्नर जनरल आणि व्हाईसरॉय लॉर्ड बॅरन आयर्विन आणि लेडी आयर्विन यांच्या उपस्थितीत पार पडला. या पुलाचे बांधकाम चुना व दगड यांनी केलेले असून यासाठी सात लाख रूपये खर्च आला. या पुलाची उंची ७० फूट असून लांबी ८२० फुट तर रूंदी ३२ फुट आहे. या पुलाला दोन तरंगते पदपथ आहेत.

आयर्विन पुल बांधण्यासाठी अभियंते व्ही.जी.माने, मेसर्स व्ही.आर रानडे, अहमदखान राजेसुतार इत्यादीनी मोठया प्रमाणावर सहकार्य केले. या पुलाच्या उद्‌घाटनावेळी श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांनी आपल्या भाषणात श्री.आयर्विन यांच्या प्रशासन कौशल्याचा गौरव केला होता. या पुलामुळे सांगलीतील व्यापार आणि शेतीच्या प्रगतीला चालना मिळेल असे मत व्यक्त केले होते.[१०५]

### ४.६.१४ कृष्णा घाट(मिरज)

मिरज शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर कृष्णा नदीच्या काठावरील हे ठिकाण आहे. सन १७८७ मध्ये मिरज अधिपती श्रीमंत गंगाधरराव गोविंद पटवर्धन यांनी घाट बांधला. या घाटाच्या बांधकामासाठी चुना आणि दगड यांचा वापर केला आहे. त्यामुळे त्याला मजबूतपणा आलेला आहे. हा घाट बांधण्यासाठी १,३५,०००/– रूपये खर्च आला आहे. या घाटाच्या दोन्ही बाजूंना दोन मनोरे आहेत. कृष्णा घाटास ६५ पायऱ्या असून या मध्ये चार पटांगणे आहेत. या पटांगणाना तुळसी, महादेव, कासव आणि मत्स्य पटांगण अशी नावे आहेत. या घाटावर श्रीमंत गंगाधरराव पटवर्धन यांची 'सरकारी वाडा' नावाची वास्तु आहे. तसेच मार्कडेश्वर व कमलेश्वर मंदिरे, अणाबुवा यांची समाधीही या घाटावर आहे.[१०६]

### ४.६.१५ कुंडल लेणी

सांगली जिल्हयातील पलूस तालुक्यात कुंडल हे गाव आहे. कुंडल गावच्या ईशान्येस डोंगरावर १३ ब्राम्हणी गुहा आहेत व दक्षिणेस तीन गुहा आहेत. या गुहांचा आकार १४×९×२ फुट आहे. कुंडल लेण्यामध्ये वीरभद्राची गुंफा आहे. प्राचीन काळात चालुक्य राजवटीत राजा सत्याश्रय  याने बांधल्या असाव्यात असा उल्लेख चालुक्य सम्राट विजयादित्य याच्या ताम्रपटात मिळतो. या गुंफाचे दरवाजे दोन फुट रूंदीचे असून या गुंफेशेजारी दलिमा देवीची गुंफा आहे. देवीच्या गुंफेशेजारी महादेवाचे मंदिर आहे. या मंदिराच्या शेजारी कचेरी नावाची गुंफा आहे. तेथेच स्नान गुंफा आहे. पुढे भांडारघर नावाची गुंफा आहे. १२ व्या व १३ व्या गुंफेचा वापर केलेला नाही. मात्र सन १८७०  मध्ये  या गुंफेकडे  जाण्यासाठीचा रस्ता बसाप्पा लिम्प या कुंडलच्या वाण्याने २५ हजार रूपये खर्च करून बांधलेला आहे.

कुंडलच्या पश्चिमेकडील बाजूस २५×१२ फुट लांबी व रूंदीची गुंफा आहे. या गुंफेमध्ये १७ खांब असून त्यापैकी ६ खांब भिंतीशी संलग्न आहेत. या गुंफेमध्ये शिव पार्वती आणि गंगा

यांच्या प्रतिमा आहेत. दक्षिणेकडील डोंगरावर २०×१६×७ या आकाराच्या तीन गुंफा आहेत. या गुंफामध्ये राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती आहेत. यावरून या गुंफा शैव व वैष्णव संप्रदायाशी निगडीत होत्या हे स्पष्ट होते.[१०७]

कुंडलच्या पश्चिमेस डोंगरावर गुहेमध्ये श्री कलिकुंड पार्श्वनाथ मंदिर आहे या पार्श्वनाथास झरी पार्श्वनाथ असे म्हणतात. तर या डोंगराच्या उत्तर दिशेस असलेल्या डोंगरावर गिरी पार्श्वनाथ नावाची प्राचीन मूर्ती आहे. यावरून या परिसरावर जैन धर्माचा प्रभाव होता, हे स्पष्ट होते.[१०८]

### ऐतिहासिक महत्त्व

सिद्धक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुंडलजवळील डोंगरावर कलिकुंड, झरी व गिरी पार्श्वनाथ मंदिर आहे. भगवान श्री पार्श्वनाथ यांची महासभा या डोंगरावर झाली होती. श्रुतकेवली श्रीधर मुनींचे महानिर्वाण याच ठिकाणी झाले होते. हे जैन धर्माचे तीर्थकर पार्श्वनाथ यांचे शिष्य असून त्यांनी कुंडल परिसरात जैन धर्माचा मोठया प्रमाणावर प्रचार व प्रसार केला होता. आचार्य विमलकिर्ती व आचार्य धर्मवीर यांचेही या डोंगरावर काही काळ वास्तव्य होते. म्हणूनच त्याला सिद्धक्षेत्र असे म्हटले जाते. हजारो जैन श्रावक या तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्यास दरवर्षी येतात. चालुक्य सम्राट सत्यश्रय पुलकेशी आणि जयसिंह यांच्या साम्राज्याची कुंडल ही बदामीपूर्व राजधानी होती. चालुक्य सम्राट विजयदित्य याच्या ताम्रपटात कुंडल व परिसरातील गावांचा उल्लेख आढळतो.[१०९]

## ४.७ समारोप

सांगली जिल्हयास प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. सातवाहन काळापासूनच्या इतिहासाच्या पाऊलखुणा सांगली जिल्हयात आजही पाहावयास मिळतात. काळ बदलला तरी आजही अनेक गावात प्राचीन इतिहासाचे ठळक ठसे राहिलेले आहेत. त्याचबरोबर इतिहासाचा वारसा घेऊन अनेक गावात पराक्रमाचे नवे विजयस्तंभ उभे राहिलेले आहेत. सांगली जिल्हयात खानापूर, मिरज, जत, कवठेमहांकाळ, आटपाडी आणि वाळवे या तालुक्यात प्राचीन काळापासून वसाहती असाव्यात. हे सांगली जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा आढावा घेतल्यानंतर लक्षात येते. सांगली जिल्हयात प्राचीन काळात अनेक धार्मिक स्थळे निर्माण झालेली दिसतात. तर मध्ययुगीन

काळात त्यामध्ये भर पडलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली धार्मिक परंपरा सांगली जिल्हयाने जपलेली आहे. हे तेथील धार्मिक स्थळावरून स्पष्ट होते.

सांगली जिल्हयात ऐतिहासिक स्मारके मध्ययुगीन काळात मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहेत. ही स्थळे पेशवेकाळात भरभराटीस आली होती. या स्मारकावरून मानवी जीवनाची वैशिष्टये दिसून येतात. ऐतिहासिक लेण्यामधून कलात्मक जीवनाची माहिती मिळण्यास मदत होते. या ऐतिहासिक स्थळांच्या बांधकामाच्या शैलीतून ते कोणत्या हेतूने उभारण्यात आले होते. तसेच मराठाकालीन परंपरेची माहिती मिळते.

सांगली जिल्हयात असलेल्या गडकोट व भुईकोट किल्ल्यावरून त्या प्रदेशाची राजकीय मालकी समजण्यास मदत होते. मराठेकालीन वास्तुशैलीचा नमुना असलेल्या राजवाडयांची वैशिष्टयपूर्ण रचना होती. संरक्षणासाठी वाडयाभोवती भक्कम तटबंदी होती. या वाडयामध्ये जे लाकडीकाम केले जात होते, त्यावरील कोरीवकाम व नक्षीकामावरून मराठाकालीन चित्रशैलीची माहिती मिळण्यास मदत झाली आहे. तसेच वास्तुवरून बांधकाम शैलीची माहिती मिळण्यास मदत झाली आहे. उदा. मिरजेचा कृष्णा घाट, त्यावरील मनोरे, पायऱ्या तसेच गणेशदुर्गाचे बांधकाम आहेत. यावरून सांगली जिल्हयाच्या मराठा काळातील प्रगतीची कल्पना येते.

## संदर्भ

१) सांगली जिल्हा, जनगणना अहवाल–२००१, पृ.३५

२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.१८

३) कित्ता, पृ.१९

४) सांगली जिल्हा, जनगणना अहवाल–२०११, पृ. ३०

५) शर्मा के. के. मुख्य संकलक इंटक्यअलस, संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन, खंड–२, २००५, पृ.१५३३

६) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.१

७) कित्ता, पृ.०२

८) कित्ता, पृ.१८

९) कित्ता, पृ.१९

१०) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.९, १०

११) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड–५, पुणे १९९७, पृ.१६८

१२) कित्ता, पृ.१८१

१३) केळकर कृ.रा., सचित्र भिलवडी वर्णन, पुणे १९३५, पृ.१२

१४) भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पुणे, १९९८, पृ.२७४

१५) केळकर कृ.रा., उपरोक्त, पृ.११

१६) मोरे खं.आ., मराठी संस्कृती–मराठी अस्मिता, दिंडोरी(नाशिक), २००५, पृ.१३८

१७) कित्ता, पृ.२१७

१८) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, दै.सकाळ लेख सांगली जिल्हा इतिहास आणि वर्तमान, २ एप्रिल २००६, पृ.८

१९) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.४१ व ४७

२०) कित्ता, पृ.४७

२१) कित्ता, पृ.५५

२२) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, उपरोक्त, पृ.८

२३) कित्ता, पृ.८

२४) सांगली नगरपालिका, शताब्दी महोत्सव, स्मरणिका १९७६, पृ.१७

२५) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.५६,५७

२६) सांगली नगरपालिका, शताब्दी महोत्सव, स्मरणिका १९७६, पृ.१७

२७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.६१, ६२

२८) कित्ता, पृ.६४, ६५

२९) अक्कलकोट सतीश, शोध शिवछत्रपतीच्या दुर्गाचा, २००९, पृ.२६० ते २६५

३०) कित्ता, पृ.२६०

३१) कित्ता, पृ.२६०

३२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.८८ ते १११

३३) कित्ता, पृ.१२४, १२६

३४) कित्ता, पृ. १३२ ते १३६

३५) कोनगाळे विजय, देशभक्त धोंडीराम, सांगली, २००१-०२, पृ.१०

३६) कित्ता, पृ.११

३७) जोशी ह. न., श्री क्षेत्र औदुंबर, १९७७, मुंबई,पृ.३

३८) हरवंदे गीता आदिनाथ, महाराष्ट्रातील तीर्थयात्रा कुलदैवते आणि कुलसंप्रदाय, प्रफुल्लता प्रकाशन पुणे, ६ नोंव्हेंबर २०११, पृ.१३८

३९) कित्ता, पृ.१३८

४०) जोशी ह.न., उपरोक्त, पृ.३

४१) कुंटे मो. के., सांगाली जिल्हयातील मंदिरे, पुणे, १९९८, पृ. ७९

४२) अभ्यंकर रा. वि., महाराष्ट्रातील शक्तिस्थाने, मुंबई, प्रथमावृत्ती २००६, पृ.११५

४३) चिंतामणराव पटवर्धन यांची रोजनिशी, पृ.३

४४) सांगली नगरपालिका शताब्दी महोत्सव स्मरणिका, १९७६, पृ.२

४५) अभ्यंकर रा. वि., उपरोक्त, पृ.६०

४६) सांगली नगरपालिका शताब्दी महोत्सव स्मरणिका १९७६, पृ.३

४७) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५, पृ.१४, १५

४८) अभ्यंकर रा.वि., उपरोक्त, पृ.६०

४९) दै.लोकमत वर्धापन दिन विशेषांक, १२ ऑक्टोबर २००८, पृ.३७

५०) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, इतिहासाची सुवर्णपाने, सांगली, १२ मार्च २०१२, पृ.२८

५१) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.६८०, ६८१

५२) दै.तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक, २००६, पृ.६१

५३) कुंटे मो.के., उपरोक्त, पृ.२२

५४) माणगौरव आटपाडी वार्षिक विशेषांक २००५–०६, पृ.३

५५) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.६९६

५६) कुंटे मो.के., उपरोक्त, पृ.११०

५७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.६९७

५८) फडके आदित्य, सफर सांगली कोल्हापूरची, कोल्हापूर
४ सप्टेबर २०१२, पृ.१८८

५९) ठाकूर जितेंद्रनाथ, नवनाथ कथासागर अध्याय, मुंबई २००८, पृ.३४,३५, ३६

६०) केळकर कृरा., उपरोक्त, १९३५, पृ.१८

६१) हंगसे एम.बी., कविवर्य सुधांशु यांच्या कवितेचे विशेष, एम.फिल अप्रकाशित प्रबंध,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९४, पृ.४६

६२) कुंटे मो.के., उपरोक्त, पृ.४१

६३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.७१७

६४) कुंटे मो.के., उपरोक्त, पृ.९१

६५) कित्ता, पृ.९१

६६) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.६८५

६७) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक, २००७, पृ.१०

६८) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.७१५

६९) मुश्रीफ हमीदहसन मुहम्मदसाहेब, हजरत ख्वाँजा शमशुद्दीन(गंजबक्ष) यांचे हयाते पाक
जीवन चरित्र भाग पहिला, १९८७, पृ.५

७०) कित्ता, पृ.१९

७१) मुश्रीफ हमीदहसन मुहम्मदसाहेब, हजरत ख्वाँजा शमशुद्दीन(गंजबक्ष) यांचे हयाते पाक जीवन चरित्र भाग दुसरा, १९८९, पृ.३०

७२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.७१६

७३) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५,उपरोक्त, पृ.१९

७४) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक,२००७, पृ.५९

७५) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.८६,८७

७६) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक २००७, पृ.३३

७७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, पृ.७२७

७८) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.१६०

७९) कित्ता, पृ.१६०

८०) टिळक अविनाश, सांगली आणि सांगलीकर, २००१, पृ.२१३

८१) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक २००६, पृ.६

८२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.७११

८३) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, उपरोक्त, पृ.१७ ड्ढ १८

८४) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.३३

८५) चिले भगवान, दुर्गसंपदा महाराष्ट्राची, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, एप्रिल २००७, पृ.३५–३८

८६) कित्ता, पृ.३८,३९

८७) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.३४

८८) अक्कलकोट सतीश, उपरोक्त पृ.२६२

८९) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.२४,२५

९०) चिले भगवान, दुर्गसंपदा महाराष्ट्राची, एप्रिल २००७, उपरोक्त, पृ.२९,३०

९१) खराडे दत्तात्रय पांडुरंग, सांगली जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास, (इ.स.१६०० ते १९००), एम. फिल. शोधप्रबंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जून २०१०, पृ.७४

९२) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.९२

९३) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.६८८

९४) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१७,१८

९५) अक्कलकोट सतीश, दुर्ग, २००९, पृ.५३५

९६) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.८५

९७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.६७६

९८) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.२७

९९) टिळक अविनाश, उपरोक्त, पृ.२६१

१००) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.२९२

१०१) कित्ता, पृ.२९०

१०२) सांगली वस्तुसंग्रहालय, हस्तलिखीत पत्रिका, सांगली, २००१, पृ.२

१०३) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.२९०

१०४) टिळक अविनाश, उपरोक्त, पृ.२६२

१०५) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.४३ – ४५

१०६) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक २००६, पृ.६०

१०७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सांगली जिल्हा, १९६९, उपरोक्त, पृ.६९८–७००

१०८) दै. तरूण भारत, पलुस तालुका विशेषांक, २००७, पृ.१५

१०९) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, उपरोक्त, पृ.२९

# प्रकरण पाचवे
# कोल्हापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

## ५.१ प्रास्ताविकः–

कोल्हापूर जिल्हयास प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक वारसा आहे. पद्मपुराणातील करवीर खंडात कोल्हापूर क्षेत्राचे महात्म्य यथोचितपणे वर्णिले आहे. त्यावरून या क्षेत्राचे प्राचीनत्व व पावित्र्य मान्यता पावले आहे. या क्षेत्रास 'दक्षिण काशी' या नावाने ओळखले जाते. श्री. महालक्ष्मीच्या तीर्थक्षेत्रामुळे कोल्हापूर शहरास ऐतिहासिक काळापासून महत्त्व प्राप्त झाले आहे.

मराठा काळात या जिल्हयात मोठया प्रमाणावर धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण झाली आहेत. इ. स.११८७ मध्ये कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यातील दुसऱ्या भोज राजांने कोल्हापूर आपली राजधानी केली, इ.स.११९१ मध्ये ती त्याने पन्हाळागडावर आणली. या काळात शिलाहारांचे देवगिरीच्या यादवांबरोबर युद्ध सुरू झाले. त्यामध्ये यादवांनी शिलाहारांचा पराभव केला. यादवांनी कोल्हापूरवर आपली सत्ता स्थापन केली. यादवांची इ. स.१३१८ पर्यंत कोल्हापूरवर सत्ता होती. त्यानंतर इ. स.१३४७ साली बहामनी राज्याची स्थापना होईपर्यंत हा कोल्हापूर प्रदेश स्थानिक राजे सांभाळत होते. बहामानी सत्तेने अल्पकाळात कोल्हापूर येथे आपला अमंल निर्माण केला. बहामनीचे विघटन झाल्यानंतर हा प्रदेश विजापूरकर आदिलशहाच्या ताब्यात गेला.

अफझलखान वधानंतर सन १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर प्रांत जिंकून घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी ते स्वराज्य टिकवून धरले. त्यामध्ये कोल्हापूरचाही समावेश होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मराठयांची राजधानी सातारा व जिंजी या दोन ठिकाणी असल्याने मध्यवर्ती ठिकाणी असल्याने कोल्हापूर राज्य यास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. छत्रपती राजाराम महाराजांचे सिंहगडावर सन १७०० मध्ये निधन झाले. त्यावेळी महाराणी ताराबाई व राजसबाई या कोल्हापूर राज्यातील पन्हाळा किल्ल्यावर होत्या. याच वेळी महाराणी ताराबाई आपला मुलगा शिवाजी दुसरा यास पन्हाळा गडावर राज्याभिषेक करून इ.स.१७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना केल्याची घोषणा केली. इ. स.१७१० ते १९४९ या कालखंडात कोल्हापूर राज्य होते.

१३ एप्रिल १७३१ रोजी छत्रपती शाहू महाराज आणि छत्रपती संभाजीराजे यांच्यात वारणेचा तह होऊन कोल्हापूरकडील प्रदेश छत्रपती संभाजी राजांच्या ताब्यात गेला. पुढे सन १८९२ मध्ये कोल्हापूरच्या राजाने इंग्रजाबरोबर तह केला. या तहानुसार कोल्हापूरच्या राज्यातील राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या बाबींमध्ये त्यांना मांडलिक बनविले. पुढे सन १९४९ पर्यंत कोल्हापूर हे एक संस्थान म्हणून परिचित झाले, पण पुढे ते भारतीय संघराज्यात सन १९४९ मध्ये विलिन करण्यात आले.

अशाप्रकारे कोल्हापूर जिल्हयास ऐतिहासिक वारसा असल्याने या जिल्हयात अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## ५.२ कोल्हापूर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी–

कोल्हापूर जिल्हा मुंबई राज्यात विलीनीकरण झाल्यानंतर सन १९४९ मध्ये अस्तित्त्वात आला. त्यावेळी पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानातील ९५६ गावे, कुरूंदवाड संस्थानातील पाच गावे, मिरज संस्थानातील एक गाव, बेळगाव जिल्हयातील सात गावे समाविष्ट करण्यात आली. पूर्वीच्या शिरोळ पेठ्यातील कटकोळ ठाणे समाविष्ट करण्यात आले. या पुनर्रचनेनंतर कोल्हापूर जिल्हयात आठ तालुके व पन्हाळा, बावडा व आजरा हे तीन महाल होते. इ. स. १९५० मध्ये या जिल्हयातील दोन गावे रत्नागिरी जिल्हयात समाविष्ट करण्यात आली. १ मे १९६० मध्ये गडहिंग्लज तालुक्यातील वाटंगी गाव आजरा तालुक्यात समाविष्ट झाले. ३० जून १९८३ रोजी कोल्हापूर जिल्हयातील बावडा तालुक्यातील ३७ गावे सिंधुदुर्ग जिल्हयात समाविष्ट करण्यात आली.[१]

### ५.२.१ स्थान व सीमा

महाराष्ट्राच्या नैऋत्य पठारी भागावर वसलेला कोल्हापूर जिल्हा १५°४३′ ते १७°१७′ उत्तर अक्षांश आणि ७३°४०′ ते ७४°४२′ पूर्व रेखांश यामध्ये आहे. कोल्हापूर जिल्हयाच्या पश्चिमेस सहयाद्रीचा कडा व उत्तरेकडे वारणा नदी अशा नैसर्गिक सीमा असून पूर्वेकडे अंशतः कृष्णा नदी व कर्नाटकातील बेळगाव जिल्हा तसेच दक्षिणेकडे कोल्हापूर जिल्हयाची सीमा आखलेली असून वारणा नदीने सांगली व कोल्हापूर जिल्हयांची उत्तर सीमा आखली आहे.[२]

### ५.२.२ क्षेत्रफळ व लोकसंख्या

इ.स.१९८१ च्या जनगणनेनुसार कोल्हापूर जिल्हयाचे क्षेत्रफळ ८,०४७ चौ. कि. मी. असून त्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे १६० कि.मी., पूर्व–पश्चिम रूंदी सुमारे ६० कि.मी. आहे. लोकसंख्या २५,०६,३३० आहेत. यापैकी नागरी लोकसंख्या ६,२२,०२२ आहे. ग्रामीण लोकसंख्या १८,८४,३०८ आहे.[३]

सन २००१ च्या जनगणनेनुसार भौगोलिक क्षेत्रफळ ७७४६ चौरस कि.मी. आहे. तर लोकसंख्या ३५,१५,४१३ असून त्यामध्ये पुरूष–१८, ०३,७४६, स्त्रिया– १७,११,६६७ एवढी आहे. कोल्हापूर जिल्हयात १२ तालुके व १८ शहरे आहेत. जिल्हयात एकूण गावे १२१७ आहेत. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३८,७६,००१ असून त्यामध्ये पुरूष– १९,८०,६५८ स्त्रिया– १८,९५,३४३ एवढी आहे.[४]

### ५.२.३ लोकसंख्या

**कोल्हापूर जिल्हयातील सन १९०१ ते २०११ पर्यंतची लोकसंख्या**

| अ.न. | वर्ष | लोकसंख्या | अ.न. | वर्ष | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९०१ | ९,००,५७० | ७. | १९६१ | १५,९६,४९३ |
| २. | १९११ | ८,१७,९७६ | ८. | १९७१ | २०,४८,०४९ |
| ३. | १९२१ | ८,२०,०३२ | ९. | १९८१ | २५,०६,३३० |
| ४. | १९३१ | ९,३७,३०३ | १०. | १९९१ | २७,५३,६३४ |
| ५. | १९४१ | १०,७२,४४४ | ११. | २००१ | ३५,१५,४१३ |
| ६. | १९५१ | १३,०८,०६० | १२ | २०११ | ३८,७६,००१[५] |

### ५.२.४ हवामान व पर्जन्यमान

कोल्हापूर जिल्हयाची समुद्रसपाटीपासूनची उंची सरासरी २००० फूट आहे. कोल्हापूर जिल्हयाचे हवामान समशितोष्ण आहे. कोल्हापूर जिल्हयातील हवामान ऋतुनुसार बदलते. उन्हाळयात तापमान जलद गतीने वाढत जाऊन एप्रिल महिन्यात ते कमाल मर्यादा गाठते. उन्हाळयात तापमान किमान ३५.६° सेल्सियस व कमाल तापमान ३७.८° सेल्सियस इतके असते व पावसाळयात कमाल तापमान २६.१° अंश सेल्सियस इतके असते व हिवाळयात थंडी असल्याने किमान तापमान १४.०° सेल्सियस तसेच कमाल तापमान १६.१° सेल्सियसपर्यत असते. यावरून कोल्हापूर जिल्हयाचे सरासरी तापमान हे किमान तापमान १४.०° ते कमाल

तापमान ३७.८° सेल्सियस इतके असते.[६]

कोल्हापूर जिल्हयातील वार्षिक सरासरी पर्जन्यमानात प्रादेशिक असमानता असून ईशान्य भागात ५०० मि. मीटर पश्चिमेकडील सहयाद्री पर्वतात असलेल्या बावडा येथे ६०० मि. मीटरपेक्षा जास्त पाऊस पडतो. जिल्हयातील निम्म्यापेक्षा अधिक प्रदेशात पावसाची वार्षिक सरासरी १,००० मि.मीटर असते. मे आणि नोव्हेंबर या महिन्यात जिल्हयात सरासरी ४० ते ५० मि.मीटर एवढा पाऊस पडतो.[७]

### ५.२.५ कोल्हापूर जिल्हयातील भूवर्णने व नदीप्रणाली–

कोल्हापूर जिल्हयात सहयाद्रीच्या रांगा, पूर्वेकडील, मध्यभागातील आणि दक्षिण भागातील डोंगर रांगा यांचा समावेश होतो. सहयाद्रीचा माथ्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ६०० ते १००० मीटर असून तो अनेक ठिकाणी तुटलेला आहे. सहयाद्रीच्या शिखर रांगेत विशाळगड, बावडा, भूदरगड हे किल्ले आहेत.

याशिवाय मुख्य पर्वत रांगेपासून अनेक डोंगररांगा आहेत. पूर्वेकडील पर्वत रांगेत विशाळगड–पन्हाळा रांग ही मुख्य डोंगररांग आहे. याशिवाय जोतिबा, मांजरा व बोरिवडे ही लहान टेकडयांच्या रांगा आहेत. मध्य डोंगररांगेत तुळजाई डोंगर, फोंडा–सांगाव डोंगर रांग, सहयाद्रीच्या मुख्य रांगेपासून कोल्हापूर शहरापर्यंत येते. दक्षिणेकडील डोंगर रांग ही कागल आणि भूदरगड येथील डोंगराच्या रांगांची भुरूपे इतर रांगासारखीच आहेत. गडहिंग्लज तालुक्याचे भूदृश्य हे लहान लहान टेकडयांनी वेढलेले असून या रांगेत सामानगड हा किल्ला आहे.

कोल्हापूर जिल्हयाच्या पश्चिम सीमेवरील सहयाद्रीच्या घाटमाथ्यातून खाली कोकणात उतरण्याचे अनेक घाटमार्ग आहेत. त्यामध्ये आंबा, फोंडा, अंबोली, घोटगे घाट, रांगणा घाट, पारपोली घाट व रामघाट इत्यादीचा समावेश होतो.[८]

### ५.२.६ नदीप्रणाली–

कोल्हापूर जिल्हयात कृष्णा, वारणा, पंचगंगा, वेदगंगा, हिरण्यकेशी व घटप्रभा या प्रमुख नद्या आहेत. या नद्यांचे उगमस्थान सहयाद्री पर्वतरांग आहे. या नद्या आग्नेयेस, पूर्वेस किंवा ईशान्येस कोल्हापूर जिल्हयातून वाहत जाऊन कृष्णा नदीला मिळतात. भूदरगड व निपाणी यामध्ये मल्ल्या डोंगर रांग व उत्तर डोंगराची रांग पसरलेली आहे. त्यामुळे त्याच्या उत्तर

भागातून वारणा, पंचगंगा, दूधगंगा आणि वेदगंगा या नद्या पूर्व व ईशान्य दिशेला वाहत जाऊन कोल्हापूर जिल्हयाच्या सीमेच्या आत कृष्णा नदीस मिळतात. दक्षिण भागातून हिरण्यकेशी व घटप्रभा या नद्या पूर्व व आग्नेय भागातून वाहत जाऊन कोल्हापूर जिल्हयाच्या सीमेबाहेर कृष्णा नदीस जाऊन मिळतात. याशिवाय कोल्हापूर जिल्हयातून कासारी, कुंभी, तुळशी, भोगावती इत्यादी नद्या वाहतात. या नद्यांच्या खोऱ्यामुळे कोल्हापूर राज्याचा भाग सुपीक बनला आहे.[९]

## ५.३ कोल्हापूर जिल्हयाची सामाजिक व धार्मिक पार्श्वभूमी

कोल्हापूर जिल्हयात हिंदू, जैन, इस्लाम, लिंगायत, ख्रिश्चन, बौद्ध, यहुदी व पारशी धर्माचे लोक आहेत. यामध्ये मराठा, जैन व लिंगायत समाजातील लोक मोठया प्रमाणात आहेत. अनुसूचित जातीमध्ये समाविष्ट असणाऱ्या लोकांच्या वस्त्या परंपरागत पद्धतीप्रमाणे ग्रामीण भागात गावाबाहेर आढळतात. गावगाडयातील समाजात ब्राह्मण, मराठा, गुरव, सुतार, कुंभार, न्हावी, परीट, तेली, कोष्टी, शिंपी, कासार, तांबट, घिसाडी, सोनार, माळी, धनगर, आंबी, कोळी, भोई, लोणारी, कलाल, खाटीक, पाथरवट, बेलदार, वडार, कैकाडी, कोरवी, रामोशी, महार, मांग, चांभार, ढोर व भंगी इत्यादीचा समावेश आहे. तसेच भिक्षेकरी समाजामध्ये गारूडी, गोंधळी, गोपाळ, गोसावी, कुडमुडे जोशी, डोंबारी, बैरागी व वासुदेव इत्यादी समावेश आहे.

समाजरचना श्रेष्ठ व कनिष्ठ होती. त्याकाळातील कोणत्याही गावची रचना पाहिली तर स्पृश्य जातीची घरे वेशीच्या आत होती. अस्पृश्य जातींची घरे वेशीबाहेर असत. चांभार व ढोर यांची घरे गावकुसाला लागून असत.[१०]

कोल्हापूर जिल्हयातील लोकांचा पोषाख हा पुरूष पागोटे व अंगरखा घालून धोतर किंवा तुमान अगर चोळणा घालत. तसेच स्त्रीया लुगडे, चोळी, कपाळास कुंकू लावतात. पुरूष व स्त्रीया या सण व उत्सवामध्ये उंची कपडे व दागिने वापरतात. तेथील पुरूष, स्त्रिया, मुले व मुली यांचे अलंकार वेगवेगळया प्रकारचे होते. श्रीमंत लोक सोन्याचे, गरीब लोक चांदी, तांबे व पितळेचे अलंकार वापरत. श्रीमंत पुरूष भिकबाळी, पोची, गोफ व अंगठी व लहान मुलांचे करगोटे, कडी असे सोन्या–चांदीचे अलंकार घालत असत. स्त्रीया मंगळसूत्र, चंद्रहार, चपलाहार, जोंधळी पोत, सरी, तांदुळी पोत, बकुळीहार, पोहेहार, मोहनमाळ, बोरमाळ, एकदाणी व वज्रटीका, पुतळयाची माळ , कोल्हापुरी साज इत्यादी अलंकार घालतात. तसेच

लहान मुलांचे अलंकार हे बिंदल्या, मनगटया, कडीतोळे, वाळे, तोरडया, साखळया, चाळ इत्यादी अलंकार घालत असत.[११]

समाज रचनेवर धर्माचा अत्यंत मोठा पगडा होता. दैनंदिन आचार–विचारावर धर्माचे प्राबल्य होते. दिवसभर व्यक्तीची मने धार्मिक आचार व विचारांनी व्यापलेली होती. कोल्हापूर जिल्हयात हिंदू, जैन, लिंगायत, मुसलमान, गुजर, मारवाडी धर्माचे लोक राहत होते. यामध्ये मराठा समाज मोठया प्रमाणावर होता. येथील समाज जरी अनेक जाती व धर्मामध्ये विभागला गेला असला तरी एकमेकांचे सण व उत्सव मोठया प्रमाणावर साजरे करीत असत. तेथील प्रत्येक घरात जातीधर्माप्रमाणे देव असत. त्यांची पूजा केली जात होती. श्रीमंत सरदार घराण्यात पूजेसाठी ब्राह्मणास बोलावित असे. देवाजवळ सांजवात लावण्याची पद्धत होती. प्रत्येक जातीतील लोकांच्या कुलदेवते शिवाय म्हसोबा, विठलाई, जाखाई, जखीण, डाकीण व वेताळ इत्यादी देवतांची पूजा केली जात होती. देवाला संतुष्ट करून घेण्यासाठी व आपली इच्छा देवामार्फत पूर्ण व्हावी या हेतूने अनुष्ठाने केली जात होती.[१२]

## ५.४ कोल्हापूर जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

### ५.४.१ प्राचीन काळ–

सन १९४५–४६ मध्ये ब्रह्मपुरी येथे पुण्याच्या डेक्कन कॉलेजने केलेले संशोधन आणि करवीर माहात्म्य, हरिवंश तसेच इतर पौराणिक परंपरा यांचेद्वारे कोल्हापूर जिल्हयाचा प्राचीन कालीन इतिहास इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून मिळतो.[१३] प्राचीन काळात कोल्हापुरास 'करवीर क्षेत्र' असे म्हणत असत. पद्मपुराणाचा भाग म्हणून मानलेल्या करवीर माहात्म्यमध्ये करवीर क्षेत्राला दक्षिण काशीचे महत्त्व दिलेले आहे. गंगाकाठची काशी शिवाचे आद्यपीठ असून करवीर नगरी मातृकेचे आद्यपीठ असल्याचे त्यात म्हटले आहे. करवीर माहात्म्य पद्मपुराणात कोल्हापूर शहराचा उल्लेख 'कोल्लाक्षेत्र' असा आहे. हरिसेन याच्या बृहत कथाकोश या ग्रंथात कोल्हापूरचा उल्लेख 'कोल्लारिगिरिपट्टण' असा असून ते दक्षिणपथात असल्याची माहिती आली आहे. [१४]

इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात कोल्हापूर परिसरात मौर्य घराण्याची सत्ता होती. मौर्य साम्राज्यानंतर तेथे सातवाहानांची सत्ता सुरू झाली. सातवाहन काळात कोल्हापूर शहराचा व्यापार रोमशी चालत होता.[१५] कोल्हापूर परिसरात सातवाहनकालीन नाणी मोठया प्रमाणावर

सापडली आहेत. पोहाळे, पांडवदरा व गगनबावडा येथील लेण्यावरून कोल्हापूर परिसरावर सातवाहनांची राजवट होती हे स्पष्ट होते. सातवाहनानंतर चालुक्य व राष्ट्रकुट यांची सत्ता कोल्हापूर येथे स्थापन झाले. हे सामानगड, सांगली व कराड येथे सापडलेल्या ताम्रपटावरून स्पष्ट होते.[१६] चालुक्य राजा विक्रमादित्याने खोची हे गाव ब्राह्मणाला दान दिल्याचा उल्लेख आहे. यावरून कोल्हापूरचा काही भाग चालुक्य सम्राटाच्या अधिपत्याखाली होता हे स्पष्ट होते.[१७]

राष्ट्रकुटानंतर कोल्हापूर प्रांतात शिलाहार घराण्याचा उदय झाला. कोल्हापूर प्रांतात शिलाहार राजांनी जवळ-जवळ २०० वर्षे राज्य केले. त्यांची राजधानी पन्हाळा किल्ला होता. शिलाहार घराण्यात भोज दुसरा हा सामर्थ्यशाली राजा होऊन गेला. तसेच त्याने कोल्हापूर प्रांतात अनेक किल्ले व मंदिरे बांधली. भोज दुसरा या शिलाहार राजाचा यादव घराण्यातील सिंघणदेव यादवाने पराभव करून कोल्हापूर परिसरात आपले साम्राज्य निर्माण केले. त्यांचे हे राज्य इ.स.१३१८ पर्यंत टिकून होते.[१८]

### ५.४.२ मध्ययुगीन कालखंड-

#### अ) बहामनी राजवट-

देवगिरीच्या यादवांचे राज्य संपुष्टात आल्यानंतर कोल्हापूर येथे बहामनी राजवट सुरू होण्यापुर्वी स्थानिक राजांच्यामार्फत तेथील राज्यकारभार सुरू झाला होता. दक्षिणेत बहामनीशाहीची स्थापना ऑगस्ट १३४७ मध्ये झाली. त्यामुळे कोल्हापूर प्रांत नव्याने स्थापन झालेल्या बहामनी राज्यात समाविष्ट झाले. त्यावेळी हसन गंगू बहामनीने राज्यकारभारासाठी जे चार विभाग पाडले होते. त्यातील अहसनाबद(गुलबर्गा) या विभागात कोल्हापूरचा समावेश करण्यात आला होता. इ.स.१३७६ मध्ये महमदशहा बहामनी पहिला याचे वास्तव्य पन्हाळा किल्ल्यावर असल्याची नोंद आहे.

इ. स. १४८९-१५१० या दरम्यान दक्षिणेत बहामनी शाहीची शकले पडून अहमद-नगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, वऱ्हाडची इमादशाही, बिदर- ची बरीदशाही व गोवळकोंडयाची कुतुबशाही असे पाच राज्ये निर्माण झाली. त्यामुळे बहामनीचा प्रदेशही विभागला गेला. या प्रदेश विभागणीमध्ये कोल्हापूर व पन्हाळयाचा प्रदेश आदिलशहाला मिळाला. हा प्रदेश आदिलशहाकडे १५० वर्षे होता. इब्राहिम आदिलशहाने आपल्या राज्यातील किल्ल्याकडे जातीने लक्ष दिले. विशेषतः पन्हाळा किल्ल्याची त्याने डागडुजी करून त्यास

बळकटी आणली. किल्ल्यावर अनेक फारशी शिलालेख असून किल्ल्यातील शिल्पावरही बऱ्याच प्रमाणात मुसलमानी शिल्पकलेची छाप पडलेली दिसते.[१९]

### आ) मराठा कालखंड–

#### शिवकाळ

छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५९ मध्ये अफझलखानाचा वध केल्यानंतर कोल्हापूर पर्यंतचा प्रांत जिंकून घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी त्यांनी पन्हाळा, पावनगड, रांगणा, खेळणा आणि घाटमाथ्याच्या खाली व वर असलेले सर्व किल्ले जिंकून घेतले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने इ. स. १६६० मध्ये सिद्दी जोहर व रूस्तुम जमान ची नियुक्ती केली. त्यांनी पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला असता छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळा किल्ल्यावरून आपली सुटका करून घेतली व विशाळगडाकडे कूच केली. त्यावेळी बाजीप्रभू देशपांडे याने गजापूरच्या खिंडीत सिद्दी जोहरच्या सैन्यास अडवून छत्रपती शिवाजी राजांना विशाळगडाकडे सुखरूप जाऊ दिले. मात्र गजापूरच्या खिंडीत बाजीप्रभुने आत्मबलिदान केल्याने त्या खिंडीस पावनखिंड असे नाव दिले.

इ.स.१६६५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज व मुघल सरदार मिर्झा राजा जयसिंग यांच्यात पुरंदरचा तह झाला. त्या तहातील अटीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांना विजापूरकराविरोधी मोहिमेत सामील व्हावे लागले. १९ नोव्हेंबर १६६५ रोजी मिर्झा राजा जयसिंगाने छत्रपती शिवाजी महाराज व सेनापती नेताजी पालकर यांना पन्हाळा किल्ला जिंकण्यास पाठविले. परंतु यामध्ये छत्रपती शिवाजी राजांना यश मिळाले नाही. म्हणून त्यांनी खेळण्यासह आसपासचे किल्ले जिंकले. पुढे ही अनेकवेळा विजापूरकरांशी त्यांचा संबंध आला होता. ६ मार्च १६७३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने कोल्हापूर व आसपासची अनेक शहरे लुटली.[२०]

#### छत्रपती संभाजी महाराज(इ.स.१६८० ते १६८९)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूसमयी छत्रपती संभाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावर कैदेत होते. कैदेतून सुटका झाल्यावर रायगड किल्ल्यावर झालेल्या बंडाळीविरूद्ध लढण्यासाठी ते रायगडावर गेले. तेथे त्यांनी आपला २० जुलै १६८० रोजी राज्याभिषेक करून घेतला. छत्रपती राजाराम व सोयराबाई यांना कैदेत ठेवले. छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण

कारकिर्द मोगलविरूद्ध लढण्यात, विजापूर आणि गोवळकोंडा यांच्याबरोबर मोगलांच्या विरूद्ध चाललेल्या युद्धात त्या शाहयांना मदत करण्यामध्ये गेली. यावेळी सन १६८१ मध्ये औरंगजेब बाहशहा दक्षिणेत आलेला होता. इ.स.१६८३ ते १६८५ या दरम्यान कोल्हापूर परिसरात मोगल व मराठे यांच्यात अनेक चकमकी झाल्या. परंतु मोगलांना यामध्ये यश मिळाले नाही. सन १६८८ मध्ये सरदार गणोजी शिर्के याच्या ताब्यात सातारा आणि कोल्हापूरमधील डोंगराळ भाग होता. गणोजी शिर्के छत्रपती संभाजी महाराजांच्यावर सूड उगविण्यासाठी मोगलांना जाऊन मिळाला. शेवटी मोगलांनी छत्रपती संभाजी महाराजांना पकडून ११ मार्च १६८९ रोजी ठार केले.[२१]

**छत्रपती राजाराम महाराज–(इ.स.१६८९ ते १७००)**

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांनी १२ मार्च १६८९ रोजी स्वराज्याची सूत्रे हाती घेतली. झुल्फिकारखानने रायगडला २५ मार्च १६८९ रोजी वेढा घातला असता. छत्रपती राजाराम महाराजांनी त्यातून आपली सुटका करून घेऊन प्रतापगडावर येऊन तेथून पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला होता. पुढे मोगलांनी पन्हाळा किल्ल्यावर हल्ले सुरू केल्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीकडे प्रयाण केले. पुढे जिंजीहून ते पुन्हा विशाळगडावर २२ फेब्रुवारी १६९८ रोजी आले होते. त्यावेळी महाराष्ट्रात राजधानीसाठी कोणतेच असे सुरक्षित ठिकाण नव्हते. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी इ.स.१६९८ मध्ये स्वराज्याची राजधानी सातारा केली होती. २ मार्च १७०० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू सिंहगडावर झाला.

**कोल्हापूरचे छत्रपती**

**अ) छत्रपती शिवाजी दुसरा–(१७०० ते १७१४)**

महाराणी ताराबाई या छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी तिने आपला चार वर्षाचा मुलगा दुसरा शिवाजी याचा राज्याभिषेक घडवून आणला. महाराणी ताराबाईने मुघल बादशहा औरंगजेब याच्यासारख्या बलाढय शत्रूशी खंबीरपणे लढा दिला. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजीचा पुत्र शाहू यास मोगलांनी इ.स.१७०७ मध्य कैदेतून मुक्त केले. त्यामुळे मराठा राज्यात दुही निर्माण झाली. त्याचा परिणाम असा झाला की, इ.स.१७१० मध्ये महाराणी ताराबाईने पन्हाळयास स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यामुळे छत्रपती शिवाजी राजांनी निर्माण

केलेल्या स्वराज्याचे विभाजन झाले. पन्हाळयाला स्थापन झालेली स्वतंत्र राजवट पुढे कोल्हापूरची गादी म्हणून प्रसिद्ध झाली. ताराबाईचा कालखंड हा इ.स.१७०० ते १७६१ पर्यंत होता. कोल्हापूरचा परिसर हा महाराणी ताराबाईच्या कर्तबगारीशी निगडीत आहे. महाराणी ताराबाईच्या कर्तबगारीची साक्ष विशाळगड, पन्हाळा, रांगणा हे किल्ले पटवून देतात. महाराणी ताराबाईच्या कालखंडात दुसरा शिवाजी याने इ.स.१७१४ पर्यत कोल्हापूर येथील राज्यकारभार पाहिला.[२२]

**ब) छत्रपती संभाजी दुसरा–(१७१४ ते १७६०)**

छत्रपती राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई हिने महाराणी ताराबाईच्या विरोधात कट करून आपला मुलगा दुसरा संभाजी यास गादीवर बसविले. छत्रपती संभाजी दुसरे हे सत्तेवर येण्यापूर्वी बंदीवासात असल्याने त्यांना राजकारणाचा अनुभव नव्हता. तेव्हा त्यांना राज्यकारभारात रामचंद्रपंत अमात्य यांचा सल्ला घ्यावा लागत होता. अमात्यांच्या मृत्यूनंतर उदाजी चव्हाण हे छत्रपतीचे मदतनीस झाले. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्याकडे दहा सुभ्यांचा आणि सत्तावीस किल्ल्यांचा प्रदेश होता. छत्रपती संभाजी दुसरे व सातारचे छत्रपती शाहू महाराज यांच्यात पटत नव्हते. साताराचे छत्रपती, पहिला बाजीराव पेशवा व निजाम यांच्या शत्रुत्व होते. तेंव्हा निजामाने छत्रपती संभाजी व छत्रपती शाहू यांच्यातील संबंध बिघडतील असे राजकारण सुरू केले होते.[२३]

सातारचे छत्रपती शाहू व कोल्हापूरचे छत्रपती संभाजी यांच्यात १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला. त्यानुसार सातारा व कोल्हापूर राज्यांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. हा तह शाहू महाराजांनी संभाजीराजांना लिहून दिलेला होता. या तहामुळे या दोघांच्यातील संघर्ष संपुष्टात आला. पुढे कधीही दोघांच्यात कसलाही वाद घडून आला नाही. या तहामुळे कोल्हापूर राज्य स्वतंत्र राहिले गेले.[२४]

**तिसरे शिवाजी (इ.स.१७६२–१८१२)**

छत्रपती संभाजी दुसरे निपुत्रिक मरण पावले. त्यामुळे वारसाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा संभाजीराजांची पत्नी जिजाबाई यांनी शहाजी भोसले खानवटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेतले. त्याचे २२ सप्टेंबर १७६२ रोजी शिवाजी असे नामकरण करून राज्याभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी अल्पवयीन असल्याने जिजाबाई कारभार पाहू लागल्या.

राज्यकारभार करताना अडचण निर्माण होऊ नये म्हणून जिजाबाईनी आपल्या नावाचा सोळा कोनी शिक्का तयार करवून घेतला होता. त्यामध्ये ‘शंभू राजस्य भार्याया जिजादेव्या धरातले बालेंदुरिव वर्धिष्णू मुद्राभद्राय विराजते.’ असा मजकूर कोरलेला होता. असा शिक्का करणाऱ्या छत्रपतीच्या घराण्यातील जिजाबाई या पहिल्याच राणी होत्या.[२५]

जिजाबाईच्या मृत्यूनंतर छत्रपती शिवाजी तिसरे यांनी वयाच्या १९व्या वर्षी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. तेव्हा त्यांना करवीरचे सरदार व सैन्य यांनी चांगलीच साथ दिली. त्याच्यामुळे छत्रपतींनी कोल्हापूरचा चांगला राज्यकारभार केला. पेशव्यांच्या कर्नाटकातील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सन १७८८ मध्ये राजधानी पन्हाळयाहून कोल्हापूरास आणली. याशिवाय आणखी काही कारणे त्यास कारणीभूत ठरली होती. राजधानी कोल्हापुरास आणल्यानंतर भुईकोट किल्ला शिवाजी दुसरे यांनी बांधून घेतला. किल्ल्याभोवती खंदक व सर्व बाजूस वेशी बांधून घेतल्या. कोल्हापूर शहाराची पाण्याची सोय व्हावी यासाठी पद्माळे तळे बांधले तसेच कोल्हापूर राज्यास सिधोजीराव निंबाळकर याचा उपद्रव होऊ नये, म्हणून छत्रपती शिवाजी राजांनी इंग्रजाचे साहय मिळविण्यासाठी १ ऑक्टोबर १८१२ रोजी तह केला. त्यानुसार सिंधुदुर्ग इंग्रजांना द्यावयाचे ठरले. निपाणीकर व सावंतवाडीकर यांनी कोल्हापूरचे जे किल्ले व प्रांत घेतले होते ते इंग्रजांना परत मिळवून द्यावयाचे ठरले.[२६]

या तहामुळे छत्रपतीच्या सत्तेला मर्यादा पडल्या. त्यामुळे करवीर छत्रपतींची शंभर वर्षाची चाललेली उज्ज्वल परंपराही संपुष्टात आली. यानंतर कोल्हापूर हे ‘स्वतंत्र राज्य’ न राहता ते इंग्रजी सत्तेच्या खाली एक संस्थान बनले.

### ५.४.३ आधुनिक काळ

### छत्रपती संभाजी तिसरे उर्फ आबासाहेब महाराज(१८१३–२१)

छत्रपती शिवाजी तिसरे यांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या गादीवर त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी तिसरे उर्फ आबासाहेब हे आले. यांच्या काळात इग्रंजांनी पूर्णपणे कारभार आपल्या हाती घेतला नव्हता. आबासाहेबांच्या काळात राणोजीराव घोरपडे खडकेवाडकर यांना डिसेंबर १८१६ मध्ये सेनापती म्हणून निवडण्यात आले. पुढे आबासाहेबांनी राणोजीराव घोरपडे यांचे सेनापती पद काढून घेऊन संताजीराव घोरपडे कापशीकर यास दिले. तसेच आबासाहेबांनी बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकरांशी तह करून इचलकरंजी जहागिरीवर करवीर छत्रपतीचे

वर्चस्व मान्य केले. इचलकरंजीकरांनी दरसाल साडेबाराशे रूपये छत्रपतींना देण्याचे १९ सप्टेंबर १८२० रोजीच्या कराराने केले.[२७]

सिंधोजीराव निपाणीकराने चिकोडी व मनोळी हे दोन मुळचे कोल्हापूर जिल्हयातील तालुके जबरदस्तीने आपल्याकडे घेतले होते. आबासाहेबांनी ते २ ऑगस्ट १८१८ रोजी परत मिळविले होते. आबासाहेबांनी केवळ नऊ वर्षे राज्य केले. आबासाहेबांच्यावर १६ जुलै १८२१ रोजी राजवाडयात खुनी हल्ला होऊन ते ठार झाले.

**छत्रपती शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज(१८२१–१८३८)**

आबासाहेब महाराजांच्यानंतर त्यांचा बंधू बुवासाहेब महाराज यांच्याकडे कोल्हापूरची सत्ता आली कारण आबासाहेबांचा पाच वर्षाचा मुलगा आजारी पडून मरण पावला. बुवासाहेब महाराज गादीवर आल्यानंतर त्यांनी आपल्याला विरोध करणाऱ्या लोकांवर वचक बसवण्यासाठी गव्हर्नर एलफिन्स्टन यांना बोलविले. बुवासाहेब महाराजांच्या काळात सन १८२६ व सन १८२९ असे सरकारबरोबर दोन तह झाले. या तहामुळे छत्रपतींच्या सत्तेवर मर्यादा आल्या. फौजेवर नियंत्रण येऊन कंपनी सरकारचे वर्चस्व निर्माण झाले.[२८]

**शिवाजी चौथे उर्फ बाबासाहेब महाराज(१८३८–१८६६)**

छत्रपती शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज यांच्या निधनानंतर त्यांचा ज्येष्ठ मुलगा बाबासाहेब महाराज हे सन १८३८ मध्ये कोल्हापूरच्या गादीवर आले. राजमाता म्हणून आनंदीबाई उर्फ ताराबाई यांची निवड झाली होती. बाबासाहेब महाराजांच्या काळात राज्यकारभार करीत असताना छत्रपती शहाजी महाराजांची राजमाता सईबाई उर्फ दिवाणसाहेब व राजमाता ताराबाई यांच्यात मोठया प्रमाणावर वितुष्टता निर्माण झालेले होते.[२९] त्यामुळे कोल्हापूर दरबारात राज्यकारभारात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. यांचा फायदा घेऊन इंग्रजांनी कोल्हापूर राज्यात हस्तक्षेप वाढविला. या दरबारात रामचंद्रपंत राजाज्ञा यांनी इ.स.१८४३ ते १८४४ या काळात राज्यकारभार केला. पुढे दाजी पंडितानी कारभार केला. कोल्हापूर राज्यात इ. स. १८४४ मध्ये गडकऱ्यांनी इंग्रजांच्याविरूद्ध उठाव केला. त्यानंतर सामानगडचा उठाव झाला. कोल्हापूर शहर, भुरदरगडचा उठाव, पन्हाळयाचा उठाव, रांगणा व विशाळगडावरील उठाव इत्यादी उठाव झाले. मात्र या बंडवाल्यांना अपयश आले होते. कोल्हापूर राज्यात शांतता निर्माण व्हावी यासाठी मुंबईच्या कंपनीने दरबारात पोलिटिकल

सुपरिटेडेंटची नियुक्ती केली होती. या पोलिटिकल सुपरिटेडेंटची कारकीर्द ही इ.स.१८४५ ते १८५६ पर्यंत होती. त्यानुसार पहिला सुपरिटेडेंट म्हणून सन १८४५ मध्ये कॅप्टन ग्रॅहमची नियुक्ती केली.[३०]

सन १८५७ च्या उठावाला कोल्हापूर राज्यात प्रतिसाद मिळाला होता. हा उठाव दडपून टाकण्यासाठी साताऱ्याहून सदर्न मराठा घोडदळाची ५० घोडेस्वाराची तुकडी घेऊन ब्रिटीश सेनापती केर हा ३ ऑगस्ट १८५७ रोजी कोल्हापूरला पोहोचला. व त्याने हा उठाव दडपून टाकला. १४ ऑगस्ट १८५७ रोजी कर्नल जेकब हा केरच्या मदतीसाठी आला. त्याने हा उठाव मोडण्यासाठी मदत केली. कोल्हापूर येथे ४ डिसेंबर १८५७ रोजी दुसरा उठाव झाला. हा उठाव दडपण्याचे काम कर्नल जेकब याने केले.त्याने या बंडात सहभागी झालेल्यांना मोठया प्रमाणात शिक्षा केल्या.[३१]

सन १८५७ च्या बंडानंतर कर्नल जेकब याची स्पेशल कमिशनर म्हणून नियुक्ती झाली. जेकबला सर्वात जास्त अधिकार देण्यात आले. सन १८६१ मध्ये छत्रपती बाबासाहेब महाराजांच्या नावे राज्यकारभार चालविण्याचे ठरले त्यामुळे कोल्हापूर राज्यासाठीचा पोलिटिकल सुपरिटेंडेट हा रद्द करून पोलिटिकल एजंट हा हुद्दा चालू करण्यात आला. यानुसार हॉवलॉक याची पहिला पोलिटिकल एजंट म्हणून नियुक्ती करण्यात आली. कोल्हापूर राज्यात सन १८४४ व सन १८५७ मध्ये झालेल्या उठावामुळे छत्रपती बाबासाहेब महाराजांनी बंदवाल्यांना मदत न करता कंपनी सरकारशी एकनिष्ठता दाखविली होती. यामुळे कोल्हापूर राज्य खालसा केले नाही. छत्रपती बाबासाहेब महाराजांच्याकडे राज्यकारभार देताना मुंबई सरकारने त्यांच्याकडून काही अटी मान्य करून घेतल्या होत्या.[३२]

छत्रपती बाबासाहेब महाराजानंतर कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती राजाराम महाराज (१८६६-१८७०) व छत्रपती शिवाजी पाचवे (१८७१-१८८३) या कालावधीत राज्यकारभार केला. छत्रपती शिवाजी पाचवे हे मनोरूग्ण असल्याने मुंबई सरकारने १३ मार्च १८८२ रोजी एका निर्णयाद्वारे कागलचे जयसिंगराव घाटगे यांना कोल्हापूरचे रिजंट म्हणून नियुक्त करण्यात आले. मनोरूग्ण राजा सन १८८३ मध्ये निपुत्रिक मरण पावल्यानंतर कागलच्या जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव घाटगे (कागलकर) यास कोल्हापूरच्या गादीचा वारस नेमण्यास हिंदुस्थान सरकारने मान्यता दिली. त्यानुसार १७ मार्च १८८४ रोजी त्यांचा दत्तक विधान

कार्यक्रमानंतर त्यांचा राज्याभिषेक समारंभ पार पडला.[३३]

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर राज्यात अनेक सुधारणा केल्या त्यामुळे कोल्हापूर राज्याची भरभराट झाली. सन १८९६ ते १९०० या कालखंडात छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील लोकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविले होते. त्यासाठी साथीच्या रोगाचे निवारण करण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीच्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर मदत केली. भोगावती नदीवर इ. स. १९०८ मध्ये राधानगरी हे धरण बांधकामास प्रारंभ केला. त्यामुळे शेतीस पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध झाली. शेतीसाठी 'कोल्हापूरी पद्धतीचे' बंधारे निर्माण केले. कोल्हापूर शहरात गुळाची बाजारपेठ निर्माण केली. चहा व कॉफी या पीकांच्या लागवडीस प्रोत्साहन दिले. सन १९१२ मध्ये शेतकऱ्यांसाठी कृषी पतपुरवठा करणाऱ्या संस्थाची स्थापना केली. याशिवाय शेती शिक्षणासाठी एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयुटची सन १९१२ मध्ये स्थापना केली. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेती, व्यापार, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणून कोल्हापूर राज्याचा मोठा विकास घडवून आणला होता.[३४]

**कोल्हापूर – स्वातंत्र्य चळवळ –**

कोल्हापूर जिल्हयातील लोकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय कॉँग्रेसने जे विविध उपक्रम राबविले होते. त्यामध्ये असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग चळवळ, वैयक्तिक सत्याग्रह, चले जाव आंदोलन व भारतीय स्वातंत्र्याचा १९४७ चा लढा या सर्व उपक्रमात सहभाग घेतला होता. कोल्हापूर जिल्हयात प्रजा परिषदेचे कार्य मोठया प्रमाणावर चालू होते. शेवटी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ.स.१९४९ मध्ये कोल्हापूर जिल्हा म्हणून अस्तित्त्वात आला.[३५]

## ५.५ कोल्हापूर जिल्हयातील धार्मिक स्थळे–

कोल्हापूर जिल्हा हा प्राचीन काळात धार्मिक व सांस्कृतिक केंद्र मानले जाते. कोल्हापूरचा प्रदेश हा जैन धर्मांचा बालेकिल्ला समजला जातो. कोल्हापूर शहरातील महालक्ष्मीचे मंदिर व खिद्रापूर येथील जैन मंदिर हे त्याचे प्रसिद्ध अवशेष आहेत. जैन धर्माच्या ऱ्हास काळात हे हिंदू धर्माचे केंद्र व एक शक्तीपीठ बनले. अशा प्रकारची काही निवडक धार्मिक स्थळे या प्रकरणात अभ्यासासाठी घेतलेली आहेत. त्यामध्ये कोल्हापूरचे श्री महालक्ष्मीचे मंदिर,

ज्योतिबा, खिद्रापूर, नरसोबाचीवाडी व बाहुबली इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश आहे.

### ५.५.१ श्री महालक्ष्मी मंदिर–

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठापैकी एक प्रमुख शक्तिपीठ असलेली करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिर हे कोल्हापूर शहरातील एक प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. श्री महालक्ष्मीचे देवालय कोणी बांधले हे निश्चीतपणे सांगता येत नाही. परंतु देवीचे माहात्म्य इ.स.पू.नवव्या शतकापूर्वी प्रस्थापित झाले होते. कारण राष्ट्रकूट राजा प्रथम अमोघवर्ष यांने काही सार्वजनिक आपत्तीच्या निवारणार्थ आपल्या डाव्या हाताची अंगुली महालक्ष्मीला अर्पण केल्याचा उल्लेख त्याच्या संजाण ताम्रपटात आलेला आहे.[३६] श्रीमहालक्ष्मीचे देवालय हे शिलाहारपूर्वी करहाटक येथील सिंदवंशी राजाने बांधले असावे.[३७] त्यापूर्वीच हे ठिकाण शाक्तपीठ म्हणून प्रसिद्ध होते. कोल्हापूरचे शिलाहार राजे या देवीचे निस्सिम भक्त होते. या शिलाहार राजांनी आपणास देवीचा 'वरप्रसाद' मिळाला असल्याचा उल्लेख त्यांच्या अनेक लेखात येतो.[३८]

### श्री.महालक्ष्मीदेवी मंदिराचे वर्णन–

मंदिराच्या मुख्य वास्तूचे दोन मजले आहेत. या मंदिराचे बांधकाम काळया पाषाणात केलेले आहे. मेजर ग्रॅहम याच्या मतानुसार चौदाव्या व पंधराव्या शतकात मुस्लीमांनी या मंदिराची नासधूस केली. त्यावेळी या मंदिरातील महालक्ष्मीची मूर्ती एका खाजगी घरात लपविण्यात आली. पुढे १७२२ मध्ये छत्रपती दुसऱ्या संभाजीने त्या मूर्तीची देवळात प्रतिष्ठापना केली. ही प्रतिष्ठापना करण्यासाठी छत्रपती दुसऱ्या संभाजीने पन्हाळा किल्ल्यावरून सिधोजी हिंदूराव घोरपडेस कोल्हापूर येथे रवाना केले होते. या मंदिराची बांधणी हेमाडपंथीय वास्तूशिल्प पद्धतीने झालेली आहे. या बांधणीचे वैशिष्टये म्हणजे दरजा न भरता एकमेकावर ठेवलेल्या अशा मोठमोठया चौकोणी किंवा आयताकृती दगडात बांधणी करण्यात आलेली आहे. हे मंदिर पश्चिमाभिमुख असून मुख्य प्रवेशद्वारावर नगारखाना आहे. पश्चिम दरवाजाशिवाय पूर्व, दक्षिण व उत्तर दिशेलाही दरवाजा आहे. उत्तर दरवाज्यावर एक मोठी घंटा असल्याने या दरवाजास घाटी दरवाजा असे म्हणतात.[३९]

या मंदिरातील पुर्वेकडील बाजूस असलेल्या मोठया घुमटाच्याखाली महालक्ष्मीची मूर्ती आहे. उत्तरेकडे व दक्षिणेकडे असलेल्या दोन छोटया घुमटीखाली महाकाली व महासरस्वतीच्या

मूर्ती आहेत. महालक्ष्मीची मूर्ती १.२२ मीटर उंच असून ती एका ०.९१ मीटर उंच असलेल्या दगडी चौथऱ्यावर उभी करण्यात आलेली आहे. या मंदिरातील प्रवेशद्वारानंतर मुख्य मंडप आहे. या मुख्य मंडपास गरूड मंडप असे म्हटले जाते. या मंडपाचे बांधकाम इ.स.१८४४ ते १८६७ या कालावधीत झाले आहे. या मुख्य मंडपाच्या दोन्ही बाजूला कोनाडे असून त्यामध्ये कोरीव मूर्ती बसविलेल्या आहेत. यातील प्रमुख मूर्ती म्हणजे भरत आणि शत्रुघ्न यांच्या मूर्ती आहेत. मुख्य मंडपाच्यापुढे मणी मंडप आहे. या मणीमंडपाच्या पाठीमागील बाजूस द्वारपालाच्या जय व विजय यांच्या दोन मूर्ती आहेत.

मंदिराच्या मुख्य इमारतीस अनेक मजले असून त्या ठिकाणी महालक्ष्मीची मूर्ती असलेल्या जागेच्या वरच्या बाजूस एक लिंग आहे. मुख्य मंदिराच्या बाहेरील बाजूस भिंतीमध्ये कोनाडे तयार केलेले असून प्रत्येक कोनाडयामध्ये काळया दगडात कोरलेल्या स्वर्गीय वादक व अप्सरांच्या मूर्ती आहेत. श्री.महालक्ष्मीच्या मुख्य मंदिराभोवती दत्तात्रय, विठोबा, काशीविश्वेश्वर, राम व राधाकृष्ण इत्यादी अनेक लहानमोठी मंदिरे आहेत. मंदिराच्या निरनिराळया भागात चार देवनागरी शिलालेख कोरलेले आहेत. यातील पहिला शिलालेख दत्त मंदिराच्या पाठीमागे असलेल्या हरिहरेश्वर मंदिराच्या भिंतीवर कोरलेला आहे. दुसरा शिलालेख मंदिराच्या पटांगणात प्रवेश करताना डाव्या बाजूच्या एका खांबावर कोरलेला असून तो शके ११५८ मधील आहे. तिसरा शिलालेख मुख्य मंदिराच्या डाव्या बाजूला असलेल्या नवग्रहांच्या छोटया मंदिरातील एका खांबावर आहे. चौथा शिलालेख मुख्य मंदिराच्या पाठिमागे असलेल्या शेषशायी मंदिराच्या डाव्या बाजूला आहे.[४०]

श्री.महालक्ष्मी देवीचा उत्सव वर्षातून तीनवेळा केला जातो. पहिला उत्सव चैत्र पौर्णिमेला होतो. यादिवशी श्री.महालक्ष्मीची पितळी प्रतिमा पालखीत घालून मिरवणूक काढण्यात येते. दुसरा उत्सव आश्विन महिन्यातील पंचमीच्या दिवशी साजरा केला जातो. या दिवशी कोल्हापूरपासून ४.८३ कि. मी. वर असलेल्या टेंबलाईच्या मंदिरापर्यंत महालक्ष्मीच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढली जाते. त्यावेळी कसबा बावडा गावाचा जो प्रमुख असतो त्याच्या अविवाहित मुलीकडून टेबंलाईला कोहळयाचा नैवद्य दाखविण्यात येतो. आश्विन पौर्णिमेला दिवे व ज्योती लावून मंदिर सजविण्यात येते. देवीला महाप्रसाद अर्पण करण्यात येतो. कार्तिक व माघ महिन्यात महालक्ष्मीच्या मंदिराच्याबाबत एक विलक्षण घटना अनुभवता

येते ती म्हणजे या दिवशी सूर्यकिरणे महाद्वारातून प्रवेश करून गाभाऱ्यापर्यत पोहोचतात. तेथून ते महालक्ष्मीच्या प्रतिमेवर परावर्तित होतात. ही किरणे प्रथमतः महालक्ष्मीच्या पायावर पोहोचतात आणि तेथून हळूहळू तिच्या मस्तकापर्यत जातात. ही घटना पाच मिनिटे चालू असते. या दिवशी देवीला खास प्रार्थना केली जाते. हा मुहूर्त मंदिराचा पुजारी पंचांग पाहून ठरवितात. ही घटना घडण्याचे कारण असे आहे की, मंदिराची बांधणी अशा तऱ्हेने केलेली आहे. वर्षातून केवळ दोन दिवशी सूर्यकिरणे देवीच्या अंगावर पडतात.[४१]

**श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील शिलालेख**

मंदिराच्या निरनिराळया भागात चार देवनागरी शिलालेख कोरलेले आहेत.

**१) चालुक्य नृपती सोमदेव शिलालेख–**

हा शिलालेख कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या देवालयात आहे. या शिलालेखाची भाषा संस्कृत असून बाळबोध लिपीत आहे. या शिलालेखात वर्ष  व तिथी यांचा उल्लेख नाही. या शिलालेखाचा सारांश हा लेख चालुक्य नृपती सोमदेव याच्य अमदानीतील आहे. सोमदेव महालक्ष्मीच्या मध्यान्ह पूजेला आला असताना उपाध्यायाच्या व इतर ब्राह्मणांच्या विनंतीवरून त्याने कंभरगी हे खेडे दान दिले असा उल्लेख या लेखात आहे. हा लेख विद्याधर पंडित याने लिहिला आहे.[४२]

**२) यादव सिंघण, शिलालेख**

हा शिलालेख श्री.महालक्ष्मी मंदिराच्या आवारातील गणेश मंदिराच्य पायऱ्याच्या उजव्या बाजूला असलेल्या स्तंभावर कोरलेला आहे. हा शिलालेख यादव नृपती सिंघणदेव याच्या अमदानीतील आहे. या शिलालेखाची भाषा संस्कृत असून इ. स. ११ व्या किंवा १२ व्या शतकातील नागरी लिपीत कोरलेला आहे. या शिलालेखाचा कालखंड शके ११४०, बौद्धायन संवत्सर, इ.स.१२१८ हा आहे. या लेखाचा उद्देश तैलण नामक व्यक्तीने श्री.महालक्ष्मी मंदिराचे समोर तोरण बांधले असे नमूद केले आहे.[४३]

**३) यादव जयसिल व सिंघणदेव–**

शिलालेख श्री.महालक्ष्मी मंदिराच्या पश्चिम द्वारासमोर असलेल्या पायऱ्यासमोर सापडला आहे. हा शिलालेख यादव नृपती जयसिल व सिंघणदेव यांच्या काळातील आहे. या शिलालेखातील लेखाची भाषा संस्कृत असून लिपी प्राचीन बालबोध आहे. हा शिलालेख

सोमवार माघ शुद्ध १५, दुर्मखी संवत्सर, शके ११५८, इ.स.१२३६ मध्ये कोरलेला आहे. हा लेख कोरण्याचा उद्देश जयसिल याने चंद्रग्रहण प्रसंगी, सौवर्ण जटेश्वराला धूप, दीप, नैवेद्य, दाखविण्यासाठी काही सरकारी उत्पन्न दान दिले. हे नमूद करणे हा होता.[४४]

**४) यादव नृपती महादेव–**

श्री महालक्ष्मीच्या आवारात असलेल्या नवग्रह मंदिराच्या रंगमंडपाच्या स्तंभावर हा शिलालेख कोरलेला आहे. हा शिलालेख यादव नृपती महादेव याच्याविषयी माहिती दिलेली आहे. या शिलालेखाची भाषा संस्कृत असून लिपी १३व्या शतकातील नागरी लिपी आहे. हा शिलालेख शके ११८७ क्रोधन संवत्सर, माघ शुद्ध पौर्णिमा, शुक्रवार, २२ जानेवारी, १२६६ रोजी कोरलेला आहे. हा लेख देवगिरीच्या यादव नृपती महादेव याच्या अमदानीतील आहे. या लेखाचा मुख्य उद्देश पंडित कनकचंद्र आणि हेगडे वसवदेव यांनी ईश्वरकेशव व नरसिंह यांना नेमादेवी बसतीची व्यवस्था ठेवण्यासाठी काही जमीन देणगी दिली आहे.[४५]

**५.५.२ ज्योतिबा–**

कोल्हापूर शहराच्या वायव्येस २० कि.मी. अंतरावर पन्हाळागडाच्या समोर ज्योतिबाचा डोंगर आहे. समुद्रसपाटीपासून या डोंगराची उंची ३१०० फूट इतकी आहे. या ज्योतिबाच्या डोंगरास 'वाडी रत्नागिरी' असे म्हणतात. या डोंगरावरील पठारी भागात ज्योतिबाचे मंदिर व गाव वसलेले आहे. या ज्योतिबाच्या डोंगरावर तीन प्रमुख देवालये आहेत. ज्योतिबाचा अवतार असलेल्या केदारलिंग, केदारेश्वर व रामलिंगाची आहेत. ज्योतिबाचे मंदिर हे कोल्हापूरच्या दिशेला तोंड करून उभे आहे. त्यामुळे ज्योतिबा जणू कोल्हापूरच्या श्री.महालक्ष्मीच्या मंदिराचे रक्षण करण्यासाठी उभा आहे असे समजले जाते.

**ऐतिहासिक महत्त्व–**

डोंगरावर एका प्रशस्त आवारामध्ये, तटबंदीत ज्योतिबाचे मुख्य मंदिर आहे. त्यास तीन बाजूने प्रवेशद्वारे आहेत. त्यापैकी पश्चिम द्वाराच्या उजवीकडील भिंतीवर संस्कृत भाषेत एक शिलालेख आहे. आवारामध्ये मध्यभागी ज्योतिबाचे मुख्य मंदिर आहे. त्याच्या सभोवती दीपमाळा आहेत. ज्योतिबाचे मंदिर अतिशय जुने असून त्याचा पहिला जिर्णोद्धार किवळ गावचे पाटील बावजी ससे यांनी केला आहे. ज्योतिबा हे ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याचे कुलदैवत आहे. त्यामुळे या मंदिराचे बांधकाम प्रशस्त व संस्थानी पद्धतीचे आहे. पुढे मुख्य मंदिराच्या

परिसरातील तलाव, उंच दीपमाळा, व कामधेनूची प्रतिमा आहे. ज्योतिबाचे मूळ मंदिर कराडजवळच्या किवळ येथील रावजी नावाच्या भक्ताने बांधले होते. पुढे सन १७३० मध्ये ग्वाल्हेरचे राणोजीराव शिंदे यांनी मूळच्या ठिकाणी हे भव्य स्वरूपात पुनर्रचित करून उभारले. हे मंदिर साधे असून त्याचे बांधकाम उत्तम प्रतीच्या काळया बेसॉल्ट दगडांत केलेले आहे. मंदिराच्या उत्तरेस तेरा व पूर्वेस सतरा त्याचप्रमाणे पश्चिम व दक्षिणेकडे काही ओवऱ्या आहेत. मंदिराची लांबी ५७ फूट व रूंदी ३७ फूट असून त्याच्या शिखराची उंची जमिनीपासून ७७ फूट आहे. मंदिराचा सभामंडप सहा कमानीवर उभा असून त्याला कुठेही स्तंभाचा आधार दिलेला नाही. मंदिरात एक पांडवशाळा असून इथे पांडवाच्या मूर्ती आहेत. याशिवाय कृष्ण, विठ्ठल–रखुमाई यांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यासमोर उभी असलेली भीमाची गदाधारी पाषाणमूर्ती आहे. देवासमोर तुळशी वृंदावन व नंदी असून सभामंडपात कासवाची मूर्ती आहे.[४६]

मंदिरातील गर्भगृहात ज्योतिबाची दक्षिणाभिमुख मूर्ती आहे. ज्योतिबाची मूर्ती कोल्हापूरी पगडीतील असून घोडयावर स्वार आहे. काळया निळसर घोटीव पाषाणात घडविलेल्या या चतुर्भूज मूर्तीच्या हातात खड्ग, पानपात्र, डमरू व त्रिशूल आहे व मस्तकावर गंगा आहे. शेजारी ज्योतिबाच उपवाहन शेष आहे. मंडपात डाव्या बाजूला गणेशाची मूर्ती आहे. उजव्या बाजूस भैरवाची मूर्ती आहे. ज्योतिबाचा शरीररक्षक काळभैरव बाहेरच्या बाजुस असून, तेथे मूळ ज्योत तेवत असते.[४७]

मंदिराच्या आवाराच्या भोवताली तटबंदीमध्ये तीन बाजूला प्रशस्त ओवऱ्या आहेत. त्याशिवाय मंदिराच्या बाहयांग भागावर काही ठिकाणी शिल्प कोरलेली आहेत. यातील भैरव, शेषशायी ही शिल्पे उत्कृष्टपणे कोरलेली आहेत. जोतिबा डोंगरावर अनेक लहानमोठी मंदिर आहेत. डोंगरावर उत्तरेस यमाई देवीचे मंदिर राणोजीराव शिंदे यांनी सन १७५० मध्ये बांधलेले आहे. या मंदिरासमोर दोन कुंडे आहेत. यापैकी एक कुंड जिजाबाईने सन १७४३ मध्ये बांधलेले आहे. दुसरे कुंड जमदग्नीतीर्थ हे राणोजीराव शिंदे यांनी बांधले आहे. याशिवाय डोंगरावर अनेक कुंडे आहेत. त्यापैकी कुशावर्त कुंडातून झरा बाहेर पडतो त्याला गोडा झरा म्हणतात, तर उत्तरेकडून एक झरा खाली जाऊन पुढे तो वारणा नदीस मिळातो त्याला हेमवती नावाने ओळखतात.[४८]

### ज्योतिबाचा उत्सव

चैत्री पौर्णिमेस मोठया थाटात ज्योतिबा आणि यमाई देवी यांचा विवाह सोहळा पार पडतो. त्या दिवशी दुपारी १२ वाजता ज्योतीबाला पालखीत बसवून यमाईदेवीकडे वाजत गाजत नेले जाते. त्या वेळी गुलाल खोबरे उधळले जाते. ज्योतीबाची पालखी यमाई मंदिरासमोर येताच मंदिरससमोरील चौथऱ्यावर ठेवली जाते. पुढे देवीपुढे खंजीर ठेवून हा सोहळा पार पडतो.[४९]

ज्योतिबाच्या यात्रेतील एक वैशिष्टपूर्ण देखावा म्हणजे निरनिराळया गावाहून देवापुढे नाचवण्यासाठी आणलेल्या काठया होत. यापैकी काही काठया मानाच्या असतात. त्या देवाच्या पालखी पुढे नाचविल्या जातात. सातारा तालुक्यातील पाडळीची 'फाळक्यांची काठी' व निनाम पाडळीची 'ढाण्यांची काठी' या मानाच्या काठया असतात. या यात्रेत ज्योतिबाच्या नावान चांगभल असा गजर केला जातो.[५०]

### ५.५.३ नरसोबाची वाडी–

शिरोळ तालुक्यात शिरोळपासून दक्षिणेस ५ कि.मी. अंतरावर कृष्णा व पंचगंगा नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. कोल्हापूर शहरापासून पूर्वेला ४० कि.मी अंतरावर आहे. या ठिकाणी दत्त अवतार नरसिंह सरस्वतीचे १२ वर्षे वास्तव्य होते. त्यांचा जन्म मराठवाडयातील कारंजा गावात झाला. त्या ठिकाणी त्यांनी अंबा व माधव यांच्या पोटी जन्म घेतला. पुढे तीर्थाटन करून त्यांनी काशीमध्ये आद्य शंकराचार्यांच्या परंपरेतील श्रेष्ठ संन्याशी, कृष्ण सरस्वती यांच्याकडून संन्यस्त दीक्षा घेतली. तसेच नृसिंहवाडी येथे सन १४५६ मध्ये येऊन वास्तव्य केले. म्हणून या ठिकाणाला वाडी नरसिंह या नावाने ओळखले जाते. या गावामध्ये दत्तात्रय व नारायणस्वामी यांची मंदिरे आहेत. दत्तात्रयांचे मंदिर गावाच्या दक्षिणेला कृष्णा नदीच्या काठावर आहे. हे मंदिर हेमाडपंती शैलीतील असून त्याच्या कळसाचा आकार थोडा वेगळया पद्धतीचा आहे. औदुंबर वृक्षाखाली सुमारे ३.३५ मीटर उंचीच्या १८ खांबावर छताखाली हे लहानसे मंदिर आहे. मंदिराचा गाभारा दर्शनी बाजूने चांदीच्या पत्र्याने मढविलेला आहे. त्यावर नक्षीकाम केलेले आहे. या ठिकाणी गाभाऱ्यात जाण्यासाठी १ फूट×१ फूट अशी खिडकी आहे. या मंदिरात दत्तात्रेयांच्या पादुका आहेत. मंदिरापुढे ४२ मीटर लांब व ३९ मीटर रूंद अशा पायऱ्या बांधलेल्या आहेत. नारायणस्वामींचे मंदिर दत्तात्रय मंदिराच्या पश्चिमेला आहे.

खुद्द दत्तात्रेयांनी नारायणस्वामीला अध्यात्माविषयक ज्ञान प्राप्त करून दिले. अशी आख्यायिका आहे.[५१]

नरसोबाचीवाडी येथे वर्षभर विविध धार्मिक विधी व उत्सव साजरे केले जातात. त्यापैकी महत्त्वाचा उत्सव म्हणजे गुरूप्रतिपदा माघ शुद्ध पौर्णिमा ते माघ कृष्ण पंचमीपर्यंत सहा दिवस सर्वात मोठा उत्सव साजरा केला जातो. श्रीकृष्णवेणी उत्सव माघ शुद्ध ७ ते वद्य १ पर्यंत दहा दिवस होतो. श्रीनृसिंह सरस्वती जन्मोत्सव मार्गशीर्ष ११ ते पौष शु. २ असा सात दिवस असतो. दत्तजयंती उत्सव मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मोठया प्रमाणावर साजरा केला जातो. हा महोत्सव मार्गशीर्ष शु. ७ ते १५ असा असतो. आश्विन वद्य द्वादशी दिवशी दत्त महाराज या भूतलावरून अदृश्य झाले अशी समजूत आहे. या दिवशी गावामध्ये मोठी यात्रा भरते. या ठिकाणी प्रामुख्याने भूत पिशाच्चापासून सुटका करून घेण्यासाठी सेवेकरी येऊन राहतात. बेळगाव जिल्हयातील औरवाड आणि गौरवाड ही दोन खेडी विजापूरच्या अली आदिलशहाने देवाला इनाम दिली होती. सन १९७१–७२ पासून २७३२ रूपये सालीना नक्त देणगी मिळते. याशिवाय श्री. छत्रपती संस्थान कोल्हापूर व पटवर्धन संस्थानिक यांच्या कायम स्वरूपाच्या देणग्या देवस्थानास मिळतात.[५२]

### ५.५.४ खिद्रापूर–

कोल्हापूर जिल्हयातून शिरोळ तालुक्यात कोल्हापूरच्या आग्नेय दिशेला ६५ कि. मी. अंतरावर कृष्णा नदीच्या काठावर महाराष्ट्र कर्नाटक सीमेजवळ आहे. याचे खरे नाव आहे वाडी कोप्पेशवर. परंतु इ.स.७५९ मध्ये खिदरखान फणी याच्या ताब्यात हा भाग होता. त्यानेच या गावाला खिद्रापूर हे नाव दिले. तेंव्हापासून हे गाव खिद्रापूर नावाने ओळखले जाते. खिद्रापूरचे कापेश्वराचे मंदिर स्थापत्य व शिल्पशैलीच्या दृष्टीने उकृष्ट आहे. या मंदिराभोवती एक मोठा दगडी प्राकार असून प्रवेशद्वार साधे आहे. कोपलेश्वराच्या मंदिराचे आवार प्रशस्त आहे.[५३]

**स्थापत्यरचना**

महाराष्ट्रातील प्राचीन हेमाडपंती देवळाची मानचित्रदृष्टया विभागणी ही सामान्यपणे गर्भगृह(गाभारा), गूढमंडप, त्या दोघांना जोडणारे अंतरळ आणि मुखमंडप अशी असते. मंदिरात प्रवेश करताना सुरूवातीस हा मंडप असतो, म्हणून त्याला मुखमंडप असे म्हणतात. देवळापासून वेगळा नंदीमंडप नसल्यास काही वेळा मुखमंडपात नंदीची स्थापना केलेली

आढळते. कोप्पेश्वराच्या मंदिराचे वैशिष्टये म्हणजे अशा प्रकारची नेहमीची आखणी त्याची रचना करताना बाजूला ठेवलेली दिसते. कोप्पेश्वर मंदिरात अर्धमंडपाच्या ऐवजी तिन्ही बाजूंनी प्रवेशद्वारे असलेला मध्यभागी एका गोलाकृती शिळेच्या सभोवार उभारलेला एक मोठा मंडप आहे. मंडपाच्या कडेने भिंतीऐवजी थोडा उंच कठडा बांधलेला आहे. [५४]

**स्वर्ग मंडप**

मुखमंडपाच्या आगळेपणामुळे स्थानिक समजुतीप्रमाणे मध्यभागी गोल शिळेवर उभा राहणारा भाविक स्वर्गाला जातो. म्हणून त्याला स्वर्ग मंडप असे म्हणतात. मंडप एकूण ४८ खांबावर आधारलेला आहे. त्यातील शिळेभोवतालचे १२ खांब गोलाकार पद्धतीने उभारलेले असून प्रत्येकी ९ असे ३६ खांब चारही दिशांना आहेत. या मंडपातील शिळेवर उभे राहिल्यास मंडपाच्या रचना कौशल्याचा प्रत्यय येतो. या खांबावर मंडपाचा घुमट उभारलेला आहे. खांबावर भव्य स्तंभशीर्ष असून त्यावर रूंद तुळया आहेत. तुळयावर लहान लहान देव्हारे कोरले असून त्यावर छताचा भाग सुरू होतो. हे छत घडीव दगडाच्या एकापेक्षा एक लहान होत जाणाऱ्या या गोलाकार तुळयांचे केले आहे. या तुळयांच्यावर क्रमाने लहान होत जाणाऱ्या अर्धगोलात नाजूक नक्षीकाम केले आहे व प्रत्येक अर्धगोलातून एक कमळाच्या कडीसारखा लोलक खाली डोकावत आहे. अशा प्रकारची सुंदर नक्षी असलेले व मध्यभागी कमळाच्या आकाराचे झुंबर असलेले घुमट राजस्थान व गुजरातमधील समकालीन मंदिरातील रंगमंडपात आढळून येतात. खांब छतांना जोडणाऱ्या ब्रॅकेटला दिक्पाल व इंद्रादी देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. [५५]

**सभामंडप–**

स्वर्गमंडपानंतर मोठा सभामंडप आहे. याच्या चारही बाजूना भिंती असल्याने शिल्पशास्त्राच्या परिभाषेत याला झाकलेला म्हणजे गूढमंडप म्हणतात. उत्तर व दक्षिण या दोन्ही बाजूंनी मंडपाला भव्य प्रवेशद्वारे आहेत. त्यांना जोडून पायऱ्या आहेत. प्रवेशद्धाराला जोडून प्रत्येक बाजूला एकेक असे दोन खांब आहेत. व तळाशी लहान कोनाडयात वेलांचे चित्रण केले आहे. प्रवेशद्वाराला एकापेक्षा एक खोल जाणाऱ्या द्वारशाखा असून स्वागतासाठी द्वारपाल म्हणून प्रत्येक बाजूला पाच–पाच देव–देवता आहेत. मधल्या द्धारशाखेतील नाजूक खांबावर पाच खोल्यांचा नगारखाना कोरलेला आहे. गूढमंडपाची मांडणी बारा खांबाच्या या चौकोनी मंडपाभोवती चौकोनाकृतीत वीस खांब आहेत. त्यापलीकडे मंडपाच्या भिंती आहेत. एवढा

विस्तृत मंडप महाराष्ट्रातील बांधीव देवळात इतरत्र कमी असेल. या मंडपाला थोडासा उजाळा मिळावा म्हणून दोन्ही बाजूंना प्रशस्त गवाक्षे आहेत. [५६]

**गर्भगृह**

सभामंडपानंतर मंदिराचा गाभारा आहे. या गाभाऱ्यात स्वयंभू कोपेश्वराची पिंड विराजमान आहे. मुखमंडपापासून गाभाऱ्याकडे जाताना अंधःकार वाढतच जातो. कदाचित सिमेंट अथवा चुन्याचा प्रचूर वापर नसलेल्या प्राचीन स्थापत्य पद्धतीचाही हा दोष असू शकतो. अशा गाभाऱ्यात प्रवेश केल्यानंतर पूर्णपणे अहंकार–विरहीत मन संथ तेवणाऱ्या नंदादीपाच्या साक्षीने शिवात विरघळून जाते. गाभाऱ्यातील भिंतीवर कोठेही नक्षीकाम किंवा शिल्प कोरलेली नाहीत. गाभाऱ्याच्या भिंतीच्या बाहय भागावर चित्रे कोरलेली आहेत.

मंदिराचा गाभारा हा तारकाकृती विन्यासीच्या निरनिराळया बिंदूवर भिंतीत अर्थस्तंभाची उभारणी केली आहे. त्याच्या दोन बाजूवर तसेच उरलेल्या भिंतीच्या पृष्ठभागावर शिल्पांची मनोरम रचना दोन स्तरावर केलेली आहे. त्यात मुख्यत्वेकरून सुरसुंदरींचा समावेश आहे. त्या नृत्य मुद्रात मग्न आहेत.

गाभाऱ्याच्या उत्तर, दक्षिण व पश्चिम दिशांना थोडेसे पुढे आलेल्या भागात तीन लहान देवळयांची रचना केलेली आहे. या देवळयात चित्रे कोरलेली आहेत. गाभाऱ्याच्या बाहयांगावर साहाजिकच शैव मूर्तीचे चित्रण मोठया प्रमाणावर आहे. त्यामध्ये तांडवात व लास्यात मग्न असलेले शिवपार्वती, त्यांच्या आजूबाजूला साथ देणारे गण व सावळयाच्या रूपातील भृंगरीट, एकमेकांच्या जवळ खेटून बसलेले अलिंगन मुद्रेतील उमामहेश्वर, हातात त्रिशूल घेऊन भाळी चंद्र धरलेला चंद्रशेखर अशा सौम्य मूर्ती आहेत. तसेच रौद्र मूर्ती ही आहे. मदोन्मत अंधकासुराच्या बेफाट कृत्यामुळे क्रुर झालेल्या रूद्राने आपल्या समोरच्या दोन हातात शूलावर त्याला धरून भिरकावून देण्याच्या पवित्र्यात असलेला शंकर या ठिकाणी दाखविला आहे. [५७]

**शिल्पकला–**

कोपेश्वराच्या बाहय भिंतीवर शिवाच्या व्यक्तिमत्त्वाची पैलू आणि शिवलिलामृतातील अनेक प्रसंग कोरलेले आहे. या ठिकाणी रौद्र स्वरूपातील शिव युद्धखेळात मग्न असतानासुद्धा पार्वती त्याला साथ देत आहे. या शिवलिलामृतात शिवाचा परिवार दाखविला आहे. यामध्ये पार्वती बरोबर महिषासूर मर्दिनी दुर्गा, स्कंद कार्तिकेय, गणेश यांची चित्रे कोरलेली आहेत. या

ठिकाणी विष्णू व त्याचे वराहवतार याचे सुंदर चित्रण केलेले आहे. या चित्रावरून हे स्पष्ट होते की, पंथापथांतील सहिष्णुतेचे संबंध निदान या काळात तरी टिकून होते. एवढेच नव्हे तर काही कुलदेवता या निरनिराळया पंथात असल्याने हे संबंध निकटचे होण्यास मदत झाली आहे. याचे उदाहरण म्हणजे उत्तरेकडील प्रवेशद्वारालगत असलेली सरस्वतीची मूर्ती ही देवता असून बसलेल्या स्वरूपात आहे. तिच्या चार हातात अनुक्रमे जपमाळ, अंकूश, पाश व पोथी आहे. अशीच मूर्ती कोप्पेशवरापासून थोडया अंतावर असलेल्या समकालीन जैन मंदिराच्या गाभाऱ्याच्या भिंतीवर कोरलेली आहे. जैन शिल्पपरंपरेप्रमाणे ती सोळा श्रुतदेवता व महामानसी यापैकी श्रुतदेवतेच्या ध्यानाशी मिळतीजुळती आहे. सरस्वतीचे अशा प्रकारचे रूप जैन व उरलेल्या हिंदू समाजात लोकप्रिय आहे.[५८]

**स्थापत्य रचनेची वैशिष्टये**

कोप्पेश्वराच्या स्थापत्य रचनेचे वैशिष्टये म्हणजे गाभारा व मंडपाच्या जोत्याची घडण हे होय. सर्वसामान्य हेमाडपंती मंदिराचे जोते सरळ सपाट असून पुढे गेलेले नक्षीचे थर एकावर एक दाखवलेले असतात. या निरनिराळया थराचा आकार क्वचित चौकोनी, थोडा फुगवटा आलेला अथवा पसरलेल्या कमळ दलाप्रमाणेही असतो. त्यातील एकेकावर व्यालमुख, किर्तीमुख, गज, अश्व अथवा वेलबुट्टी किंवा नक्षीदार चौकट अशाप्रकारचे नक्षीकाम असते. या सर्व थरांना बाजूला सारून सांत्वन करीत भीम दिसतो. मानवी आयुष्याचा पसारा हाच या थराचा विषय असल्याने कुठे आपल्या शिष्यांना उपदेश करणारा उच्चासनावर बसलेला राजयोगी, कुठे तंत्रविद्योतील सिद्धीसाठी परिश्रम करणारा कापालिक, दिंगबरावस्थेत हिंडणारा जोगी तसेच त्यांना लोभविणाऱ्या अप्सरा दिसतात. संस्कृत वाङ्मयातील एक लोभसवाणा विषय म्हणजे त्यातील विविध प्रकारच्या नायिका होत. या नायिक या ठिकाणी मूर्तिमंत दिसतात. या नायिका कधी नृत्यमग्न, कधी कंदूक क्रीडामग्न, कधी प्रियकरासोबत शृंगारमग्न असलेल्या दाखविल्या आहेत. [५९]

**जोत्याची रचना–**

या मंदिराच्या छतावरचा भाग मूळ स्वरूपात शिल्लक नाही. स्वर्गमंडपाचे छत कोसळून त्यात खिंडार पडले होते. पुरातत्त्व विभागाने त्यावर कॉंक्रिटचा स्लॅब टाकून खिंडार बुजविले आहे. अनेक ठिकाणी कोसळेल्या शिखराऐवजी चुना व विटांनी बांधलेली विशोभित दिसणारी

एका वेगळया प्रकारची रचना ज्योत्यात केली आहे. जोत्याच्या पायथ्यापासून त्याच्या मध्यापर्यंत मंदिराकडे पाठ करून उभे असलेले हत्ती ओळीने दाखविलेले आहेत. त्यांच्या पाठीवर जणू ३३ कोटी देवतापैकी काहींनी तरी स्थान पटकावले आहे. शिल्पशास्त्राच्या संकेतानुसार हत्ती हे बुध व इंद्र यासारख्या काही निवडक देवतांचेच वाहन आहे. पण तो संकेत या ठिकाणी झूगारून लावलेला आहे. हत्तीच्या पाठीवर ब्रह्मा, विष्णू व त्याच्या चतुविशती अवतारातील काही मूर्ती व लकुलीशासारखे योगी विराजमान झालेले आहेत. याला अपवाद आहे तो फक्त शिवाचा, मंदिराच्या उत्तर, पश्चिम व दक्षिणेकडे मध्यभागी शिवाच्या मूर्ती असून त्या नंदीवर विराजमान आहेत. या शंभर हत्तींच्या रांगेमुळे जोत्याला एक वेगळे देखणेपण लाभले आहे. अशा प्रकारचे जोते वेरूळच्या कैलास लेण्यात पाहावयास मिळते.

जोत्यावरच्या नरथरात 'महाभारत' व 'रामायण' या महाकाव्यातील प्रसंग, 'पंचतत्र' इत्यादी उपदेशपर वाङ्मयातील सरस कथा व अवतीभोवतीच्या मानवी आयुष्यातील प्रसंग, क्वचित प्रसंगी शृंगारिक यावर आधारलेली शिल्पे कोरलेली आहे. कोप्पेश्वराच्या जोत्यावर नरथर नसला तरी हत्तीच्या चित्रणातील विभाजक रेषा म्हणून कोरलेल्या अर्धस्तंबाचा त्यांनी नरथरासारखा उपयोग करून घेतले. मधून एखाद्या खांबावर राम अथवा सीतेपुढे अंजनी मुद्रेत लीनतेने उभा असलेला मारूती दिसतो. त्याच्यापुढे दास्याची शिखरे आहेत. जवळ असलेल्या जैन मंदिराचे शिखरही मराठा कालीन पद्धतीचे आहे. पण त्याचे काम सुबकपणे असल्याने ते सुशोभित दिसते. मंदिराचे बारकाईने निरीक्षण केल्यास तो अंशतः ही सोडविता येईल. स्वर्ग मंडपातील काही खांबावर गाभाऱ्याच्या भिंतीतील पश्चिम, उत्तर व दक्षिणेला असलेल्या देवळयावर शिखरांचे नमुने कोरलेले आहेत. ही शिखरे एकाच पद्धतीने कोरण्याची पद्धत नाही. उलट कर्नातकातील आणि दक्षिण महाराष्ट्रातील मंदिरावर भारताच्या निरनिराळया भागांत प्रचलित असलेले शिखरांचे नमुने कोरलेले आहेत. असे नमुने कोरण्यामागे देवालय उभारणारा रथपती हा बहुश्रुत होता. त्याला उत्तर दक्षिणेतील मंदिराचे विविध नमुने व पर्यायाने शिल्पशास्त्र येते. हे दाखविले गेले आहे.[६०]

स्वर्गमंडपामुळे विन्यास दृष्टया, हत्तीच्या रांगेच्या अलंकरणामुळे व कोरलेल्या विविध देवतांच्यामुळे मूर्तिविद्येच्या दृष्टीने या देवळाने महाराष्ट्राच्या मंदिरात आपले एक विशिष्ट स्थान निर्माण केले आहे.

**मुख्य शिलालेख–**

मंदिराच्या मुख्य मंडपाच्या दक्षिण दरवाजालगत मोठा देवनागरी लिपीतील शिलालेख आहे. हा शिलालेख श्री शके ११३६ श्रीमुख संवत्सराच्या चैत्र अमावस्येच्या मुहुर्तावर कोरलेला असून यादव सम्राट सिंघणदेव याने कोप्पेश्वराला उद्देशून दिलेल्या दानाचा त्यात तपशील आहे. सूर्यग्रहणाच्या निमित्ताने श्री सिंघणदेवाने श्रीकोप्पेश्वर महादेवाच्या पूजाअर्चासाठी व देवालयाच्या मंडपात होणाऱ्या नैत्यनैमत्तिक नृत्य कीर्तनादी प्रसंगासाठी कृष्णवेणी व भेणसी नद्यांच्या संगमावरील 'कूडलदामवाड' नावाचे गाव दान दिले. हे गाव मिरंजी देशात होते. लेखात म्हटले आहे की, यापूर्वी कोप्पेश्वराला उद्देशून दान म्हणून दिलेल्या जुगूल व सिरिगुप्प या गावाचे उत्पन्न मंदिरास मिळत असे ते पुन्हा दिले. वरील उल्लेखावरून हे निश्चितपणे सांगता येईल की, सन १२१३ मध्ये हा लेख कोरण्यापूर्वी श्री सिंघणदेवाने मिरज कोल्हापूरच्या भागात आपले वर्चस्व स्थापित केले होते. सिंघनदेवाच्या इतर लेखातील उल्लेखावरून त्याने कोल्हापूर व पन्हाळा येथे राज्य करणाऱ्या भोजदेवाचा निःपात करून या भागात आपला अमंल बसविल्याची माहिती मिळते. शिलाहार सत्तेच्या शेवटी इ. स. च्या १२ व्या शतकाच्या अखेरीस या देवळाचे बांधकाम झाले आहे.[६१]

**५.५. ५ बाहुबली–**

**हे** ठिकाण कोल्हापूरपासून २९ कि.मी. अंतरावर बाहुबली हे ठिकाण हातकणंगले तालुक्यात आहे. हे ठिकाण कुंबोज गावाच्या पश्चिमेस ३ कि.मी. अंतरावर आहे. हे एक तीर्थस्थान असून त्याचा परिसर हा पूर्वी घनदाट अरण्य व निसर्ग सौंदर्याने नटलेला होता. सुमारे तीनशे वर्षापूर्वी मुनिश्री १०८ बाहुबली महाराज येथे ध्यानसाधना करीत असत. हे निर्ग्रंथ मुनी म्हणजे सांगली जिल्हयातील मौजे नांद्रे येथील बाळगौंडा पाटील होत. अकरा प्रतिमापूर्वक मुनिधर्म स्वीकारल्यानंतर त्यांना बाहुबली महाराज हे नामाभिधान प्राप्त झाले होते. त्यांच्या नावावरून पूर्वीच्या कुंभोजगिरीला बाहुबलीचा डोंगर या नावाने प्रसिद्ध आहे. बाहुबली निर्गथ मुनीच्या निर्वाणानंतर या डोंगरावर त्यांच्या पादुकांची स्थापना करण्यात आली. त्यासाठी धार्मिक परिभाषेत ज्याला निसाहिया म्हणतात. हे सुंदर दगडी मंदिर बांधले आहे. पुढे या मंदिराचा जीर्णोद्धार करून तेथे नवीन सुंदर इमारत बांधल्या आहे. या डोंगरावर दरवर्षी कार्तिक शुद्ध प्रतिपदेस मोठी यात्रा भरते. निर्ग्रंथ मुनिमहाराजांनी जमाल यांना उपदेश केला होता. त्याने

बाहुबली डोंगराच्या पूर्वेस असलेल्या डोंगरावर तपश्चर्या केली होती. त्याचे नावावरून त्या डोंगरास बाबा जमालचा डोंगर असे म्हणतात. श्री अतिशयक्षेत्र बाहुबली या ठिकाणास सध्या धार्मिकदृष्टया फार महत्त्व प्राप्त झाले आहे.[६२]

बाहुबलीच्या डोंगरावर श्री १००८ आदिनाथ, श्रीचंद्रप्रभू व श्रीशांतीनाथ यांची प्राचीन जिन मंदिरे आहेत. या मंदिराचे जवळ काळया पाषाणांचे २.१३ मीटर उंच खड्गासनी श्री १००८ बाहुबली भगवंताचे खंडित परंतु अतिशय मनोवेधक जिनबिंब आहे. जिन मंदिराच्या भव्य व प्रशस्त परिसराभोवती उंच व दगडी परकोट बांधलेला आहे. त्यास भव्य प्रवेशद्वार असून त्यावर संगमरवरी पाषाणाचा नगारखाना बांधलेला आहे. प्रवेशद्वाराच्या आतील दोन्ही भिंतीवर प्रथम तीर्थकर भगवान आदिनाथांच्या शंभर पुत्रापैकी भरत चक्रवर्ती व बाहुबली या दोन पुत्रांच्या जीवनातील अद्भुत घटनांचे चित्रीकरण केलेल्या पाच भव्य तसबिरी आहेत.

प्रमुख प्रवेशद्वाराच्या एका बाजूस भगवान बाहुबलीचे प्रशस्त मंदिर आहे. त्यामध्ये बदामी रंगाच्या संगमरवरी पाषाणाची १.८३ मीटर उंच भगवान बाहुबलीची मूर्ती आहे. या मंदिरासमोरील शुभ्र संगमरवरी १२.५० मीटर उंचीच्या कलात्मक मनोज्ञ मानस्तंभावर तीर्थकर भगवंताची सर्वताभिद्र प्रतिमा आहे. तसेच भगवान बाहुबलीच्या मंदिराच्या शिखरात एक हजार वर्षापूर्वीची हरितवर्णी भगवान आदिनाथाची अति प्राचीन अर्धपद्मासनस्थ मनोज्ञ मूर्ती आहे. श्रीबाहुबली जिनमंदिर व श्रीमहावीर समवसरण मंदिर यांच्या मधोमध सुमारे ८२.३० मीटर आत १५.२४ मीटर उंच भागी श्री १००८ भगवान बाहुबलीची पांढऱ्या संगमरवरी पाषाणाची ८.५० मीटर उंचीची अतिशय सुरेख महामूर्ती माघ शु.१३ दिनांक ८ फेब्रुवारी १९६३ रोजी विधीपूर्वक प्रतिष्ठापित केली आहे. सभोवार गुलाबी रंगाचे कमलासन व खाली प्रशस्त उंच वेदीका असल्याने प्रवेशद्वारातून येताच ती पूर्ण दिसते.[६३]

## ५.६ कोल्हापूर जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे–

कोल्हापूर जिल्हयास प्राचीन इतिहास आहे. सातवाहन काळापासूनच्या इतिहासाच्या पाऊलखुणा जिल्हयात ठिकठिकाणी दिसतात. अनेक गावात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचे ठसे राहिलेले आहेत. त्याबरोबर इतिहासाचा वारसा घेऊन अनेक गावात लेणी, किल्ले, वाडे व वस्तुसंग्रहालये उभे राहिलेले आहेत. त्यातील निवडक ऐतिहासिक स्थळे पाहणे महत्त्वाचे आहेत.

### ५.६.१ जुना राजवाडा–

हा राजवाडा तिसरे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात (इ.स.१८६२ ते १९१२) बांधला गेला आहे. श्री.महालक्ष्मीच्या मंदिराच्या आग्नेय दिशेला हा राजवाडा असून सुमारे अडीचशे वर्षापूर्वी १५ लक्ष रूपये खर्चून तो बांधण्यात आला. या वाडयाचा काही भाग सन १८१३ मध्ये सादल्लाखानाच्या बंडाचे वेळी पेटविण्यात आल्यामुळे भस्मसात झाला होता. त्यानंतर त्याची टप्प्याटप्याने डागडुजी करण्यात आली आहे. वाडयाचा दर्शनी भाग अलिकडच्या काळातील आहे. या वाडयाची इमारत दुमजली असून मध्यभाग वगळता सर्वत्र गच्च्या आहेत. मध्यभागी एक दिवाणखाना आहे. राजवाडयाच्या पटांगणात सहा चौक आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाचा चौक म्हणजे भवानी चौक असून त्यामध्ये कोल्हापूरच्या घराण्याची अधिष्ठात्री देवता भवानीची प्रतिष्ठापना केलेली आहे. पूर्वी चौकामध्ये छत्रपतींच्या घराण्याशी संबंधित असलेले सर्व दरबारी उपचार व इतर धर्मविषयक विधी होत असत. चौक विस्ताराने मोठा असून त्याला असलेली फरसबंदी घोटीव दगडाची आहे. चौकाच्या चार बाजूला व्हरांडे असून पहिल्या मजल्यावर दर्शनी बाजूला सज्जा आहे. भवानी देवीचे मंदिर चौकाच्या पश्चिम बाजूला असून पूर्वाभिमुख आहे. दक्षिणेकडे असलेल्या व्हरांडयामध्ये सिंहासन ठेवलेले असून त्याचा उपयोग दरबाराच्या प्रसंगी करण्यात येत असे. या चौकामध्ये शाहू छत्रपतींचा पूर्णाकृती लाकडी पुतळा आहे. भवानी चौकाच्या दक्षिणेच्या बाजूला दुसरा एक चौक असून त्यात छोटे पाण्याचे टाके आहे. टाक्याच्या मध्यभागी महादेवाचे एक छोटेसे मंदिर आहे. पहिल्या मजल्यावर निवासस्थाना करिता खोल्या आहेत. वाडयाच्या पश्चिम भागात अनेक शासकीय कार्यालये आहेत. पूर्वी ज्या ठिकाणी खजीना होता. त्या ठिकाणी पोलिस चौकी आहे. या भागाच्या पहिल्या मजल्यावर दिवाणी कोर्टाची जागा आहे. दुसऱ्या चौकामध्ये शासकीय कचेऱ्या आहेत. या चौकाच्या नैऋत्य दिशेला स्त्री शिक्षण संस्थेची इमारत असून कोल्हापूर संस्थानच्या राजमातेच्या आश्रयाने या संस्थेचा कारभार चालतो. या भागाच्या दर्शनी बाजूला थोडी मोकळी जागा असून तेथे लहान लहान मंदिरे आहेत. वाडयाची बांधणी साधी असून फक्त काही ठिकाणी घुमट किंवा कमानी आहेत. नक्षीकाम फार थोडया ठिकाणी आढळते. वाडयाच्या पूर्व बाजूला भवानी चौकाच्यासमोर एक मोठा मंडप असून तो आता मोडकळीस आलेला आहे. उत्तरेच्या बाजूला दोन मजली इमारत असून या इमारतीच्या मध्यभागी दर्शनी दरवाजा आहे. दक्षिण बाजूला दरबार मंडळीचा

वाडा आहे. वरील इमारती शिवाय नगारखाना इमारत ही पाच मजली असून तिचे सर्व बांधकाम काळया फरसबंदी दगडात केलेले आहे. भारतीय मध्ययुगीन वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. या इमारतीस काही ठिकाणी कमानी आहेत. त्या मध्ययुगीन दख्खनी कलेचा प्रभाव दर्शवितात. तिसऱ्या मजल्यावर चौकोनी खांब असलेली खोली आहे. हे खांब व खोलीच्या भिंती अतिशय गुळगुळीत अशा काळया दगडात बांधलेल्या आहेत. या खोलीला आरसा महाल असे नाव दिले आहे. नगारखाना इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराला मोठमोठया कमानी आहेत. या प्रवेशद्वाराला दोन्ही बाजूला एक एक खोली असून त्यात पूर्वी हत्ती ठेवण्यात येत असत. नगारखाना इमारत कोल्हापूरच्या बुवासाहेब महाराजांनी सन १८२८ मध्ये बांधली. या इमारतीच्या पूर्व बाजूला असलेल्या दरवाजाला स्तंभ आहेत.[६४]

**वाडयाचे ऐतिहासिक महत्त्व–**

भारतीय मध्ययुगीन वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. राजवाडयाच्या पटांगणात सहा चौक आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाचा चौक म्हणजे भवानी चौक असून त्यामध्ये कोल्हापूरच्या घराण्याची अधिष्ठात्री देवता भवानीची प्रतिष्ठापना केलेली आहे. पूर्वी चौकामध्ये छत्रपतींच्या घराण्याशी संबंधित असलेले सर्व दरबारी उपचार व इतर धर्मविषयक विधी होत असत.

आधुनिक काळात राजर्षी शाहू महाराजांच्याबरोबर लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा अनेक नेत्यांनी या वाडयास भेट दिलेली आहेत. बालगंधर्व याचे बालपण या वाडयात गेले आहे. या वाडयात २० व्या शतकाच्या पूर्वार्धात एक 'ताई महाराज प्रकरण' हे वादग्रस्त प्रकरण घडले होते. ताई महाराज या सिद्धेश्वरबुवांच्या नातसून. त्यांचे पती पुण्याला स्थायिक झाले होते. राजकारणात हुशार असल्यामुळे त्यांचा पुण्यात चांगला जम बसला होता. पण ते लवकरच मृत्यू पावले. त्यांच्या पश्चात त्यांना कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार ज्या तीन व्यक्तींना दिला होता. त्यात एक लोकमान्य टिळक होते. एकुलता एक मुलगा ११ महिन्यांचा होऊन मरण पावल्यावर ताई महाराजांनी मूल दत्तक घ्यायच ठरवलं. पण कोल्हापूरच्या गुरूमहाराज घराण्यातून जे मूल दत्तक जाणार होत. त्याच्या व ताई महाराजांच्या वयात फारसा फरक नव्हता. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी त्याला विरोध करून सिद्धेश्वरबुवांच्या औरंगाबाद येथील मूळ कुटुंबातील मुल दत्तक घ्यायचे ठरविले. टिळकांचा

विरोध आहे हे कळताच त्याच्याशी वैचारिक मतभेद असलेल्या राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या घराण्यातूनच मूल दत्तक देण्याचा मुद्दा उचलून धरला होता. त्यामुळे हा घरगुती वाद न्यायालयात गेला. या वादात लोकमान्य टिळकांचा विजय झाला. लोकमान्य टिळक व राजर्षी शाहू महाराजांनी हे दत्तक प्रकरण आपल्या प्रतिष्ठेचे केल्यामुळे गुरूमहाराज प्रकरणाला वेगळे राजकीय वळण लागले.[६५]

**५.६.२ नवा राजवाडा**

नवा राजवाडा हा रेसिडेन्सीच्या इमारतीजवळ भाऊसिंगजी रस्त्यावर आहे. हा राजवाडा छत्रपती शिवाजी पाचवे यांनी सन १८७७ ते १८८४ या कालावधीत बांधला. या वाड्यासाठी सुमारे सात लक्ष रुपये खर्च करून उभारला आहे. कोल्हापूरच्या शहराच्या उत्तरेस असलेली काळ्या घडीव दगडात बांधलेली ही भव्य इमारत दक्षिणाभिमुख आहे. या वाडयाच्या इमारतीचा नकाशा मेजर मेंट या वास्तुशस्त्रज्ञाने तयार केला होता. इमारतीच्या मध्यभागी अष्टकोनी मनोरा आहे, त्याचा घेर ७.६२ मीटर व उंची ४१.१५ मीटर आहे. या मनोऱ्याला घडयाळाचा मनोरा असेही म्हणतात. राजवाडयाच्या दोन्ही टोकाच्या खोल्या अष्टकोनी असून दरबार भरविण्यासाठी एक भव्य सभागृह, एका बाजूला बिलीअर्ड कोर्ट व दुसऱ्या बाजूला अभ्यागतासाठी दोन खोल्या आहेत. राजवाडयाच्या पाठीमागील बाजूस एक चौक असून त्याच्या मध्यभागी एक कारंजे आहे. या चौकाच्या सर्व बाजूंना खोल्या आहेत. राजवाडयाची मुख्य इमारत दुमजली असून वरच्या बाजूला गच्ची आहे. त्याशिवाय थोडया अंतरावर मनोरे आणि घुमट आहेत. वाडयाच्या शिल्पामध्ये निरनिराळ्या कालखंडातील हिंदू शिल्पशैलीचे उत्कृष्ट मिश्रण दिसते. ठिकठिकाणी उत्तम प्रकारे केलेले कोरीव काम असून त्यामधील बारकावे वाखाणण्याजोगे आहेत. या सर्वामध्ये दरबारासाठी जे सभागृह आहे ते अप्रतिम आहे. सभागृहाच्या खिडक्यांना रंगीत काचेची तावदाने असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनामधील अनेक महत्त्वपूर्ण प्रसंग दर्शविण्यात आले आहेत. हे रंगकाम एका इटालियन चित्रकाराने केलेले आहे. राजवाडयाच्या सभोवती विस्तृत मैदाने आहेत. राजवाडयामध्ये एक छोटे प्राणी संग्रहालय असून प्राण्यांसाठी एक छोटेसे तळे बांधण्यात आलेले आहे. राजवाडयाच्या जवळ पूर्वी पोहण्यासाठी खाजगी तलाव होता.[६६]

**वाडयातील ऐतिहासिक वस्तू–**

राजर्षी शाहू महाराजांच्या जन्मशताब्दी निमित्ताने ३० जून १९७४ रोजी नवीन राजवाडयात ऐतिहासिक वस्तूंचे संग्रहालय स्थापन करण्यात आले. त्यासाठी या वाडयात शहाजी म्युझियमची स्थापनाही करण्यात आली. त्याच प्रमाणे राजघराण्यातील मौल्यवान, दुर्मिळ, ऐतिहासिक वस्तू, परंपरागत राजचिन्हे, सोन्याचांदीच्या बहुमोल वस्तू, शस्त्रास्त्रे व छत्रपतींच्या शिकारविषयक कौशल्याचा प्रत्यय देणाऱ्या वस्तू प्रदर्शित केलेल्या आहेत. वस्तूंची मांडणी निरनिराळ्या दालनात करण्यात आली असून स्थूलमानाने त्यांची वर्गवारी ऐतिहासिक शस्त्रास्त्रे, राजर्षी शाहू महाराज आणि इतर करवीर राजांच्या जीवनाशी संबंधित वस्तू, राजघराण्यातील कलात्मक वस्तू व वन्य पशुपक्ष्यांच्या शिकार ट्राफी या चार प्रकारात करण्यात आली आहे.

वाडयाचा प्रारंभीच्या दालनात चिमासाहेब महाराजांचा पुतळा ठेवला आहे. चिमासाहेबाने सन १८५७ च्या उद्रेकात स्वातंत्र्य लढयाचे सूत्रसंचालन केले होते. याच दालनात विविध प्रकारच्या पगडया, कोल्हापूर संस्थानचा नकाशा व छत्रपती राजाराम महाराजांचे अश्वारूढ भव्य तैलचित्र पाहावयास मिळते. पुढील दालनात हत्तीवर चांदीची अंबारी, त्याला शोभनारे चांदीचे दागिने, चांदीचा हौदा इत्यादी वस्तू आहेत. शेजारच्या दालनात सोन्याच्या चौऱ्या, मोरचली, सूर्यपान, अबदगिरी, चांदीची आसने व राजचिन्हे इत्यादी आहे.

या वाडयाच्या पुढील दालनात उत्तम तैलचित्रे, उंची कपडे व भेटवस्तू प्रदर्शित केल्या आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या वस्तूसाठी एक स्वतंत्र दालन असून त्यात त्यांची निरनिराळ्या प्रसंगाची छायाचित्रे, पोशाख इत्यादीचा समावेश आहे. एका दालनात कलाकुसरीचे फर्निचर असून पहिली फोर्ड गाडी ठेवलेली आहे. चित्रमय गॅलरीत प्रामुख्याने नामांकित चित्रकार राजा रविवर्मा, रा. ब. धुरंदर इत्यादी चित्रकारांच्या कलाकृती आहेत. शस्त्रास्त्रांचे दालन हे वस्तुसंग्रहालयाचे मुख्य आकर्षण आहे. त्यात धोप, अलेमानी, साकेला, तेगा, जोधपुरी, किरच, कट्टी इत्यादी प्रकारच्या तलवारी, बंदुका, जंबिये, खंजिर, भाले, कुकऱ्या, वाघनखे, परशू, लहान तोफा व यद्धप्रसंगाचे पोशाख ठेवलेले आहेत.[६७]

### ५.६.३ रंकाळा तलाव–

कोल्हापूर शहराच्या नैऋत्य दिशेला रंकाळा तलाव असून त्याचे क्षेत्र सुमारे २०२.३४ हेक्टर असून खोली जवळजवळ १०.६७ मीटर आहे. रंकाळा तलावाचा उल्लेख कोल्हापूरची मरीन ड्राईव्ह असा केला जातो. त्यावरून हा तलाव एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून समजले जात आहे. तलावातील पाणी सोडण्यासाठी एक दरवाजा बांधला आहे. अलिकडच्या काळात या तलावातील पाण्याचा उपयोग शेतीसाठी केला जातो. या तलावाकाठी शालिनी नावाचा राजवाडा असून राजवाडयाच्या भव्यतेमुळे रंकाळा तलावाच्या वैभवात भर पडली आहे. रंकाळा तलावाच्या पूर्व बाजूला संध्यामठ आहे हा मठ म्हणजे प्रशस्त मंडप असून त्याची बांधणी हेमाडपंती पद्धतीने केलेली आहे. पावसाळयात तलाव जेंव्हा भरून वाहतो त्यावेळी संध्यामठ पुर्णपणे पाण्यात बुडतो. रंकाळा तलावाजवळ पद्माराजे उद्यान आहे. पूर्वी कोल्हापूरचे राजे तलावामध्ये विहार करण्यासाठी छोटया छोटया नावांची व्यवस्था होती. या तलावात मासे पकडण्याचा हक्क फक्त राजे लोकांनाच होता. आज तलावात विहार करण्यासाठी महानगर–पालिकेने सोय केली आहे.[६८]

**रंकाळा तलावाच्या निर्मितीचा इतिहास–**

रंकाळा तलाव हे नाव रंक भैरव या देवाच्या नावावरून देण्यात आलेले आहे. रंक भैरव महालक्ष्मीच्या अतिशय मर्जीतला होता. रंकाळा तलावाची सुरूवातीस त्याजागी दगडाची खाण होती. त्या खणण्यापासून झाली. जैन समजुतीप्रमाणे त्या खाणीतून महालक्ष्मीच्या मंदिराला आणि त्याच प्रमाणे राजा गंडरादित्य याने जी ३६० जैन मंदिरे बांधली त्यांना दगडाचा पुरवठा करण्यात आला. त्यानंतर आठव्या किंवा नवव्या शतकात झालेल्या एका धरणीकंपामुळे या खाणीचा विस्तार होऊन ती पाण्याने भरून गेली. या तळयाला उत्तरेकडे असलेल्या दोन ओढयातून पाण्याचा पुरवठा होतो. सन १८८३ साला पासून रंकाळा तलावाच्या पाणीपुरवठयात बरीच सुधारणा झाली. जुना बंधारा होता, त्यापेक्षाही अधिक मजबूत बंधारा नव्याने बांधण्यात आला. हा बंधारा अजून चांगल्या स्थितीत आहे. परंतु त्याला लागून असलेल्या रस्त्यावर वारंवार भर टाकली गेल्यामुळे बंधाऱ्याची उंची तुलनेने कमी झाल्यासारखी वाटते.[६९]

### ५.६.४ रांगणा–

कोल्हापूरपासून १०६कि.मी.अंतरावर रांगणा हा ऐतिहासिक किल्ला आहे. या किल्ल्यावर जाण्यासाठी चिक्केवाडीहून जावे लागते. या गावाच्या परिसरात घनदाट अरण्य असून त्यात हिंस्त्र श्वापदे आढळतात. रांगणा हा किल्ला सहयाद्रीच्या डोंगरधारेतील निमुळती होत गेलेली सोंड आहे. गडाच्या पहिल्या दरवाज्यातून गेल्यावर कातळ फोडून त्यामधली वाट तयार केलेली आहे. येथून आत गेल्यावर गडाचा दुसरा दरवाजा आहे. या दरवाज्याला पहारेकऱ्यांच्या देवडया आहेत. त्यातून पुढे गेल्यावर उजव्या बाजूला एक पडक्या अवस्थेतील वाडा आहे. त्याच्या पलीकडे एक विहीर आहे. त्या विहीरीस निंबाळकर बाव असे म्हणतात. तेथून जवळ गडाचा तिसरा दरवाजा आहे. हा दरवाजा जांभ्या दगडांनी बांधलेला आहे. शत्रूला गडावर प्रवेश मिळू नये यासाठी या दरवाजाची केलेली बांधणी आश्चर्य वाटण्यासारखी आहे. तिसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर एक छोटेसे गणेश मंदिर आहे. त्याच्या मागच्या बाजूला एक छोटा तलाव आहे. त्याच्या पुढे एक मोठा तलाव आहे. त्याच्या उजव्या बाजूला छत नसलेले महादेवाचे मंदिर आहे. त्याच्याच पुढे एक हनुमान व रांगणाई देवीचे मंदिर आहे. देवीच्या मंदिरासमोर एक दीपमाळ आहे. मंदिराच्या पाठीमागे तटाच्या बाजूला कोकण दरवाजा आहे. या दरवाज्याच्या डाव्या बाजूला एका टेकडीसारख्या उंच जागेवर भरपूर झाडी वाढलेली आहे. याच्या मागच्या बाजूला शिवाजी उर्फ यशवंत दरवाजा आहे. येथून गडाच्या पश्चिमेकडे एक सोंद गेलेली आहे. त्याच्या दोन्ही बाजूला भक्कम तट बांधलेले आहे. शिवाय सोंडेच्या तोंडाशी चिलखती बुरूज आहेत.[७०]

#### किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

रांगणा किल्ल्याची उभारणी राजा भोज याने १२ व्या शतकात केली. १५ व्या शतकात हा किल्ला संगमेश्वराचा राजा जखुराय याच्या ताब्यात होता. या राजाचा मुसलमानांना त्रास होत होता. दरवर्षी हजारो मुसलमान व्यापारी व प्रवाशी या राजामुळे बळी पडत होते. तेव्हा बहमनी सुलतान अल्लाउद्दीन याने सन १४६९ मध्ये आपला वजीर महमूद गवान यास प्रचंड सैन्य देऊन दक्षिण कोकणात पाठवले. बहामनी सत्तेचे सर्व कारभार महमूद गवानच्या तंत्राने चालत होते. त्याच्या सैन्याचा मुख्य तळ कोल्हापूर येथे होता. तेथून त्याने रांगणा जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. १९ जुलै १४७० रोजी रांगणा बहामनी सत्तेच्या वर्चस्वाखाली आला.

बहामनी सत्तेच्या ऱ्हासानंतर आदिलशाहीने रांगणा किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. शिवकाळात आदिलशाहीचे सरदार सावंतवाडीचे सावंत यांच्याकडे हा किल्ला होता. ५ मे १६५८ रोजीच्या गोव्याच्या पत्रानुसार विजापूरचा सरदार रूस्तुम–इ–झमानने लखम सावंताकडून रांगणा घेतला होता. व त्याने विजापूर दरबारास न कळवताच रांगणा ऑगस्ट १६६६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे कोकणातील अधिकारी राहुजी पंडीत यांच्या स्वाधीन केला. रांगणा किल्ला मराठयांच्या ताब्यात आल्यानंतर छत्रपती शिवाजी राजांनी विठोजी जाधव याची हवालदार म्हणून नेमणूक केली. पुढे छत्रपती राजाराम महाराजांचा सन १७०० मध्ये मुक्काम रांगणा किल्ल्यावर होता. महाराणी ताराबाईच्या काळात औरंगजेब बादशहाने रांगणा किल्ला जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मराठयांच्या यादवी युद्ध काळात महाराणी ताराबाईने रांगणा किल्ल्याचा आश्रय घेतला होता. पुढे हा सन १८४८ पर्यंत हा किल्ला मराठयाच्या ताब्यात होता.

छत्रपती शाहूने मार्च १७०८ मध्ये रांगणा किल्ल्यास तीन महिने वेढा दिला. परंतु महाराणी ताराबाई सिंधुदुर्गला निघून गेल्या होत्या. तेव्हा हा वेढा अमात्य व सेनापती पिराजी घोरपडे यांनी मोठया शर्थीने लढविला. यावेळी चिक्केवाडी येथे दोन्ही पक्षात लढाई झाली. सन १७८१ मध्ये सावंतवाडीचे खेमसावंतानी रांगण्याला वेढा दिला. हा वेढा आठ महिने चालला. अखेर खेमसावंतानी वेढा उठविला व छत्रपतीशी एकनिष्ठ राहण्याचे मान्य केले. करवीर राज्य इंग्रजांच्या अंकित झाल्यावर गडावर करवीरकरांचीच सत्ता होती. सन १८४८ मध्ये ब्रिटिशांनी सर्व किल्ले पाडले. परंतु रांगणा किल्ला त्यांनी पाडला नाही. सन १८५० पर्यंत हा किल्ला सुस्थितीत होता.[७१]

**५.६.५ पन्हाळा–**

पन्हाळागड हा महाराष्ट्रातील इतिहास प्रसिद्ध किल्ला कोल्हापूर जिल्हयात १६.४८ उत्तर अक्षांश व ७४.८ पूर्व रेखांशावर वसलेला आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची २७७२ फूट आहे. कोल्हापूरच्या वायव्येस १२ मैलावर हा किल्ला आहे. जमिनीपासून ७०० फूट उंचीवर सहयाद्रीच्या कडयावर हा किल्ला वसलेला आहे. त्याच्या पठाराचा परिसर ४ मैलाचा आहे. या किल्ल्याची तटबंदीही अतिशय मजबूत अशा बुरूजांनी व्यापलेली आहे.

**पन्हाळा किल्ल्याचे नामाभिधान**

पन्हाळा हा शब्द 'पन्नगालय' या शब्दापासून आला. पन्नग म्हणजे नाग आणि आलय म्हणजे घर. नागाच्या येथील वास्तव्यामुळे त्याला हे नाव पडले असावे. करवीर महात्म्यानुसार ऋषी पाराशर याने या ठिकाणी वास्तव्य केले. या किल्ल्याच्या दक्षिणेला असलेली गुहा ही त्या महान ऋषीच्या वास्तव्याची साक्ष पटविते. त्याने या जागेला 'पन्नगालय' असे नाव दिले.[७२]

जुन्या शिलालेखानुसार पन्हाळा हा शब्द प्रणालक किंवा पद्मनाळ या शब्दापासून आला असावा. ग्रँट डफ याने त्यास पन्नाला असे म्हटले आहे. कर्नल वेल्स याने पन्हाळा याचा अर्थ विपुल पर्जन्याचे ठिकाण पवनगड याचा अर्थ अतिउंच ठिकाण असे सांगितले आहे.[७३] विजापुरी आदिलशहाने इ.स.१४८९ मध्ये या किल्ल्याला 'शहानबी दुर्ग' असे नाव दिले व छत्रपती शिवाजी राजांनी त्याला 'पन्हाळा' असे हिंदू नाव दिले. पन्हाळागड शिलाहार घराण्यातील महामंडलेश्वर विक्रमादित्य राजा दुसरा भोज याने बांधला आहे.[७४]

**किल्ल्यावरील प्रमुख वास्तू–**

**५.६.५ .१ किल्ल्याची प्रवेशद्वारे–**

**अ)चार दरवाजा–**

किल्ल्याच्या पूर्व दिशेला तोंड करून दोन बुरूजांच्यामध्ये याचा पहिला दरवाजा होता. यानंतर आतल्या डाव्या बाजूला दुसरा व चक्राकार तटाभोवती फिरल्यानंतर तिसरा दरवाजा लागतो. या दरवाजाचे केवळ अवशेष शिल्लक आहेत. त्याच्या पुढे चौथा दरवाजा आहे. सन १८४४ मध्ये इंग्रजांनी चार दरवाजा उध्वस्त केला. शत्रुला किल्ल्यावर सहाजासहजी प्रवेश करता येऊ नये म्हणून या दरवाज्यांची निर्मिती करण्यात आलेली होती.

**आ) तीन दरवाजा–**

पन्हाळागडच्या पश्चिम दिशेस असणाऱ्या या दरवाजास कोकणी दरवाजा असेही म्हणतात. हे दरवाजे एकापाठोपाठ तीन वेगवेगळे दरवाजे आहेत. तीन दरवाजाचे स्थापत्य म्हणजे एक शिल्पच आहे. तिसऱ्या दवाजावर हत्तींनी पायात धरलेले दोन शरभ असून त्यांच्या मधोमध गणपतीची मूर्ती कोरली आहे. तीन दरवाजावर एक शिलालेख असून तो इब्राहिम आदिलशहाच्या कालावधीत दरवाजाचा जिर्णोद्धार झाला आहे.

### इ) वाघ दरवाजा–

गडाच्या उत्तर बाजूस असणारा हा दरवाजा अत्यंत मजबूत बांधणीचा असून गडाच्या पर्वताच्या दोन रांगाच्यामध्ये याची बांधणी केली असुन याचा चढाईचा मार्ग गडाच्या तटबंदीच्या व बुरूजांच्या माऱ्याच्या टप्प्यात येतो. दोन्ही बाजूस असणाऱ्या तटबंदीच्या मधून शत्रूस यावे लागत असल्यामुळे इतर दोन्ही दरवाजांच्या मानाने याची बांधणी वैशिष्टयपूर्ण नाही. यास वाघ दरवाजा नाव पडण्याचे कारण जसे वाघाच्या ताब्यात असलेले सावज सुटू शकत नाही, त्याप्रमाणे या दरवाज्याच्या ताब्यात आलेला शत्रू जिवंत जाऊ शकत नाही.

### ई) चोर दरवाजे–

पन्हाळागडास चार चोर दरवाजे आहेत. त्यापैकी एक दरवाजा अंधारबावच्या मधून आहे. हा दरवाजा गडाखालून पाहिला तर दिसत नाही. अत्यंत कठिण प्रसंगी या दरवाजाचा उपयोग केला जाई. दुसरा चोर दरवाजा म्हणजे राजदिंडी दरवाजा होय. तिसरा गडाच्या पश्चिम बाजूच्या तटबंदीत तालीमखाना म्हणून ओळखला जाणारा अलंगाच्या शेजारी एक दरवाजा आहे. चौथा दरवाजा पावनगडाच्या बाजूला असणाऱ्या तटबंदीत असून तो भुयारी मार्ग आहे.[७५]

### ५.६.५ .२ अंबरखाना–

अंबरखाना म्हणजे धान्याची कोठारे ही किल्ल्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असून त्यात सैन्याच्या आवश्यक सर्व वस्तूचा साठा केला जात असे. या अंबरखान्याचे आज अवशेष शिल्लक असलेले पाहावयास मिळतात. या गडावर प्रामुख्याने गंगा, यमुना, सरस्वती अशा तीन कोठया होत्या. या मध्ये गंगा ही सर्वात मोठी कोठी होती. यामध्ये प्रचंड फौजेला पुरेल एवढा मोठा धान्यसाठा या अंबारकान्यात साठविण्याची क्षमता होती.[७६]

### ५.६.५ .३ धर्मकोठी–

अंबरखान्याशिवाय धर्मकोठी हे आणखी एक धान्याचे कोठार पश्चिमेला आहे. ही इमारत दगडी असून तिला प्रवेशद्वार व जिना आहे. या कोठीतील धान्य गोरगरिबांना दानधर्म म्हणून वाटले जात होते. वरील कोठयांच्या वरून पूर्वी या किल्ल्यात लष्करी वापरासाठी धान्य कसे साठविले जात होते, याची कल्पना येते.

**५.६.५ . ४ सज्जा कोठी–**

सज्जा याचा अर्थ गच्ची कोठी याचा अर्थ इमारत, यावरून लक्षात येते की गच्चीची इमारत. किल्ल्यातील सर्वात उंच व संपूर्ण परिसर दृष्टिक्षेपात येणारी ही इमारत आहे. या इमारतीत असलेल्या शिलालेखावरून विजापूरच्या इब्राहिम आदिलशहाच्या काळात मकसूद अका याने सुहूर सन १००८ साली ही इमारत बांधली असावी. ही इमारत आहे त्या स्थितीत पाहावयास मिळते. छत्रपती शिवाजी महाराज विशाळगडला निसटून गेले म्हणून ती खिडकी प्रसिद्ध आहे.

**५.६.५ .५ कलावंतिणीचा सज्जा–**

किल्ल्याच्या पूर्व बाजूला तटालगत एक जनानखाण्याची इमारत आहे. सध्या ती पुर्णपणे विध्वंसित झालेली आहे. मात्र तिच्या छतावरील कलाकुसरीचे काम सुरक्षित आहे.

**५.६.५ .६ सदोबाचा दर्गा–**

सदोबा म्हणजे संत. पीर सद्उद्दीनया मुस्लिम संताच्या नावाने हा दर्गा उभारला आहे. त्यानंतर लोक त्याला सदोबा म्हणू लागले. या दर्ग्याभोवती चिखल–मातीची भिंत असून ती २९ चौरस फुटांची इमारत आहे. तिला ५० फुट उंचीचा घुमट आहे. दरवर्षी तेथे जत्रा किंवा ऊरूस भरतो. या दर्ग्यासमोर एक लहानसा सदोबाचा तलाव आहे.

**५.६.५ .७ संभाजी मंदिर–**

सन १७१२ ते १७६० या काळात राज्य केलेल्या छत्रपती संभाजी दुसरा यांच्या नावे हे मंदिर उभारले आहे . हे सध्याच्या मामलेदार कचेरी शेजारी आहे. या मंदिराच्या कळासाची उंची ५५ फुट आहे.

**५.६.५ .८ जिजाबाई मंदिर–**

दुसऱ्या संभाजी राजांची पत्नी महाराणी जिजाबाई यांचे मंदिर किल्ल्यावरील छत्रपती संभाजी राजांच्या मंदिरासमोर उभारले आहे. महाराणीच्या राजवाडयापासून थोडयाच अंतरावर कालीमातेचे मंदिर असून तेथे तिची आराधना केली जाते. [७७]

**पन्हाळागडाचे ऐतिहासिक महत्त्व–**

**प्राचीन काळ**

पन्हाळागडाच्या पश्चिमेला सातवाहन काळातील बौद्धगुहा आहेत. सन २५० ते १०५० या काळात दक्षिण महाराष्ट्रावर वाकाटक, कदंब, राष्ट्रकूट, पश्चिमी चालुक्य घराण्यांनी कारभार केला. परंतु पन्हाळा किल्ल्यास खऱ्या अर्थाने शिलाहार घराण्याच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. शिलाहार घराण्यातील राजा भोज याने ११७५ ते १२१० या काळात कोल्हापूर प्रांतात जे १५ किल्ले जिंकले होते. त्यामध्ये पन्हाळा किल्ल्याचा समावेश होत होता. ग्रँट डफच्या मते सिंघणराजाचा अमंल पन्हाळयावर बसविण्यापूर्वी
त्याच्या काळात हा प्रदेश मराठा पालेगारांच्या ताब्यात गेला. जिंकलेल्या प्रदेशावर ते
ताबा ठेवू शकले नाहीत हे स्पष्ट होते.[७८]

**मध्ययुगीन कालखंड**

पन्हाळागडावर सापडलेल्या सन १३७६ मधील शिलालेखावरून महाम्मदशहा बहामनी पहिला याच्या काळात बहामनी सत्ता पन्हाळयापर्यत विस्तारल्याचे दिसून येते. बहामनी व बहामनीनंतर आदिलशाहीच्या ताब्यात आला. विजापूरकरांना पन्हाळागडचा फार मोठा आधार असे. त्यांनीही गडावर अनेक बांधकामे केली आहेत. अफझलखान वधानंतर केवळ १८ दिवसांनी पन्हाळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. २८ नोव्हेंबर १६५९ रोजी रात्रीच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज गडावर आले व त्यांनी सर्व गड रात्रीच्यावेळी मशालीच्या उजेडातून पाहिला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळा जिंकल्याची बातमी विजापूर येथे मिळताच आदिलशहाने २० हजार घोडदळ व ३५ हजार पायदळासह सिद्दी जौहरला पन्हळा पुन्हा जिंकून घेण्यासाठी पाठविले. सिद्दी जौहारने गडास वेढा दिला. गडावर तोफांचा मारा करण्यासाठी राजापूरहून इंग्रज सैन्य, तोफा व दारूगोळा हे साहित्य आणले. दिवसेंदिवस वेढा तीव्र होऊ लागल्याने शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दीशी तह करून गड देण्याचे जाहीर केले. हे ऐकून वेढयातील सैनिक थोडे बेसावध राहिले. याचा फायदा घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी १३ जुलै १६६० रोजी गडाच्या उत्तर बाजूच्या दिंडी दरवाजातून बाहेर पडले. वेढा पार करून ते विशाळगडाकडे निघाले. यावेळी पावनखिंडीत बाजीप्रभूच्या बलिदानाची घटना

घडली. पन्हाळयाच्या पायथ्याशी या वेळेस शिवा न्हाव्याचे हौतात्म्य झाले. अशाप्रकारे साडेचार महिने छत्रपती शिवाजी महाराज या वेढयात अडकून पडले होते. शेवटी आदिलशहाशी समझोता करून २० सप्टेंबर १६६० रोजी पन्हाळागड मराठयांनी आदिलशहाच्या स्वाधीन केला.[७९]

पुढे सन १६७६ मध्ये कोंडाजी फर्जदने अत्यंत धाडसाने केवळ साठ सैनिकानिशी पन्हाळा जिंकून घेतला. २१ डिसेंबर १६७९ रोजी छत्रपती संभाजी महाराज मोगल सत्तेतून स्वराज्यात परत आल्यानंतर ते पन्हाळगडावर प्रथम दाखल झाले. येथे छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची भेट १३ जानेवारी १६८० रोजी भेट झाली. ग्रँट डफच्या मतानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी संभाजी राजांना पन्हाळगडावर नजरकैदेत ठेवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यामार्फत रायगडावर जाऊन छत्रपती संभाजी राजेंनी स्वराज्याची सर्व सूत्रे आपल्याकडे घेऊन स्वतःला राजा म्हणून घोषीत केले. सन १६८० ते १६८९ काळात पन्हाळा मराठयांच्या ताब्यात होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात पन्हाळा व विशाळगड हे औरंगजेब बादशहाच्या संतापाचे प्रमुख कारण बनले होते. नोव्हेंबर १६८९ मध्ये रायगड घेतल्यावर औरंगजेब बादशहाने आपले लक्ष पन्हाळा व विशाळगड या किल्ल्यावर केंद्रित केले. मोगली फौजांनी विशाळगडास वेढा दिला. छत्रपती राजाराम व त्याचे मुत्सद्दी रामचंद्रपंत यांनी विशाळगड व परशुराम त्रिंबक याच्या मदतीने सन १६९२ मध्ये पन्हाळा पुन्हा मोगलांच्याकडून हस्तगत केला. पन्हाळा किल्ल्यास पूर्वीचे राजवैभव प्राप्त झाले. ते शाही कुटुंबाचे प्रमुख निवासस्थान बनले. सन १७०० मध्ये छत्रपती राजाराम महाराजांचा सिंहगडावर मृत्यू झाला. त्यांचे पुत्र शिवाजी व संभाजी यांच्यासह सुरक्षिततेसाठी पन्हाळगडावर ठेवण्यात आले.[८०]

### कोल्हापूरच्या राजांच्या वर्चस्वाखालील पन्हाळा–

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब बादशहाने पन्हाळा किल्ला २८ मे १७०१ रोजी हस्तगत केला. हो किल्ला १७०७ पर्यत मोगलांच्या ताब्यात होता. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर हा किल्ला १७०८ मध्ये महाराणी ताराबाई हिने जिंकून घेतला. छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्यात यादवी सुरू झाली त्यावेळी छत्रपती शाहूने महाराणी ताराबाईचा पराभव करण्यासाठी पन्हाळा किल्ल्यावर स्वारी केली. तो किल्ला जिंकून घेतला. मात्र महाराणी ताराबाईने खचून न जाता वाडीच्या खेम सावंताच्या मदतीने पुन्हा पन्हाळा

जिंकला. आपला मुलगा शिवाजी याला सार्वभौम राजा म्हणून सन १७१० मध्ये कोल्हापूर संस्थानाचा स्वतंत्र राजा असे जाहीर केले.

नवीन स्वतंत्र कोल्हापूर राज्याचा हा पहिला राजा शिवाजी आपल्या मातेच्या ताराबाईच्या इच्छा–आकांक्षा पूर्ण न करताच सन १७१२ मध्ये पन्हाळागडावर मरण पावला. तो निःसंतान असल्याने त्याचा धाकटा सावत्र भाऊ राजसबाईचा मुलगा संभाजीने याने राज्यकारभार पाहिला होता. राज्यकारभार हाती येताच संभाजीने महाराणी ताराबाई, तिचा जावई व भवानीबाई यांना कैद केले व पन्हाळयावर नजरकैदेत ठेवले. पुढे १७२९ मध्ये त्या साताऱ्यास आल्या. छत्रपती संभाजीने फार काळ कोल्हापूरवर राज्यकारभार केला नाही.

छत्रपती संभाजीच्या मृत्यूनंतर खानवटकर भोसले घराण्यातील एक मुलगा दत्तक घेऊन त्यास दुसरा शिवाजी म्हणून घोषीत करून कोल्हापूरचा छत्रपती बनवले.(सन १७७२) तो अज्ञान असल्याने त्याची आई राणी जिजाबाईने १२ वर्षे राज्यकारभार पाहिला जिजाबाईने पेशवा व इंग्रज यांच्याशी मैत्रीचे व सलोख्याचे करार केले. ती सन १७७२ मध्ये पन्हाळा किल्ल्यावर मरण पावली. सन १७८२ मध्ये आपल्या मंत्र्याच्या सांगण्यावरून शिवाजी पन्हाळा सोडून कोल्हापूर येथे राहावयास आल्याने कोल्हापूर ही राज्याची राजधानी बनली. त्यामुळे पन्हाळा किल्ल्याचे महत्त्व संपुष्टात येऊ लागले.[८१]

### ५.६.६ पावनगड–

पन्हाळगडावरील अंधारबावपासून एक रस्ता पावनगडाकडे जातो. या किल्ल्याकडे जात असताना रस्त्याच्या कडेला एक मंदिर आहे. या मंदिर परिसरात एक भग्न दीपमाळ, स्तंभ, गणेशमूर्ती व तुटलेले शिवलिंग आहे तसेच दुसऱ्या मंदिराजवळ काही शिल्प आहेत. त्या मंदिराच्या पुढे एका मोठया पठारावर काळया पाषाणातील मोठे शिवमंदिर आहे. त्याच्या समोर नंदीमंडपासारखा लहान मंडप आहे. जवळच ओवऱ्यासारखी वाटणारी सुंदर वास्तू आहे. त्याची पडझड झालेली आहे. शिवमंदिराच्या मागे एक तुपाची विहीर आहे. या विहीरीवर बांधलेली घुमटी मात्र आजही पाहावयास मिळते. पुढे पावनगड गावातून गडाच्या शेवटच्या बुरूजाकडे जाण्यास रस्ता आहे. हा बुरूज आकाराने प्रचंड असून त्यावरून भोवतालचा सर्व प्रदेश पाहता येतो. या बुरूजाच्या पायऱ्या मात्र ढासळलेल्या आहेत. अलिकडच्या काळात या बुरूजावर एक मोठा स्तंभ उभारून त्यावर भगवा ध्वज लावण्यात आलेला आहे.

पावनगड गावाच्या डाव्या बाजूला एक कबर आहे. या ठिकाणी खालच्या बाजूस असणाऱ्या गुहेचे आज खोलीत रूपांतर झालेले आहे. पण पूर्वी येथे मार्कंडेय ऋषी राहत होते. आज येथे लकडबंद फकीर याची कबर आहे. या कबरीच्या जवळ दोन ढासळलेले बुरूज आहेत. त्यामध्ये लपलेले प्रवेशद्वार यांच्या खुणा फक्त शिल्लक आहेत.[८२]

**ऐतिहासिक महत्त्व**

पन्हाळागड हा प्राचीन गड, पण या गडाजवळ असणाऱ्या मार्कंडा डोंगरावर पावनगड बांधून पन्हाळयास बळकटी आणावी, अशी कल्पना कुणाला सुचली नव्हती. मार्कंडा डोंगर शत्रूच्या ताब्यात गेल्यावर पन्हाळा अडचणीत येणार हे स्वतः छ.शिवाजी महाराजांनीही ओळखले होते. पन्हाळयाच्या सुरक्षेच्या दृष्टीने या गडास खूप महत्त्व होते. त्यामुळेच पन्हाळगड दुसऱ्यांदा ६ मार्च १६७३ रोजी महाराजांनी घेतल्यानंतर त्यांनी या टेकडीवर पावनगड बांधला.

औरंगजेब बादशहाने पन्हाळागडास २८ मे १७०१ रोजी वेढा दिला. त्यावेळी पावनगडचा किती त्रास त्याला सहन करावा लागला हे पाहिल्यावर गडाचे महत्त्व लक्षात येते. पावन गडचा इतिहास पन्हाळयाशी निगडीत आहे. खंडोजी निकम हे पावनगडचे अखेरचे किल्लेदार होते.[८३]

**५.६.७ विशाळगड–**

कोल्हापूर जिल्हयात मलकापूर गावाजवळ विशाळगड हा किल्ला आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटी पासूनची उंची २५९८ फूट आहे. या किल्ल्याने मराठा काळात फार मोठे योगदान दिलेले आहे.

**किल्ल्याचे वर्णन–**

आंबा व अणुस्करा या दोन घाटांच्यामध्ये सहयाद्रीच्या मुख्य रांगेपासून सुटलेला हा एक विशाल किल्ला आहे. या दोन घाटावर नियंत्रण ठेवण्यासाठी या किल्ल्याचे बांधकाम करण्यात आले होते. केवळ पंधरा ते वीस फुटाच्या चिंचोळया सोंडेने विशाळगड सहयाद्रीशी जोडला आहे. या सोंडेवरून विशाळगडाला जाण्यासाठी खोदीव पायऱ्या लागतात. त्या चढून माथ्यावर जाता येते. माथ्यावर प्रवेश करण्यासाठी प्रचंड प्रवेशद्वार होते. परंतु हा दरवाजा पडझड झालेल्या स्थितीत आहे.

दरवाजामधून आत गेल्यावर डाव्या बाजूस टेकडीवर चौथरा आहे. हा भाग रणमंडळ नावाने ओळखला जातो. भोजराजाने भूपाळ तळे खोदले त्यावेळी त्याची माती इथे टाकली

गेली व टेकडी तयार झाली असे म्हटले जाते. या रस्त्यावर पुढे रेहानचा दर्गा आहे. वाटेच्या दोन्ही बाजूस घरे व दुकाने आहेत.

दर्ग्यापासून जवळ भगवंतेश्वर मंदिर व घोडयांची पागा, अर्धचंद्राकार विहिर, गौरी तळे, राजाराम महाराज यांचे तृतीय पत्नी सती गेल्या ते सतीचे वृंदावन, तास टेकडी व टोकाला एक कमान आहे. जो दुरून लक्ष वेथून घेते. अशा वास्तू या गडाच्या उत्तर भागात आहेत. गडाच्या पश्चिम बाजूला नष्ट झालेला कोकण दरवाजा आहे.[८४]

**गडावरील स्मारकशिल्पे–**

विशाळगडावरील तटबंदी व बुरूज ब्रिटिशांनी नष्ट केले तरीसुद्धा किल्ल्याच्या भक्कमपणाची साक्ष देणारे अवशेष अस्तित्त्वात आहेत. काही दरवाजे व बुरूज लक्षणीय आहेत. किल्ल्याची लांबी व रूंदी अनुक्रमे ९७५ व ३१७ मीटर आहे. या गडावर प्रतिनिधींचा जुना वाडा चांगल्या अवस्थेत आहे. गडावर अमृतेश्वराचे देवालय आहे. हे देवालय अमृतराव प्रतिनिधी याने बांधलेले आहे. गडावरील टकमक कडयावरुन पूर्वी कडेलोट करीत असत. किल्ल्यावर नरसोबा, वाघजाई, रामेश्वर, भगवंतेश्वर व राम इत्यादी पडझड झालेली मंदिरे आहेत.

गडावर भोपाळ तलावाच्या भिंतीवर फारशी शिलालेख आहे. त्याचा मराठीत मजकूर असा होता. 'भोज राजा एका मराठा राजाकडे या किल्ल्याचा ताबा होता. मी मलिक रहान याने किल्ल्याला सहा वेळा वेढा दिला. पण मला यश आले नाही. सातव्या वेढयाच्या वेळी मी किल्ला ताब्यात घेतला. शौर्यशाली बना व तुमची भरभराट ठेवलेलीच आहे.'[८५]

विशाळगड किल्ल्याच्या दौलत बुरूजावर खालील अर्थाचा शिलालेख आहे. 'या जगामध्ये दिर्घोद्योगामुळे सर्व संकटावर मात करता येते.' 'दौलत बुरूजाची बांधणी अतिशय सुबकप्रकारे पूर्ण केली गेली.' 'तुम्हाला जर दौलत बुरूज केव्हा बांधला गेला हे जाणून घ्यायचे असेल तर ती तारीख दौलत बुरूज या अक्षरात आहे.'[८६]

**विशाळगड किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व–**

विशाळगडला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा आहे. हा गड कधी बांधला याची तारीख उपलब्ध नसली तरी शिलाहार राजा भोज दुसरा याने कोल्हापूरला सन ११८७ मध्ये शिलाहार घराण्याची राजधानी स्थापन केल्यापासून किल्ल्याचा इतिहास उपलब्ध आहे. इ.स.११९१–९२ मध्ये राजा भोज याने पन्हाळगडावर आपले राजसिंहासन प्रस्थापित

केल्यानंतर दक्षिण महाराष्ट्रातील जे पंधरा किल्ले बांधले व त्यात विशाळगडचा समावेश होता. शिलाहार घराण्याचा अस्त झाल्यानंतर यादव घराण्याने पन्हाळा–विशाळगड हा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला. तेराव्या शतकाच्या प्रारंभी हा सर्व परिसर देवगिरीच्या यादव राज्याचा एक महत्त्वाचा भाग बनला होता. देवगिरीच्या राज्यानंतर विशाळगड हा बहामनी सत्तेच्या ताब्यात गेला. इ.स. १४७० मध्ये बहमनी सुलतानाचा वजीर महामूद गवान याने नऊ महिन्याच्या वेढयानंतर विशाळगड जिंकून घेतला. बहमनी घराण्याचा सन १४८९ मध्ये अस्त झाल्यानंतर विशाळगड विजापूरच्या आदिलशहाकडे गेला. प्रतापगडाच्या विजयानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रथम पन्हाळा जिंकून घेतला. त्यानंतर अल्पावधीत विशाळगड जिंकून घेतला. संरक्षणाच्या दृष्टीने हा गड अतिशय महत्त्वाचा होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी विशाळगड किल्ल्याचे महत्त्व ओळखून परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यास हा किल्ला इनाम म्हणून दिला होता. तो परत मिळविण्यासाठी आदिलशाही सैन्याने विशाळगडास सन १६६१ मध्ये वेढा दिला होता. विजापूरच्या सैन्याची छावणी गडा जवळील लहान गावामध्ये पसरली होती.[८७]

रायगड मराठयांच्या ताब्यातून गेल्या नंतर सन १६८९ मध्ये मराठयांची अवस्था खूप बिकट झाली होती. त्यावेळी विशाळगड हे मराठयांचे आश्रयस्थान बनले होते. छत्रपती राजाराम महाराज जिंजीच्या वेढयातून सुखरूप आल्यानंतर २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर येऊन पोहचले. दुर्दैवाने त्या वर्षी झुल्फिकारखान याने हा गड जिंकून घेतला. पुढे छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यू नंतर इ.स.१७०० मध्ये महराणी ताराबाई हिने आपला मुलगा शिवाजी यास विशाळगडावर राज्याभिषेक करून गादीवर बसविले. महाराणी ताराबाई स्वतःच राज्यकारभार करीत होती. महाराणी ताराबाई व राजा शिवाजी हे दोघेजण विशाळगड व पन्हाळगडावर आलटूनपालटून राहत असत. तथापि पन्हाळा गड अधिक बळकट असल्याने संकटसमयी ते पन्हाळयावरच राहत असत.[८८]

औरंगजेब बादशहाने २८ मे १७०१ रोजी पन्हाळागड जिंकल्यानंतर त्याने आपला मोर्चा विशाळगडाकडे वळविला. औरंगजेब १६ जानेवारी १७०२ रोजी विशाळगडच्या पायथ्याशी जाऊन पोहोचला. त्यावेळी मराठयांच्या फौजा गडापासून फार दूरवर गेलेल्या होत्या अशा संकटसमयी मोगलांच्या सैन्याने विशाळगडावर तोफांचा भडीमार केला. त्याप्रसंगी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याने अप्रतिम शौर्य व विलक्षण कौशल्य दाखविले. गडावर फारसे सैन्य

नसल्यामुळे त्याने वरून दगडांचा प्रचंड मारा सुरू केला व मोगल सैन्याला जेरीस आणले. परशुराम त्रिंबक याने सतत पाच महिने निकराचा लढा देऊन हा किल्ला लढविला. मोगलांना यश मिळण्याची चिन्हे नव्हती. मे १७०२ पर्यत अशी परिस्थिती चालू राहिली. पावसाळा जवळ आला होता. त्यामुळे बादशहाने किल्ला घेण्यासाठी सेनापतीवर दबाव आणला होता. शेवटी काही मोगल सरदारांनी परशुराम पंताकडे बोलणी केली. बादशहाने हा प्रश्न प्रतिष्ठेचा मानला. त्याने परशुरामपंताला पत्र पाठवून धमकी दिली व आमिषही दाखविले. गडावर फार दिवस तग धरता येईल एवढे धान्य व दारूगोळयाची तरतूद नव्हती. परशुरामपंताची ही कसोटीची वेळ होती. म्हणून बादशहाकडून सामोपचाराचा निरोप आल्यावर परशुराम त्रिंबकने काही अटी घालून विशाळगड बादशहाच्या स्वाधीन करण्याचे मान्य केले. त्यासाठी त्याने पुढील तीन अटी घातल्या. १) विशाळगड घेतल्यावर बादशहाने दुसरे किल्ले न घेता या मुलुखातून निघून जावे.२) गडावरील लोकांच्या जीवास धोका पोहचवू नये.३) हे सर्व मान्य असल्याबद्दल प्रत्यक्ष बादशहाने लेखी आश्वासन द्यावे. बादशहाने या सर्व अटी मान्य करून दोन लाख रूपये परशुरामपंताला दिले. पाच सहा महिन्याच्या या लढाईत मोगलांचे सहा हजार सैन्य मारले गेले. औरंगजेब बादशहाने २७ मे १७०२ रोजी विशाळगडचे नाव 'सकरूल्लाना' असे ठेवले. औरंगजेब बादशहा विशाळगडावरून परत निघाला तोपर्यत पावसाळा सुरू झालेला होता. पंचगगा, कृष्णा इत्यादी नद्या ओलांडाव्या लागल्या. बादशहाच्या सैन्यातील हत्ती, घोडे आणि उंट बेसुमार मरण पावले. मोगल लष्कराची दुर्दशा झाली होती.[८९]

पुढे मराठयांनी विशाळगड परत मिळविला. तेंव्हापासून विशाळगडचे महत्त्व फार वाढले. विशाळगडच्या इतिहासाशी परशुराम त्रिंबक प्रतिनिधी याचे नाव निगडीत आहे. विशाळगडच्या प्रतिनिधी घराण्याचा हा पहिला पुरूष होय. त्यांच्या निधनानंतर विशाळगडचा इनाम त्यांच्याच घराण्याकडे राहिला. वारणेच्या तहानंतर कोल्हापूरच्या संभाजीराजाने जनार्दनपंत प्रतिनिधी यांच्या नावे नवीन सनद देऊन किल्ल्याचे इनाम चालू ठेवले. सन १८४४ पर्यंत या घराण्याचे विशाळगडावर मुख्यालय होते. तथापि सन १८४४ मध्ये बंडखोरांनी विशाळगड ताब्यात घेतल्यावर इंग्रज फौजांनी प्रचंड भडीमार करून किल्ला परत मिळविला. त्यावरील तटबंदी नष्ट केली. किल्ल्याचा पुन्हा उठावा करीता उपयोग करणे अशक्य व्हावे. म्हणून ब्रिटिशांनी गडाची नासधूस केली. तेंव्हापासून प्रतिनिधीचे मुख्यालय मलकापूरला स्थलांतरित करण्यात आले.[९०]

### ५.६.८ भूदरगड–

भूदरगड किल्ला कोल्हापूरच्या दक्षिणेस ५८ कि. मी. व गारगोटी या तालुका मुख्यालया–पासून दक्षिणेस १८.४ कि.मी.वर आहे. या किल्ल्याची दक्षिणोत्तर लांबी ७९२ मीटर व पूर्व पश्चिम रूंदी ६४० मीटर आहे. किल्ल्याच्या तटबंदीस दोन प्रवेशद्वारे आहेत. सन १८८२ मध्ये या किल्ल्यात सुमारे १७० लोक ३३ घरात राहत होते. याशिवय सरकारी वाडा, एक कोठी व तिच्यापुढे असलेल्या मोठया चौकात हौद होता. चौक व हौद बांधण्यास त्यावेळी रू.५००० खर्च आला होता. किल्ल्याच्या पायथ्याशी दोन खेडी आहेत.[९१]

भूदरगड किल्ला शिलाहार वंशीय दुसऱ्या भोज राजाने इ.स.११९१–९२ मध्ये बांधला. मात्र या किल्ल्याचा इतिहास मराठ्यांच्या काळापासून उपलब्ध होते. हा किल्ला आदिलशाहीकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात आल्यावर त्यांनी सन १६६७ मध्ये त्याची दुरूस्ती केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी डागडुजी केल्यानंतर काही दिवसांनी मोगलानी हा किल्ला जिंकला. परंतु पुन्हा पाच वर्षांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ला परत जिंकून घेतला. त्यावेळी मोगलाबरोबर झालेल्या युद्धात मारल्या गेलेल्या मोगल सेनानीची पताका छत्रपतींनी भैरवाच्या देवळाला अर्पण केली. याची आठवण म्हणून अजून देखील तेथे पताका आपल्याला पाहावयास मिळते. अठरावे शतकाच्या शेवटी किल्ल्यावरील शिंबदीला लाच देऊन परशुराम पटवर्धनाने किल्ला ताब्यात घेतला. परंतु दहा वर्षानी किल्ला कोल्हापूरकरांनी पुन्हा जिंकून घेतला. यानंतर परशुरामभाऊ व इचलकरंजीकर गोपाळपंत आपटे यांच्या फौजांनी किल्ला जिंकून घेण्याचे प्रयत्न केले. पुढे सन १७९१ मध्ये करवीर छत्रपतींनी तो जिंकून घेतला. शेवटी सन १८४९ च्या दरम्यान भूदरगडावरील सैन्य व इंग्रज यांच्यामध्ये युद्ध झाले. पुढे हा गड इंग्रजांच्या ताब्यात गेला. त्यांनी तोफा लावून गडाचा महादरवाजा व तटबंदी पाडून टाकली.[९२]

### ५.६.९ गंधर्वगड–

कोल्हापूर जिल्हयात हा किल्ला चंदगडच्या पूर्वेस ७ कि.मी. व बेळगावच्या पश्चिमेस ३३.८० कि.मी. वर असून सहयाद्रीच्या रांगेतील एका कडयावर बांथलेला आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची १२२ मीटर आहे. गडावर जाणारा पश्चिमेकडील मार्ग अतिशय सोपा आहे. दक्षिण बाजूकडील मार्ग चढावाचा आहे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी बांधलेली

तटबंदी आता जवळजवळ पूर्णपणे मोडकळीस आलेली असून फक्त पश्चिम आाणि उत्तरेकडील तटबंदीचे अवशेष शिल्लक आहेत. हा किल्ला सावंतवाडीच्या थोरल्या फोंड सावंताचा मुलगा नाग सावंत याने सन १७२४ मध्ये बांधला. सन १७७८ मध्ये कोल्हापूरच्या राजाने तो वाडीकर सावंताकडून जिंकून घेतला. परंतु सन १७९३ मध्ये शिंदेच्या मध्यस्थीने तो पुन्हा सावंताकडे देण्यात आला. यापुर्वी सन १७८७ मध्ये नेसरीच्या जमीनदाराने कोल्हापूरच्या राजाविरूद्ध बंड करून गंधर्वगड व इतर काही किल्ले जिंकून घेतले. परंतु या बंडखोरांचा विमोड करण्यात आला. आणि गंधर्वगडासहीत सर्व किल्ले पुन्हा जिंकून घेण्यात आले. किल्ल्यावर चाळोबा, शंकर, गणपती आणि मारूती यांची मोडकळीस आलेली मंदिरे आहेत.

चंदगड तालुक्यात वाळकुळी हे खेडेगाव गडाच्या पायथ्याशी आहे. या गावातून या किल्ल्यावर जाण्यास रस्ता आहे. येथे चाळोबा देवाची यात्रा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या पंधरावडयात भरते.[९३]

**५.६.१० महीपालगड–**

महिपालगडाच्या पायथ्याशी वैजनाथ हे तीर्थस्थळ आहे. वैजनाथ येथे महादेव व पार्वती यांचे जोडमंदिर आहे. येथूनच महिपालगडावर रस्ता जातो. गडावर जात असताना कडयात खोदलेल्या गुहा आहेत. ही महिपालगडाची माची होय. याठिकाणी छोटेसे गाव वसलेले आहे. या भागात तट, बुरूज बऱ्याच ठिकाणी नामशेष झालेली आहेत. त्यांनतर महिपाल गडातील बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार लागते. यास गणेश दरवाजा असे नाव दिले आहे. दरवाजाच्या दोन्ही बाजूस उभारलेल्या तटबंदीने हा भाग माचीपासून वेगळा करण्यात आलेला आहे. तटबंदी पुढे खोल खंदक आहे. दरवाजा पुढील खंदक सध्या बुजविण्यात आलेला आहे. दरवाजामधून आत प्रवेश केल्यावर समोर दोन खोल्या दिसतात. खोल्यांचे छत ढासळले आहे. हे दारूकोठार आहे असे वाटते. तेथे डाव्या बाजूस एक विहीर आहे. विहीरीची लांबी ६० ते ७० फूट, रूंदी अंदाजे ४० व खोली ८० ते ९० फूट आहे. विहीरीत उतरण्यासाठी खोबणी आहेत. वहीरीमागे भवानी मातेचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या पुढे महादेवाचे मंदिर व टेहळणी बुरूज आहे. त्याच्या पुढे दुसरा टेहळणी बुरूज आहे.[९४]

## ऐतिहासिक महत्त्व

महिपालगडाचा प्राचीन इतिहास उजेडात नाही. आदिलशहाकडून गड छत्रपती शिवाजी महाराजांनी कधी घेतला याची माहिती मिळत नाही. सन १६६५ नंतर लवकर गड छ.शिवाजी महाराजांनी घेतला असावा. छत्रपती संभाजी महाराजांच्या राजवटीत गड मराठयांच्या अंमलाखालीच होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सन १६८९ ते १६९३ च्या दरम्यान मोगलांनी महीपालगडाभोवती केलेल्या हालचाली संदर्भात थोडयाफार प्रमाणात माहिती मिळते. यावेळी गड मराठयांच्या ताब्यात होता. मोगलांचा तो गड घेण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणावर चाललेला होता. यादगार हुसेनने चांगल्या सैन्यानिशी महीपालगडास चोहोबाजूने वेढले होते. त्यामुळे त्याने आपल्या सैन्याचे पथक अन्यत्र पाठविण्याचे तहकूब केले होते.

दुसऱ्या एका पत्रावरून धनाजी जाधव व इतर मराठे सरदार महीपालगडाच्या भागात पसरले असताना औरंगजेबाने यादगार हुसेनला मराठयांच्या पाठलागावर निघण्यास सांगितले. त्यावेळी बादशाही सैन्याची पथके रवाना करण्यात आली. यावर यादगार ने औरंगजेबाला लिहीले की, 'मी त्वरीत हालचाली सुरू केलेल्या आहेत. व बहरामंदखान याला हे कळविण्यात यावे. सैन्याची पथके लवकर पाठविण्यात यावी म्हणजे मोहीम पार पाडण्यात विलंब लागणार नाही.'

मोगलकाळात विजापूर प्रांतात असलेले राजहंसगड, महिपालगड यांची किल्लेदारी व याला जोडून बेळगाव येथील किल्लेदारी ही पूर्वी सुंदरसिंगाकडे होती. या सर्व किल्ल्यावर सय्यद यादगार हुसेन याची नेमणूक करण्यात आली. किल्लेदाराची कर्तव्य व्यवस्थितपणे व काळजीपूर्वक पार पाडण्याची आज्ञा त्याला करण्यात आली.

मराठयांनी मोगलाकडून हा किल्ला जिंकून घेतला. पुन्हा सन १७०० च्या दरम्यान गड मराठयांनी घेतला. पुढे गड करवीर राज्यात तो सामील करण्यात आला. पण १८ व्या शतकाच्या अखेरीस गड पेशव्यांच्या अमंलाखाली गेला. सन १८०९–१० च्या एका यादीत पेशवे व त्यांच्या सरदारांच्या ताब्यातील दुर्गाच्या यादीत महीपालगडचे नाव आहे. हा गड चिंतामणराव पटवर्धन यांच्या ताब्यात होता.[९५]

## ५.७ समारोप–

कोल्हापूर जिल्हा हा ऐतिहासिक व धार्मिकदृष्टया महत्त्वाचा असलेला दिसतो. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळात या जिल्हयात अनेक ऐतिहासिक महत्त्वपूर्ण घटना घडलेल्या आहेत. हे तेथील ऐतिहासिक पुरावशेषावरून समजते. या जिल्हयात जे ऐतिहासिक वाडे, शिलालेख, ताम्रपट, किल्ले, लेण्या व स्मारके आहेत. त्यावरून कोल्हापूर जिल्हयाचा इतिहास उजेडात येण्यास मदत झालेली आहे. तसेच तेथे असणारी धार्मिक स्थळे यांनी कोल्हापूर जिल्हयाचे धार्मिक महत्त्व समजण्यास मदत झालेली आहे. असा हा कोल्हापूर जिल्हा ऐतिहासिक व धार्मिकदृष्टया महत्त्वाचा समजला जातो.

## संदर्भ


१) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक–आयएन–२९८०–१०८९–सी, आर, ४५३(अे)–एम–१०, ३० जून १९८३, पृ.२

२) चौधरी कि.का.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन १९८९, पृ.२

३) महाराष्ट्र शासन, कोल्हापूर जिल्हयाचा सन १९८१ चा जनगणना अहवाल, पृ.३

४) महाराष्ट्र शासन, कोल्हापूर जिल्हयाचा सन २०११ चा जनगणना अहवाल, पृ.२

५) कित्ता, पृ.२

६) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, १९८९, पृ.१९

७) कित्ता, पृ. २०

८) कित्ता, पृ. ६

९) डॉ.शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८–१८९४), कोल्हापूर, २००९, पृ.१७

१०) कित्ता, पृ.८८ ते ९५

११) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, पृ ११५

१२) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, १९८९, पृ.१२८

१३) Khane B.D. : Shri Shahu : A study of socio-political Reforms 1842-1922, unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur, p.3-4

१४) उपाध्ये ए.एन.,(संपा), बृहत कथाकोश, मुंबई १९४३, पृ.३४७

१५) Sabnis R.V. : Notes on Kolhapur, P. 4

१६) Ibid, P.83

१७) Ibid, P.78

१८) डॉ.शिंदे खंडेराव, उपरोक्त, पृ.१९

१९) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.४६

२०) कित्ता, पृ.४८–४९

२१) कित्ता, पृ.५२, ५३

२२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत-खंड२ : स्थिरबुद्धी राजाराम, १९२६, पृ.९०

२३) गर्गे स.मा., करवीर रियासत-खंड १, पृ.१७९-१८२

२४) डॉ. शिंदे खंडेराव, उपरोक्त, पृ.२४

२५) डॉ. पवार आप्पासाहेब, जिजाबाईकालीन कागदपत्रे, १९७९, पृ.७

२६) मोडक बा.प्र., कोल्हापूर प्रांताचा इतिहास, पृ.८०-८१

२७) डॉ.शिंदे खंडेराव, उपरोक्त, पृ.३०

२८) गुजर मा.वि., करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने भाग ५, लेख ११७.

२९) मोडक बा.प्र., उपरोक्त, पृ.७८

३०) डॉ.शिंदे खंडेराव, उपरोक्त, पृ.३६-५८

३१) गर्गे स.मा., करवीर रियासतीची कागदपत्रे खंड ३, पृ.१०२-१०३

३२) मोडक बा.प्र., उपरोक्त, पृ.१३२

३३) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.७९

३४) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू : राज व माणूस, पुणे १९८४, पृ.६७,६८

३५) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.११२-१२०

३६) एपिग्राफिया इंडिका, खंड १८, पृ.२४८

३७) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, नागपूर, १९७४, पृ.४८

३८) हरवंदे गीता आदिनाथ, महाराष्ट्रातील तीर्थयात्रा कुलदैवते आणि कुलसंप्रदाय, ६ नोंव्हेंबर २०११, पृ.८२

३९) मोहिते अनंत गोपाळ, तीर्थे महाराष्ट्राची, मुंबई, २०११, पृ.८३

४०) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६५९-६६०

४१) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.८७

४२) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील चालुक्य नृपती सोमदेव शिलालेखावरून

४३) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव सिंघण, संस्कृत व प्राचीन बाळबोध लिपीतील शिलालेखावरून

४४) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव जयसिल व सिंघणदेव संस्कृत व प्राचीन बाळबोध लिपीतील शिलालेखावरून

४५) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव नृपती महादेव संस्कृत व इ.स.१३व्या शतकातील नागरी लिपीतील शिलालेखावरून

४६) मोहिते अनंत गोपाळ, उपरोक्त, पृ.२४०–२४१

४७) हरवंदे गीता आदिनाथ, उपरोक्त, पृ.५५

४८) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१६७

४९) कित्ता, पृ.१६७

५०) हरवंदे गीता आदिनाथ, उपरोक्त, पृ.५२

५१) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१२०–१२१

५२) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६८७

५३) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१२३

५४) जामखेडकर अ.प्र., शिल्प–स्थापत्याचे वैभव– खिद्रापूर, लेख ८. ११. १९८१ च्या सकाळ(कोल्हापूर), पृ.५

५५) कुलकर्णी भरत कल्याण, खिद्रापूरचे श्री कोपेश्वर मंदिर, २०१२, पृ.६–७

५६) कित्ता, ९ ते १२

५७) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१२६–१२७

५८) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६७३

५९) कित्ता, पृ.६७४

६०) कित्ता, पृ.६७४

६१) श्री कोप्पेश्वर मंदिरातील कन्नड शिलालेखावरून

६२) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६७०

६३) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.१२९

६४) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६६१

६५) कुळे मुकुंद, इतिहासाचे साक्षीदार–मराठेकलीन सांस्कृतिक वैभवाचा मागोवा, २०११, पृ.७८–७९

६६) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६६२

६७) कित्ता, पृ.६६३

६८) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.२०७

६९) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, पृ.६६९

७०) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.३३–३४

७१) अक्कलकोट सतीश, दुर्ग, सांगली, २००९, पृ.५५५ ते ५६०

७२) गुळवणी एम.जी., पन्हाळा, १९८१, पृ.२

७३) पारसनीस डी.बी., पन्हाळा, १९८९, पृ.४

७४) गुळवणी एम.जी., उपरोक्त, पृ.३

७५) सावंत इंद्रजीत व., पर्णालपर्वत पन्हाळगड, कोल्हापूर, जून २००४, पृ.३२ ते ३४

७६) देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, पुणे, २००९–१०, पृ.१२८–१२९

७७) गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, २००९, पृ.६०–६१

७८) ढेरे आर सी आणि खरे बी.डी., महाराष्ट्र इतिहास दर्शन, २००२, पृ.३६

७९) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.५६३ ते ५६५

८०) सरदेसाई जी.एस., मराठी रियासत खंड ३, १९८९, पृ.४

८१) ) गायकवाड आर.डी. व इतर, उपरोक्त, पृ.७१, ७२

८२) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.४९–५०

८३) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.५७१–५७२

८४) कित्ता, पृ.५३७

८५) विशाळगडावर भोपाळ तलावाच्या भिंतीवरील फारशी शिलालेखावरून

८६) विशाळगड किल्ल्याच्या दौलत बुरूजावरील फारशी शिलालेखावरून

८७) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.५३८

८८) देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, उपरोक्त, पृ.१३२

८९) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, १९८९, पृ.६८८–६८९

९०) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.६९–७०

९१) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, १९८९, पृ.६८५

९२) फडके आदित्य, उपरोक्त, पृ.८२

९३) चौधरी कि.का.(संपा.), उपरोक्त, १९८९, पृ.६७६

९४) अक्कलकोट सतीश, उपरोक्त, पृ.५८१

९५) कित्ता, पृ.५८२

# प्रकरण सहावे

# सोलापूर जिल्हयातील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे

## ६.१ प्रास्ताविक–

महाराष्ट्र राज्यात सीमावर्ती भागात असलेल्या सोलापूर जिल्हयाला प्राचीन काळापासून गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. सोलापूर जिल्हा हा ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. कारण या जिल्हयात प्राचीन काळापासूनचा वैभवशाली इतिहास लाभला आहे. या जिल्हयाला बारमाही पाणीपुरवठा करणारी असून भीमा नदी बाकी सर्व हंगामी वाहणाऱ्या आहेत. त्यामुळे भीमा नदीकाठी किंवा भीमा नदीस मिळणाऱ्या नद्यांच्या संगमाकाठी मानवी वसाहतीच्या प्राचीन खुणा आढळून येतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व नंतर काही काळ सोलापूरला महत्त्व प्राप्त झाले होते. औरंगजेब बादशहाचा मुक्कामसुद्धा सोलापूर जिल्हयातील माचणूर व बेगमपूर परिसरात भीमानदीकाठी होता. याच्याही ऐतिहासिक माहिती मिळते.

या भागातून वाहणाऱ्या भीमा, भिवरा व चंद्रभागा या नद्यांनी येथील लोकांचे आर्थिक प्रगतीबरेबर धार्मिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे. या नद्यांनी सोलापूर जिल्हयातील लोकांचे समाज जीवन बदलून टाकले आहे. आधुनिक काळातही सोलापूर जिल्हयाने आपल्या त्यागाने, कर्तृत्त्वाने व पराक्रमाने अभिनव असा इतिहास निर्माण केला आहे. यातून सोलापूर जिल्हयात अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण झालेली आहेत. या स्थळांनी सोलापूर जिल्हयातील लोकांना सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. तेव्हा या प्रकरणात येथील निवडक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास केलेला आहे. या धार्मिक स्थळामध्ये पंढरपूरातील विठ्ठल मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, अक्कलाईदेवी, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, मंगळवेढा संताचे स्थान, मोहोळचे नागनाथ मंदिर व दहिगाव जैन मंदिर इत्यादीचा समावेश केलेला आहे. ऐतिहासिक स्थळांमध्ये सोलापूरचा किल्ला, पिलीव गढी, मंगळवेढे व माचणूर किल्ला यांची सविस्तर माहिती दिलेली आहे.

## ६.२ सोलापूर जिल्हयाची भौगोलिक पार्श्वभूमी–

### ६.२.१ स्थान व सीमा

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील सीमावर्ती जिल्हा आहे.राज्याच्या दक्षिण भागात हा जिल्हा असून त्याचे भौगोलिक स्थान १७.१० ते १८.३२ उत्तर अक्षांश आणि ७४.४२ ते ७६.१५ पुर्व रेखांश याच्या दरम्यान आहे. सोलापूर जिल्हयाच्या पश्चिमेस पुणे, सातारा व सांगली हे जिल्हे आहेत. उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद या जिल्हयाच्या दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आहे. जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र १४ हजार ८८६ चौरस किलोमीटर आहे. सोलापूर जिल्हयात एकूण ११ तालुके आहेत. यामध्ये उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी. अक्कलकोट, मोहोळ, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, माढा, करमाळा व मंगळवेढा इत्यादीचा समावेश होतो.[१]

### ६.२.२ लोकसंख्या–

इ.स.२००१ च्या जनगणनेनुसार सोलापूर जिल्हयाची लोकसंख्या ३८ लाख ५५ हजार ३८३ एवढी आहे. त्यात १९ लाख ९० हजार ६६१ पुरूष आणि १८लाख ६४ हजार ७२२ महिला आहेत. जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ५६.४ टक्के आहे. जिल्हयातील ग्रामीण भागातील लोकसंख्या २६ लाख २९ हजार ५५८ असून नागरी भागातील लोकसंख्या १२ लाख २५ हजार ८२५ आहे.[२]

### ६.२.३ हवामान

सोलापूर जिल्हा समुद्रापासून दूर आहे. जिल्हयाचा बहुतेक भाग पठारी आहे. परिणामी पावसाचे प्रमाण जून ते सप्टेंबर हे महिने वगळता जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे. जिल्हयाचे उन्हाळयाचे तापमान ४२ सेंटीग्रेड पर्यत व हिवाळयाचे तापमान ११ सेंटीग्रेड पर्यत नोंदले जाते. जिल्हयाचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ५४५ मिलीमीटर आहे. बंगालच्या उपसागरात आंध्रप्रदेश किंवा तामीळनाडूच्या प्रदेशात तयार होणारी चक्रीवादळे हवामानातील अनुकूल अथवा प्रतिकूल परिस्थितीत चांगला पाऊस देतात. अशा अचानक बदलाच्या मौसमामुळे नद्यांना अचानक पूर येण्याच्या घटना आढळतात. सोलापूर जिल्हा हा भौगोलिकदृष्टया दुष्काळग्रस्त किंवा अवर्षणग्रस्त असा जिल्हा आहे. या जिल्हयात मौसमी पाऊस पडतो. परंतु समुद्रापासून लांब असल्यामुळे तसेच सहयाद्रीच्या रांगापासून दूर

पर्जन्यछायेच्या प्रदेशात असल्यामुळे कमी जास्त तसेच अनियमित पडणारा पाऊस येथील जनजीवन डळमळीत व विस्कळीत करणारा ठरतो. या प्रदेशात मोसमी पाऊसापेक्षा बिगर मोसमी पाऊस वेळेवर पडतो.[३]

### ६.२.४ प्राकृतिक विभाग

या जिल्हयाचे तीन प्राकृतिक विभाग पडतात. पश्चिम व नैऋत्येकडील प्रदेशात महादेवाचे व शुक्राचार्याचे डोंगर आहेत. हा भाग डोंगराळ आणि पठारी आहे. यात माळशिरस, सांगोले, पंढरपूर व मंगळवेढे या तालुक्याचा भाग येतो. उत्तर, ईशान्य व पुर्वेकडील प्रदेशात बालाघाटच्या डोंगर रांगा आहेत. हा प्रदेश डोंगराळ व पठारी आहे. करमाळे, बार्शी व अक्कलकोट या तालुक्याचा भाग येतो. भीमा नदीच्या खोऱ्याच्या प्रदेशात जिल्हयातील मध्यभाग समाविष्ट आहे. हा भीमा व तिच्या उपनद्यांचा सखल प्रदेश आहे. या प्रदेशातील जमीन सुपीक आहे. भीमा ही सोलापूर जिल्हयातील सर्वात महत्त्वाची नदी आहे. या नदीचा उगम पुणे जिल्हयातील भीमाशंकर येथे होतो. ही नदी सोलापूर जिल्हयात वायव्येकडून आग्नेयेकडे वाहते. पंढरपूरजवळ भीमा नदीच्या पात्राचा आकार चंद्रकोरीप्रमाणे आहे. म्हणून त्या ठिकाणी भीमा नदीस चंद्रभागा असेही म्हणतात. भीमा नदीस नीरा व माण या उपनद्या पश्चिमेकडून सीना व बोरी या उपनद्या उत्तरेकडून मिळतात. नीरा व भीमा यांचा संगम माळशिरस तालुक्यात झाला आहे. भीमा नदीची सोलापूर जिल्हयातील एकूण लांबी २८९ किलोमीटर आहे.[४]

## ६.३ सोलापूर जिल्हयाची धार्मिक व सामाजिक पार्श्वभूमी

सोलापूर जिल्हा हा हिंदूचे केंद्र म्हणून ओळखला जात होता. हिंदू धर्मात अनेक जाती व्यवस्थेचा समावेध होता. जातीव्यवस्था हा हिंदू धर्माचा पाया असल्यामुळे विविध जातीचे लोक शहरात वास्तव्य करत होते. हिंदू समाजामध्ये ब्राम्हण, मराठा, कुणबी इतर मागासवर्गीय जाती, जमाती व अनुसूचित जमातीचा समावेश होतो पारंपरिकपणे ब्राम्हण व मराठा या जाती उच्च समाजल्या जात होत्या इतर जाती या कनिष्ठ समजल्या जात होत्या. ब्राम्हण जातीमध्ये देशस्थ ब्राम्हण, गोलक ब्राम्हण, गुजराथी ब्राम्हण, कनौज ब्राम्हण, कऱ्हाडी ब्राम्हण, कोकणस्थ ब्राम्हण, रामानुज ब्राम्हण, तेलंग ब्राम्हण, तिरगल्स ब्राम्हण, कायस्थ प्रभू व अगरवाल्स इत्यादी जाती आहेत. याशिवाय मराठा, वाणी, यामध्ये गुजराथी वाणी, लिंगायत वाणी, मारवाडी वाणी व वैश्यवाणी इत्यादी वाणी जातीचे प्रकार आहेत. कोमटी, हाटकर, बुरूड, माळी, चांभार, गवंडी,

घिसाडी, कासार, खेत्री, कोष्टी, कुंभार, लोहार, लोणार, पाथरवट, रंगारी, रावळ, साळी, सोनार, सुतार,.शिंपी, तेली, न्हावी, परीट, गुरव, धनगर, गवळी, तसेच मुस्लीम जातीचे लोक राहत आहेत.[५]

सोलापूर जिल्हयातील बहुसंख्य लोक खेडयात राहतात. ते लोक हे नितीमान, प्रामाणिक, सचोटीने जीवन जगणारे होते. येथील समाजात स्वास्थ व सुरक्षितता असल्याने मोठया प्रमाणावर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण झाले. समाजात हिंदु धर्माचे प्रमाण सर्वाधिक होते. त्यामुळे समाजात रूढी परंपराचे जतन मोठया प्रमाणावर केले जात होते.

### ६.३.१ आहार

सोलापूर जिल्हयातील लोकांचा शाकाहारी व मांसाहारी स्वरूपाचा आहार असतो. शाकाहारी जेवणात ज्वारी, बाजरी, गहू इत्यादी पिकांचा व पालेभाज्या यांचा समावेश आहे. मांसाहारी जेवणात मटण, मासे इत्यादीचा समावेश होतो.

### ६.३.२ पोषाख–

पुरूष व स्त्रिया वेगवेगळा पोषाख परिधान करीत असत. मुसलमान पुरूष हे अंगावर शेरवानी, पायजमा, चुडीदार, सलवार, लुंगी, शर्ट व डोक्यावर गोल टोपी हा पोषाख वापरतात. स्त्रिया अंगात चोळी ब्लाऊज घालतात व गोल साडी नेसतात त्या डोक्यावर साडीचा पदर घेऊन त्यावर बुरखा घेतात.[६]

### ६.३.३ दागदागिने

सोलापूर जिल्हयात समाजातील वरिष्ठ वर्ग दागिण्याची हौस पुरवित होता. ग्रामीण भागातील लोक सोन्याचे, गरीब लोक चांदी, तांबे, पितळ व काचेचे मणी वापरतात. स्त्रिया माळा, हार, बाजूभूषणे, चंद्रहार, चपलाहार, कंकणे, पाटल्या, बिलवर, पुतळया, मोहनमाळ, ठुशीचीमाळ व गोठ असे दागिने वापरत. याशिवाय स्त्रिया केसात मुद, अग्रफुल, केतकी, केवडा, गुलाबाचे फुल, वेणी, बिंदीविजोर असे दागिने वापरतात. कानात विवाहीत चौकडया व कुडया मोत्यांचा किंवा हिऱ्यांचा घालतात. विवाहित स्त्रिया गळयात मंगळसूत्र घालतात. याशिवाय चंद्रहार, राणीहार, चपलाहार, जोधंळीपोत, बकुळीहार, पोहेहार, मोहनमाळ, बोरमाळ, पुतळयाची माळ व कोल्हापुरी साज इत्यादी दागिने समारभात घालतात. हिरे व मोती यांच्या बांगडया श्रीमंत स्त्रिया वापरतात. तसेच नाकात नथ, चमकी, फुली, मुरणी वापरतात. लहान

मुलांना बिंदल्या, मनगटया, कडीतोडे, वाळे, तोरडया, चाळा, करगोटे, कडया इत्यादी सोन्या चांदीचे दागिने घालतात. शिरोभूषण, कर्णभूषण कंठभूषण, हस्तभूषण, कलगीतुरा हे शिरपेच, शिरोभूषण, भिकबाळी, चौकडा ही कर्णभूषण, कंठी, गोफ, ही कंठभूषणे पुरूष वापरत. कंबरेचा करगोटा सर्वजण आपापल्या ऐपतीप्रमाणे रेशमी, चांदी, सोन्याचा वापरत गरीब लोक चांदी व रूप्याचे दागिने वापरत. पुरूषामध्ये श्रीमंत लोक भिकबाळी, अंगठी, पोची, गोफ, कंठा, वापरतात. [७]

## ६.३.४ घरे

सोलापूर जिल्हयात शहरी विभागात सिमेंटची एकमजली ,बहुमजली घरे असून ज्या घराभोवती मोकळया जागेचा अभाव असतो. अशा घरामध्ये स्वंयपाकघर, देवघर, स्नानगृह, शयनगृह व अतिथीगृह अशा अनेक खोल्या आढळतात.

सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील बहुतांशी शेतकऱ्यांची घरे दगडाची, कच्च्या विटांची, कौलाची किंवा धाब्याची दिसून येतात. डोगराळ भागातील गरीब शेतकरी, शेतमजूर, मागास जातीतील लोंकाच्या झोपडया दिसून येतात. या झोपडया तयार करण्यासाठी बांबूच्या कामटया, निरगुडया किंवा इतर काठयावर चिखल थापून तयार केलेल्या असतात. भटक्या जमातीतील लोक मात्र बांबूच्या कामठयांपासून किंवा ताडा माडाच्या झावळयापासून विणलेल्या झोपडया किंवा कापडाचे लहान तंबू पाल यामध्ये वास्तव्य करतात.

## ६.३.५ सण व उत्सव

समाज निर्मितीमध्ये सण समारंभाचे महत्त्वाचे स्थान आहे. सोलापूर जिल्हयातील लोक बाराही महिने विविध सणउत्सव मोठया उत्साहाने साजरे करतात. गुढीपाडवा, रामनवमी, गौरी गणपती, बसवेश्वर जयंती, वटपौर्णिमा, अक्षयतृतिया, बेंदूर, नारळी पौर्णिमा, दिवाळी, दसरा, होळी, मकरसंक्रात, बकरी ईद, रमजान, पारशी दिन, मोहरम, ख्रिसमस इत्यादी सण उत्सव साजरे करतात. हे सर्व सण, उत्सव उत्साहाने व आनंदाने साजरे केले जातात. याशिवाय नाताळ, मोहरम, रमजान ईद,पारशी दिन व बौद्ध पौर्णिमा असे इतर धर्मियांचे सण ही उत्साहात साजरे केले जातात. [८]

## ६.४ धार्मिक स्थळे–

### ६.४.१ पंढरपूर विठ्ठल मंदिर

विठ्ठल हा शब्द विष्णु या शब्दाचा अपभ्रंश झालेला आहे. असे मानले जाते. स्कंद व पद्म पुराणात विठ्ठलाच्या आगमनाची कथा दिली आहे. श्रीकृष्ण द्वारकेचा राणा झाल्यावर राधा ही श्रीकृष्णाच्या मांडीवर बसली आहे. हा विरह रूक्मिणीला सहन झाला नाही. म्हणून रूक्मिणीने द्वारकेहून पलायन केले. ती पंढरपूरहून दिंडीरवनात आली. या पवित्र तीर्थक्षेत्रात तपश्चर्येला जागा योग्य होती म्हणून ती तेथे तप करीत बसली. रूक्मिणी आपल्याला टाकून गेल्याचे पाहून श्रीकृष्ण दुःखी झाला आणि रूक्मिणीच्या शोधार्थ द्वारकेचा त्याग करून आपल्या गाई–गोपाळासह तो प्रथम गोपाळपूरात आला. तेथे दिंडीरवनात जाऊन रूक्मिणीची मनधरणी करू लागला. यावेळी तो विटेवर उभा नसला तरी कटीवर हात ठेवून रूक्मिणीकडे पहात उभा राहिला असा उल्लेख असलेला दिसून येतो.[९]

या स्कंद आणि पद्मपुराणाच्या निर्मितीच्या कालखंडाचा विचार केला तर इ.स.सातव्या शतकापासून ते इ.स.नवव्या शतकापर्यंत या पुराणाची निर्मिती झाली. यावरून हा कालखंड प्राचीन भारताच्या इतिहासातील गुप्तोत्तर कालखंडापासून मंदिर अस्तित्त्वात असावे. प्रारंभीस हे मंदिर प्राथमिक स्वरूपाचे म्हणजे लहान असावे असे विठ्ठलदाजी शास्त्री धारूरकरांचे मत आहे.[१०]

विठ्ठलाची स्थापना बिज्जल–बसवेश्वर कालखंडानंतर झाली. असेही म्हटले जते. बिज्जल–बसवेश्वर कालखंडानंतर शिव, जैन, विष्णु या तीन पंथात भीषण दंगे झाले. त्यातून हिंसक वळण लागले. त्यामुळे अराजकता निर्माण झाली. तेव्हा मंगळवेढा हे बिज्जलाचे मुळ गाव व मुळ राजधानीचे ठिकाण होते. पंढरपूर हे ठिकाण मंगळवेढयापासून केवळ १४ मैल अंतरावर असल्याने या परिसरात हिंसेचे प्रमाण अधिक होते. ही अराजकता संपल्यानंतर या परिसरात उध्वस्त झालेल्या एका ठिकाणी पांढरीवर(पंढरी) हिंसक शक्तीवर मिळालेला विजय साजरा करण्याच्या उद्देश्याने अशी परिस्थिती पुन्हा होवू नये या फेतून शांतीदेई दैवतांची स्थापना करण्याचे तेथील लोकांनी ठरविले. विष्णु, शिव, जैन यांच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्वांना मान्य होईल असा मूर्तीचा तपशील मान्य होण्यास अवधी लागेल हे जाणून प्रथम एक किंवा दोन विटांची स्थापना झाली. व नंतर काही दिवसांनी विठ्ठलाची स्थापना झाली. असे मत

संशोधक श्री. अ.व्यं.सावंजी यांनी व्यक्त केले आहे.[११]

**मंदिराचे वर्णन**

पंढरपूरचे मुख्य दैवत विठ्ठल देव असून ते वारकऱ्यांचा जीव की प्राण आहे. तसेच संकटाने, व्याधीने आणि गरिबीने ग्रासलेल्या अठरापगड जातीच्या लोकांचे उद्धार करणारे एकमेव कल्याणकारी स्थान पंढरपूर असून विठ्ठल देवावर या सर्वांची नितांत श्रद्धा आहे. भक्त पुंडलिकाच्या समाधीपासून पाचशे यार्ड अंतरावर भर वस्तीत असलेले विठ्ठल मंदिर विशाल असून त्याची पूर्व पश्चिम लांबी ३५० फूट व दक्षिणोत्तर लांबी १७० फूट आहे.

मंदिराला एकूण आठ दरवाजे असून जणू काही हे अष्टांग योग आहेत. यातील प्रमुख दरवाजा म्हणजे महाद्वार असून त्याला संत नामदेवांचा दरवाजा असे म्हणतात. महाद्वारासमोर संत चोखामेळ्याची समाधी आहे. या समाधीचे दर्शन घेऊन भक्तगण विठ्ठल देवाच्या दर्शनाला जातात. दर्शनाला जाताना बारा पायऱ्या चढाव्या लागतात. पितळी पत्र्याने मढवलेली पहिली पायरी नामदेवांची आहे. या पायरीवर नामदेवांनी देहाचे विसर्जन केले होते. या पायरीच्या चौदा मनुष्याकृती असलेला पत्रा आहे. नामदेवांच्या समाधीमुळे विरह सहन न झाल्यामुळे त्यांच्या चौदा नातलगांनी चंद्रभागेत उडया घेतल्या होत्या. त्या आकृत्या त्यांचे निदर्शक आहे. या मंदिराचे भूषण म्हणजे मंडपाची मांदियळी होय.[१२]

**६.४.१.१ द्वार मंडप–**

हा मंडप दोन गोल दगडी खांबावर आधारीत असून डाव्या अंगाला वटवृक्ष आहे. याला लागून तेहतीस कोटी देवांचे मंदिर व उजव्या अंगाला दत्तमंदिर आहे.[१३]

**६.४.१.२ मुक्तिमंडप–**

द्वार मंडपातून पुढे गेल्यावर मुक्तिमंडप लागतो. या मंडपात तीन खोल्या असून डाव्या सोंडेच्या गणपतीची भव्य मूर्ती आहे. कमानीवर आधारलेल्या मंडपात नगारखाना आहे.[१४]

**६.४.१.३ महामंडप–**

मुक्तिमंडपातून पुढे गेल्यावर महामंडप लागतो. अठरा फूट उंचीच्या बारा अखंड खांबावर हा मंडप उभा असून आकर्षक आहे. या मंडपात प्रवेश केल्यावर डाव्या हाताला प्रल्हाद बुवा बडवे व कान्होजी हरिदास या विठ्ठल भक्तांच्या समाधी आहेत. तीस फूट उंचीच्या येथे दीपमाळा असून मधल्या भागात गरूड हनुमंताची मंदिरे आहेत. समर्थ रामदासांनी स्थापन

केलेल्या गोमयाच्या तांबडया मारूतीचे इथे दर्शन घडते महानैवद्याची पाकशाला, भोजनाची जागा या मंडपात बनविली आहे.[१५]

**६.४.१.४ सभामंडप–**

महामंडपापुढे सभामंडप आहे. या मंडपात प्रवेश करण्यासाठी तीन पायऱ्या असून दोन्ही बाजूस जय–विजयाच्या मूर्ती आहेत. मंडपाचे खांब चौरसाकार व गोलाकार असून या मंडपातून मंदिरात जाताना डाव्या अंगाला देवाचे अलंकारगृह आहे.[१६]

**६.४.१. ५ सोळाखांबी मंडप–**

सभामंडपानंतर सोळखांबी मंडप येतो. हा सोळा दगडी खांबांचा असून मंडपात प्रवेश करण्यासाठी तीन दरवाजे आहेत. हेमाडपंथी धाटणीच्या मंडपाच्या दरवाजासमोर जय–विजयाच्या मूर्ती लक्ष वेधून घेतात. दगडी खांबाच्या रांगेतील दुसऱ्या खांबाला गरूड खांब म्हणतात. या खांबाला आलिंगन दिल्याशिवाय वारकरी विठ्ठल देवाचे दर्शन घेत नाहीत. या मंडपात भलेमोठे संगमरवरी कासव असून तिथे धूप व कापूर जाळण्याची व्यवस्था आहे. सोळाखांबी मंडपातून देवाकडे जाण्यासाठी रूप्याने मढवलेला दरवाजा आहे.[१७]

**६.४.१.६ चौखांबी मंडप–**

रूप्याच्या दरवाजाने आत गेल्यावर चौरसाकृती दगडी खांबावर उभारलेला चौखांबी मंडपाच्या दरवाजाच्या दोन्ही बाजूस दगडी हत्ती आहेत. चौखांबी मंडपातून पुढे गेल्यावर चांदीच्या पत्र्याने मढवलेली कमान लागते. कमानीच्या पुढे गेल्यावर गर्भारिचा दरवाजा लागतो. त्याच्या पश्चिमेस भिंतीस लागून पाच फूट उंचीचा चौथरा बांधलेला असून त्यावरही पाच फूट उंचीचा चवरडोल आहे. तो नक्षीकाम केलेल्या रूप्यांनी मढवला असून पाठीमागे प्रभावळ आहे. प्रभावळीला लागून पाच फण्यांचा नाग व चवर डोलाच्या खाली गाय दृष्टीस पडते. तिथे गोडया तेलाचा नंदादीप तेवत असतो. चवरदोलच्या मध्यभागी सिंहासनावर आरूढ झालेली तीन मुर्ती, श्यामल वर्णी विठ्ठल देवाची करकटेवर ठेवलेले विलोभनीय मूर्ती विटेवर उभी आहे. या मूर्तीचे चरण दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक देशाच्या कानाकोपऱ्यातून येतात व दर्शन घेतात.[१८]

**६.४.१.७ गाभारा–**

गाभाऱ्यात काही बदल केला आहे. त्यात संगमरवरी फरशी बसविण्यात आल्याने लहान मुलांनाही चरणावर डोके टेकवून दर्शन घेता येते. गाभाऱ्यात चांदीचे आवरण असलेले

नक्षीदार व्यासपीठ असून याची उंची तीन फूट आहे. दोन्ही बाजूला दोन गाईची प्रतिकृती कोरली आहे. मागील बाजूस चांदीची प्रभावळी आहे. तिला लागून पाच फणाच्या नागाची भव्य प्रतिमा आहे. व्यासपीठाच्या दोन्ही बाजूस नंदादीपासाठी दोन कोनाडे असून वरच्या बाजूला दोन घंटा आहेत. देवाच्या स्नानानंतर पाणी वाहून जाण्याची व्यवस्था केली असुन त्यास गायमुख असे म्हणतात. श्रीच्या मूर्तीच्या उजव्या बाजूला सेवेकरी थांबतात व डाव्या बाजूस निर्माल्य ताकण्यासाठी हौद असलेला दिसतो.[१९]

### ६.४.१.८ शिखर–

दक्षिणेकडील मंदिरावरील असलेली शिखरे त्यांच्या तुलनेत विठ्ठल मंदिरातील शिखर साधे असून शिखरावरील बांधकामाचे तीन टप्पे आहेत. तळाच्या टप्प्यावर हत्तीस्वार, घोडेस्वार, भजनात तल्लीन असलेले वारकरी यांची चित्रे, तसेच वरच्या बाजूस गणेश, नरसिंह, गरूड, मारूती, श्रीकृष्ण, गवळणी, याची चित्रे आहेत. दुसऱ्या बाजूस समर्थ रामदास, संत तुकाराम, चैतन्य महाप्रभू यांची चित्रे आहेत. मंदिराचा कळस सोन्याचा असून कळसावर विजेचा प्रखर दिवा आहे. शिखराची उंची ४८ फूट आहे.[२०]

मंदिराच्या परिसरात अंबाबाई, नरद परशुराम, गणपती इत्यादी मुर्ती आहेत. इथे कान्होपात्राचे झाड असून जवळ तरटी दरवाजातून पुढे लाकडी सभामंडप लागतो. त्यासमोर रूक्मिणीचे मंदिर असून गाभाऱ्याच्या बाजूच्या खोल्यात सत्यभामा व राही म्हणजे राधेच्या मुर्ती आहेत.

मंदिरात रोज पहाटे विठ्ठलदेवाची काकड आरतीने पूजा होते. नंतर पंचामृताचे स्नान घालून भरजरी कपडे चढविण्यात येतात. दुपारी बडव्यांच्या हस्ते पाद्यपूजा होऊन देवाला नैवद्य अर्पण करतात. तिसऱ्या प्रहरी अपरान्ह पूजा होऊन देवाचे पाय प्रक्षाळले जातात. तिन्ही सांजेला धुपारती होते. रात्री पंचारती झाल्यावर कल्पनेने देवाला शयनगृही नेण्यात होते. दररोज तसेच एकादशीला वारकरी व भाविक देवाचे दर्शनाला येत असतात. चंद्रभागा स्नान, कळसाचे दर्शन, हरीचे किर्तन, क्षेत्र प्रदक्षिणा हे चतुर्विध कार्यक्रम वारकऱ्यांचे ठरलेले असतात.

आषाढी एकादशीला मोठी यात्रा भरते. ठिकठिकाणाहून देवाचे दर्शन घेण्यासाठी संतांच्या पालख्या घेऊन वारकरी पायी येतात. त्याला पंढरीची वारी म्हणतात.[२१]

## पंढरपूरातील प्रमुख यात्रा

पंढरपूर येथे वर्षातून चार वेळा यात्रा भरतात. त्या म्हणजे चैत्री वारी, आषढी वारी, कार्तिकी वारी व माघ वारी होय.

### अ) चैत्री वारी–

ही यात्रा हिंदू संस्कृतीप्रमाणे चैत्र महिन्यात भरते. लाखो भाविक पंढरपूरात विठ्ठल दर्शनासाठी येतात. चंद्रभागेत स्नान, श्री विठ्ठलदर्शन, क्षेत्र प्रदक्षिणा करून भजनामध्ये भक्तभाविक तल्लीन होऊन जातो. या यात्रेस आलेले भाविक श्री विठ्ठल दर्शन घेऊन खांद्यावर कावड घेऊन वाजतगाजत शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाच्या दर्शनाला येतात.[२२]

### ब) आषाढी वारी

ही वारी अत्यंत महत्त्वाची वारी मानली जाते. आषाढी व कार्तिकी या चार महिन्याचा काळ हा चातुर्मास म्हणून ओळखतात. या वारीसाठी सहा ते सात लाख भाविक संताच्या पालख्यासमवेत व अन्य मार्गाने पंढरपूरात दाखल होतात. हे वारकरी व भक्त पंढरपूरात मठ, मंदिरे, धर्मशाळा इत्यादी ठिकाणी राहून भजन कीर्तन या कार्यक्रमात सहभागी होतात. तसेच भागवत धर्माचा अभ्यास करतात. अनेक संताच्या पालख्या पंढरपूरात आलेल्या असतात.[२३]

### क) कार्तिकी वारी

कार्तिक महिन्यातील एकादशीस पंढरपूरात मोठी यात्रा भरते. या यात्राकाळात नदीच्या वाळवंटातर जागोजागी कीर्तने चालू असतात. पंढरपूरातील मठ, मंदिर व धर्मशाळेतून कीर्तने भजनाचे कार्यक्रम चालतात. या दिवशी श्री विठ्ठलाचा रथ नगरप्रदक्षिणेला निघतो. पौर्णिमेच्या दिवशी गोपाळकाला व दुसऱ्या दिवशी मंदिरात महाद्वार काला होतो. या यात्रेवे वैशिष्टय म्हणजे या यात्रेस कर्नाटकातून दिंडयासह लाखो भाविक पंढरपूरात दाखल होतात.[२४]

### ड) माघवारी

पंढरपूरातील ही चौथी वारी होय. माघ महिन्याच्या शुद्ध एकादशीस ही यात्रा भरते. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून मोठया प्रमाणात अनेक भाविक पंढरपूरात दाखल होतात. यावरून तामिळ, तेलगू भाविकामध्येही श्री विठ्ठलाविषयी व भागवत धर्माविषयी किती जिव्हाळा आहे हे दिसून येते.[२५]

पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या वारीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे पंढरपूरमध्ये देशाच्या विविध प्रांतातील भाषिकांना भागवत धर्माच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे कार्य होते. लाखो भाविक जात, धर्म, पंथ व भेद विसरून विठ्ठलाच्या दर्शनासाठी एकत्र येतात.

**मंदिराचे सेवेकरी**

काकडारती ते शेजारती व नित्योपचारातील पुजा करणारे ते पुजारी होत. नित्योपचारातील मंत्र सांगणारे ते बेणारे होय. विठ्ठलपूजेच्या वेळी चांदीच्या घागरीने गरमपाणी आणणे व धुपदीप चांदीच्या धपटण्यातून पुजाऱ्याकडे देणे. बुधवार व शनिवारी देवाला अभ्यंगस्नान असते त्यावेळी देवाचे न्हावी डिंगरे लोक केसांची निगा राखतात व देवाला आरसा दाखवितात. तर देवाचे चोपदार हातात चांदीची काठी घेऊन पूजा विधीच्यावेळी बंदोबस्त करण्याचे काम डांगे करतात. देवाच्यापुढे काकड आरतीच्यावेळी गायन करण्याचे काम हरीदास करतात. दिवटे हे पूजाविधी सुरू असताना हातात दिवा घेऊन देवाचे दर्शन भक्तांना सोपे व्हावे म्हणून प्रकाश दाखवितात. बडवे लोक हे विश्वस्त असून त्यांचे उत्पन्न हे भक्तांकडून येणाऱ्या भेटवस्तू व दक्षिणा हे आहे. उत्पात लोक रूक्मिणी मातेची सर्व पूजाविधी करतात.[२६]

**मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व**

पंढरपूरमध्ये जे शिलालेख उपलब्ध आहेत त्यावरून ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करता येईल. शके ११११ चा शिलालेखावरून विठ्ठल मंदिराशी संबंधित एका व्यक्तीचे नाव विठ्ठलदेव नायक असे आले आहे. शके ११५९ च्या शिलालेखावरून होयसळ राजवंशाची यादी दिली आहे. शके ११९२ च्या शिलालेखावरून महादेव यादवाच्या राजकाळातील देवगिरीच्या यादवांच्या एका ब्राम्हणकुलीन सामंत घराण्यातील कोणा एका केशवपुत्र भानूने महादेव यादवाच्या राजकाळात भीमरथीच्या तिरावर केलेल्या यज्ञाची नोंद या शिलालेखात केलेली आहे. शके ११९५ च्या लक्षचौऱ्यांशी नावाच्या शिलालेखावरून विठ्ठल मंदिरातील पूजा, प्रसाद, व्यवस्थेसाठी दिलेल्या देणग्या, देणगीदाराचा तपशील व काळाचा तपशील दिलेला आहे. शके १२३३ च्या शिलालेखावरून दानविषयक माहिती येते.

मध्ययुगीन काळात बिदर दरबाराच्या निकालाप्रमाणे इ.स.१४७८ पर्यंत मंदिराची व्यवस्था पाहिली जात होती. बिदरशाहीनंतर विजापूर दरबाराने संपूर्ण व्यवस्था पत्र तयार केले. त्यात त्यांनी प्रत्येकाचे हक्क व अधिकार निश्चित केले. सेवेकऱ्याची कामे ठरवून दिली. सरकारी

महापूजा व नैवद्यासाठी सरकारकडून दरवर्षी ३५०० रूपये मिळत होते. पेशवेकाळात मंदिर व्यवस्थापन व मंदिरासंबंधीचे नियम तयार केले होते. त्यानुसार मंदिराची दैनंदिनी चालत होती.[२७]

### ६.४.२ सिद्धेश्वर मंदिर

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज योगी पुरूष होते. ते १२ व्या शतकात सिद्धरामेश्वर संत होवून गेले. सोलापूरमध्ये तलावाच्या मध्यभागी सिद्धेश्वराचे मंदिर आहे. सिद्धेश्वरांनी सोलापूरच्या पंचक्रोशीत ६८ लिंगाची व अष्टविनायकाची स्थापना केली.

सोलापूर येथे सिद्धेश्वराची यात्रा भरते यास 'गड्डा' या नावाने ही यात्रा प्रसिद्ध आहे. १३ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान प्रतिवर्षी ही यात्रा भरते. १२ जानेवारीपासून यात्रेला प्रारंभ होतो. ६८ लिंगाना या दिवशी तैलाभिषेक करण्यत येतो. एक कुंभार कन्या सिद्धेश्वराची भक्त होती. तिच्या भक्तीने सिद्धेश्वर महाराज प्रसन्न झाले. त्यांनी तिला वर माग म्हणून साांगितले. तिने सिद्धेश्वराशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. सिद्धेश्वर योगी पुरूष असल्याने ते लग्न करू शकत नव्हते. त्यानी भक्ताची इच्छा पूर्ण करण्यासाठी कुंभार कन्येचा विवाह त्यांच्या योगदंडाची लावला. हा विवाह सोहळा भोगीच्या दिवशी म्हणजे १३ जानेवारीला होतो. १४ जानेवारीला होमाचा कार्यक्रम असतो. १५ जानेवारीला नयनरम्य दारूकाम असते. या यात्रेचे वैशिष्ठये म्हणजे यात्रेत मानाच्या सात काठया असतात. या तीन दिवसांच्या कालावधीत फुलांनी व विद्युत रोषणाईने त्या सजविलेल्या असतात. अशा काठया कर्नाटकातून आलेल्या असतात.[२८]

### ६.४.३ अक्कलकोट

सोलापूरपासून २२ मैल पुणे रायचूर या रेल्वेमार्गवरचे गाव अक्कलकोटचे स्वामी यांनी वास्तव्य केल्यामुळे या गावाला दत्तक्षेत्राचा मान लाभला आहे. सोलापूर जिल्हयातील ते तालुक्याचे गाव आहे. अक्कलकोट संस्थानची ती राजधानी असून त्याची लोकसंख्या सन १९७१ च्या जनगणनेनुसार २६,४८४ आहे.[२९] इ.स.१८७८ मध्ये श्री स्वामींनी येथे समाधी घेतलेली आहे. माणिक प्रभूंचे समकालीन सत्पुरूष यांना दत्ताचे अवतार मानतात. दत्त संप्रदायाच्या अर्वाचीन इतिहासात यांना महत्त्वाचे स्थान आहे. हे इ.स.१८५७ मध्ये अक्कलकोट येथे आले व अखेरपर्यंत तिथे राहिले. त्यांच्या पूर्व जीवनाविषयी काही माहिती मिळत नाही.

त्यांनीही आपले पूर्व जीवन अखेरपर्यंत गुप्त राखले. त्यामुळे लोक त्यांना अक्कलकोटचे स्वामी याच नावाने ओळखू लागले. एकदा कोणीतरी त्यांना प्रश्न विचारला की, 'आपण कुठुन आला ?' त्यावर त्यांनी उत्तर दिले की, 'आम्ही कर्दळी बनातून निघालो. बंगालदेश, गंगा गोदातटाक, वगैरे स्थळे हिंडत हिंडत शेवटी इथे आलो.

कर्दळी बनातून निघालो या त्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या भक्तांनी मनाशी निश्चित केले की, इ.स.१४५८ मध्ये कर्दळी बनात (श्रीशैल) निजानदास गेलेले नरसिंह सरस्वतीच या स्वामींच्या रूपाने पुनश्च अवतरले आहेत.

उन्मुक्त लीला आणि अद्भुत चमत्कार यांनी त्यांचे चरित्र भरलेले आहे. ते 'बालोन्मत्तपिशाचवत' वागत. शेकडो भाविक जन त्यांच्या दर्शनार्थ येत. राजेरजवाडेही त्यात असत. ते कोणाच्या प्रश्नाला कधीच धड उत्तर देत नसत. संदर्भाने ज्याची त्याला खूण पटावी असे त्यांचे मोजके बोलणे असे. त्यांच्यामुळे महाराष्ट्रात दत्तोपासनेचा प्रसार मोठया प्रमणात झाला.

शिव हर शंकर नममि शंकर
शिवशंकर शंभो
ये गिरिजापति भवानिशंकर शंभो ।।
संतमहंता होती भेटी
हरूषे नाचू वाळवंटी ।।

असे स्वामींचे भजन असे. सुषुप्ति अवस्थेत ते विराट शिवाचे ध्यान स्वामीचे असे सांगतात. त्यांनी महाराष्ट्रात गुरूसंप्रदाय वाढविला. वीस वर्षे प्रकट राहून चेत्र व १३ शके १८०० या दिवशी ते निजानंदी निमग्न झाले. अक्कलकोट येथे त्यांची समाधि असून लोक तिच्या दर्शनासाठी जात असतात.[३०]

### ६.४. ४ मंगळवेढा संताचे स्थान

प्राचीन शिलालेखाद्वारे या तालुक्याचे महत्त्व लक्षात येते. १० व्या शतकातील शिलालेखानुसार मंगळवेढयास मनसूलवाड असे म्हणत होते. शालिवाहन शतकाच्या सुरूवातीपासूनच मंगळवेढा अस्तित्त्वात होते. मंगल या राज्याच्या नावावरून मंगळवेढा असे नाव पडलेले होते. या गावाचे हे नाव पूर्व चालुक्यापैकी पाचवा राजा मंगलीश याच्या नावावरून

पडले असावे. मंगलाने वेष्टीत असा जो देश तो मंगलवेष्टीत किंवा मंगलवेष्टक होय. याचे पुढे मंगळवेढे झाले असावे. यापूर्वी येथे मंगलाई नावाची देवी होती. तिच्या नावावरूनही हे नाव पडले आहे.

मंगळवेढे गावची ऐतिहासिक व धार्मिक परंपरा अतिशय मोठी आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाला चालना देणारी शक्ती म्हणजे संत साहित्य होय. संत साहित्य ही मराठी संस्कृतीची चिरस्थायी संपत्ती आहे. ही भूमी जसी शुरवीरांची तशी साधूसंतांची आहे. महाराष्ट्रात १३ व्या शतकाच्या सुमारास अध्यात्म क्षेत्रात लोकशाही उदयाला येऊन आध्यात्मिक विकास झाला. त्यामुळे त्याची अभंगवाणी संपन्न झाली. याचा प्रत्यय मंगळवेढयातील संताच्या अभंगवाणीतून येतो. या संतामध्ये श्री संत दामाजीपंत, श्री संत चोखामेळा, श्री संत कान्होपात्रा, श्री टिकाचार्य, श्री.संत गोपाबाई, श्री संत सिताराम महाराज व श्री बाबामहाराज आर्वीकर इत्यादी संत होऊन गेले म्हणूनच मंगळवेढा या गावास संतांची भूमी असे म्हणतात.

### अ) श्री संत दामाजीपंत

बहामनी राज्यात बिदर येथे दामाजी नावाचा कारकून दरबारात त्याच्या कामामुळे प्रसिद्धीस आलेला होता. दामाजी पंतास रोज तख्त महालात बसून दफ्तर सांभाळावे लागे व कामे करावी लाते. पंचवीस वर्षे वय असले तरी दामाजी पंताचा चेहरा श्रद्धाळू व भाविक दिसत होत. रोज स्नान करून कपाळावर मोठा गंध लावण्याची त्याची प्रथा होती. दरबारात येताना तो टिळा लावून येत असे. त्यामुळे चटकन तो लोकांच्या डोळयात भरत असे. त्याची अंगकाठी व शरीरयष्टी चांगली होती. तो घोडयावर बसण्यात व दांडपट्टा चालविण्यात तरबेज होता. त्याचे अक्षरही सुंदर होते. त्यामुळे वरिष्ठाची त्याच्यावर मर्जी बसली. अहमदशहावल्ली हे बादशहा असून ते ही त्याचे चांगलेच कौतुक करू लागले. एकदा दफ्तरखान्यातील सर्व कारकून काम संपवून गेले व सायंकाळी दामाजीपंत काम करीत बसलेले आढळले. तेव्हा बादशहा दामाजीपंतास म्हणाले, 'अभी तक काम कर रहे हो?' त्यावर दामाजीपंतानी उत्तर दिले, 'आज का काम अबतक पुरा नही हुआ, वह पुरा कर रहा हूँ । हर रोज काम पुरा करके ही घर जाने की मुझे आदत है ।' हे ऐकून बादशहास आनंद झाला. बादशहा म्हणाला, 'इस तरह काम करके तुझे क्या मिलेगा तुम्हारे साथ काम करनेवाले सब चले गए । त्यावर दामाजीपंत म्हणाले, 'काम का

बदला देना ईश्वर के हाथ मैं हैं, मैं अगर मेरा फर्ज पुरा करू तो उससे दिल की तसल्ली मिलती है ।' बादशहा म्हणाला, 'तेरा ईश्वर कहाँ है ।' दामाजीपंत म्हणाले, 'मेरा ईश्वर हर जगह मौजुद है ।'या संभाषणाने बादशहा खुश झाला. त्यांनी दामाजीपंताची बढती नायब तहसिलदार म्हणून केली. अल्लाउद्दीन दुसरा या बादशहाच्या काळात दामाजीपंत सैन्याबरोबर पंढपूरच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी आला. तेथील दिव्य सोहळा पाहून तो वारकरी पंथाचा अनुयायी बनला. तेथून पुढे तो ग्रंथाचे अध्ययन करून मोठा संत झाला. त्याचे वास्तव्य मंगळवेढे या ठिकाणी झाले. त्यावेळी त्यांनी मंगळवेढयातील दुष्काळ हटविण्यास मदत केली होती.[३१]

**ब) श्री.संत चोखामेळा**

संत चोखामेळा यांच्या जन्माविषयी माहिती उपलब्ध नसली तरीही विठ्ठलच्या प्रसादापासून (चोखलेल्या आंब्यापासून ) त्याचा जन्म झाला असावा. संत चोखमेळा हे श्री संत नामदेव कालीन संत होते. कारण चोखोबांनी आपल्या अभंगवाणीतून नामदेव व ज्ञानदेव यांच्या भावंडाचा उल्लेख केलेला आहे. विशेषतः नामदेव महाराजांच्या कीर्तनामुळे ते हरीनामाशी एकरूप झाले. यात शंका नाही. चोखामेळ हे प्रापचिंक संत असल्याने संसारातील कटकटी, अठराविश्व दारिद्रय इत्यादी ते बैचेन झाले होते. त्यामुळै ते कधी कधी आपल्या बहिणीकडे (निर्मळा) जात असत. संसाराच्या त्रासाने व्यापलेल्या मनाला शांती मिळावी म्हणून हरीनामाचा ध्यास त्यांनी घेतला. वेशांतर केले, तीर्थयात्रा केल्या. तरी मनाला शांती मिळाली नाही. परंतु पंढरपूरला आल्यावर त्यांच्या मनाला शांती व सुख समाधन मिळाले. मनातील दुःख कमी झाले. नामदेवासारखा गुरू मिळाले.[३२]

चोखामेळा हे एक संस्कारसंपन्न, संवेदनशील व प्रामाणिक संत होते. त्यांची भक्ती ही डोळस, सुजाण आणि सत्य आहे. इतराप्रमाणे ती आत्मनिष्ठ असली तरी त्यामध्ये फरक आहे. त्याची आत्मनिष्ठेतून ईश्वर दर्शनाची तळमळ, सामाजिक उपेक्षारूपी वेदनांचा सूर आहे. चोखोबांनी आपल्या समाजातील उपेक्षितांचे 'सामाजिक दुखणे' अभंगवाणतून वेशीवर टांगले. त्यामुळे त्यांच्या अभंगवाणीतून तात्कालीन धार्मिक, सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते.[३३] संत चोखामेळा हे विठ्ठलभक्त संत असून त्यांनी अनेक अंभग लिहीले आहेत. त्यांनी विवेक दिप म्हणून एक ग्रंथ लिहीला आहे. मंगळवेढे येथे किल्ल्याच्या पुर्वेकडील वेशीचे बांधकाम चालू असता ते एकाएकी कोसळले व त्याखाली श्री चोखामेळा व इतर मजूर सापडले

ही घटना शके १२६० म्हणजे इ.स.१३३८ मध्ये वैशाख वद्य पंचमीस झाली. पुढे श्री संत नामदेव महाराज हे मंगळवेढ्यास आले व ज्या आस्थिमधून विठ्ठल विठ्ठल असा आवाज येत होता. त्या अस्थि श्री चोखोबारायाच्या आहेत असे ओळखून त्यांनी पंढरपूरी विठ्ठल मंदिरापुढे संत नामदेव पायरी म्हणून त्यासमोर नेऊन ठेवल्या. मंगळवेढे येथ त्यांची पुण्यतिथी वद्य पंचमीस साजरी केली जाते. त्या समाधी स्थानावर श्रीराजे निंबाळकर फलटण यांनी चांगली घुमटी बांधली आहे. मंगळवेढे येथे त्यांच्या निधनाच्या जागेवर एक शोभिवंत घुमटी बांधावी अशी सुचना ना.बाळासाहेब खेर यांच्याकडे केली. त्याप्रमाणे श्रीसंत चोखामेळा स्मारक समिती म्हणून एक समिती स्थापन होऊन तिने त्याठिकाणी घुमटी बांधली आहे.

श्रीसंत चोखोबाच्या अस्थि घेऊन जाताना श्रीसंत नामदेव महाराज यांनी मंगळवेढयापासून दोन मैलावर व दहा मैलावर विसावा घेतला त्या ठिकाणी लोकांनी पादुका स्थापन केल्या असून पंढरपूरास चालत जाताना त्या विसाव्याजवळ थांबून पादुकांचे दर्शन घेण्याचे वारकरी व इतर मंडळीची पद्धत आहे. श्रीसंत चोखामेळा महाराज यांचे चरित्र व त्यांनी लिहिलले अंभग प्रसिद्ध आहेत.[३४]

संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगवाणीतून नाममहिमा, विठ्ठलमहिमा, पंढरीमहिमा, संतमाहात्म्य, गुरूभक्ती विनम्रपणे गाईली आहे. पंढरपूरच्या पांडुरंगावर त्यांचे अफाट प्रेम होते. नामदेव हे संत चोखामेळा यांचे पारमार्थिक गुरू असल्याने त्यांच्याबद्दल कृतज्ञता भाव आणि भक्तिभाव स्पष्ट करणारे तेहतीस अभंग उपलब्ध आहेत. संत चोखामेळा यांच्याविषयी 'पाच भक्तिसंप्रदाय' या ग्रंथात र.रा.गोसावी म्हणतात की, मंगळवेढयातील अस्पृश्य मानल्या गेलेल्या यादीतील चोखामेळा या संताचे जीवन म्हणजे ज्ञानदेव व नामदेवांच्या कार्याची फलश्रुतीच म्हणावी लागेल.[३५]

### क)श्री संत कान्होपात्रा

कान्होपात्रा ही वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर समकालीन संत कवयित्री, उपेक्षित, मंगळवेढयाच्या श्यामा गणिकेची म्हणजे नायिकीणीची मुलगी म्हणून परिचित आहे. कान्होपात्रा ही एका नायिकीणीची मुलगी असली तरी तिने कोणत्याही परपुरूषाला आपल्या देहाचा विक्रय केला नाही. परपुरूषाकडे ती आकर्षित झाली नाही की प्रलोभनाला बळी पडली नाही. उलट पंढरपूरच्या पांडुरंगाला शरण जावून पांडुरंगाची तिने मनापासून भक्ती केली.

कान्होपात्राच्या अंभगवाणीचा विचार केल्यास तिच्या अंभगवाणीतून मुख्यतः पांडुरंगाच्या भक्तीची ओढ, आर्तता, करूणा, उत्कटता, मानसिक ताण–तणाव, अन्याय अत्याचार, व्यथा, वेदना व निर्वाणीचा अतिप्रसंग इत्यादी गोष्टीचे दर्शन घडते. कान्होपात्राचे एकूण २७ अंभग उपलब्ध आहेत. कान्होपात्राची पांडुरंगावर नितांत श्रद्धा असल्याने ती पांडुरंग भेटत नाही म्हणून ती स्वतःच्या नशिबाला दोष देते. आपण भ्रष्ट, पतित आहोत. त्यामुळेच आपणास पांडुरंगाचे दर्शन होत नाही.[३६]

बहामनी बिदरच्या सत्तेच्या काळात मंगळवेढयात महादेवाच्या मंदिरा शेजारी शामा नावाची नायकिण राहत होती. ती धनदांडग्या अमीर उमरावांना व मुसलमान सरदारांना नाचगाणे करून खूश करीत होती. प्रसंगी स्वतःचा देहही विकत असे. त्यामुळे तिची किर्ती दूरवर पसरली होती. अशा या शामा नायकिणीच्या पोटी कान्होपात्राचा जन्म झाला. वयात आलेल्या कान्होपात्राने आपल्याप्रमाणे नर्तकीचा व्यवसाय करून श्रीमंताची मर्जी राखावी असे शामाला वाटू लागले. परंतु कान्होपात्राने नर्तकीचा व्यवसाय न करता पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन व्हायचे ठरवले. ती पंढरपुरास वारकऱ्यासोबत वारीला जात असे. त्यामुळे तिला संत ज्ञानेश्वर माऊलीची भेट होऊन सहवास मिळाला संत संगतीमुळे तिच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. ती नेहमी हरीनामात दंग होत असे व किर्तन ही करत असे. तिचे अनेक अंभगही आहेत.

कान्होपात्राच्या सौंदर्याची ख्याती बिदरचे बादशहाला समजताच त्याने तिला पकडून आणण्यासाठी आपल्या सरदारास मंगळवेढयास पाठवले. आपले शील भ्रष्ट होऊ नये म्हणून ती पंढरपूरास गेली. त्यावेळी तिने पांडुरंगाच्या पायास मिटी मारून विठ्ठलाचा धावा केला. व आपला देह विठ्ठलाच्या चरणी समर्पण केला. परमेश्वर प्रसन्न झाले. तिथे मरण पावली. तिचा देह विठ्ठल मंदिराच्या दक्षिण दरवाजाजवळ पुरण्यात आला. तेथे एक तरटी वृक्ष उगवला असून तो अक्षय हिरवा आहे. शालीवाहन १२ व्या शतकात ही घटना घडली असून कान्होपात्रा तरटी वृक्षाच्या रूपाने आजही जशीच्या तशी पांडुरंगाच्या मंदिरात काळया दगडावर उभी आहे.[३७]

**ड) श्री टिकाचार्य**

धोंडूराम रघुनाथ देशपांडे हे विजयनगरच्या रामदेवराय राजाच्या दरबारी कामास होते. ते अतिशय हुशार होते. तसेच ते महापराक्रमी असून घोडयावर बसण्यात पटाईत होते. ते घोडयावर बसून भिमा नदीच्या महापूरातून पलीकडे जात असत. मध्यपूरात घोडयावर बसून

तोंडाने पाणी पीत असे. चंद्रभागेचा पैलतीरावरील श्रीमध्वाचार्यांचे गादीवरील श्रीअक्षभेयतीर्थ यांना साक्षात्कार होऊन त्यांनी धोंडूरायाला संन्यास दिक्षा देऊन त्यांचे नाव जयतीर्थ ठेवले. पण धोंडूरायाच्या आई वडिलांनी त्यास पुन्हा मंगळवेढयास आणले. संसारात रमविण्याचा प्रयत्न केला व त्याची बायको गर्भादानाच्या दिवशी रात्री खोलीत गेली तेव्हा गादीवर महाभुजंग दिसावयास लागला. तेव्हा ती घाबरून बाहेर आली. नंतर त्या खोलीत पुष्कळ दिवस दिसत होता. जयितर्थांनी श्रीमानमध्वचार्य यांच्या ग्रंथावर फार मोठया टिका केल्या आहेत. म्हणून त्यांचे नाव टिकाचार्य असे पडले आहे ते शके १२८७ मध्ये मालखेड येथे समाधिस्त झाले.[३८]

### इ) श्री संत गोपाबाई

मंगळवेढयास गोपाबाईची विहीर म्हणून प्राचीन काळापासून आहे. मंगळवेढयात नेहमी दुष्काळ पडायचा. त्यामुळे लोक नेहमी चिंताग्रस्त व्हायचे. अशा प्रसंगी तेथे एक अतिशय तेजस्वी तपस्वी आले. त्यांनी लोकांना दिलासा देऊन लोकाना सन्मार्ग दाखविला. अशा वेळेस धनिक कुटुंबातील एका शेतकऱ्याच्या घरी गेले. त्यांनी त्या शेतकऱ्याला विहीर काढण्याची जागा दाखविली. परंतु पाणी लागण्यासाठी त्या विहीरीत बाळंतीण सुनेस जीवदान द्यावे लागेल. असे सांगितले, तेव्हा त्या विहीरीस पाणी लागावे म्हणून त्या शेतकऱ्याची सुन गोपाबाईने त्या विहीरीत राहण्यास तयार झाली. ती विहीर खोदल्यानंतर गोपाबाईसाठी स्वतंत्र खोलीची सोय त्या विहीरीत केली. त्या खोलीत संसाराचे सर्व साहित्य ठेवण्यात आले. त्या विहीरीस खूप पाणी लागले परंतु गोपाबाईस जीवदान द्यावे लागले. यातूनच तेथे संत गोपाबाईची संतरूपी ख्याती मंगळवेढे येथे आहे. हे दिसून येते.[३९]

### ई) श्रीसंत सिताराम महाराज

सिताराम महाराज यांचा जन्म हैद्राबादकडील जामदार या ब्राह्मण घराण्यात झाला. ते इंग्लिश ४ ते ५ इयत्तेपर्यत शिकले होते. त्यांना सावत्र आई होती. या सावत्र आईने सिताराम यास घारीचे मांस खावयास देऊन वेड लावण्याचा प्रयत्न केला. म्हणून ते घरदार सोडून विरक्तपणे भटकू लागले. ते मंगळवेढयास खूप वर्षे होते. त्यांची वृत्ती शांत असून ते अंगावर एक लंगोटी नेसत. कोणी वस्त्र दिले तर ते गरिबास वाटून टाकत. लोकांच्या मनातील ते ओळखत व गोरगरीबांना मदत करीत असत.

सिताराम महाराजांना यांनी खर्डीस जाऊन समाधी घेतली. तेथील मंदिरास सिताराम महाराज मंगळवेढेकर असे नाव देण्यात आले आहे. मंगळवेढयातही सिताराम महाराजांचे दामाजी चौकात एक मंदिर आहे.[४०]

### उ) श्री बाबामहाराज आर्वीकर

श्री बाबामहाराज आर्वीकर हे १९२५ ते १९७१ होऊन गेलले थोर संत, योगी, कवी आणि तत्त्वज्ञ 'दिव्यामृतधारा' व 'माचणूरचे हृदयगत' ही त्यांची दोन पुस्तके त्यांच्या ईश्वरनिष्ठाविषयी व विश्वप्रेमाविषयी सर्व काही सांगून जातात. धर्मपुरूष या एकाच शब्दात त्यांचे दर्शन घडते.

विदर्भातील आर्वी या संतभूमीत जोशी या पवित्र कुळात ३ ऑगस्ट १९२५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे पणजोबा योगीराज श्री कासिनाथपंत जोशी हे एक तपस्वी पुरूष होत. त्यांचाच थोर आध्यात्मिक वारसा श्री बाबामहाराज यांना लाभला. श्रीबाबा लहानपणापासून एकांतप्रिय आणि चिंतनशील होते. त्याच्या वयाच्या १५ व्या वर्षी त्यांचे वडील वारले. त्यानंतर दोन वर्षानी श्रीबाबानी एका मध्यरात्री घर सोडले. बरे वाईट प्रसंग सहन करत पंढरपूर येथे आले. तेथून ते पंढरीरायाच्या आज्ञेने नाशिक क्षेत्री गेले. नाशिक क्षेत्रात त्यांना महान योग्यांचे दर्शन व मार्गदर्शन झाले. तेथे त्यांना महेश्वरनंदांचे दर्शन लाभले. बोध मिळाला व जीवनाचे सार्थक झाले. मग त्यांची तीर्थयात्रा सुरू झाली. ते तीर्थयात्रा करीत अक्कलकोट येथे आले आणि श्री स्वामी समर्थाचा शुभाशिर्वाद मिळवून माचणूर येथे आले.

माचणूर येथे त्यांनी ऋषी आश्रम उभा केला. श्रीबाबा हे मुळात कवि मनाचे संत होते. मानव जातीबद्दल त्यांना नितांत कळवळा होता. विश्वप्रमाचे आणि मानवसेवेचा राजमार्ग सकळ जनासाठी त्यांना उजळायचा होता. त्याना मुमुक्षू या राजमार्गावरून प्रत्यक्ष न्यावयाचे होते. मोठा आखिव – रेखिव कार्यक्रम, त्यामागे उदात्त विचारांचा सेवाभाव यामुळे या धर्मपुरूषाने थोडया अवधीत दिव्यामृत धारेचा अक्षरशः वर्षाव केला.[४१]

### ६.४.५ वेळापूरचे शिवमंदिर

माळशिरसच्या आग्नेयेला १० मैल अंतरावर वेळापूर हे गाव असून या गावात हे शिवमंदिर आहे. वेळापूर येथील देवगिरीचे राजे यादव यांच्या काळात हे मंदिर बांधले आहे. मंदिराची रचना पूर्व–पश्चिम असून परिसर भव्य आहे. दगडी प्रवेशद्वार, प्रवेशद्वारातून आत

जाताच मंदिराच्यासमोर असणारी बारव, त्यामगे एका उंच दगडी चौथऱ्यावर हे मंदिर आहे. बारवेच्या लगतच तटभिंती मध्येच एक लहानसे मंदिर आहे. यामध्ये गणेश, नाग, शिवलिंग यांच्या मूर्ती आहेत. सरव बारवच्या पायऱ्यालगत यादवकालीन शिलालेख आहेत.

हा शिलालेख देवगिरी लिपीत असून भाषा मराठी आहे. शके १२२७ रोजीच्या या शिलालेखात या मंदिराच्या लहान मंदिरावर देवळावर ध्वज लावल्याचा उल्लेख आहे. यावेळी यादव राजा रामचंद्रदेव राज्य करीत असल्याचा उल्लेख त्यामध्ये आहे. मंदिराच्या आत प्रवेश करीत असताना बाहेरील डाव्या बाजूला एक शिलालेख असून तो शके १२१२ मधील असून यामध्ये यादव राजा रामचंद्रदेव यांचा अधिकारी जोईदेव याचा निरोपीत ब्रम्हदेव राणा व त्यांचा भाऊ बाइ देवराणा यांनी वेळापूरच्या या मंदिराचा काही बाग बांधल्याचा उल्लेख आहे. एकमेकांना अभिमुख असलेल्या दोन अर्धमंडपानी युक्त आणि मध्यभागी अंगण असलेला अर्ध खुला मंडप व मंडपाच्या उरलेल्या दोन बाजूस एकाच अक्षात एकमेकांना अभिमुख असलेली अंतरालयुक्त गर्भगृहे असा मंदिराचा तलविन्यास आहे. अर्धमंडपाना वामनभिंती आहेत. दोन्ही अर्धमंडपात जाण्यासाठी पायऱ्या आहेत. मंडपाच्या चारही कोपऱ्यात अंतरालाच्या प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूस देवकोष्टे आहेत. दोन्ही गर्भगृहे एका आकाराची असली तरी त्या दोन्हीमध्ये फरक आहे. आज पूर्णतः पडझड झालेल्या स्थितीत असलेल्या गर्भगृहाचे अंतराल दुसऱ्या गभगृहाच्या अंतरालाच्या तुलनेत लहान आहे.

स्तंभाचा घटक क्रम किंवा स्तंभरचना, अलंकरण नसलेले प्रवेशमार्ग या परिसरात सापडलेले शिलालेख लक्षात घेता हे मंदिर यादव नृपती रामचंद्र याच्या कारकिर्दीच्या शेवटी किंवा १४व्या शतकाच्या सुरूवातीस बांधले आहे.[४२]

या मंदिरातील मूर्ती ही उमामहेश्वराची असून तिला अर्धनारीनटेश्वर असेही म्हणतात. या मंदिरातील मूर्ती ही अर्धा शंकर व अर्धी पार्वती होय. उमा महेश्वरीची मूर्ती प्रकारातील अलिंगन मूर्तीचा हा प्रकार आहे. मूर्ती कोरीव असून ती हिरव्या ग्रेनाईट दगडापासून बनविण्यात आलेली आहे. ही मूर्ती चतुर्भुज असून तिच्या एका हातात जपमाळ दुसऱ्या हातात त्रिशूल व एक हात आशीर्वाद देण्याच्या मुद्रेत आहे. चौथा हात पार्वतीच्या डोक्यावर असून त्यामध्ये नाग धरलेला आहे. पार्वती द्विभुज असून तिने डाव्या हातात कमळ घेतलेला असून तिचा उजवा हात शंकराच्या खादयावर ठेवलेला आहे. शंकर द्विभंगा अवस्थेत उभा आहे. उमा अर्धसमपाद

अवस्थेत उभी आहे. शंकराच्या मूर्तीच्या पायालगत शिवगण आणि नंदी आहे. उमाच्या पायालगत गणपती आनि घोरपड आहे. घोरपड(गोधा) हे पार्वतीचे वाहन आहे. अशाप्रकारे या मूर्तीची उंची तीन फूट आहे. अतिशय कला कुसरयुक्त ही मूर्ती रेखीव, देखणी व पाहताक्षणी नजरेत भरण्यासारखी आहे. उत्तर चालुक्यकालीन मंदिरस्थापात्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.[४३]

### ६.४.६ दहिगाव जैन मंदिर

दहिगाव जैन मंदिरातील मुख्य देवता २ मीटर उंचीची पदमासना मुद्रेत ध्यानस्थ बसलेली भगवान महावीरांची काळया रंगाची मूर्ती आहे. या मंदिराचा सन १९१० साली जीर्णोद्वार करून पंडित गुणचंद्रजी यांच्या हस्ते मूर्तीची स्थापना करण्यात आली. ठिकाणी महतीसागरजी महाराज यांनी काही काळ साधना केली होती. त्यांच्या पादुका या मंदिरात आढळतात. विक्रम काळात सन १८८९ साली त्याची स्थापना करण्यात आली आहे. हे देवस्थान जागृत मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. या मंदिरास भेट दिल्यास सर्व प्रकारचे शारीरिक व मानसिक त्रासांपासून मुक्तता मिळते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

नातेपुते येथे भालचंद रस्त्यावरील दहिगाव खेडयाच्या मध्यवर्ती भागात हे मंदिर वसलेले आहे. सर्वात जवळचे रेल्वेस्थानक पंढरपूर हे ६४ कि.मी. अंतरावर असून जवळचे मोठे गाव नातेपुते हे ६ कि.मी. अंतराव आहे.[४४]

## ६.५ ऐतिहासिक स्थळे

### ६.५.१ सोलापूरचा किल्ला

महाराष्ट्रातील प्राचीन भुईकोट दुर्गातील हा सोलापूरचा किल्ला आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये हिंदू आणि मुस्लिम या सत्तांच्या राजकारणात गाजलेला हा किल्ला आहे. तो ब्रिटीश काळातही महत्त्वाचा ठरलेला आहे. या किल्ल्याला गावावरून किल्ले सोलापूर असे नाव पडलेले आहे. या किल्ल्याच्या बांधकामाविषयी इतिहासच्या विद्वानामध्ये एकमत नाही. दक्षिणेत बहामनी साम्राज्य इ.स.१३४७ मध्ये स्थापन झाले. आपल्या साम्राज्याच्या विस्तारासाठी बहामनींनी दक्षिणेमध्ये अनेक किल्ले बांधले. त्यामध्ये या किल्ल्याचा समावेश असावा. किल्ल्याची बांधणी शके १२३५ हा कालखंड सोलापूरच्या कैफियतीमध्ये दिलेला आहे. डॉ.वॅट यांनी १३४५, मल्लिकार्जून पाटील यांनी १४५६ व कॅंपवेल यांनी १३५८ अशी बांधकामाची शके

दिलेली आहेत. या बांधकामाविषयी सोलापूर गॅझेटियरमध्ये अशी माहिती दिलेली आहे की, हा किल्ला बहामनींच्या काळात बांधला गेला होता.  आनंदनाम सवंत्सरी भाद्रपद मास, अष्टमी वार बुधवार, इ.स.१३१३ म्हणजे शके १२३५ या दिवशी किल्ला बांधावयास आरंभ झाल्याचा उल्लेख मिळतो.

हा किल्ला बहामनीच्या विभाजनानंतर निजामशाहीकडे इ.स.१५१७ मध्ये गेला. त्यामुळे आदिलशाही व निजामशाही यांच्यात या किल्ल्यावरून सतत लढाया होत राहिल्या. हा संघर्ष सुमारे ६० वर्षे चालला होता. अखेर १५२३ साली निजामशहा आणि आदिलशहा यांनी याच किल्ल्यामध्ये मैत्रीचा तह केला. त्यानुसार ईस्माईल आदिलशहाची मुलगी मरिअम हिचा विवाह बुऱ्हाण निजामशहाशी झाला. या विवाह प्रसंगी आदिलशहाने हा किल्ला मुलीस आंदण दिला. प्रत्यक्ष किल्ला मात्र आदिलशहाकडे होता. त्यामुळे पुन्हा संघर्ष सुरू झाला. इ.स.१५५२ मध्ये आदिलशहा आणि निजामशहा यांच्यात वैवाहिक संबंध जुळून आले. निजामशहाची कन्या चांदबीबी हिचा विवाह अली आदिलशहाशी झाला. आदिलशहाची कन्या हादिया सुलताना हिचा विवाह मुर्तझा निजामशहाशी झाला.[४५]

सोलापूर किल्ल्याचे बांधकामाचे वेळी बांधकामाचे बुरूज वरचेवर ढासळत असत. त्यामुळे जोतिषाच्या सांगण्यावरून एक जीवंत स्त्री गाडल्याशिवाय काम पूर्ण होणार नाही असे सांगितल्याने दर्गो पाटील घराण्यातील गरोदर भावजय जिवंत गाडण्यास परवानगी दिली. त्याबद्दल त्याला सोलापूर शहराचे पाटीलकीचे वतन वंशपरंपरेने देण्यात आले.[४६] त्यावरून ज्या ठिकाणी गरोदर स्त्रीला गाडण्यात आले, त्या ठिकाणच्या बुरूजास बाळंतिणीचा बुरूज असे म्हणतात.[४७] याचप्रमाणे महाकाली बुरूजाखाली एक मुंजा देशमुख घराण्यातील गाडला असून त्यांना जोशीपणाची वृत्ती देण्यात आली. तसेच सरकारातून १५ रूपयांचे दरसाल नेमणूक करून दिली ती चालू आहे.[४८]

**ऐतिहासिक महत्त्व**

अहमदनगरचा निजामशहा व विजापूरचा आदिलशहा या उभयतामध्ये सोलापूर किल्ल्यासाठी बऱ्याच वेळा लढाया झाल्या आहेत. इ.स.१५६२ मध्ये अहमदनगरच्या सुलतानाची मुलगी चांदबिबी हिचा विवाह विजापूरचा आदिलशहाशी झाला. तेंव्हा हा किल्ला विजापूरकरानी आंदण म्हणून अहमदनगरच्या निजामशहाकडे दिला.[४९] सोलापूरच्या किल्ल्यात

एकूण दहा शिलालेख आहेत. काही शिलालेख विजापूरचे आदिलशाही राजवटीचे आहेत. व काही शिलालेख सुलतान महंमदशहाच्या वेळचे आहेत.[५०] अहमदनगरच्या अस्तानंतर हा किल्ला पन्नास वर्षे विजापूरच्या आदिलशहाकडे होता.[५१]

औरंगजेब बादशहा दक्षिणेत आल्यानंतर त्याने गोवळकोंडा आणि विजापूर येथे स्वारी केली. तेंव्हा २४ मे १६८५ रोजी औरंगजेब बादशहा सोलापूरला दाखल झाला. त्यापूर्वी थोडे दिवस आगोदर विजापूरचा जो वेढा चालू होता. तो यशस्वी व्हावा म्हणून बहाद्दूरखान व बक्षी रूहल्लाखान यांना बादशाही हुकुम सोलपूरच्या तळावरून देत होता.[५२] म्हणजे आदिलशाही राजधानी विजापूर जिंकण्यासाठी बादशहाचे लष्करी डावपेच या किल्ल्यावरूनच चालत होते. तो या तळावरून गोवळकोंड्याची कुतुबशाही राजधानीस वेढा घालण्यासाठी त्याने बहादुरखानास मे १६८५ मध्ये आज्ञा दिल्या त्याही याच तळावरून होय.[५३]

यावरून बादशहाचा यावेळी असलेला सोलापूरचा मुक्काम होता हे स्पष्ट होते. डोळयासमोर आलेला विजय पुन्हा हुलकावणी देऊ नये म्हणून बादशहाने सोलापूरचा तळ जुलै १६८६ ला हालविला व तो विजापूरला पोहचला.[५४]

डिसेंबर १७०५ मध्ये व जानेवारी १७०६ मध्ये मराठयांनी मोगल सैन्याला सोलापूर, मंगळवेढा, सांगोला या भागात उठाव करून सळो की पळो असे करून सोडले होते. सोलापूरजवळ मार्डी येथे मराठी सैन्याने चिनकुलीचखानाची बक्षी मीर तुमान यावर हल्ला चढविला.[५५] मार्डी येथे झालेल्या या हल्ल्यात मीर तुमान जखमी झाला व तो सोलापूर येथे मरण पावला.[५६] सन १७०५ च्या सुरूवातीपासूनच सोलापुरच्या या भागात मराठयांचे नियोजन पूर्वक हल्ले चालू झाले होते. सन १६८५ मध्ये छत्रपती संभाजी राजांच्या काळात सोलापूरच्या या भागात मराठयांचे हल्ले चालू झाले. ते सन १७०५ पर्यत अखंडपणे चालू होते. त्यात मराठयांनी खंड पडू दिला नाही. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर चिनकुलीचखान हा दक्षिणेचा सुभेदार झला. सन १७२३ मध्ये त्याने सोलापूर शहर व किल्ला आपल्या या अधिपत्याखाली आणला.[५७]

सेतूमाधवराव पगडी यांच्या मते छत्रपती शिवाजी महाराज राज्यभिषेकानंतर कर्नाटकाकडे जाताना भीमा नदीच्या उत्तर बाजूने म्हणजे सोलापूर, नळदुर्ग, उमरगा, हुमणाबाद, जहीरबाद, मेदक या मार्गाने ते हैद्राबादेस गेले.[५८]

पेशवे काळात सोलापूरच्या बाजूस फार महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना झाल्या नसल्या तरी सन १७५० पासून सोलापूरचा इतिहासातील संबंध थेट पेशवाईच्या अखेरपर्यंत चालू होता हे स्पष्ट होते. सन १७५० पासून १८१८ सालापर्यंत अनेक महत्त्वाच्या घटना सोलापूर किल्ला व महत्त्वाच्या घटना सोलापूर परिसरात घडून आल्या आहेत.

सन १७१५ मध्ये ताराबाईचा पुत्र शिवाजी हा मराठी सत्तेचा कारभार पाहत असताना करवीर दरबारात बंड होऊन त्यांना पदच्युत होऊन कैदेत पडावे लागले. त्याच्या जागेवर करवीरकर छत्रपती म्हणून संभाजीराजे गादीवर आले. छत्रपती संभाजी राजांनी दुर्गोजी महाडीक यास १० फेब्रुवारी १७२५ रोजी सनद करून दिली. त्या महालातील परगण्यात सोलापुरचे नाव होते. सोलापूर प्रांतात तीन महालाचा समावेश असलेला होता. कारभाराकरिता अनेक परगणे मिळून तयार करण्यात आलेल्या भौगोलिक विभागास मुघल साम्राज्यात सरकार असे म्हणत.[५९]

उदगीरच्या लढाईनंतर सोलापूर प्रांताचा कारभार पेशव्याकडे आला. माधवराव पेशव्यांच्या काळात सोलापूर शहरात सन १७६८ मध्ये मंगळवार पेठ वसविली. ही मंगळवार पेठ बाजार म्हणून ओळखण्यात येत असे. तसेच त्यावेळी या पेठेचे नाव माधवराव पेठ असे होते.[६०]

माधवराव पेशव्याच्या काळात सोलापूरचा किल्ला बाबुजी नाईक बारामतीकर यांचेकडे होता.[६१] बाबूजी नाईक हा पेशव्यांचा नातेवाईक होता. सोलापूरचा किल्ला बाबूजी नाईकाकडे आल्यानंतर त्याने हळूहळू आपले सैन्यवाढविण्यास सुरूवात केली. सोलापूरचा किल्ला ताब्यात असल्याने त्याने वरचेवर माधवराव पेशव्याशी विरोध चालू केला.[६२] माधवरावाने सोलापूरचा किल्ला बाबूजी नाईकाकडून काढून आपले ताब्यात मागितला. मात्र बाबूजी नाईकाने हैदरअलीशी संधान साधले त्याचा सर्व पत्रव्यवहार माधवरावाचे हाती पडला. त्यामुळे किल्ला सोडण्याचा तगादा लावला. त्यावेळी बाबूजी नाईकाने किल्लेदारास अंतस्थ किल्ला न सोडणेबाबत कळविले. त्यामुळे सोलापूरचा किल्ला बऱ्या बोलाने हाती येत नाही हे पाहून माधवराव पेशव्याने रामचंद्र गणेश याचे हाताखाली फौज रवाना केली. त्यावेळी रात्रीच्या दीड प्रहर सुमारास बाबुजी नाईक घोडयावर जीन ठेवून पळत धारूरकडे गेला. रामचंद्र गणेश याने पाठलाग चालू ठेवल्याने शेवटी बाबुजी नाईक याने सन १७६७ मध्ये शरणागती स्वीकारून सोलापूरचा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात दिला.[६३]

बाबूजी नाईक बारामतीकर यांचेकडून सोलापूर किल्ला काढून पेशव्याचे तर्फे त्याचा ताबा गोविंद शिवराम काजगीवाले यांचेकडे डिसेंबर १७६७ मध्ये आला. नंतर उधो विरेश्वर यांचे भाऊ सोलापूरात होते. त्यांनी गोविंद शिवराम यांचे वतीने किल्ल्यात राहवे असे पेशव्याने ठरवून दिले.[६४]

माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर मराठी दौलतीस मोठया उलथापालथी झाल्या. नाना फडणीसाकडे दौलतीचे कारभारीपण आले. सन १७७३–७४ सालात नाना फडणीस यांनी रामचंद्र शिवाजी यांचेकडे सोलापूरची किल्लेदारी दिली.[६५] त्यांनी हा किल्ला कैदीखाना बनविला. सरखेल तुळाजी आंग्रे यांचा मुलगा पेशव्यांचे कैदेत होता. त्यास सोलापूरच्या किल्ल्यात कैदेत ठेवले होते.[६६]

दुसरा बाजीराव पेशव्यांच्या काळात अमृतराव पेशव्याच्या नावे राज्यात बंडाळी चालली होती. यशवंतराव होळकरांचे सरदार व खुद्द पेशवे यांचे सरदार यांनी अमृतराव पेशव्याच्या नावावर पेशव्यांच्या मुलूखात लुटालुट चालविली होती. सोलापूरजवळ पानशाच्या फौजांची त्यांनी दाणादाण उडवून दिली. त्या प्रांतात खंडण्या वसूल केल्यानंतर हे सरदार कर्नाटक प्रांताकडे वळाले.[६७] सन १८००च्या नोव्हेंबर महिन्यात यशवंतराव रामकृष्ण व होळकरांचे लष्कर सोलापरूरास गेले. या लष्कराचा मुक्काम किल्ल्यावळ होता. सोलापूर किल्ल्याची ताबेदारी पेशव्याकडून पानसेकडे होती. तेव्हा बंडखोरांनी किल्ला खाली करून देण्याविषयी त्याच्याकडे तगादा लावला. परंतु पानशाने किल्ला खाली करून देण्यासाठी पेशव्यांच्या सनदाची मागणी या बंडखोराकडे केली. तेव्हा बंडखोरांनी त्यांचेकडे अमृतराव पेशव्यांच्या सनदा आहेत. असे सांगितले. मात्र सोलापूरच्या किल्लेदाराने बाजीराव पेशव्याच्या सनदा मागितल्या. अशा परिस्थितीत उभय पक्षाची लढाई होणे अटळ होते. बाळकृष्ण गंगाधर यांच्या फौजेचा जमाव जास्त होता. सोलापूरच्या किल्लेदाराचा जमाव थोडा होता. बाळकृष्ण यांच्या फौजा चालून आल्या तेव्हा सोलापूरकर सामान घेऊन गेले. गोळागोळी होऊन बंडखोरांनी चालून घेतले. त्यावेळी पानशाने तेथून पळ काढला. त्याचा पाठलाग बाळकृष्ण गंगाधर यांनी केला.

दुसऱ्या दिवशी बाळकृष्ण गंगाधर चार हजार जमावानिशी चालून आले. त्यावेळी किल्ल्यातील सरंजाम सातशे व तोफा दोन घेऊन तुळजापूर वेस येथे रामचंद्र अप्पा यांचे बंधू

महादेव परशुराम हे लढण्यासाठी उभे राहिले. त्यामुळे तेथे लढाई झाली. या लढाईत बाळकृष्ण गंगाधर याचेकडील शंभर दीडशे ठार सोलापूरकर किल्लेदार याजकडील शंभर सैनिक ठार झाले.[६८]

पुढे बारभाईची पंधरा सोळा हजार फौज जमा झाली. त्यावेळी बाजीराव पेशवा त्यांच्या पारिपत्यासाठी सर्व सरदार आणि करवीरकर छत्रपती यास पत्रे लिहीली. त्यांनी मिरज प्रांतात दुर्दशा केली. सोलापूर प्रांतात दुर्दशा केली. सोलापूर प्रांतात बाळकृष्ण गंगाधर याचीही सरकारी फौजेने दाणादाण उडवून दिली. बाळकृष्ण मात्र कसाबसा जीव वाचवून मोगलाकडे पळून गेला.[६९]

सन १८०४ च्या नोव्हेंबर महिन्यात सोलापूर किल्ल्यावर एकाएकी बंड झाले. किल्लेदार रामचंद्र शिवाजी बायका मुलासह कैदेत पडला. रक्ताचा थेंबही न सांडता झालेले हे बंड होते. त्यामुळे हा किल्ला पेशव्याच्या हाती आला. किल्ल्यातील रामचंद्र शिवाजी याची लाखो रूपयांची दौलत पेशव्याने जप्त केली. रामचंद्र शिवाजीची किल्लेदारी पेशव्याने नानाजी माणकेश्वर यास दिली.[७०]

बाजीराव पेशवा शनिवारवाडा सोडून सन १८१७ चे नोव्हेंबर पासून रानोमाळ भटकू लागला होता. त्याचे पाठलागावर कॅप्टन स्मिथ होता. त्यावेळी इंग्रज फौजेस चुकवून बाजीराव पेशव्यांचा मुक्काम सोलापूरकडे आला. तेथे सदाशिवपंत भाऊकडील आबा पुंडले मामलेदार व मल्हारराव बाजी वगैरे मंडळीस कैद करून त्याचा ऐवज काढून किल्ल्यात विसाजीपंत देवराव यास ठेऊन फौज सुद्धा टेंभुर्णीहून गोपाळ आष्टीच्या मुक्कामाला गेले. बाजीराव पेशवा व छत्रपती प्रतापसिंह व त्याचे बंधू व राजमाता माईसाहेब हे सर्वजण दोन महिने सोलापूर येथे राहिले होते.[७१]

शेवटी बाजीराव पेशव्यांनी पानशे यांचा तोफखाना सरंजाम जप्त करून तो सन १८१२–१३ साली त्रिंबकजी डेंगळे याजकडे दिला. बाजीराव पेशवा रानोमाळ भटकू लागला. त्यावेळी काही पायदळाचा फौजफाटा व चंदनवंदन येथील तोफखाना घेऊन पानसे पेशव्याबरोबर होते.[७२]

जनरल मनरोल सो कर्नाटकातून सात फलटणे व दुल्लेखान हा नबाबाचा सरदार यासह पानशाच्या मागे होता. गणपतराव पानशे यांनी आपला अल्प तोफखाना व लष्करी सरंजाम

सामुग्रीने सोलापूरचा किल्ला लढविण्याचे ठरविले. गणपतराव पानसे यांनी सोलापूर किल्ला लढविण्याचे वेळी यांना अनुकूल अशी कोणतीही गोष्ट मराठी दौलतीचे बाजूने त्याच्याकडे नव्हती. सर्व सरदार आणि सरंजामदार पेशव्यांचे मागे किंवा आपापल्या जहागिरीकडे निघून गेले होते. काही सरंजामदार इंग्रज गोटात हजर राहून आपली जहागीर व आपला मुलूख वाचविणयची खटपट करीत होते. पेशवे शनिवार वाडा सोडून गेले. तेव्हा शनिवार १७ नोव्हेंबर १८१७ रोजी बाळाजीपंत नातूच्या हस्ते एलफिन्स्टनने शनिवार वाडयावर इंग्रजाचे युनियन जॅक निशाण फडकविले. इंग्रज सरकारचा जाहिरनामा सर्व मुलुखात ११ फेब्रुवारी १८१८ रोजी जाहीर करून बाजीराव पेशव्याकडे जे चाकरीस असतील त्यांनी दोन महिन्याच्या आत पेशव्याची चाकरी सोडून घरी जावे असे जाहीर केले होते. जे कोणी आदेश पाळणार नाहीत त्याचे वतन जप्त करण्यात येईल असेही या जाहीरनाम्यात कंपनी सरकारने जाहीर केले होते. याशिवाय स्वतः पेशवा सैन्य फौजफाटा व कुंटुबियांना घेऊन पळून गेला होता. अशा या असाधारण परिस्थितीत व प्रतिकूल वातावरणात सोलापूरचा किल्ला लढविला. सोलापूर किल्ल्यात गणपतराव पानसेंनी हा किल्ला लढविला. परंतु त्यात पानसेंचा पराभव झाला. व सोलापूरचा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.[७३]

### ६.५.२ पिलीव किल्ला

सातारा पंढरपूर मार्गावर साताऱ्यापासून १०६ कि.मी. व पंढरपूरपासून ४० कि.मी.वर पिलीव आहे. गावाच्या मागील टेकडीवर पिलीवचा किल्ला आहे. किल्ल्याच्या एकंदरीत आकार पाहता ही गढी असावी. किल्ला सुस्थितीत असून किल्ल्याच्या आतमध्ये वस्ती आहे.

या किल्ल्याची उंची १०० फुट असून हा गिरीदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. हा किल्ला कोणत्याही डोंगररांगेत नसून चढण्यास सोपा आहे. या किल्ल्याचे चारही टोकाला भव्य बुरूज आहेत. बुरूजावर व तटबंदीवर जागोजागी जंग्या आहेत. किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर दोन्ही बाजूस पहारेकऱ्यासाठी असणाऱ्या देवडया आहेत. प्रवेशद्वारासमोर एक पडझड झालेली वास्तू आहे. या वास्तूच्या दरवाजातून आत शिरून उजव्या हाताला गेल्यास बुरूजाखाली बनवलेली एक मोठी खोली पाहायला मिळते. या खोलीला दोन झरोके आहेत. हा बुरूज पाहून पुन्हा प्रवेशद्वारापर्यंत येऊन डाव्या हाताला थोडेसे चालत गेल्यावर तटबंदीवर जाणारा जीना लागतो. या जीन्याने बुरूजावर जाता येते. या बुरूजाचा आकार १२ मीटर आहे.

बुरूजावरील ५ फूट उंचीच्या तटबंदीत जागोजागी जंग्या व तोफासाठी झरोके केलेले आहेत. बुरूजाच्या दुसऱ्या बाजूला उतरण्यासाठी अरूंद दरवाजा व जीना आहे. मधल्या बुरूजावर एक तोफ आहे. किल्ल्यात वस्ती असल्यामुळे बाकीचे जुने अवशेष नामशेष झालेले आहेत.[७४]

**६.५. ३ मंगळवेढे**

एक प्राचीन नगर हे नगर महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयात असून पंढरपूरपासून १४ मैलावर आहे. मंगळवेढा हा सांगली पटवर्धनांच्या संस्थानातील भाग असला तरीही अनेक प्राचीन शिलालेखाद्वारे या तालुक्याचे महत्त्व लक्षात येते. १० व्या शतकातील शिलालेखानुसार मंगळवेढयास मनसूलवाड असे म्हणत होते. शालिवाहन शतकाच्या सुरूवातीपासूनच मंगळवेढा अस्तित्त्वात होते. मंगल या राजाच्या नावावरून मंगळवेढा असे नाव पडलेले होते. या गावाचे हे नाव पूर्व चालुक्यापैकी पाचवा राजा मंगलीश याच्या नावावरून पडले असावे. मंगलाने वेष्टीत असा जो देश तो मंगलवेष्टीत किंवा मंगलवेष्टक होय. याचे पुढे मंगळवेढे झाले असावे. यापूर्वी येथे मंगलाई नावाची देवी होती. तिच्या नावावरूनही हे नाव पडले आहे.

दक्षिणेतील कलचुरी राजा जोगम याचा पुत्र मेरमाडी उर्फ हेमाडी हा चालुक्य सम्राट सोमेश्वर (तिसरा) याचा मांडलिक होता. हेमाडीचा मुलगा बिज्ञल(दुसरा) याने चालुक्याचे राज्य हस्तगत केले. सातारा जिल्हयात म्हसवड येथे इ.स.११४७ मधील एक शिलालेख सापडला असून त्यात मंगळवेढे हे कलचुरी बिज्जलाचे स्थिर शिबीर असल्याचा निर्देश आहे. बिज्ञलानंतर रायमुरारी सोयीदेव उर्फ सोमेश्वर व नंतर संकम राजा झाला. या संकमाचा शके १०९५ मधील एक कानडी शिलालेख आहे. त्यातही मंगळवेढा हे कलचुरी सोयीदेव याचे शिबिरस्थान असल्याचे म्हटले आहे. बिजलानंतर मंगळवेढे बहामनी राज्यात सामील झाले. या काळातच प्रसिद्ध संत दामाजी याने मंगळवेढयातील ज्वारीची पेवे लुटल्याची हकीकत घडली. नंतर मोगल सरदार बहाद्दूर जिलाणी याने मंगळवेढे व त्याच्या आसपासचा प्रदेश जिंकून तो मोगल अमंलाखाली आणला. तो प्रदेश इ.स.१४६७-१४७५ मागणीकडे होता. पुढे बिदरचा बादशहा महबूबशहा याने बहादूर जिलाणीचा पराभव करून मंगळवेढे पुन्हा बहामनी राज्यात इ.स.१४९४ मध्ये सामील केले. या काळात येथील भुईकोट किल्ला बांधला. यानंतर विजापूरच्या आदिलशहाने हा गाव जिंकून इ.स.१४८९ मध्ये आपल्या राज्यात सामील केला.[७५]

इ.स.च्या १७व्या शतकात मंगळवेढे एक प्रमुख लष्करी ठाणे म्हणून प्रसिद्धी पावले. अकबराचा सरदार मीर जियाउद्दीन मुस्ताफाखान मंगळवेढयाला राहत होता. येथील किल्ल्यावर कब्जा मिळविण्यासाठी वारंवार लढाया होत असत. विजापूरचा सरदार सर्जाखान व मोगल सरदार राजे जयसिंग याची लढाई या किल्ल्याच्या स्वामित्वासाठी झाली होती. १८ डिसेंबर १६६५ रोजी मंगळवेढ्याच्या किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराज व जयसिंग यांची भेट झाली होती. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी जयसिंगाला मदत केली होती. नेताजी पालकरने हा किल्ला हस्तगत केला होता. पण पुन्हा विजापूरकरांनी तो जिंकून घेतला व त्यानंतर पुन्हा तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधिकारात आला. इ.स.१८७६ पर्यंत हा किल्ला चांगल्या स्थितीत होता. पुढे ब्रिटिश सत्ता आल्यावर कॅप्टन वेस्ट याने या किल्ल्याचे दरवाजे पाडले मेजर वॉलरने याचा तट पाडला. आज केवळ किल्ल्याची चौबुर्जी शिल्लक आहे. किल्ल्याच्या पश्चिम दरवाजाला दामाजी दरवाजा म्हणतात.

या गावची आध्यात्मिक परंपरा मोठी आहे. संत चोखामेळयाची ही कर्मभूमी होय. कान्होपात्रा ही या गावची आहे. जयतीर्थ हे मध्य आचार्य ही याच गावचे मंगळवेढे ही तर दामाजीची नगरी म्हणूनच ओळखतात. याशिवाय लतीफशाह गैबीसाहेब, अक्कलकोटकर स्वामी मौनीबुवा, शिवदास महाराज वाखरीकर, सिताराम महाराज खर्डीकर व गोविंदबुवा इत्यादी संताचा मंगळवेढयाशी घनिष्ठ संबंध होता. मंगळवेढयात ज्या ठिकाणी चोखोबाला मृत्यू आला. त्या जागेवर एक घुमटी बांधली आहे. संत दामाजीचे येथे मंदिर आहे. दामाजीने दुष्काळात जी पेवे लुटली ती गंगा जमुना पेवांची जागा लोक दाखवितात. त्या जागेवर आता तळे आहे. वैशाख महिन्यात शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यत संत दामाजीचा पुण्यतिथी उत्सव येथे साजरा करतात.[७६]

### ६.५.४ माचणूर

औरंगजेब बादशहाचा तळ ब्रम्हपूरी व माचनूर येथे इ.स.१६९४ पासून सन १७०२ पर्यंत होता. इतिहासात मात्र ब्रम्हपूरीचा तळ असेच म्हटले जाते. स्वतः बादशहा या ठिकाणी सन १६९८ पर्यंत वास्तव्य करून होता. ब्रम्हपूरी व मानचूर या गावातील अंतर एक मैलाचे आहे.

पेशवाईच्या काळात मंगळवेढा परगण्यावर पटवर्धनांची नेमणूक पेशव्यांनी केली. थोरले माधवराव पेशवे व त्यांचे चुलते यांचे उभयतांचे मतभेद वाढून युद्धप्रसंग होऊन माधवराव पेशवा

राघोबाच्या नजरकैदेत राक्षसभुवनाच्या युद्ध प्रसंगापर्यंत होता. या दरम्यान राघोबाने पटवर्धनाचा मिरज किल्ला लढाई करून ताब्यात घेतल्याने गोपाळराव पटवर्धन निजामाला मिळाला होता. सातारचे प्रतिनिधी, पिराजी नाईक निंबाळकर, घाटगे, घोरपडे, पवार इत्यादी सरदार व नागपूरचे भोसले हेही निजामाला सामील झाल्याने पेशव्यांचे समोर अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. प्रतिनिधीचा मुतालिक गमाजी बाबा याने निजामास सल्ला दिला की आपण साताऱ्यास चलावे. एक प्रहारात सातारचा किल्ला घेऊन देतो. सातारचे छत्रपतींना हस्तगत करून देतो. वीस लाखांची खंडणी मिळवून देतो. असे सांगून ते निजामासह सातारच्या रोखाने निघाले होते.[७७]

भिमा नदीच्या पाण्याने निजामाचे लष्कर पंढरपूर क्षेत्रा नजिक आले. गमाजी बाबाने प्रतिनिधीचा पूर्वीची जी ठाणी पेशव्यांनी घेतली होती त्यावर पुन्हा प्रतिनिधीचा ताबा बसविला होता. त्यावेळी गमाजी बाबाचे काही स्वार व प्यादे मानचूर येथेही आले.[७८] ही तारीख ३ मार्च १७३३ ही होती. त्यावेळी मानचूर हे गोविंद हरी पटवर्धन यांचे ताब्यात होते. त्या ठाण्यावर जगदेव पाटील व पटवर्धनाचे प्यादे हजर होते. यावेळी प्रतिनिधी आणि पटवर्धन हे उभयता सरदार पेशव्यांना सोडून मोगलास मिळालेले असताना ही गमाजी बाबा यांनी माचणूर ठाण्यावर स्वार प्यादे पाठविले होते हे विशेष होते. माचणूर ठाण्याचे ठाणेदार जगेदेव पाटील यांनी आपले धनी लष्करात आहेत असे सांगून त्यांचे चिठ्ठीशिवाय मानचूर ठाणे खाली करणार नाही असे सांगितले.[७९] गमाजी बाबा कडील आलेले स्वार माघारी बेगमपुराकडे निघून गेले. त्यातील दहावीस स्वार माचणूरच्या देवळाजवळ थांबले व बाकीचे माघारी घेले. जगदेव पाटीलचे मदतीसाठी मागाहून मंगळवेढयातून दारूगोळा रवाना केला. तसेच दहा प्यादे लावून जगदेव पाटील यांची मदत केली.[८०] पुन्हा जर गमाजी बाबाचे लोक माचणूरास आले. व त्यावर बेजरब गोळी चालवावी असे मंगळवेढयातून गोविंद हरीने जगदेव पाटील यास सुचना दिल्या.

गोविंद हरीने जगदेव पाटील याचे मदतीसाठी जे स्वार प्यादे पाठविले होते. ते 'नागणे' यांचेकडील होते.[८१] तसेच गमाजी बाबा यांचे वतीने मानचूरचे ठाणे खाली करून देणयबाबत आलेल्या स्वार प्याद्याचे प्रमुख गोविंदराव नाईक निंबाळकर होते.[८२]

नबाब निजामअल्लीने गोपाळराव पटवर्धन त्याचेकडे सामील झालेने मानचूरचे ठाणे पटवर्धनाकडे दिले होते. खासेगाव हा प्रतिनिधीचा परगणा असला तरी मानचूर त्यावेळी

कासेगाव परगण्यात मोडत नाही. असे गमाजी बाबाचे पथक प्रमुख निंबाळकर यांना गोविंद हरीने कळविले आहे.[८३] सध्या माचणूर येथे बादशाही छावणीचा किल्लेवजा अवशेषापैकी काही थोडेसे अवशेष दिसून येतात. बाकी सर्व लयाला गेले आहेत.

## ६.६ समारोप

सोलापूर जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगलीच कामगिरी बजावली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना फार महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. या स्थळांनी सोलापूर जिल्हयातील लोकांना सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

सोलापूर जिल्हयातील विठ्ठल मंदिर व वारकरी संप्रदायाचे प्रमुख केंद आहे. येथे सर्व जाती जमातीचे लोक आषाढी वारीच्या निमित्ताने एकत्र येत असतात. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांच्यापासून ते तुकाराम महारांजाच्या काळापर्यतची परंपरा तेथे जपलेली दिसून येते. अशाप्रकारे सामाजिक समतेचा वारसा या पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराने जपलेला दिसून येतो. याशिवाय सिद्धेश्वर मंदिर, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, मंगळवेढा येथील संत परंपरा, वेळापूर मंदिर, दहिगावे जैन मंदिर इ. धार्मिक स्थळांनी सोलापूर जिल्हयाचा धार्मिक वारसा जपण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. बहामनी शाहीच्या काळापासून ते पेशव्यांच्या अस्तापर्यत ज्या ऐतिहासिक स्थळांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे त्यामध्ये सोलापूरचा किल्ला, पिलीव किल्ला, मंगळवेढा व माचणूर इत्यादी चा समावेश होतो.

## संदर्भ


१) Gazetteer of Bombay Prisidency, Solapur District, P.400

२) जनगणना अहवाल सोलापूर जिल्हा, २००१, पृ.३

३) बेणारे गोपाळ, राणा पंढरीचा, पंढरपूर, १९९३, पृ.३२

४) कित्ता, पृ.३५

५) Gazetteer of Bombay Prisidency, Solapur District, P.167

६) Ibid. 135

७) Ibid. 137

८) Ibid. 138

९) धारूरकर विठ्ठलशास्त्री, पंढरी माहत्म्य, पुणे २००२, पृ.११

१०) कित्ता, पृ.११

११) सावंजी अ.व्य., विठ्ठल स्थापनेची मिमांसा, नागपूर, १९८४, पृ.२४

१२) नाईक कृष्णाकांत, इच्छापूर्ण करणारी देवस्थाने, अक्षय प्रकाशन, पुणे, २०११, पृ.६

१३) बहिरट बा.अ., भालेराव प.ज्ञा., वारकरी संप्रदाय उदय व विकास , पुणे, १९८८, पृ.२१५

१४) नाईक कृष्णाकांत, उपरोक्त, पृ.७

१५) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, पुणे, १९६३, पृ.१७

१६) कित्ता, पृ.४

१७) कित्ता, पृ.५

१८) बेणारे गोपाळ, उपरोक्त, पृ.१७

१९) कित्ता, पृ.१८

२०) भिंगारकर कृ.ज्ञा., श्री विठ्ठल महात्म्य, पुणे, १९९६, पृ.२५

२१) नाईक कृष्णाकांत, उपरोक्त, पृ.८

२२) नेरकर अरविंद, होय होय वारकरी, मुंबई १९९८, पृ.२५

२३) कित्ता, पृ.२६

२४) वाडेकर अरूण श., पंढरपूर माहात्म्य, पुणे, २०००, पृ.१८

२५) वाडेकर अरूण श., पंढरपूर माहात्म्य, पुणे, २०००, पृ.१९

२६) बेणारे गोपाळ, राणा पंढरीचा, पंढरपूर, १९९३, पृ.१०६

२७) चौधरी दत्तात्रय मल्हारी, पंढरपूर नगरीचा इतिहास, शिवाजी विद्यापीठ पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, डिसेंबर २००६ पृ.९८ ते ११०

२८) विभूतीमठ ईश्वरय्या विरय्या, श्री सिद्धरामेश्वर चरित्र, १९९३, पृ ५३

२९) जोशी ल.बा.(संपा.),भारतीय विश्वकोष खंड १, साहित्य संस्कृती मंडळ, मुबई, पृ.२१२

३०)जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश प्रथम खंड, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, पृ.४३

३१) Gazetteer of the Bombay Presidency, Solapur District, Vol.XX, 1884, P.408

३२) जोशी प्र.न., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पहिली आवृत्ती पुणे, २००२, पृ.१२६

३३) कित्ता, पृ.९२,९३

३४) गोसावी र.रा., पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, तृतीय आवृत्ती पुणे– २००८, पृ.२०७

३५) देसाई संभाजीराव(संपा.), युवकमुद्रा, सहामासिकमधील लेख, जुलै–डिसेंबर २०१०, पृ.२४ ते २६

३६) Gazetteer of the Bombay Presidency, Solapur District, Vol.XX, 1884, P.430

३७) Ibid, P.451

३८) Ibid, P.452

३९) Ibid, P.453

४०) Ibid, P.453

४१) Ibid, P.451

४२) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र इतिहास– प्राचीन काळ(खंड १ भाग–२) स्थापत्य व कला(प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ.२०१

४३) संशोधनाची वाटचाल, आखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, १९ वे अधिवेशन डी.बी.एफ.दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर, २४ व २५ डिसेंबर २०१०, पृ.२७, २८

४४) जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश खंड १, पुणे, १९७६, पृ.९०

४५) संशोधनाची वाटचाल, उपरोक्त, पृ.५०

४६) बेंद्रे वा.सी.(संपा.), महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग पहिला, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथमाला, पहिली आवृत्ती, १९६७, पृ.१७३

४७) जक्कल विठ्ठल नरसाप्पा, सोलापूर शहराचा इतिहास, १९२८, पृ.५४, ५५

४८) कित्ता, पृ.५८

४९) कित्ता. पृ.५९

५०) सोलापूर किल्ल्यावरील शिलालेखाचे प्रत्यक्ष वर्णनावरून

५१) जक्कल विठ्ठल नरसाप्पा, उपरोक्त, पृ.५९

५२) पगडी सेतूमाधव(संपा.), मोगल आणि मराठे(तारिखे दिल्कुशा), पुणे, १९६३, पृ.८५, ८६

५३) कित्ता. पृ.८७

५४) कित्ता. पृ.९२

५५) कित्ता. पृ.१०७

५६) Kulkarni G.T., The Mughal-Maratha relations Twenty five fateful years(1682-1707), Deccan College, Pune 1983 P.254

५७) सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेटियर आवृत्ती १९७७, मुंबई.पृ.९७२

५८) पगडी सेतू माधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर १९७१, पृ.२३१

५९) मेहेंदळे ग.भा., श्री राजा शिवछत्रपती खंड १, भाग २, पुणे, १९९९, पृ.६९७

६०) पोतदार द.वा. व मुजुमदार गं.ना., भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, त्रैमासिक वर्ष १८ अंक ४था, चैत्र १८६०, पृ.६५

६१) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत गो.स.सरदेसाई खंड ५ वा., पुणे, १९९०, पृ.२२८

६२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड ३ पृ.१९०

६३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड ५ पृ.२२८

६४) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ३, मिरज, पृ.१२८६

६५) मराठे का.बा.(संपा.), सवाई माधवराव पेशव्याची रोजनिशी व्हॅल्युम १, १९०८, पृ.१०८

६६) कित्ता, पृ.१६४

६७) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ३, मिरज, पृ.६९४७

६८) कित्ता, पृ.६९६७

६९) कित्ता, पृ.६८८७

७०) कित्ता, पृ.८०५५

७१) सोवनी अ.म.(संपा.), ऐतिहासिक बखरी खंड २, पुणे, १९९८, पृ.२९२

७२) मावजी पु.वि. व पारसनीस द.ब.(संपा.), कैफियती यादी इत्यादी, पुणे, १९०८, पृ.१२६

७३) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर खंड ४१, मुंबई, पृ. २१०

७४) हस्तलिखित, सहयाद्री प्रतिष्ठान, पिलीव किल्ला,पृ.३

७५) जोशी महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९७०, पृ.६३३

७६) कित्ता, पृ.६३४

७७) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह खंड १, मिरज, पृ.३०७

७८) कित्ता, पृ.३१४

७९) कित्ता, पृ.३१५

८०) कित्ता, पृ.३१५

८१) कित्ता, पृ.३१५

८२) कित्ता, पृ.३१६

८३) कित्ता, पृ.३१५

# प्रकरण सातवे

# उपसंहार

प्राचीन काळापासून भारतीय समाजात धर्माला महत्त्वाचे स्थान होते. भारतीय समाज जीवनावर धर्माचा मोठा पगडा होता. समाजजीवनाची सर्व क्षेत्रे धर्मसंस्थेने व्यापली होती. भारतात हिंदू, बौद्ध व जैन या धर्माचे लोक सलोख्याने राहतात. येथे 'धार्मिक सहिष्णुता' आहे. ८ व्या व ९ व्या शतकात या देशावर इस्लाम धर्मियांची आक्रमणे सुरू झाली. काही सनातनी इस्लाम धर्मीय सत्ताधीशांच्याकडून येथील जनतेस त्रास झाला. इस्लामांच्या राजकीय आक्रमणामुळे हिंदू राज्यकर्ते स्थानभ्रष्ट झाले होते. प्रजेला रक्षणकर्ता न राहिल्याने ती हतबल झाली. त्यामुळे इस्लाम राज्यकर्त्यांना हिंदूच्यावर धार्मिक आक्रमण करणे सोपे झाले. या काळात हजारो हिंदू लोक बाटवले गेले. हिंदू संस्कृतीची जी प्रतीके होती ती उध्वस्त करण्यात आली. परंतु अकबर बादशहाने उदारमतवादी धर्मसहिष्णू धोरणाचा पुरस्कार केला. पण नंतरच्या काळात भारतीय धर्म, संस्कृती व लोक यांना काही राज्यकर्त्यांनी दुय्यम दर्जाची वागणूक दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मानवतावादी व आदर्श धार्मिक धोरणाने आपल्या स्वराज्यात नवे युग निर्माण केले.

शिवकाळात व पेशवे काळात इस्लामी राज्यकर्त्यांच्या धार्मिक अत्याचाराला पायबंद बसलेला होता. हिंदूधर्मीय पुन्हा आपल्या चालीरीती, धर्म व परंपरा उत्साहाने करायला लागले होते. पेशवे काळात याला फार मोठे महत्त्व प्राप्त झाले होते. समाजात बहुसंख्य लोक हिंदु धर्मिय आहेत, त्यानंतर मुस्लीम, जैन धर्मीय अल्पसंख्य होते. पण त्यांनाही त्यांच्या धर्माप्रमाणे वागण्याची मुभा होती. मराठयांचे राज्य स्थापन झाल्यामुळे पुन्हा एकदा तीर्थयात्रा, नवस–सायास, व्रतवैकल्य यांना उत्तेजन मिळाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी धार्मिक सहिष्णुतेचे धोरण स्वीकारले होते. त्यांनी मंदिराप्रमाणे मशिदींनाही सरकारी तिजोरीतून मदत केली. शिवकाळात पूर्वीची मुस्लिम राज्यकर्त्यांनी स्वीकारलेली धार्मिक क्षेत्रातील अन्यायाची परंपरा संपली व सर्व–धर्म–सम–भाव हे धोरण सुरू झाले. प्रत्येक व्यक्तीला आपाल्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते. अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांनी पारंपरिक धर्माची जोपासना करीत असताना

तत्कालीन राजकारणाच्या संदर्भात धर्माला योग्य ते स्थान मिळवून दिले होते.

पेशवेकाळात मराठी सत्तेचा विकास सर्व भारतभर झाला होता. या काळात हिंदूधर्म, त्याचे श्रेष्ठत्व, धार्मिक आचार–विचार यांना महत्त्व प्राप्त झाले होते. पेशवे हे हिंदू उच्चवर्णीय ब्राह्मण जातीचे होते. त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था व देवदेवता कल्पना मान्य होत्या. त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील कर्मकांड, पूर्जा–अर्चा, रूढी, परंपरा, यज्ञयाग, व्रतवैकल्य या गोष्टी मान्य होत्या. म्हणून सनातनी हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन झालेले उत्तर पेशवाईत दिसून येते. या देशात पूर्वीपासून धर्मसत्ता ही ब्राह्मण जातीच्या हातात होती. १८ व्या शतकात राजसत्तासुद्धा त्यांच्या हाती गेली. ज्या धर्माचे व जातीचे राज्यकर्ते असतात. त्या धर्माचे व जातीचे वर्चस्व समाजात निर्माण होते. १८ व्या व १९ व्या शतकात महाराष्ट्रात धार्मिक व राजकीय क्षेत्रात ब्राह्मणाचे वर्चस्व वाढले होते.

पेशवे काळात समाजात पाप–पुण्याच्या कल्पनाला खूप महत्त्व प्राप्त झाले होते. त्यामुळे पुण्य संपादन करण्यासाठी धार्मिक विधी, व्रतवैकल्य यांचे स्तोम माजले होते. सदैव धार्मिक कृत्ये करण्यात लोक गुंतलले होते. सरदारापासून पेशव्यापर्यत सर्वजण धार्मिक कृत्ये करण्यात सहभागी झाले होते. एखादे वेळेस राज्य बुडाले तरी चालेल, पण धर्म बुडता कामा नये. अशी धारणा राज्यकर्ते व समाजाची होती. सर्व संकटातून मुक्त होण्यासाठी नवस, अनुष्ठाने, दान देणे, ग्रंथाची पारायणे करणे असे विधी केले जात. ग्रहण, ग्रहदशा, मुहूर्त, देवऋषी, चेटूक, सण व धार्मिक समारंभ या बाबी समाजात नित्याच्याच होत्या.

महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, शैवसंप्रदाय, वैष्णव संप्रदाय व नाथ पंथ इत्यादी निरनिराळे संप्रदाय व त्यांच्या निरनिराळया देवतांच्या उपासना सदैव चालू असलेल्या दिसतात. बारा महिने सदैव सण व उत्सव चालू आहेत. या देवदेवतेमध्ये दुर्गादेवी, पंढरपूरचा विठोबा, गणपती, खंडोबा, जोतिबा, तुळजापूरची भवानी, अष्टविनायक , यमाई, तुकाई, नवलाई, भैरवनाथ व सटवाई इत्यादीचा समावेश होतो. या देवतांच्या स्थापनेमुळे ते ठिकाण धार्मिक स्थळ म्हणून उदयास आलेले आहे. या ठिकाणी दरवर्षी मोठया प्रमाणावर उत्सव साजरे केले जातात. त्याचप्रमाणे रामनवमी, हनुमान जयंती, वटसावित्री, नागपंचमी, गणेश चतुर्थी, नवरात्र महोत्सव, दत्त जयंती, रथसप्तमी व महाशिवरात्र इत्यादी धार्मिक उत्सव ही साजरे केले जातात. तसेच गुढीपाडवा, दसरा, दिवाळी, होळी, बेंदूर, अक्षयतृतिया, मकर–

संक्रात, रंगपंचमी, गौरीपूजा व वसंतपंचमी इत्यादी सण साजरे केले जातात.

महाराष्ट्राला वैभवशाली ऐतिहासिक परंपरा आहे. आधुनिक काळात करण्यात आलेल्या उत्खनन व संशोधनावरून महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाची माहिती मिळते. महाराष्ट्रातील कोल्हापूरमधील ब्रह्मपूरी व कराडमध्ये झालेल्या उत्खननात मिळालेल्या अवशेषावरून दोन हजार वर्षापूर्वीच्या सांस्कृतिक जीवनाचे ज्ञान होते. प्राचीन मानवी वसाहती, समाज व त्यांच्या सांस्कृतिक प्रगतीची माहिती देणारी ही ठिकाणे महाराष्ट्रात मिळतात. या पुरातत्वीय अवशेषांचा विचार करता मौर्य घराण्याची महाराष्ट्राच्या काही भागावर सत्ता असावी. मौर्याच्या सत्तेनंतर महाराष्ट्रात सातवाहनांची सत्ता प्रस्थापित झाली .

सातवाहन राजवंशापूर्वीचा महाराष्ट्राचा राजकीय इतिहास फारसा उपलब्ध नाही. सातवाहन घराण्यातील सिमुक, कृष्ण, सातकर्णी, वेदश्री, गौतमीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र सातकर्णी, वसिष्ठीपुत्र पुळुयामी, वसिष्ठीपुत्र स्कंध सातकर्णी, गौतमीपुत्र यज्ञ सातकर्णी, गौतमीपुत्र विजय सातकर्णी, चण्ड सातकर्णी, वसिष्ठीपुत्र विजय सातकर्णी व पलुमावी हे कर्तबगार राजे होऊन गेले. या घराण्याने इ.स.पू. २३० ते इ.स.२३० या कालखंडात सत्ता उपभोगली. सातवाहन राजांनी सुरूवातीला विदर्भावर राज्य केले. त्यांची सत्ता अखेरच्या काळात विदर्भात मर्यादित होती. सातवाहन सम्राटानी कला व स्थापत्यालाही उत्तेजन दिले. त्यांनी पितळखोरा जि. औरंगाबाद येथील डोंगरात १३ लेण्या खोदविल्या. या सर्व बौद्ध धर्मीय आहेत. अजिंठा येथील लेणी क्र.८,९,१०,१२,१३, व १५ या क्रमांकाच्या बौद्ध लेण्या या काळातील आहेत. भोकरदन येथे लेणी कोरण्यात आली.

महाराष्ट्रात सातवाहनानंतर वाकाटक वंशाची सत्ता उदयास आली. वाकाटकाचा मूळ पुरूष विंध्यशक्ति हा होय. हे वाकाटक नृपती हरीषेणच्या अजिंठा शिलालेखावरून समजते. या वंशाने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यत राज्यकारभार केला. विदर्भात वाकाटकांच्या दोन शाखा कार्यरत होत्या. पहिली शाखा नागपूर जिल्हयातील 'नंदीवर्धन' येथे (इ.स.३३० ते ४९०) पर्यत) राज्य करीत होती. वाकाटकांची ही शाखा ज्येष्ठ शाखा या नावाने ओळखली जात होती. वाकाटकांच्या दुसऱ्या शाखेची राजधानी 'वत्सगुल्म' (वाशिम) होती. अंजिठा लेणीतील शिलालेखावरून ही वाकाटकांची राजधानी असल्याचे समजते. वत्सगुल्म शाखेत सर्वसेन प्रथम, विंध्यशक्ति द्धितीय, सर्वसेन द्रितीय, देवसेन, हरियेण हे राजे होऊन गेले.

वाकाटकांनंतर महाराष्ट्रात बदामीच्या चालुक्याची सत्ता उदयास आली. कर्नाटकातील बदामी येथे या घराण्याची राजधानी असल्याने त्यांना 'बदामीचे चालुक्य' म्हणून ओळखतात. या घराण्यातील पहिला ऐतिहासिक पुरूष जयसिंह याने राष्ट्रकुट इंद्र याचा पराभव करून दक्षिण गुजरात व खानदेश हा भाग जिंकून घेतला. पहिला पुलकेशी याने दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक हा प्रदेश ऱ्हासाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मानपूरचे राष्ट्रकुट व कदंब यांच्याकडून जिंकून घेतला. पहिला पुलकेशी यास बदामीच्या चालुक्य वंशाचा खरा संस्थापक मानले जाते. या घराण्यात पहिला कीर्तिवर्मन, मंगलेश, दुसरा पुलकेशी, पहिला विक्रमादित्य, विनयादित्य, दुसरा विक्रमादित्य, दुसरा कीर्तिवर्मन हे कर्तबगार राज्यकर्ते होवून गेले.

महाराष्ट्रावर राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. यामध्ये मानपूरचे राष्ट्रकूट, विदर्भाचे राष्ट्रकूट व मान्यखेटचे राष्ट्रकूट या तीन घराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले होते. मान्यखेटचे राष्ट्रकूटांची राजधानी कंधार जि. नांदेड ही होती. राष्ट्रकूट कन्नड वंशीय असून ते मूळ मराठवाडयातील लातूरचे असल्याचे इतिहासकार ए. एस. आळतेकर यांचे मत आहे.

इ. स. ७०९, इ. स. ६३१ व इ. स. ६९३ या साली सापडलेले ताम्रपट अनुक्रमे मुलताई ताम्रपट, तिवरखेड ताम्रपट व सांगळूद ताम्रपट यावरून विदर्भातील अज्ञात अशा राष्ट्रकूट घराण्याची माहिती मिळते. या घराण्यात दुर्गराज, गोविंदराज, स्वामिकराज, नन्नराज हे राजे होऊन गेले. हे घराणे कलचुरीचे मांडलिक घराणे म्हणून उदयास आले. त्यांनी नंदीवर्धन येथे राजधानी केली. हे घराणे सातव्या शतकापर्यत सत्तेवर होते.

राष्ट्रकुटनंतर दक्षिणेत कल्याणीच्या चालुक्याची सत्ता तैल दुसरा याने स्थापन केली. तो राष्ट्रकुटांचा सुरूवातीस महासामंत होता. राष्ट्रकूट सम्राट कर्क दूसरा यास ठार करून त्याने राष्ट्रकुटांचे राज्य मिळविले. या घराण्याची सत्ता इ. स. ९७५ पासून ११९० पर्यत होती. या राज्याची राजधानी बिदर जवळील कल्याणी हे नगर होते. चालुक्य घराण्यात भुवनेकमल्ल, दुसरा चालुक्य, सहावा विक्रमादित्य चालुक्य व तिसरा तैल हे राजे होऊन गेले.

पुणे जिल्हा पश्चिम महाराष्ट्रातील एक जिल्हयाचे मुख्य ठिकाण आहे. पुणे जिल्हयास ऐतिहासिक व धार्मिक वारसा आहे. पुणे हे शहर ऐतिहासिक व धार्मिकतेच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला, त्याच प्रमाणे तोरणा, सिंहगड, विचित्रगड, पुरंदर राजगड व लोहगड इत्यादी इतिहास प्रसिद्ध किल्ले याच जिल्हयात

आहेत. भाजे, कार्ले व बेडसे येथील लेणी, संत ज्ञानेश्वरांची समाधी असलेले पवित्र तीर्थक्षेत्र आळंदी, संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने पुनित झालेले देहू, तर सोपान देवाच्या समाधीमुळे प्रसिद्ध असलेले सासवड, याशिवाय ओझर, थेऊर, रांजणगाव, मोरगाव व लेण्याद्री ही अष्टविनायकापैकी पाच तीर्थक्षेत्रे, नसरापूर जवळील बनेश्वर मंदिर, जेजुरीचे खंडोबा मंदिर, भीमाशंकर येथील ज्योतिर्लिंग मंदिर व करंजे येथील सोमनाथाचे मंदिर यांचे ऐतिहासिक व धार्मिकतेच्या दृष्टीने प्रसिद्ध आहेत. पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळे यामध्ये शिवनेरी, सिंहगड, तोरणा, राजगड, लोहगड, विसापूर, पुरंदर, वज्रगड, शनिवारवाडा, महादजी शिंदे यांची छत्री व केळकर वस्तुसंग्रहालय यांनी मोठया प्रमाणावर ऐतिहासिक दृष्टिने महत्त्वाचे कार्य केले आहे.

धार्मिक स्थळामुळे जातीय ऐक्याचा पाया मजबूत करण्यास विशेष मदत होते. त्यामध्ये पुणे जिल्हयातील अष्टविनायकापैकी मोरगाव, थेऊर, लेण्याद्री, ओझर, राजंणगाव ही पाच गणपतीची स्थळे, भीमाशंकर, जेजूरी, नारायणपूर, पुण्यातील कसबा पेठेतील गणपती, पुण्यातील पर्वती, सोमेश्वर, देहू व आळंदी इत्यादी प्रकारच्या स्थळांवरून पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे.

पुणे जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. त्यामुळे ऐतिहासिक स्थळे तेथे प्राचीन काळापासून असलेली पाहावयास मिळतात. पुणे शहरावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांचे राज्य होते. सातवाहनानंतर पुणे येथे राष्ट्रकूट घराण्याची सत्ता होती. या काळात पुणे हे मोठे व संपन्न शहर होते. १० व्या शतकाच्या अखेरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी राष्ट्रकुटांचा पराभव करून पुणे आपल्या वर्चस्वाखाली आणले. यादव काळातील अनेक वास्तुंचे अवशेष अद्याप पुणे जिल्हयात विखुरलेले आढळतात. पुणे जिल्हयाची ऐतिहासिक भरभराट खऱ्या अर्थाने यादव काळापासून झाली. शिवकाळात व पेशवेकाळात त्यामध्ये भर पडली. याच काळात पुणे जिल्हयातील ऐतिहासिक ठिकाणांना महत्त्व प्राप्त झाले होते. पुणे जिल्हयातील ऐतिहासिक स्थळांमध्ये शिवनेरी, सिंहगड, लोहगड, पुरंदर, राजगड, तोरणागड, वज्रगड, वढू, विसापूर, शनिवारवाडा, महादजी शिंदे यांची छत्री व केळकर वस्तुसंग्रहालय इत्यादीचा समावेश होतो.

पुणे जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे ही महत्त्वपूर्ण आहेत. यातील काही स्थळे प्राचीन, मध्ययुगीन व काही आधुनिक काळातील आहेत. या धार्मिक स्थळाच्या ठिकाणी सण, उत्सव व यात्रा साजऱ्या केल्या जातात. यावरून या स्थळांचे महत्त्व दिसून येते. पुराणातून आणि प्राचीन धर्मग्रंथातून वर्णन केलेली ही धार्मिक स्थळे आपले आध्यात्मिक महत्त्व टिकवून आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक विश्वाची जवळून ओळख करून घेण्यासाठी या स्थळांचे महत्त्व मोठया प्रमाणावर आहे. या धार्मिक स्थळांची माहिती पाहिली असता त्यातून मराठी मनाच्या धार्मिकतेचा प्रत्यय येतो. या धार्मिक स्थळांनी आध्यात्म टिकवून ठेवले आहे. पुणे जिल्हयातील आळंदी व देहू सारख्या धार्मिक ठिकाणांना महत्त्वाचे अध्यात्माच्या दृष्टीने महत्त्व लाभले होते. या ठिकाणी निर्माण झालेल्या संतानी ज्या धार्मिक परंपरा निर्माण केल्या त्या अजूनही टिकून आहेत. त्यामुळे महाराष्ट्रासह सामाजिक व धार्मिक एकता वाढण्यास मदत झालेली आहे. या स्थळावरून त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक परिस्थिती समजण्यास मदत झाली आहे. त्यावेळचे रिती–रिवाज, राहणीमान याचा ही प्रत्यय येतो. पुणे जिल्हयात महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना या स्थळांच्या माध्यमातून घडल्या होत्या.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. युवराज संभाजी यांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याच्या कार्याचा प्रारंभ पुणे जिल्हयात केला. एवढे नव्हे तर स्वराज्याची प्रारंभीची राजधानी ही पुणे जिल्हयातील राजगड किल्ला ही होती. छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म राजगड किल्ल्यावर झाला व मृत्यू पुणे जिल्हयातील सिंहगड किल्ल्यावर झाला. पुढे छत्रपती शाहूच्या काळात पेशव्यांनी पुण्याचे महत्त्व वाढवून पुणे येथून मराठी राज्याचा कारभार सुरू झाला होता. अशा अनेक ऐतिहासिक घटना पुणे जिल्हयात घडल्याने पुणे जिल्हयाला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

सातारा जिल्हयास प्राचीन काळापासून इतिहासाचा वारसा लाभलेला आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून सातारा जिल्हा ऐतिहासिक ठिकाण म्हणून नावारूपास आला. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना या जिल्हयात केली. त्यांनी स्वराज्याचा विस्तार सातारा जिल्हयापासून सुरू केला. पुढे छत्रपती संभाजी महाराजांच्या

काळात या जिल्हयात अनेक लढाया झाल्या होत्या. छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात सातारा हे स्वराज्याची राजधानी होती. स्वराज्याची सूत्रे सातारा येथून हलविली जात होती. पुढे पेशवेकाळात पुण्याचे महत्त्व वाढले. पेशवे हे छत्रपतींच्या सल्ल्याने मार्गदर्शनाने कारभार करीत असत. ब्रिटिश काळात सातारा जिल्हयास महत्त्वाचे स्थान होते.

सातारा जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगली कामगिरी बजावली आहे. त्याच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी सातारा जिल्हयात स्वराज्याची स्थापना करून स्वराज्य विस्ताराचे धोरण अवलंबिले. त्यांना यश मिळवून देण्यासाठी येथील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी फार मोठे काम केले आहे.

छत्रपती शाहूच्या काळात सातारा ही मराठयांची राजधानी होती. पेशवे पुण्यातून कारभार पाहत असले तरी ते सातारच्या छत्रपतीच्या सल्ल्याने पाहत होते. त्यांना पेशवाईची वस्त्रे ही सातारच्या छत्रपतींच्याकडून दिली जात होती. यावरून सातारचे त्याच बरोबर सातारा जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व दिसून येते.

धार्मिक स्थळामध्ये शिखर–शिंगणापूर, औंधची यमाईदेवी, मांढरदेवी, जबरेश्वरी मंदिर, चाफळचे राम मंदिर, संगम माहूली, वाईचा गणपती, पाली, मेरूलिंग, यवतेश्वर व मशिद इत्यादी धार्मिक स्थळांचा तसेच ऐतिहासिक स्थळांमध्ये अदालतवाडा, चारभिंती, सापचा वाडा, फाशीचा वड, मेणवलीचा राजवाडा, अजिंक्यतारा, जुना राजवाडा, नवा राजवाडा, रंगमहाल, जुने जलमंदिर, नवे जलमंदिर, छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालय, प्रतापगड, सज्जनगड, वैराटगड, सदाशिवगड इत्यादीचा समावेश आहे.

सातारा जिल्हयाच्या प्राकृतिक स्वरूपात विविधता आढळून येते. त्यामुळे जिल्हयातील भुरूपे, हवामान, जंगले आणि मनुष्याचे आर्थिक व्यवहार इत्यादी गोष्टी प्रभावित झाल्या आहेत. जिल्हयात निरनिराळया प्रकारची भुदृश्ये आढळतात एका भागात सहयाद्रीची रांग, तिची शिखरे व तिच्याशी निगडीत उंच पठारी प्रदेश व दुसऱ्या बाजूला नीरा नदीचे सखोल खोरे, पश्चिमेकडे

महाबळेश्वरला वार्षिक सरासरी ६००० मि. मि. पेक्षा अधिक पाऊस व पूर्वेकडे माण तालुक्यात वार्षिक सरासरी ५०० मि. मि. पेक्षा कमी पाऊस पडतो. माण, फलटण व खटाव तालुक्याचा काही भाग हा दुष्काळग्रस्त आहे. जिल्हयाच्या भौगोलिक अभिलक्षणातील ही विविधता जंगलक्षेत्र, कृषीसाठी भूमीचा वापर, लोकसंख्येची घनता आणि आर्थिक प्रगती या बाबतीतही दिसून येते. व या जिल्हयाचे तीन प्रमुख भौगोलिक विभाग पडतात. ते म्हणजे पश्चिम विभाग, मध्य विभाग  व पूर्व विभाग हे आहेत.

सातारा जिल्हयात प्रामुख्याने चार नद्यांची खोरी आहेत. कृष्णा या नदीचे खोरे, नीरा नदीचे खोरे, माणगंगा नदीचे खोरे व येरळा नदी खोरे इत्यादी आहेत. सातारा जिल्हयातील बहुसंख्य लोक खेडयात राहात असत. पूर्वी खेडी ही स्वंयपूर्ण असल्याने समाजात स्वास्थ्य व सुरक्षितता होती. लोक हे नितीमान, प्रामाणिक, सचोटीन, सरळमार्गाने जीवन जगणारे होते. येथील समाजात स्वास्थ व सुरक्षितता असल्याने मोठया प्रमाणावर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संरक्षण झाले. समाजात हिंदु धर्माचे प्रमाण सर्वाधिक होते. त्यामुळे समाजात रूढी परंपराचे जतन मोठया प्रमाणावर केले जात होते.

सातारा जिल्हयात विविध जाती धर्माचे लोक वास्तव्य करतात. यामध्ये हिंदू, ख्रिश्चन, जैन, इस्लाम, बौद्ध, शीख व पारशी इत्यादी त्यांच्या सामाजिक चाली–रिती, आचार सहिंता व जीवनपद्धतीमध्ये विविधता आढळते. सातारा जिल्हयात प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडापर्यंत घडून आलेल्या राजकीय परिस्थितीमुळे जिल्हयाच्या विकासाला चालना मिळाली. सातारा जिल्हयास लाभलेल्या राजकीय परिस्थितीमुळे अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा विकास घडून आला. मध्ययुगात सातारा स्वराज्याची राजधानी होती. या काळात अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची निर्मिती झालेली आहे.

छत्रपती शाहूच्या काळात पेशव्यांचे महत्त्व वाढले. या पेशव्यांनी पुणे येथे राहून राज्यकारभार चालविला. या पेशव्यामध्ये बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे, पहिला माधवराव पेशवा, नारायणराव पेशवा, सवाई माधवराव पेशवा व दुसरा बाजीराव पेशवा इत्यादी पेशव्यांनी पुणे येथून राज्यकारभार केला. छत्रपती शाहूच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा सत्तेवर आला. पुढे ११ डिसेंबर १७७८ रोजी छत्रपती दुसरा शाहू सत्तेवर आला. दुसरा शाहू ४ मे १८०८ रोजी मरण पावला. त्यानंतर छत्रपती प्रतापसिंह

गादीवर आले. परंतु छत्रपतींचे अधिकार व महत्त्व हळूहळू कमी करत आणून पेशव्यांनी अखेरच्या छत्रपतीना बंदिवासाची वागणूक दिली. सातारा शहर व परिसरात अनेक ऐतिहासिक व धार्मिक वास्तू निर्माण करण्याचे कार्य याच छत्रपतींनी केले आहे. त्यामुळे सातारा जिल्हयाच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर भर टाकाण्याचे श्रेय छत्रपती शाहू, छत्रपती रामराजा, छत्रपती दुसरे शाहू व छत्रपती प्रतापसिंह महाराज यांच्याकडे जाते.

सांगली जिल्हयास प्राचीन काळापासून ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. सांगलीला प्राचीन काळापासून विविध क्षेत्रात प्रगती होत आलेली आहे. मध्ययुगीन काळापासून या प्रगतीत वाढ होत जाऊन अर्वाचीन काळात ही प्रगती मोठया प्रमाणावर होत गेली आहे. सांगली जिल्हयाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सहकार व सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र प्रगती केलेली आहे. महाराष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणून सांगली जिल्हयाकडे पाहिले जाते.

सांगली जिल्हयावर प्राचीन काळात राष्ट्रकुट, सातवाहन, वाकाटक, शिलाहार व यादव घराण्यातील राजांनी राज्य केल्याचे अनेक पुरावे मिळतात. मध्ययुगीन कालखंडात देवगिरीचे यादव, सुलतानशाही कालखंडात खिलजी व तुघलकांनी सांगली जिल्हयावर राज्य केले होते.` बहामनीच्या काळात आदिलशहाने या भागावर राज्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मिरज काही काळ मराठयांच्याकडे होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर हा प्रदेश मोगलांनी जिंकून घेतला. पुढे पेशवेकाळात सातारच्या छत्रपती शाहू महाराजांनी ३ ऑक्टोबर १७३९ रोजी सांगलीचा प्रदेश मोगलाच्या ताब्यातून जिंकून घेतला व तो प्रदेश साताऱ्यास जोडला. त्यावेळी हा प्रदेश मराठा संरक्षणासाठी मराठा सरदाराकडे सोपविला. या कालावधीत तेथे अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची निर्मिती होऊन पूर्वीच्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळात भर पडली.

आधुनिक काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेक क्रांतिकारकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांतीवीर जी. डी. लाड, वसंतदादा पाटील, दे. भ. आर. पी. पाटील, गणपतराव कोळी व धोंडीराम माळी यांचा समावेश होता. या क्रांतीकारकांनी केलेल्या कामगिरीमुळे सांगली जिल्हा महाराष्ट्राच्या नकाशावर आला. अशा प्रकारे सांगली जिल्हयाने केलेल्या ऐतिहासिक कामगिरीमुळे सांगली

जिल्हयात अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण झाली आहेत. यामध्ये धार्मिक स्थळात औंदुबर–(दत्तमंदिर), सांगली गणपती मंदिर, दंडोबा येथील प्राचीन गुंफा मंदिर, सिद्धनाथ खरसुंडी, रेवणसिद्ध मंदिर रेणावी, भुवनेश्वरी मंदिर भिलवडी, सागरेश्वर, हजरत ख्वाजा शमसुद्दीन मिरासाहेब दर्गा मिरज, बुवाफन बाबा दर्गा मालगाव तसेच ऐतिहासिक स्थळामध्ये जुना पन्हाळा, गणेश दुर्ग, आयर्विन पुल, मिरजेचा भुईकोट किल्ला, कृष्णा घाट, प्रचितगड, मच्छिंद्रगड, सांगलीचे वस्तुसंग्रहालय, कोळदुर्ग, रामदुर्ग, कुंडल लेणी, विलासगड व बहादूरगड इत्यादी समावेश होतो.

सांगली जिल्हयाचे प्राकृतिक रचनेनुसार तीन विभाग पडतात. यामध्ये कृष्णा व येरळा नदीचे खोरे, वारणा नदीचे खोरे व पठारी प्रदेश यांचा समावेश होतो. कृष्णा व येरळा नदीच्या खोऱ्यात खानापूर, मिरज, पलुस, तासगाव व वाळवा तालुक्याचां समावेश होतो. वारणा नदीच्या खोऱ्यात शिराळा तालुका व वाळवा तालुक्याचा काही भागाचा समावेश होतो. पठारी प्रदेशात आटपाडी, जत, कवठेमहांकाळ, कडेगाव व खानापूर या तालुक्यांचा समावेश होतो. सांगली जिल्हयाच्या मध्य भागात शुक्राचार्य व आडवा डोंगर, होनाई, दंडोबा डोंगर, रामगड व मुचंडी इत्यादी टेकडया आहेत. तसेच पश्चिम व दक्षिण बाजूस कृष्णा नदीचे खोरे आहे. पश्चिमेस काळभैरव डोंगर व आष्टा डोंगररांग आहे.

सांगली जिल्हयातील लोक आपल्या धर्माच्या रिती–रिवाजाप्रमाणे सण व उत्सव साजरे करतात. हिंदू धर्माचे लोक समाजात सुरू असलेल्या रूढी, परंपरा व चालीरिती सांभाळतात. मध्ययुगीन काळात सांगली जिल्हयात अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळे निर्माण झाली आहेत. ही स्थळे समाजात स्थिरता असल्याने सुरक्षित राहिली आहेत. या स्थळाचे मोठया प्रमाणावर संरक्षण झालेले आहे.

सांगली जिल्हयास प्राचीन काळापासून राजकीय इतिहास आहे. प्राचीन काळात सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य व कलचुरी इत्यादी राजवंशाच्या अधिपत्याखाली सांगली जिल्हयाचा मोठा भाग होता. मध्ययुगीन काळात सुलतानशाही, मुघल व मराठे यांचे वर्चस्व सांगली जिल्हयावर होते. सांगली जिल्हयातील लोकांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला होता. त्यावेळी राष्ट्रीय काँग्रेसने जे विविध उपक्रम राबविले होते. त्यामध्ये सांगली जिल्हयानेही सहभाग घेतलेला आधुनिक काळात भारताच्या इतिहासात सातारचे प्रतिसरकार जे

प्रसिद्ध आहे. ते प्रतिसरकार सांगली जिल्हयात होते.

सांगली जिल्हयामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने धार्मिक स्थळे या जिल्हयाने अनेक तीर्थक्षेत्रे निर्माण केली आहेत. सांगली जिल्हयात हिंदूची अनेक मंदिरे, मुस्लिमांच्या मशिदी, ख्रिश्चनांचे चर्च, जैन मंदिर व पारशींचे अग्यारी मोठया प्रमाणात आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, सांगली जिल्हयात सर्व जाती–धर्माचे लोक राहतात. हे लोक परंपरेने चालत आलेल्या धार्मिक श्रद्धा मानत असल्याने अनेक धार्मिक स्थळे निर्माण सांगली जिल्हयास आहे. सातवाहन काळापासूनच्या इतिहासाच्या पाऊलखुणा जिल्हयात ठिकठिकाणी दिसतात. आजही अनेक गावात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचे ठसे राहिलेले आहेत. त्याच बरोबर इतिहासाचा वारसा घेऊन अनेक गावात लेणी, किल्ले, वाडे व वस्तुसंग्रहालये उभे राहिलेले आहेत.

सांगली जिल्हयास प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. इतिहासाचा वारसा घेऊन अनेक गावात पराक्रमाचे नवे विजस्तंभ उभे राहिलेले आहेत. सांगली जिल्हयात खानापूर, मिरज, जत, कवठेमहांकाळ, आटपाडी व वाळवे या तालुक्यात प्राचीन काळापासून वसाहती असाव्यात. हे सांगली जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा आढावा घेतल्यानंतर लक्षात येते. सांगली जिल्हयात प्राचीन काळात अनेक धार्मिक स्थळे निर्माण झालेली दिसतात. मध्ययुगीन काळात त्यामध्ये भर पडलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेली धार्मिक परंपरा सांगली जिल्हयाने जपलेली आहे. हे तेथील धार्मिक स्थळावरून स्पष्ट होते.

सांगली जिल्हयात ऐतिहासिक स्मारके मध्ययुगीन काळात मोठया प्रमाणावर निर्माण झाली आहेत. ही स्थळे पेशवेकाळात भरभराटीस आली होती. या स्मारकावरून मानवी जीवनाची वैशिष्टये दिसून येतात. ऐतिहासिक लेण्यामधून कलात्मक जीवनाची माहिती मिळण्यास मदत होते. या ऐतिहासिक स्थळांच्या बांधकामाच्या शैलीतून ते कोणत्या हेतूने उभारण्यात आले होते. तसेच मराठाकालीन परंपरेची माहिती मिळते.

सांगली जिल्हयात असलेल्या गडकोट व भुईकोट किल्ल्यावरून त्या प्रदेशाची राजकीय मालकी समजण्यास मदत होते. मराठेकालीन वास्तुशैलीचा नमुना असलेल्या राजवाडयांची वैशिष्टयपूर्ण रचना होती. संरक्षणासाठी वाडयाभोवती भक्कम तटबंदी होती. या वाडयामध्ये जे

लाकडीकाम केले जात होते, त्यावरील कोरीवकाम व नक्षीकामावरून मराठाकालीन चित्रशैलीची माहिती मिळण्यास मदत झाली आहे. तसेच वास्तुवरून बांधकाम शैलीची माहिती मिळण्यास मदत झाली आहे. उदा. मिरजेचा कृष्णा घाट, त्यावरील मनोरे, पायऱ्या तसेच गणेशदुर्गचे बांधकाम आहे. यावरून सांगली जिल्हयाच्या मराठा काळातील प्रगतीची कल्पना येते.

कोल्हापूर जिल्हयास प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक वारसा आहे. मराठा काळात या जिल्हयात मोठया प्रमाणावर धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण झाली आहेत. इ.स.११८७ मध्ये कोल्हापूरच्या शिलाहार घराण्यातील दुसऱ्या भोज राजांने कोल्हापूर आपली राजधानी केली, पुढे इ. स. ११९१ मध्ये ती त्याने पन्हाळागडावर हलविली. या दरम्यान शिलाहारांचे देवगिरीच्या यादवांबरोबर युद्ध सुरू झाले. त्यामध्ये यादवांनी शिलहारांचा पराभव केला आणि कोल्हापूरवर आपली सत्ता स्थापन केली. यादवांची इ. स. १३१८ पर्यत कोल्हापूरवर सत्ता होती. त्यानंतर इ. स. १३४७ साली बहामनी राज्याची स्थापना होईपर्यत हा कोल्हापूर प्रदेश स्थानिक राजेच सांभाळत होते. बहामनी सत्तेने अल्पकाळात कोल्हापूर येथे आपला अमंल निर्माण केला. बहामनीचे विघटन झाल्यानंतर हा प्रदेश विजापूरकर आदिलशहाच्या ताब्यात गेला.

अफझलखान वधानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी कोल्हापूर प्रांत जिंकून घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराजांनी ते स्वराज्य टिकवून धरले. त्यामध्ये कोल्हापूरचा समावेश होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात मराठयांची राजधानी सातारा व जिंजी या दोन ठिकाणी असल्याने मध्यवर्ती ठिकाणी असणारे कोल्हापूर राज्य यास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. छत्रपती राजाराम महाराजांचे सिंहगडावर निधन झाले त्यावेळी महाराणी ताराबाई व राजसबाई या कोल्हापूर राज्यातील पन्हाळा किल्ल्यावर होत्या. याचवेळी महाराणी ताराबाई आपला मुलगा छत्रपती शिवाजी दुसरा यास पन्हाळा येथे राज्याभिषेक करून इ. स. १७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना केल्याची घोषणा केली. इ. स. १७१० ते १९४९ या कालखंडात कोल्हापूरास राज्य होते.

१३ एप्रिल १७३१ रोजी झालेल्या छत्रपती शाहू आणि छत्रपती संभाजी यांच्यात वारणेचा तह होऊन कोल्हापूरकडील भाग छत्रपती संभाजीच्या ताब्यात गेला. पुढे १८९२ मध्ये कोल्हापूरच्या राजाने इंग्रजा बरोबर तह केला. या तहानुसार कोल्हापूरच्या राज्यातील

राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या गोष्टींमध्ये त्यांना मांडलिक बनविले. त्यानंतर सन १९४९ पर्यंत कोल्हापूर हे एक संस्थान होते, पुढे त्यानंतर ते भारतीय संघराज्यात विलिन करण्यात आले.

समाज रचनेवर धर्माचा अत्यंत मोठा पगडा होता. दैनंदिन आचार–विचारावर धर्माचे प्राबल्य होते. दिवसभर व्यक्तीची मने धार्मिक आचार व विचारांनी व्यापलेली होती. कोल्हापूर जिल्हयात हिंदू, जैन, लिंगायत, मुसलमान, गुजर, मारवाडी धर्माचे लोक राहत होते. यामध्ये मराठा समाज मोठया प्रमाणावर होता. येथील समाज जरी अनेक जाती व धर्मामध्ये विभागला गेला असला तरी एकमेकांचे सण व उत्सव मोठया प्रमाणावर साजरे करीत असत. तेथील प्रत्येक घरात जाती धर्माप्रमाणे देव असत. त्यांची पूजा केली जात होती. श्रीमंत सरदार घराण्यात पूजेसाठी ब्राह्मणास बोलाविले जात असे. देवा जवळ सांजवात लावण्याची पद्धत होती. प्रत्येक जातीतील लोकांच्या कुलदेवते शिवाय म्हसोबा, विठलाई, जाखाई, जोखाई, जखीण, डाकीण, वेताळ इ. देवतांची पूजा केली जात होती. देवाला संतुष्ट करून घेण्यासाठी व आपली इच्छा देवामार्फत पूर्ण व्हावी, या हेतूने अनुष्ठाने केली जात होती.

सन १९४५–४६ मध्ये ब्रह्मपुरी येथे पुण्याच्या डेक्कन कॉलेजने केलेले संशोधन व करवीर महात्म्य, हरिवंश तसेच इतर पौराणिक परंपरा यांचेद्वारे कोल्हापूर जिल्हयाचा प्राचीन कालीन इतिहास इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून मिळतो. इ. स. पूर्व तिसऱ्या शतकात कोल्हापूर परिसरात मौर्य घराण्याची सत्ता होती. मोर्य साम्राज्यानंतर सातवाहानांची सत्ता सुरू झाली. सातवाहनानंतर चालुक्य व राष्ट्रकुट यांची सत्ता कोल्हापूर येथे होती. हे सामानगड, सांगली व कराड येथे सापडलेल्या ताम्रपटावरून स्पष्ट होते. राष्ट्रकुटानंतर कोल्हापूर प्रांतात शिलाहार घराण्याचा उदय झाला. कोल्हापूर प्रांतात शिलाहार राजांनी जवळ–जवळ २०० वर्षे राज्य केले. त्यांची राजधानी पन्हाळा किल्ला होती. शिलाहार घराण्यात भोज दुसरा हा सामर्थ्यशाली राजा होऊन गेला. तसेच त्याने कोल्हापूर प्रांतात अनेक किल्ले व मंदिरे बांधली. भोज दुसरा या शिलाहार राजाचा यादव घराण्यातील सिंघणदेव यादवाने पराभव करून कोल्हापूर परिसरात आपले साम्राज्य निर्माण केले.

देवगिरीच्या यादवांचे राज्य संपुष्टात आल्यानंतर कोल्हापूर येथे बहामनी राजवट सुरू होण्यापुर्वी स्थानिक राजांच्यामार्फत तेथील राज्यकारभार सुरू झाला होता. दक्षिणेत बहामनीशाहीची स्थापना ऑगस्ट १३४७ मध्ये झाली. त्यामुळे कोल्हापूर प्रांत नव्याने स्थापन

झालेल्या बहामनी राज्यात समाविष्ट झाले. त्यावेळी हसन गंगू बहामनीने राज्यकारभारासाठी जे चार विभाग पाडले होते. त्यातील अहसनाबद (गुलबर्गा) या विभागात कोल्हापूरचा समावेश करण्यात आला होता. इ. स. १३७६ मध्ये महमदशहा बहामनी पहिला याचे वास्तव्य पन्हाळा किल्ल्यावर असल्याची नोंद आहे.

बहामनीशाहीची शकले पडल्यानंतर कोल्हापूर व पन्हाळयाचा प्रदेश आदिलशहाला मिळाला होता. हा प्रदेश आदिलशहाकडे १५० वर्षे होता. इब्राहिम आदिलशहाने आपल्या राज्यातील किल्ल्याकडे जातीने लक्ष दिले. विशेषतः पन्हाळा किल्ल्याची त्याने डागडुजी करून त्यास बळकटी आणली. किल्ल्यावर अनेक फारशी शिलालेख असून किल्ल्यातील शिल्पावरही बऱ्याच प्रमाणात मुसलमानी शिल्पकलेची छाप पडलेली दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध केल्यानंतर कोल्हापूर पर्यतचा प्रांत जिंकून घेण्यास सुरूवात केली. त्यावेळी त्यांनी पन्हाळा, पावनगड, रांगणा, खेळणा आणि घाटमाथ्याच्या खाली व वर असलेले सर्व किल्ले जिंकून घेतले होते. तेव्हा छत्रपती शिवाजी राजांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने इ. स. १६६० मध्ये सिद्दी जोहर व रूस्तुम जमानची नियुक्ती केली. त्यांनी पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला असता राजांनी पन्हाळा किल्ल्यावरून आपली सुटका करून घेतली. व विशाळगडाकडे गेले. त्यावेळी बाजीप्रभू देशपांडे याने गजापूरच्या खिंडीत सिद्दी जोहरच्या सैन्यास अडवून धरून छत्रपती.शिवाजी राजांना विशाळगडाकडे सुखरूप जाऊ दिले. मात्र गजापूरच्या खिंडीत बाजीप्रभूने आत्मबलिदान केल्याने त्या खिंडीस पावनखिंड नाव पडले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यू समयी छत्रपती संभाजी महाराज पन्हाळा किल्ल्यावर कैदेत होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराजांनी स्वराज्याची सूत्रे हाती आली. झुल्फिकारखानने रायगडला वेढा घातला असता. छत्रपती राजाराम महाराजांनी त्यातून आपली सुटका करून घेऊन प्रतापगडावर येऊन तेथून पन्हाळा किल्ल्याचा आश्रय घेतला होता. पुढे मोगलांनी पन्हाळा किल्ल्यावर हल्ले सुरू केल्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीकडे प्रयाण केले. पुढे जिंजीहून ते पुन्हा विशाळगडावर २२ फेब्रुवारी १६९८ रोजी आले होते. त्यावेळी महाराष्ट्रात राजधानीसाठी कोणतेच असे सुरक्षित ठिकाण नव्हते. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी इ.स.१६९८ मध्ये स्वराज्याची राजधानी सातारा केली होती. २ मार्च १७०० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचा मृत्यू सिंहगडावर झाला.

इ.स.१७१० मध्ये महाराणी ताराबाईने पन्हाळयास स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे विभाजन झाले. पन्हाळयाला स्थापन झालेली स्वतंत्र राजवट पुढे कोल्हापूरची गादी प्रसिद्ध झाली. ताराबाईचा कालखंड हा इ.स.१७०० ते १७६१ पर्यंत होता. कोल्हापूरचा परिसर हा महाराणी ताराबाईच्या कर्तबगारीशी निगडीत आहे. महाराणी ताराबाईच्या कर्तबगारीची साक्ष विशाळगड, पन्हाळा, रांगणा हे किल्ले पटवून देतात. महाराणी ताराबाईच्या कालखंडात दुसरा शिवाजी याने इ. स. १७१४ पर्यंत कोल्हापूर येथील राज्यकारभार पाहिला.

छत्रपती राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई हिने महाराणी ताराबाईच्या विरोधात कट करून आपला मुलगा दुसरा संभाजी यास गादीवर बसविले. छत्रपती संभाजी दुसरे हे सत्तेवर येण्यापूर्वी बंदीवासात असल्याने त्यांना राजकारणाचा अनुभव नव्हता. तेव्हा त्यांना राज्यकारभारात रामचंद्रपंत अमात्य यांचा सल्ला घ्यावा लागत होता. अमात्यांच्या मृत्यूनंतर उदाजी चव्हाण हे छत्रपतीचे मदतनीस झाले. त्यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्याकडे दहा सुभ्यांचा आणि सत्तावीस किल्ल्यांचा प्रदेश होता. छत्रपती संभाजी दुसरे व सातारचे छत्रपती शाहू महाराज यांच्यात पटत नव्हते. साताराचे छत्रपती, पहिला बाजीराव पेशवा व निजाम यांच्या शत्रुत्व होते. तेंव्हा निजामाने छत्रपती संभाजी व छत्रपती शाहू यांच्यातील संबंध बिघडतील असे राजकारण सुरू केले होते.

साताराचे छत्रपती शाहू व कोल्हापूरचे छत्रपती संभाजी यांच्यात १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला. त्यानुसार सातारा व कोल्हापूर राज्यांच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. हा तह शाहू महराज व संभाजीराजे यांच्यात झाला होता. या तहामुळे या दोघांच्यातील संघर्ष संपुष्टात आला. पुढे दोघांच्यात कसलाही वाद घडून आला नाही. मात्र या तहामुळे कोल्हापूर राज्य स्वतंत्र राहीले गेले.

छत्रपती संभाजी दुसरे निपुत्रिक मरण पावले. त्यामुळे वारसाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा छत्रपती संभाजीराजांची पत्नी जिजाबाई यांनी शहाजी भोसले खानवटकर यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेतले. त्यांचे २२ सप्टेबर १७६२ रोजी शिवाजी असे नामकरण करून राज्याभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी अल्पवयीन असल्याने जिजाबाई कारभार पाहू लागल्या. राज्यकारभार करताना अडचण निर्माण होऊ नये, म्हणून जिजाबाईनी आपल्या

नावाचा सोळा कोनी शिक्का तयार करवून घेतला होता. त्यामध्ये 'शंभू राजस्य भार्याया जिजादेव्या धरातले बालेंदुरिव वर्धिष्णू मुद्राभद्राय विराजते.' असा मजकूर कोरलेला होता.असा शिक्का करणाऱ्या छत्रपतीच्या घराण्यातील जिजाबाई या पहिल्या राणी होत्या.[२५]

जिजाबाईच्या मृत्यूनंतर छत्रपती शिवाजी तिसरे यांनी वयाच्या १९ व्या वर्षी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. तेव्हा त्यांना करवीरचे सरदार व सैन्य यांनी चांगली साथ दिली. त्याच्याच जोरावर छत्रपतींनी कोल्हापूरचा चांगला राज्यकारभार केला. पेशव्यांच्या कर्नाटकातील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सन १७८८ मध्ये राजधानी पन्हाळयाहून कोल्हापूरास आणली. याशिवाय आणखी काही कारणे त्यास कारणीभूत ठरली होती. राजधानी कोल्हापुरास आणल्यानंतर भुईकोट किल्ला छत्रपती शिवाजी दुसरे यांनी बांधून घेतला. किल्ल्याभोवती खंदक व सर्व बाजूस वेशी बांधून घेतल्या. कोल्हापूर शहराची पाण्याची सोय व्हावी यासाठी पद्माळे तळे बांधले तसेच कोल्हापूर राज्यास सिधोजीराव निंबाळकर याचा उपद्रव होऊ नये, म्हणून छत्रपती शिवाजी राजांनी इंग्रजाचे साहय मिळविण्यासाठी १ ऑक्टोबर १८१२ रोजी तह केला. त्यानुसार सिंधुदुर्ग इंग्रजांना द्यावयाचे ठरले. निपाणीकर व सावंतवाडीकर यांनी कोल्हापूरचे जे किल्ले व प्रांत घेतले होते ते इंग्रजांना परत मिळवून द्यावयाचे ठरले.

या तहामुळे छत्रपतीच्या सत्तेला मर्यादा पडल्या. त्यामुळे करवीर छत्रपतींची शंभर वर्षाची चाललेली उज्ज्वल परंपराही संपुष्टात आली. यानंतर कोल्हापूर हे 'स्वतंत्र राज्य' न राहता ते इंग्रजी सत्तेच्या सरंक्षणा खालील एक संस्थान बनले. छत्रपती शिवाजी राजांनी करवीरचे राज्य ३५ वर्षे राखले होते.

छत्रपती शिवाजी तिसरे यांच्या मृत्यूनंतर कोल्हापूरच्या गादीवर त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी तिसरे उर्फ आबासाहेब हे आले. यांच्या काळात इंग्रजानी पूर्णपणे कारभार आपल्या हाती घेतला नव्हता. आबासाहेबांच्या काळात राणोजीराव घोरपडे खडकेवाडकर यांना डिसेंबर १८१६ मध्ये सेनापती म्हणून निवडण्यात आले. पुढे आबासाहेबांनी राणोजीराव घोरपडे यांचे सेनापती पद काढून घेऊन संताजीराव घोरपडे कापशीकर यास दिले. तसेच आबासाहेबांनी बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकरांशी तह करून इचलकरंजी जहागिरीवर करवीर छत्रपतीचे वर्चस्व मान्य केले आणि इचलकरंजीकरांनी दरसाल साडेबाराशे रूपये छत्रपतींना देण्याचे १९

सप्टेबर १८२० रोजीच्या कराराने केले.

आबासाहेबांनी सिंधोजीराव निपाणीकराने चिकोडी व मनोळी हे दोन मुळचे कोल्हापूर जिल्हयातील तालुके जबरदस्तीने आपल्याकडे घेतले होते. आबासाहेबांनी ते २ ऑगस्ट १८१८ रोजी ते परत मिळविले होते. आबासाहेबांनी केवळ नऊ वर्षे राज्य केले. आबासाहेबांच्यावर १६ जुलै १८२१ रोजी राजवाडयात खुनी हल्ल्यात ते ठार झाले.

छत्रपती शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज(१८२१ ते १८३८), शिवाजी चौथे उर्फ बाबासाहेब महाराज(१८३८ ते १८६६), बाबासाहेब महाराजानंतर कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती राजाराम महाराज(१८६६ ते १८७०) व छत्रपती शिवाजी पाचवे (१८७ ते १८८३) या कालावधीत राज्यकारभार केला. छत्रपती शिवाजी पाचवे हे मनोरूग्ण असल्याने मुंबई सरकारने १३ मार्च १८८२ रोजी एका निर्णयाद्वारे कागलचे जयसिंगराव घाटगे यांना कोल्हापूरचे रिजंट म्हणून नियुक्त करण्यात आले. हा राजा सन १८८३ मध्ये निपुत्रिक मरण पावल्यानंतर कागलच्या जयसिंगराव घाटगे यांचा मुलगा यशवंतराव घाटगे यास कोल्हापूरच्या गादीचा वारस नेमण्यास हिंदुस्थान सरकारने मान्यता दिली. त्यानुसार १७ मार्च १८८४ रोजी त्यांचा दत्तकविधान कार्यक्रम पार पडला व त्यांचा राज्याभिषेक समारंभ पार पडला.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर राज्यात अनेक सुधारणा केल्या. त्यामुळे कोल्हापूर राज्याची भरभराट झाली. सन १८९६ ते १९०० या कालखंडात छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील लोकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरविले होते. त्यासाठी साथीच्या रोगाचे निवारण करण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न केले होते. दुष्काळ व नैसर्गिक आपत्तीच्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर मदत केली. भोगावती नदीवर इ.स.१९५४ मध्ये राधानगरी हे धरण बांधून शेतीस पाणीपुरवठयाची सोय उपलब्ध करून दिली. शेतीसाठी ‘कोल्हापूरी पद्धतीचे’ बंधारे निर्माण केले. कोल्हापूर शहरात गुळाची बाजारपेठ निर्माण केली. चहा व कॉफी या पीकांच्या लागवडीस प्रोत्साहन दिले. सन १९२२ मध्ये शेतकऱ्यांसाठी कृषी पतपुरवठा करणाऱ्या संस्थाची स्थापना केली. याशिवाय शेती शिक्षणासाठी एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयुटची सन १९१२ मध्ये स्थापना केली. अशाप्रकारे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यात शेती, व्यापार, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणून कोल्हापूर राज्याचा मोठा विकास घडवून आणला होता.

कोल्हापूर जिल्हा हा प्राचीन, धार्मिक व सांस्कृतिक केंद्र मानले जाते. कोल्हापूर जिल्हयाचा प्रदेश हा जैन धर्मांचा बालेकिल्ला समजला जातो. कोल्हापूर शहरातील महालक्ष्मीचे मंदिर आहे तसेच खिद्रापूर येथील जैन मंदिर हे त्याचे प्रसिद्ध अवशेष आहेत. जैन धर्माच्या ऱ्हास काळात हे हिंदू धर्माचे केंद्र व एक शक्तीपीठ बनले. या धार्मिक स्थळांमध्ये कोल्हापूरचे श्री महालक्ष्मीचे मंदिर, ज्योतिबा, कपिलेश्वर, नरसोबाचीवाडी, खिद्रापूर व बाहुबली इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश होतो.

कोल्हापूर जिल्हयास प्राचीन इतिहास आहे. सातवाहन काळापासूनच्या इतिहासाच्या पाऊलखुणा जिल्हयात ठिकठिकाणी दिसतात. अनेक गावात प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाचे ठसे राहिलेले आहेत. तसेच इतिहासाचा वारसा घेऊन अनेक गावात लेणी, किल्ले, वाडे व वस्तुसंग्रहालये उभे राहिलेले आहेत.

कोल्हापूर जिल्हा हा ऐतिहासिक व धार्मिकदृष्टया महत्त्वाचा असलेला दिसतो. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळात या जिल्हयात अनके ऐतिहासिक महत्त्वपूर्ण घटना घडलेल्या आहेत. हे तेथील पुरावशेषावरून समजते. या जिल्हयात जे ऐतिहासिक वाडे, शिलालेख, ताम्रपट, किल्ले, लेण्या व स्मारके आहेत त्यावरून कोल्हापूर जिल्हयाचा इतिहास उजेडात येण्यास मदत झालेली आहे. तसेच तेथे असणारी धार्मिक स्थळे यांनी कोल्हापूर जिल्हयाचे धार्मिक महत्त्व समजण्यास मदत झालेली आहे. असा हा कोल्हापूर जिल्हा ऐतिहासिक व धार्मिक दृष्टया महत्त्वाचा समजला जातो.

महाराष्ट्र राज्यात सीमावर्ती भागात असलेल्या सोलापूर जिल्हयाला प्राचीन काळापासून गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. या भागातून वाहणाऱ्या भीमा व चंद्रभागा या नद्यांनी येथील लोकांचे धार्मिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध केले आहे. या नद्यांनी सोलापूर जिल्हयातील लोकांचे समाज जीवन बदलून टाकले आहे. आधुनिक काळातही सोलापूर जिल्हयाने आपल्या त्यागाने, कर्तृत्त्वाने व पराक्रमाने अभिनव असा इतिहास निर्माण केला आहे. यातूनच सोलापूर जिल्हयात अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण झालेली आहेत. या स्थळांनी सोलापूर जिल्हयातील लोकांना सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या धार्मिक स्थळामध्ये पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, अक्कलाईदेवी, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, मंगळवेढा संताचे स्थान, मोहोळचे नागनाथ मंदिर व दहिगाव जैन मंदिर

इत्यादींचा समावेश होतो. ऐतिहासिक स्थळांमध्ये सोलापूरचा किल्ला, पिलीवची गढी, मंगळवेढे, माणचूर किल्ला इत्यादी आहेत.

सोलापूर जिल्हयाचे तीन प्राकृतिक विभाग पडतात. पश्चिम व नैऋत्येकडील प्रदेशात महादेवाचे व शुक्राचार्याचे डोंगर आहेत. उत्तर, ईशान्य व पुर्वेकडील प्रदेशात बालाघाटच्या डोंगर रांगा आहेत. हा प्रदेश डोंगराळ व पठारी आहे. भीमा नदीच्या खोऱ्याच्या प्रदेशात जिल्हयातील मध्यभाग समाविष्ट आहे. हा भीमा व तिच्या उपनद्यांचा सखल प्रदेश आहे. या प्रदेशातील जमीन सुपीक आहे.

सोलापूर जिल्हयातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांनी महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविलेला आहे. ही स्थळे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक कारणातून निर्माण झालेली आहेत. लोकांनी आपले अध्यात्म जपण्यासाठी या धार्मिक स्थळांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात या ऐतिहासिक स्थळांनी चांगलीच कामगिरी बजावली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना फार महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. या स्थळांनी सोलापूर जिल्हयातील लोकांना सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.

सोलापूर जिल्हयातील विठ्ठल मंदिर तसेच वारकरी संप्रदायाचे प्रमुख केंद आहे. येथे सर्व जाती जमातीचे लोक आषाढी वारीच्या निमित्ताने एकत्र येत असतात. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांच्यापासून ते तुकाराम महारांजाच्या काळापर्यंतची परंपरा आजही आपणास तेथे जपलेली दिसून येते. अशाप्रकारे सामाजिक समतेचा वारसा या पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराने जपलेला दिसून येतो. याशिवाय सिद्धेश्वर मंदिर, अक्कलकोट स्वामी समर्थ, मंगळवेढा येथील संत परंपरा, वेळापूर मंदीर, दहिगावे जैन मंदिर इत्यादी धार्मिक स्थळांनी सोलापूर जिल्हयाचा धार्मिक वारसा जपण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. बहामनी शाहीच्या काळापासून ते पेशव्यांच्या ऱ्हासापर्यंत ज्या ऐतिहासिक स्थळांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. त्यामध्ये सोलापूरचा किल्ला, पिलीव किल्ला, मंगळवेढा व माणचूर इत्यादीचा समावेश होतो.

महाराष्ट्राला भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामुळे अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे निर्माण होण्यास मदत झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक जीवन हे परंपरावादी असल्याने ही परंपरा

जपण्यासाठी फार मोठया प्रमाणावर येथील लोक प्रयत्न करीत असतात. याशिवाय पश्चिम महाराष्ट्राला प्राचीन काळापासून ऐतिहासिक परंपरा असली तरी मध्ययुगीन काळात ज्या ऐतिहासिक घडामोडी घडून आल्या. त्यातून महाराष्ट्राला स्थिरता लाभली. त्यामुळे अनेक ऐतिहासिक स्थळे निर्माण होण्यास मदत झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे ही प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळात निर्माण झालेली आहेत. यामध्ये मध्ययुगीन काळात महाराष्ट्रावर मराठयांची सत्ता असल्याने फार मोठया प्रमाणात धार्मिक स्थळे निर्माण झालेली आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील मध्ययुगीन काळापासून ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व मोठया प्रमाणावर वाढले होते. पश्चिम महाराष्ट्रातील सामाजिक परंपरा या धार्मिकतेतून निर्माण झालेल्या असल्याने या परंपरेने चालत आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील लोक कोणतीही गोष्ट करीत असताना धर्मास अनुसरून करीत असल्याने या परंपराची जपणूक केलेली आहे. हे महाराष्ट्रीयन लोक धर्मबाहय वर्तन करणे म्हणजे पाप समजत असल्याने जुन्या रूढी परंपरेनुसार सामाजिक जीवन जगत असताना दिसत आहेत.

पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे भारताच्या इतिहासातील योगदान अभ्यासत असताना दिसून येते की, मराठयांचे नेतृत्त्व करणारे छत्रपती हे ही आपले वर्तन करीत असताना त्यांनी धार्मिक परंपरा जपलेली आहे. याचे कारण मध्ययुगीन काळातील संतानी या धार्मिक तीर्थक्षेत्रांचे महत्त्व वाढविले होते. याचे कारण महाराष्ट्रातील परकीयांची सत्ता संपविण्यासाठी आपल्या लोकांच्यात एकता निर्माण होण्यासाठी त्यांनी हे कार्य केले होते. तेव्हापासून महाराष्ट्रातील समाजात प्रत्येक जातीचे संत निर्माण झाले होते. त्यांनी आपापल्या परीने या तीर्थक्षेत्राचे महत्त्व वाढविले होते. याच तीर्थक्षेत्राच्या जोरावर मराठयांच्या काळात छत्रपतीनी अनेक ऐतिहासिक स्थळे निर्माण केली होती. त्यांनीच महाराष्ट्राचा इतिहास घडवित असताना फार महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत. महाराष्ट्राचा इतिहास प्राचीन आणि समृद्ध आहे. महाराष्ट्राचा विकास पुरातन काळापासून होत आलेला आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा विकास होण्यासाठी भौगोलिक परंपरा लाभलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा मानवी

समाज जीवनावर फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेस ही स्थळे उपयुक्त आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत.

ऐतिहासिक स्थळांच्या संदर्भात लक्षात घेता असे दिसते की, उत्तर हिंदुस्थानात इंग्रजांना विशेष प्रतिकार न होता किल्ले व आजूबाजूचे प्रदेश ताब्यात मिळाले, पण महाराष्ट्रात मात्र प्रखर प्रतिकार झाला. त्यामुळे कदाचित अपमानित झालेल्या इंग्रजांनी या ऐतिहासिक स्थळांची मोडतोड करून येथील वास्तू नष्ट करण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे दिल्ली व आग्रा इत्यादी ठिकाणचे किल्ले आजही शाबूत असल्याचे दिसतात, तर महाराष्ट्रातील सर्व किल्ले संपूर्ण ढासळल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळे महाराष्ट्रातील वास्तू ऐतिहासिक कागदपत्रे व अन्य ऐतिहासिक बहुमोल ठेवा नष्ट झाला आहे. आजही येथे उरलेल्या अवशेषाकडे आपले दुर्लक्षच होत आहे. खर तर हया पडक्या वास्तू पाहूनच आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. कारण हया भिंतीनीच आपले स्वराज्य टिकवून धरले होते.

पूर्वी राजप्रसाद होते. राजे, शूर लढवय्ये, श्रीमान व्यापारी यांचा राबता होता. प्राचीन चिरेबंदी वाडे ढासळलेले आहेत. शिवकालीन पद्धती मोडत चालल्या आहेत. गडावर जाण्याचे मार्गही दिवसेंदिवस कठिण होत चाललेले आहेत. ऊन, वारा, पाऊस यांच्या जोडीला अव्यवस्था अन उपेक्षा यामुळे ऐतिहासिक  वास्तू धुळीला मिळू पाहत आहेत. या ऐतिहासिक वास्तूकडे आजच लक्ष द्यायला हवे नाहीतर काही वर्षानी त्यांची निशाणीही राहणार नाही आणि विस्मृतीच्या खोल गर्तेत बुडून जातील.

विद्यापीठे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुराणवस्तू संशोधन खाते अशाकडून मोठमोठया किल्ल्यांचे तसेच ऐतिहासिक स्थळांचे उत्खनन झाल्यास मातीचा ढिगाऱ्याखाली लपलेल्या अनेक वस्तू व शस्त्रे इत्यादीचा ठेवा प्रकाशात येईल. तसेच मराठा काळ व आधुनिक काळातील ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण राहावे म्हणून ठराविक दिवशी नियमितपणे व्याख्याने, चित्रपट व स्लाइड शो इत्यादी माध्यमातून स्मरणदिन साजरे केले जावेत. त्यातून महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वास्तूंचे दर्शन घडू शकेल.

सन १८४८ व १८५७ च्या उठावा वेळी किल्ल्यावर हल्ले करण्यात आले. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले. हवामानामुळे व त्यांच्याकडे करण्यात आलेल्या दुर्लक्षामुळे किल्ल्यांचा

नाश झाला. किल्ल्यांचे भूतकाळातील महत्त्व पाहता त्याची देखरेख ठेवणे आवश्यक आहे. याबाबत प्रा. केणी म्हणतात की, 'काळाच्या बदलाप्रमाणे आणि विज्ञानाच्या प्रगतीमुळे व बॉंब हल्ला करणाऱ्या विमानाच्या आगमनामुळे किल्ल्यांची आवश्यकता व अभेद्यता कायमची समाप्त झाली. कार्याच्या दृष्टीने ते संपले आणि भूतकाळातील अवशेष म्हणून केवळ जिवंत राहिले. पण स्मारक या नात्याने तो आपला राष्ट्रीय वारसा आहे, म्हणून त्यांचे जतन केले पाहिजे.'

किल्ले आपले राष्ट्रीय स्मारक आहे. या दृष्टीने त्यांची योग्य देखरेख झाली पाहिजे. ते आपल्या वैभवशाली भूतकाळाची देणगी आहे. त्यांची व्यवस्थित निगा ठेवली पाहिजे. ऐतिहासिक वास्तू हे पर्यटन केंद्र म्हणून विकसित झाले असले, तरी त्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. आपण आपल्या ऐतिहासिक वास्तूंची तुलना मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश व राजस्थान येथील ऐतिहासिक स्थळाशी करतो. त्यावेळी लक्षात येते की, आपले ऐतिहासिक वास्तूकडे पुर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे ऐतिहासिक स्थळेही पर्यटकांचे लक्ष वेधून घेण्यास असमर्थ ठरतात. तरी पर्यटनाच्या दृष्टीने ऐतिहासिक स्थळांना महत्त्वाचे स्थान आहे.

महाराष्ट्रातील धार्मिक जीवनाच्या इतिहासाकडे नजर टाकली असता तसे दिसते की, व महाराष्ट्रात स्थानिक अथवा प्रादेशिक देवतांना कुलदैवत म्हणून मानण्याची प्रथा यादव काळापासून प्रस्थापित झाली. राष्ट्रकुटांनी पुरस्कारलेल्या पौराणिक देवतांपेक्षा स्थानिक देवतांचे माहात्म्य यादवांनी वाढविले.

पारंपरिक पद्धतीनुसार प्रत्येक कुटुंबाच्या देवघरात कुलदैवतांची मूर्ती किंवा टाक असतो. वर्षातून एकदा कुलदेवतांचा उत्सव केला जातो. त्यासाठी अनेक कारणांनी वेगवेगळया ठिकाणी राहणारे कुटुंबातील सर्वजण एका ठिकाणी जपून हा उत्सव मोठया आनंदाने साजरा करतात.

ग्रामदेवता ही संपूर्ण गावाशी संबधित असते. सर्व गावाच रक्षण करण्याची जबाबदारी या देवतेकडे असते. तिच्या नावाने सर्व गावाने उत्सव साजरा करायचा आणि गावाला भोजन घालायचे असा त्या गावचा कुळाचार असतो आणि तो दरवर्षी मोठया उत्साहात साजरा केला जातो. या देवतांची मूर्ती दिसायला उग्र असतात. कारण त्यावेळच्या जनमाणसावर भूत, प्रेत, पिशाच्च, राक्षस यांनी निर्माण केलेली विघ्ने यांचा मुकाबला करणाऱ्या देवदेवता त्यांच्याहून भिन्न दिसाव्यात, हा त्यापाठीमागील उद्देश होता.

प्रादेशिक स्तरावर पंढरपूरचा विठोबा व जेजूरीचा खंडोबा यांचा उल्लेख करावा लागतो. तसेच स्त्री देवतामध्ये तुळजापूरची भवानी आणि कोल्हापूरची महालक्ष्मी माता यांचा उल्लेख करावा लागेल. पंढरपूरचा विठ्ठल हा महाराष्ट्राचे दैवत म्हणून सर्व भक्त पांथिक भेद बाजूला सारून केवळ पारमार्थिक सुखासाठी या दैवतांची आराधना करतात. या दैवताला जाती–धर्माचे बंधन नाही. खंडोबाच्या भक्तामध्ये मुसल्मानही सामील आहेत.

आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगातसुद्धा आपल्या उपासना, कुळाचार कमी झाले नाहीत. उलट तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दर्शनासाठी रांगा कितीतरी पटीने वाढताहेत. याचे कारण आजचा समाज हा वय आणि अनुभवाच्या अनेक टप्प्यांवर उभ्या असलेल्या व्यक्तींनी मिळून बनलेला आहे. म्हणून जास्तीत जास्त व्यक्तींच्या भल्यासाठी या समाजाला अनेक नियम आणि निर्बंध यामध्ये बांधून ठेवावे लागते. यातूनच नीती–निती, पाप–पुण्य संकल्पनांची निर्मिती होते.

श्रद्धा आणि अध्यात्म या स्थिर पायावर महाराष्ट्राच्या संस्कृतीची भव्य इमारत उभी आहे. विज्ञानाची घोदौड चालू असतानासुद्धा विज्ञानाच्या शतकात सिंहस्थ कुंभमेळयाला लाखो लोक येतात, यावरून तीर्थांचे महत्त्व टिकून राहिले आहे, असे दिसते. तीर्थस्थानामुळे जातीय ऐक्याचा पाया मजबूत करण्यास विशेष मदत होते. स्वातंत्र्योत्तर नवीन महाराष्ट्राची निर्मिती चालू असताना महाराष्ट्रात बहुसंख्य असणाऱ्या समाजात एकीचा अभाव असणे इष्ट नव्हे. त्या दृष्टीने जातीय ऐक्य व धर्मभावना दृढ होण्याकरीता तीर्थाच्या पवित्र स्थानाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. यातूनच या तीर्थक्षेत्रांची निर्मिती होवून दिवसेंदिवस त्याचे महत्त्व वाढत आहे.

महाराष्ट्राला प्राचीन व समृध्द इतिहास असल्याने पुरातन काळापासून विकास झालेला आहे. महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळे प्राचीन काळापासून अस्तित्त्वात असून भौगोलिक परंपरेतून पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा विकास झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांची धार्मिक श्रद्धा असल्याने धार्मिक स्थळांचे महत्त्व वाढले आहे. महाराष्ट्राला प्राचीन काळापासून चालत आलेली ऐतिहासिक परंपरा आजही टिकून आहे. पश्चिम महाराष्ट्रातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा मानवी समाज जीवनावर फार मोठया प्रमाणावर प्रभाव पडलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळे समाजाला प्रबोधनकारक व प्रगतीसाठी उपयुक्त आहेत.

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने

## इंग्रजी ( अप्रकाशित साधने)


**( Maharashtra State Archives, Mumbai)**

1) Political Department file Volume-16; Files relating to Satara – Files No. 22, 28, 31, 40, 47, 55, 61, 69, 71, 91.
2) Revenue Department Volumes – File : No.60, 93, 95,104, 142
3) Political and Services Department Files : No. 2325/37 No. 3445 / 46, No. 2989/46 ; Political and Services Department : List No. 7001 to 9997

**Maharashtra State Archives, Pune**

1) Alienation Department (Duftar) Rumal No. 17 (14)
2) Dhawalikar M.K., Late Hinyan Caves of Western India, Deccan College Post Gradute and Research Institute Pune.

**मराठी (अप्रकाशित)**

१) चिंतामणराव पटवर्धन यांची रोजनिशी

२) छत्रपती शिवाजी महाराजांची सन १६५३ मधील सनद

३) पेशवे बाळाजी बाजीराव यांनी नाना फडणीस याना सन १७६१ मध्ये पाठविलेले पत्र

४) श्री कोप्पेश्वर मंदिरातील कन्नड शिलालेख

५) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव सिंघण, संस्कृत व प्राचीन बाळबोध लिपीतील शिलालेख

६) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव जयसिल व सिंघणदेव संस्कृत व प्राचीन बाळबोध लिपीतील शिलालेख

७) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील यादव नृपती महादेव संस्कृत व इ.स.१३व्या शतकातील नागरी लिपीतील शिलालेख

८) श्री.महालक्ष्मीच्या मंदिरातील चालुक्य नृपती सोमदेव शिलालेख

९) विशाळगड किल्ल्याच्या दौलत बुरूजावरील फारशी शिलालेख

१०) विशाळगडावर भोपाळ तलावाच्या भिंतीवरील फारशी शिलालेख

११) पेशवे दप्तर, रूमाल नं. ४९, १३३, १३७

## अप्रकाशित एम्.फिल. व पीएच. डी. प्रबंध

१) प्रा. काळे व्ही.सी., सातारा जिल्हयातील किल्ल्यांचे मराठा स्वातंत्र्य युद्धातील ऐतिहासिक महत्त्व, १६८९–१७०७, टि. म. वि. पुणे, एम.फिल. प्रबंध, जुलै २००८ पृ.३

२) प्रा.भोसले एस.एच., सातारा जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा–एक चिकित्सक अभ्यास (इ.स.१६०० ते १९००), टि. म.वि.पुणे, एम.फिल. प्रबंध, ऑक्टो.२००८ पृ.६

३) प्रा.ओवाळे डी.एस., साताऱ्याचे शिवछत्रपती वस्तूसंग्रहालय, एक चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित एम. फिल. प्रवंध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, मार्च २०१२.

४) प्रा. हंगसे एम.बी., कविवर्य सुधांशु यांच्या कवितेचे विशेष, एम.फिल अप्रकाशित प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९९४, पृ.४६

५) प्रा. डॉ. दळवे अरूण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड, २००४,

६) प्रा. डॉ. खराडे दत्तात्रय पांडुरंग, सांगली जिल्हयातील निवडक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचा चिकित्सक अभ्यास, (इ.स.१६०० ते १९००), एम. फिल. शोधप्रंबध, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जून २०१०, पृ.७४

७) प्रा. डॉ. कोरडे दत्तात्रय ज्ञानदेव, “वाईचा राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहास (१९०० ते २०००)” पीएच.डी. शोधप्रबंध, टि. म. वि. पुणे, ऑक्टोबर २०१३,

८) प्रा. डॉ. चौधरी दत्तात्रय मल्हारी, पंढरपूर नगरीचा इतिहास, शिवाजी विद्यापीठ पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, डिसेंबर २००६ पृ.९८ ते ११०

९) Dr. Khane B.D. : Shri Shahu : A study of Socio-Political Reforms 1842-1922, unpublished Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur,

इंग्रजी ( प्रकाशित साधने)

ब . प्राथमिक साधने, प्रकाशित

१ . इंग्रजी साधने


1) Administration Report of Satara District,1945.

2) Aictichson C.U., Collection of Treates, Engagements and Sanads relating to Indian and neighboring countries, Vol.No.VII, Calcutta, 1892

3) Choksey R.D.(Ed.), Raja Pratapsinh of Satara 1818-1839, B1SM, Poona 1970

4) Choksey R.D.(Ed.), The Aftermath 1818-1876, Poona 1975

5) Choksey R.D.(Ed.), The Period of Transition, 1818-1826, Poona, 1975

6) Eliot H.M. and Dowson, J. History of India as told by its own historians, Vol. I to VIII, Trubner and Company, London, 1964.

7) Elphinstone Mountstuart, Territories Conquered from the Peshwa– A Report, Orient Publication Delhi, reprint, 1973

8) Forest G.W.(Ed.) Selections from the Letters Dispatches and Other State Paper preserved in the Bombay Secretariet, Home Series, Vol.I, Part III, Bombay, 1887

9) Gazetteer of Bombay Presidency, Kolhapur District,

10) Gazetteer of Bombay Presidency, Sangli District,

11) Gazetteer of Bombay Presidency, Solapur District

12) Gazetteer of Satara District,1885.

13) Gazetteer of Satara District,1963.

14) Gazetteer of State Maharashtra, Govt. of Maharashtra,1969.

15) Gazetteer of the Bombay Presidency (Old Series), Bombay, 1884

16) Imperial Gazetteer of Indian Provincial Series, Bombay Presidency, Vol.II, Usha Publication, Delhi, 1885

17) Indian Archeological, Vol.- 62, 1932

18) Joshi P.M.,The Adilshahi and the baridshahi, History of medieval Deccan (1295-1724), Vol.I

19) Khoberekar V.G.(Ed.), Record of Shivji Period, Vol. I and II, Government of Central Press, Bombay, 1887.

20) Kulkarni A.R., The Maratha\s, History of medieval Deccan, Vol. II

21) Kulkarni G.T., The Mughal-Maratha relations Twenty five fateful years(1682-1707), Deccan College, Pune 1983

22) List of Ruling princes & chiefs in political relations with government of Bombay and their leading official Nobles and Personages, Calcutta, 1931

23) List of Ruling princes chiefs and leading personages in Kolhapur & Deccan State, Delhi 1941

24) Maharashtra State Gazetteers Vol.XIX, Satara District (Revised Edition), Bombay, 1963

25) Mirashi V.V., The Rashtrakutas of Manpur, in Studies in Indology, Nagpur, 1968,Vol.I

26) Nagraj M. S.(Ed.), The Chalukya's Of Badami, 1978

27) Ogilvy T., Memoir on Satara Territory, Selection from the records of the Bombay Government Vol.XLI, (New Series)

28) Sankliya H.D., An excanater at Brahmpuri, 1945,

29) Saradesai G.S.(Ed.), Poona Residency Correspondence, Vol.II, Poona Affairs 1786-1797, Bombay, 1936

30) Saradesai G.S.(Ed.), Poona Residency Correspondence, Vol.VIII, Poona Affairs 1801-1810, Bombay, 1941

31) Sardesai G.S. and Sarkar J., Poona Residency Corresondence Series, Vols.1 to 14, Government of Central Press, Bombay, 1936.

32) Satara District Suplementary, 1902-1921.

33) Censes Of India 1991, Series 14 Maharashtra, Part 4(B)(2) Religion Table C 9

34) Censes of India,2011, series 14, maharashtra, Part 4(B)(2) Religion Table

35) Surhtankar B.R., Nineteen Century History of Maharashtra, Vol, I, 1988.

36) Tarachand, History of the Freedom Movement India, Vol.1,1973

## मराठी (प्रकाशित साधने)

१) चौधरी कि.का.(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, कोल्हापूर जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन १९८९,

२) हस्तलिखित, सहयाद्री प्रतिष्ठान, पिलीव किल्ला,

३) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतिकोश प्रथम खंड, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे,१९६९

४) जिल्हा माहिती अधिकारी सांगली जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

५) जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

६) जिल्हा माहिती अधिकारी सातारा जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

७) जिल्हा माहिती अधिकारी कोल्हापूर जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

८) जिल्हा माहिती अधिकारी पुणे जिल्हा, संदर्भ पुस्तिका–२००१

९) जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश, खंड ३, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९७०.

१०) जोशी महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतिकोश सहावा खंड, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९७६,

११) जोशी ल.बा.(संपा.),भारतीय विश्वकोष खंड १, साहित्य संस्कृती मंडळ, मुबई, पृ.२१२

१२) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश-खंड ४, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६

१३) जोशी ल.बा.(संपा.), मराठी विश्वकोश खंड- ९, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९८०,

१४) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५ .

१५) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश खंड १५, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९५

१६) मराठे का.बा.(संपा.), सवाई माधवराव पेशव्याची रोजनिशी, खंड १, पुणे १९०८,

१७) महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, महाराष्ट्र इतिहास- प्राचीन काळ(खंड १ भाग-२) स्थापत्य व कला(प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादव काळ), महाराष्ट्र शासन,मुंबई, २००२,

१८) महाराष्ट्र शासन, जनगणना अहवाल सांगली जिल्हा, १९०१-२०११

१९) महाराष्ट्र शासन, जनगणना अहवाल सोलापूर जिल्हा, १९०१-२०१

२०) महाराष्ट्र शासन, जनगणना अहवाल सातारा जिल्हा, १९०१-२०११

२१) महाराष्ट्र शासन, जनगणना अहवाल कोल्हापूर जिल्हा, १९०१-२०११

२२) महाराष्ट्र शासन, जनगणना अहवाल पुणे जिल्हा, १९०१-२०११

२३) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-आयएन-२९८०-१०८९-सी, आर, ४५३(अे)-एम-१०, दि.३०जून १९८३, पृ.२

२४) मुंबई प्रांत गॅझेटियर, खंड-१९, १९८९

२५) पाठक अरूण (संपा.), पुणे जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १८८५

२६) रायगड जिल्हा गॅझेटियर, १९९३

२७) सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझेटियर आवृत्ती १९७७, महाराष्ट्र शासन, गव्हर्नमेट सेंट्रल प्रेस, मुंबई.

२८) सांख्यिकी गोषवारा, महाराष्ट्र राज्य , १९७१-७२

२९) सातारा जिल्हा गॅझेटियर, १९९९ .

## मुलाखत

१) गोसावी अश्विनकुमार गोसावी, दि.२२.१२.२०१३, स्थळ- श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा, वेळ-३.३० वा.

२) द्रविड मॅडम, दि.२३.१२.२०१३, स्थळ–श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा, वेळ–३.३० वा.

३) मुलाखत– शिंदे पी.डी. श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा दि.२३.१२.२०१३, वेळ–१०.३० वा

## दुय्यम साधने

## इंग्रजी


1) Alteker A.S., Village Communities in Western India, Bombay, Oxford University, press,1927.

2) Banerjee A.C., Peshwa Madhar rao I, A Mukherjee & Co-Operative Limited, 1968.

3) Bhandarkar R. G., Early History of the Deccan, Vol.I, Dehli,1894.

4) Burgess James, The Cave of Temples of India, Orient, books Corporation Reprint, Delhi, 1959

5) Chaudhari K. K. (Ed.), Source Material for History of Freedom Movement, Vol.II

6) Chitnis K. N., Socio-Economic History of Medieval India, Atlantic Publishers and Distributors, 2002

7) Choksey R. D. , Select Doucments From the Satara Residency Records, Peshwa Dafter Poona, Raja Shahji Of Satara- 1839-1848, First edition 1974.

8) Desai Sudha, Social Life in Maharashtra Under The Peshwas, Popular prakashan, Bombay, 1980.

9) Deva Krishna., Temples Of North India, Dehli National Book Trust 1969.

10) Doshi Saryu, Maharashtra, Marg Publications, 1985

11) Duff James Grant, History Of the Mararthas- Vol. I, Low Price Publications Reprinted, 1990.

12) Duff James Grant, History Of the Marartha's- Vol. III, Cosmo Publications, 1999

13) Gazetteer Of India, Maharashtra State, History Part III, Maratha Period, Directorate of Government Printing, Stationary and publications, Maharashtra State, 1967.

14) Gazetteer Of India, Maharashtra State History- Part I – Ancient Period, Directorate Of Government Printing, Stationary and Publications, Maharashtra State, 1967

15) Gokhale Balkrishna Govind, Poona In the Eighteenth Century ; An Urban, Delhi oxford University Press Bombay Calcutta Madras, 1988

16) Habib Irfan(Ed.), Medieval India, Researches in the History of India 1200-1750, Centre Of Advanced study in History Aligarh Muslim University Delhi, Delhi oxford University Press Bombay Calcutta Madras, 1999

17) Joshi P.M.(Ed.), Selections From the Peshwa Dafar New Series (3), Revival of Maratha Power(1761-1772), Government Central Press, Bombay, 1962

18) Kadam V.S., Munshiram Manoharlal, Maratha Confederacy ; A Study in its Origin and Development Publishers Pvt. Ltd., 1993

19) Kamble B.R.(Ed.), Studies in Shivaji and His Times, Shivaji University Publication, Kolhapur,1982.

20) Kanhere Gopal Krishna, The Temples Of Maharashtra, Maharashtra Information Centre, New Dehli,1989

21) Kaur Manmohan, Role of Women in the Freedom Movement of India (1857-1947), Sterling publication Pvt. Ltd. Jullandar,1968.

22) Kincaid C.A. and Parasnis D.B., History Of The Maratha People III, Oxford University Press, Bombay, 1918.

23) Mahajan T.T., Shivaji And His Diplomats, Commomwealth Publishers, New Dehli, 1991

24) Marathe Kashinath Balkrishna (Ed.), Selections From the Satara Raja's And The Peshwas Diaries- VI, The Poona Deccan Vernacular Translation Society with the permission of the Government of Bombay, 1909

25) Narvane M.S., The Maritime And Coastal Forts Of India, (Foreword by) Admiral Vishnu Bhagwat, APH Publication Corporation, 1998

26) Nath R., Medival Indian History and Architecture, APH Publishing Corpration, 1995

27) Pagadi S.M.(Ed.), Studies in Maratha History II, Shivaji University, Kolhapur, 1971

28) Patil Shalini V., Maharani Tarabai Of Kolhapur(C.1675-1761 A.D.), S. Chand & Company(Pvt.) LTD., 1987

29) Patwardhan R.P., Rawlinson H.G., Source Book of Maratha History, with an Introduction by Joshi P.M. and Kulkarni A.R. K.P.Bagchi & Company, Calcutta, 1978

30) Pawar A.G., Studies In Maratha History- Vol.I, Shivaji University Publication, 1971

31) Rajarshi Shahu Chhatrapati Papers- Vol. I, 1884-1894, Shahu Research Institute, Shivaji University Kolhapur, 1978

32) Ranade D.G., The Prophat of liberated India, Pune, 1942

33) Ranade M.G. and K.T. Telang, Rise of the Maratha Power and Other Eassays, University of Bombay,1961.

34) Rao P.R., Indian Heritage And Culture, Sterling Publishers Private Limited, 1988

35) Sangve Vilas, Khane B.D.(Ed.), Rajarshi Shahu Chhatrapati Papers- Vol. III (1900-1905), Shivaji University, Kolhapur.

36) Sardesai Govind S., New History Of The Marathas- Vol.I, Shivaji and His Line(1600-1707), Phoenix Publications, 1957

37) Sarkar J.N., Shivaji and His Times, Orient Rongman Limited, Bombay, 1973.

38) Sen S.P. (Ed.), Source of the History of India-I, Institute of Histiorical Studies, Calcutta, 1978.

39) Sen Surendranath, Administrative System Of the Maratha's, Calcutta K.P.Bagchi & Company Third Edition 1976.

40) Shastri K.N., A History of South India, Delhi, Oxford University Press, (4th Ed.), 1976.

41) Sullivan E., Mughal Empire in India, Royal Publications, Delhi, 1990

42) Sukthankar B.R., Maharashtra- 1858-1920, Popular Book Depot, 1993

43) Wauchape R.S., Buddhist Cave Temples of India, Calcutta, 1933.

44) Yazdani Gulam (Ed.), The Early History of the Deccan (4th Volumes), London,1960.

## मराठी (दुय्यम साधने)

१) अक्कलकोट सतीश, दुर्ग, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ सांगली, नोव्हेंबर २००९

२) अभ्यंकर रा. वि., महाराष्ट्रातील शक्तिस्थाने, आमोद प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती २००६

३) अत्रे त्रि.ना., गावगाडा, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८९

४) आठल्ये विभा अनिल, कोल्हापूर राज्याचे सातारा व पुणे दरबाराशी संबंध, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, २००७

५) एपिग्राफिया इंडिया, खंड १८, दिल्ली

६) भिंगारकर कृ.ज्ञा., श्री विठ्ठल महात्म्य, पुणे, १९९६

७) बहिरट बा.अ., भालेराव प.ज्ञा., वारकरी संप्रदाय उदय व विकास , पुणे, १९८८

८) बेंद्रे वा. सी.(संपा.), महाराष्ट्र इतिहासाची साधने, विभाग पहिला, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ, ग्रंथमाला, पहिली आवृत्ती, १९६७, पृ.१७३

९) बहुलेकर बाळासाहेब, उपारण्य, म.चि., आपला सातारा, मावळा प्रकाशन, सातारा, ६ मार्च, १९९४

१०) बेणारे गोपाळ, राणा पंढरीचा, श्री संतसेवा वाङ्मय सेवा प्रकाशन, पंढरपूर, १९९३

११) भावे विनायक लक्ष्मण, मराठी दफ्तर(रूमाल दुसरा), मराठी दफ्तर संस्था ठाणे, १९२२

१२) भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन पुणे,१९९८

१३) भावे विनायक लक्ष्मण, मराठी दफ्तर(रूमाल पहिला), मराठी दफ्तर संस्था ठाणे, १९१७

१४) चिले भगवान पांडुरंग, दुर्गवैभव कोल्हापूर जिल्हयाचे, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर २००९

१५) चिले भगवान, गडकोट, शिवस्पर्श प्रकाशन, २००४

१६) चिले भगवान, दुर्गसंपदा महाराष्ट्राची, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर २००९

१७) डिसकळकर द. बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे विद्यापीठ पुणे, १९६४,

१८) ढेरे रा .चि. श्रीविठ्ठल एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन पुणे, २१ जुलै २०१२

१९) ढेरे आर सी आणि खरे बी.डी., महाराष्ट्र इतिहास दर्शन, पद्मगंधा प्रकाशन, २००२

२०) ढेरे रा.चि., शिखर शंगणापूरचा शंभू महादेव, श्रीविद्या प्रकाशन पुणे, २००१

२१) दारूवाला महंमदमियाँ, आपली प्राचीन वाई, दारूवाला मजहर हुसेन प्रकाशन, वाई, २००१

२२) दाते य. रा. (संपा.), मराठी शब्दकोश, विभाग तिसरा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९३४,

२३) देव शा. भा. महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर मुंबई, १९६८

२४) देशमुख रा.नी., आपला सातारा जिल्हा, कल्पना प्रकाशन, २०११

२५) देशमुख गोपाळ, सोलापूर जिल्हयाचा इतिहास१६००ते १८५०), रेवू प्रकाशन पंढरपूर, फेब्रुवारी २००९
२६) देशपांडे महेश, साताऱ्याच्या परिसरात, लोकव्रत प्रकाशन, सातारा, ७ ऑगस्ट, २०११
२७) देशपांडे अ. ना. प्राचीन महाराष्ट्रातील वाकाटकांचा इतिहास, डायमंड प्रकाशन, पुणे, १९९५
२८) देशपांडे प्र.न., रायगड दर्शन, सुषमा प्रकाशन, धुळे, १९९३
२९) देशपांडे सु.र., वाई : मंदिरे, मूर्ती आणि भित्तीचित्रे, लोकहित, मे, १९९२
३०) देशपांडे सु.र., वाई : कला आणि संस्कृती, आस्था, पर्यावरण मैत्री संस्था, वाई, २०११
३१) देशपांडे पी.एन., मराठयांचे किल्ले, डायमंड प्रकाशन, पुणे, १९९९
३२) देशपांडे द.ग., महाराष्ट्रातील किल्ले, डायमंड पब्लिकेशन पुणे, २९ ऑक्टोबर २००९
३३) देसाई रमेश, शिवाजी किल्ल्यांचा शेवटचा रचनाकार, मुंबई, १९९३
३४) धारूरकर विठ्ठलशास्त्री, पंढरी माहत्म्य, पुणे २००२
३५) गणपती मंदिर सांगलीच्या राजघराण्याचा लोकहितवादी सहभागाचा इतिहास हस्तलिखित, २००५
३६) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत गो.स.सरदेसाई खंड ५ वा. पॉप्युलर प्रकाशन, १९९०
३७) गर्गे स.मा., करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन जानेवारी १९६८.
३८) गर्गे स.मा., छत्रपतींची धाकटी पाती, मराठयांचा इतिहास, खंड–२, गो.य.राणे, प्रकाशन, १९८५
३९) गायकवाड आर.डी. व इतर, शिवाजी महाराजांचे सहा किल्ले, प्रा.सौ.डॉ.हेमलता रामचंद्र गायकवाड प्रकाशक सातारा, फेब्रुवारी २००९
४०) गायकवाड, हणमाने व सरदेसाई, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन कोल्हापूर, २०००
४१) गोविलकर मोहन (प्रकाशक), आधुनिक भारत, १९९५
४२) गोसावी र.रा., पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, तृतीय आवृत्ती पुणे– २००८
४३) गोखले कमल, छत्रपती संभाजी, मराठयांचा इतिहास, खंड १, ज्ञान–विज्ञान विकास मंडळ, पुणे, १९७१

४४) गोखले पु.पा., जागृत सातारा, आनंद प्रिंटींग, सातारा, १९७९

४५) गुप्त चंद्रशेखर, प्राचीन विदर्भाचा ऐतिहासिक भूगोल, साकेत प्रकाशन, नागपूर, २००४

४६) गुजर मा.वि., करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने भाग ५, लेख ११७, पुणे, १९६२

४७) घाणेकर प्र.के., महाराष्ट्रातील गड व किल्ले, स्नेहल प्रकाशन, १९७९

४८) घाणेकर प्र.के., इथे महाराष्ट्र देशी, स्नेहल प्रकाशन, पुणे १९९४

४९) घाणेकर प्र.के., साद सहयाद्रीची भटकंती किल्ल्यांची, स्नेहल प्रकाशन, पुणे १९९६

५०) हरवंदे गीता आदिनाथ, महाराष्ट्रातील तीर्थयात्रा कुलदैवते आणि विविध संप्रदाय, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे ६ नोव्हेंबर २०११

५१) जक्कल विठ्ठल नरसाप्पा, सोलापूर शहराचा इतिहास, १९२८

५२) जगताप बाळासाहेब, श्री क्षेत्र मांढरदेवी वर्णन, १९७६

५३) जोशी नि.पु., भारतीय मूर्तीशास्त्रे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९७९

५४) जोशी प्र.न., प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पहिली आवृत्ती पुणे, २००२

५५) जोशी श.ना., शिवकालीन पत्रसारसंग्रह,

५६) जोशी ह. न., श्री क्षेत्र औदुंबर,  जयहिंद प्रकाशन, कोल्हापूर १९७७

५७) जोशी पु.म. मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४

५८) जोशी ना.वि., पुणे शहराचे वर्णन–१८६८, अनमोल प्रकाशन, पुणे, १९९४

५९) जोग सुरेश व इतर, भारत प्राकृतिक पर्यावरण, पुणे, २००६

६०) जोगळेकर एस. ए., सहयाद्री, पुणे १९५२

६१) कर्वे चि. ग. (संपा.), महाराष्ट्र परिचय, पुणे,१९९५

६२) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, आर. जे. देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२

६३) काळे पाटसकर भाग्यश्री, महाराष्ट्राची मंदिरशैली, डायमंड पब्लिकेशन, पुणे, नोव्हेंबर, २००९

६४) काळदाते सुधा, भारतीय समाजरचना, भारत मुद्रक, औरंगाबाद, १९७६

६५) कोठेकर शांता व वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, १९९३ मुंबई

६६) कोनगाळे विजय, देशभक्त धोंडीराम, सुचेता प्रकाशन सांगली, २००१–०२

६७) कॅनिंगहॅम, स्तुप ऑफ बारहूत, लेख क्र.१३५,१३८ व १३९

६८) केळकर य.न., रामशास्त्री प्रभुणे, भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल १९९६

६९) केळकर कृ.रा., सचित्र भिलवडी वर्णन, प्रकाशक, कृष्णाजी केळकर ज्ञानविकास प्रेस, पुणे १९३५,

७०) केपन डेव्हिड, मराठयांची बखर

७१) कुलकर्णी भरत कल्याण, खिद्रापूरचे श्री कोपेश्वर मंदिर, भरत कल्याण कुलकर्णी प्रकाशक, २०१२

७२) कुलकर्णी अ.रा., राजगड शिवाजीची पहिली राजधानी, १९९३

७३) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास खंड–२, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५

७४) कुलकर्णी गो.त्र्यं., मराठयांचा इतिहास, खंड १, १९८४

७५) कुलकर्णी पी.के. भारतातील धर्म, १९८७

७६) कुळे मुकुंद, इतिहासाचे साक्षीदार–मराठेकलीन सांस्कृतिक वैभवाचा मागोवा, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०११

७७) कुंटे मो. के., सांगाली जिल्हयातील मंदिरे, ओम गणेश प्रकाशन, पुणे

७८) खरे वा.वा., ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ३, मिरज

७९) खरे ग.ह. व बोराटे व.म., अशी आमुची वाई, अक्षरभांडार प्रकाशन, पुणे, १९७९

८०) खरे ग.ह., मूर्तीविज्ञान, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३९

८१) खरे ग.ह., श्री विठ्ठल आणि पंढरपूर, पुणे, १९६३

८२) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयाचे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९२

८३) लांजेकर रू.ज., सातारा जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळे

८४) लांजेकर.ज. रा. वाई परिसरातील प्रेक्षणीय स्थळे, विद्यादिप प्रकाशन, वाई, २०००

८५) लेले. सु.य., कर्मयोगी, वरदा प्रकाशन, पुणे, २१ मार्च २००४

८६) मंत्री रमेश, सुंदर सातारा, १९८६

८७) मराठे का.बा.(संपा.), सवाई माधवराव पेशव्याची रोजनिशी व्हॅल्युम १, १९०८

८८) महाजन शां.ग., पुणे शहराचा ज्ञानकोश, पुणे शहराचा ज्ञानकोश प्रतिष्ठान, पुणे, ९ ऑक्टोबर २००४

८९) महाजन शां.ग., पुणे शहरातील मंदिरे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, ९ ऑक्टोबर २००८.

९०) मावजी पु.वि. व पारसनीस द.ब.(संपा.), कैफियती यादी इत्यादी, आर्यभूषण प्रेस, १९०८

९१) मोहिते अनंत गोपाळ, तीर्थे महाराष्ट्राची, मैत्रेय प्रकाशन, मुंबई, १५ ऑगस्ट २०११

९२) मोरे एम.एस., महाराष्ट्रातील बुद्धधम्माचा इतिहास, अनागरिक लोकमित्र, पुणे, १९८१

९३) मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९८.

९४) मोरे खं.आ., मराठी संस्कृती–मराठी अस्मिता, श्रीस्वामी समर्थ प्रकाशन, दिंडोरी(नाशिक), २००५,

९५) मोडक बा. प्र., कोल्हापूर प्रांताचा इतिहास, अनुभव प्रकाशन, कोल्हापूर, १९८६

९६) माटे म.श्री., प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७४.

९७) माटे गो.रा., असा घडला जिल्हा सातारा, महाराष्ट्र मित्र, मुद्रणालय, सातारा, १९८८

९८) मेहेंदळे ग.भा., श्री राजा शिवछत्रपती खंड १, भाग २, रावत ब्रदर्स, सदाशिव पेठ, पुणे, १९९९

९९) मुश्रीफ हमीदहसन मुहम्मदसाहेब, हजरत ख्वाँजा शमशुद्दीन(गंजबक्ष) यांचे हयाते पाक जीवन चरित्र भाग पहिला, १९८७

१००) मिराशी वा. वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर, १९७४

१०१) मिराशी वा. वि., वाकाटक नृपती आणि त्यांचा काळ, १९५७

१०२) मिराशी वा. वि., सातवाहन आणि पश्चिम क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७९

१०३) नाईक पंडित कृष्णकांत, इच्छापूर्ण करणारी देवस्थाने, अक्षय्य प्रकाशन पुणे, ६ ऑक्टोबर २०११

१०४) नाईक पंडित कृष्णकांत, तीर्थक्षेत्र अक्कलकोट दर्शन यात्रा, भक्ती सुंगध प्रकाशन, पुणे, २० जानेवारी २०११

१०५) नागराज एस. यु., बुद्धिष्ट आर्किटेक्चर ऑफ इंडिया(इ.स.पू.२५०इ.स. ३००), आगमकला, दिल्ली, १९८१

१०६) नेरकर अरविंद, होय होय वारकरी, मुंबई १९९८

१०७) नूलकर व.कृ., पर्वती मंदिरे व इतिहास, देवदेवेश्वर संस्थान पर्वती, पुणे १९९६

१०८) फडके य.दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, विद्या प्रकाशन, पुणे, १९८९

१०९) फडके आदित्य, सफर सांगली कोल्हापूरची, स्नेहल प्रकाशन कोल्हापूर, ४ सप्टेबार २०१२

११०) पवार जयसिंग, महाराणी ताराबाई स्वातंत्र्य संग्राम, मराठयांचा इतिहास, खंड१, १९८४

१११) पगडी सेतू माधवराव, शिवचरित्र एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,१९७१, पृ.२३१

११२) पगडी सेतूमाधव(संपा.), मोगल आणि मराठे(तारिखे दिल्कुशा), ग.ल.ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६३

११३) पाटील रमेश, सफर पन्हाळगड परिसराची, पी.जी.पब्लिकेशन्स पन्हाळा, २००८

११४) पाटणे संभाजीराव, अजिंक्यताऱ्यावरून, अजिंक्य, ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा, १९६३

११५) पाध्ये के. आ., हेमाद्री उर्फ हेमाडपंत यांचे चरित्र, १९३१

११६) पानसे मु.ग., यादवकालीन महाराष्ट्र, १९८५

११७) पुरंदरे बो.म., प्रतापगड आणि शिवदर्शन

११८) डॉ. पवार आप्पासाहेब, जिजाबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, १९७९

११९) रानडे म.गो., मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९८९

१२०) शिंदे सरकार अशोकराव, स्वराज्याचा मागोवा, सहयाद्री प्रकाशन संस्था, इस्लामपूर, २००९

१२१) शिवचरित्र निबंधावली, पुणे, १९३०

१२२) शर्मा के. के. मुख्य संकलक इंटक्यअलस, संदर्भ महाराष्ट्र राज्य व जिल्हे एक दृष्टीकोन, खंड–२, २००५

१२३) सरदेसाई बी. एन., आधुनिक महाराष्ट्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९४

१२४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड १ ते १३, १९३०

१२५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत खंड १, पॉप्युलर प्रकाशन, पुणे,१९८८

१२६) सरदेसाई गो.स., मराठी रियासत–खंड २ : स्थिरबुद्धी राजाराम, १९२६

१२७) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर खंड ४१, गव्ह.सेंट्रल प्रेस मुंबई, १९३०

१२८) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, इतिहासाची सुवर्णपाने, आदित्य प्रकाशन सांगली, १२ मार्च २०१२

१२९) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५

१३०) सांगली वस्तुसंग्रहालय, हस्तलिखित

१३१) सावंजी अ.व्य., विठ्ठल स्थापनेची मिमांसा, नागपूर, १९८४

१३२) सावंत इंद्रजीत व., पर्णालपर्वत पन्हाळगड, सहयाद्री प्रतिष्ठान कोल्हापूर, जून २००४

१३३) सोवनी अ.म.(संपा.), ऐतिहासिक बखरी खंड २, शब्दवेध प्रकाशन पुणे, १९९८,

१३४) सूर्यवंशी कृ.गो., राजर्षी शाहू : राज व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे १९८४

१३५) श्री भाटये, पुण्याची पर्वती, १९९३

१३६) श्री संत तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा, शासकीय मुद्रण आणि लेखनसामग्री मुंबई, १९६७

१३७) श्री. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, सातारा यांची मार्गदर्शक पुस्तिका

१३८) डॉ.शिंदे खंडेराव, कोल्हापूर राज्याचा इतिहास (१८३८–१८९४), निर्मिती विचारमंच कोल्हापूर, २००९

१३९) टिळक अविनाश, सांगली आणि सांगलीकर, २००१

१४०) ठाकरे प्रबोधनकार, प्रतापसिंह महाराज आणि रंगो बापूजी, १९९६
१४१) ठाकूर जितेंद्रनाथ, नवनाथ कथासागर अध्याय, धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई २००८
१४२) उपाध्ये ए.एन.,(संपा), बृहत कथाकोश, मुंबई १९४३
१४३) वाडेकर अरूण श., पंढरपूर माहात्म्य, पुणे, २०००
१४४) संशोधनाची वाटचाल, आखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, १९ वे अधिवेशन डी.बी.एफ.दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर, २४ व २५ डिसेंबर २०१०
१४५) येवले शंभा., सोलापूर जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती मुंबई, १९ जुलै २०११

**हिंदी**

१) थापर रोमिला, भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, न्यू दिल्ली,२००१.

**स्मरणिका**

१) कोष्टी प्रभाकर ,शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद, गौरवगाथा रौप्य महोत्सवी विशेषांक १९७५
२) सांगली नगरपालिका, शताब्दी महोत्सव, स्मरणिका १९७६
३) स्मरणिका, आमचा सातारा, सातारा शहर नगरपालिका, १९६७

**नियतकालिके**

१) मोरवंचीकर रा.श्री., अस्मिता महाराष्ट्राची, १९८५, महाराष्ट्र दिन, रौप्य महोत्सवी विशेष अंक
२) माणगौरव आटपाडी वार्षिक विशेषांक २००५-०६
३) लोकप्रभा, नवरात्री विशेष, इतिहास महालक्ष्मीचा, १९ ऑक्टोबर, २०१२
४) सातारा शहर नगरपालिका शतसावंत्सरिक महोत्सवी अंक१९५४

**त्रैमासिके, मासिके व वृत्तपत्रे**

१) बेंद्रे वा.सी., राणी येसूबाईसाहेब, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै १९६४
२) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे २००२
३) भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, मुंबई, १९९८
४) रूद्रभटे दिलीप, दैनिक ऐक्यमधील लेख, सातारा, १२ एप्रिल १९९२
५) फाटक न.र. व खोबरेकर वि.गो., भारतीय इतिहास आणि संस्कृती, एप्रिल, १९७५

६) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, दै.सकाळ लेख सांगली जिल्हा इतिहास आणि वर्तमान, २ एप्रिल २००६
७) सपकाळ सुभाष, निसर्गरम्य–क्षेत्र यवतेश्वर, दैनिक ऐक्य, सातारा, १० ऑगस्ट, १९९२
८) चव्हाण शिवाजी, सातारा जिल्हयाचा सांस्कृतिक आकृतिबंध, सातारा जिल्हा परिषद गौरव गाथा, रौप्य महोत्सवी अंक, सातारा, १९८७ दैनिक सकाळ, ४ जुलै २००३
९) पोतदार द.वा. व मुजुमदार गं.ना., भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, त्रैमासिक वर्ष १८ अंक ४था, चैत्र १८६०
१०) जामखेडकर अ.प्र., शिल्प–स्थापत्याचे वैभव– खिद्रापूर, लेख दि. ८. ११. १९८१ च्या सकाळ(कोल्हापूर)
११) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, एप्रिल १९७३
१२) जोशी वा.वि., सातारा शहरासंबंधी काही जुनी माहिती, भारतीय इतिहास आणि संस्कृति(त्रैमासिक), पुस्तक ३७ वे, (एप्रिल १९७३), मुंबई
१३) संशोधक वि. का. राजवाडे संशोधक मंडळ, त्रैमासिक, धुळे
१४) ढवळे ना.वा., श्रावणातील आकर्षण सदाशिवगड, दैनिक सकाळ (कोल्हापूर), १९ ऑगस्ट १९९२
१५) दै. तरूण भारत, पलुस तालुका विशेषांक, सांगली, २००७
१६) दै.लोकमत वर्धापन दिन विशेषांक, १२ ऑक्टोबर २००८
१७) दै.तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक, २००६
१८) दैनिक लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, १२ एप्रिल २००९
१९) दैनिक तरूण भारत, मिरज तालुका विशेषांक, २००७
२०) देसाई संभाजीराव(संपा.), युवकमुद्रा, अर्धवार्षिक मधील लेख, जुलै–डिसेंबर २०१०

## इंग्रजी

1) Indian Social and Economic History Review
2) Journal of Indian History, Trivandrum, Vividhdnyanvistar, Bombay
3) Proceedings of Maharashtra Itihas Parishad

## बहादूरगडावरील शिलालेख




## छंदोगामात्य कविकलश यांनी बहादूरगड येथे औरंगजेब बादशहासमोर म्हटलेले काव्य

## (१५ फेब्रुवारी १६८९)

यावन रावन की सभा संभू वन्ध्यो बजरंग

लहू लसत सिंदूर सम खूब खेल्यो रनरंग

ज्या रवि छवि लखतही खद्योत होत बदरंग

त्यो तव तेज निहार के तखत त्यजो अवरंग

## या कवितेचा अर्थ

यवनरूपी (औरंगजेब)रावणाच्या सभेत बजरंगाप्रमाणेच संभाजीराजांनाही

बंधनात आणण्यात आले आहे . रणरंग खेळल्यामुळे रक्ताळलेले संभाजीचे अंग

शेंदूर फासलेल्या हनुमानाप्रमाणेच दिसत आहे . आकाशात सुर्यादय झाल्यावर

ज्याप्रमाणे काजवे निस्तेज होतात . तद्वत हे संभाजीराजा

तुझ्या तेजामुळे औरंगजेबाने आपल्या तख्ताचा त्याग केला आहे .

## सिंहगड किल्ल्यावरील शिलालेख




या किल्ल्यावर नरवीरांनी भगवा झेंडा फडकविला

रक्त सांडले त्यांनी म्हणुनी आम्हा सुखाचा दिन दिसला

नरविर तानाजी मालुसरे यांनी

प्राणार्पण करून गड जिंकला दि.०४-०२-१६७०

स्वातंत्रययोध्दा नावजी लखमाजी बलकवडे यांनी


त्याच तऱ्हेने गड जिंकला दि.०१-०७-१६९३

आणि छत्रपती राजाराम महाराज यांनी

याच किल्ल्यावर देह ठेवला दि. ०३-०३-१७००

# अजिंक्यतारा किल्ल्यावरील शिलालेख






या लेखाचा अर्थ

१) ऐश्वर्य तुझ्या दारांतून तोंड दाखवीत आहे.

२) तुं विवंचना दूर होण्याचें स्थान युक्त-


आहेस, परंतू पुन्हां विवंचना युक्त आहेस.

३) तुझ्यापासून सर्व विवंचना दूर होतात.

४) हिंमत त्याच्या ह्यरेहानच्याह कामामुळें-

सर्व फुलांना प्रफुल्लित करीत आहे.

## मच्छिंद्रगडावरील शिलालेख




॥ श्री ॥

श्री . मच्छिंद्रनाथ प्रसन्न

मौजें किल्ले मच्छिंद्रगड मजरे लवणमाची

व मजरे बेरडमाची ताो, वाळवे येथील

समस्त लोक व गडकरी यांनी,

श्री . मच्छिंद्रनाथ महाराजांचे शिखर

सन १९३१ सालीं कार्तिक महीन्यांपासून सुरूं केले


व सन १९३६ सालांपर्यंत ९२५१ रूपये

अंग मेहनतीसह खर्च करून काम संपविलें .

मक्तेदार . बाळा सखाराम कुंभार(रजपूत) रा . तासगाव

जनार्धन शिल्पकला भवन पुणे २

## लोहगडावरील शिलालेख



श्री गणेशायनमः गणेश दरवाजा बांधला


बाळाजी जनार्दन फडणीस विदयमान

धोंडो बल्लाळ नीजसुरे प्रारंभ शके १७१२

साधारण नाम संवत्सरे अस्वीन

शुध ९ नवमी रविवार समाप्त शके

१७१६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ सुध त्रयोदशी बुधवार कत (र्त) व्य जयाजी धनराम गव (वं) दी त्रिव (त्रिंब) कजी सुतार जेजुरी गडावरील शिलालेख



श्री मारतंड प्रसन्न

शक १६५४ पत्रधावि नाम संवछरे

भादपद सुध प्रतिपदा

गुरूवार – – – –

दामाजी खंडेराव सुत वाडरा

व लिंगर सकुळ काळ मौजे


चऱ्होली जीत – – – याचा धश्र – – –


– वृंदावन बांधिले आहे

अजिंक्यतारा किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले चारभिंती स्मारक





सातारा येथील चारभिंतीवर झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे कोरलेले चरित्र








महाराष्ट्राचा नकाशा (संदर्भ- डॉ. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २०१२ ) ऑक्टोबर, २००९


PUNE DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
73°20'0"E
73°30'0"E
73°40'0"E
73°50'0"E
74°0'0"E
74°10'0"E
74°20'0"E
74°30'0"E
74°40'0"E
74°50'0"E
75°0'0"E
75°10'0"E
19°50'0"N
19°40'0"N
19°30'0"N
19°20'0"N
19°10'0"N
19°0'0"N
18°50'0"N
18°40'0"N
18°30'0"N
18°20'0"N
18°10'0"N
18°0'0"N
17°50'0"N
17°40'0"N
17°30'0"N
17°20'0"N
N
W
E
S
16
20
3
1
18
8
13
14
7
19
12
4
11
9
5
6
15
10
2
17
INDEX
1. Bhimashankar
2. Jejuri
3. Shivneri
4. Sinhagad
5. Torana
6. Rajgad
7. Lohgad
8. Visapur
9. Purandar
10. Vajragad
11. Mahadaji Shinde Chhatri
12. Kelkar Vastu Sangrahalay
13. Dehu
14. Alandi
15. Baneswar
16. Lenyadri
17. Morgaon
18. Ranjangaon
19. Theur
20. Ozar
SCALE
0 10 20 40 Km


पुणे जिल्हा


SATARA DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
INDEX
1. Shikhar Shinganapur
2. Pratapgad
3. Waicha Ganpati
4. Sajjangad
5. Ajinkyatara
6. Charbhinti
7. Mahuli
8. Yavateshwar
9. Chafal
10. Vairatgad
11. Aundh
12. Jabreshwar
13. Sadashivgad
14. Pali
15. Meruling
16. Adalat Rajwada
17. Shivaji Vastu Sangrahalay
18. Jalmandir
SCALE
0 5 10 20 Km


सातारा जिल्हा


SANGLI DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
N
S
E
W
1
2
3
4
5
6
7
8
9
10
11
12
13
INDEX
1. Prachitgad
2. Machhindragad
3. Koldurg
4. Ramdurg
5. Vilasgad
6. Bahadurgad
7. Juna Panhala
8. Buvaneswar Mandir, Bhilwadi
9. Audumbar
10. Siddhanath Kharsundi
11. Prachin Gunfa Mandir (Dandoba)
12. Revansiddha Mandir, Renavi
13. Mirajecha Bhuikot Killa
14. Sangli Ganpati Mandir
SCALE
0 10 20 40 Km
73°40'0"E
73°50'0"E
74°0'0"E
74°10'0"E
74°20'0"E
74°30'0"E
74°40'0"E
74°50'0"E
75°0'0"E
75°10'0"E
75°20'0"E
75°30'0"E
75°40'0"E
18°30'0"N
18°20'0"N
18°10'0"N
18°0'0"N
17°50'0"N
17°40'0"N
17°30'0"N
17°20'0"N
17°10'0"N
17°0'0"N
16°50'0"N
16°40'0"N
16°30'0"N
16°20'0"N
16°10'0"N
16°0'0"N
15°50'0"N

सांगली जिल्हा


KOLHAPUR DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
INDEX
1. Jyotiba
2. Panhala
3. Pavangad
4. Rangana
5. Vishalgad
6. Bhudargad
7. Gandharvgad
INDEX
8. Mahipalgad
9. Bhaubali
10. Narsobachi Wadi
11. Mahalaxmi
12. Rankala Talav
13. Juna Rajvada (Bhavani Mandap)
14. New Rajvada (Shahu Palace)
SCALE
0 5 10 20 Km
N
S
E
W

कोल्हापूर जिल्हा


SOLAPUR DISTRICT: SELECTED RELIGIOUS AND HISTORICAL PLACES
INDEX
1. Pandharpur
2. Siddheswar Mandir
3. Solapurcha Bhuikot Killa
4. Mangalwedhe
5. Machnoor Killa
6. Pileevchi Gadhi
7. Akkalkot
8. Mohol
9. Dahigaon
10. Velapur
SCALE
0 5 10 20 Km
N
S
E
W

सोलापूर जिल्हा



शिवनेरी किल्ला




पुरंदर किल्ला




तोरणा किल्ला



महादजी शिंदे स्मारक



भिमाशंकर मंदिर




नारायणपूर मंदिर



सातारा किल्ला प्रवेशद्वार



प्रतापगड




औंधचे यमाई मंदिर



शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव मंदिर




सापचा वाडा



सातारा राजवाडा



प्रचितगडावरील तोफा



मच्छिंद्रगडावरील पुरावशेष




खिद्रापूरचे मंदिर



गणपती मंदिर सांगली



पन्हाळा किल्ल्यावरील बाजीप्रभूंचा पुतळा



विशाळगड




महालक्ष्मी मंदिर(कोल्हापूर)




ज्योतिबा मंदिर, वाडी रत्नागिरी



सोलापूरचा किल्ला



पंढरपूर विठ्ठल मंदिर